

**प्रा. डॉ. विलास आघाव**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
आदर्श महाविद्यालय, हिंगोली जि. हिंगोली
(अध्यक्ष, राज्यशास्त्र अभ्यास मंडळ)
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

प्रा. डॉ. विलास आघाव हे आदर्श महाविद्यालय, हिंगोली, जिल्हा हिंगोली येथे उपप्राचार्य, प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग प्रमुख (पदवी, पदव्युत्तर) म्हणून कार्यरत आहेत. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष व विद्या परिषदेचे सदस्य, राज्यशास्त्र विषयातील पीएच.डी. चे संशोधन मार्गदर्शक म्हणून देखील कार्यरत आहेत. ते एक विद्या व्यासंगी व संशोधक वृत्तीचे विद्यार्थी प्रिय अध्यापक आहेत.

विविध पुरोगामी चळवळीतही ते निरंतर कार्यरत आसतात. त्यांनी विविध आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय पातळीवरील अधिवेशने, परिषदा व चर्चासत्रे इत्यादींचे यशस्वीरित्या आयोजन व सक्रीय सहभाग नोंदवून शोधनिबंधाचे वाचन केले आहे. सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील त्यांच्या योगदानाबद्दल आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय व राज्यस्तरीय विविध संस्था व संघटनांनी त्यांना पुरस्काराने सन्मानित केले आहे. त्यांचे अनेक संशोधन पेपर, शोधनिबंध, लेख विविध आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय व राज्यस्तरीय शोधपत्रिकेमध्ये प्रकाशित झाले असून ते विविध संशोधन पत्रिकेचे संपादक व सल्लागार मंडळावर कार्यरत आहेत. महाराष्ट्र राज्यशास्त्र व लोकप्रशासन परिषद या विचारप्रवण संस्थेत देखील ते सक्रीय सहभागी आहेत. स्पर्धा परीक्षा, व्यक्तीमत्व विकास, रोजगार मार्गदर्शन इत्यादी विषयावर बहुसंख्य व्याख्याने दिलेली आहेत. तसेच विविध स्पर्धा परीक्षा पुस्तकांचे व संदर्भग्रंथाचे लेखनही त्यांनी केलेले आहे.

भारतीय संविधान आणि राजकारण या प्रस्तुत ग्रंथाचे संपादन करत असताना त्यांनी घेतलेले मौलिक परिश्रम, संवैधानिक निष्ठा, राजकीय प्रगल्भता आणि वैचारिक विद्वत्ता त्यांच्या निरंतर लेखन प्रक्रियेतून विस्तृतपणे विशद झालेली आहे. या सर्व प्रक्रियेत संपादक म्हणून त्यांनी मुबलक वेळेची उपलब्धता तसेच लेखक, प्राध्यापक, बौद्धिक विचारवंतांच्या लेखन परंपरेस मार्गदर्शन आणि प्रेरणा देण्याचे काम डॉ. विलास आघाव यांनी केलेले आहे. प्रस्तुत संपादित ग्रंथात बहुआयामी विषयांचे मौलिक संकलन व्हावे या हेतू आणि उद्देशाने त्यांनी जाणीवपूर्वक मान्यवर लेखक मंडळीशी संपर्क प्रस्थापित करून लेखन कार्यास बळकटी देण्याचे काम केले आहे. त्यांच्या या परिश्रमाचे आणि कामाचे वाचक वर्ग स्वागत केल्याशिवाय राहणार नाही याची खात्री आहेच.

**Dayadhan Publishers Group**
263, Anudaya, Akola Road, Near Gram Panchayat Office,
Balsond, Hingoli Maharashtra State (India)
7276193979
www.dayadhanpublication.com

**ISBN : 978-93-91097-18-9**

भारतीय संविधान आणि राजकारण | प्रा.डॉ.विलास आघाव (संपादक)




# भारतीय संविधान आणि राजकारण

प्रा.डॉ.विलास आघाव
संपादक

# भारतीय संविधान आणि राजकारण


**संपादक**

**प्रा. डॉ. विलास आघाव**

उप प्राचार्य, राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
आदर्श महाविद्यालय हिंगोली, जि. हिंगोली
(अध्यक्ष, राज्यशास्त्र अभ्यास मंडळ)
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

**दयाधन पब्लिशर्स ग्रुप,**
**भारत सरकारच्या MSME मंत्रालया अंतर्गत मान्यताप्राप्त.**
**नोंदणी क्रमांक MH-12-0001884**

# भारतीय संविधान आणि राजकारण

**प्रा. डॉ. विलास आघाव (संपादक)**

**© सौ. मस्के अनिता दयाराम**

**आवृत्ती** :- पहिली

**प्रकाशिका**

सौ. मस्के अनिता दयाराम

दयाधन पब्लिशर्स ग्रुप, 263, 'अनुदया', अकोला रोड, ग्रामपंचायत कार्यालयाजवळ, बळसोंड, हिंगोली. महाराष्ट्र राज्य, ( भारत) 431513.

Mob. No. 7276193979 (WhatsApp) Call 9371725117

**Email Id**: - dayadhanpublishersgroup@gmail.com

**Website:** - http://www.dayadhanpublication.com

**मुद्रक**

श्रेया प्रिंटर्स, 263, 'अनुदया', अकोला रोड, ग्रामपंचायत कार्यालयाजवळ, बळसोंड, हिंगोली. महाराष्ट्र राज्य, ( भारत) 431513.

**प्रकाशन दिनांक 26/11/2021**

**ISBN 978-93-91097-18-9**

किंमत 225/-

**टीप:-**

प्रस्तुत ग्रंथातील लेखन व पुनर्मुद्रण यांचे सर्व हक्क सौ. मस्के अनिता दयाराम यांच्याकडे राखीव आहेत. लेखन संभ्रमित अथवा सदोष झाल्यास / आढळल्यास यासाठी केवळ लेखक/लेखिकाच जबाबदार असतील. ग्रंथातील भाषा, लेखन आणि आशय याविषयी संपादकप्रकाशक किंवा मुद्रक सहमत असतीलच असे नाही.

**न्यायाधिकरण:-** जिल्हा व सत्र न्यायालय, हिंगोली.

# संपादकीय

भारतीय राज्यघटनेमुळे भारतीयांना समान संधी मिळण्याची संधी निर्माण झालेली आहे. भारतीय राज्यघटनेच्या मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राज्यघटना तयार करताना सर्व जाती-धर्मांतील व्यक्तींचे हित कशा पद्धतीने राखले जाईल याचा विचार केला. जगातील विविध देशांच्या राज्यघटनांचा सखोल अभ्यास करून 'समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय' या तत्त्वांवर अधारित राज्यघटना तयार केली. संपूर्ण भारतीय समाजाला प्रतिनिधीत्व मिळाले पाहिजे, अशी काळजी घेतली. त्यांनी बहुजनांना 'शिका, संघटित व्हा, संघर्ष करा!' हा महान मंत्र दिला. त्यामुळे तळागाळातील समाज शिकला, सावरला, जागरूक झाला, बंगल्याचा मालक झाला. गाडीत फिरू लागला. खासदार, आमदार, मंत्री बनून राज्य करू लागला. ही प्रचंड ताकद भारतीय राज्यघटनेमुळे निर्माण झालेली आहे. राजे, सेनापतींनी ढाल, तलवार, शस्त्रास्त्रे वापरून रक्तरंजित क्रांती केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मात्र 'एक व्यक्ती-एक मूल्य' यावर भर देऊन घटनात्मक तरतुदीद्वारे, शांततेच्या मार्गाने मतदानाच्या माधमातून सत्तापालट करण्याची नवी दिशा दाखवून दिली.

सामाजिक, राजकीय सत्ता पुन्हा आपल्या हाती घेण्यासाठी हे विषमतावादी-धर्मांध लोक देशविघातक कारवाया करू लागले आहेत. बहुजनांना पुन्हा तळागाळात डांबून ठेवून त्यांना गुलाम करावे, या हेतूने हे धर्मांध पछाडलेले आहेत. यासाठी ते आज राष्ट्रीय पातळीवर नव-नवीन समीकरणे निर्माण करीत आहेत. अशा समीकरणांमध्ये नेहमीच वैचारिक राजकीय गोंधळ करण्याचा प्रयत्न होत आहे. या गोंधळातून भारतीयांनी बाहेर पडण्याची आता वेळ आलेली आहे. राज्यघटनेमुळे अलीकडच्या 15 - 20 वर्षांत अनेकांना पोटदुखी होऊ लागली. मनुवादी डोक्यात राज्यघटना बदलण्याचा डाव शिजतो आहे. म्हणूनच अधूनमधून राज्यघटना कालबाह्य झाली आहे, असा सूर निघतो आहे. या लोकांना खरे संविधान समजलेच नाही, असे माझे मत आहे. स्वातंत्र्यापूर्वी या देशात 157 पेक्षा अधिक संस्थाने राज्य होती.

या सर्वांना एकत्र आणून सार्वभौम राष्ट्र निर्माण करण्याचे महान कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले. हा देश केवळ भारतीय राज्यघटनेमुळे एकसंघ आहे, हे माहीत असूनही काही संधीसाधु लोक संविधानाला बदनाम करू पाहात आहेत. एकीकडे राज्यघटना बदलण्याची भाषा वारंवार चालू असताना दुसरीकडे स्वत:ला आंबेडकरवादी

म्हणून घेणारे काही संधीसाधू पुढारी प्रतिगाम्यांशी सलगी करून प्रतिक्रांतीला खतपाणी घालण्याचे काम करताना दिसत आहेत.

'भारतीय संविधान आणि राजकारण' या संपादित ग्रंथाचे संपादन करताना सर्व सहकारी, विषय बंधू आणि अभ्यासक यांच्या अतुलनीय सहकार्य आणि योगदानातून प्रस्तुत संदर्भ ग्रंथ प्रकाशित होत आहे याचा मला मनस्वी आनंद होत आहे. भारतीय संविधान, मानव अधिकार, मूलभूत हक्क, मार्गदर्शक तत्व, नीती आयोग, नियोजन आयोग, मूलभूत कर्तव्य, भारतीय राजकारण व त्याचे बदलते स्वरूप या सर्व घटकांचा सविस्तर आढावा प्रस्तुत संपादित ग्रंथात घेण्यात आलेला आहे.

राज्य लोकसेवा आयोग आणि केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या राजपत्रित व अराजपत्रित पदांच्या परीक्षांच्या निवडीसाठी भारतीय संविधान आणि राजकारण या विषयाचे सर्व घटक प्रस्तुत ग्रंथात समाविष्ट करण्यात आलेले आहेत. या घटकांचा अभ्यास करण्यासाठी महाराष्ट्र राज्यातील सर्व विद्यापीठांच्या अभ्यासक्रमास पूरक आणि तत्सम घटकांचे अवलोकन करण्यासाठी हा ग्रंथ उपयुक्त ठरेल असा आशावाद व्यक्त करतो.

प्रस्तुत संपादित ग्रंथ आपल्या सर्वांच्या सहकार्याशिवाय पूर्ण होणे शक्यच नाही. सर्व लेखक, मान्यवर बंधू-भगिनी आपले मनःपूर्वक आभार व्यक्त करतो. या संदर्भ ग्रंथाचे संपादन करण्याची महत्त्वपूर्ण कार्यात्मक जबाबदारी माझ्यावर सोपवलेले दयाधन पब्लिशर्स ग्रुपचे कार्यकारी संचालक डॉ. दयाराम मस्के आणि प्रकाशिका सौ अनिता दयाराम मस्के यांचे आभार व्यक्त करणे मी माझे कर्तव्य समजतो. यापुढील लेखन व संपादन कार्यातही आपल्या सर्वांचे भरीव योगदान आणि सकारात्मक प्रतिसाद कायम राहील हा आशावाद व्यक्त करतो. आपल्या सर्वांना संविधान दिनाच्या मनःपूर्वक शुभेच्छा व्यक्त करतो.

**प्रा. डॉ. विलास आघाव**
(राज्यशास्त्र विभाग प्रमुख)
आदर्श महाविद्यालय, हिंगोली,
जि. हिंगोली 431513
मो. नं. 9922228656

**दिनांक २६-११-२०२१**

# अनुक्रमणिका


| अ. क्रं. | शीर्षक | लेखक | पृष्ठ क्रं. |
|---|---|---|---|
| १ | महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) | डॉ.रविंद्र भणगे | १-१३ |
| २ | घटना दुरुस्ती व मुलभूत हक्क | प्रा. डॉ. शुभांगी दिनेश राठी | १४-१९ |
| ३ | मुलभूत अधिकार | प्रा.डॉ.विलास आघाव | २०-२४ |
| ४ | भारतीय संविधान आणि राजकारण संविधानाचे तत्वज्ञान (धर्मनिरपेक्षता, लोकशाही आणि समाजवाद) | प्रा. डॉ. कविता सोनकांबळे | २५-३१ |
| ५ | भारतीय राज्यघटनेतील मुलभूत हक्क आणि मार्गदर्शक तत्वे यांचा विश्लेषणात्मक् अभ्यास | डॉ. संभाजी संतोष पाटील | ३२-३८ |
| ६ | निवडणूक आयोग व निवडणूक पद्धती | प्रा. डॉ.विजयकुमार सोन्नर | ३९-४३ |
| ७ | भारतीय संविधानाचे प्रमुख वैशिष्ट्ये | प्रा. डॉ. बी. एम. नरवाडे | ४४-४९ |
| ८ | हिंगोली जिल्ह्यामधील मतदारांच्या राजकीय उदासीनतेचा चिकित्सक अभ्यास | आकाश शेषेराव बांगर | ५०-५२ |
| ९ | भारतीय राजकारणाचे बदलते स्वरूप | प्रा.डॉ.लक्षटे आर.बी. | ५३-५७ |
| १० | भारतीय संविधानाची निर्मिती आणि स्त्रोत | प्रा.डॉ.पांडुरंग नेवरकर | ५८-६८ |
| ११ | भारतीय संविधानातील मुलभूत अधिकार | डॉ. रमेश शेवाळे | ६९-७९ |
| १२ | धर्मनिरपेक्षत: राज्यघटनेचे मुलभूततत्वज्ञान | प्रा. के. एच. वाघमारे | ८०-८४ |
| १३ | मानवाधिकार आणि भारतीय महिला | डॉ.मलदोडे साहेबराव रामराव | ८५-९० |
| १४ | लोकन्यायालय | डॉ. विलास आघाव<br>चौधरी संदीप जनार्धन | ९१-९५ |
| १५ | भारतीय संघराज्याचे बदलते प्रारूप | प्रा. डॉ. अर्जुन गंगाराम येरगे | ९६-१०१ |
| १६ | भारतीय संविधानातील मुलभूत अधिकाराची फलनिष्पत्ती | डॉ. सत्यवान नामदेव रेपे | १०२-१०८ |
| १७ | संघराज्य शासन आणि भारतीय संघराज्याचे स्वरूप | डॉ. अरूण पेंटावार | १०९-११३ |

| | | | |
|---|---|---|---|
| १८ | भारतीय राज्यघटनेची वैशिष्ट्ये | डॉ श्रीनिवास भोंग | ११४-११९ |
| १९ | विधानसभा कामकाज प्रक्रिया आणि संसदीय आयुधे | प्रा.डॉ. सुखनंदन ढाले | १२०-१२५ |
| २० | तीन केंद्रिय घटनात्मक संस्थाचे अधिकार व स्वायत्ता : एक दृष्टिक्षेप | डॉ. चंद्रशेखर शंकरराव ढोले | १२६-१२९ |
| २१ | भारतीय संविधानाची उददेशपत्रिका | सुभाष किसनराव पोले | १३०-१३४ |
| २२ | भारतीय संविधानातील नागरिकांचे मुलभूतहक्क | प्रा. डॉ. नवनाथ गोविंदराव अडकिणे | १३५-१३९ |
| २३ | लोकशाही आणि मुलभूत कर्तव्य | डॉ. रेखा रामनाथ बने | १४०-१४२ |
| २४ | निती आयोग | डॉ. कोनेरू बाबान्ना डुमलवाड | १४३-१४७ |
| २५ | लोकशाही आणि निवडणूक प्रक्रिया | प्रा ज्ञानेश्वर बनसोडे<br>डॉ. महादेव गव्हाणे | १४८-१५० |
| २६ | कलम ३७० आणि संयुक्त राष्ट्र | प्रा.डॉ.विनोद गायकवाड | १५१-१५४ |
| २७ | केंद्र-राज्य संबंध | प्रा. डॉ. दिनकर संतुकराव कळंबे | १५५-१६१ |
| २८ | भारतीय संविधानातील समता: एक विचार | डॉ. रजनी अ. बोरोळे | १६२-१६६ |
| २९ | खाजगीपणाचा अधिकार | डॉ. प्रशांत विघे | १६७-१७३ |
| ३० | भारतीय राज्यघटनेची वैशिष्टये | डॉ. विकास बी. चांदजकर | १७४-१७७ |
| ३१ | महाराष्ट्र विधानसभा | डॉ. मनीषा शंकर यादव | १७८-१८३ |
| ३२ | रोजगार हमी योजनेत ग्रामपंचायतीची भूमिका | प्रा.सुनील कांशिराम राठोड | १८४-१८७ |
| ३३ | निर्वाचन सुधारणा | प्रा. डॉ. आर. जी. सुरळकर | १८८-१९२ |
| ३४ | शिक्षण हक्क उपलब्धी आणि आव्हाने | प्रा. डॉ. डोंगरे एल. बी. | १९३-१९८ |
| ३५ | न्यायमूर्ती सरकारिया आयोगाच्या मुख्य शिफारशी | प्रा. ढोबळे डी. बी. | १९९-२०६ |
| ३६ | माहिती अधिकार कायदा २००५ : मधील संशोधन | प्रा.डॉ.आंधळे बी.व्ही. | २०७-२१० |
| ३७ | भारतीय संसद आणि न्यायालयीन सक्रियता | डॉ. संतोष कोल्हे | २११-२१५ |
| ३८ | केंद्र-राज्य यांचे प्रशासकीय, कार्यकारी आणि आर्थिक संबंध | डॉ. सुनिल पिंपळे | २१६-२२१ |

| | | | |
|---|---|---|---|
| ३९ | राष्ट्रीय अनुसूचित जनजाती आयोग | प्रा.डॉ. पी.एस.लांडगे | २२२-२२४ |
| ४० | प्रधानमंत्री: कार्य व भूमिका | डॉ. प्रेम प्रकाश | २२५-२३१ |
| ४१ | Salient Features of Indian Constitution | Dr. Meenal. K. Kshirsagar | २३२-२३७ |
| ४२ | Judicial Review and the Doctrine of Basic Features (Keshvanand Bharati, Maneka versus State of Madras Minerva Millas) | Dr. Harshvardhan S. Kolhapure | २३८-२४२ |
| ४३ | Conceptualizing Indian Citizenship: Constitutional and Legal Perspective | Mr. Yogesh Sangale, Ms. Mugdha Hedau, | २४३-२४७ |
| ४४ | The Panchayat Raj System in India: Especially Reference of the PESA Act, 1996. | Dr. Sham Kadam, Asst.Prof. Rohit Bhaskar Jadhav | २४८-२५९ |
| ४५ | Indian Constitution and Politics<br>Right to Work (MGNREGA) | Dr. Megha Sharadchandra Pathak | २६०-२६२ |
| ४६ | Human Rights Violation – A Curse to Humanity | Dr. Mamta Madhukar Deshmukh | २६३-२६७ |

# १. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा)

**डॉ.रविंद्र भणगे**
प्राध्यापक व विभाग प्रमुख , राज्यशास्त्र विभाग
समन्वयक, नेहरू अभ्यास केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
Ravindrabhanage105@gmail.com

**प्रस्तावना :**

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारत सरकारने देशाचा आर्थिक विकास घडवून आणण्याच्या दृष्टीकोनातून नियोजन सुरू केले. १९५१ साली सुरू झालेल्या पहिल्या पंचवार्षिक योजनेपासून अलीकडील निती आयोगाच्या नियोजनावर दृष्टी टाकता असे लक्षात येते की, कृषी, औद्योगिकीकरण आणि सेवा क्षेत्राचा विकास काहीशा प्रमाणात झालेला असून त्यामुळे दळणवळण व वाहतुकीची साधने मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे. याचाच परिपाक म्हणजे राष्ट्रीय उत्पन्न, दरडोई उत्पन्न व लोकांच्या राहणीमानात झालेला बदल होय. आतापर्यंत झालेल्या बारा पंचवार्षिक योजनांमध्ये ग्रामीण विकासाबाबत मोठ्या प्रमाणात नियोजन करण्यात आले. परंतु आजही दारिद्र्य, बेकारी आणि उपासमार या समस्या दूर झाल्या नाहीत. एकीकडे नागरी क्षेत्रात विवीध सोयी-सुविधांमध्ये भरघोस वाढ होत आहे. परंतु दुसरीकडे ग्रामीण क्षेत्रात मात्र किमान आवश्यक गरजांची पूर्ततासुद्धा होत नाही. असे विदारक चीत्र दृष्टीक्षेपास पडते. या प्रश्नाचा गंभीरपणे विचार करणे आवश्यक आहे. भारताच्या एकूण लोकसंख्येच्या ७० टक्के जनता ही ग्रामीण क्षेत्रात वास्तव्यास आहे आणि या ग्रामीण जनतेचा मुख्य व्यवसाय शेती हा आहे.

प्रत्येक पंचवार्षिक योजनेमध्ये ग्रामीण विकासाच्या दृष्टीकोनातून नव-नवीन योजना राबविण्यात आल्या. ज्यामध्ये प्रामुख्याने सामुदायीक विकास कार्यक्रम (१९५२), राष्ट्रीय विस्तार सेवा (१९५३), खादी व ग्रामोद्योग कार्यक्रम (१९५७), बहुउद्देशीय आदिवासी विकास कार्यक्रम (१९५९), अवर्षण प्रवण कार्यक्रम (१९७०), किमान गरजा कार्यक्रम (१९७२), डोंगरकडा विकास कार्यक्रम (१९७५), कामासाठी धान्य कार्यक्रम (१९७७), एकात्मीक ग्रामीण विकास कार्यक्रम (१९७९), ट्रायसेम (१९७९) व राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (२००५) इत्यादी कार्यक्रमांद्रारे केंद्र सरकारने "आर्थिक योजनेच्या माध्यमातून लोकांच्या जीवनमानात असलेली दरी कमी करण्यासाठी सतत प्रयत्न केला गेला आहे. या कार्यक्रमांद्वारे भारत सरकारने ग्रामीण भागातील सर्वात विकलांग व आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या शेतमजुरांच्या वर्गाला आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविण्याचा प्रयत्न केलेला आहे.

बेरोजगारीच्या विळख्यात अडकलेल्या ग्रामीण जनतेला बाहेर काढण्याच्या उद्देश्याने भारत सरकारने २००३ साली जाहीर केलेल्या 'समान किमान कार्यक्रमा' अंतर्गत राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी विधेयक मांडून ५ सप्टेंबर २००५ रोजी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम तयार केल्यानंतर २ फेब्रुवारी २००६ पासुन देशाच्या २०० जिल्ह्यांमध्ये राबविण्यास सुरूवात झाली. तर १ एप्रिल २००८ पासुन देशाच्या सर्व जिल्ह्यांमध्ये ही योजना लागू केली आहे. मागेल त्याला काम या तत्त्वावर आधारलेल्या या योजनेत नोंदणीकृत कुटुंबातील वित्तीय वर्षात किमान १०० दिवस (केंद्रीय निधीतून) अकुशल रोजगाराची हमी आणि उर्वरित दिवसासाठी राज्य निधीतून अकुशल रोजगाराची हमी दिली जाते. कायदा पारित झाल्यानंतर बारमाही विकासाची, कष्टकरी, गरजूंना रोजगार पुरवणारी योजना म्हणून राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचा उगम झाला. केंद्राच्या व राज्यांच्या रोजगार निर्मितीच्या सर्व योजना एकत्रीत करून त्यातील चांगल्या तरतुदींचा लाभ ग्रामीण भागातील मजुरांना देणारी ही एक व्यापक व अभिनव अशी योजना आहे. आज ही योजना राष्ट्रीय स्तरावरील रोजगार योजनांची प्रेरक ठरली. दि. ०२ ऑक्टोबर २००९ पासुन या योजनेस महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) म्हणून संबोधले जाते.

**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा-२००५ मधील तरतुदी :**

१) ग्रामीण क्षेत्रातील कुटुंबांना निर्वाहासाठी सुरक्षितता मिळावी यासाठी अंगमेहनतीचे अकुशल काम करण्यास तयार असणाऱ्या प्रत्येक कुटुंबास एका आर्थिक वर्षात १०० दिवसाचा रोजगार देण्याची हमी या कायद्यामध्ये करण्यात आलेली आहे.

२) मनरेगाची व्याप्ती ही ग्रामीण क्षेत्रापुरतीच मर्यादित असून शहरी भागाचा यात समावेश नाही.

३) ग्रामपंचायत स्तरावर घ्यावयाच्या कामाची निवड ग्रामसभेत होत असल्यामुळे कामांच्या निवडीत ग्रामस्थांची मुख्य भूमिका असते. तालुका पातळीवरील नियोजन आराखड्यात पंचायत समिती तर जिल्हा पातळीवरील आराखड्यात जिल्हा परिषद मंजुरी देत असल्यामुळे मंजुरीसाठी विलंब होत नाही.

४) मंजूर कामांच्या ५० टक्के खर्चाची कामे ग्रामपंचायतीमार्फत केली जातात तर उर्वरित ५० टक्के कामे ही शासनामार्फत केली जात आहेत.

५) कुशल व अकुशल कामाचे प्रमाण ६०:४० असे आहे.

६) महिलांचा आर्थिक व सामाजिक विकास व्हावा याकरिता मनरेगा अंतर्गत एकूण लाभार्थ्यांपैकी एक तृतीयांश महिला असाव्यात अशी तरतूद आहे.

७) समाजातील मागासवर्गाचे विशेष हित, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व महिलांचे सबलीकरण करण्याचा प्रयत्न मनरेगामधून करण्यात आलेला आहे.

८) किमान वेतन कायदा १९४८ नुसार कामाची मजुरी ६० रूपयापेक्षा कमी नसावी.

९) स्त्री-पुरूषांना समान कामासाठी समान वेतन दिले जाते.

१०) कामाची मजुरी थेट बँक किंवा पोस्ट खात्यात जमा होते.

११) काम झाल्यानंतर १५ दिवसापर्यंत कामाची मजुरी वाटप करणे बंधनकारक आहे. अन्यथा मजुरी देय कायदा १९३६ च्या तरतुदीनुसार मोबदला देय आहे.

१२) कामासाठी अर्ज केल्यापासुन १५ दिवसाचे आत काम उपलब्ध करणे बंधनकारक आहे. अन्यथा पहिल्या ३० दिवसांपर्यंत किमान वेतनाच्या २५ टक्के दराने तर पुढील १०० दिवसापर्यंत ५० टक्के दराने बेरोजगार भत्ता देण्याची तरतूद केली आहे.

१३) मनरेगाच्या कामावर एखाद्या मजुराचा दुर्दैवी मृत्यू झाल्यास रूपये २५,०००/- सानुग्रह अनुदान दिले जाते.

१४) कामाचे ठिकाण ग्रामपंचायतीच्या ठिकाणापासून ५ कि मी. च्या आत असणे आवश्यक. ५ कि.मी. पेक्षा जास्त अंतर असल्यास दैनीक मजुरी दरापेक्षा १० टक्के अधिक दराने वेतन देय असेल.

१५) ग्रामसभेला कामे मंजुर करणे, कामावर देखरेख करणे आणि सोशल ऑडिटचे अधिकार प्रदान केले आहेत.

१६) मनरेगा कलम १७(२) अन्वये सामाजिक लेखा परिक्षण करणे बंधनकारक आहे.

१७) कामाच्या ठिकाणी पाच पेक्षा अधिक मुले असल्यास त्यांना सांभाळण्यासाठी एक आया ठेवण्याची मुभा दिली आहे.

**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची उद्दिष्ट्ये :**

ग्रामीण क्षेत्रातील बेरोजगार श्रमिकांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी या योजनेची अंमलबजावणी करण्यात आलेली आहे. या योजनेच्या कार्यान्वयासाठी पुढील उद्दिष्ट्ये निश्चित करण्यात आली आहेत.

१) ग्रामीण भागातील अकुशल काम करण्यास इच्छुक असणाऱ्या प्रत्येक कुटुंबातील प्रौढ व्यक्तीला योजनेअंतर्गत १०० दिवस प्रतिकुटुंब रोजगाराची हमी देणे.

२) योजने अंतर्गत केल्या गेलेल्या कामातून गावासाठी स्थायी स्वरूपाची मालमत्ता निर्माण करणे.

३) ग्रामीण भागातील शेतकरी/शेतमजुरांना या अधिनियमाच्या माध्यमातून रोजगाराचा हक्क प्रदान करणे.

४) सामाजिक सुरक्षा देणे.

५) महिला व दुर्बळ घटकांचे सबलीकरण करणे.

६) पंचायतराज संस्थांचे बळकटीकरण करणे.

७) जिल्ह्यात हाती घेण्यात येणाऱ्या सर्व कामांच्या एकूण किंमतीच्या प्रमाणात कमीतकमी ६० टक्के कामे ही उत्पादक स्वरूपाची मालमत्ता निर्माण करणारी असावी.

८) कामे ही भूमी, जल व वृक्ष यांचा विकास करणारी कृपी व कृषिसंलग्न क्षेत्राशी निगडीत असावी.

 ISBN No. 978-93-91097-18-9

**मनरेगाची वैशिष्ट्ये :**

मनरेगा योजना ही 'मागेल त्याला काम' या वैशिष्ट्यावर आधारलेली असली तरी रोजगार उपलब्ध करून देण्यासोबतच ग्रामीण जनतेला स्वावलंबी बनवीणे, मानवी हक्कांची प्रतिष्ठा राखणे, आर्थिक सक्षमीकरण तसेच महिलांना सक्षम बनविण्याचे कामही मनरेगा योजनेच्या माध्यमातून होत असल्याचे लक्षात येते. मनरेगा योजनेची काही ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) ग्रामीण क्षेत्रात वास्तव्यास असणाऱ्या प्रत्येक प्रौढ व्यक्तीला १०० दिवसाच्या रोजगाराची हमी देणे.

२) प्रत्येक नोंदणीकृत कुटुंबाला एक जॉब कार्ड देण्यात येईल जे पुढील पाच वर्षासाठी वैध असेल.

३) प्रत्येक जॉब कार्डधारक ग्रामपंचायत कार्यालयात जाऊन कामाची मागणी करू शकतो.

४) कामासाठी अर्ज केल्यावर पोचपावती मिळते.

५) कामासाठी अर्ज केल्यापासुन १५ दिवसाचे आत रोजगार उपलब्ध करणे बंधनकारक आहे.

६) १५ दिवसात काम न मिळाल्यास बेरोजगारी भत्त्याचे प्रावधान केले आहे.

७) कामाचे ठिकाण हे ग्रामपंचायतीपासुन ५ कि.मी. अंतरापेक्षा जास्त नको.

८) कामाचे ठिकाण ५ किमी. पेक्षा जास्त अंतरावर असल्यास प्रवास भत्त्याचे प्रावधान केल आहे.

९) मजुरी ही प्रत्यक्ष कामाच्या गुणवत्तेवर व प्रमाणावर अवलंबून असते.

१०) कामाच्या ठिकाणी पिण्याचे पाणी व वेदना, आजारपण किंवा छोटया जखमेसाठी प्रथमोपचार पेटीची तरतूद.

११) कामाच्या ठिकाणी ५ पेक्षा अधिक लहान मुले असतील तर त्यांच्या देखभालीसाठी एका स्त्रीची निवड केली जाते.

१२) एकूण मजुर संख्येच्या १/३ इतकी महिलांची संख्या अनिवार्य आहे,

१३) कामाची मजुरी सरळ बॅक किंवा टपाल खात्यात जमा होते.

१४) या योजनेअंतर्गत हाती घेतलेली सर्व कामे कोणत्याही कत्राटदारामार्फत न करता विभागाकडून केली जातात.

१५) पारदर्शकता राखण्यासाठी सामाजिक लेखा परिक्षणाची तरतूद केलेली आहे.

१६) मजुरांना कामावर अपघात झाल्यास सानुग्रह देण्याची तरतुद आहे.

अशाप्रकारे ‘‘मजुरांना कामाची मागणी करण्याचा आणि मागितल्यानुसार काम मिळण्याचा कायदेशीर हक्क हे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायद्याचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य आणि वेगळेपणही आहे. या आधी राबवील्या गेलेल्या इतर कोणत्याही रोजगार कार्यक्रमात अशी तरतुद नव्हती.

**मनरेगा अंतर्गत काम मिळविण्यासाठीची प्रक्रिया :**

**नोंदणी ;**

मनरेगा अंतर्गत काम मिळविण्यासाठी सर्वप्रथम नोंदणी करणे महत्वपूर्ण आहे. ही नोंदणी करण्यासाठी स्थानिक ग्राम पंचायत कार्यालयात साध्या कागदावर किंवा ग्रामपंचायतीमध्ये उपलब्ध नमुन्यावर अर्ज करून करता येते. नोंदणीचा अर्ज कुटुंबाला एकत्रीतपणे तसेच कोणत्याही ग्रामीण प्रौढ व्यक्तीला स्वतंत्रपणे करता येतो. हा नोंदणी अर्ज ग्रामपंचायत कार्यालय प्रमुख किंवा सचिव यांना देता येतो. अर्जामध्ये कुटुंबाच्या त्या सर्व सदस्यांची नावे द्यायची आहे, जे कायद्यानुसार अंगमेहनतीची कामे करण्यास तयार आहेत. त्यासोबतच सदस्यांचे वय, लिंग, जाती समूह (अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती) याची नोंदणी आवश्यक आहे. नोंदणी प्रक्रिया ही ग्रामपंचायत कार्यालयात वर्षभर सुरू असेल तसेच इच्छुक व्यक्तींकडून जॉबकार्डसाठी तोंडी अर्ज देखील स्वीकारण्याची तरतूद केली आहे व अशा तोंडी अर्जाचा अन्य अर्जाप्रमाणेच स्वीकार करून त्याची नोंद घेण्याचे बंधन ग्रामपंचायतीला आहे. ग्रामीण कुटुंबाला कायद्यान्वये नोंदणी करवून घेण्याचा अधिकार आहे. परंतु ग्रामपंचायतीने स्वत: विशेष बैठका घेऊन व घरोघरी सर्वेक्षण करून कुटुंबांना नोंदणीसाठी प्रोत्साहीत करावे. केवळ त्यांच्याकडून अर्ज येण्याची वाट पाहू नये.

**नोंदणी अर्जाची पडताळणी :**

नोंदणी अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्वरीत ग्रामपंचायतीमाफत आलेल्या अर्जाची पडताळणी केली जाते. त्यामध्ये नियमानुसार सर्व अटींची पूर्तता करण्यात आली की नाही हे प्रामुख्याने तपासले जाते, ज्यात मुख्यत्वे :

- ❖ अर्जदार ग्रामपंचायतीचा स्थानिक निवासी आहे अथवा नाही.
- ❖ अर्जामध्ये नमूद कुटुंबातील सर्व सदस्य प्रौढ म्हणजेच १८ वर्षाहून अधिक वयाचे आहे अथवा नाही.
- ❖ सर्व सदस्य एकाच कुटुंबाचे आहे अथवा नाही.

या बाबींची पडताळणी केली जाते. अर्जदाराने स्वत:च्या किंवा अन्य सदस्याच्या नावाबाबत किंवा निवासस्थानाबाबत चुकीची नोंद केली असल्यास ग्रामपंचायत खंड कार्यक्रम अधिकारी या संदर्भात कार्यवाही करू शकतात. अर्जाच्या पडताळणीनंतर सर्व कुटुंबाची नोंदणी ग्रामपंचायतीतील नोंदणी वहीमध्ये करण्यात येते. प्रत्येक नोंदणीकृत कुटुंबाला एक स्वतंत्र नोंदणी क्रमांक देण्यात येतो. हा क्रमांक बी.पी.एळ. जनगणना २००२ साठी निर्धारीत सांकेतिक पद्धतीच्या अनुसार राहील. या सांकेतांकात १९६ अंक आहेत, राज्य सांकेतांक (२ अंक), जिल्हा सांकेतांक (३ अंक), खंड सांकेतांक (३ अंक), ग्रामपंचायत सांकेतांक (३ अंक), गावांचा सांकेतांक (२ अंक) आणि कुटुंब ओळख संख्या (३ अंक) याप्रमाणे असतो.

**रोजगार पत्रक :**

पडताळणीनंतर प्रत्येक नोंदणीकृत कुटुंबाला एक जॉबकार्ड प्रदान केले जाते. हे जॉबकार्ड पाच वर्षासाठी वैध असते. अर्ज केल्याच्या १५ दिवसात जॉबकार्ड जारी करणे

अनिवार्य आहे. जॉबकार्डवर कुटुंबातील नोंदणी केलेल्या प्रत्येक सदस्यांचा फोटो असतो. जॉबकार्ड तयार झाल्यानंतर ते स्थानिक समुदायाच्या उपस्थितीत वितरीत केले जाते. जॉबकार्डमधील महत्वपूर्ण नोंदीमध्ये जॉबकार्ड क्रमांक, जॉबकार्ड जारी केल्याची तारीख, जॉबकार्ड धारक कुटुंबाची संपूर्ण माहिती व जॉबकार्ड जारी करणाऱ्या अधिकाऱ्याची स्वाक्षरी याचा समावेश होतो.

जॉबकार्ड हे मनरेगा योजनेच्या कार्यान्वयातील सर्वात महत्वपूर्ण दस्तऐवज आहे. हे जॉबकार्ड निःशुल्क वितरीत केले जाते. जॉबकार्डमुळे मजुरांना कुठल्याही प्रकारच्या फसवणूकीला बळी पडण्यापासून वाचवता येते. जॉबकार्डमुळे मनरेगाच्या अंमलबजावणीत पारदर्शकता राखता येते. जॉबकार्ड हे मजुराकडेच असले पाहिजे ते कोणत्याही परिस्थितीत अन्य व्यक्ती आपल्याकडे ठेवू शकत नाही. जॉबकार्डची वैधता ही पाच वर्षाची असल्यामुळे प्रत्येक पाच वर्षानंतर जॉबकार्ड अद्यावत करणे अनिवार्य आहे. घरातील एखादा सदस्य प्रौढ झाल्यास, एखाद्या सदस्याचा मृत्यु झाल्यास किंवा विवाहामुळे एखादा सदस्य कमी झाला किवा वाढला असता त्याची नोंद अद्यावत करताना जॉबकार्डमध्ये करावी. ग्रामपंचायतीतर्फे दरवर्षी अद्यावत प्रक्रिया केली जाते. जॉबकार्डमध्ये एखादी गोष्ट समाविष्ट केल्यानंतर किंवा काढल्यानंतर त्याची माहिती ग्रामसभेसमोर मांडणे आवश्यक असते. अशा बदलांची माहिती ग्रामपंचायतीमार्फत कार्यकम अधिकाऱ्याकडे पाठवीली जाते. ज्यामुळे अधिकृत कागदपत्र अद्यावत करणे सोयीचे जाते.

**कामाची मागणी :**

मनरेगा अंतर्गत प्रत्येक जांबकार्डधारक कुटुंबातील सदस्य कामाच्या मागणीचा अर्ज ग्रामपंचायतीकडे करू शकतो. ही मागणी कमीत कमी १४ दिवसांच्या कामाची असली पाहिजे. कामासाठी करावयाचा अर्ज हा ग्रामपंचायतीमध्ये उपलब्ध छापील नमुन्यावर किवा साध्या कागदावरही केला जाऊ शकतो. ज्या लोकांना लिहिता वाचता येत नाही अशा लोकांनी मौखिक अर्ज केल्यास त्यालाही इतर अर्जाप्रमाणे मानले जाते व त्याची नोंद घेतली जाते. अर्जावर जॉबकार्ड क्रमांक, कोणत्या दिवसापासून काम हवं आहे आणि किती दिवसासाठी काम हवं आहे हे स्पष्टपणे नमूट कलेले असले पाहिजे.

कामाच्या मागणीसाठी व्यक्तीगत अर्जाव्यतिरिक्त सामुहीक अर्ज देखील करता येतो. तसेच जर एखादी व्यक्ती काही कारणास्तव अर्जाची प्रक्रिया आधी पूर्ण करू शकली नसेल व ती व्यक्ती सरळ कामाच्या ठिकाणी जाऊन कामाची मागणी करत असेल तर अशा व्यक्तीचे नावही हजेरी वहीमध्ये नोंदवीले जाते.

**पोचपावती :**

कामासाठी अर्ज केल्यापासून १५ दिवसाचे आत अर्जदाराला काम उपलब्ध करून देणे ही ग्रामपंचायतीची जबाबदारी आहे. असे न झाल्यास अर्जदारास १५ दिवसानंतर बेरोजगारी भत्ता देण्याचे प्रावधान अधिनियमात केले आहे. यासाठी ज्या कोणी कामासाठी अर्ज केलेला

असेल त्याला पोचपावती देणे त्यावर तारीख आणि अर्ज स्वीकारणाऱ्याची स्वाक्षरी असणे ही ग्रामपंचायतीची कायदेशीर जबाबदारी आहे.

**विकास योजना व प्रकल्पाची यादी तयार करणे :**

मनरेगा योजनेअंतर्गत प्रत्येक ग्रामपंचायतीला विकास योजना तयार करावी लागते. ज्यामध्ये प्रस्तावीत कार्याचा (प्रकल्पाची यादीचा) समावेश असेल. ही यादी १५ ऑक्टोबरपर्यंत तयार करावी जेणेकरून पुढील वर्षी प्रस्तावीत कामाची अंमलबजावणी करण्यासाठी मंजुरीसाठी कार्यक्रम पदाधिकाऱ्याकडे पाठवीता येऊ शकेल. प्रकल्पांची यादी ही प्रशासनीक व तांत्रिक मान्यता मिळालेली ग्राम-निहाय कामाची यादी होय. या यादीमधील कामांना मागणीनुसार त्वरीत सुरू करता येते. ज्या वर्षात काम करायचे आहे त्याच्या आधीच ३१ डिसेंबरपर्यंत अशी प्रकल्पाची यादी तयार करण्यात येते.

**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत अनुज्ञेय कामे**

प्रवर्ग अ : नैसर्गिक साधनसंपत्ती व्यवस्थापनाशी संबंधित सार्वजनिक बांधकामे

१) पेयजल स्त्रोतांसह भूजलाचे पूणर्भरण करण्यावर विशेष भर देऊन भूमीगत पाट, मातीची धरणे, संरोधी धरणे यासारखी भूजल स्तर वाढविणारी व त्यात सुधारणा करणारी जलसंधारणाची व जलसंचयाची बांधकामे.

२) व्यापक पाणलोट क्षेत्र प्रक्रीया करता येईल असे समतल चर, मजगी घालणे, समतळ बांध, दगडी संरोधक, दगडमातीचे कक्षबांध (गॅबीयण संरचना) आणि पाणलोट विकासाची कामे यासारखी जलव्यवस्थापन विषयक कामे.

३) सुक्ष्म व लघु पाठवंधाऱ्याची कामे आणि सिंचन कालवे व नाली बांधणे, त्याचे नुतनीकरण करणे व परिक्षण करणे.

४) सिंचन तलाव व इतर जलाशये यामधील गाळ उपसण्यासह पारंपारीक जलाशयाचे नुतनीकरण करणे.

५) परिच्छेद ४ मध्ये अंतर्भूत असलेल्या कुटुंबांना फलोपयोग घेण्याचा रितसर हक्क मिळवून देईल असं सर्वसामान्य व वन जमिनीवरील सडक पट्ट्या, कालवा बांध, तलाव अग्रतट (टँक फोरशोअर) आणि किनारी पट्टे यावरील वणरोपण, वृक्षारोपण आणि फलोत्पादन करणे.

६) सामुहिक जमिनीवरील भूविकासाची कामे करणे.

**प्रवर्ग ब : दुर्बळ घटकाकरीता व्यक्तीगत मत्ता (फक्त परिळछेद ४ मध्ये उल्लेखिलेल्या कुटुंबाकरीता)**

१) भूविकासामार्फत तसेच खोद विहिरी, शेततळी व इतर जल संचयाच्या संरचनासह सिंचनाकरीता योग्य त्या पायाभूत सुविधा उभारून परिच्छेद ४ मध्ये विनिर्दीष्ट कुटुंबाच्या जमिनींची उत्पादकता वाढवणे.

२) फलोत्पादन, रेशीम उत्पादन, रोपमळा व प्रक्षेत्र वनीकरण यामार्फत उपजीविकेची साधने वाढवणे.

 ISBN No. 978-93-91097-18-9

३) परिच्छेद ४ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कुटुंबाच्या पडीक अथवा उजाड जमिनी लागवडीखाली आणण्याकरीता त्या जमिनीचा विकास करणे.

४) इंदिरा आवास योजनेंतर्गत किंवा राज्य व केंद्र शासनाच्या अशा अन्य योजनेंतर्गत मंजूर केलेल्या घरांच्या बांधकामामधील अकुशल वेतन घटक.

५) पशुधनाला चालना देण्याकरीता कुक्कूटपालन संरचना, शेळीपालन संरचना, वराहपालन संरचना, गुरांचा गोठा, गुरांना चारा देण्यासाठी गव्हाणी व पाणी देण्यासाठी हाळे यासारख्या पायाभूत सुविधा निर्माण करणे, आणि

६) मत्स्य व्यवसायाला चालना देण्याकरीता मासे सुकवीण्यासाठी ओटे, साठवण सुविधा यासारख्या तसेच सार्वजनीक जमिनीवरील हंगामी जलाशयामधील मत्स्यशेतीला चालना देण्याकरिता पायाभूत सुविधा निर्माण करणे.

**प्रवर्ग क : राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका अभियान अंतर्गत स्वयंसहायता गटांकरीता सामाईक पायाभूत सुविधा.**

१) जैविक खतांकरिता आवश्यक असणाऱ्या शाश्वत पायाभूत सुविधा उभारून आणि कृषी उत्पादनासाठी पक्क्या स्वरूपाच्या साठवण सुविधासह हंगामोत्तर सुविधा उभारून कृषी उत्पादकतेस चालना देण्याबाबतची कामे आणि

२) स्वयंसहायता गटांच्या उपजीविकेच्या उपक्रमाकरीता सामाईक कार्यक्षेत्र.

**प्रवर्ग ड : ग्रामीण पायाभूत सुविधा**

१) हागणदारीमुक्त गावाचा दर्जा संपादन करण्याच्या उद्देशाने एकतर स्वतंत्रपणे किंवा शासकीय विभागाच्या इतर योजनांच्या अभिसरणातून व्यक्तिगत घरगुती शौचालये, शाळेतील प्रसाधनगृहे, अंगणवाडी प्रसाधनगृह आणि विहीत मानकांनुसार घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन यासारखी ग्रामीण स्वच्छते संबंधातील कामे.

२) रस्त्यांनी न जोडलेल्या गावांना बारमाही ग्रामीण रस्त्यांनी जोडणी आणि निश्चित करण्यात आलेली ग्रामीण उत्पादन केंद्र, विद्यमान पक्क्या रस्त्यांच्या जाळ्याशी जोडणे, आणि गावामधील पार्श्व नाली व मोऱ्या यांसह अंतर्गत पक्क रस्ते अथवा मार्ग बांधणे.

३) खेळाची मैदाने उभारणे.

४) ग्राम व गट स्तरावर पूरनियंत्रण व संरक्षण कामासह आपातकालीन सिद्धता ठेवणे अथवा रस्ते पूर्ववत करणे अथवा इतर आवश्यक सार्वजनिक पायाभूत सुविधांचे पुनर्स्थापन करणे, सखल भागात जलनि:स्सारण व्यवस्थेची तरतूद करणे, पुराचे पाणी वाहून नेणारे मार्ग खोल करणे व त्यांची डागडूजी करणे, प्रवनिकेचे नुतनीकरण करणे, तटीय क्षेत्राच्या संरक्षणासाठी नाल्यांचे (स्टॉर्म वॉटर ड्रेन) बांधकाम करणे.

५) ग्राम व गट स्तरावर ग्रामपंचायती, महिला स्वयं-सहाय्यता गट, संघ, चक्रीवादळ, छावणी, अंगणवाडी केंद्र, गावबाजार व स्मशानभूमी इत्यादींकरीता इमारती बांधणे.

६) राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ (१०१३ चा २०) याच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्याकरीता अन्नधान्य साठवण इमारती बांधणे.

७) अधिनियमांतर्गत करावयाच्या बांधकामाचा अंदाजाचा भाग म्हणून त्याकरीता लागणाऱ्या बांधकाम साहित्याची निर्मिती करणे.

८) अधिनियमांतर्गत निर्माण केलेल्या ग्रामीण सार्वजनिक मतांचे परिक्षण करणे.

९) राज्य शासन या संदर्भात अधिसूचीत करील अशी तर कोणतीही कामे आणि

१०) केंद्र सरकार राज्य शासनाशी विचार विनीमय करून अधिसूचीत करेल असे अन्य कोणतेही काम.

- ❖ प्रत्येक ग्रामपंचायत, स्थानिक क्षेत्राची क्षमता, स्थानिक गरजा व साधन संपत्ती विचारात घेऊन व परिच्छेद ८ च्या तरतुदींनुसार, ग्रामसभेच्या सभांमध्ये प्रत्येक कामाचा प्राधान्यक्रम निर्धारीत करील.
- ❖ गवत कापणे, खडीकरण करणे, शेतीची कामे यासारखी अमूर्त स्वरूपाची, मोजता न येण्याजोगी व वारंवार उद्भवणारी कामे हाती घेण्यात येणार नाहीत.

**मनरेगाच्या अंमलबजावणीत पंचायतराज संस्थांची भूमिका**

राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम २००५ च्या कलम २(जी) प्रमाणे कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून शासकीय यंत्रणाशिवाय जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत, अशासकीय संस्था किंवा शासनाचे उपक्रम यांना नियुक्त करण्यात येईल." या अधिनियमाअंतर्गत ग्रामसभा व पंचायतीराज संस्थांना मनरेगा योजनेच्या कार्यान्वयात महत्वपूर्ण भूमिका प्रदान करून विकेंद्रीकरणाला मजबूत करणे आणि लोकतांत्रिक प्रक्रियेला अधिकार दृढ बनविण्यात या योजनेची महत्वपूर्ण भूमिका आहे. मनरेगा योजना ग्रामीण क्षेत्रासाठी असल्यामुळे या योजनेच्या कार्यान्वयात पंचायतीराज संस्थांची भूमिका सर्वात महत्वपूर्ण ठरते. महाराष्ट्र राज्य कायद्या अंतर्गत अधिनियमाच्या कलम ६.१(अ) अन्वये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या अंमलबजावणीची जबाबदारी जिल्हाधिकारी यांची असून कलम ६.१(क), ६.१(ब) व कलम ६ (सुधारित २०१४) नुसार महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचे नियोजन व कार्यवाही करण्याच्या संदर्भात ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद या प्रमुख यंत्रणा आहेत.

**मनरेगा योजनेची घोषणा आणि अंमलबजावणी**

साठीच्या दशकात महाराष्ट्रातील सांगली जिल्ह्यात प्रायोगिक तत्वावर रोजगाराचा एक पथदर्शी कार्यक्रम सुरू करण्यात आला. त्याचे विशाल स्वरूप म्हणजे आमचे राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना होय." राज्य रोजगार हमी योजनेप्रमाणे आवश्यक तरतुदी करून केंद्र सरकारने राष्ट्रीय पातळीवर ही योजना राबवायचा निर्णय घेतला. 'सन २००३ मध्ये जेव्हा संयुक्त पुरोगामी आघाडीचे सरकार सत्तेवर आले तेव्हाच त्यांनी समान किमान कार्यक्रम जाहीर केला. या कार्यक्रमाअंतर्गत राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी विधेयक २३ ऑगस्ट २००५ रोजी

लोकसभेत पारीत झाले. ८ सप्टेंबर २००५ रोजी राष्ट्रपतींच्या मंजुरीनंतर या विधेयकाला कायद्याचे रूप प्राप्त झाले व २ फेब्रुवारी २००६ पासुन देशभर कायद्याची अंमलबजावणीस सुरूवात झाली. कायद्याची अंमलबजावणी तीन टप्प्यातून करण्यात आली. पहिल्या टप्प्यात देशातील २०० जिल्ह्यात याची सुरूवात झाली. तर दुसऱ्या टप्प्यात देशातील एकूण १३० जिल्ह्यात कायद्याची अंमलबजावणी करण्यात आली. तर १ एप्रिल २००८ पासुन तिसऱ्या टप्प्यात देशातील उर्वरीत सर्व जिल्ह्यात राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा-२००५ ची अंमलबजावणीला सुरूवात झाली. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या १४० व्या जयंतीनिमित्त २ ऑक्टोबर २००९ रोजी कायद्याला महात्मा गांधी यांचे नाव देऊन या कायद्याला महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा-२००५ (मनरेगा) असे संबोधले जाते.

केंद्र सरकारच्या आदेशावर महाराष्ट्र राज्य शासनाने २०१५ ते २०२० या कालावधीत मनरेगा योजनेत देण्यात येणारा मजूरी दर किती असेल याचे प्रपत्र जाहीर केले आहे. अध्यादेशातील नमूद आकडेवारी अभ्यासता २०१५ मध्ये मजुरीचा दर १८९ रूपये होता. तो २०२०--२१ करीता २३८ रूपये प्रती दिवस घोषित रण्यात आला आहे. ५७ रूपयांची वाढ या पाच वर्षामध्ये दिसून येते. याचा अर्थ श्रमिकांना आपल्या कुटुंबाचा गाडा हाकण्याकरिता किमान श्रममुल्य प्राप्त व्हावे हा त्यामधील महत्वाचा भाग आहे. परंतु केवळ १५० दिवसांचा रोजगार पुरवण्याची हमी या योजनेत दिली आहे.

महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेत करण्यात येणारी कामे उत्पादक स्वरूपाची होत असल्यामुळे सुविधांची निर्मिती या योजनेद्वारे झाली. समाजोपयोगी कामांमुळे उत्पादकता वाढून स्थानिक लोकांना रोजगार उपलब्ध झाला. ग्रामीण भागाची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी मदत झाली. कायमस्वरूपी उत्पादकता वाढवणारी व ग्रामीण भागात दारिद्र्यरेषेखालील लोकांना रोजगाराची व स्वाभिमानाने जगण्याची संधी देणारी योजना म्हणून या योजनेला विशेष महत्त्व आहे.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या प्रारंभापूर्वबी खरीपाचे चार महिने संपल्यानंतर अत्यल्प व अल्पभूधारक तसेच भूमिहीन शेतमजुरांना रोजगारासाठी वणवण फिरावे लागे या योजनेच्या प्रारंभापूर्वी मजुरांची रोजगारासाठी होणारी वणवण थांबली. तसेच मजुरांना स्थानिक पातळीवरच रोजगार मिळू लागल्याने आज ही योजना केवळ रोजगार देणारी राहिली नसून त्यातून आपल्या गावाच्या विकासात मजुर देखील भरीव योगदान देत आहेत. मजुरीच्या पलीकडे ग्रामीण विकासाचा संदर्भ महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेला आहे. म्हणून या योजनेला ग्रामीण विकासात अनन्यसाधारण महत्त्व आहे. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेमुळे जीवनमानाची सुरक्षेची हमी देण्यात आली आहे. गरीबांच्या भल्यासाठी ही योजना सुरु करण्यात आली आहे. सरकारने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेत वैयक्तिक कामांना ही परवानगी दिली आहे. ग्रामीण भागातील लोकांच्या प्रामुख्याने आरोग्यविषयक पाणी विषयक समस्या महत्त्वाच्या आहेत. त्यामुळे

सरकारने वैयक्तिक कामांना मंजुरी देऊन वैयक्तिक विहीरी खोदणे व वैयक्तिक शौचालय बांधकामाची कार्ये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतून करण्यात येत आहे. ग्रामीण भागातील अकुशल कामगारांना गावांमध्येच रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ लागल्या आहेत. योजनेचे कुशलतेने व्यवस्थापन होत असल्याने गावाला पायाभूत सुविधा उपलब्ध होऊन गावविकासासाठी हातभार लागत आहे. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेत वैयक्तिक कामांनाही परवानगी दिली आहे. ग्रामीण भागातील लोकांच्या प्रामुख्याने आरोग्यविषयक पाणीविषयक समस्या महत्त्वाच्या आहेत. त्यामुळे सरकारने वैयक्तिक कामांना मंजूरी देऊन वैयक्तिक विहिरी खोदणे व वैयक्तिक शौचालय बांधकामाची कार्ये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतून करण्यात येत आहे. ग्रामीण भागातील अकुशल कामगारांना गावांमध्येच रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ लागल्या आहे. योजनेचे कुशलतेने व्यवस्थापन होत असल्याने गावाला पायाभूत सुविधा उपलब्ध होऊन गावविकासासाठी हातभार लागत आहे. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत शासनाने विविध विकासकामांची घोषणा केली आहे. यामध्ये फलोत्पादन विकासाला चालना देण्याचे धोरण ठरविण्यात आले. त्यासाठी फळ रोपवाटिकांची स्थापना करणे, अल्पभूधारक तसेच अनुसूचित जाती-जमातीच्या शेतकऱ्यांना निवडक फळझाडे वाढवण्यासाठी भांडवली सहाय्य देणे फळबाग,फुले आणि मसाले पिकांची लागवड,जुन्या फळबागांचे पुनरुज्जीवन इत्यादींच्या माध्यमातून फळउत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्यात आला आहे. शिवाय या वृक्षलागवडींमुळे पर्यावरण संतुलन राखण्यास मदत होत आहे. शासनाच्या राष्ट्रीय कृषी योजनेमुळे महत्त्वपूर्ण बदल कृषी क्षेत्रात घडून आले. त्यामध्ये कृषी आणि कृषी संलग्न क्षेत्रात सार्वजनिक गुंतवणुकीचे प्रमाण वाढविण्यास राज्यांना उत्तेजन देण्यात आले. कृषी आणि इतर संबंधित क्षेत्रातील शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करणे व शेतकऱ्यांचे राहणीमान उंचावणे, कृषी व कृषी संलग्र क्षेत्रातील विविध घटकातील उत्पादन आणि उत्पादकतेत सकारात्मक बदल करण्यासाठी मार्गदर्शन करणे. स्थानिक गरज ,पिके, प्राधान्य याचा विचार करून त्यांना राज्याच्या कृषी नियोजनात स्थान देणे इत्यादी बाबींमुळे कृषीक्षेत्रात महत्त्वपूर्ण बदल घडून आले. शिवाय वैयक्तिक कामांमध्ये शेततळी, पशुधन,मत्स्यव्यवसाय इत्यादी कामांचा समावेश करण्यात आला आहे. दुष्काळावर मात करणे हे महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेसमोरील मोठे आव्हान आहे. दुष्काळाची तीव्रता पाहुन जलसंधारणाच्या कामावरही भर देण्यात आला आहे. देशात निर्माण झालेला दुष्काळ हा कमी पावसामुळे तसेच जलसंवर्धनाच्या अभावामुळे झालेला आहे. त्यामुळे जलसंधारणाची कामे तसेच पारंपरिक पाण्याच्या स्त्रोतामध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेअंतर्गत नुतनीकरण करुन जलंधारण व जलसंवर्धनाला प्रेरणा मिळाली.महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून लोकांमध्ये विश्वास निर्माण झाला. उत्पन्नाचा अतिरिक्त स्त्रोत मिळाल्याची ग्वाही वाटते. या योजनेच्या विविध प्रकल्पात काम करत असताना कामगारांना एका जागी उपस्थित राहून राज्य, देश आणि

आसपासच्या माहितीची देवाणघेवाण करणे शक्य होते. त्याच्या माध्यमातून त्यांच्या सामान्य ज्ञानात वाढ होते. शिवाय महिलांनाही त्यांच्या आरोग्याशी संबंधित माहिती सोबत काम करणाऱ्या महिलांकडून घेणे शक्य होते. या योजनेच्या माध्यमातून जनता आणि सरकारमध्ये अधिक समन्वय साधला गेला व ग्रामीण भागातून शहरांकडे होणारे स्थलांतर रोखण्यात ही योजना यशस्वी ठरली ही महत्त्वपूर्ण बाब आहे. राजकीय वर्तुळातील जाणीव व प्रशासन स्तर यांच्या मध्यस्थीने ही योजना दिवसेंदिवस अधिक प्रभावशाली बनत आहे. तसे पाहता बेरोजगारी दूर करण्यरासाठी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना ही केवळ एकच मुख्य योजना आहे असे नाही परंतु खऱ्या अर्थाने ही योजना बेरोजगारांना सहाय्यक ठरली आहे. या योजनेमध्ये थोडे जाणीवपूर्वक अनुकूल बदल घडवून आणले तर ही योजना अजून सामर्थ्यशाली बनेल यात शंका नाही.

२०२०-२१ या वित्तीय वर्षांच्या पहिल्या पाच महिन्यात (एप्रिल ते सप्टेंबर) दरम्यान देशभरात ८३ लाख नवे मनरेगा कार्डधारकांची नोंद झाली आहे. गेल्या ७ वर्षांतला हा उच्चांक असून ही आकडेवारी मनरेगाच्या पोर्टलवर उपलब्ध आहे.२०१९-२०मध्ये ६४ लाख ७० हजार कार्ड देण्यात आले त्यातुलनेत यंदाची वाढ २८.३२ टक्के इतकी आहे. कोरोना महासाथीमुळे पुकारण्यात आलेल्या लॉकडाऊनमध्ये मोठ्या प्रमाणावर स्थलांतरित आपल्या घरी परतले होते त्याने बेरोजगारी प्रचंड प्रमाणात वाढली. ही बेरोजगारी आता मनरेगाकडे वळली आहे. देशात सर्वाधिक मनरेगा रोजगार कार्ड उ. प्रदेशात २१ लाख ९ हजार इतकी वाटण्यात आली असून त्यानंतर बिहारमध्ये ११ लाख २२ हजार, प. बंगालमध्ये ६ लाख ८२ हजार, राजस्थानात ६ लाख ५८ हजार, मध्य प्रदेशात ५ लाख ५६ हजार रोजगार कार्ड वाटण्यात आली आहेत. गेल्या ५ महिन्यात रोजगार कार्ड घेणाऱ्या महिलांच्या टक्केवारीत ५२.४६ टक्के वाढ झाली आहे. मनरेगा योजनेत ग्रामीण भागातील प्रत्येकी एक लाभार्थी कुटुंबातील एकाला कार्ड दिले जाते. एखाद्या वेळेस कुटुंब कायमस्वरुपी शहरात वास्तव्यास गेल्यास किंवा ग्राम पंचायतमध्ये गेल्यास किंवा डुप्लिकेट कार्ड आढळून आल्यास त्या कुटुंबाचे मनरेगा कार्ड रद्द केले जाते. या आर्थिक वर्षात १० लाख ३९ लाख मनरेगा कार्ड रद्द झाले असून गेल्या आर्थिक वर्षात हा आकडा १३ लाख ९७ हजार इतका होता. ३ सप्टेंबर अखेर देशभरात मनरेगा कार्ड धारकांची संख्या १४ कोटी ३६ लाख इतकी आहे.

**निष्कर्ष :**

मनरेगा योजनेअंतर्गत ग्रामीण भागातील लाभार्थी कुटुंबातील सर्वच पत्र सदस्यांना या योजनेचा लाभ मिळावा हे अपेक्षित असताना तो मिळत नाही. यातील सर्वाधीक कामे दुष्काळी भागात सुरु आहेत. जलसंधारण व संवर्धनाची कामे योग्य प्रमाणात झाली आहेत त्या खालोखाल स्वच्छता अभियान व रस्त्याची कामे झाली असून वैयक्तिक विहीर, शौचालये, फळबाग, वनीकरण या काकामांना दुय्यमत्व दिले गेले आहे लोकांच्या आर्थिक स्थितीमध्ये या योजनेमुळे अमुलाग्र परिवर्तन झाले असून त्याच्या कृषी उत्पनात वाढ झाली आहे. या योजने

अंतर्गत दिल्या जाणाऱ्या सोय सुविधाबाबत लाभार्थी समाधानी आहेत. लोकांना बचतीची सवय लागली आहे. लोकांच्या सामाजिक जीवनाच्या प्रत्येक स्तरावर परिवर्तन झाले असून महिलांचे सक्षमीकरण घडवून आणण्यात ही योजना यशस्वी ठरली आहे. अकुशल बेरोजगार व भूमिहीनासाठी मालमत्तांची निर्मिती झाली आहे. पर्यावरण पूरक उपक्रम राबवले जात आहेत आणि हे प्रयत्न स्तुत्य आहे.

मनरेगा योजना राबवणारे शासकीय अधिकारी व मजुरांच्या सलोख्याच्या सहसंबंधातूनच या समाज उपयोग योजनेचे कुशलतेने व्यवस्थापन होत असल्याने उद्दिष्टे फलदृप झाली आहेत. ग्रामीण भागातून शहरी भागाकडे होणारे स्थलांतर रोखण्यामध्ये ही योजना उपयुक्त सिद्ध झाली आहे. असे असले तरी या योजनेमध्ये काही उणिवा आढळतात यामध्ये मनरेगाच्या माध्यमातून अकुशल कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले जात नाही, मजुरांनी त्यांच्या श्रमाचा मोबदला (मजुरी) वेळेवर मिळत नाही. पूर्णवेळ कायमस्वरूपी काम नसल्यामुळे आर्थिक बचत करता येत नाही स्थनिक व्यवस्थापक व प्रशासन यंत्रणा प्रभावीपणे कार्य करत नाही या योजनेच्या फलदृपतेसाठी व्यापक जनजागृतीची आवश्यकता आहे.

**संदर्भ :-**

१.श्रीकांत शेंडे (२०२०), "नागपूर जिल्ह्यातील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा २००५ चे चिकित्सक अध्ययन", अप्रकाशित शोध प्रबंध , राष्ट्र संत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.

२.मनीषा सोडणकर,(२०१७), "महात्मा गांधी रोजगार हमी योजनेची कार्यपद्धती, व्यवस्थापन आणि प्रभाव क्षमता : एक अभ्यास", अप्रकाशित शोध प्रबंध , सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

३.डॉ.रसाळ आर.जी.व सानप जी.के. (२०१३), " महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना : आर्थिक व सामाजिक स्थित्यंतर", वाणिज्य विद्या जर्नल ऑफ कॉमर्स अँड मनेजमेंट थॉट.

४.महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना , माहिती पुस्तिका, महाराष्ट्र राज्य माहिती जनसंपर्क महासंचनालय, मुंबई

५.सांगवे भगवान (२०११), "ग्रामीण विकास योजना दशा आणि दिशा" , चतुरंग प्रकाशन, पुणे.

 ISBN No. 978-93-91097-18-9

# २. घटना दुरुस्ती व मुलभूत हक्क

**प्रा. डॉ. शुभांगी दिनेश राठी**
श्रीमती प. क. कोटेचा महिला महाविद्यालय, भुसावळ

घटनाकारांनी बदलती परिस्थिती विचारात घेऊन भारतीय राज्यघटनेच्या कलम 368 मध्ये बदल करण्याची तरतूद केलेली आहे. त्यानुसार आजतागायत भारतीय संविधानात 104 घटनादुरुस्त्या झालेल्या आहेत. राज्यघटना दुरुस्तीची प्रक्रिया किंवा घटनेतील मूलभूत अधिकाराच्या संदर्भात असलेल्या घटनात्मक तरतुदी व झालेले बदल याबाबतचे अध्ययन करण्यात आले आहे. घटनादुरुस्तीची घटनात्मक तरतूद व झालेल्या घटना दुरुस्त्या विचारात घेवून भारतीय राज्यघटनेतील तिसऱ्या भागातील मूलभूत अधिकारात घटनादुरुस्तीने झालेल्या बदलांचा अभ्यास या भागात करण्यात आलेला आहे. घटना दुरुस्तीचा अधिकार संसदेला असला तरी याबाबत न्यायालयाने दिलेले निर्णय अभ्यासण्यात आले आहे.

घटनादुरुस्ती याचा अर्थच राज्यघटनेमध्ये बदलत्या परिस्थितीनुसार बदल करण्याची तरतूद होय. यासंबंधीची भारतीय संविधानात केलेली तरतूद विचारात घेऊन घटनादुरुस्तीच्या पद्धती यांचा तात्वीक पद्धतीने वर्णनात्मक अध्ययन करण्यात आलेले आहे . घटनादुरुस्तीच्या पद्धती अभ्यासल्या असता असे लक्षात येते की, भारतातील घटना दुरुस्तीची पद्धत खूप सोपी ही नाही आणि खूप अवघड ही नाही. त्यामुळे भारताची राज्यघटना ही अंशतः परिवर्तनीय व अंशतः परिदृढ आहे. भारतीय संविधानाच्या तिसर्या भागातील मूलभूत अधिकारात दुरुस्ती करण्यासाठी विशिष्ट बहुमताची आवश्यकता असते. मूलभूत अधिकारातील घटनादुरुस्ती अभ्यासण्यासाठी त्यासंबंधीची संविधानात्मक तरतूद, संसदेला असलेला घटनादुरुस्तीचा अधिकार, घटना दुरुस्तीचे प्रकार आदी बाबीं जाणून घेवून मुलभूत अधिकारात झालेल्या दुरुस्त्या याचे अध्ययन करण्यात आलेले आहे .

**घटना दुरुस्तीची संविधानात्मक तरतूदः**

घटनादुरुस्तीची तरतूद – कलम – ३६८ भारतीय संविधानातील भाग २० मधील कलम ३६८ मध्ये संसदेला असलेला घटनादुरुस्तीचा अधिकार व घटनादुरुस्तीची पद्धत देण्यात आलेली आहे.

**संसदेला घटना दुरुस्तीचा अधिकार**

संसदेला कलम ३६८ (१) नुसार घटनेतील कोणत्याही तरतुदी मध्ये भर घालणे, बदल करणे किंवा काढून टाकणे या मार्गांनी या कलमात सांगितलेल्या पद्धतीनुसार सुधारणा करण्याचा अधिकार देण्यात आलेला आहे. केशवानंद भारती केस मध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या

निकालानुसार संसद घटनादुरुस्ती करताना घटनेच्या मूलभूत संरचनेत बदल करू शकणार नाही असा निवाडा दिलेला आहे.

**घटना दुरुस्तीचे प्रकार:**

भारतीय राज्यघटनेत खालील तीन प्रकारे दुरुस्ती करता येते

१) संसदेच्या साध्या बहुमताने – संसदेच्या साध्या बहुमताने म्हणजे कलम 368 नुसार दोन्ही सभागृहांच्या साध्या बहुमताने घटनेतील अनेक तरतुदींमध्ये दुरुस्ती करता येते. उदाहरणार्थ – राज्यांत विधानपरिषदेची निर्मिती करणे अथवा विधानसभा रद्द करणे, संसद सदस्यांचे पगार व भत्ते , संसदेच्या कामकाजाचे नियम तयार करणे, केंद्रशासित प्रदेश, नागरिकत्व, संसदेची गणसंख्या, संसदेत इंग्रजीचा वापर, इत्यादी.

२) संसदेच्या विशेष बहुमताने – कलम 368 नुसार घटनेतील बहुसंख्य तरतुदीमध्ये संसदेच्या विशेष बहुमताने घटना दुरुस्ती करता येते. यासाठी दोन्ही सभागृहांमध्ये स्वतंत्ररीत्या सभागृहांच्या एकूण सदस्य संख्येच्या बहुमताने व उपस्थित व मतदान करणाऱ्या सदस्यांपैकी दोन तृतीयांश इतक्या सदस्यांच्या बहुमताने संमत होणे आवश्यक असते. मूलभूत हक्क, मार्गदर्शक तत्त्वे, पहिल्या व तिसऱ्या पद्धतीमध्ये न येणाऱ्या तरतुदींमध्ये या पद्धतीने दुरुस्ती केली जाते.

३) संसदेच्या विशेष बहुमताने सोबत निम्म्या राज्यांच्या साध्या बहुमताने – भारतीय राज्यघटनेतील संघराज्य तरतुदींमध्ये दुरुस्ती करण्यासाठी ते घटनादुरुस्ती विधेयकाला संसदेच्या दोन्ही सभागृहांत विशिष्ट बहुमता बरोबरच किमान निम्म्या राज्यांची साध्या बहुमताने संमती आवश्यक असते. यासाठी राज्यावर कोणत्याही कालावधीची मर्यादा घालण्यात येत नाही. उदाहरणार्थ – सातव्या अनुसूचीतील कोणतीही सूची, संसदेतील राज्यांचे प्रतिनिधित्व, कलम 368 मधील तरतुदी, सर्वोच्च व उच्च न्यायालय, राष्ट्रपतीची निवडणूक व त्याची पद्धत, इत्यादी.

**मूलभूत हक्क:-**

या वरील तीन प्रकारांपैकी भारतीय राज्यघटनेतील मूलभूत हक्कांत दुरुस्ती करण्यासाठी संसदेच्या विशिष्ट बहुमताची आवश्यकता असते. भारतीय राज्यघटनेत सुरुवातीला सात मूलभूत हक्कांचा समावेश करण्यात आलेला होता. परंतु 1978 मध्ये करण्यात आलेल्या 44 व्या घटना दुरुस्तीने संपत्तीचा अधिकार यातून काढण्यात आला. त्यामुळे सध्या नागरिकांना पुढील सहा मूलभूत हक्क प्राप्त झालेले आहे समतेचा हक्क (कलम 14 ते 18), स्वातंत्र्याचा हक्क (कलम 19 ते 22), शोषणाविरुद्धचा हक्क (कलम 23 आणि 24), धर्मस्वातंत्र्याचा हक्क (कलम 25 ते 28), सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क ( कलम 29 ते 30), घटनात्मक उपाययोजनेचा हक्क (कलम 32)

घटनादुरुस्ती व मूलभूत हक्क –

भारतीय नागरिकांच्या दृष्टीने मूलभूत हक्क हा संविधानातील अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. स्वातंत्र्य व समता नागरिकाला उपभोगायची असेल तर मूलभूत हक्क महत्त्वाची भूमिका बजावतात. किंबहुना व्यक्तीची प्रगती हे या मूलभूत हक्कावर अवलंबून असते. या मुलभूत हक्काबाबत परिस्थितीनुरूप झालेल्या महत्वपूर्ण घटनादुरुस्त्या-

1 ली घटनादुरुस्ती 1951:

• सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीयांसाठी विशेष तरतुदी करण्याचा अधिकार राज्यसंस्थेला दिला.

• मालमत्ता ताब्यात घेण्यासाठी तरतुदी असणारे कायदे

• जमीन सुधारणा आणि इतर कायद्यांचे न्यायालयीन पुनर्विलोकनापासून संरक्षण करण्यासाठी ९व्या परिशिष्टाचा समावेश

• भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर निर्बंध घालणाऱ्या तीन आधाराचा उदा. सार्वजनिक सुव्यवस्था, परराष्ट्रासोबत मैत्रीपूर्ण संबंध आणि गुन्ह्याला उत्तेजन देणे इ. बाबींचा समावेश ह्या मर्यादा वाजवी असतील, म्हणून न्याय प्रविष्ट असतील.

• राज्यातील व्यापार: राज्यसंस्थेने कोणताही व्यापार वा उद्योगाचे राष्ट्रीयीकरण केल्यास त्यामुळे व्यापार आणि उद्योग करण्याच्या हक्काचा भंग होतो, या आधारावर ती कृती अवैध ठरविता येणार नाही.

8 वी घटनादुरुस्ती (1960), 23वी घटनादुरुस्ती (1969), 45वी घटनादुरुस्ती (1980), 62वी घटनादुरुस्ती (1989), 79वी घटनादुरुस्ती (2000), 95वी घटनादुरुस्ती (2009), 104 वी घटनादुरुस्ती (2020)

अनुसूचित जाती आणि जमाती तसेच आंग्ल भारतीय समाजाच्या प्रतिनिधित्वासाठी लोकसभा आणि विधानसभांमध्ये आरक्षित जागांची मुदत १० वर्षाकरिता वाढविली. मात्र 104 व्या घटनादुरुस्तीने अँग्लो इंडीयन समुदायाचे आरक्षण रद्द करण्यात आले.

16वी घटनादुरुस्ती (1963 ): राज्यसंस्थेला भारताचे सार्वभौमत्व आणि अखंडता यांच्या हितार्थ भाषण आणि अभिव्यक्ती, शांततापूर्व एकत्र जमणे आणि संघटना, संस्था स्थापन करणे या मूलभूत हक्कांवर आणखी निर्बंध लादण्याचे अधिकार प्रदान.

24वी घटनादुरुस्ती (1971): मूलभूत हक्कासह राज्यघटनेतील कोणत्याही भागामध्ये दुरुस्ती करण्याचा संसदेचा अधिकार.

25 वी घटनादुरुस्ती (1971) : मालमत्तेच्या हक्कासंबंधी तरतुदीतील ‘भरपाई’ या शब्दाऐवजी ‘रक्कम’ हा शब्द समाविष्ट केला आणि मालमत्तेचा मूलभूत हक्क संकुचित करण्यात आला.

26 वी घटनादुरुस्ती (1971): संस्थानिकांचे तनखे आणि विशेषाधिकार रद्द केले.

 ISBN No. 978-93-91097-18-9

42 वी घटनादुरुस्ती (1976): देश विघातक कारवायांना हाताळण्यासाठी कायदे करण्याचा अधिकार संसदेला देण्यात आला आणि अशा कायद्यांचे मूलभूत हक्कांवर देखील श्रेष्ठत्व असेल.

44 वी घटनादुरुस्ती (1978): मालमत्तेचा हक्क मूलभूत हक्कांच्या यादीतून रद्द केला आणि तो केवळ कायदेशीर हक्क केला.

65वी घटनादुरुस्ती (1990): अनुसूचित जाती आणि जमाती यांच्यासाठी विशेष अधिकारी नेमण्याच्या तरतुदी ऐवजी त्यांच्याकरिता बहुसदस्यीय राष्ट्रीय आयोगाची स्थापना करण्याची तरतूद केली.

77 वी घटनादुरुस्ती (1995 ): अनुसूचित जाती आणि जमातींना शासकीय नौकाऱ्यांमधील बढत्यांमध्ये आरक्षण देण्याची तरतूद केली. बढत्यांमधील आरक्षणाबाबत सर्वोच्च न्यायालयाच्या निवडयाला या घटनादुरुस्तीने समाप्त केले.

82वी घटनादुरुस्ती (2000): अनुसूचित जाती आणि जमातीसाठी कोणत्याही परीक्षेच्या पात्रता गुणांमध्ये शिथिलता देणे किंवा त्यांच्या मूल्यांकनाचा दर्जा कनिष्ठ ठेवण्याची तरतूद केली. याशिवाय केंद्र आणि राज्यांच्या लोकसेवामध्ये चालना देण्यासाठी त्यांना आरक्षण दिले.

85वी घटनादुरुस्ती (2001): जून १९९५ पासून पूर्वानुवर्ती परिणामाद्वारा अनुसूचित जाती आणि जमातींच्या शासकीय सेवकांसाठी असलेल्या आरक्षणाच्या नियमानुसार बढतीमध्ये ‘अनुक्रमणात्मक सेवाज्येष्ठता’ हे तत्त्व लागू केले.

86वी घटनादुरुस्ती (2002): प्राथमिक शिक्षणाचा मूलभूत हक्कामध्ये समावेश केला. यानुसार समाविष्ठ केलेले अनुच्छेद २१ (क) म्हणते ‘राज्यसंस्था तिने निश्चित केलेल्या रीतीने ६ ते १४ वयोगटातील सर्व मुला-मुलींना मोफत आणि सक्तीचे शिक्षण पुरवेल.’

93वी घटनादुरुस्ती (2005): अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थांचा अपवाद वगळता खाजगी शैक्षणिक संस्थासह (राज्याकडून निधी मिळणाऱ्या वा न मिळणाऱ्या ) इतर शैक्षणिक संस्थांमध्ये सामाजिक आणि शैक्षणिक दृष्ट्या मागासवर्गीयांसाठी किंवा अनुसूचित जाती वा जमातींसाठी विशेष तरतुदी करण्याचा अधिकार राज्यसंस्थेला दिला. इनामदार खटल्यामध्ये (२००५) सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाला या घटनादुरुस्तीने निकालात काढले. या खटल्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाने नमूद केले होते की, “राज्यसंस्था तिचे आरक्षणाचे धोरण , व्यावसायिक महाविद्यालयासह, अल्पसंख्याक आणि बिगर अल्पसंख्याक, विना अनुदानित खाजगी महाविद्यालयांसह, अल्पसंख्याक विना अनुदानित खाजगी महाविद्यालयांवर लादू शकत नाही. ” खाजगी, विना अनुदानित शिक्षण संस्थांमध्ये ‘आरक्षण’ ही बाब बिगर घटनात्मक असल्याचे न्यायालयाने घोषित केले.

103 वी घटनादुरुस्ती (2019):आर्थिक मागासवर्गीयांसाठी 10% आरक्षणाची तरतूद करण्यात आली.

घटनादुरुस्तीबाबत सर्वोच्च न्यायालयाचे निकाल

कलम ३६८ नुसार मूलभूत हक्कां संदर्भात संसदने केलेली घटना दुरुस्ती व न्यायालयाने दिलेले निर्णय पुढीलप्रमाणे

१) शंकरी प्रसाद खटला १९५१ – पहिल्याच घटनादुरुस्तीला या खटल्याला नुसार आव्हान दिले गेले. या घटनादुरुस्तीचा संपत्तीच्या हक्कात घट केली होती. यामध्ये सर्वोच्च न्यायालयाने असा निर्णय दिला की कलम ३६८ अंतर्गत संसद कोणत्याही ही मूलभूत अधिकारात दुरुस्ती करू शकते, घट करू शकते किंवा काढून घेऊ शकते. न्यायालयाने कलम १३ मधील कायदा या शब्दाला ही मर्यादा घातली व कायदा याचा अर्थ केवळ साधारण कायदे असा होतो. घटनादुरुस्ती कायदा असा होत नाही असे सांगितले.

२) गोलकनाथ खटला १९६७ – यामध्ये सर्वोच्च न्यायालयाने आपला पूर्वीचा निर्णय बदलला व असा निर्णय दिला की मूलभूत हक्क हे अलौकिक व रूपांतर अन्य स्वरूपाचे आहेत त्यामुळे संसद मूलभूत हक्कात घट करू शकत नाही किंवा ते काढून घेऊ शकत नाही मूलभूत हक्कावर गदा आणणारा घटनादुरुस्ती कायदा कलम १३ अंतर्गत अवैध आहे.

३) २४ वी घटनादुरुस्ती – खटल्यातील सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयावर संसदेने २४ वी घटनादुरुस्ती १९७१ मध्ये केली. या घटनादुरुस्तीनुसार कलम १३ व कलम ३६८ मध्ये दुरुस्ती करण्यात आली व संसदेला कलम ३६८ अंतर्गत कोणत्याही मूलभूत हक्कात घट करण्याचा किंवा तो काढून टाकण्याचा अधिकार आहे आणि कलम १३ नुसार हा वैध असेल असे म्हटले.

४) केशवानंद भारती खटला १९७३ – गोलकनाथ खटला व २४ व्या घटना दुरुस्तीची वैधता मान्य करून सर्वोच्च न्यायालयाने संसदेच्या कोणत्याही मूलभूत हक्कात घट करण्याचा किंवा तो काढून टाकण्याचा अधिकार असल्याचे मान्य केले. मात्र या सोबतच घटनेची मूलभूत संरचना किंवा मूलभूत वैशिष्ट्ये या नव्या तत्त्वांची मांडणी केली. कलम ३६८ अंतर्गत संसदेला घटनेच्या मूलभूत संरचनेत बदल करण्याचा अधिकार प्राप्त नाही असे सर्वोच्च न्यायालयाने सांगितले.

५) ४२ वी घटनादुरुस्ती (१९७६): सर्वोच्च न्यायालयाच्या या मूलभूत संरचना तत्वाला अनुसरून ४२ वी घटनादुरुस्ती मध्ये करण्यात आली कलम ३६८ समाविष्ट करून संसदेच्या संविधान अधिकारावर कोणतीही मर्यादा नाही आणि कोणत्याही घटनादुरुस्ती कोणत्याही न्यायालयात कोणत्याही कारणास्तव उपस्थित करता येणार नाही.

६) १९८० मधील मिनर्व्हा मिल खटला – यामध्ये सर्वोच्च न्यायालयाने कलम ३६८ (4) मधील तरतूद अवैध ठरवली. कारण यानुसार न्यायिक पुनर्विलोकनाचा अधिकार नष्ट होतो असे कारण देण्यात आले.

७) वामनराव खटला – वामनराव खटला १९८१ सर्वोच्च न्यायालयाने मूलभूत संरचना तत्त्व पुन्हा उचलून धरले व स्पष्ट केले की २४ एप्रिल १९७३ नंतरच्या सर्व घटनादुरुस्त्याना ते लागू होईल.

अशा प्रकारे भारतीय राज्यघटनेत दिलेल्या घटनात्मक तरतूदीनुसार संसदेने विशिष्ट बहुमताच्या आधारावर मूलभूत अधिकारात परिस्थितीनुरूप काही बदल केले. परंतु या घटनादुरुस्तीच्या बाबतीत उपस्थित झालेल्या प्रश्नांच्या संदर्भात न्यायालयाने निर्णय देवून संसदेच्या अधिकारावर मर्यादा घातलेल्या आहेत. याचाच अर्थ असा की संसदेला घटनादुरुस्तीचा अधिकार आहे परंतु कायद्याच्या चौकटीत राहून त्यांना ही घटना दुरुस्ती करता येते असे निदर्शनास आले.

**संदर्भसूची**


1. Durga Das Basu: Shorter Constitution of India; Ninth Edition (1984); Prentice Hall of India Private limited,New Delhi
2. Durga Das Basu: Introduction to Constitution of India; 19th Edition (2001); Wadhwa and company Law Publishers Nagpur
3. प्रा. शुभांगी दिनेश राठी; भारताचे संविधान; (2017) कैलाश पब्लीकेशन, औरंगाबाद
4. प्रा. शुभांगी दिनेश राठी; भारताचे संविधान; (2013) अथर्व पब्लीकेशन्स, जळगाव
5. डॉ. वि. मा. बाचल व प्रा. स. मा. गोळवलकर; भारतीय गणराज्य ( शासन आणि राजकारण) ; सुविचार प्रकाशन मंडळ, पूणे
6. प्राचार्य देवरे, प्राचार्य विसपुते, डॉ. निकुंभ; भारतीय लोकशाही गणराज्य;,(2007); प्रशांत पब्लीकेशन्स; जळगांव

# ३. मुलभूत हक्क व अधिकार

**प्रा.डॉ.विलास आघाव**
उपप्राचार्य तथा राज्यशास्त्र विभाग प्रमुख
आदर्श महाविद्यालय, हिंगोली.

**प्रस्तावना:-**

भारताच्या संविधानातील भाग 3 मध्ये कलम 12 ते 35 पर्यंत भारतीय नागरीकाना दिलेल्या मुलभूत अधिकारांची मांडणी संविधानात केलेली आहे. भारतीय लोकशाही शासनपदधतीचे मुलूभूत अधिकार हे एक गुण वैशीष्टये आहे. राज्य व व्यक्ती अशा दोन्ही घटकावर नियंत्रण ठेवण्याचे कार्य मूलभूत अधिकारादवारे केले जाते. मूलभूत हक्कांची संकल्पना भारतांने फ्रेंच व अमेरीकन संविधानावरून घेतली आहे. मूलभूत हक्क हे व्यक्तीच्या सर्वांगीन विकासासाठी आवश्यक आहे.मूलभूत हक्कावर कोणीही आक्रमन करू शकत नाही. असे झाल्यास व्यक्ती न्यायालयाकडे दाद मागू शकते. मूळ संविधानात एकूण सात मूलभूत हक्क व अधिकार आहेत. मात्र 1978 साली झालेल्या 44 व्या घटनादूरूस्तीनूसार खाजगी मालमत्तेचा हक्क मूलभूत अधिकारातून वगळण्यात आला व त्यास कायदेशीर हक्क म्हणून स्थान देण्यात आले समतेचा अधिकार , व्यक्तीस्वातंत्रयाचा अधिकार,शोषणाविरूधचा अधिकार, शैक्षणीक व सांस्कृतीक अधिकार, धर्मस्वातंत्रयाचा अधिकार व घटनात्मक उपाययोजनांचा अधिकार, हे सहा मूलभूत अधिकार आहेत. यापैकी पहील्या पाच अधीकारानूसार नागरीकांना त्यांच्या व्यक्तीमत्व विकासासाठी आवश्यक ती परिस्थीती राज्यानें निर्माण करून दिलेली आहे. तर घटनात्मक उपायांच्या सहाव्या अधिकारादवारे मूलभूत अधिकारांच्या संरक्षणाची तरतूद केली आहे.सरकार, व्यक्ती किंवा संस्था यांच्याकडून जर वरील मूलभूत अधीकारावर अतिक्रमन झाले तर कलम32 नूसार नागरीक सर्वोच्च व उच्च न्यायालयात विविध प्रकारचे रीट अर्ज करून आपल्या हक्काचे संरक्षण करू शकतात. डॉ. बाबासाहेबांनी ‘राज्यघटनेचा आत्मा’ असे वर्णन या अधिकाराचे केले आहे. भारतीय नागरीकावर घातलेली बंधने जाचक स्वरूपाची नसून ती माफक स्वरूपाची आहेत त्यामूळे त्यातून खऱ्या स्वातंत्रयाची अभीव्यक्ती व्यक्तत होते मूलभूत अधिकारात बदल करण्याचा अधिकार शासन अथवा संसदेला आहे.किंवा नाही यावर बरीच चर्चा करण्यात आली मात्र संविधानाच्या 24 व्या दूरस्तीने संसदेला मूलभूत हक्कांमध्ये बदल करण्याचा अधिकार असल्याचे स्पष्ट केले. भारतीय संविधानात पूढील प्रकारचे मूलभूत हक्क नमूद करण्यात आले आहेत.

1) **समतेचा अधिकार ( कलम14 ते 18 )**:-

समतेमूळे व्यकत्तीला कायदयापूढे समानता व कायदयाचे समान संरक्षण प्राप्त होते.**कलम14**-कायदयापूढे समानता स्पष्ट केली असून त्यादवारे, कायदयासमोर प्रत्येक व्यक्तीला समान मानन्यात येते. धर्म, वंश, जात, स्त्री-पूरूष, श्रीमंत-गरीब, वरीष्ठ-कनिष्ठ, सरकारी

अधिकारी, नोकर असा भेदभाव केला जाणार नाही. यात सरकार योग्य ते फेरफार करू शकते. उदा. श्रीमंतावर जास्त कर, गरीबांना करामधून सवलत देऊ शकते. **कलम15**-धर्म,वंश, स्त्री-पूरूष जन्मस्थान लींग ,जात याच्या आधारावर नागरीकामध्ये कोणताही भेदभाव केला जाणार नाही. तसेच दूकाने सार्वजनीक उपहारगृहे, हॉटेलस, करमणूकगृहे येथे कोणालाही प्रवेश नाकारता येणार नाही. परंतू सरकार मात्र न्यायोचीत भेद करू शकते. स्त्रीया व मूले यांना वीशेष सवलती देऊ शकते. समाजहितासाठी महारोगी व क्षयरोगी तसेच संसर्गजन्य रोगी यांना सार्वजनीक ठिकाणी प्रवेश नाकारण्याचा अधिकार सरकारला आहे. **कलम 16**-प्रत्येक नागरीकाला पात्रतेनूसार नोकरी करण्याचा, एखादे पद गृहण करण्याचा समान अधिकार आहे. वंश, जात,धर्म, लींग, जन्मस्थान या आधारावर कोणालाही नेमणूकीपासून वंचीत करता येत नाही. **कलम17**- 1955 साली संसदेने कायदा करून अस्पृश्यता पाळणे हा फौजदारी गुन्हा आहे. **कलम 18**- व्यक्ती- व्यक्तीत असणारा सामाजीक, आर्थीक, राजकीय, भेदभाव नष्ट केला गेला आहे.सरकारतर्फे मीळणाऱ्या रावसाहेब, रावबहादूर,दीवानसाहेब, खानबहादूर अशा पदव्या मीळणाऱ्या व्यक्तीना वीशेष अधीकार प्राप्त होत. त्यामूळे व्यक्ती-व्यक्तीत भेद नीर्माण होईल म्हणून पदव्या देणे कायदयाने बंद केले. परंतू केंद्र व राज्यसरकार व्यक्तींच्या वीशेष सामाजीक कामगीरीसाठी पदव्या देउ शकते. उदा. पदमभूषण, पदमवीभूषण, उददयानपंडीत, भारतरत्न इ. त्याचप्रमाणे 18व्या कलमानूसार इतर देशांचा पुरस्कार व्यक्तीस घेण्यापूर्वी सरकारची परवाणगी घ्यावी लागते.

**2) व्यक्ती स्वातंत्रयाचा अधीकार (कलम 19 ते 22)**:-

व्यक्तीगत स्वातंत्र हा प्रजातंत्राचा आत्मा आहे. व्यक्तीच्या उत्कर्षासाठी घटनेने व्यक्तीस्वातंत्रयाचा अधीकार दीलेला आहे. परंतू समाजवीघातक कृत्य करून व्यक्तीस्वातंत्र उपभोगू शकत नाही. त्यासाठी उचीत बंधने व्यक्तीवर आहेत. भारतीय नागरीकाला सात प्रकारची स्वातंत्र मीळाली आहेत. कलम 19- याकलमात सात स्वातंत्रयाची हमी देण्यात आलेली आहेत. 1 भाषण व वीचार स्वातंत्र 2 शांततापूर्वक परंतू शस्त्राशीवाय सभा भरवीण्याचे स्वातंत्र 3 संस्था व संघ स्थापन करण्याचा अधीकार 4 भारतात सर्वत्र संचार करण्याचे स्वातंत्र 5 भारताच्या कोणत्याही भागात वास्तव्य करण्याचे आणी स्थायीक होण्याचे स्वातंत्र 6 संपत्ती, धारण, आर्जन कींवा व्यय करण्याचे स्वातंत्र 7 कोणताही धंदा कींवा व्यापार करण्याचे स्वातंत्र या सात स्वातंत्रयाची हमी 20,21,22 कलमान्वये प्राप्त झालेली आहे.

**3) शोषणाविरूधचा अधिकार (कलम 23 व 24)**:-

कलम 23- मानवाच्या क्रय विक्रयास बंदी घातली आहे. कोणत्याही व्यक्तीला कोणीही दास बनवू शकत नाही. कोणत्याही व्यक्तीकडून जबरदस्तीने काम करून घेण्यासाठी बंदी आहे. कलम 24- 14 वर्षाच्या आतील मूलामूलीना खानी किंवा धोक्याच्या ठिकाणी काम करण्यास बंदी आहे परंतू सार्वजनीक हिताच्या दृष्टीने सरकारला लोकाकडून सक्तीने काम

करून घेण्याचा अधिकार आहे. उदा. लष्करात भरती होण्याची सक्ती सरकार नागरीकांना करू शकते.

**4) धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार (कलम 25 ते 28)**:-

कलम 25- प्रत्येक व्यक्तीस कोणत्याही धर्माचे पालन , उपासना, आचरण, वाचण, धर्मांतर करण्याचा अधिकार. कलम 26- धार्मीक संस्थाना चल व अचल संपत्तीची मालकी स्विकारण्याचा कींवा व्यवस्था पाहण्याचा अधीकार. कलम27- कोणत्याही धर्माच्या प्रचारासाठी सक्तीने पैसा गोळा करण्यावर बंदी आहे. कलम28- शिक्षण संस्थातून धार्मीक शिक्षण देण्यावर बंदी आहे.

**5) शैक्षणिक व सांस्कृतीक अधिकार (कलम 29 ते 30)**:-

कलम 29- कोणत्याही समूहाला स्वत:ची संस्कृती, भाषा, लीपी व साहीत्य याचे संरक्षण व संवर्धण करण्याचे स्वातंत्र आहे. भाषीक, धार्मीक, अल्पसंख्याकांना स्वत:च्या शीक्षण संस्था स्थापण्याचा व चालवीण्याचा अधीकार आहे. कलम30- अशा संस्थाना आर्थीक साहय देताना, राज्य वा केंद्र शासन संस्था भेदभाव करणार नाही.

**6) संपत्तीचा अधिकार (44 व्या घटनादूरूस्तीने रद्द )**:-

संविधानात प्रारंभी संपत्तीवीशयक तरतूदी होत्या. सार्वजनीक हितासाठी कोणत्याही नागरीकाची मालमत्ता राज्याने ताब्यात घेतल्यास योग्य तो मोबदला दिला जातो. सामाजीक न्यायाच्या दृष्टीने जमीनदारी नष्ट करण्यासाठी 1951 मध्ये संपत्तीच्या कलमात दूरूस्ती करून 31अ, 31 ब अशी कलम समाविष्ट करण्यात आली. 1955साली पून्हा दूरूस्ती करण्यात येउन सर्व प्रकारची खाजगी मालमत्ता आवश्यकतेनूसार ताब्यात घेण्याचा अधिकार राज्याला मिळाला.1971 साली या कलमात आणखी एक पोट कलम घालून त्यात नूकसान भरपाई या शब्दाऐवजी रक्म या शब्दाचा वापर करण्यात आला. अशा प्रकारे वेळोवेळी संवीधानात दूरूस्तया करून मालमत्तेचा अधिकार सरकारने अर्थहीन केला. संपत्तीच्य अधिकाराचे भवीत्व विधिमंडळावर अवलंबून ठेवल्यामूळे या अधिकाराचा संकोच झाला. मालमत्तेच्या अधिकाराचे साध्या कायदयाने होउ शकते. मूलभूत अधिकारात त्याचा समावेश करूनही सरकारने तो अधिकार घटना दूरस्त्यादवारे नग्ण्य केला. पूढे मूलभूत अधीकाराच्या यादीतून संपत्ततीचा अधिकार 44 व्या घटनादूरूस्ती नवय्ये 1978 साली काढून

**7) घटनात्मक उपाययोजनेचा अधिकार (कलम 32 ते 35):-**

नागरीकाला जे मूलभूत अधिकार संविधानाने दिले त्याचे संरक्षण करण्यासाठी घटनात्मक उपायांचा अधिकार नागरीकाला आहे. नागरीकांच्या हक्कांचे योग्य प्रकारे संरक्षण होत नसेल, अधिकारावर अतिक्रमण करणाऱ्या व्यक्तीवर कायदेशीर कारवाई होत नसेल तर हे सर्व अधिकार निरर्थक ठरतील. मूलभूत अधिकारावर झालेले आक्रमण दूर करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्याचा हक्क आहे. हक्काचे संरक्षण करण्यासाठी नागरीकाला न्यायालयाकडे पाच प्रकारचे अर्ज करता येतात.

 ISBN No. 978-93-91097-18-9

**1) बंदी प्रत्यक्षीकरण:-**

यादवारे बेकायदेशीर अटक करण्यात आलेली व्यक्ती न्यायालयात आपल्या अटकेविरूध दाद मागू शकते. ही अटक सरकार अथवा अन्य कोणादवारे ही होउ शकेल. संबधित व्यक्ती स्व:ता तीचे नातेवाईक अगर मीत्र अशी दाद मागू शकते. अटकेला उच्य /सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिल्यानंतर संबधीत आव्हान अर्जाचा वीचार करून न्यायालय त्या व्यक्तीला न्यायालयात हजर ठेवण्याचा अगर अटकेच्या बेकायदेशीर पणा बददल खातरी झाल्यास तिची सूटका करण्याचा हूकूम देवू शकते.

**2) परमादेश:-**

या रिट दवारे व्यक्ती ,संस्था,शासन- शासनाचा अधिकारी, कनिष्ठ स्तर न्यायालय यांना उच्च किंवा सर्वोच न्यायालयादवारे दीलेल्या आदेशानूसार कृती करण्याबददल फरमावले जाते. एखादया मानवी हक्कांनूसार संबधीताकडून कारर्वाई होत नसल्यास अशी कारवाई व्हावी/ ती करण्यास भाग पाडण्यात

**3) प्रतिशेध**:-प्रतीशेध म्हणजे बंदी घालणे. सदरलेखादवारे उच्च व सर्वोच न्यायालय कनीष्ठ न्यायालय सरकारदवारा गठीत न्याय प्राधीकरणे यांना न्याय प्रवीष्ठ प्रकरणातील एखादी कारवाई न करणे बदल आदेश देतात. मात्र अशी बंदी पाळताना बंदी घातलेली कारवाई करण्याचा संबधीत न्यायालयास अधीकारच नाही. अशी उच्च व सर्वोच न्यायालयाची खात्री झाली पाहीजे.

**4) अधिकार पृच्छा:-**

अधीकार पृच्छा अधीकार नसताना अधीकार गाजवणे, नीयमबाहय रीतीने अधीकाराच्या जागेवर पदास होणे. अशा बाबीमध्ये उच्च कींवा सर्वोच न्यायालये,संबधीत अधीकार नसताना अधीकार गाजवीणाऱ्या व्यकत्तीस अधीकार सोडण्यास भाग पाडण्यासाठी अधीकारपृच्छा लेख काढते. अशी परिस्थीती कायदयाने ठरवीलेली लायकी कींवा पात्रता नसताना बेकायदेशीर किवा नियमबाहय पदधतीने एखादया व्यक्तीस अधीकार पदावर बसवीले तर उधभवू शकते.

**5) उत्प्रेषन:-**

यादवारे उच्य न्यायालयास असलेल्या अधिकारादवारे हददीतील कनिष्ठ न्यायालयाना हूकूम देउन कळवीता येते की, संबधीत कनिष्ठ न्यायालयापूढील विशीष्ठ प्रकरणातील सर्व पूरावे व तदनूसंगीक कागदपत्रे उच्च न्यायालयाकडे पाठवीण्यात यावीत अशा हूकूम वीशीष्ठ प्रकरण कनीष्ठ न्यायालयासमोर चालणे वा त्या न्यायालयाच्या अधीकार क्षेत्राबाहेर आहे. किंवा ते प्रकरण उच्च न्यायालयासमोर चालणेच आवश्यक आहे असे वाटल्यास दिला जातो. शासनादवारा स्थापीत न्याय प्राधिकारणांनाही अशा हूकूम देता येतो.भारताच्या संवीधानाने दीलेली मूलभूत अधीकार फार व्यपक स्वरूपाचे आहे. जगातील इतर कोणत्याही राज्यघटनेने इतके व्यापक अधीकार आपल्या नागरीकांना दीलेले दीसत

नाहीत. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी असे म्हटले आहे की, ‘हा अधिकार भारतीय संविधानाचा प्राण आहे’ मुलूभूत अधीकारांना संरक्षण दीले नाही तर ती मूल्यहीन व अर्थहीन ठरतील. श्री. एम.व्ही. पायली म्हणतात की, या अधीकारामूळेच मूलभूत अधीकारां खरे रूप प्राप्त झाले आहे. संवीधानाच्य 32, 33, 34 आणी 35 या कलमातून न्यायालयाकडून दाद मागण्याचा अधीकार प्राप्त होतो. नागरीकांना ज्याप्रमाणे हक्क प्राप्त होतात. त्याप्रमाणे हक्काचा भंग झाल्यास कोणती उपाययोजना करावी हे घटनेत नमूद केले आहे.आपल्या मूलभूत हक्काची वैशिष्टये खालीलप्रमाणे आहेत.

1)हक्क दिलेले आहेत परंतू त्यावर बंधने लादली आहेत.

2)संपत्तीचा अधिकार मूलभूत म्हणून राहीला नाही.

3) नागरीक आणी व्यक्ती असा भेद संविधानाने केला आहे.

4) काही अधिकाराचे स्वरूप सकारात्मक आहे. तर काही अधिकाराचे स्वरूप नकारात्मक आहे.

5) शासनावर देखील अंकूश ठेवण्यासंबधीच्या तरतूदी आहेत.

6) अधिकाराची अंमलबजावणी करणे व्यक्ती व राज्य याचबरोबर सार्वजनीक संस्थावर देखील बंधनकारक आहे.

7)अधिकाराचे स्वरूप बरेच उदारमवादी आहे.

8) अनेक अधिकार मुलभूत म्हणून नागरीकांना मिळणे अंत्यंत आवश्यक असताना देखील त्यांचा समावेश मुलभूत अधिकारात केलेला नाही.

9)आणीबाणीची घोषणा झाल्यास मूलभूत अधिकार स्थगीत होतात.

10)प्रतिबंधात्मक स्थान बदधता मुलभूत अधिकारावर फार मोठा आघात करते.

**संदर्भ ग्रंथ:-**

1.भारतीय प्रशासन व संवीधानात्मक प्रक्रीया(2016), के.आर.बंग,विद्याबुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद.

2. भारतीय शासन आणी राजकारण (2003), सुधाकर जोशी, वीद्या बुक्स पब्लीशर्स, औरंगाबाद.

3.भारतीय संवीधान स्वरूप आणी राजकारण (2001),चीं.ग.घांगरेकर, श्री मंगेश प्रकाशन नागपूर.

4.भारतीय प्रशासन(2008), व्यंकट विळेगावे, गोवींद यमलवाड.अरूणा प्रकाशन लातूर.

5.भारतीय प्रशासन विकास व व्यवस्था(2013), प्रीती पोहेकर,अरूणा प्रकाशन लातूर.

6.Indian Polity ,M Laxmikanth,Tata McGraw Hill Education Private Limited New Delhi

# ४. भारतीय संविधान आणि राजकारण

## संविधानाचे तत्वज्ञान (धर्मनिरपेक्षता, लोकशाही आणि समाजवाद)

**प्रा. डॉ.कविता सोनकांबळे**
यशवंत महाविद्यालय,नांदेड
मोबा. नंबर. 9421757724

**Abstract :**

स्वतंत्र भारताचे संविधान ज्याला आपण राज्यघटना म्हणतो ते ज्या मूलभूत तत्वांवर उभे आहे त्यापैकी धर्मनिरपेक्षता लोकशाही आणि समाजवाद ही अत्यंत महत्त्वाची तत्त्वे आहेत. विविधता केव्हा विविधता हे भारताचे एक अत्यंत महत्त्वाचे वैशिष्ट्य असून भिन्न जाती धर्म पंथ भाषा प्रदेश संस्कृती असलेल्या ह्या देशातील नागरिकांना एका धाग्यामध्ये जोडण्याचे महत्त्वाचे कार्य भारतीय संविधानाच्या मार्फत केले जाते कारण भारतीय संविधानाने जात धर्म लिंग वर्ण वंश जन्मस्थान गरीब-श्रीमंत असा कोणताही भेदभाव न मानता प्रत्येकाला नागरिकत्वाचा समान दर्जा समान अधिकार दिलेले आहेत. भारताच्या संविधानाचे मूलभूत तत्वज्ञान समजून घेण्याची गुरुकिल्ली म्हणजे सरनामा किंवा उद्देश पत्रिका होय. सर्वनाम यातील आशय संविधानातील विविध कलमान्वये व्यक्त झाल्याचे दिसून येते.

ब्रिटिश भारतामध्ये आणि त्यापूर्वी सुद्धा भारतीय समाजामध्ये मोठ्याप्रमाणावर विषमता होती. माणसामाणसांमध्ये भेदभाव केला जात असे शोषण केले जात असे मानवी अधिकारापासून काही समाजाला वंचित ठेवले जात असे स्वतंत्र भारत देशाच्या संविधानाने मात्र सर्व प्रकारच्या भेदभावाविना नागरिकांना सर्व प्रकारचे मूलभूत अधिकार प्रदान केले आहेत.

पाकिस्तान बांगलादेश अफगाणिस्तान यासारख्या देशांमध्ये मोठ्या प्रमाणावर राजकीय अस्थिरता दिसून येते भारतात मात्र धर्मनिरपेक्षतेचे तत्त्व लोकशाहीचे तत्व आणि काही काळ समाजवादाच्या तत्त्वाचा व्यवहारांमध्ये मुक्तपणे वापर झाल्यामुळे भारत देश जागतिक महासत्ता बनण्याच्या वाटेवर आहे. याचे श्रेय भारतीय संविधानातील तत्त्वज्ञान धर्म निरपेक्षता हे असून तीच भारतीय समाजाला एकत्र ठेवणारी शक्ती आहे. प्रस्तुत संशोधन पेपर मध्ये भारतीय संविधानाचे तत्वज्ञान धर्मनिरपेक्षता लोकशाही आणि समाजवाद यांचा सविस्तर आढावा घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**Key words :**

**1) धर्मनिरपेक्षता:** धर्मनिरपेक्षता म्हणजे राज्याचा कोणताही अधिकृत धर्म नसणारी व्यवस्था ती निधर्मी केव्हा धर्मविरोधी नसते तर धार्मिक दृष्ट्या निपक्षपाती असते

**2) लोकशाही:** लोकांचे लोकांसाठी लोकांकडून चालविले जाणारे शासन म्हणजे लोकशाही असून राजकीय लोकशाहीचे रूपांतर सामाजिक आणि आर्थिक लोकशाही मध्ये होणे भारतीय घटनाकारांना लोकशाहीच्या तत्त्वज्ञानामध्ये अपेक्षित होते

**3) समाजवाद :** संपत्तीच्या विकेंद्रीकरण आला प्राधान्य देणारे आर्थिक तत्त्वज्ञान असून भारताने लोकशाही समाजवादाचा स्वीकार करून संपत्तीच्या साधनांचे न्याय वितरण करण्याचा प्रयत्न केलेला आहे

**4) न्याय :** समाजाचे सर्वांगीन कल्याण करणारी आणि व्यक्तिगत वर्तनामध्ये समन्वय साधणारी तत्वज्ञानाची प्रक्रिया न्याय म्हणता येते आणि यामधून सामाजिक आर्थिक राजकीय न्याय अपेक्षित आहे

**4) स्वातंत्र्य :** व्यक्तिमत्वाच्या विकासासाठी आवश्यक असलेली परिस्थिती म्हणजे स्वातंत्र्य असून उचित बंधनांमधून त्या स्वातंत्र्याचा उपयोग केला जातो भारतीय संविधानाने विचार अभिव्यक्ती उपासना संघटना व्यवसाय मालमत्ता इत्यादीचे विधी नियमांच्या कक्षेत स्वातंत्र्य दिलेले आहे

**5) समता:** समता म्हणजे भेदभाव न करणे किंवा विषमतेचा व्यवहार न करणे होय संविधानाने संधीची आणि दर्जाची समता प्रत्येक भारतीय नागरिकाला दिलेली आहे समता आणि स्वातंत्र्य परस्परपूरक आहेत न्याय स्वातंत्र्य समता हे भारतीय संविधानाचे तत्वज्ञान आहे

**Introduction:**

भारतीय संविधान तथा राज्यघटना देशाचा सर्वोच्च कायदा असून शासन प्रशासन सामाजिक आर्थिक राजकीय व्यवस्था नियंत्रित करण्याचा तो एक महत्त्वपूर्ण दस्तऐवज आहे. समाज व्यवस्था परिवर्तनाचे ते एक शस्त्र असून अहिंसक पद्धतीने संसदीय मार्गाचा वापर करून शांततेने सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यामध्ये भारतीय संविधानाचे योगदान अधिक आहे. न्याय स्वातंत्र्य समता बंधुत्व ही तत्वे संविधानातील वैचारिक तत्वज्ञान समजून घेण्यासाठी उपयोगाची असून घटनाकारांनी साक्षरता भारत निर्माण होण्यासाठी त्या काळात अस्तित्वात असलेल्या लिखित-अलिखित संविधानाचा सूक्ष्म अभ्यास करून ब्रिटिश भारतामध्ये निर्माण झालेल्या विविध कायद्यांचा आधार घेऊन भारतीय समाज व्यवस्थेला अधिक बळकट करण्यासाठी चा यशस्वी प्रयत्न संविधानाच्या निर्मिती मधून केलेला आहे.

संविधान पूर्व भारतामध्ये ब्राह्मण क्षत्रिय वैश्य शूद्र अशाप्रकारच्या चार वर्णांमध्ये मानवी समूहाचे विभाजन झालेले होते सत्ता संपत्ती प्रतिष्ठा यांचे विषमतेच्या आधारावर वितरण झालेले होते परिणामी भारतीय माणसांची शक्ती राष्ट्र विकासामध्ये फारशी उपयोगात आले नाही. संविधान लागू झाल्यानंतर भारतीयांची प्रगती झपाट्याने होत गेली. संविधान निर्मात्यांनी भारतीय परंपरांचा अभ्यास करून लोकशाही प्रधान भारताची उभारणी धर्मनिरपेक्षता लोकशाही आणि समाजवादाच्या तत्वावर केली. जातिव्यवस्थेने हजारो वर्षापासून बहुसंख्य लोकांवरती अन्याय अत्याचार केले होते हा अनुभव सोबत असल्यामुळे आणि मुख्य म्हणजे धर्माच्या

 ISBN No. 978-93-91097-18-9

आधारावर अखंड भारत देशाचे विभाजन झालेले असल्यामुळे भारतीयांना एका सूत्रांमध्ये बांधून ठेवणारे महत्त्वाचे तत्त्व म्हणून धर्मनिरपेक्षतेला सर्वोच्च स्थान दिले गेले.

भारतीय संविधानाचे ध्येय आणि उद्दिष्ट संबंधीचा प्रस्ताव 13 डिसेंबर 1946 रोजी पंडित जवाहरलाल नेहरू यांनी मांडला ज्यामध्ये भारत हे सार्वभौम गणराज्य असेल भारतातील लोकांना सामाजिक आर्थिक राजकीय न्याय दर्जा आणि संधीची समानता कायद्यासमोर समानता विचार अभिव्यक्ती श्रद्धा व्यवसाय संघटन आणि कृती यांचे स्वातंत्र्य तसेच न्याय यावर आधारलेल्या सुसंस्कृत राष्ट्राच्या उभारणीसाठीचा संकल्प करून विश्वशांती च्या आणि अखिल मानव जातीच्या कल्याणासाठी आपले योगदान देण्यासाठी सिद्ध व्हावे अशा प्रकारची भावना व्यक्त केली आणि त्याच आधारावर भारतीय संविधानाचा सरनामा उद्देश पत्रिका किंवा प्रस्तावना यातील आशय आधारित आहे.

भारताबरोबर स्वातंत्र्य मिळालेल्या पाकिस्तानचे विभाजन होऊन बांगलादेशाची निर्मिती झाली, अफगाणिस्तान मध्ये तालिबान सारख्या कट्टर धर्मवादी लोकांचे सरकार आले पण भारत मात्र राजकीय दृष्ट्या स्थिर असून त्याचे सर्व श्रेय घटनाकारांनी स्विकारलेल्या तत्वज्ञानाला जाते आणि ते म्हणजे धर्मनिरपेक्षता लोकशाही आणि समाजवाद होय.

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये भारतीय संविधानाच्या तत्त्वज्ञानाचा आढावा घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**Objectives :** 1) भारतीय संविधानाचे तत्त्वज्ञान समजून घेणे.

2) धर्मनिरपेक्षता या संविधानिक मूल्याचे महत्त्व समजून घेणे.

3) लोकशाही आणि समाजवाद हे तत्वज्ञान समजून घेणे.

4) जगातील सर्वात मोठ्या लोकशाही लोकशाहीप्रधान भारत देशाची संविधानिक शक्ती स्थळे शोधणे.

**Hypothesis :**1) धर्मनिरपेक्षता हे भारतीय लोकशाहीचे प्रमुख तत्व आहे

2) भारतीय समाजाला एकत्र ठेवण्याची शक्ती धर्मनिरपेक्षता या तत्त्वांमध्ये आहे

3) लोकशाहीतील सांगली तत्वे आणि समाजवाद आतील चांगली तत्वे यांचे मिश्रण लोकशाही समाजवादाच्या रुपाने भारतीय संविधानामध्ये पडलेले आहे.

4) धर्मनिरपेक्षता लोकशाही आणि समाजवाद या तत्त्वज्ञानाच्या विरोधात प्रत्यक्ष राजकीय व्यवहार होताना दिसतो.

Research methodology: भारतीय संविधानाच्या निर्मिती प्रक्रियेवर आधारित वाद-विवाद खंड, अनेक विचारवंतांनी भारतीय संविधानावर लिहिलेली ग्रंथसंपदा, राजकीय घटना घडामोडींचे अवलोकन, मूलभूत साधने आणि दुय्यम साधने यांचा आधार घेऊन विश्लेषणात्मक पद्धतीने शोधनिबंध पूर्ण केला जाईल

**Importance of the topic:**

प्रसिद्ध राजकीय विचारवंत अर्नेस्ट पारकर यांनी प्रिन्सिपल्स ऑफ सोशल अँड पॉलिटिकल तेरी या त्यांच्या ग्रंथामध्ये भारतीय संविधानाचा सरनामा छपून भारतीय संविधानातील तत्त्वज्ञान वैचारिक अंतरंग हे भारताच्या जनतेने आपल्या स्वतंत्र राजकीय जीवनाची सुरुवात करताना भिकारी की केवळ पाश्चात्त्यांची मिरासदारी नसून भारती यांच्या उपक्रमाचा मला अभिमान वाटतो अशा शब्दांमध्ये भारतीय संविधानातील तत्वज्ञान किती महत्वपूर्ण आहे याचा गौरवोद्गार केलेला दिसून येतो.

भारतीय संविधानाचे तत्त्वज्ञान समजून घेण्याची गुरुकिल्ली म्हणजे सरनामा होय कारण सरनामा शब्दांनी तयार केलेला आहे त्यातील प्रत्येक शब्द म्हणजे एक तत्वज्ञान असून या तत्त्वज्ञानाला वरच लोकशाही आधारलेली आहे. आमच्या संविधान सभेत आज दिनांक 26 नोव्हेंबर 1949 रोजी याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वतःप्रत अर्पण करीत आहोत. यातील प्रत्येक शब्दाचे आशयाच्या आधारे विश्लेषण केल्यास असे दिसून येते की भारतीय संविधानामध्ये उच्चकोटीचे वैचारिक तत्वज्ञान सामावलेले आहे. विविधतेने नटलेल्या भारत देशामध्ये सर्वांमध्ये एकता निर्माण करण्याची शक्ती भारतीय संविधानातील तत्त्वज्ञानामध्ये असल्याचे वेळोवेळी सिद्ध झालेले आहे. जरी राजकारणासाठी राजकीय पक्ष राजकीय नेते यांच्याकडून धर्मनिरपेक्षतेचा चुकीचा अर्थ घेतला जात असेल किंवा समाजवादाची तोडफोड केली जात असेल घराणेशाहीचा वापर होत असेल तरीसुद्धा धर्मनिरपेक्षता लोकशाही आणि समाजवाद ही मूलतत्त्वे भारतीय संविधानाचा आशय म्हणून महत्त्वाची भूमिका पार पाडत आलेले आहेत.

भारतासारख्या भिन्न धर्मीय देशामध्ये कोणताही एक धर्म त्या देशाचा राजकारणाचा प्रशासनाचा समाजव्यवस्थेचा कायदा निर्मितीचा कायद्याच्या अंमलबजावणीचा आधार असू शकत नाही त्याऐवजी संविधान हाच सर्वोच्च कायद्याचा ग्रंथ असून संविधानाच्या आधारित कायदे निर्मिती आणि त्याची अंमलबजावणी केली गेली म्हणूनच आजपर्यंत भारतामध्ये धार्मिक आधारावर ती कितीही प्रयत्न करून विभाजन यशस्वी होऊ शकले नाही. अल्पसंख्यांक समूह स्वतःचे अल्पसंख्याक तत्व सोडवून मुख्य प्रवाहामध्ये सामील होण्याचा प्रयत्न करत असते आणि बहुसंख्यांक समाजाकडूनही अल्पसंख्यांक समूहाला सामावून घेण्यासाठी चा प्रयत्न केला जातो की भारतातली वस्तुस्थिती असून सैद्धांतिक पातळीवर आणि प्रत्यक्षामध्ये संविधान आणि राजकारण यामध्ये विरोधाभास दिसत असला तरी सुद्धा धर्मनिरपेक्षता हीच भारतीय संविधानाची तत्व परंपरा विचार परंपरा असल्याचे सिद्ध झालेले आहे. जन्माने कोणत्याही धर्माचे असोत भारतीय नागरिक असणाऱ्या प्रत्येकाला भारतीय संविधानाने समान अधिकार दिले असून धर्म ही प्रत्येकाची खाजगी बाब मांडलेली आहे आणि म्हणूनच भारतामध्ये सक्षम पद्धतीने लोकशाहीची वाटचाल प्रगतीकडे होताना दिसून येते.

**Explanation of the topic :**

भारताच्या संविधानाच्या तत्वद्न्यानाचा विचार करताना धर्मनिरपेक्षता लोकशाही आणि समाजवाद त्याला प्राधान्य द्यावे लागते कारण या तत्त्वांवरच भारतीय लोकशाही आधारलेली आहे. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये धर्मनिरपेक्षता लोकशाही आणि समाजवाद या मूल्यांचे स्पष्टीकरण विश्लेषण पुढील प्रमाणे सिद्धांत आणि व्यावहारिक पातळीवर करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**धर्मनिरपेक्षता :**

कार्ल मार्क्स सारखा विचारवंत धर्माला अफूची गोळी असे संबोधतो तर अनेक विचारवंतांनी मानवी जीवनासाठी धर्म अत्यावश्यक आहे असेही प्रतिपादन केलेले आहे. विचार धर्म कितीही चांगला वाटत असला तरीही आचारी धर्मामध्ये मात्र कर्मकांड अंधश्रद्धा शोषण अत्याचार या गोष्टी दिसून येतात, याला कोणताही धर्म अपवाद नाही. आधुनिक राज्यशास्त्राचा जनक निकलो मे की यावली या विचारवंताने धर्म आणि राजकारण धर्म आणि नीती कारण या दोन्ही वेगवेगळया गोष्टी असून राजाला राजधर्म अत्यंत महत्त्वाचा असतो, लोक धर्मामध्ये अनैतिक वाटणाऱ्या गोष्टी राजाला राष्ट्रनिर्माण आणि राष्ट्र संरक्षणार्थ कराव्या लागत असतात म्हणून राजधर्म आणि व्यक्तिगत धर्म यामध्ये फारकत झाली पाहिजे.

राजेशाहीच्या काळामध्ये जगातील अनेक धर्मांमध्ये पोप किंवा चर्च यांची अप्रत्यक्ष सत्ता राजा वर आणि राज्य व्यवस्थेवर होती. धर्मा सत्तेचे राज्य सत्तेवर नियंत्रण प्रस्थापित झाले होते धर्म लोकांची फसवणूक करत होता तसेच राजाला स्वतःच्या म्हणण्याप्रमाणे वागायला भाग पाडत होता परिणामी चर्च आणि राजा यांच्यातील संघर्षामध्ये राजसत्ता प्रभावी ठरली आणि चर्च किंवा धार्मिक सत्तेला दुय्यम स्थान मिळाले. स्वतंत्र भारतासाठी च्या संविधानामध्ये घटना निर्मात्यांनी धर्म आणि राजकारण धर्म सत्ता आणि राजकीय सत्ता या ठेवण्याचा प्रयत्न मूलभूत अधिकारातून केल्याचे दिसून येते. 42 व्या संविधान दुरुस्तीने धर्मनिरपेक्षता हा शब्द भारताच्या संविधानाच्या सरनामा यामध्ये समाविष्ट केला. भारताने व्यक्तीसाठी धर्म ही गोष्ट स्वीकारून राज्य किंवा शासन हे कोणत्याही धर्माप्रमाणे चालणार नाही किंवा कोणत्याही धर्माचा विरोध करणार नाही राज्य संविधानाप्रमाणे चालेल कायदा निर्माण करताना धर्म हा आधार असणार नाहीतर लोककल्याण हा आधार असेल याची काळजी घेतली. म्हणजेच भारत या राष्ट्राचा अधिकृत असा कोणताही धर्म असणार नाही किंवा कोणत्याही धर्माला विरोध असणार नाही हे भारतीय संविधानातील तरतुदी वरुन स्पष्ट होते

**लोकशाही :** घटनाकारांनी स्वतंत्र भारताच्या संविधानामध्ये लोकशाही हे मूल्य स्वीकारले असून संसदीय स्वरुपाच्या लोकशाहीचा स्वीकार केलेला आहे जनतेचे सार्वभौमत्व म्हणजेच जनतेला सर्वोच्च स्थान देणाऱ्या आणि शासन निवडीचा अधिकार जनतेकडे असलेल्या लोकशाहीचा स्वीकार केलेला आहे. केंद्र शासन राज्य शासन आणि स्थानिक स्वराज्य शासन अशा तीन स्तरावर चर्चा करणे निर्णय घेणे निर्णयाची अंमलबजावणी करणे लोककल्याणकारी

राज्यकारभार करण्यासाठीचे लोकशाही अत्यंत महत्त्वाचे तत्वद्न्यान असून भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉक्टर भीमराव आंबेडकर यांच्या मते रक्ताचा एकही थेंब न सांडता सामाजिक राजकीय आर्थिक जीवनामध्ये समतेवर आधारलेली समाज व्यवस्था निर्माण करणारी लोकशाही हे भारताचे महत्त्वाचे वैशिष्ट्य होय घराणेशाहीच्या प्रभावामुळे लोकशाहीचे खरे तत्त्वज्ञान लपले गेलेले आहे तरीसुद्धा सामान्य माणसाला या लोकशाहीने सत्तेच्या विकेंद्रीकरणा मध्ये सामावून घेतले आहे.

राजकीय लोकशाहीचे रूपांतर सामाजिक आणि आर्थिक लोकशाही मध्ये करणे हा घटनाकार यांचा संकल्प होता त्यासाठी मार्गदर्शक तत्त्वांची योजना करण्यात आली आणि मोठ्या प्रमाणावर त्याला सुद्धा मिळाल्याचे दिसून येते. जात धर्म लिंग वर्ण वंश गरीब-श्रीमंत अशा कोणत्याही कारणावरून माणसामाणसांमध्ये भेदभाव केला जाणार नाही किंवा राज्य कायद्याच्या समान संरक्षणाची हमे नाकारणार नाही अशाप्रकारची व्यवस्था आपल्या लोकशाहीने केलेली आहे.

संविधानाने जरी अशा प्रकारची लोकशाही स्वीकारली असली तरीही प्रत्यक्ष व्यवस्थेत मात्र जात धर्म लिंग यावरून मोठा भेदभाव होत असतो. धर्माधारित जातीआधारित राजकारणाचा प्रभाव वाढताना दिसतो. गेल्या कित्येक वर्षापासून महिलांना कायदे मंडळांमध्ये प्रतिनिधित्व देणारे महिला आरक्षण विधेयक संसदेत पडून आसने की सामाजिक लोकशाहीच्या दृष्टिकोनातून घातक गोष्ट आहे. सत्ता संपत्ती सामाजिक प्रतिष्ठा या प्रत्येक पातळीवर सामाजिक राजकीय आर्थिक लोकशाही प्रस्थापित होणे घटनाकारांना अपेक्षित होते.

**समाजवाद :**

उत्पादनाची साधने आणि वितरण व्यवस्था यामध्ये न्याय यावर आधारलेले तत्व स्वीकारणे याचा पुरस्कार करणारे आर्थिक धोरण समाज वादामध्ये अपेक्षित असते मोठे उद्योग धंदे सार्वजनिक मालकीचे असणे उत्पादन समतेच्या पातळीवर आणणे संपत्तीचे विकेंद्रीकरण करणे संपत्तीचा योग्य वाटा प्रत्येकाला मिळेल अशी तरतूद करणे समाज वादाला अभिप्रेत असते भारतीय संविधानाचा भाग-4 मार्गदर्शक तत्त्वांमध्ये कलम 36 ते 51 मधून केलेल्या सर्व तरतुदी समाज वादा सी सुसंगत आहेत पण उदारीकरण खाजगीकरण आणि जागतिकीकरणामध्ये समाजवादाचे तत्वज्ञान बाजूला पडल्याचे दिसून येते पंडित जवाहरलाल नेहरू यांनी लोकशाही समाजवादाच्या तत्त्वज्ञानाचा मधून लोकशाही आणि समाजवाद या मधील कल्याणकारी तत्व एकत्र करून भारत देशाला आर्थिक सत्तेच्या केंद्रीकरणाला पासून दूर करण्याचा यशस्वी प्रयत्न केला.

**Findings and suggestions:**

भारतीय संविधानाचे तत्वज्ञान धर्मनिरपेक्षता लोकशाही आणि समाजवाद या विषयाचा सूक्ष्म अभ्यास केल्यास असे दिसून येते की घटनाकारांना अपेक्षित असलेली तत्वे भारतीय संविधानाच्या विचारांमध्ये सिद्धांत रुपाने आलेली आहेत पण प्रत्यक्ष राजकारणामध्ये

मात्र कित्येक वेळा त्या तत्त्वांशी विसंगत असे राजकारण दिसून येते. समाजव्यवस्थेवर असलेला धर्माचा पगडा आणि हिंदू बहुसंख्यांक असणे तसेच अल्पसंख्यांक आणि आपलं अल्पसंख्यांक तत्व गोंजारणे यामधूनही धर्मनिरपेक्षता आचरणामध्ये विसंगत दिसते. शासकीय कार्यालये प्रशासकीय कार्यालय यामधून धार्मिक उत्सव मोठ्या प्रमाणावर केले जातात शासकीय महापूजा या नावाने राज्याच्या प्रमुखांकडून विशिष्ट धर्माच्या सांस्कृतिक उत्सवाला महत्त्व दिले जाते. भारतीय संविधानातील कलम 25 26 27 28 29 30 आणि 44 अनुसार धर्मनिरपेक्षतेचे तत्त्वज्ञान स्पष्ट होते.

जनता सार्वभौम असलेल्या संसदीय शासन व्यवस्थेचा स्वीकार केलेला असल्यामुळे राष्ट्र प्रमुखाच्या पदापासून ते प्रत्येक राजकीय पद जनतेकडून निवडले जात असते लोकशाही हा भारतीय संविधानाचा गाभा असून घराणेशाहीमुळे लोकशाहीच्या तत्वाला बाधा पोहोचत आहे.

१९९०-९१ पासून भारतीय संविधानाचे समाजवादाचे तत्व प्रभावित झालेले आहे निती निर्देशक तत्वा मधील आशय बाजूला पडून त्याची जागा खाजगी करणारी घेतल्याचे स्पष्ट होते. संपत्तीचे केंद्रीकरण उत्पादनाच्या साधनांचे विषम वाटप आणि वितरणाचा न्याय अशी तुटलेला संबंध हे समाजवादाला घातक असल्याचे प्रत्यक्षामध्ये घडून येत आहे

मतदार असलेली सामान्य जनता जोपर्यंत भारतीय संविधानाचे मूळ तत्त्वज्ञान समजून घेत नाही आणि सनिक स्वार्थाच्या पलीकडे जाऊन मतदानाच्या अधिकाराचा निस्वार्थपणे वापर करणार नाही तोपर्यंत स्वार्थी राज्यकर्त्यांकडून धर्मनिरपेक्षता लोकशाही आणि समाजवाद या अत्यंत मूलभूत असलेल्या तत्त्वज्ञानाची सिद्धांत तपासून तोडफोड करण्याचे प्रयत्न सुरूच राहतील. बुद्धिवादी लोकांची राजकीय उदासीनता लोकशाही धर्मनिरपेक्षता आणि समाजवादाच्या तत्त्वाला मारक ठरत आहे. जात धर्म गुंडागर्दी पैसा यावर आधारलेल्या राजकारणापासून बुद्धीवादी वर्ग स्वतःला दूर ठेवण्याचा प्रयत्न करतो आणि हेच भारतीय तत्त्वज्ञानातील आशय विसंगत ठरत आहे. नागरिकत्व कायदा, तीन तलाक विधेयक, शहाबानो पोरगी प्रकरण, समान नागरी कायदा, इस्लामी दहशतवाद किंवा हिंदू दहशतवाद याप्रसंगी धर्मनिरपेक्ष तत्त्वांशी विसंगत व्यवहार झाल्याचे दिसून येते

**References :**

1) M. Laxmikant, Indian polity, K Sagar Publication, pune

2) वि.मा.बाचल, भारतीय राज्यघटना आणि राजकीय व्यवहार, के सागर पब्लिकेशन्स, पुणे

3) जाधव तुकाराम आणि शिरपुरकर महेश, भारतीय संविधान आणि राजकारण, युनिक पब्लिकेशन्स, पुणे

4) साबळे डॉ. आर.डी., भारतीय संविधानाचे वैचारिक अंतरंग, क्रिएटिव पब्लिकेशन्स,नांदेड

5) कल्पना राजाराम, कन्स्तिच्युशन ऑफ इंडिया अंड इंडियन पोलिटी, स्पेक्ट्रम बुक्स प्रायव्हेट लिमिटेड न्यू दिल्ली.

 ISBN No. 978-93-91097-18-9

# ५. भारतीय राज्यघटनेतील मुलभुत हक्क आणि मार्गदर्शक तत्वे यांचा विश्लेषणात्मक् अभ्यास

**डॉ संभाजी संतोष पाटील**
श्री. शि. वि. प्र. संस्थेचे भाऊसाहेब ना. स. पाटील साहित्य आणि
मु. फी. मु. अ. वाणिज्य महाविद्यालय धुळे

**प्रस्तावना** :-

१७९१ मध्ये सर्वांत प्रथम अमेरिकेच्या राज्यघटनेमध्ये मुलभुत हक्कांचा समावेश करण्यात आला भारताच्या स्वातंत्र्य् आंदोलनाच्या काळात राष्ट्रवादी नेत्यांनी मुलभुत हक्कांची मागणी केली. लोकमान्य् टिळक यांच्या प्रेरणेने तयार केलेल्या स्वराज्य् सनदेत अभिव्यकती स्वातंत्र्य्, मालमत्तेचा हक्क् आणि न्यायालयीन समता इत्यादी मुलभुत हक्कांचा समावेश करण्यात आला. १९१८ च्या काँग्रेस अधिवेशनात मुलभुत हक्कांचा समावेश नव्या राज्यघटनेत व्हावा अशी मागणी करण्यात आली होती. १९२८ मध्ये नेहरु समितीने भारतासाठी निर्माण केलेल्या घटनेत मुलभुत अधिकारांचा उल्लेख करण्यात आलेला होता. नेहरु समितीने सांगितले की, ''भारतातील सर्व वर्गातील लोकांच्या धार्मिक आणि सांस्कृतिक अधिकारांची सुरक्षितता निर्माण करण्याचे सर्वोत्तम साधन म्हणजे मौलिक अधिकारांचा समावेश करणे हेच आहे. ''या स्पष्ट् शब्दात नेहरु समितीने मुलभुत अधिकाराच्या समावेशाचा आग्रह धरला होता. १९३१ मध्ये कराची येथे झालेल्या राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनात मुलभुत हक्कांच्या संदर्भात ठराव पास करण्यात आला होता. १९४५ मध्ये सप्रु समितीने मुलभुत हक्कांची मागणीचा पुनरुच्चार केला. १९४६ साली कॅबिनेट मिशनने मुलभुत अधिकाराच्या घटनेतील समावेशासाठी आचार्य. जे.बी.कृपलानी यांच्या अध्यक्षतेखाली एक उपसमितीची स्थापना करण्यात आली होती या समितीने आपला अहवाल २३ एप्रिल १९४७ राजी सादर केला. घटना समितीने सरदार वल्लभभाई पटेल यांच्या अध्यक्षतेखाली मुलभुत हक्क् व अल्पसंख्याक समिती स्थापन केली. या समितीने दिलेल्या शिफारशीच्या आधारावर चर्चा होऊन सर्वांच्या संमतीने मुलभुत हक्कांचा समावेश भारतीय राज्यघटनेमध्ये करण्यात आला. भारतीय राज्यघटनेच्या चौथ्या प्रकरणात कलम ३६ ते ५१ मध्ये मार्गदर्शक तत्वे सांगितलेली आसे. मुलभुत हक्क् व मार्गदर्शक तत्वे घटनेच्या सरनाम्यातील तत्वज्ञानातुन व्यक्त् होतात. त्यामुळे त्यांचा एकमात्र विचार करावा लागतो. कारण मुलभुत हक्कांच्या माध्यमातुन राजकीय लोकशाहीची स्थापना करता येते. मार्गदर्शक तत्वांच्या माध्यमातुन समाजातील व आर्थिक लोकशाहीची स्थापना करता येते. मार्गदर्शक तत्वांच्या समावेशाबाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांगतात की आदर्श आर्थिक लोकशाही कशी स्थापन करता येईल याची कल्पना देण्याकरिता मार्गदर्शक तत्वाचा घटनेत समावेश केलेला आहे. भारतीय राज्यघटलेतील मार्गदर्शक तत्वांचे स्वरुप नैतिक स्वरुपाचे

आहे. भारतात न्यायपुर्ण आणि कल्याणकारी स्वरुपाची समाजरचना तयार करण्याच्या दृष्टिकोनातुन या तत्वांचा उपयोग होऊ शकतो म्हणुन सरकारने धोरण ठरवितांना वा निर्णय घेतांना या नावांचा विचार करावा हि घटनाकारांची अपेक्षा होती. मानवी जीवनाच्या विकासाची गुरुकिल्ली मुलभुत हक्क् मानली जातात. हक्काशिवाय व्यक्तीच्या विकासाची कल्पना करता येत नाही म्हणुन प्राचीन काळापासुन राज्य् आणि समाजव्यवस्थेशी संघर्ष करुन विविध हक्क् प्राप्त् केले आहेत.

**शोधनिबंधाचा उद्देश** :-

भारतीय राज्यघटनेतील मुलभुत हक्क् आणि मार्गदर्शक तत्वे यांचा विश्लेषणात्मक् अभ्यास करणे हा प्रस्तुत लघुशोध निबंधाचा उद्देश आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे** :-

१) मुलभुत हक्क् व मार्गदर्शक तत्वांची माहिती अभ्यासने

२) भारतीय राज्यघटनेतील मुलभुत हक्क् व मार्गदर्शक तत्वे यांची माहिती जाणून घेणे.

३) मुलभुत हक्कांची वैशिष्टे जाणुन घेणे .

४) मार्गदर्शक तत्वांच्या प्रकाराची माहिती जाणुन घेणे.

**माहितीचे संकलन आणि विश्लेषण :-**

प्रस्तुत लघुशोध निबंधासाठी दुय्यम साधनांचा वापर करण्यात आलेला आहे. त्यात प्रकाशित, अप्रकाशित ग्रंथ, पुस्तके, मासिके, इंटरनेट इत्यादींचा वापर करण्यात आला आहे. संकलीत माहितीच्या आधारे शोधनिबंधाच्या अभ्यासाची मांडणी करण्यात आली आहे.

**विषयाचे महत्व्** :-

मानवाचा सर्वांगिण विकास होण्यासाठी हक्क् आवश्यक् असतात. या हक्कांना राज्यव्यवस्थेने मान्यता प्रदान केल्यास त्यांचे मुलभुत हक्कांमध्ये रुपांतर होत असते. मुलभुत हक्कांचा समावेश संविधानामध्ये करण्यात येतो. संविधानात समाविष्ट् मुलभुत हक्कांमध्ये घटना दुरुस्तीशिवाय परिवर्तन करता येत नाही. तसेच हक्कांना न्यायालयाचे संरक्षण प्रदान केलेले असल्याने त्यांच्यावर अतिक्रमण होण्याची शक्यता कमी असते. देशातील नागरीकांच्या हक्कांवर कोणीही अतिक्रमण करण्याचा प्रयत्न् केला तर नागरिकांना न्यायालयामध्ये दाद मागता येते आणि न्यायालयाचा निर्णय सर्वांवर बंधनकारक असतो. त्यामुळे मुलभुत हक्कांच्या माध्यमातुन नागरिकांच्या स्वातंत्र्याला एक प्रकारे हमी प्राप्त् असते आणि शासनाच्या अधिकारावर नियंत्रण प्रस्थापित करता येते.

**मुलभुत हक्कांचा अर्थ, स्वरुप आणि व्याख्या** :-

अधिकाराचा सकारात्मक् व नकारात्मक् भुमिकेतुन विचार केला जातो. बंधनांचा अभाव म्हणजे स्वातंत्र्य् हा हक्काचा नकारात्मक् भाव असतो पण मुलभुत हक्कांचा विचार सकारात्मक् परिस्थितीत केला जातो. मुलभुत हक्कांचा विचार राज्य् आणि सामाजिक परिस्थितीच्या संदर्भात केला जातो. राज्याने मान्यता दिलेले वैधानिक अधिकार आणि समाजाने

मान्यता दिलेल्या सामाजिक अधिकारांना संविधानामध्ये स्थान दिल्यानंतर त्यांना मुलभुत हक्क् म्हटले जाते. नागरिकांना त्यांच्या स्वातंत्र्याची हमी देण्यासाठी त्यांना मुक्त् आणि स्वतंत्र जीवन जगण्यासाठी तसेच स्वत:चा आर्थिक सामाजिक , शैक्षणिक , सांस्कृतिक विकास साधण्यासाठी घटनाकारांनी भारतीय संविधानामध्ये मुलभुत हक्कांचा समावेश केला आहे. संविधानाच्या तिस-या भागात कलम २२ ते ३५ मध्ये मुलभुत हक्कांविषयी तरतुद करण्यात आली आहे.

**मुलभुत अधिकाराची व्याख्या** :-

१) लास्की – "अधिकार म्हणजे समाज जीवनाची अशी परिस्थिती होय की ज्याच्या शिवाय कोणतीही व्यक्ती आपल्या व्यक्तीमत्वाचा योग्य् त-हेने विकास करु शकत नाही. व्यक्ती विकासासाठी उचित संधी प्राप्त् करुन देण्याचा अधिकाराचा उद्देश असतो.

२) बोझांके यांच्या मते हक्क् म्हणजे समाजाने मान्य् केलेला व राज्यांने अंमलात आणलेला असा व्यक्तींचा दावा होय .

**मुलभुत हक्काची आवश्यकता** :-

१) प्रत्येक नागरिकास आपले सुसंस्कृत जीवन जगण्यासाठी आणि व्यक्तीमत्वाच्या विकासासाठी काही स्वातंत्र्ये आवश्यक् असतात त्याशिवाय नागरिक आपले जीवन जगु शकत नाही हि स्वातंत्र्ये हक्कांच्या स्वरुपात नागरिकांना मिळतात. राज्याकडुन या स्वातंत्र्याच्या संरक्षणाची हमी मिळते तेव्हा व्यक्तीला अर्थपुर्ण जीवन जगणे शक्य् होते.

२) लोकशाही यशस्वी होण्यासाठी राज्यघटनेत मुलभुत हक्कांची सविस्तर् तरतुद आवश्यक् आहे. कारण या हक्कांपुढे जागरुक लोकमत, लोकांचा विकास , लोकांचा शासनातील सहभाग वाढण्यास मदत होते.

३) हक्कांमुळे लोकांना स्वातंत्र्याची हमी मिळते. धर्म, वंश, जात, भाषा, संस्कृती इत्यादी. बाबतीत विविधता असलेल्या देशात नागरीकांच्या मनात सुरक्षिततेची भावना निर्माण होण्यासाठी लोकांमध्ये सलोख्याचे सामजस्यांचे वातावरण निर्माण होण्यासाठी समाजात एकसंघता येण्यास हक्काची हमी आवश्यक् असते.

**मुलभूत हक्कांची वैशिष्टये** :-

(१)अभिव्यक्ती स्वातंत्र्याची हमी, (२) कायद्यापुढे समानता, (३) धर्म, पंथ, जात, लिंग आणि जन्मस्थान यावरुन भेदभाव न पाळणे, (४) व्यक्ती स्वातंत्र्य, (५) असाधारण कतृत्व दाखविणाऱ्यांना पदव्या, (६) आणिबाणीच्या काळामध्ये मर्यादा, (७) न्यायालयीन संरक्षण, (८) धार्मिक स्वातंत्र्य, (९) अल्पसंख्यांकांचे कल्याण, (१०) चौदा वर्षे वय असणाऱ्या मुला मुलींना संरक्षण, (११) व्यक्तीच्या पिळवणूकीतुन मुक्तता, (१२) मालमत्तेला कायदेशिर संरक्षण

**भारतीय राज्यघटनेतील मुलभूत हक्क :-**

| अ.क्र. | मुलभूत अधिकार | कलम |
|---|---|---|
| १ | समतेचा हक्क | १४ ते १८ |
| २ | स्वातंत्र्याचा हक्क | १९ ते २२ |
| ३ | शोषणाविरुध्दचा हक्क | २३ ते २४ |
| ४ | धर्मस्वातंत्र्यांचा हक्क | २५ ते २८ |
| ५ | सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क | २९ ते ३० |
| ६ | घटनात्मक उपाययोजनेचा हक्क. | ३२ |

मुलभूत हक्क ही आधुनिक जगाची देणगी आहे. १७ व्या व १८व्या अनियंत्रीत राजेशाहीच्या जुलमी राजवटीपासुन जनतेची सुटका करण्यासाठी या हक्काचा उगम युरोपमध्ये झाला. त्यावेळी त्याचा उद्देश जनतेच्या विकासाच्या मार्गातील अडचणी दुर करणे असा होता. पण आज आधुनिक लोकशाहीत त्याचे स्वरुप बदलले आहे. व्यक्तीचे प्रतिष्ठेचे ध्येय साध्य करणे असे आहे. त्यामुळे त्याचे स्वरुप आदर्शवादी बनलेले आहे. त्याचप्रमाणे त्याचा उद्देश फक्त अडचणी दुर करण्याचा राहीला नसुन आता तो व्यक्तीची सुटका करणे एवढयापुरतेच त्याचे कार्य सिमीत राहीले नसुन आता तो व्यक्तीच्या आर्थिक, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक गरजा पुर्ण करण्याचे ध्येय बाळगुन असतात व नागरिकांच्या जीवनात स्वातंत्र्य समता, बंधुता व न्याय निर्माण करतात. भारतीय राज्य घटनेने नागरिकांना दिलेले हक्क हे अमर्याद नाही. हे आपल्या राज्यघटनेचे महत्वाचे वैशिष्टये आहे. या हक्कांवर घटनेने काही बंधने घातली आहेत. हक्कांबरोबर काही बंधनेही येतात. हे विसरता येत नाही. व्यक्तीच्या स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी भारतीय राज्यघटनेत काही तरतुदी करण्यात आल्या आहेत. जोपर्यंत निश्चितपणे प्रचलीत कायद्याचे उल्लंघन होत नाही तोपर्यंत कोणत्याही व्यक्तीला कोणत्याही अपराधासंबंधी दंड देता येत नाही. तसेच त्याला कायद्याने दिलेल्या शिक्षेपेक्षा जाता शिक्षा देता येत नाही.

**मुलभूत हक्कांवरील मर्यादा** :-

भारताच्या राज्यघटनेने व्यक्तीच्या विकासासाठी मुलभूत हक्क दिलेले आहेत. व्यक्तीच्या स्वातंत्र्याचे सरंक्षण केले आहे. कायदे मंडळ आणि कार्यकारी मंडळ यांच्याकडुन व्यक्ती स्वातंत्र्याच्या हक्कांवर अतिक्रमण होता कामा नये. यासाठी न्याय मंडळास अधिकार देण्यात आलेले आहेत. असे जरी असले तरी घटनेने घटनेतील अनेक हक्कांवर मर्यादा घातल्या आहेत. तसेच घटनेतील ३३ आणि ३४व्या कलमानुसार नागरिकांच्या हककांचा संकोच करण्याचा अधिकार भारतीय संसदेला देण्यात आला आहे. आणिबाणीच्या काळात मुलभूत हक्कांवर अनेक प्रकारचे निर्बंध टाकण्यात येतात. भारतीय राज्यघटनेतील कलम ३५२ व्या कलमानुसार राष्ट्रपती जेव्हा देशात आणिबाणी जाहीर करतात तेव्हा मुलभूत

हक्कांचा संकोच करण्यात येतो. राष्ट्रपतींना देण्यात आलेला या अधिकारामुळे राष्ट्रपतींची निरंकुश सत्ता प्रस्थापित होवू शकेल अशीही टिका करण्यात येते. अशा वेळेस कायदा करण्याचा संपुर्ण अधिकार हा संसदेलाच असतो. घटनेत अशीही नोंद करण्यात आली आहे की, आणिबाणीच्या काळात मुलभूत हक्क जर स्थगीत ठेवले असतील तर त्याविरुध्द कोणालाही कोणत्याच न्यायालयात दाद मागता येत नाही. यावरुन असे दिसून येते की, भारतीय राज्यघटनेने राष्ट्रपतींना असे अधिकार देवून नागरिकांचे स्वातंत्र्य धोक्यात आणले आहे. भारतीय घटनेने भारतीय नागरिकांना एका हाताने हक्क दिले आहे व दुसऱ्या हाताने ते काढुन घेतले आहेत.

मुलभूत हक्कांवर ज्या मर्यादा आहेत त्यामुळे मुलभूत अधिकाराचा संकोच होतो ही सैध्दांतिक टिका आहे. वास्तविक नाही कारण अनेक मर्यादा मुलभूत हक्कांना अर्थ प्राप्त करुन देणाऱ्या आहेत. मागासवर्गीयांना दिलेल्या सवलतीच समस्येची ग्वाही देऊ शकतात. संपत्तीच्या अधिकाराची समाप्तीच आर्थिक लोकशाही निर्माण करु शकते इतर अनेक बंधने "राष्ट्रस्वातंत्र्यासाठी" आहेत. मुलभूत हक्क भारतासाठी मॅग्नाचार्य आहे. भाग तीन आहे तो पर्यंत भारतातील लोकशाही निर्धोक आहेत.

**मार्गदर्शक तत्वे :-**

भारतीय राज्य धोरणांच्या मार्गदर्शक तत्वांचा स्विकार हा आर्यलंड, स्पेन, युगोस्लाव्हीय, चीन, नेपाळ इत्यादी देशाच्या राज्यघटनेवरुन केलेला आहे. तसेच १९३५ चा भारत सरकार कायदा याचाही आधार घेण्यात आला आहे. भारतासारख्या विकसनशिल देशाला केवळ राजकीय लोकशाहीच प्रस्थापित करावयाची नसुन आर्थिक आणि सामाजिक लोकशाही ही निर्माण करावयाची आहे. लोककल्याणकारी राज्याची निर्मीती हे भारतीय राज्यघटनेचे एक उद्दिष्ट आहे. मार्गदर्शक तत्वातुन ते व्यक्त होते. आपल्या देशातील नागरिकांना चांगले जीवन जगता यावे असे वाटत असेल तर राज्यकर्त्यांना राज्यकारभार करतांना घटनेतील मार्गदर्शक तत्वे डोळयासमोर ठेवून प्रशासनाकडे कायदे करावयाचे असतात. राज्यकर्त्यांनी मार्गदर्शक तत्वांना अनुसरुन राज्य करावयाचे असते आणि घटनाकारांची सुध्दा तीच अपेक्षा असते. कल्याणकारी राज्याच्या निर्मीतीसाठी मार्गदर्शक तत्वे आधारभूत मानने अत्यंत गरजेचे आहे. सामाजिक न्यायाबरोबर आर्थिक न्याय मिळवून देणे हे सुध्दा शासनाचे कर्तव्यच आहे. भारतीय राज्यघटनत अंतर्भूत करण्यात आलेली मार्गदर्शक तत्वे म्हणजे राज्यकर्त्यांना एक प्रकारची आचारसंहीता तयार करुन ठेवली आहे. भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्यात व्यक्त करण्यात आलेली उद्दिष्टये गाठण्यासाठी राज्याला ही मार्गदर्शक तत्वे मार्गदर्शन करीत असतात. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्गदर्शक तत्वांच्या बाबतीत असे म्हणाले होते की, "मार्गदर्शक तत्वे ही शोभेची उदात्त तत्वे नाहीत तर कायदे मंडळ व कार्यकारी मंडळ यांनी ही तत्वे डोळयासमोर ठेवून राज्यकारभार केला पाहीजे. याच्या आधारे

कल्याणकारी राज्याची संकल्पना स्पष्ट होऊ शकेल त्यामुळे देशाच्या विकासासाठी भविष्य काळात निर्णय घेण्यासाठी मार्गदर्शक तत्वे आधारभूत ठरतील यात शंका नाही.

मार्गदर्शक तत्व भारतीय राज्यघनेचे एक महत्वाचे वैशिष्टये आहे. मार्गदर्शक तत्वांना ऐतिहासिक महत्व आहे. स्वातंत्र्य आंदोलनाचा उद्देश केवळ राजकीय स्वातंत्र्य किंवा ब्रिटीश शासनाची भारतातुन समाप्ती इतकाच नव्हता तर भारतातील सामाजिक, आर्थिक विषमता दुर करण्यासाठी स्वातंत्र्य आवश्यक आहे असे मत काँग्रेसचे नेते मांडत होते. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर घटनाकारांना स्वातंत्र्य आंदोलनातील ही तत्वे घटनेत अंतर्भूत करणे आवश्यक झाले होते. त्यासाठी घटनेच्या भाग ४ मध्ये या तत्वांना मार्गदर्शक तत्वे म्हणून समाविष्ट केले आहे. भारतीय लोकांच्या विकासासाठी अनेक महत्वाची तत्वे घटनेत समाविष्ट केली जावे असे घटनाकारांना वाटत होते पण भारताच्या आर्थिक, सामाजिक परिस्थितीमुळे त्यावेळी सर्वच गोष्टी करता येणे सर्व गोष्टींचा घटनेत समावेश करणे घटनाकारांना शक्य नव्हते. अशा तत्वांचा समावेश मार्गदर्शक तत्वांच्या भाग ४ मध्ये करण्यात आलेला आहे. मार्गदर्शक तत्वांचा उद्देश अतिशय व्यापक आहे. परिणामत: मागदर्शक तत्वे काही आर्थिक स्वरुपाची तर काही सामाजिक, नैतिक स्वरुपाची आहेत. मार्गदर्शक तत्वांना केवळ भारतातील परिस्थिती कशी असावी याबद्दल मार्गदर्शन केलेले नाही. तर आंतरराष्ट्रीय राजकारणात भारताची भुमिका काय आहे स्वातंत्र्य आंदोलनात गांधीच्यां विचारांचा अतिशय प्रभाव होता. त्या विचारांना देखील मार्गदर्शक तत्वांना महत्वाचे स्थान देण्यात आलेले आहे. भारताची सामाजिक रचना व त्या रचनेत असलेले दोष दुर करण्यासाठी मार्गदर्शन त्यात आहे. भारतात अनेक धर्म आहेत. धार्मिक तत्वावर आधारित कायदे आहेत त्यामुळे सर्वांसाठी एकाच कायद्याची आवश्यता आहे ते करण्याचे मार्गदर्शन करण्यात आलेले आहे.

**मार्गदर्शक तत्वांचे महत्व :-**

भारतीय घटनाकारांना लोकशाही शासन पध्दतीच्या अंतर्गत समाजवादी समाज रचना प्रस्थापित करावयाची होती. त्यासाठी आवश्यक तत्वांचा समावेश करण्यासाठी भारतीय राज्यघटनेमध्ये मार्गदर्शक तत्वांचा समावेश करण्यात आला. या तत्वांच्या माध्यमातुन समाजवादाशी निगडीत न्याय, समता, बंधुता यांची जोपासना करणे शक्य होईल या तत्वांचे महत्व टिकवून ठेवण्यासाठी घटना दुरुस्तीने मार्गदर्शक तत्वांच्या अंमलबजावणीसाठी केलेला कायदा मुलभूत हक्कांशी विसंगत आहे.या आधारावर रद्द करता येणार नाही हा बदल करण्यात आला. मार्गदर्शक तत्वांचे स्वरुप हे नैतिक व आदर्श स्वरुपाचे आहे. उच्च दर्जाची नैतिक संस्कृती निर्माण करण्यासाठी ही तत्वे उपयुक्त आहेत. आधुनिक काळात कल्याणकारी राज्याची संकल्पना सर्वत्र मान्य करण्यात आलेली आहे. त्यास अनुकूल अशी अनेक तत्वे मार्गदर्शक तत्वामध्ये समाविष्ट आहेत. उदा.बेरोजगारी,अपंगत्व, वृध्दत्व या काळात सरकारी मदत मार्गदर्शक तत्वांच्या माध्यमातुन कल्याणकारी राज्याचा पाया अधिक विस्तृत करता येवू शकतो. भारतीय राज्य घटनेत समाविष्ट मार्गदर्शक तत्वांच्या माध्यमातुन जनतेच्या आशा

आकांक्षा मुल्य, संस्कृती, रुढी व परंपरा इ.विचार केला आहे. मार्गदर्शक तत्वांच्या माध्यमातुन सरकारच्या कामकाजाचे मुलभूत जनता करीत असते. भारतीय घटनेमध्ये राज्याच्या धोरणांच्या मार्गदर्शक तत्वांचा
समावेश केल्यामुळे भारतीय राज्यघटना उदार मतवादी राज्यघटना बनली आहे असे मत के.सी.व्हियर यांनी व्यक्त केले आहे.

**भारतीय राज्यघटनेतील मार्गदर्शक तत्वांचे प्रकार :-**

(अ)समाजवादी तत्वावर आधारीत मार्गदर्शक तत्वे

(ब)सामाजिक मार्गदर्शक तत्वे. (क)राजकीय स्वरुपाची मार्गदर्शक तत्वे.

(ड)आंतरराष्ट्रीय संबंधाविषयक मार्गदर्शक तत्वे

**४२ व्या घटना दुरुस्तीने समाविष्ट तत्वे :-**

(१) कलम ३९-अ नुसार – आर्थिक दृष्टीकोनातुन मागासवर्गीयांना कायदेविषयक मोफत सहाय्य करावे.

(२) कलम ३९-क नुसार – बालकांची निरोगी वाढ व स्वातंत्र्यांसाठी त्यांना आवश्यक संधी व सवलती द्याव्यात.

(३) कलम ४३-अ नुसार – कोणत्याही उद्योगामध्ये गुंतलेल्या संस्था व संघटनेच्या व्यवस्थापनात कामागारांना सहभाग द्यावा.

(४) कलम ४८-अ नुसार – देशातील वने व वन्यप्राणी यांचे रक्षण करण्यासाठी राज्य प्रयत्न करेल.

**समारोप :-**

भारतीय राज्यघटनेमध्ये मुलभूत हक्क आणि मार्गदर्शक तत्वे या दोन्ही तत्वांचा समावेश लोककल्याणाच्या हेतुसाठी झालेला आहे. या दोघांच्या अंमलबजावणीतुन भारतातील लोकांचे जीवन सुखी, समृध्द व समाधानी करता येऊ शकेल. भारताचा सामाजिक, आर्थिक आणि राजकीय विकास करण्यासाठी मुलभूत हक्क व मार्गदर्शक तत्वे उपयुक्त व मोलाचे आहेत. मार्गदर्शक तत्वे घटनाकारांच्या देशाच्या कल्याणासाठी नंतरच्या सरकारकडुन केलेल्या अपेक्षा आहेत. त्यांची अंमलबजावणी करणे ही सत्तेवर असणाऱ्या सरकारची नैतिक जबाबदारी आहे. देशातील लोकांच्या कल्याणासाठी मुलभूत हक्कांची नितांत गरज आहे. भारतीय राज्यघटनेत मुलभूत हक्क व मार्गदर्शक तत्वे यांना महत्वपुर्ण स्थान दिले आहे.

**संदर्भ ग्रंथ**

(१) प्रा.मुळीक आर.जी.,भारतीय शासन, प्रकाशक सौ.सिंधुबाई राजाराम मुळीक, वसंत नगर, सांगली.

(२)घांगरेकर चि.ग., भारतीय राज्यघटना, मंगेश प्रकाशन, नागपुर.

(३)जोशी सुधाकर, भारताचे शासन आणि राजकारण, विद्या प्रकाशन, औरंगाबाद.

(४)डॉ.पाटील प्रतिभा, प्रा.आरगडे अंबादास, भारतीय प्रशासन आदित्य प्रकाशन, लातुर.

(५)प्रा.बकाणे छाया, भारतीय राजकीय व्यवस्था, श्रीविद्या प्रकाशन, पुणे.

(६)डॉ.राठी शुभांगी, भारतीय संविधानाची ओळख, अथर्व पब्लीकेशन्स, जळगांव.

 ISBN No. 978-93-91097-18-9

# ६. निवडणूक आयोग व निवडणूक पद्धती

**प्रा डॉ. विजयकुमार सोन्नर**
(राज्यशास्त्र विभाग, प्रमुख)
होळकर महाविद्यालय, राणीसावरगाव
ईमेल - मो.नं.- 9673112369

जगातील सर्वात मोठा लोकशाहीवादी देश म्हणून भारताची आजची ओळख आहे. भारतीय राज्यघटनेत या देशासाठी लोकशाही शासन पद्धतीचा स्वीकार केला आहे.हा निर्णय आपल्या घटनाकारांनी अत्यंत जाणीवपूर्वक, विचारपूर्वक आणि निश्चित स्वरूपाच्या तात्विक भूमिकेतून घेतला होता. भारतीय जनतेच्या निर्णयक्षमतेवर, मूल्यावर व विवेक बुद्धीवर भारतीय लोकशाही सिद्धांत पूर्ण विश्वास असलेली भारतीय राज्यघटना आहे. भारत्तेचा वापर देशातील सामान्य लोकांच्या कल्याणासाठी झाला पाहिजे, भारतीय सत्ता संपूर्ण जनतेच्या कल्याणासाठी कार्य करेल अशी अपेक्षा ठेवून घटना समितीची स्थापना करण्यात आली. राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळीतून भारताच्या घटना समितीचे बहुसंख्य सभासद आले होते. भारतीय घटना समितीचे सदस्य आणि राष्ट्रीय नेत्यांच्या तात्विक भूमिकेमुळे त्यांनी लोकशाही शासनव्यवस्था मान्य केली. सर्वमान्य जनतेचा व भारतीय संस्कृतीचा वारसा, सर्व जनतेच्या स्वप्नांची पूर्तता करण्याची हमी देणारी लोकशाही शासनव्यवस्था भारताने स्वीकारली. लोकशाही व्यवस्था ही एक जीवन पद्धतीही होय . लोकशाही देशाचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यास सहाय्यभूत ठरणारी आहे. भारतीय लोकशाहीमध्ये संस्था निर्माण होण्यास चालना देणारी आणि त्यांच्यात परस्पर विश्वास निर्माण करणारी एक आदर्श व्यवस्था आहे. भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्याचे उद्दिष्टात स्पष्ट शब्दांमध्ये राजकीय, सामाजिक आर्थिक लोकशाहीची संपूर्ण गाथा समोर ठेवली आहे. आधुनिक काळातील परिणामकारक शासन पद्धती म्हणून लोकशाही शासनव्यवस्था ओळखली जाते.लोकशाही शासनाच्या यशस्वीतेसाठी समाजातील घटकांनी लोकशाही तत्त्वाचा व जीवन पद्धतीचा स्वीकार करणे आवश्यक आहे. लोकशाहीत अभिप्रेत असलेल्या मूल्यांना विरोध करणाऱ्या समाजात लोकशाही यशस्वी होऊ शकत नाही. समाजाच्या व राष्ट्राच्या विकासासाठी लोकशाही शासन व्यवस्था उपयुक्त विचारसरणी आहे. लोकशाही म्हणजे काय तर लोकसत्ता असलेली राज्य. लोकशाहीमध्ये सत्तेच्या शांती पूर्वक हस्तांतरणासाठी व जनतेच्या मनात सरकार संबंधी विश्वास टिकून राहण्यासाठी निवडणुकांची निपक्षपाती पणा आवश्यक असते यासाठी निवडणूक आयोग महत्त्वपूर्ण भूमिका बजावत असते. जनतेचा विश्वास निवडणूक व्यवस्थेवर राहिला नाही तर लोकशाहीचा संपूर्ण आधार नष्ट होतो. याच कारणामुळे लोकशाही असणाऱ्या देशात निवडणूक आयोगाला अत्यंत महत्त्व प्राप्त झाले आहे निवडणूक आयोग आपले संपूर्ण यंत्रणा निष्पक्ष निवडणुकीसाठी सज्ज ठेवत असतो.

 ISBN No. 978-93-91097-18-9

हृदयनाथ कुंझरू यांनी संविधान सभेत म्हटले होते की 'जर निर्वाचन व्यवस्था दोष पूर्ण असेल किंवा अकुशल असेल तर अशा व्यक्ती कडून संचलित होत असेल, ज्यांची इमानदारी संशयास्पद आहे तेव्हा लोकशाही आपल्या उगम स्थानावरच दोष पूर्ण होईल.' त्यामुळे भारतीय घटनाकारांनी निवडणूक आयोगाला घटनेत स्थान दिल आहे. राज्यघटनेतील भाग 15 कलम 324 ते 329 मध्ये निवडणूक आयोगा संबंधी विस्तृत चर्चा केली आहे.

विषयाचे महत्व भारतीय सत्तेचा वापर देशातील सामान्य लोकांच्या कल्याणासाठी झाला पाहिजे, भारतीय सत्ता संपूर्ण जनतेच्या कल्याणासाठी कार्य करेल अशी अपेक्षा ठेवून कल्याणकारी शासन व्यवस्था स्थापन करण्यासाठी, पारदर्शक व्यवस्थेसाठी, निकोप लोकशाहीसाठी जनतेच्या विश्वासास पात्र असा निवडणूक आयोग असणे आवश्यक आहे. निवडणूक आयोगाच्या कार्याबाबत जर जनतेच्या मनात शंका-कुशंका असतील तर ते देशासाठी नव्हे तर संपूर्ण व्यवस्थे विषयी प्रश्न निर्माण करते. निकोप लोकशाहीसाठी निष्पक्ष निवडणूक व्यवस्था असणे आवश्यक आहे. लोकशाहीवादी देशामध्ये वेगवेगळया निवडणुकीच्या पद्धती आहेत भारतीय निवडणूक आयोग तर्फेद स्वातंत्र्यानंतर आतापर्यंत ज्या निवडणुका झाल्या आहेत त्या योग्य रीतीने व जनतेला विश्वासात घेऊन जनतेचा विश्वास वृद्धिंगत करणाऱ्या निवडणुका आयोगाने घेतल्या आहेत. यामध्ये कुठलीही शंका नाही तरीसुद्धा आपण भारतीय निवडणूक आयोग या संबंधित कार्यप्रणालीचा आढावा घेणे, काळानुरूप त्यामध्ये काही बदल होतो का? व योग्य बदल व्हावा यासाठी चर्चा करणे आवश्यक आहे यासाठी जागतिक लोकशाहीवादी देशांमध्ये ज्या निवडणूक पद्धती आहेत त्यातील योग्य अशी निवडणूक पद्धती आपल्या देशाची आहे का ? हे पाहणे देखील आवश्यक आहे.

विदेशातील निवडणूक पद्धती

लोकशाहीची जननी आपण इंग्लंडला म्हणतो लोकशाहीची सर्वोत्तम प्रणाली विकसित करण्यासाठी इंग्लंड मध्ये बरेच संशोधन झाले आहे. निवडणूक प्रक्रियेत अनेक सैदांतिक मॉडेल शोधले गेले आहेत. राजकीय विचारवंत जॉन स्टुअर्ट मिल लोकशाहीचे समर्थक होते मात्र त्यांनी गुप्त मतदान पद्धतीला ब्याहड पणाचे प्रतीक मानले, मिल आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी प्रमाणसिर निवडणुकीचे तत्व विकसित केले हे तत्व बहुमतावर आधारित निवडणूक पद्धतीच्या बरेच चांगले मानले जाते. त्याचप्रमाणे अमेरिकेत मर्यादित मताधिकार प्रोड मताधिकार यापेक्षा अधिक उपयुक्त आणि चांगला आहे असे मानले जाते .लोकशाही शासन व्यवस्थेच्या बळकटीसाठी निवडणूक प्रक्रिया सोपी असने आवश्यक आहे जेणेकरून अधिकाधिक लोकांना त्यात सहभागी होता येईल. जर्मनीमध्ये लोकशाही नेहमीच खूपच कमकुवत राहिली आहे त्यामुळे याचे कारण असे आहे की तिथली निवडणूक प्रक्रिया अत्यंत किचकट आहे. त्याचप्रमाणे स्कॅन्डिनेव्हियन देशांतील निवडणूक प्रक्रियेला एक नवीन स्वरूप प्राप्त झाले आहे. कारण या देशातील पक्षीय व्यवस्था खूपच कमकुवत झाली. त्यामुळे राजकारणातील सामांन्य लोकांचा रस खूप कमी झाला. या देशात निवडणुका ही एक सामान्य

घटना बनली आहे आणि लोकांना कुठे? कोणत्या? निवडणुका होत आहेत याची पर्वा देखील नाही. अशी अवस्था झाली होती.प्रत्येक देशाच्या निवडणूक प्रक्रियेत नक्कीच काही फरक आहे. निवडणूक प्रक्रियेचे मूलभूत तत्त्व सर्वत्र सारखे असले तरी प्रत्येक देशाची निवडणूक प्रक्रिया त्या विशिष्ट देशातील प्रचलित सामाजिक विश्वास आणि सामाजिक दबावांनी प्रभावित झाल्याशिवाय राहत नाही. पाश्चिमात्य देशांमध्ये देखील निवडणूक प्रक्रिया खूप महाग असते आणि ती सुद्धा निवडणुकांवर प्रभाव टाकण्यासाठी चुकीच्या पद्धतींचा अवलंब करते. पण एका बाबतीत पाश्चिमात्य देश आपल्यापेक्षा पूर्णपणे भिन्न आहेत. भारताप्रमाणे तेथील जनताही निवडणूक भ्रष्टाचाराला वादाचा विषय बनवत नाही, किंवा सरकारी यंत्रणा तेथे कायदे करून निवडणूक भ्रष्टाचार थांबवण्याचा कोणताही प्रयत्न करत नाही. किंबहुना, समाज स्वतःच अशा लोकांना प्रतीनिधित्वा पासून बाजूला ठेवतो आणि जे लोक निवडणुकीत अनैतिक पद्धती वापरतात, अशा लोकांना राजकारणातून निवृत्त होण्यास भाग पाडले जाते.

जवळजवळ सर्व देशांमध्ये, निवडणूक पद्धती तेथील लोकांनी त्यांच्या परिस्थितीनुसार स्वीकारली आहे. या संदर्भात, सर्व युरोपियन देश स्वित्झर्लंडची निवडणूक व्यवस्था सर्वोत्तम मानतात. स्विझरलँड येथे लोकप्रतिनिधी आपले कर्तव्य नीट पार पाडू शकला नाही तर त्याला परत बोलावण्याची तरतूद आहे. तिथली निवडणूक प्रक्रिया

लोकप्रतिनिधी निवडण्यापुरती मर्यादित नाही, तर लहान मुद्द्यांवरही 'जनमत' घेण्याची व्यवस्था आहे,जेणेकरून सत्तेच्या सर्व निर्णयांमध्ये लोकसहभाग सुनिश्चित करता येईल.याशिवाय तिकिटांचे वितरण हे निवडणूक प्रक्रियेतील एक महत्त्वाचे पाऊल आहे कारण ते ठरवते की कोणत्या प्रकारचे लोक निवडले जातील आणि लोक सत्तेत कसे सहभागी होतील. बहुतेक युरोपीय देशांमध्ये, तिकिटांचे वितरण राजकीय पक्ष स्वतः हाताळतात, तर अमेरिकेत 'प्राइमरी' ची पद्धत प्रचलित आहे, ज्या अंतर्गत एखाद्या विशिष्ट पक्षाशी संबंधित सदस्यांना पसंतीच्या नावाची मान्यता / प्रस्ताव देण्याचा अधिकार आहे. प्रतिनिधी त्यांच्या उच्च कमांडला न कळवता. या प्रस्तावित प्रतिनिधींमधून एका व्यक्तीची निवड 'उन्मूलन' प्रणालीच्या आधारे केली जाते. उमेदवारांच्या निवडीची ही व्यवस्था ही लोकशाही व्यवस्था आहे जी स्वतः पक्षात स्वतंत्र आहे. या पद्धतीत उमेदवाराच्या 'गुणवत्तेपेक्षा' त्याच्या 'लोकप्रियतेला' महत्त्व दिले जाते. स्कॅन्डिनेव्हियन देशांमध्ये, निवडणूक प्रक्रिया इतकी शांत आणि सामान्य झाली आहे की विविध पक्ष निवडणूक लढवण्यासाठी उमेदवार शोधू शकत नाहीत. या देशांपैकी बऱ्याच राजकीय पक्षांना आपला उमेदवार उभा राहण्यासाठी मिळत नाही तसेच महत्त्वाचे म्हणजे निवडणुकांमध्ये माध्यमांचा वापर चांगला मानला जात नाही, उमेदवार जितका जास्त माध्यमांचा वापर करेल तितकी निवडणूक हरण्याची शक्यता वाढते.व्यापकपणे सांगायचे तर, लोकशाही व्यवस्थेअंतर्गत, आजकाल संपूर्ण जगात केवळ दोन प्रकारच्या सरकारी पद्धती प्रचलित आहेत, संसदीय शासन व्यवस्था आणि राष्ट्रपती शासन व्यवस्था. या दोन प्रणालींमधील मुख्य फरक असा आहे की जिथे पहिल्या व्यवस्थेमध्ये प्रशासनाची सर्वोच्च

 ISBN No. 978-93-91097-18-9

शक्ती संसदेद्वारे लोकांमध्ये निहित आहे, तर दुसऱ्या प्रकारच्या व्यवस्थेत ही शक्ती राष्ट्रपतींकडे आहे. येथे काही प्रमुख देशांच्या निवडणूक पद्धतींचा तुलनात्मक अभ्यास करणे योग्य ठरेल:

यूके निवडणुकांमध्ये, विजयी उमेदवाराला जास्तीत जास्त मते मिळवण्याच्या आधारावर ठरवले जाते, जरी त्या उमेदवाराला केवळ अल्पसंख्याक मते मिळाली असतील. अशा प्रकारे ब्रिटनच्या 'हाऊस ऑफ कॉमन्स'च्या निवडणुका भारतात झालेल्या निवडणुकांप्रमाणेच असतात, परंतु मुख्य फरक हा आहे की यूकेमध्ये फक्त दोन किंवा तीन पक्षच निवडणुकांमध्ये भाग घेतात. म्हणून, तेथे विजयी उमेदवाराला बहुतेक 50 टक्क्यांपेक्षा जास्त मते मिळतात, तर भारतात परिस्थिती पूर्णपणे उलट आहे. आपल्याकडे राजकीय पक्षांची संख्या मोठी आहे आणि नंतर मोठ्या संख्येने अपक्ष उमेदवारही रिंगणात उतरतात. यामुळे, कधीकधी उमेदवार फक्त सात-आठ टक्के मते मिळवूनही येथे निवडणूक जिंकतो.अमेरिकेत लोकशाही व्यवस्थेअंतर्गत अध्यक्षीय व्यवस्था अस्तित्वात आहे. येथे राष्ट्रपती थेट लोकांनी 4 वर्षांसाठी निवडलेला असतो. अमेरिकेत संसदेची दोन सभागृहे आहेत परंतु राष्ट्रपतीपद कोणत्याही सभागृहाला जबाबदार नाही. अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांवर संसदेचे मत बंधनकारक नाही तर केवळ शिफारसीस आहे. संसदेने संमत केलेला कोणताही ठराव त्याच्या सुधारित स्वरूपात स्वीकारण्यास, नाकारण्यास  राष्ट्रपती मोकळे आहेत. अशा प्रकारे, अमेरिकेत लोकशाही व्यवस्था असूनही, सर्व अधिकार राष्ट्रपतींकडे आहेत.राष्ट्रपतींच्या निवडीच्या वेळी, अमेरिकेच्या प्रत्येक राज्यात लोकसंख्येच्या घनतेच्या आधारे निवडणूक जिल्हे (परिसर) तयार केले जातात. तेथेही गुप्त मतदान पद्धतीद्वारे निवडणूक होते आणि मतदार त्याच्या आवडीनुसार एकापेक्षा जास्त उमेदवारांना मत देऊ शकतो.

रशिया- जरी रशियाचे प्रजासत्ताक पूर्णपणे लोकशाही म्हणता येत नाही, परंतु तरीही लोकशाही देशांच्या यादीत त्याचा समावेश होतो कारण त्याची संसद देखील निवडणुकांद्वारे तयार केली जाते. तसे, रशियाच्या संसदेच्या निवडणुका केवळ औपचारिकता आहेत कारण तेथे या निवडणुका सत्ताधारी कम्युनिस्ट पक्षाद्वारे आयोजित केल्या जातात आणि त्याशिवाय निवडणूक क्षेत्रात दुसरा कोणताही पक्ष निवडणुका लढवत नाही.रशियातही गुप्त मतपत्रिकेला प्राधान्य दिले जाते आणि 18 वर्षांवरील प्रत्येक नागरिकाला मतदानाचा अधिकार आहे. रशियातील उमेदवारांची निवड प्रक्रिया देखील काहीशी वेगळी आहे. सर्वप्रथम काही सार्वजनिक संस्था, युवा मोर्चे आणि सांस्कृतिक संघटनांद्वारे उमेदवाराचे नाव प्रस्तावित केले जाते आणि नंतर प्रस्तावित उमेदवारांची पात्रता तपासली जाते. यानंतर उमेदवार प्रस्तावित करणाऱ्या संघटनांची गट बैठक आयोजित केली जाते, ज्यात स्थानिक उमेदवारांपैकी एकाला निवडणुकीसाठी एकमताने नामांकित केले जाते. अशा प्रकारे रशियन 'लोकशाही'ची विडंबना अशी आहे की प्रत्येक मतदारसंघात एकच उमेदवार असू शकतो ज्यांचा विजय निश्चित आहे. रशियामध्ये  तेथे 'अनावश्यक संघर्ष टाळण्याची युक्ती' असे वर्णन केले आहे. निवडणुकीद्वारे नामांकित उमेदवार, ज्याला एकूण वैध मतांपैकी अर्ध्याहून अधिक मते मिळतात, त्याला विजयी

 ISBN No. 978-93-91097-18-9

घोषित केले जाते, अन्यथा संपूर्ण निवडणूक पुन्हा घेतली जाते  रशियाच्या निवडणुकांचे वैशिष्ट्य म्हणजे तेथील मतदानाची टक्केवारी साधारन 95 ते 98 टक्के असतअशाप्रकारे आपण पाहिले आहे की वेगवेगळ्या लोकशाही देशांमध्ये वेगवेगळ्या निवडणुका पद्धती लागू केल्या जातात, परंतु त्या सर्वांचा एकच उद्देश आहे, लोकांचे राज्य प्रस्थापित करणे, सत्तेत लोकांचा सहभाग सुनिश्चित करणे आणि जनमत आधारित महत्वाचे राजकीय निर्णय घेणे. निवडणुकीची पद्धत काहीही असो, जर ती प्रामाणिकपणे अंमलात आणली गेली तर लोकशाहीची सर्व उद्दिष्टे सहज साध्य होऊ शकतात. लोकशाही शासनपद्धती अंतर्गत येणाऱ्या सर्व यंत्रणांचे स्वतःचे गुण आणि दोष आहेत, परंतु निवडणुका घेणाऱ्या संस्थांच्या मनात जर सत्य, प्रामाणिकपणा असेल आणि ती लोकशाही मूल्यांवर विश्वास ठेवत असेल तर कोणत्याही व्यवस्थेचा आधार प्रगल्भ असतो मजबूत असतो.

संदर्भ


1. भारतीय संविधानाचा परिचय-D.D. बेसू
2. भारतीय प्रशासन - होशियार सिंह
3. भारतीय प्रशासन - श्रीराम माहेश्वरी
4. IIPA - जुलै -सप्टेंबर. 2007.
5. भारतीय प्रशासकीय यंत्रणा - डॉ गौतम वीर
6. भारतातील सार्वजनिक प्रशासन - डॉ. बी. एल. फडिया.
7. भारतीय प्रशासन - डॉ कमलेश कुमार
8. भारतीय प्रशासन - डॉ. अमरेश्वर अवस्थी आणि डॉ. आनंद अवस्थी
9. भारतीय लोकप्रशासन - डॉ. सुरेंद्र कटारिया उच्चतर लोकप्रशासन - डॉ. बी. एल. फडिया/ डॉ. कुलदीप फडिया
10. मध्ययुगीन भारतातील शासन प्रा. आर. च्या. पारुधी - भारतीय प्रशासन प्रा.के. आर. बंग
11. भारतीय शासन आणि राजकारण - डॉ. सुधाकर जोशी / प्रा. कि
12. भारतीय प्रशासकीय यंत्रणा - डॉ पारस बोरा
13. भारतीय प्रशासन (सिंधूपूर्व ते इ.स. १३००) - डॉ. सतिश दांडगे
14. www.parliamentofindia.nic.in
15. www.education.nic.in
16. www.supremecourtofindia.nic.in

# ७. भारतीय संविधानाचे प्रमुख वैशिष्ट्ये

**प्रा. डॉ. बी. एम. नरवाडे**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
श्री दत्त कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
हदगाव जिल्हा नांदेड
मो.नं.9527528792 E-Mail- vaibhavi358@gmail.com

**गोषवारा**

भारताने संसदीय लोक”ाहीचा स्विकार करून 71 वर्षे झाली आहेत तरी पण यापूर्वी डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, आपण आपली राजकीय लोक”ाही उत्तम अ”ाी सामाजिक लोक”ाही रूजवली पाहीजे. सामाजिक लोक”ाहीच्या आधारा”िावाय राजकीय लोक”ाही पूर्ण होऊ शकत नाही. सामाजिक लोक”ाहीचा अर्थ असा आहे की, स्वातंत्र्य,समता आणि बंधूता या जीवनातील तत्वाला मान्यता देणे होय. भारतीय संविधान हे 2 वर्षे 11 महिने आणि 18 दिवस एवढया प्रदिर्घ कालावधीत संविधानकारानी तयार केलेले आहे. भारतीय संविधानाची प्रमुख वै”िाष्टये म्हणजे लिखित संविधान,निर्मित संविधान, अं”ात: ताठर व लवचिक,जनतेचे सार्वभौमत्व, संघराज्याची निर्मिती,एकेरी नागरीकत्व, मुलभुत अधिकाराचा समावे”ा, राज्याच्या धोरणाची मार्गद”र्िक तत्वे, धर्मनिरपेक्ष राज्य,स्वतंत्र न्यायमंडळ,स्वातंत्र्य, समता,बंधूता व न्याय या तत्वाचा स्विकार प्रमुख वै”िाष्टये आहेत. भारतीय संविधान भारतीय जनतेने मान्य केलेले आहे असे दिसून येते.

**पस्तावना :**

भारत हा विविधतेने नटलेला दे”ा आहे. भारतात विविध जाती,धर्म, वं”ा,प्रांत,भाषा,वातावरण,दबावगट,राजकीय पक्ष, सामाजिक ,धार्मिक संघटना आहेत.स्वातंत्र्यानंतर भारतीय राज्यघटनेची आव”यकता भासु लागली इ.स.1934 मध्ये भारतीय साम्यवादी चळवळीचे प्रणेते आणि पुरोगामी लोक”ाही विचारवंत एम.एन.रॉय यांनी सुचविल्याप्रमाणे 1926 मध्ये संविधान सभा बनविण्यात आली[1] 15 ऑगस्ट 1947 मध्ये दे”ााच्या फाळणीनंतर भारताची खरी प्रगती सुरू झाली आणि 26 नोव्हेंबर 1949 रोजी भारतीय संविधानाचे ”िाल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी संविधान सभेत संविधान सादर केले व डॉ.राजेंद्र प्रसाद यांची स्वाक्षरी झाली. परंतु हे संविधान 26 जानेवारी 1950 पासून अंमलात आले या दिव”ाी आपल्या प्रदिर्घ कालखंडात पहिल्यांदा भारताने आधुनिक संस्थात्मक असलेल्या संसदीय लोक”ाहीचा स्विकार केला. लोकसभा आणि राज्यसभा या दोन सभागृहाना मिळून संसद म्हटल्या जाते.[2] भारतासारख्या विविधतेने नटलेल्या बहुसांस्कृतिक दे”ाामध्ये लोक”ाही रूजविण्याचे विविध प्रकारच्या अडचणीवर मात करून पार पाडल्या जात आहे. स्वातंत्र्यानंतर अर्धे शतक निघून गेले तरीही

भारतीय जनता अद्यापही अज्ञानी आहे, ि"ाक्षणाच्या सोई अपुऱ्या आहेत, अज्ञानामुळे अंधश्रध्दा व जुनाट परंपरा कायम आहेत.[3] भारताने संसदीय लोक"ाहीचा स्विकार करून 71 वर्षे झाली आहेत तरी पण यापूर्वी डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, आपण आपली राजकीय लोक"ाही उत्तम अ"ी सामाजिक लोक"ाही रूजवली पाहीजे. सामाजिक लोक"ाहीच्या आधारा"ािवाय राजकीय लोक"ाही पूर्ण होऊ शकत नाही. सामाजिक लोक"ाहीचा अर्थ असा आहे की, स्वातंत्र्य,समता आणि बंधूता या जीवनातील तत्वाला मान्यता देणे होय[4] म्हणजेच लोक"ाही ही एक जीवनपध्दती आहे. या लोक"ाहीला परिपक्व करावयाचे असेल तर संविधानाची अत्यंत आव"यकता आहे. यामुळे भारतीय संविधान हे 2 वर्षे 11 महिने आणि 18 दिवस एवढया प्रदिर्घ कालावधीत घटनाकारांनी तयार केले आहे. या संविधानात भारताच्या आधुनिक पिढीच्या सामाजिक,धार्मिक व राजकीय उदीष्टांची व अपेक्षांची अभिव्यक्ती असल्याचे दिसून येते.प्रस्तुत अध्ययनात भारतीय संविधानाचे प्रमुख वैि"ाष्टयांचा अभ्यास केला आहे.

**भारतीय संविधानाचे प्रमुख वैशिष्ट्ये:**

**1. लिखित संविधान :**

भारताचे संविधान हे घटना परिषदेतील मसुदा समितीने लिखाण करून तयार केलेले आहे या भारतीय संविधानात सुरूवातीस 395 कलमे आणि 8 परि"ाष्ट होती ही घटना 22 भागात विभागलेली होती परंतु 2016 च्या शेवटी हे संविधान 465 कलमे 12 परी"ाष्ट व 25 भागात विभागलेली आहे. जगातील कोणत्याही दे"ाचे संविधान एवढे विस्तृत नाही.

**2. जगातील सर्वात मोठे संविधान :**

भारतीय संविधान हे जगातील ईतर दे"ाच्या तुलनेत सर्वात मोठे आहे. मुळ संविधानात 395 कलमे, 8 परि"ाष्ट व 22 भागात विभागलेले आहे. या तुलनेत अमेरिकेचे संविधान 7 कलमे, चिन 106 कलमे ,र"ाया 126 कलमे, दक्षिण आफ्रीका 153,ऑस्ट्रेलिया 128,कॅनडा 127,स्वित्झरलॅडच्या संविधानात 123 कलमे आहेत. म्हणजेच जगातील सर्वच दे"ाच्या संविधानाची तुलना केल्यास भारताचे संविधान हे जगात सर्वात मोठे आहे हे यावरून स्पष्ट होते. भारतीय संविधान मोठे होण्याचे कारण संविधानातील तत्वे अधिक तप"ालासह स्पष्ट करण्यात आली आहेत.

**3. निर्मित संविधान :**

भारतीय संविधान हे मसुदा समितीने निर्माण केलेले आहे. इंग्लंडप्रमाणे रूढी,परंपरेनुसार उत्क्रांत झालेले नाही. भारतीय संविधान निर्माण करण्यासाठी 23 जुलै 1946 रोजी घटना समितीची स्थापना करण्यात आली. 9 डिसेंबर 1946 ला घटना समितीची पहिली बैठक झाली.[5] मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणुन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची निवड करण्यात आली. घटना समितीचे एकुण 11 अधिवे"ाने झाली ज्यांच्या दिवसांची संख्या 165 आहे. मसुदा समितीने 141 दिवस काम करून घटनेचा मसुदा तयार केला त्यावर घटना परिषदेत एकुण 114

दिवस चर्चा झाली. संविधान निर्माण करण्यासाठी एकुण खर्च 63,96,339 रू.एवढा आला. हे
संविधान 26 नोव्हेंबर 1949 रोजी सकाळी 11 वाजून 10 मिनिटांनी घटना परिषदेत संमत झाले आणि 26 जानेवारी 1950 पासून अंमलबजावणीस सुरूवात झाली म्हणुन भारतीय संविधान हे निर्मित आहे.

**4. अंशतः ताठर व लवचिक :**

ज्या संविधानामध्ये साध्या,सोप्या पध्दतीने बदल करता येतो त्याला लवचिक असे म्हणतात तर ज्या संविधानात दुरूस्ती करण्यासाठी वि"ाष्ट बहुमताची आव"यकता असते ते संविधान ताठर असते. त्यामुळे भारतीय संविधान हे अमेरिकन संविधानाप्रमाणे ताठर व इंग्लंडच्या संविधानाप्रमाणे लवचिक नाही. भारतीय घटनेत बदल करताना वि"ाष्ट पध्दती स्विकारली आहे. घटनादुरूस्तीच्या विधेयकाला संसदेच्या दोन्ही गृहाची 2/3 बहुमताने मंजुरी घेतल्यानंतर ते विधेयक राज्याच्या संमतीसाठी पाठवले जाते. एकुण घटकराज्यापैकी निम्याहून अधिक घटकराज्यांच्या विधीमंडळानी मंजुरी दिल्यानंतर राष्ट्रपतीच्या सहीने ते विधेयक मंजूर होते.या वि"ाष्ट पध्दतीबरोबरच संसदेच्या साध्या बहुमताने घटनेतील सर्वसाधारण कायद्यात दुरूस्ती करता येते. तेंव्हा भारतीय घटनेत दुरूस्ती करण्याची पध्दती फार"ाी कठीण नाही.[6] भारतीय संविधानाच्या कलम 368 मध्ये संविधान दुरूस्तीची प्रक्रिया दिलेली आहे. म्हणुनच भारतीय संविधान हे अं"ातः ताठर व लवचिक आहे.

**5.जनतेचे सार्वभौमत्व :**

भारतीय संविधानानुसार भारतीय जनता सार्वभौम आहे. कारण भारतीय संविधान हे जनतेने निर्माण केलेले आहे व जनतेने स्वतःप्रतच अर्पण केले आहे. भारतात दर 5 वर्षानी लोकसभा व विधानसभेच्या प्रत्यक्ष निवडणुका होतात यामधून लोकप्रतिनिधीची निवड होते या लोकप्रतिनिधीमधून शासनाची निर्मिती केली जाते. शासनाने योग्य काम केले नाही तर पुन्हा त्या प्रतिनिधीना निवडून न देण्याचा अधिकार जनतेला आहे. म्हणजेच अंतिम सत्ता ही जनतेच्या हाती आहे म्हणुन भारतीय संविधानात जनतेचे सार्वभौमत्व अंतर्भूत आहे.

**6. संघराज्याची निर्मिती :**

भारतीय संविधानाची वै"ाष्टये म्हणुन संघराज्याकडे पाहिल्या जाते. परंतु भारतीय संविधानात 'संघराज्य' या शब्दाचा उल्लेख कोठेही दिसून येत नाही. Federation (संघराज्य) या शब्दाऐवजी Union of State (राज्याचा संघ) हा शब्दप्रयोग केलेला आहे. संघराज्य याचा अर्थ केंद्रसरकार व राज्य सरकार यांच्यात केलेली सत्तेची विभागणी होय.म्हणजेच संघराज्यात सत्तेचे विकेंद्रीकरण केलेले असते ते भारतीय संविधानात दिसून येते. तसेच भारतीय संघराज्यात संघराज्य"ाासन पध्दतीची वै"ाष्टये दिसून येतात ती म्हणजे लिखित राज्यघटना, अधिकार क्षेत्राची विभागणी आणि सर्वोच्च न्यायालय ही संघराज्याची वै"ाष्टये भारतीय संघराज्यात दिसून येतात.

**7. एकेरी नागरिकत्व :**

भारतीय संविधानाने एकेरी नागरिकत्वाचा स्विकार केलेला आहे. संविधानातील कलम 5 ते 11 मध्ये भारतीय नागरिकत्वाच्या तरतुदी केलल्या आहेत. भारतात कोणत्याही राज्यात जन्म झााला असेल किंवा कोणत्याही राज्यात वास्तव्य असेल तरी सर्व नागरीकांना पूर्ण दे”ाभर नागरीकत्वाचे समान राजकीय आणि नागरी अधिकार आहेत. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी एकेरी नागरीकत्वाचे समर्थन करतांना असे म्हटले आहे की, ''प्रत्येक भारतीय व्यक्तीला, मग ती कोणत्याही प्रदे”ाची रहिवासी असो नागरीकत्वाचा अधिकार असेल, तसेच भारतीय नागरीकत्व प्राप्त झालेल्या व्यक्तीला भारतात कायद्याचे समान संरक्षण व कायद्यासमोर समानता या गोष्टी नाकारल्या जाणार नाहीत''

**8. मुलभूत अधिकाराचा समावेश :**

मुलभूत हक्कावरून राज्याच्या अधिकाराचा दर्जा स्पष्ट होतो. भारतीय संविधानात तिसऱ्या विभागात कलम 14 ते 35 या कलमाव्दारे मुलभूत अधिकार स्पष्ट केलेले आहेत.भारतीय संविधानात एकुण सात प्रकारचे मुलभूत अधिकार भारतीय नागरीकांना दिलेले आहेत. यामध्ये समतेचा अधिकार (कलम 14 ते 18 ) स्वातंत्र्याचा अधिकार (कलम 19 ते 22 ), शोषणाविरूध्दचा अधिकार (कलम 23 ते 24 ), धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार (कलम 25 ते 28 ), सांस्कृतिक व शैक्षणिक अधिकार (कलम 29 ते 30), मालमत्तेचा अधिकार (कलम 31), परंतु 1978 च्या 44 व्या घटना दुरूस्तीने हे कलम रद करण्यात आले आहे. कोणत्याही व्यक्तीची मालमत्ता कायद्याच्या संमती”िावाय हिरावून घेतली जाऊ नये अ”ाी तरतुद कलम 300 (अ), मध्ये केली आहे. आणि घटनात्मक उपाययोजनेचा अधिकार (कलम 32 ), सद्यपरिस्थितीत सहा मुलभुत अधिकार आहेत.

**9. राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्वे :**

भारतीय संविधानातील मार्गद”र्ाक तत्वे आयर्लंडच्या संविधानाकडून घेतलेली आहेत. भारताने कल्याणकारी धोरण स्विकारले आहे. त्यानुसार भारतीय नागरीकांच्या कल्याणासाठी वेगवेगळया योजना राबविण्यात येतात.संविधानातील भाग 4 मधील कलम 36 ते 51 मध्ये मार्गद”र्ाक तत्वाचा समावे”ा करण्यात आला आहे. सामाजिक व आर्थिक लोक”ाहीच्या आद”र्ाांना चालना देणे हे मार्गद”र्ाक तत्वाचे उदीष्ट आहे. परंतु मुलभुत हक्कांवर गद्दा आल्यास ज्याप्रमाणे न्यायालयात दादा मागता येते त्याप्रमाणे मार्गद”र्ाक तत्वाच्या बाबतीत न्यायालयात दाद मागता येत नाही म्हणजेच त्यांचे उल्लंघन झाल्यास ते न्यायालयाकडून लागु करून घेता येत नाही. असे असले तरी ''ही तत्वे दे”ाच्या राज्यव्यवस्थेसाठी मुलभुत स्वरूपाची आहेत आणि या तत्वानुसार कायदे करणे राज्याचे कर्तव्य आहे असे संविधानात म्हटले आहे. भारतीय राज्यघटना मुलभुत हक्क आणि मार्गद”र्ाक तत्वे यांच्या संतुलनाच्या भक्कम पायावर उभी आहे. '' असे सर्वोच्च न्यायालयाने मिनर्व्हा मिल खटल्यामध्ये म्हटले आहे.[7]

**10. धर्मनिरपेक्ष राज्य :**

भारतीय संविधानाने धर्मनिरपेक्ष राज्याचा स्विकार केला आहे. त्यामुळे भारतीय राज्याचा विर्”ाष्ट असा अधिकृत धर्म नाही. संविधानकर्त्यांनी सुरूवातीस धर्मनिरपेक्ष राज्याचा स्पष्ट उल्लेख केलेला नव्हता परंतु 1976 साली 42 व्या घटना दुरूस्तीने **'धर्मनिरपेक्ष'** या शब्दाचा समावे”ा उद्दे”ापत्रिकेत करण्यात आला आहे. परंतु संविधानाच्या र्”ाल्पकारांनी अनुच्छेद 25, 26 आणि 27 हे पुढील धर्मनिरपेक्षतेला चालना देण्याकरिता अंगिकारले आहे. त्यांच्या घटनात्मक तत्वप्रणालीमध्ये धर्मनिरपेक्ष खुपच जास्त रूजलेली होती[8]. बेचाळीसाव्या घटना दुरूस्तीने जी धर्मनिरपेक्षता घटनेच्या उद्दे”ापत्रिकेमध्ये औपचारिकपणे घातली, तीथे अधिपासून जी गोष्ट अस्पष्ट होती ती फक्त स्पष्ट केली.[9] धर्मनिरपेक्षता हा घटनेचा पायाभूत रचनेचा एक भागच आहे.[10] म्हणजेच धर्मस्वातंत्र्या”ाी संबंधित सर्व जनतेचे मुलभुत हक्क नमूद करून ज्यामध्ये प्रत्येक व्यक्तीला धर्म स्विकारण्याचे, आचरणात आणण्याचे, त्यांचा प्रसार करण्याचे स्वातंत्र्य कलम 25 ते 28 मध्ये दिलेले होते परंतु राज्याचा विर्”ाष्ट धर्म असणार नाही.

**11. स्वतंत्र न्याय मंडळ :**

भारतीय संविधानानुसार सर्वोच्च न्यायालय हे सर्वश्रेष्ठ अंतिम न्यायालय असुन त्यानंतर घटक राज्यात उच्च न्यायालय व सर्वात खाली दुय्यम न्यायालये असतील न्यायविभागाचे स्वातंत्र्य अबाधित ठेवण्यासाठी कार्यकारी मंडळ आणि कायदेमंडळ यापासून न्यायमंडळाला स्वतंत्र ठेवले आहे. भारतीय संविधानाने स्वतंत्र तसेच एकात्मिक न्यायव्यवस्था प्रस्तावित केलेली आहे. राष्ट्रपतीव्दारे न्यायधि”ाांच्या नियुक्त्या केल्या जात असल्या तरी न्यायधि”ाांना बडतर्फ करण्याचा अधिकार राष्ट्रपतीना नाही.न्यामंडळाचे कायदेमंडळावर व कार्यकारी मंडळावर काही प्रमाणात नियंत्रण असते. त्यासाठी संविधानाने सर्वोच्च न्यायालयाला न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अधिकार दिलेला आहे. कायदेमंडळाने मंजुर केलेले कायदे आणि कार्यकारी मंडळाने काढलेले वटहुकुम संविधाना”ाी सुसंगत आहेत की विसंगत आहेत हे ठरविण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाला दिलेला आहे. थोडक्यात भारतीय संविधानाने न्यायालयीन स्वातंत्र्य टिकवण्यासाठी विविध तरतुदी करून ठेवलेल्या आहेत.

**12. स्वातंत्र्य, समता,बंधूता व न्याय या तत्वाचा स्विकार :**

भारताने संसदीय लोक”ााहीचा पध्दतीचा स्विकार केला. लोक”ााहीचे मुख्य चार तत्व म्हणजे स्वातंत्र्य, समता,बंधूता व न्याय होय. नागरीकांच्या सर्वांगिन विकासासाठी स्वातंत्र्य आव”यक आहे.कायद्यासमोर सर्व व्यक्ती समान मानल्या गेल्या पाहीजेत. सामाजिक न्याय प्रस्थापित होऊन समाजाचा सर्वांगिन विकास साधला पाहिजे. संविधानकारानी हाच उद्दे”ा गृहीत धरुन समतेचे तत्व स्विकारले आहे. व्यक्तीची प्रतिष्ठा आणि राष्ट्राचे ऐक्य राखणारे बंधुत्वाची भावना नागरीकात निर्माण झाली पाहीजे म्हणुनच संविधानकारांनी स्वातंत्र्य,समता,बंधूता व न्याय ही मूल्य भारतीय संविधानात समाविष्ट केलेली आहेत.

 ISBN No. 978-93-91097-18-9

**सरांश :**

भारतीय संविधानाच्या वरिल सर्व वैिष्टयांचा विचार केला असता गेल्या 71 वर्षात संविधानाच्या अंमलबजवाणीचा अनुभव विचारात घेतला असता भारतीय संविधान काही प्रमाणात स्थिर व य”ास्वी झाली असे म्हणता येईल कारण की, आतापर्यंत झालेल्या सार्वजनिक निवडणुका, यातील जनतेचा सहभाग, संसदेचे कामकाज,न्यायालयाचे निर्णय केंद्र– राज्य संबंध, समाजवादी व कल्याणकारी राज्याची वाटचाल अ”ाा विविध बाबींचा पराम”र्ा घेतला असता भारतीय संविधान जनतेने मान्य केलेले आहे असे म्हणता येईल.

**संदर्भ :**


1. एम. लक्ष्मीकांत, (अनुवादक श्रीकांत गोखले ), इंडियन पॉलिटी के. सागर पब्लिके”ान, पुणे ,2017, पृ.21.

2. पायली एम.व्ही.भारतीय राज्यघटना, एस.चॉद ॲड कं. नवी दिल्ली,2011,पृ. 189.

3. घाटोळे रा.ना.,समाज”ाास्त्रीय सं”ाोधन तत्वे व पध्दती, मंगे”ा प्रका”ान नागपुर,2000, पृ.16.

4- Ambedkar B.R.,Theory and Practice of Democracy, Democracy in India (Ed.) K.P.Karunakaran,Intellectuan Book Corner, New Delhi,1978, Page 122.

5. राठी शुभांगी, भारतीय राज्यघटना,कैलास पब्लिके”ान्स,औरंगाबाद,2018, पृ. 26.

6. पाटील बी.बी., भारतीय शासन आणि राजकारण,फडके प्रका”ान, कोल्हापूर, (चौथी आवृत्ती), नोंव्हेंबर 2010,पृ.15.

7. मिनर्व्हा मिल्स विरुध्द भारताचे संघराज्य,1980

8. बसू दुर्गा दास,भारतीय राज्यघटनेची ओळख (आवृत्ती दुसरी),Lexis Nexis Publication,Gurgaon, Haryana,2015,पृ.31.

9. ठाकुर अ”ाोक कुमार विरुध्द भारताचे केंद्र सरकार, 2008, 6, एस. सी.सी. 1

10. बोमई विरुध्द भारताचे केंद्रसरकार ,ए.आय.आर.,1994,एस.सी.

# ८. हिंगोली जिल्ह्यामधील मतदारांच्या राजकीय उदासीनतेचा चिकित्सक अभ्यास

**आकाश शेषेराव बांगर**
(संशोधक विद्यार्थी)
आदर्श महाविद्यालय, हिंगोली
जि. हिंगोली -431513

**प्रस्तावना**

एकविसाव्या शतकामध्ये लोकशाही शासन व्यवस्थेमध्ये जनतेचा राजकीय सहभाग हा अत्यंत चर्चेचा विषय बनला आहे. परंतु राजकीय सहभागाचे स्वरूप आणि प्रमाण काय असावे याबाबत विचारवंतांमध्ये मतभेद आहेत. शिवाय प्रतिनिधिक लोकशाही मध्ये लोकांचा राजकीय सहभाग काही बाबतीत प्रत्यक्ष तर काही बाबतीत अप्रत्यक्ष स्वरूपाचा असतो म्हणून त्याच्या अर्थ बाबतही एकवाक्यता दिसून येत नाही. काही विचारवंत राजकीय सहभाग या संकल्पनेला निवडणूक प्रक्रिया पुरते मर्यादित ठेवतात तर काही विचारवंत ज्या वर्तनामुळे लोक आपल्या राजकीय मतांची अभिव्यक्ती व्यक्त करतात त्या वर्तनास राजकीय सहभाग म्हणतात. एकूणच राजकीय सहभागाबाबत जरी मतभिन्नता दिसून येत असली तरी लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी मतदारांचा राजकीय सहभाग हा राजकीय नेतृत्वाला आपल्या जबाबदारी प्रतीक उद्युक्त करत असल्यामुळे आज त्याचे महत्त्व अधोरेखित झाले आहे.

लोकशाही शासनव्यवस्थेत लोकांना राजकीय प्रक्रियेत सहभागी करून घेण्याच्या दृष्टीने जास्तीत जास्त संधी उपलब्ध करून दिल्या जात असतात. भारतीय संविधान कारांनी देखील या दृष्टीने सर्वेक्षणात अनेक उपबंध केले आहेत. मुक्त आणि न्याय निवडणुकीच्या माध्यमातून तसेच लोकशाही विकेंद्रीकरणाच्या माध्यमातून सत्ताकेंद्रे ही मतदारांच्या अधिकाधिक जवळ आणली आहेत. लोकांचे लोकांनी लोकांसाठी चालविलेले शासन ही लोकशाहीची केले जात असलेले वर्णन सार्थ ठरविण्यासाठी सहभाग अशा मतदारांना आपल्या निरंतर सहभागातून व सतर्क त्यातून राजकीय प्रगल्भतेचा आविष्कार घडवून आणण्याची यानिमित्ताने एक संधी प्राप्त झाली आहे. परंतु स्वातंत्र्यप्राप्तीनंतर पाच दशकांचा कालावधी संपूनही अपेक्षित प्रमाणात लोकांचा हा सहभाग आढळून येत नाही. कोणतीही सामाजिक अथवा आर्थिक बाबी राजकीय इच्छेशिवाय पूर्ण होत नाही. म्हणून विकासाच्या समग्र प्रक्रियेत राजकीय पैलू हा निर्णय ठरला आहे. किंबहुना यार आज की पहिली तर एक भाग म्हणून निवडणूक राजकारणात सर्व मतदारांचा सहभाग हा देखील तेवढाच महत्त्वपूर्ण ठरला आहे.

रश व अल्ताफ या विचारवंतांनी देखील राजकीय सहभाग यात समाविष्ट होणाऱ्या कृती पैकी मतदान करणे ही प्रक्रिया महत्त्वपूर्ण मानली आहे किंबहुना या दृष्टिकोनातून हिंगोली

जिल्ह्यातील हिंगोली वसमत कळमनुरी यातील विधानसभा मतदार संघातील मतदारांचा निवडणूक सहभाग प्रस्तुत शोधनिबंधात मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

**उद्देश**

1. जनतेची राजकारणातील उदासीनता अभ्यासणे .
2. हिंगोली जिल्ह्यातील तीन विधानसभांमधील जनतेची राजकीय उदासिनतेचा अभ्यास करणे.

**जनतेच्या राजकारणातील उदासीनतेचा अर्थ**

1. एच.आर.विंटर :- शासनाचा निर्णय निर्धारण प्रक्रियेत लोकांनी स्वतःला गुंतवून घेणे म्हणजे जनतेची राजकारणातील उदासीनता होय
2. टी.जी.बेलोस :- शासनाच्या निवड प्रक्रियेत आणि सार्वजनिक धोरण निर्मितीमध्ये लोकांनी प्रत्यक्षपणे जाणून-बुजून सहभागी न होणे म्हणजे जनतेची राजकारणातील उदासीनता होय.

**जनतेची राजकीय उदासीनतेची कारणे**

1- सहभाग आणि राजकीय स्वारस्य यासाठी आवश्यक असलेल्या प्रोत्साहनाचे अभावामुळे.

2- स्व कर्तुत्व व सामर्थ्य यावर विश्वास नसल्यामुळे.

3- स्वतःची प्रतिष्ठा व स्वतःची अवहेलना होईल या भीतीमुळे.

4- राजकीय सहभाग आपेक्षा इतर विविध मार्गांनी हित साध्य होत असल्यामुळे.

5- संदिग्ध राजकीय उद्दिष्टापेक्षा निकटचे व स्पष्ट बाबी या व्यक्तींना अधिक आकर्षित करीत असल्यामुळे.

6- राजकीय सहभागामुळे निर्णय निर्धारण प्रभाव पडण्याची शक्यता नसल्यामुळे.

7- सद्यस्थितीतील राजकीय व्यवस्थेच्या कार्य व कार्यक्षमतेविषयी व्यक्ती असंतुष्ट असल्यामुळे.

8- राजकीय धोरणांच्या हा भावी राजकारणाची गुंतागुंत व अंतर्विरोध सोडविण्याबाबत च्या असमर्थतेमुळे.

**जनतेचा राजकीय उदासीनते वरील उपाय**

1- सामूहिक सामाजिक हित साध्य करण्याची प्रेरणा जनतेत निर्माण करणे.

2- राजकारणामध्ये युवा नेत्यांना संधी उपलब्ध करून देणे त्यामुळे इतर तरुणांना त्यांच्याकडून राजकारणात सहभागी होण्याची प्रेरणा मिळेल.

3- राजकीय दृष्ट्या सुशिक्षित व्यक्ती अति जागृत असल्यामुळे त्यांच्यात राजकारणा प्रति आकर्षण व नवीन संधी उपलब्ध करून देणे.

4- सत्ता प्राप्तीची अभिलाषा व्यक्तींमध्ये निर्माण होईल याकरिता प्रयत्न करणे.

5- व्यक्तीच्या राजकीय सहभागामुळे त्याला अनुकूल असे निर्णय होईल याची खात्री शासनाने देणे.

6- उमेदवारांच्या व राजकीय पक्षांच्या निवडणूक खर्चावर मर्यादा आणणे.

7- उमेदवारांसाठी पक्षासाठी आचारसंहिता लागू करणे आणि ती कटाक्षाने अमलात आणणे.

8- निवडणुकांमध्ये भ्रष्ट मार्गाचा अवलंब करणाऱ्या उमेदवाराविरुद्ध चौकशी करण्यासाठी स्वतंत्र अशी न्यायिक व्यवस्था निर्माण करणे.

**हिंगोली जिल्हा विधानसभा मतदार संघातील मतदारांचा निवडणूक सहभाग सन 2019**

| अ क्र | मतदार संघ | एकुण मतदार | झालेले मतदान | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| **01** | **हिंगोली** | 3,12,431 | 2,00,319 | 64.12% |
| **02** | **कळमनुरी** | 3,05,506 | 2,11,354 | 69.18% |
| **03** | **वसमत** | 2,92,304 | 2,17,733 | 74.49% |
| **एकूण** | | 9,10,271 | 6,29,406 | 69.26% |

उपरोक्त तक्त्याचे अवलोकन केले असता असे लक्षात येते की सन 2019 या संदर्भ वर्षात हिंगोली जिल्ह्यातील हिंगोली कळमनुरी वसमत या तीनही मतदार संघातील मतदारांचा निवडणूक सहभाग लक्षात घेता तो न्यूनतम 64.12 % तर अधिक उत्तम 74.49% राहिलेला दिसून येतो. जिल्ह्यातील तिन्ही मतदारसंघात एकूण मतदारांची संख्या 9,10,271 एवढी होती त्यापैकी 6,29,406 मतदारांनी प्रत्यक्ष मतदान प्रक्रियेत सहभाग नोंदवला याचे दिसून येते. ज्याचे मतदारांचे सरासरी प्रमाण 69.26% एवढे आहे.

**निष्कर्ष**

सामाजिक बदलाचे एक प्रभावी साधन म्हणून आपण राजकारणाकडे पाहतो. परंतु हिंगोली जिल्ह्यातील वरील तिन्ही विधानसभा मतदार संघातील महिला मतदारांच्या निवडणूक सहभाग पाहिल्यास एकूणच जिल्ह्यातील तीनही विधानसभा मतदारसंघातील मतदारांना निवडणूक सहभाग पाहता तो मतदारसंघातील मतदारांची निष्क्रियता दर्शविणारा तर आहेच शिवाय तो लोकशाही मूल्यही विसंगत आहे. शिवाय हा राजकीय सभा केवळ संख्यात्मक दृष्टिकोनातून नव्हे तर गुणात्मक दृष्टीनेही कसा वाढते आणि व व्यवस्था परिवर्तनाच्या दिशेने तो अधिक उपयुक्त कसा ठरू शकेल या दृष्टीने विचार होणे गरजेचे आहे

**संदर्भ ग्रंथ सूची**

1- भारतीय राजकीय विचार- डॉक्टर आर डी साबळे हिमालया पब्लिशिंग हाऊस

2- भारतीय राजनीति भाग एक – डॉग देश बंधू त्यागी जैन अंड जैन पब्लिकेशन जयपुर

3- आधुनिक राजकीय विश्लेषण – डॉ. र. ना.इनामदार

4- Political behaviour in India -V. M. Sirseekar

5- Google

6- Wikipedia

 ISBN No. 978-93-91097-18-9

# ९. भारतीय राजकारणाचे बदलते स्वरूप

**प्रा.डॉ.लक्षटे आर.बी.**
सहयोगी प्राध्यापक व संशोधन मार्गदर्शक
पदवी व पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग प्रमुख
देगलूर महाविद्यालय देगलूर, ता.देगलूर जि.नांदेड
**Email Id-** ratnakarlakshete1@gmail.com

आज आपण भारतीय स्वातंत्र्याचा अमृत वर्ष साजरा करत आहोत. या पार्श्वभूमीवर भारतीय राजकारणात या ७५ वर्षात काय व कोणते बदल झाले? हा प्रश्न भारतीयांना पडणे साहजिकच आहे.असाच प्रश्न एक भारतीय म्हणून लेखकाला पडला आहे. लेखकाने या ठिकाणी असे कोणते महत्वाचे बदल भारतीय राजकारणात या ७५ वर्षात झाले त्यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

राजकारण ही एक सर्वव्यापी व सर्वस्पर्शी संकल्पना आहे. जिच्या बद्दल प्राचीन काळापासूनच अनेकांनी आपले मत व विचार व्यक्त केले आहेत. राजकारण हा आपला पिंड नाही अशी एक सर्वसामान्य लोकांची कल्पना आज बनली आहे. परंतु राजकारणात राज्यातील जनतेचे कल्याण करणारी नीती समाविष्ट आहे. त्यामुळे यामध्ये सर्वांचा सहभाग असणे आवश्यक आहे. या विचाराने प्रेरित होवून अनेक अभ्यासक व लेखकांनी राजकारणाचा अर्थ आपापल्या परीने स्पष्ट केला आहे. या नीतीला आपल्या हातात ठेवण्याच्या दिशेने मानवाने अथक प्रयत्न केले आहेत.

प्रस्तुत लेखात भारतीय राजकारणाचे बदलते स्वरूप स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.या बदलास कारणीभूत असणाऱ्या घटकांची स्पष्टता केली आहे. प्रस्तुत बदल हा भारतीय लोकशाहीस अनुकूल आहे का घटक हे ही स्पष्ट करण्याचा प्रयत्न या लेखात लेखकाने केला आहे.

स्वातंत्र्यापासून ते आजपर्यंतच्या राजकारणाशी निगडीत सर्व घटकात आमुलाग्र बदल झाला आहे. राज्य व शासन यांच्या स्वरूप, उद्देश व कार्य यात झालेला बदल, राजकीय पक्ष, व्यक्तीचे राजकीय वर्तन, शासनाचे धोरण, राजकीय नेतृत्व, राजकीय संस्कृती, राजकीय विकास, अधिकारांची वाढती कक्षा, सत्ता प्राप्त करण्याच्या मार्ग व पद्धतीत झालेला आमुलाग्र बदल, लोकांचा वाढता सहभाग, प्रशासनात झालेल्या सुधारणा, निवडणूक पद्धतीचे बदलते स्वरूप, केंद्र व राज्य यांच्यातील वाढता संघर्ष, संसद श्रेष्ठ की न्यायालय असा संघर्ष, न्यायालयीन सक्रियता, जनहित याचिका ,माहितीचा अधिकार ,शिक्षण हक्क कायदा, आरक्षण या बाबतचे बदलते संदर्भ, महिलांचे सक्षमीकरण, सहभागी लोकशाही ,गुणात्मक लोकशाही, मानवी हक्क ,दहशतवाद, पर्यावरण संरक्षण या सर्व घटकात आज प्रचंड बदल झाले आहेत. तसेच या सर्व

बदलांनी राजकारण व्यापून गेले आहे.विशेषतः हे बदल १९९१ नंतरच्या काळापासून अधिक तीव्र गतीने झाले आहेत. वाढती लोकसंख्या, विज्ञान , तंत्रज्ञान व दळणवळणाच्या साधनात झालेली क्रांती, माहिती तंत्रज्ञानाचा झालेला स्फोट यासह लोकांचा राजकारण व त्याकडे आकर्षित होण्याचा वाढता कल. आपल्या जीवनाशी निगडीत सर्व प्रश्नांचे उत्तर राजकीय व्यवस्थेतच आहेत व तिची सूत्रे आपल्या हातात असणे आवश्यक आहे या भावनेतून लोकांचा राजकारणाकडे वाढता कल निश्चितच आश्चर्यचकित करणारा आहे. कारण राजकारणात लोक प्रतिनिधी होण्यासाठी कोणतीही शिक्षणाची अट नाही.कोणतीही वयोमर्यादा नाही.समाज सेवेच्या अनुभवाची अट नाही.जोपर्यंत न्यायालय अप्रडी किंवा गुन्हेगार म्हणून घोषित करत नाही तो पर्यंत अपराधी नाही.सर्वात म्हणजे समाज व इतर घटकावर आपला प्रभाव टाकता येतो.किंबहुना आपण त्यास लोकशाहीतील लोकांचा वाढता सहभाग असे देखील म्हणू. या सहभागाने राजकारणाची दिशा व दिशा बदलून टाकली आहे.

**राजकारण म्हणजे काय ?**

राजकारण ही मानवी जीवनाच्या सर्व अंगाना स्पर्श करणारी विचारधारा आहे. जिच्या प्रतीचे आकर्षण सर्वामध्ये वाढत आहे.मानवी जीवनाचे सर्वच घटक आज राजकारणाचा भाग बनले आहेत. उदा.साहित्य, कला, संस्कृती, क्रीडा. या राजकारणाविषयी अभ्यासकांनी अनेक मते नोंदवली आहेत.राजकारण हा शब्द दोन शब्दांचा समूह आहे. एक राज दुसरा कारण. राज म्हणजे शासन आणि कारण म्हणजे योग्यवेळी व योग्यठीकानी योग्य कार्य करण्याची कला.लोकांच्या सार्वजनिक जीवनाचा स्तर उंचावणे म्हणजे राजकारण होय.उत्तम व चांगल्या जीवनाची प्राप्ती करने हा राजकारणाचा हेतू आहे.राजकारण उत्तम जीवन मिळवण्याचे साधन आहे.सर्वसामान्य व्यक्तीच्या नजरेत राजकीय नेता जे करतो ते राजकारण.

राजकारण यास आपण इंग्रजीत POLITICS असा शब्द वापरतो.जो ग्रीक भाषेतील POLIS शब्दापासून बनला आहे.राजकारणाचा संबंध मानवाच्या सार्वजनिक जीवनाशी आहे.या सार्वजनिक जीवनात मनुष्य अनेक क्रिया-प्रतिक्रिया करत असतो. त्यामुळे राजकारण परस्पर सहकार्य,संघर्ष व स्पर्धेचे क्षेत्र आहे. राजकारण या शब्दाचा वापर सत्तेचा प्रयोग,संघर्ष व त्याचे समाधान (उत्तर ),मानवी मूल्यांचे न्यायपूर्ण वितरण असा केला जातो. उदारमतवादी,मार्क्सवादी व समुदायवादयानी राजकारण म्हणजे काय हे सांगितले आहे. ज्यात कल्याणकारी राजकारण ,राज्याला शोषणाचे साधन मानले,अधिकारांचे राजकारण या ऐवजी सामान्य हिताचे राजकरण असा अर्थ यांनी सांगितला.

**भारतीय राजकारणाचे बदलते स्वरूप:**

स्वातंत्र्यानंतर देशाची राजकीय सत्ता संविधान सभा व स्वातंत्र्य आंदोलनाची पार्श्वभूमी असलेल्या राजकीय नेतृत्वाच्या हाती होती. त्यामुळे नैतिकता, त्याग, बलिदान, जनसेवा,राष्ट्र सेवा हा भाव होता.जो फक्त राजकारणातच नव्हता तर संपूर्ण समाज ,समाज मनात होता.आपला राज्यकारभार आपण स्वतः करण्याची एक संधी स्वातंत्र्याने दिली होती.या संधीचे सोन्यात

रुपांतर करावे व एक लोकशाहीभिमुख व संविधानाला अनुसरून देश घडवावा असा भाव जनता व राजकीय नेतृत्वात होता. त्यामुळे स्वातंत्र्यानंतरच्या पहिल्या दशकापर्यंतच्या राजकारणाला आदर्शवादी,मानवतावादी,नैतिक स्वरूप प्राप्त झालेले होते.आदर्शवादी विचारधारेने प्रेरित व्यक्तिमत्वाचा हा काळ होता.ध्येयवेडी नागरिक व नेतृत्व होते. संसद व संसदेच्या बाहेर होणऱ्या राजकीय वर्तनाला, भूमिकेला आदर्शवादाची झालर व नैतिकतेची किनार होती. लोकशाही मूल्याला अनुरूप व्यवहार होत असत.

भ्रष्टाचार मुक्त राजकारण होते. आज भ्रष्टाचार हाच शिष्टाचार बनला आहे. राजकारण हा नैतिक,स्वातंत्र्य आंदोलनाची पार्श्वभूमी असलेल्यानी करावयाचा भाग आहे असे मत होते.आज ज्याला जीवनात कांहीच करता येत नाही तो राजकारण करत आहे. समाजसेवा, राष्ट्रसेवा, लोककल्याण, कृषी विकास, संयुक्त महाराष्ट्र, स्वातंत्र्य प्राप्ती, मराठवाडा मुक्ती,मुजोर व हुकुमशाही प्रवृत्तीच्या सरकारला सत्तेतून पायउतार करने हे राजकारणात प्रवेश करण्याचे हेतू होते. राजकारणाला सामाजिक ऐवजी राष्ट्रीय स्वरूप प्राप्त झाले होते. नेतृत्वावर प्रचंड विश्वास असलेला काळ होता. जवाबदेहिता, पारदर्शकता,उत्तरदायित्व ,लोक कल्याण ही नेतृत्वाची ओळख होती. आज जात, धर्म, भाषा, पंथ, स्वार्थ ही नेतृत्वाची ओळख झाली आहे. गुन्हेगारी, संकुचित विचार, पक्षांतर, स्वहित निष्ठा, पक्ष श्रेष्ठी प्रतीची निष्ठा हे राजकीय नेतृत्वाचे लक्षण आहे. मतदार देखील आपली भूमिका बदलत आहे. यथा प्रजा तथा राजा असे चित्र झाले आहे.वाढती लोकसंख्या ,वाढते तुष्टीकरण, राजकीय नेतृत्वाकडून अलोकतांत्रिक भाषेचा वापर राजकारणाचा अविभाज्य भाग बनला आहे.राजकीय नेतृत्वाचे चारित्र्य हनण करण्याचा प्रयत्न आज सर्रास होत आहे. विरोधी पक्षाकडून सरकारच्या प्रत्येक कामात विनाकारण अडथळा आणण्याचा प्रयत्न होत आहे.पक्षांतर हा वर्तमान राजकारणाच्या नित्याचा भाग बनला आहे. विचारधारा राजकारणातून लुप्त झाली आहे. स्व व पक्ष हित हीच विचारधारा बनली आहे.राजकारण गुन्हेगार व धनवानाच्या हातातील बाहुले बनले आहे. निवडणुकीला आर्थिक स्वरूप प्राप्त झाले आहे.संसदीय कामकाज संसदीय लोकशाहीनुसार होत नाही. प्रशासकीय सेवा बजावणारा आज राजकारणात येवू पाहत आहे.घराणेशाहीने देशाचे राजकारण आपल्या ताब्यात घेतले आहे. कांही विशिष्ट जातींचेच प्रस्थ राजकारणात आहे. राजकीय सत्ता व संपत्तीचा वापर स्वतःच्या व पक्षाच्या हितासाठी केला जात आहे.राजकारणात खरे बोलणे वर्ज्य आहे. राहत इंदोरीच्या एका शायरीनुसार बनके एक हादसा बाजार में आजेगा जो नहीं होगा वो अखबार में आ जायेगा चोर उच्चकों की करो कद्र के मालूम नहीं, कौन,कब,कौनसी सरकार में आ जायेगा अशी स्थिती राजकारणाची झाली आहे.

संविधानकारांनी जे कधीच चिंतले नव्हते ते आज होत आहे. स्थानिक राजकारणापासून ते राष्ट्रीय राजकारणा पर्यंत राजकारणाचे सर्वच गणित संविधान व लोकशाही विरोधी बनले आहे. परंतु आव मात्र सर्वच कांही लोकशाहीच्या संरक्षणासाठी करत आहोत असा दाखवला जातो. जी धोरणे कधीच पूर्ण होवू शकत नाहीत ती आश्वासने राजकीय पक्ष व नेता देत आहेत.

राजकारण लोकानुरंजनवादी बनले आहे. गरिबी हटाव, बेटी बचाव-बेटी पढाव, महिला सबलीकरण,सबका साथ सबका विकास अशी घोषणा दिली जाते. परंतु या घोषणा व आश्वासने पूर्ण करण्यासाठी आवश्यक नीती व कृतीचा अभाव आहे.किंवा त्याची परिणामकारकता जाणवत नाही. सामाजिक तेढ निर्माण करून राजकीय पोळी साधण्याचा प्रयत्न होत आहे. भाषा सामाजिक न्यायाची पण कृती व भूमिका स्व न्यायाची. केंद्र व राज्य यांच्यातील संघर्ष दिवसेंदिवस वाढत आहे.सामाजिक व राजकीय जीवनात परस्परातील संघर्ष तणाव वाढण्यास पोषक ठरतील अशी भूमिका राजकीय नेते व राजकीय पक्ष घेत आहेत. राजकीय संस्कृती खंडित झाली.राजकीय सामाजीकारणाचा प्रवास व साधने राजकीय पक्षाची बटिक बनली आहेत.मतदाना पुरता जनतेचा राजकीय सहभाग दिसतो.रस्ते,पाणी,निवारा .शिक्षण संस्था आपल्या हातात ठेवून त्याचे राजकीयीकरण केले जात आहे.लोकशाही व संविधान याच्या विपरीत राजकीय वर्तन होत आहे.

मजबूत सरकार कडून आघाडी सरकार व परत स्थिर सरकार अशी वाटचाल झाली. राष्ट्रीय राजकारणात कॉंग्रेस या राजकीय पक्षाच्या एक पक्षीय सत्तेपासून प्रादेशिक पक्षाचे वर्चस्व व पुन्हा भारतीय जनता पक्षाचे एक पक्षीय वर्चस्व उदयास आले. समाजवाद, धर्मनिरपेक्षतेकडून राष्ट्रवाद व हिंदुत्ववाद अशी वाटचाल राहिली आहे. लोककल्याणकारी राज्याच्या दिशेने जाणारा भारत हळूहळू कॉर्पोरेट राज्याच्या दिशेने प्रवास करत आहे. माहिती तंत्रज्ञानाचा राजकारणातील वापर प्रचंड वाढला आहे. जागतिक नेतृत्व करण्याची संधी पुन्हा एकदा भारताकडे आली आहे. पारंपारिक परराष्ट्र धोरणात बदल होवून नवी दिशा दिली आहे, जी वास्तववादाची आहे. आर्थिक, सामरिक, तंत्रज्ञान, लष्करी, शस्त्राअस्त्र, कृषी अश्या क्षेत्रात विलक्षण प्रगती झाली आहे.अविकसित देशाची जगातील पाचवी अर्थ व्यवस्था म्हणून ओळख होत आहे.

राष्ट्रीय, राज्य व स्थानिक राजकारणाचा दर्जा किंवा स्तर ढासळला आहे. नैतिक राजकारण हा आज फक्त पुस्तकी भाग बनला आहे. भांडवलवाद, चंगळवाद, भ्रष्टाचार, खोटारडेपणा, जनहिताची पायमल्ली हा राजकारणातील व्यवहाराचा भाग बनला आहे. राजकारण नको रे बाबा अशी म्हणायची वेळ आज आहे. तरुण दिशाहीन बनला आहे. बलात्कार, गुन्हेगारीचे प्रस्थ वाढले आहे. सामाजिक व राजकीय नीती मूल्याचा ऱ्हास होत आहे.आधुनिक भारत, नवा भारत, इंडिया शायनिग अश्या घोषणा दिल्या जातात परंतु वास्तवतेत इथली गरिबी, दारिद्रय, बेकारी, अज्ञान, नैराश्य, सामाजिक बांधिलकीचा अभाव, समाजात सामाजिक तेढ वाढत आहे.

या ७५ वर्षात आंतरराष्ट्रीय पातळीवर एक मजबूत भारत अशी ओळख आपली निर्माण झाली आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर अशी प्रतिमा होवून ही जुने विषय सोडवण्यात आपणास यश आले नाही. राजकीय नेतृत्व उदासीन, आंतरराष्ट्रीय स्थितीची योग्य जन व अभ्यासाचा अभाव असल्याचे उदयास येत आहे. राजकारण सामाजिक कल्याणाचा भाग आहे असे स्थिर

होई पर्यंत सांगितले जाते त्यानंतर तो स्व व आप्तेइष्ठांच्या कल्याणाचा भाग बनतो. जातीय राजकारणातून नेतृत्व विकसित होत आहे.लोकशाही व संसदीय संविधान याची जान राजकीय नेतृत्व व राजकारणात दिसत नाही.

**निष्कर्ष**

वरीलप्रमाणे मागील ७५ वर्षात देश्याच्या राजकारणात व त्याच्या स्वरुपात आमुलाग्र बदल झाले आहेत. यातील कांही बदल सकारात्मक तर कांही नकारात्मक आहेत. कांही लोकशाहीची पाळेमुळे मजबूत करणारी आहेत तर कांही तिच्या अस्तित्वावरच घाला घालणारी आहेत.भारतासारख्या प्रचंड लोकसंख्या,भौगौलिक व सामाजिक विविधता असणाऱ्या देशात राजकारण व राजकीय संस्कृती नेहमी बदलत असते.असे असणे हेच कदाचित जिवंत लोकशाहीचे लक्षण असेल असे आपण म्हणू .या सर्व बदलातून भविष्यात नक्कीच आपण गुणात्मक लोकशाहीच्या दिशेने वाटचाल करू असा आशावाद येणाऱ्या काळाबद्दल बाळगू.

**संदर्भ :**


1) भारतीय गणराज्य व संविधान : डॉ.भा.ल.भोळे
2) Political Theory-EDDY ASIRVATHAM & K. K. MISRA.
3) तत्वनिष्ठतेची जपणूक –सोमनाथ चटर्जी-अनुवाद-शारदा साठे-राजहंस प्रकाशन
4) लोकपालाची मोहिनी- माधव गोडबोले- राजहंस प्रकाशन
5) लोकप्रशासन-संपादक-प्रो.एस.एन.मिश्र-जनवरी-जून-२०१४
6) लोकप्रशासन – संपादक - प्रो. एस. एन. मिश्र – जुलाई - दिसंबर२०१७, विशेषांक सुशासन एवं विकास

 ISBN No. 978-93-91097-18-9

# १०.भारतीय संविधानाची निर्मिती आणि स्त्रोत

**प्रा.डॉ.पांडुरंग नेवरकर**
न्यु मॉडेल डिग्री कॉलेज हिंगोली.

ब्रिटिश साम्राज्याच्या अस्ताबरोबर अनेक नवोदित राष्ट्रात लोकशाही शासन व्यवस्थेच्या उदयास सुरूवात झाली. अनेक राष्ट्रात लोकशाही शासनव्यवस्था ही कोलमडली तर काही राष्ट्रात ती बहरली. ज्या राष्ट्रांमध्ये ती बहरली, फुलली त्या राष्ट्रांपैकी एक राष्ट्र म्हणजे भारत होय. लोकशाहीच्या रोपट्याचे आज वटवृक्षात रुपांतर झाले. त्याला खतपाणी घालण्याचे काम भारतीय राज्यघटनेने केले आहे. परंतू यात काही विचारवंत भारतीय लोकशाही म्हणजेच भारतीय संविधानावर शंकेच्या नजरेने पाहताना दिसतात. त्यांची शंका दूर करण्यासाठी आपणास भारतीय संविधानाची निर्मिती आणि स्त्रोतांचा आधार घ्यावा लागतो. भारतीय संविधान हे ब्रिटिश राजवट आणि भारतीय समाज यातील आंतरक्रियेचा परिपाक आहे. भारतीय स्वांतत्र्य लढ्यातील वैचारिक वारसा हा भारतीय संविधानाचा प्रमुख स्त्रोत दिसून येतो. ब्रिटिश कालीन, कायदे इस्ट इंडिया कंपनीच्या राजवटीत निर्माण झालेले कायदे, रेग्युलेटिंग ॲक्ट, तीन चार्टर ॲक्ट, राणीचा जाहीरनामा, मॉटेग्यु चेम्सफोर्ड सुधारणा कायदा, 1935 चा भारत प्रशासन कायदा, कॅबिनेट मिशन व इतर अनेक कायद्याचा प्रभाव भारतीय संविधानावर पडलेला आहे. त्याच प्रमाणे जगातील प्रमुख देशातील संविधानाचा अभ्यास करून भारतीय परिस्थितीशी अनुकुल अशा बाबीचा त्यात समावेश करण्यात आला व एक अस्खलीत दस्ताऐवज तयार केला. त्यामुळेच आज सुध्दा भारतीय संविधान आणि लोकशाही भक्कमपणे पाय रोऊन उभी आहे. त्याचे श्रेय संविधानकारांच्या दुरदृष्टीला आणि त्यांनी अहोरात्र चितंन करून केलेल्या संविधान निर्मितीला द्यावे लागते.

भारतीय संविधानाची निर्मिती आणि तीचे स्त्रोत पाहतांना असे दिसून येते की, भारतीय संविधानावर तत्कालीन सर्व परिस्थितीचा प्रभाव पडलेला आहे. भारतीय संविधान हे ब्रिटिश राजवट आणि भारतीय समाज यातील अंतरक्रियेचा परिपाक आहे. भारतीय संविधान हे ब्रिटिश वसाहतवादाविरोधी लढ्यातून सिध्द झाले आहे. 1857 च्या स्वातंत्र्य युध्दापासून ते 1947 पर्यंत भारतीयांना ब्रिटिश सत्तेशी संघर्ष करावा लागला. ब्रिटिश राजवटीतून एका बाजूला कायद्याचे अधिराज्य, मानवतावाद, धर्मनिरपेक्षता, व्यक्तिस्वातंत्र्य या आधुनिक मूल्यांची भारतीय समाजाला ओळख झाली. तर दुसऱ्या बाजूला आधुनिक शासनसंस्थेचा पाया रोवला गेला. अनेक संस्थाने राजेरजवाडयात विभागल्या गेलेल्या भारतीय भूप्रदेशाचे प्रशासकीय ऐक्य, आधुनिक मुल्यांची ओळख व प्रसार, धर्म व समाजसुधारणा इ. घटकामुळे भारतीयांमध्ये राष्ट्रवादाचे बीजारोपन झाले. यातूनच पुढे स्वातंत्र्य चळवळ आकारास येऊन स्वातंत्र्य प्राप्तीचे

उद्दिष्टये निश्चित झाले. या प्रक्रियेतच भारतीय राज्यघटनेची जडणघडण झाली हे लक्षात घेता येते. या आधारे भारतीय संविधानाचे स्त्रोत खालील प्रमाणे सांगता येतील.

**अ) भारतीय स्वातंत्र्य लढयाचा वैचारिक वारसा:**

1757 च्या प्लासीच्या युध्दापासून ते 1857 च्या स्वातंत्र्य समरापर्यंतचा काळ हा ब्रिटिश साम्राज्यवादाचा काळ मानला जातो. या प्रदिर्घ काळात परकीय आक्रमण व साम्राज्यवादाला टक्कर देण्यास अनेक संघर्ष व लढाया झाल्या, पण हे सर्व संघर्ष स्थानिक स्वरुपाचे होते. यातून स्थानिक राज्यभक्ती, वैयक्तिक अभिलाषा व जाती-जमातीचे भेदभाव विसरुन परकिय सत्तेविरुध्द प्रथमत: एक राष्ट्रवादी उठाव या समरात आढळतो, यापुढील राष्ट्रवादी चळवळ संवैधानिक व क्रांतीकारक अशा दोन वेगवेगळया पण परस्परपुरक अशा चळवळीत विभागल्या गेल्या या दोहोंचा परिणाम भारताच्या संवैधानिक विकासावर आलेला दिसून येतो. आधुनिक भारतीय इतिहासाचे अभ्यासक बिपन चंद्रा यांनी म्हटल्या प्रमाणे भारतीय स्वातंत्र्यलढा म्हणजे भिन्न स्वरुपाचा वैचारिक प्रवाहाचे एक गाठोडेच होते. घटना परिषदेने घटना तयार करतांना उपरोक्त नमुद केलेल्या बहुल-वैचारिक चौकटीच्या संदर्भातच राज्यघटना तयार केली हे लक्षात येते.

एकोणीसाव्या शतकात ज्या धार्मिक व सामाजिक चळवळी झाल्या त्यांचाही बराच परिणाम राष्ट्वादी चळवळीवर झालेला आहे. राजा राममोहन रॉय ह्यांचे प्रयत्न या दृष्टीने युगपर्वतक ठरले. न्या.रानडे, लोकहितवादी, दादाभाई नौरोजी, ईश्वरचंद्र विद्यासागर यांसारख्या नेत्यांचा उदार, नेमस्त प्रवाह जसा दिसून येतो तसाच या उदारमतवादी व्यापक प्रवाहात म.फुले, आगरकरा प्रमाणे मुलग्राही स्वरुपाची सामाजिक-धार्मिक सुधारणा सांगणाराची महत्वपूर्ण अंत:प्रवाह दिसतो. महाराष्ट्रात महादेव गोविंद रानडे ह्यांच्या नेतृत्वाखाली प्रार्थना समाजाने समाज सुधारणेचे बरेच प्रयत्न केले. टिळक, आगरकर, म.ज्योतीबा फुले (सत्यशोधक समाज) विष्णू बुवा ब्रम्हचारी, दादोबा पांडुरंग (परमहंस मंडळी), भांडारकर लोकहितवादी, विठ्ठल रामजी शिंदे, म.गांधी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर इ. व्यक्तिने समाजसुधारणेकरिता केलेल्या कार्याचा उल्लेख करावयास हवा. या सर्व चळवळीतुन बरेच विचारमंथन होऊन धर्म व समाजव्यवस्थेला बौध्दिक आधार देण्यात आला. स्वातंत्र्याची भावना निर्माण होण्यास व राजकिय लोकमतांचा विकास करण्यास या चळवळीनी फार मदत केली.

20 व्या शतकात डावी आणि समाजवादी प्रवाह ही ठळकपणे पुढे येतो एका बाजुला कार्ल मार्क्सच्या विचाराने प्रभावित झालेला तर दुऱ्या बाजुला राष्ट्रीय काँग्रेस अंतर्गत कार्यरत हेरॉल्ड लास्कीच्या प्रभावातुन येणारी फेवियन स्वरूपाची समाजवादी धाराही निदर्शनास येते. याखेरीज आदिवासी, शेतकरी, कामगार, क्रांतिकारक (उजवे, डावे) स्थानिक लोक यांच्या चळवळी आणि स्त्रीयांच्या संघटना इ. घटकांनी राष्ट्रीय काँग्रेसच्या प्रवाहाबाहेर कार्यरत राहून राष्ट्रवादी विचार- व्यवहारास महत्वपूर्ण योगदान दिले. भारतीय राज्यघटनेची जडण-घडण आणि निर्मिती स्वातंत्र्य लढयातून पुढे आलेल्या या भिन्न वैचारिक प्रवाहाच्या प्रभावाखाली

झाली आहे. हे लक्षात घ्यावे लागते. स्वातंत्र्य लढयातुन आकारास आलेल्या या भिन्न वैचारिक बैठकीचे प्रतिबिंब उदिष्टांच्या ठरावात उमटल्याचे दिसून येते.

**ब) ब्रिटिशकालीन कायदे:**

इ.स. 1600 मध्ये ईस्ट इंडिया कंपनीच्या माध्यमातून व्यापार करण्यासाठी ब्रिटिश भारतात दाखल झाले ब्रिटनची राणी एलिझाबेथ यांनी इस्ट इंडिया कंपनीला भारतामध्ये व्यापार करण्यासाठी 15 वर्षाची परवानगी दिली. ईस्ट इंडिया कंपनीचे कार्य व्यापारापुरतेच मर्यादित होते परंतू मोगल साम्राज्याच्या विघटनाने निर्माण झालेल्या राजकिय अस्थिरतेचा ब्रिटिशांनी फायदा घेतला आणि 1757 च्या प्लासीच्या लढाईत बंगालच्या नवाब सिराजउद्देला यांचा पराभव करुन ब्रिटिशांनी भारताच्या राजकीय क्षेत्रामध्ये आपले पाय रोखायला सुरूवात केली. 1764 च्या बक्सारच्या लढाईच्या विजयानंतर ब्रिटिशांनी बंगाल प्रांतावर आपली पकड अजुन मजबूत केली. हिच स्थिती अनुकुल राहण्यासाठी इंग्रजांनी वेळोवेळी अनेक प्रकारचे कायदे निर्माण केले.

**I) ईस्ट इंडिया कंपनीची राजवट (1600-1857)**

**1. रेग्युलेटिंग ॲक्ट (1773)**

भारतातील ईस्ट इंडिया कंपनीच्या कारभारावर नियंत्रण व शासन व्यवस्थेत सुसंगतपणा आणण्यासाठी हा कायदा निर्माण केलेला पहिला कायदा होय. याच कायद्यामुळे पहिल्या वेळेस कंपनीला प्रशासकीय, राजनैतिक कार्यासारठी मान्यता दिली याच कायद्याला भारतीय घटनात्मक विकासाची सुरुवात मानली जाते.

i. कंपनी सरकारवर संसदेचे नियंत्रण प्रस्थापीत करण्यात आले.

ii. या अधिनियमानुसार बंगालच्या गव्हर्नरला गव्हर्नर जनरल हे पद दिले गेले व त्याच्या मदतीला चार सदस्यीय कार्यकारी समिती गठीत केली.

iii. त्याच्या माध्यमातुन मद्रास व मुंबईचे गव्हर्नर बंगालच्या गव्हर्नर जनरलच्या नियंत्रणाखाली आले.

iv. या अधिनियमांतर्गत कोलकत्यामध्ये 1774 ला एका सर्वोच्च न्यायालयाची स्थापना करण्यात आली.

v. कंपनीतील कर्मचाऱ्यांना वैयक्तिक पातळीवर व्यापार करणे आणि लोकांना बक्षिस व लाच घेण्याला प्रतिबंध करण्यात आला.

vi. या अधिनियमानुसार दर 20 वर्षानंतर राज्यकारभारात सुधारणा करण्यासाठी सुधारणा कायदे करण्याचे ठरविले.

**2. पिट्स इंडिया ॲक्ट- 1784.**

1773 च्या रेग्युलेटिंग ॲक्टच्या उणिवा दूर करण्यासाठी ब्रिटिश संसदेने हा कायदा संमत केला. यातील तरतुदी खालील प्रमाणे सांगता येतील.

i. या कायद्यामुळे भारतात दुहेरी प्रशासनाचा प्रारंभ झाला.

अ) बोर्ड ऑफ डायरेक्टर- व्यापार विषयक करारासाठी

ब) बोर्ड ऑफ कंट्रोलर- राजकिय नियंत्रणासाठी

ii. ब्रिटिश भारतामधील नागरी व्यवस्थेवर, महसूल व सैनिकी शासन व्यवस्थेवर नियंत्रण व कार्यवाहीचे अधिकार बोर्ड ऑफ कंट्रोलरला देण्यात आले.

**3. 1793 चा पहिला चार्टर ॲक्ट (सुधारणा कायदा)**

i. या कायद्यानुसार बोर्ड ऑफ कंट्रोलरचे सदस्य आणि अधिकारी यांचे वेतन भारतीय महसूलामधुन देण्याची तरतूद करण्यात आली.

ii. गव्हर्नर जनरल आणि प्रांतिक गव्हर्नरांना त्यांच्या कौसिलचे मत डावलण्याचा अधिकार दिला.

iii. सर्वोच्च न्यायालयाच्या नियंत्रण व्यवस्थेत वाढ करण्यात आली.

**4. 1833 चा तिसरा चार्टर ॲक्ट-**

i. या कायद्यामुळे बंगालच्या गव्हर्नर जनरलला संपूर्ण भारताचा गव्हर्नर जनरल बनविले व संपूर्ण ब्रिटिश भारतासाठी कायदा बनविण्याचा अधिकार प्रदान केला.

ii. लॉर्ड विल्यम बेंटिग याला भारताचे पहिले गव्हर्नर जनरल बनविले.

iii. या कायद्यानुसार गव्हर्नर जनरल आणि गव्हर्नरला कौसिलविरुध्द नकाराधिकार वापरण्याचा अधिकार दिला. तसेच भारतीयांच्या कल्यानासाठी कायदा बनविण्याचा अधिकार देऊन भारतातील गुलामगिरीची पध्दत नष्ट करण्याचा अधिकार दिला.

iv. जात, धर्म, पंत, वंश, वर्ग, वर्ण यावरून कोणताही भेदभाव केला जाणार नाही व शासकीय सेवेत समान संधी देण्यात आली.

v. या कायद्यामुळे लोकसेवेची पात्रता निश्चित करण्यात आली.

vi. कंपनीची सर्व व्यापारी मक्तेदारी रद्द करुन फक्त राजकीय व प्रशासकीय अधिकार दिले.

II) **ब्रिटिश राजवट (1857 ते 1947)**

1857 मध्ये ब्रिटिशांच्या विरोधामध्ये राजकिय, सामाजिक, धार्मिक, आर्थिक आणि लष्करी इत्यादी कारणावरून 1857 चा उठाव घडून आला. यातून भारतीयात ब्रिटिशाविषयीचा असंतोष ऊफाळून आला. हा असंतोष कमी करण्यासाठी ब्रिटिशांनी राणीचा जाहीरनामा प्रसिध्द केला. तो पुढील प्रमाणे सांगता येईल.

**1. राणीचा जाहिरनामा (1858)-**

भारतीय शासनव्यवस्था आपल्या प्रत्यक्ष नियंत्रणात घेण्यापूर्वी राणी व्हिक्टोरिया हिने एक जाहिरनामा काढला. या जाहिरनाम्यात भारतीय जनतेला उद्देशुन असे घोषीत केले की, भारतीय जनतेच्या धार्मिक बाबतीत कसल्याही प्रकारे ढवळा-ढवळे करण्यात येणार नाही व सर्व लोकांना धर्म, भाषा, लिंग, वंश, वर्ण व जाती या बाबतीत कसल्याही प्रकारे भेदभाव न करता समतेने वागविण्यात येईल. या व्यतिरीक्त प्रमुख शिफारशी पुढील प्रमाणे सांगता येतील.

i. या कायद्यामुळे इस्ट इंडिया कंपनीची सत्ता संपुष्टात येऊन भारताचा राज्यकारभार राणीच्या नावाने सुरु झाला.

ii. या कायद्यामुळे गव्हर्नर जनरलला व्हाईसरॉय हा किताब देण्यात आला.

iii. भारताच्या राज्यकारभारावर ब्रिटिश पार्लमेंटचे नियंत्रण आले.

iv. या कायद्याने व्हाईरॉय यांना केंद्रिय कौन्सिल आणि प्रांतीय कौन्सिलमध्ये प्रतिनिधिची नेमणूक करण्याचा अधिकार दिला. तसेच राज्य कौन्सिलच्या सचिवांची नेमणूक करण्याचा अधिकार देण्यात आला.

v. बोर्ड ऑफ डायरेक्टर्स आणि बोर्ड ऑफ कंट्रोलरचे महसूल जमा करण्याचे अधिकार व कार्य राज्य सचिवाकडे सोपविले.

vi. या जाहीरनाम्यामुळे संस्थानिकांचा दत्तक घेण्याचा अधिकार मान्य करण्यात आला व अंतर्गत कारभाराचे त्यांना स्वातंत्र्य देण्यात आले.

vii. भारतमंत्री, त्यांची कौन्सिल, अंडर सेक्रेटरी आणि त्यांच्या सर्व व्यवस्थापनाचे वेतन भारतीयांच्या महसूलातून देण्यास सुरूवात झाली.

viii. नियंत्रण मंडळ व संचालक मंडळ बरखास्त करून भारतमंत्री हे नवे पद निर्माण करण्यात आले. भारत मंत्र्याच्या मदतीसाठी इंडिया कौन्सिलचे पद निर्माण करण्यात आले.

**2. 1882 चा भारत सरकारचा कायदा:**

i. 1882 मध्ये लॉर्ड रिपन यांनी पंचायतराजसंबंधी पहिला कायदा केला यामुळे त्याला स्थानिक स्वराज्य संस्थेचे जनक म्हणतात.

ii. लॉर्ड रिपनने वृत्तपत्रांवर लादलेले बंधन काढून वृत्तपत्रात स्वातंत्र्य बहाल केले.

iii. लॉर्ड रिपनने प्रशासनात बऱ्याच सुधारणा घडून आनल्या.

**3. 1892 चा कायदा**

i. 1892 च्या कायद्याने अप्रत्यक्ष निवडणूक पध्दतीची सुरुवात झाली.

ii. या कायद्यामुळे कायदेमंडळातील भारतीय सभासदांची सदस्य संख्या वाढविणयात आली. प्रातिक विधिमंडळातील किमान 8 व कमाल 20 आणि केंद्रीय विधिमंडळात किमान 10 व कमाल 16 सदस्यसंख्या करण्यात आली.

iii. मंत्रिमंडळ पध्दतीचा पाया घातला गेला.

iv. महसूल तसेच वार्षिक अंदाजपत्रकावर चर्चा करण्याचा अधिकार देऊन सार्वजनिक बाबी संबंधी सरकारला विचार विनिमयाचा अधिकार प्रदान केला.

**4. 1909 चा कायदा / मोर्ले मिंटो सुधारणा कायदा:**

देशाच्या कारभारात भारतीय लोकांना, अधिकाधिक व परिणामकारक प्रतिनिधित्व मिळावे म्हणून काँग्रेसने आपली मोहीम सुरूच ठेवली होती. इ.स.1909 चा इंडिया कौन्सिल ॲक्ट हा मोर्ले मिंटो सुधारणा कायदा या नावाने ओळखला जातो कारण भारतमंत्री लॉर्ड मोर्ले आणि गव्हर्नर जनरल (व्हॉईस रॉय) लॉर्ड मिंटो यांच्या प्रयत्नामुळे हा कायदा संमत झाला आणि

राजकिय सुधारणेचे नवे युगच सुरु झाले. इ.स. 1909 च्या कायद्याने जे क्रांतिकारक बदल केले ते खालील प्रमाणे सांगता येतील.

i. या कायद्याने केंद्रीय तसेच प्रांतीय कायदे मंडळाचा विस्तार करून त्यांच्या सत्तेत वाढ करण्यात आली.
ii. केंद्रीय कायदेमंडळाची सदस्य संख्या 16 वरून 60 करण्यात आली.
iii. बंगाल, मद्रास व मुंबई येथिल कायदेमंडळातील सभासदांची संख्या 20 वरून 50 करण्यात आली.
iv. पंजाब, ब्रम्हदेश व आसामच्या कायदेमंडळाची सदस्य संख्या 30 करण्यात आली.
v. प्रत्यक्ष निवडणूकीचे तत्व स्विकारून सामान्य वर्ग व श्रीमंत वर्ग असे मतदारसंघ निर्माण करण्यात आले.
vi. या कायदयानुसार मुस्लीमांसाठी स्वतंत्र मतदारसंघ निर्माण करण्यात आले. त्यामुळे लॉर्ड मिंटो यांना सांप्रदायिक निवडणूकीचे जनक म्हणतात.
vii. या कायदयाव्दारे कॉर्पोरेशन चेंबर ऑफ कॉमर्स विद्यापीठे व जमीनदार यांना स्वतंत्र प्रतिनिधी पाठविण्याचा अधिकार देण्यात आला.
viii. प्रातिक विधिमंडळात बिनसरकारी सदस्याचे बहुमत प्रस्थापित केले.
ix. विधिमंडळ सदस्यांना अर्थ विधेयकावर चर्चा करण्याचा आणि त्यांना अंतिम मान्यता मिळण्यापुर्वी त्यावर ठराव करण्याचा तसेच उपप्रश्न (पुरवणी प्रश्न) विचारण्यांचा अधिकार देण्यात आला.

**5. 1919 चा गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्ट (मॉटेग्यू - चेम्सफोर्ड सुधारणा)**

भारतीयांचे काही प्रमाणात तरी समाधान करता यावे या हेतुने ब्रिटिश राज्याने एक महत्वपूर्ण घोषणा केली. 20 ऑगस्ट 1917 या दिवस झालेली ही ऐतिहासिक घोषणा 'ऑगस्ट घोषणा' म्हणून प्रसिध्द आहे. तत्कालीन भारत मंत्री लॉर्ड मॉटेग्यू यांनी ब्रिटिश राजपदाच्या वतीने ही घोषणा केली. या घोषणापत्रात म्हटले होते, "ब्रिटिश राजपदावर भारतीयांना प्रशासनाच्या कामात जास्तीत जास्त प्रमाणात समावून घ्यायाचे आहे. भारतात स्वंयशासित संस्थाचा विकस करायचा आहे. त्यामुळे भारतीयांची जबाबदार शासन पध्दती ब्रिटिश साम्राज्याचा एक अविभाज्य भाग असेल." हे आश्वासन पूर्ण करण्यासाठी भारतमंत्री लॉर्ड मॉटेग्यू आणि गव्हर्नर जनरल लॉर्ड चेम्सफोर्ड यांच्या संयुक्त प्रयत्नातून भारतीय शासन कायदा 1919 (Government of India Act. 1919) निर्माण झाला. यांच्या प्रमुख तरतुदी खालील प्रमाणे सांगता येतील (पहिले महायुध्द, हिंदू- मुस्लिमांचे एक्ये, लाहोर करार, होमरूल चळवळ इत्यादी घटकांच्या परिणाम स्वरूप हा कायदा निर्माण झाला.)

ह्या कायदयानुसार केंद्रामध्ये व्दिगृही कायदेमंडळ स्थापन करण्यात आले. राज्यपरिषद (Council of state) आणि केंद्रीय विधानसभा (Central legislative assembly) अशी या दोन सदनांची नावे होती वरिष्ठ सदन असलेल्या राज्य परिषदेत 60 सदस्य

होते. त्यात 26 सदस्य गर्व्हनर जनरल व्दारा नियुक्त आणि 34 सदस्य निर्वाचित होते. नियुक्त होणाऱ्या 26 सदस्यामध्ये 1 अधिकारी व 7 गैर सरकारी सदस्य होते. निवडूण येणाऱ्या 34 सदस्यापैकी सार्वजनिक मतदार संघातून 20 मुसलमानांकडून, 10 युरोपियनांव्दारे, 03 शीखाकडून आशी व्यवस्था होती. सदर कार्यकाल 5 वर्षे असला तरी दरवर्षी अंशत: नुतनीकरण केले जाई.

i. इंडिया कौन्सिलच्या सभासदांची संख्या 8 ते 12 करण्यात येऊन त्यात तीन हिंदी सभासदांची नियुक्ती करण्यात आली पूर्वी दोन हिंदी सभासद होते.

ii. 1793 पासून भारत सचिवाला भारतीय कोषातून वेतन मिळत होते आता ते इंग्लडच्या कोषातून मिळणार होते. भारत सचिवाची काही कामे भारतीय उच्चायुक्त असे पद निर्माण करुन त्याला सोपविली होती. ह्या नव्या पदाची नियुक्ती व वेतन भारत सरकारकडून होणार होते.

iii. या कायदयाने गव्हर्नर जनरलचे परराष्ट्र खात्यावर प्रत्यक्ष नियंत्रण सुरू झाले.

iv. मतदानाचा अधिकार मर्यादित ठेवण्यात आला वार्षिक दहा हजार रूपये उत्पन्न असणाऱ्या व त्यावर आयकर देणाऱ्या किमान 750 रु वार्षिक भूमिकर देणाऱ्या व्यक्ती मतदानास पात्र होत्या. दुसरी बाब म्हणजे उमेदवाराचा कोणत्याही कायदे मंडळाचा अनुभव असणे किंवा तो विद्यापीठाच्या सिनेटचा सदस्य असणे शिवाय उपाधिकारक (Title holder) असणे आवश्यक होते. 1920 मध्ये भारताच्या 24 कोटी लोकसंख्ये पैकी फक्त 17364 लोकांनाच मताधिकार मिळू शकला.

**6. 1928 चा नेहरु रिपोर्ट:**

i. हिंदुस्थानला साम्राज्याअंतर्गत स्वराज्य लगेच मिळावे त्यानंतर पूर्ण स्वातंत्र्य हेच हिंदुस्थानचे नजीकचे ध्येय असेल.

ii. हिंदुस्थान संघराज्यात्मक राज्य असेल प्रांताना आवश्यक तेवढी स्वायत्तता असेल. प्रांताना केवळ एकच कायदे मंडळ असावे आणि राज्य सरकारच्या विषयाची वाटणी केंद्र व प्रांत यात व्हावी.

iii. हिंदुस्थान हे निधर्मी राष्ट्र असेल जे जातीय समस्या समाधानकारक रीत्या सोडवेल. राजकीय हक्काचे सरंक्षण झाले पाहिजे परंतू त्यासाठी जातीय मतदार संघाची आवश्यकता नाही.

iv. अल्पसंख्याकांना राखीव जागा असाव्यात परंतू स्वतंत्र मतदारसंघ नसावेत.

v. इंग्लडचा राजा व कायदे मंडळाची दोन गृहे मिळून हिंदी पार्लमेंट तयार होईल. प्रांताचे प्रतिनिधी वरिष्ठ ग्रहात नसतील तर कनिष्ठ गृहातील प्रतिनिधी प्रौढ मतदान पध्दतीने निवडून दिलेले असतील.

vi. गव्हर्नर जनरलने प्रधानमंत्र्याची निवड करावी व त्याच्या सल्याने इतर मंत्र्याची निवड करावी व मंत्रिमंडळ तयार करावे या मंत्रिमंडळाच्या सल्याने गव्हर्नरने कारभार करावा मंत्रिमंडळ हे पार्लमेंटला जबाबदार असेल.

**7. गोलमेज परिषदा (1930, 1931, 1932)**

i. घटनात्मक सुधारणावर विचार करण्यासाठी गोलमेज परिषदेचे आयोजन

ii. या परिषदेत भारतीय घटनेचे स्वरूप कसे असावे यावर चर्चा झाली. चर्चा सत्रात वसाहतीचे स्वराज्य आणावे व संसदीय पध्दतीची मागणी करण्यात आली.

iii. या परिषदेत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यांकरीता स्वतंत्र मतदार संघाची मागणी केली होती.

**8. 1935 चा भारत प्रशासन कायदा**

भारतीय राज्यघटनेचा बहुतांश सरंचनात्मक भाग हा 1935 च्या भारत प्रशासन कायदयावरून घेतलेला दिसून येतो. 1919 चा कायदा प्रसिध्द झाल्यावर तो आम्हास पसंत नाही. म्हणून तो सुधारला जावा अशी मागणी हिंदी लोकांनी केली पुढे सायमन कमिशन नेहरू रिपोर्ट बॅ.जीनाचे 14 मुद्दे, तीन गोलमेज परिषदा व स्वेतपत्रिका इत्यादी अनेक घटनांनी 1935 च्या कायदयाची पार्श्वभूमी तयार केली. यातुनच भारतामध्ये जबाबदार शासन पध्दतीचा निर्मितीतील एक मैलाचा दगड ठरला. हा कायदा विस्तृत स्वरूपात आहे. यामध्ये 321 कलमे आणि 10 परिशिष्टे होती. सुप्रसिध्द घटनात्मक विश्लेषक सुभाष कश्यप यांच्या मते, “भारतीय राज्यघटनेचा सुमारे 75% भाग 1935 च्याकायदयाची पुननिर्मितीच मानता येते. या कायदयाच्या प्रमुख तरतुदी पुढील प्रमाणे आहेत.

i. भारतमंत्र्याची समिती (इंडिया कौंसिल) भंग करण्यात आली आणि त्या ऐवजी त्याला सल्ला देणारी एक 3 ते 6 लोकांची सल्लागार समिती नेमण्यात आली.

ii. भारतमंत्र्याचे अधिकार कमी करण्यात आले व लोकप्रतिनिधीच्या कार्यात त्याने हस्तक्षेप करू नये असा आदेश देण्यात आला.

iii. प्रांत आणि संस्थाने यांचे मिळून अखिल भारतीय संघराज्य स्थापन करण्यात यावे. या कायदयाने केंद्र आणि राज्य यांच्यातील अधिकारांचे विभाजन तीन सुचीव्दारे केले.

   a. संघीय सूची (केंद्र सूची) – 59 विषय

   b. राज्यसूची (प्रांत सूची) – 54 विषय

   c. समवर्तीसूची – 36 विषय. उर्वरित अधिकार व्हॉइसरॉयला देण्यात आले.

iv. केंद्रामध्ये दुहेरीशासन पध्दती सुरू करण्यात येऊन राखीव व सोपी अशी राज्यकारभाराच्या खात्याची वाटणी करून प्रांतातील दुहेरी शासन पध्दती समाप्त करण्यात आली.

v. प्रांतामध्ये असलेली व्दिदल पध्दत (Diarchy) रद्द करून त्यांना स्वायत्तता देण्यात आली. त्यांच्या अधिकारक्षेत्रात प्रशासनाचा एक घटक म्हणून त्यांना कार्य करण्याची स्वायत्तता देण्यात आली. याशिवाय प्रांतामध्ये जबाबदार शासन पध्दती सुरू करण्यात आली. म्हणजे प्रांतिक कायदेमंडळाला जबाबदार असलेल्या मंत्र्याच्या सल्ल्याप्रमाणे राज्यपालाने कार्य करावे असे नमुद केले. या तरतुदीचा अमल 1937 साली सुरु झाला. परंतू 1939 मध्ये ही पध्दत खंडीत झाली.

vi. 11 प्रांतापैकी 6 प्रांतामध्ये व्दिगृही सभोग्रहे निर्माण करण्यात आली बंगाल, बॉम्बे, मद्रास, बिहार, आसाम आणि संयुक्त प्रांतमध्ये विधिमंडळाचे वरिष्ठ गृह (विधानपरिषद) आणि कनिष्ठ गृह (विधानसभा) निर्माण करण्यात आले. तथापी त्यांच्यावर अनेक निर्बंध होते.

vii. संघराज्याचे राज्य विरुध्द केंद्र किंवा एकराज्य विरुध्द दुसरे राज्य यांच्यातील संघर्ष मिटविण्यासाठी संघराज्याच्या न्यायालयाची (फेडरल कोर्ट) स्थापना करण्यात आली. (1 ऑक्टोबर 1937 पासुन कामकाज सुरु झाले)

viii. या कायदयात आणिबणी जाहीर करण्यासंबंधी तरतुद केली होती.

**9. क्रिप्स मिशन – 1942:**

11 मार्च 1942 रोजी सर स्टॅफर्ड क्रिप्स यांच्या नेतृत्वाखाली भारतात एक मंडळ पाठविण्याचे ठरविले कारण महायुध्दात जपान सामील झाल्यावर भारतात अधिक काळ अशांतता टिकू देणे योग्य नाही असे ब्रिटिशांना वाटले त्यांनी केलेल्या महत्वाच्या शिफासशी खालील प्रमाणे सांगता येतील.

i. दुसरे महायुध्द संपताच भारताला वसाहतीच्या दर्जाचे स्वातंत्र्य दिले जाईल.

ii. युध्द संपतांच घटनासमितीची निर्मिती करण्यात येईल. प्रातिक कायदेमंडळाच्या सदस्यांनी प्रमाणशीर प्रतिनिधीत्वाच्या पध्दतीने निवडलेले काही प्रतिनिधी व लोकसंख्येच्या प्रमाणात संस्थानांनी पाठविलेले प्रतिनिधी यांची मिळून ही घटना समिती बनेल.

iii. एखाद्या प्रांताला घटना मान्य नसल्यास त्यांना स्वतंत्र घटना तयार करण्याचा अधिकार असेल.

iv. संविधान अस्तित्वात येईपर्यंत भारताच्या सरंक्षणाची जबाबदारी ब्रिटिश सरकारची राहील.

**10. त्रिमंत्री योजना किंवा कॅबिनेट मिशन 1946:**

ब्रिटनचे पंतप्रधान लॉर्ड ॲटली यांनी भारताला ब्रिटिश मंत्रिमंडळाचे त्रिमंत्री शिष्टमंडळ भारतातील राजकीय पेचप्रसंग सोडविण्यासाठी पाठविले. त्यात त्यांच्या मंत्रिमंडळातील तीन मंत्री सर पॅपिक लॉरेन्स, सर स्टॅफर्ड क्रिप्स व अल्बर्ट अलेक्झांडर या मंत्र्याचा समावेश होता. या शिष्टमंडळाने एक योजना तयार केली. या योजनेनुसार घटना समितीसाठी निवडणूक होऊन घटनासमिती स्थापन झाली आणि तीने भारताची राज्यघटना तयार केली. म्हणून भारतीय संविधानाचा विकासात कॅबिनेट मिशन योजना महत्वपूर्ण मानली जाते. या योजनेतील प्रमुख तरतुदी पुढील प्रमाणे.

i. ब्रिटिश भारत आणि देशी संस्थानिक योचे एक भारतीय संघराज्य निर्माण करण्यात येईल.

ii. ब्रिटिश, हिंदुस्थान आणि संस्थानिक यांच्या प्रतिनिधीचे कार्यकारी मंडळ व कायदेमंडळ असावे.

iii. संघसरकारकडे परराष्ट्र संबंध, सरंक्षण, दळणवळण आणि अर्थ ही खाती असतील.

iv. संघ सरकारकडे सोपविलेल्या विषयाशिवाय इतर विषय घटकराज्याकडे राहतील.

v. दोन किंवा अधिक घटकराज्य संयुक्त कायदेमंडळ आणि कार्यकारिणी निर्माण करू शकतील.

vi. प्रांतिक कायदेमंडळ आणि घटनामंडळ यामध्ये दहा लाख जनतेला एक यानुसार प्रतिनिधी पाठविता येतील.

vii. कायदेमंडळात शीख आणि मुस्लामांना जनसंख्येच्या आधारावर प्रतिनिधीत्व मिळेल.

**11. 1947 चा इंडियन इंडिपेंडन्स ॲक्ट**

i. संबंधीत राज्यसंस्थेसाठी स्वतंत्र राज्यघटना निर्मितीचा अधिकार देण्यात आला.

ii. घटना तयार करून तिची अमलबजावणी करेपर्यंत कायदे करण्याचा अधिकार घटना समितीकडे असेल.

iii. नविन राज्यघटना तयार होईपर्यंत 1935 च्या कायदयाप्रमाणे राज्यकारभार चालेल.

**इतर राज्यघटनांचा प्रभाव:-**

1. ब्रिटिश राज्यघटना - संसदीय शासन, कायदयाचे राज्य, कायदेमंडळाची कार्यपध्दती, एकेरी नागरिकत्व, व्दिसभाग्रह, कॅबिनेट व्यवस्था, आदेश देण्याचा विशेष हक्क, संसदीय विशेषाधिकार.
2. अमेरिकेची राज्यघटना- न्यायालयीन पूनर्विलोकन, न्यायालयाचे स्वातंत्र्य, मूलभूत हक्क, राष्ट्रपतींवरील महाभियोग, सर्वोच्च आणि उच्चन्यायालयातील न्यायाधिशांना पदावरून दूर् करणे आणि उपराष्ट्रपतीचे पद.
3. आयर्लंडची राज्यघटना- मार्गदर्शक तत्वे, राष्ट्रपती पदाच्या निवडणुकीची पध्दत, राज्यसभेवर सदस्याची नियुक्ती.
4. कॅनडाची राज्यघटना - प्रबळ केंद्रासहित संघराज्य, केंद्राकडे शेषाधिकार केंद्राकडून राज्यातील राज्यपालाची नियुक्ती आणि सर्वोच्च न्यायालयाचे सल्लाविषयक अधिकारक्षेत्र.
5. ऑस्ट्रेलियाची राज्यघटना - संसदेच्या दोन्ही सभागृहाची संयुक्त बैठक, समवर्ती सूची, व्यापार-उद्योग आणि दळणवळणाचे स्वातंत्र्य.
6. जर्मनीची वायमर राज्यघटना- आणिबाणीच्या काळात मुलभूत हक्कांची तहकूबी.
7. सोव्हिएत (रशिया) राज्यघटना- मूलभूत कर्तव्ये आणि सरनाम्यामध्ये न्यायाची उदिष्टे (सामाजिक, आर्थिक आणि राजकीय)
8. दक्षिण आफ्रिकेची राज्यघटना- राज्यघटनेमध्ये दुरूस्ती करण्याची कार्यपध्दती आणि राज्यसभा सदस्याची निवडणूक
9. फ्रान्सची राज्यघटना- गणराज्य आणि सरनाम्यातील स्वातंत्र्य, समता आणि बंधुतेची उदिष्टे.
10. जपानची राज्यघटना- कायदयाने प्रस्थापित केलेली कार्यपध्दती.
11. भारत सरकार कायदा 1935- संघराज्यीय व्यवस्था, गव्हर्नर पद, न्यायमंडळ, लोकसेवा आयोग, आणिबाणिविषयक तरतूदी आणि प्रशासकीय विस्तृत माहीती.

**सारांश**

भारतीय राज्यघटनेवर टिका करतांना प्रा.लास्कीच्या मते भारतीय राज्यघटना म्हणजे आनेक चिंध्याचे गाठोडे आहे. तसेच 1935 च्या कायद्याची प्रतिकृती आहे. अशा प्रकारची टिका होत असल्या तरी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी या टिकेचे पूर्णपणे खंडण केले आहे. चांगल्या गोष्टी कोठेही असो त्याचे अनुकरण करण्यास गैर नाही आपल्या राज्यघटनेमध्ये इतर कोणत्याही देशाच्या जशास तशी कॉपी केलेली नाही. त्यामुळे भारतीय राज्यघटनेवर करण्यात आलेल्या सर्व टिका व्यर्थ व निरर्थक आहेत.

**संदर्भ सूची:**

1. भोळे भास्कर (2011), भारताचे शासन आणि राजकारण, नागपूर, पिंपळापूरे ॲण्ड के. पब्लिशर्स.
2. कुलकर्णी बी.वाय.(2013), भारतीय संविधान शासन व राजकीय प्रक्रिया.
3. फडिया बि.एल.(2003), राजनीति विज्ञान, आगरा, साहित्यभवन पब्लिकेशन.

कश्यप सुभाष (2011) हमारी संसद, नई दिल्ली, नॅशनल बुक्स ट्रस्ट इंडिया.

 ISBN No. 978-93-91097-18-9

# ११. भारतीय संविधानातील मुलभूत अधिकार

**डॉ. रमेश शेवाळे**
विभाग प्रमुख, राज्यशास्त्र विभाग
संत मुक्ताबाई कला व वाणिज्य महाविद्याल, मुक्ताई नगर

४ जुलै १७७६ मध्ये झालेल्या अमेरिकन राज्यक्रांतीने प्रजासत्ताक लोकशाही संघराज्य आणि घटनावाद या चार राजकीय विचार प्रणालींना प्राधान्य दिले. या क्रांतीने अमेरिकन लोकांना सामाजिक दर्जा दिला जो समानतेच्या तत्त्वावर आधारित होता. सर्वांसाठी मूलभूत हक्कांची हमी देण्यात आली. जगातील प्रथम लिखित राज्यघटना म्हणून अमेरिकन राज्य घटनेचा उल्लेख केला जातो. १७८९ मध्ये वॉल्टेअर व रुसो अशा मानवतावादी विचारवंतांच्या प्रेरणेतून फ्रेंच राज्यक्रांती घडून आली. स्वातंत्र्य, समता, न्याय व बंधुत्व या लोकशाही मूल्यांचा जन्म खऱ्या अर्थाने फ्रेंच राज्यक्रांतीमध्ये झाला. जगातील पारतंत्र्यात असलेली राष्ट्रे परकियांच्या गुलामीतून मुक्त होण्यासाठी, लोकशाहीच्या प्रस्थापनेसाठी धडपडू लागली. यामध्ये भारतीय स्वातंत्र्य आंदोलनसुद्धा तितक्याच ताकदीने सरसावत होते. १८५७ ते १९४७ या कालखंडातील सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक स्थित्यंतरे भारतीय संविधानाच्या दृष्टीने महत्वपूर्ण आहेत.

**शोधनिबंधाचे उद्दिष्टे :-**

- भारतीय संविधानातील मूलभूत अधिकार यांचे विश्लेषण करणे.
- भारतीय संविधानाच्या निर्मितीचा ऐतिहासिक आढावा घेणे.
- भारतीय संविधानावरील इतर देशातील संविधानाच्या प्रभावाचे विश्लेषण करणे.
- भारतीय संविधानातील मुलभूत अधिकारांचे तात्विक विश्लेषण करणे.

**शोधनिबंधाची गृहितके:-**

- संविधानातील मूलभूत अधिकार हे व्यक्तीला स्वातंत्र्याची हमी देतात.
- मूलभूत अधिकार लोकशाही तत्त्वांची जोपासना करतात.
- मूलभूत अधिकार व्यक्तींच्या हक्कांची सुरक्षितता देतात संविधानातील मुलभूत अधिकार मूल्यनिर्धारण करतात.
- मूलभूत अधिकार वैधानिक स्वरूपाची हमी देतात.

**संशोधन पद्धती:-**

प्रस्तुत शोधनिबंध समाजीक शास्त्रांतर्गत राज्यशास्त्र या विषयातील असून ऐतिहासीक व विश्लेषणात्मक अध्ययन पध्दतीचा अवलंब करण्यात आलेला आहे.

**तथ्य संकलन:-**

प्रस्तुत शोधनिबंधाच्या विश्लेषणाकरीता दुय्यम तथ्य संकलन पध्दतीचा अवलंब करण्यात आलेला आहे. यात भारतीय संविधानावरील विविध ग्रंथ, वृत्तपत्रे इ.चा उपयोग करण्यात आलेला आहे.

भारतीय संविधानातील मूलभूत अधिकार भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारताच्या घटनेत विभिन्न प्रदेशाचे एकत्रीकरण करून राष्ट्रीय एकात्मता प्रस्थापित केली. राज्यघटनेत समता स्वातंत्र्य व बंधुत्वाचा अंतर्भाव केला. संविधानाच्या माध्यमातून आपल्या राजकीय तत्वज्ञानात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बुद्धिमत्ता, लोकशाही, संसदीय शासन प्रणाली, मानवाचे अधिकार आणि कर्तव्य परंपरा तसेच आधुनिक विचारांचे समन्वित रूप सादर केले. हा सर्वसमावेशक विचार भारतीय समाजाच्या दृष्टीने अत्यंत प्रासंगिक व महत्त्वपूर्ण ठरतो. या अनुषंगाने भारतीय राज्य घटनेच्या तिसऱ्या भागात कलम १२ ते ३५ मध्ये अंतर्भूत असलेल्या मूलभूत अधिकारांचे प्रस्तुत शोधनिबंधात विश्लेषण करण्यात आले आहे.

**भारतीय संविधान निर्मितीची ऐतिहासिक पार्श्वभूमी:-**

भारतीय संविधान निर्मितीची ऐतिहासिक पार्श्वभूमी सुद्धा विविध घटनात्मक क्रिया-प्रक्रिया व वैचारिक घडामोडींचा दस्ताऐवज आहे. भारतीय राज्यघटनेची निर्मिती ही प्रामुख्याने उत्तर वसाहतिक कालखंडातील घटना निर्मितीचा महत्त्वपूर्ण प्रयत्न होता. राज्यघटना निर्मितीत ब्रिटिश राजवटीचा प्रभाव आणि भारतीय समाजाने त्यात दिलेले सहकार्य हे घटक निर्धारिक ठरतात. ब्रिटिशांच्या आगमनानंतर भारतात कायद्याचे राज्य, मानवतावाद, धर्मनिरपेक्षता, व्यक्ति स्वातंत्र्य इत्यादी आधुनिक मूल्यांची ओळख झाली. भारतात आधुनिक शासन चळवळीचा पाया १७६५ ते १९४७ या कालखंडात झालेल्या विविध कायद्याच्या माध्यमातून रोवला. इंग्रजी राजवट आणि भारतीय समाज यातील आंतरक्रियेतून व भारतीय स्वातंत्र्य चळवळीतून स्वतंत्र भारताच्या घटनात्मक चौकटीची रूपरेषा निर्माण झाली. नवीन मुल्यांच्या बरोबरच स्वातंत्र्यलढ्यातील उदारमतवादी विचार, फुले, शाहू, आंबेडकर व पेरियार यांच्या सामाजिक क्रांतीचा विचार, जहाल व मवाळमतवादी विचार, डावी विचारधारा, शेतकरी व आदिवासींचे क्रांती लढे आदी समांतर विचार प्रवाहांचेसुद्धा भारतीय संविधानावर प्रतिबिंब उमटलेले दिसते.

जगातील विविध देशातील राज्य घटनांचा भारतीय संविधानावर प्रभाव दृष्टिगोचर होतो. डिसेंबर १९१८ मध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या ३३ व्या वार्षिक अधिवेशनात भारताला स्वयंनिर्णयाचे तत्व लागू करावी असा ठराव पारित करण्यात आला. १९१९ मधील माँटेग्यू चेम्सफर्ड कायद्याला विरोध करून संविधान सभेची कल्पना स्वीकृत करण्यात आली. ५ जानेवारी १९२२ मध्ये महात्मा गांधी यंग इंडियामध्ये म्हणतात की, भारताचे स्वराज्य ही ब्रिटिश संसदेने दिलेली भेटवस्तू असणार नाही.”[१] मोतीलाल नेहरू यांनी ८ फेब्रुवारी १९२४

मध्ये स्वराज्य पक्षाच्या वतीने केंद्रीय विधिमंडळात ठराव मांडला की, "भारतासाठी संविधान असावे. संविधान निर्माण करण्यासाठी १९ मे १९२८ रोजी मोतीलाल नेहरू समितीने नेहरू रिपोर्ट सादर केला. १९२९ मध्ये पहिल्यांदा भारतासाठी संविधान सभा गठीत करण्याची मागणी एम.एन.रॉय यांनी केली आणि डिसेंबर १९२९ रोजी लाहोर येथे आयोजित काँग्रेसच्या अधिवेशनात संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव मांडण्यात आला. १९३४ मध्ये राष्ट्रीय काँग्रेसने नेहरूंच्या घटना समितीच्या मागणीचा काँग्रेसने अधिकृतपणे आपल्या प्रस्तावात समावेश केला तेव्हापासून घटना समितीची मागणी काँग्रेसची मुख्य मागणी बनली. १९३५ च्या राष्ट्रीय काँग्रेसच्या बैठकीत संविधान सभेची अधिकृतरित्या मागणी जाहीर केली व ८ ऑगस्ट १९४० मध्ये ऑगस्ट घोषणा जाहीर करण्यात आली. याद्वारे भारतीय घटना निर्मितीसाठी घटना समिती असावी हे अप्रत्यक्षपणे मान्य करण्यात आले. ४२ च्या क्रिप्स मिशन मधून असा सूर निघाला की, भारतीय संविधान निर्मितीची जबाबदारी पूर्णपणे भारतीयांची आहे. या ठरावाला काँग्रेस आणि मुस्लीम लीगने विरोध दर्शविला. १९४५ च्या विविध योजना मध्ये घटना निर्मिती सभेला पाचारण करणे त्याकरीता शिमला येथे २५ जून ते १४ जुलै १९४५ दरम्यान परिषद बोलविण्यात आली पण ती यशस्वी ठरली नाही. १९४६ मधल्या कॅबिनेट मिशन घोषणेतून भारताची घटना समिती तयार करण्याची पद्धत आणि प्रक्रिया निश्चित झाली. २० नोव्हेंबर १९४६ रोजी भारताचे संविधान तयार करण्यासाठी घटना समिती स्थापन करण्यात आली आणि ९ डिसेंबर १९४६ रोजी घटना समितीचे पहिले अधिवेशन आणि कामकाज अप्रत्यक्षरीत्या सुरू झाले. २ वर्षे ११ महिने १८ दिवस चाललेल्या संपूर्ण घटना निर्मितीच्या नंतर २६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारताची राज्यघटना स्वीकृत करण्यात आली आणि २६ जानेवारी १९५० रोजी भारतात ती प्रत्यक्ष अमलात आली. जगातील सर्वात मोठी लिखित राज्यघटना म्हणून उदयास आलेली भारतीय राज्यघटना ही खऱ्या अर्थाने भारतीय लोकांना सार्वभौमत्व, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही, गणराज्य स्थापित करण्याच्यासाठी तसेच सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय प्रस्थापित करण्यासाठी विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासना यांचे स्वातंत्र्य प्रदान करण्यासाठी आणि भारतातील प्रत्येक व्यक्तीला दर्जाची व संधीची समानता मिळवून देण्यासाठी कटिबद्ध असल्याचे अभिवचन देते. म्हणून भारतीय राज्यघटना ही मानवाधिकाराचा तसेच व्यक्तीच्या मूलभूत अधिकाराचा दस्ताऐवज आहे.

**भारतीय राज्यघटनेतील मूलभूत अधिकार:-**

भारताने अमेरिकेच्या राज्यघटनेकडून मूलभूत अधिकाराचे तत्त्व स्वीकारले आहे. भारतीय राज्यघटनेच्या उद्देश पत्रिकेत नमूद केलेली उद्दिष्टे स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय ही साध्य करण्यासाठी नागरिकांना मूलभूत अधिकार देणे अनिवार्य होते त्याशिवाय संविधानाच्या सरनाम्यातील उद्दिष्टे साध्य झाली नसती. म्हणून व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी मूलभूत अधिकार हे आधारभूत ठरतात. भारतीय राज्यघटनेत व्यक्तीच्या हिताचे रक्षण करण्यासाठी, नागरिकांच्या सर्वांगीण विकासासाठी, अल्पसंख्याकांच्या संरक्षणासाठी अधीसत्तेच्या मनमानी

कारभारावर निर्बंध घालणाऱ्या तरतुदी म्हणून आवश्यक आणि लोकशाहीच्या दृढीकरणासाठी अत्यावश्यक अशा प्रकारची हे मूलभूत अधिकार आहेत. संविधानाने दिलेले हक्क हा संविधानाचा भाग असून सर्वोच्च न्यायालयाने काही मूलभूत हक्कांना मौलिक संरचनेचा भाग मानले आहे. मूलभूत हक्क हे न्यायप्रविष्ट आहेत म्हणजे हक्कांचे उल्लंघन झाल्यास त्याविरुद्ध उच्च किंवा सर्वोच्च न्यायालयात दाद मागता येते याचा अर्थ हक्कांना न्यायीक संरक्षण प्रदान केले आहे.

**कलम १४ ते १८ समानतेचा अधिकार:-**

लोकशाहीचा मुख्य आधार म्हणजे समता हा आहे. समतेमुळे व्यक्तीला कायद्यापुढे समानता आणि कायद्याचे समान संरक्षण प्राप्त होते. कायद्यापुढे समानता म्हणजे सर्व व्यक्ती समान आहेत. घटनेच्या १४ व्या कलमात असे स्पष्ट केले आहे की, 'भारतामध्ये कायद्यासमोर प्रत्येक व्यक्तीला समान दर्जा देण्यात आलेला आहे. यातील मग ती व्यक्ती राष्ट्रपती असो किंवा सामान्य नागरिक असो कोणालाही कायद्याच्या समान संरक्षणा पासून वंचित ठेवले जाणार नाही.'[२] एकाच प्रकारच्या गुन्ह्यासाठी समान शिक्षा दिली जाईल. व्यक्तिपरत्वे कायदा भिन्न राहणार नाही. कायद्याप्रमाणे धर्म, वंश, जात, स्त्री-पुरुष, श्रीमंत-गरीब, शिक्षित-अशिक्षित, वरिष्ठ कनिष्ठ, सरकारी अधिकारी, नोकर असा कोणत्याही प्रकारचा भेदभाव केला जाणार नाही. सर्व व्यक्तीसाठी एकच कायदा राहील.

**कलम १५ भेदभावास प्रतिबंध:-**

संविधानाच्या १५ व्या कलमात असे नमूद करण्यात आले आहे की, 'राज्य धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान किंवा त्यापैकी कोणत्याही एका कारणाच्या आधारे कोणत्याही नागरिकांमध्ये भेदभाव करणार नाही. ही तरतूद केवळ भारतीय नागरिकांना लागू आहे.'[३] या आधारावर सार्वजनिक उपाहारगृहे, करमणूक गृहे, हॉटेल्स, दुकाने येथे कोणालाही प्रवेश नाकारता येणार नाही. राज्य आणि खाजगी व्यक्तीने भेदभाव करण्यास प्रतिबंध. राज्याच्या निधीतून पूर्णपणे किंवा अंशतः देखभाल केल्या जाणाऱ्या आणि सार्वजनिक उपयोगासाठी समर्पित केलेल्या विहिरी, तलाव, स्नान घाट, रस्ते आणि सार्वजनिक विश्रांतीची ठिकाणे न्यायोचित भेदभाव करण्याचा सरकारला अधिकार आहे. राज्यात स्त्रिया आणि बालकांसाठी विशेष तरतुदी करता येतील. राज्यातील अनुसूचित जाती आणि जमातीसाठी विशेष सवलती सरकार देऊ शकते. राज्यात सामाजिक आणि शैक्षणिक दृष्ट्या मागासवर्गीय आणि अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्यासाठी विशेष तरतुदी करता येतील. अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्था सोडून इतर सर्व शिक्षण संस्थांमध्ये राज्यात सामाजिक आणि शैक्षणिक दृष्ट्या मागासवर्गीय किंवा अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती यांच्यासाठी प्रवेशासंदर्भात कोणताही कायदा करता येईल.

**कलम १६ सार्वजनिक नोकरीत समान संधी:-**

राज्याच्या नियंत्रणाखालील सार्वजनिक सेवांमध्ये सर्व नागरिकांना समान संधी असेल याबाबत धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान किंवा या आधारे किंवा यापैकी कोणतेही कारणांच्या आधारे व्यक्तीमध्ये भेदभाव केला जाणार नाही व तिला अपात्र ठरविले जाणार नाही. मागासवर्गीय जाती आणि जमातीसाठी सरकारी नोकरीत फारसे प्रतिनिधित्व देण्यासाठी काही जागा राखीव ठेवता येतात. आवश्यकता वाटल्यास संसदेला याबाबत कायदा करता येईल. एखाद्या धार्मिक व सांप्रदायिक संस्थेत नियुक्त केला जाणारा सदस्य किंवा पदाधिकारी विशिष्ट धर्माची असावी असा कायदा करता येईल.

**कलम १७ अस्पृश्यतेचे उच्चाटन:-**

भारतीय समाजरचना ही हजारो वर्षापासून जातीयतेच्या जोखडात अडकून पडली आहे. किंबहुना जातीयता हा भारतीय समाजाला लागलेला कलंक आहे हा कलंक मिटवून टाकण्याचे कार्य घटनाकारांनी घटनेच्या १७ व्या कलमात स्पष्ट केले आहे. कोणत्याही देशाची सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक प्रगती करायची असेल तर त्या देशातील जातियता नष्ट केल्याशिवाय खऱ्या अर्थाने समता प्रस्थापित होणार नाही. म्हणून घटनेच्या १७ व्या कलमात असे स्पष्ट केले आहे की, आता अस्पृश्यता घटनेने नष्ट केली आहे. कोणत्याही स्वरूपात स्पर्श अस्पृश्यता पाळणे हा कायद्याने गुन्हा मानला जाईल. त्याला कायद्यानुसार शिक्षा मिळेल.

**कलम १८ पदव्यांची समाप्ती:-**

संविधानाच्या १८ व्या कलमानुसार पदव्यांची समाप्ती करून घटनाकारांनी 'व्यक्ती व्यक्ती मध्ये असणारा सामाजिक आर्थिक व राजकीय भेदभाव नष्ट केला आहे.'[४] राज्यसंस्था केवळ लष्करी व विद्या विशेष प्राविण्य दर्शविणारे किताब देऊ शकते. नागरिकांना कोणत्याही परकीय देशाकडून कोणताही किताब स्वीकारण्यास प्रतिबंध आहे. परकीय व्यक्ती भारत सरकारच्या नियंत्रणाखालील कोणतेही लाभाचे किंवा विश्वासाचे पद धारण करत असल्यास राष्ट्रपतींच्या संमतीशिवाय तिला कोणत्याही परकीय देशाकडून कोणताही किताब स्वीकारता येणार नाही.

**कलम १९ स्वातंत्र्याचा अधिकार:-**

ब्याक्तिगत स्वतंत्रे हा लोकशाहीचा आधार आहे. व्यक्तीला स्वातंत्रे दिल्याशिवाय व्यक्ती आपला उत्कर्ष करू शकत नाही. घटनेच्या १९ व्या कलमानुसार व्यक्तीला खालील प्रकारचे स्वातंत्र्य भारतीय नागरिकाला प्रदान करण्यात आले आहेत.

**भाषण आणि विचार स्वातंत्र्य:**

भाषणाद्वारे व्यक्ती आपले विचार व्यक्त करते आणि मोकळी चर्चा करून विचारांची देवाण-घेवाण करते.

भाषण व विचार स्वातंत्र्य मधील वरील अडचण दूर करण्यासाठी १९५१ साली १९ व्या कलमात घटना दुरुस्ती करण्यात आली. त्यानुसार भाषण आणि विचार स्वातंत्र्यावर राज्याने

पुढील बंधने घातली आहेत. - राज्याचे संरक्षण, परराज्याशी असलेले मित्रत्वाचे संबंध, सार्वजनिक शांतता आणि सुव्यवस्था, भारताची एकात्मता आणि सार्वभौमत्व यांना बाधा उत्पन्न करणारे आणि सभ्यता तसेच नीतिमत्ता, कोर्टाचा अवमान करणारे, कोणाची बदनामी करणारे, गुन्ह्यास उत्तेजन देणारे, भाषण किंवा विचार व्यक्त करण्याच्या स्वातंत्र्यावर कायदा करून योग्य ती बंधने घालण्याचा अधिकार सरकारला राहील. तसेच व्यक्तीच्या मूलभूत अधिकारांचे निरीक्षण आणि संरक्षण करणे हे कार्य सर्वोच्च न्यायालयाचे आहे. कायदे मंडळाने संमत केलेल्या एखाद्या कायद्यामुळे संविधानाने दिलेल्या स्वातंत्र्याला अडथळा निर्माण झाला तर कायदा घटनाबाह्य ठरवण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाला आहे. शांततापूर्वक परंतु शस्त्राशिवाय सभा भरविण्याचे स्वातंत्र्य भारतीय संविधानाच्या कलम १९(ख) प्रमाणे भारताच्या नागरिकाला स्वातंत्र्य प्राप्त झाले आहे. लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी आपला दृष्टीकोन लोकांना समजावून सांगणे, त्यांच्याशी सुसंवाद घडविणे आवश्यक आहे. त्याकरता सभा, मिरवणुका आणि संमेलने भरवता येतील. राज्यघटनेने नागरिकांना संस्था व संघटना स्थापन करण्याचा अधिकार बहाल केलेला आहे. देशाचे स्वातंत्र्य, सार्वभौमत्व, अखंडत्व, सार्वजनिक, सुव्यवस्था आणि नैतिकता या आधारे राज्यसंस्था निर्बंध घालू शकते. भारतीय उपखंडात सर्वत्र संचार करण्याचे स्वातंत्र्य भारतीय घटनेनुसार भारतीय नागरिकांना भारतीय प्रदेशांमध्ये संचार करण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे. परंतु हा अधिकार मर्यादित आहे. लोकहिताच्या आणि मागासलेल्या जातीच्या हिताच्या दृष्टीने योग्य ती बंधने सरकारला घालता येतात. कायद्याने स्थानबध्द केलेल्या व्यक्तींचे संचार स्वातंत्र्य नष्ट होते. सरकारने राखीव म्हणून घोषित केलेल्या जागी सरकारच्या परवानगीशिवाय संचार करता येत नाही. भारताच्या कोणत्याही भागात वास्तव्य करण्याचे आणि स्थायीक होण्याचे स्वातंत्र्य भारतीय नागरिकाला भारताच्या कोणत्याही भागांमध्ये आपल्या इच्छेनुसार वास्तव्य करण्याचे अथवा स्थायिक होण्याचे अधिकार स्वातंत्र्य प्राप्त झाले आहे. तसेच वास्तव्य आणि स्थायीक होण्याचा अधिकार संचार स्वातंत्र्याला पूरक आहे. सर्वसाधारणपणे सार्वजनिक हिताच्या वृद्धीसाठी ह्या अधिकारावर बंधने सरकार घालू शकते.

**कलम २० व्यक्ती स्वातंत्र्याची हमी:-**

भारतीय राज्यघटनेच्या कलम २०, २१ आणि २२ नुसार १९ व्या कलमात सांगितलेल्या स्वातंत्र्याचे संरक्षण नागरिकांना प्राप्त झालेले आहे. अपराधाबद्दलच्या दोषसिद्धी बाबत संरक्षण :- जो पर्यंत प्रचलित कायद्यानुसार गुन्हा झाला आहे असे सिद्ध होत नाही तोपर्यंत व्यक्तीला अपराधाकरिता शिक्षा देता येत नाही. एकाच गुन्ह्यासाठी एकापेक्षा जास्त वेळा शिक्षा दिली जाणार नाही. प्रचलित कायद्याने सांगितलेल्या शिक्षा पेक्षा जास्त शिक्षा व्यक्तीला देता येत नाही. स्वतः विरुद्ध साक्ष देण्यासाठी भाग पाडले जाणार नाही. कोणताही दंड कायदा ज्या दिवशी संमत झाला असेल त्या पूर्वीच्या घडणाऱ्या गुन्ह्यासाठी लागू करता येणार नाही.

**कलम २१ जीवित किंवा व्यक्ती स्वातंत्र्य:-**

कायद्याने प्रस्थापित केलेल्या कार्यपद्धती शिवाय कोणत्याही व्यक्तीचे जीवित किंवा व्यक्ती स्वातंत्र्य हिरावून घेतले जाणार नाही. संविधानाच्या कलम २१ मध्ये असे स्पष्ट केले आहे की, कोणत्याही व्यक्तीचे जीवन व स्वातंत्र्य किंवा वैयक्तिक स्वातंत्र्य कायद्याने ठरवून दिलेल्या पद्धती शिवाय अन्य तऱ्हेने हिरावून घेतले जाणार नाही. जसे पोलीस कोठडीतील आरोपीची डी.एन.ए. टेस्टची सक्ती, प्रदूषण, दारूचा व्यवसाय, इत्यादी. **कलम २१(क) शिक्षणाचा हक्क -** भारतीय राज्य घटनेच्या ८६ व्या घटना दुरुस्ती अधिनियम २००२ नुसार शिक्षणाचा मूलभूत अधिकार घोषित करण्यात आलेला आहे. त्याचा समावेश २१(क) मध्ये केला गेला या कायद्यानुसार राज्याने ६ ते १४ वर्षापर्यंतच्या मुलांना मोफत व अनिवार्य शिक्षण दिले जाईल. त्याची अंमलबजावणी १ एप्रिल २०१० पासून करण्यात आली आहे.

**कलम २२ मनमानी अटकेविरुद्ध आणि स्थानबद्धते पासून संरक्षण:-**

राज्यघटनेच्या २२ व्या कलमान्वये पुढील तीन अधिकारांचे संरक्षण प्राप्त झाले आहे. १) अटक केलेल्या व्यक्तीस तात्काळ अटकेची कारणे कळविणे आणि वकिलाचा सल्ला घेण्याचा हक्क असेल. २) आरोपीला न्यायालयात नेण्याचा कालावधी वगळून आरोपीला २४ तासांच्या आत दंडाधिकारी समोर हजर करणे. ३) अटक झालेली व्यक्ती परकीय शत्रू असेल किंवा एखाद्या व्यक्तीला प्रतिबंधक स्थानबद्धता कायद्याखाली अटक झाली असेल तर उपकलम २२(१) आणि (२) अंतर्गत असलेले संरक्षण अशा व्यक्तीस उपलब्ध असणार नाही.

**कलम २३ व २४ शोषणाविरुद्धचा अधिकार:-**

शोषणाविरुद्धचा अधिकार भारतीय राज्यघटनेतील कलम २३ आणि २४ मध्ये शोषणाविरुद्धचा अधिकार प्रदान करण्यात आलेला आहे. मानवी व्यापार, माणसांची वेठ आणि बिगार तसेच अन्य व्यक्तीच्या मजुरीचे प्रकार यांना प्रतिबंध करण्यात आला आहे. सार्वजनिक हितासाठी राज्य देशाची सेवा करणे आपल्या नागरिकांना सक्तीचे करू शकते. मात्र हे करताना केवळ धर्म, वंश, जात किंवा वर्ग अथवा यापैकी कोणत्याही कारणावरून राज्य भेदभाव करणार नाही. **कलम २४ नुसार कारखाने इत्यादीमध्ये बालकांना कामगार म्हणून ठेवण्यास विरोध -** भारतीय संविधानाच्या कलम २४ व्या कलमानुसार १४ वर्षाच्या आतील मुला मुलींना खाणी किंवा धोक्याच्या ठिकाणी काम करण्यास बंदी आहे. परंतु सार्वजनिक हिताच्या दृष्टीने सरकारला लोकांकडून सक्तीचे काम करून घेण्याचा अधिकार दिला आहे. या घटनेने शोषणाविरुद्ध संरक्षणाचा अधिकार दिल्यामुळे सरकारलाही शोषण बंद करण्यासंबंधीचे कायदे करता येऊ शकतात.

**कलम २५ ते २८ धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार:-**

स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये ब्रिटिशांनी भारतातील विविध जाती व धर्मामध्ये भेद निर्माण करून राष्ट्रीय एकात्मता भंग केली होती. या जाणिवेतून घटनाकारांनी धर्म ही व्यक्तीची वैयक्तिक बाब ठरविली आणि नागरिकांना स्वतःच्या इच्छेनुसार कोणत्याही धर्माचा स्वीकार आणि प्रचार

करण्याचा अधिकार प्रदान केला आहे. त्यामुळे भारतीय राज्यघटनेच्या प्रस्ताविकेतील उद्दिष्टांची पूर्तता करता आली. म्हणजेच भारतात धर्मनिरपेक्ष राज्याची निर्मिती करणे सोयीचे झाले.

कलम २६ मध्ये धार्मिक व्यवहाराचे स्वातंत्र्य प्रदान करण्यात आले. संविधानाच्या २६ व्या कलमानुसार कायदा करून राज्यातील धार्मिक संस्थेची चल व अचल संपत्तीची मालकी स्वीकारण्याचा किंवा या संपत्तीची व्यवस्था पाहण्याचा अधिकार आहे. धार्मिक कारणासाठी धार्मिक संस्था विश्वस्त मंडळे स्थापन करून ती स्वखर्चाने चालविणे, अशा संस्थांचा कारभार पाहणे, स्थावर व जंगम मालमत्ता संपादीत करणे व बाळगणे अशा मालमत्तेचे कायद्यान्वये प्रशासन पाहणे इत्यादी अधिकार दिले आहेत.

कलम २७ नुसार धर्म संवर्धनासाठी पैसे गोळा करण्याचे स्वातंत्र्य संविधानाच्या २७ व्या कलमाने कोणत्याही धर्माच्या प्रचारासाठी सक्तीने पैसा गोळा करण्यावर बंदी घालण्यात आली आहे. म्हणजेच कोणत्याही व्यक्तीस असे कर देण्याची सक्ती केली जाणार नाही. त्याचा वापर एखाद्या विशिष्ट धर्माच्या प्रसार किंवा रक्षणासाठी केला जाईल.

कलम २८ नुसार धार्मिक शिक्षण व धार्मिक उपासना यांना उपस्थित राहण्याबाबत स्वातंत्र्य घटनेच्या २८ व्या कलमात असे नमूद करण्यात आले आहे की, पूर्णपणे राज्याच्या निधीतून चालविल्या जाणाऱ्या शिक्षण संस्थांमध्ये धार्मिक शिक्षण देता येणार नाही. राज्याने मान्यता दिलेल्या किंवा राज्याकडून निधी घेणाऱ्या शिक्षण संस्थांमध्ये धार्मिक शिक्षण द्यायचे असल्यास संबंधित व्यक्तींची विद्यार्थ्यांची अथवा पालकांची परवानगी घ्यावी लागेल. त्यांच्या संमतीशिवाय धार्मिक शिक्षणाची सक्ती करता येणार नाही.

**कलम २९ आणि ३० सांस्कृतिक आणि शैक्षणिक हक्क:-**

'भारताच्या कोणत्याही भागात राहणाऱ्या नागरिकांच्या समूह व गटाची जर स्वतःची विशिष्ट भाषा लिपी किंवा संस्कृती असेल तर ती अबाधित राखण्याचा पूर्ण हक्क असेल. त्या समूहाच्या संस्कृती शिवाय इतर संस्कृती त्यांच्यावर लादता येणार नाही.'[५] राज्याकडून चालविल्या जाणाऱ्या किंवा राज्याच्या निधीतून साहित्य मिळणाऱ्या कोणत्याही शैक्षणिक संस्थेत कोणत्याही नागरिकाला केवळ धर्म, वंश, जात, भाषा या किंवा यापैकी कोणत्याही एका कारणावरून प्रवेश नाकारला जाणार नाही.

**कलम ३० नुसार अल्पसंख्यांकांना शैक्षणिक संस्था चालवण्याचा अधिकार** - धार्मिक किंवा भाषिक अल्पसंख्यांकांना आपल्या निवडीनुसार शिक्षण संस्था स्थापन करण्याचा अधिकार घटनेने प्रदान केला आहे. या संस्थांनाही इतर संस्था प्रमाणेच आर्थिक मदत मिळेल तसेच कोणत्याही शैक्षणिक संस्थेत धर्म, वंश, जात आणि भाषा ह्या आधारावर प्रवेश नाकारता येणार नाही.

 ISBN No. 978-93-91097-18-9

कलम ३१ भारतीय राज्यघटनेत पूर्वी हा अधिकार संपत्तीचा अधिकार म्हणून देण्यात आलेला होता मात्र १९७८ च्या ४४ व्या घटना दुरुस्तीने हा अधिकार रद्द करण्यात आला त्यामुळे तो सध्या अस्तित्वात नाही.

**कलम ३२ घटनात्मक उपायांचा अधिकार:-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या अधिकाराला घटनेतील सर्वात महत्त्वाचे स्थान दिले आहे. यासंदर्भात ते म्हणतात की, "घटनात्मक उपायांचा हक्क म्हणजे भारतीय राज्यघटनेचा प्राण आहे."[६] भारतीय नागरिकांना जे मूलभूत अधिकार घटनेने दिले त्यांचे संरक्षण करण्यासाठी घटनात्मक उपायांचा अधिकार नागरिकांना दिला गेला. मूलभूत अधिकारावर झालेले आक्रमण दूर करण्यासाठीच नागरिकाला उच्च अथवा सर्वोच्च न्यायालयाकडे दाद मागता येते. परिस्थितीनुसार सर्वोच्च न्यायालय आदेश किंवा निर्देश किंवा प्राधिलेख जारी करेल. आज घडीला सर्वोच्च आणि उच्च न्यायालयालाच अर्ज किंवा प्राधिलेख जारी करण्याचा अधिकार आहे. राज्यघटनेत पाच प्रकारचे प्राधिलेख आढळतात ते पुढील प्रमाणे,

**बंदी प्रत्यक्षीकरण (Habeas Corpus):-**

**बंदी प्रत्यक्षीकरण म्हणजे शरीर बाळगणे होय.** एखाद्या व्यक्तीस अटक झाली असल्यास अटकेच्या कारणांची वैधता तपासण्यासाठी आणि अशी अटक वैद्य नसल्यास अटक केलेल्या व्यक्तीला मुक्त करण्यासाठी या अर्जाचा उपयोग केला जातो. शासकीय अधिकारी किंवा खाजगी व्यक्तीच्या विरोधात हा अर्ज जारी करता येतो. अटक केलेल्या व्यक्तीस न्यायालयासमोर सादर केले जावे असा याचा अर्थ आहे. हा आदेश न पाळल्यास तो न्यायालयाचा अवमान मानला जाईल. हा अधिकार अवैधपणे अटक वा स्थानबद्धता करण्यात आली असेल तरच लागू होतो.

**परमादेश (Mandamus):-**

**परमादेश म्हणजे आम्ही आदेश देतो असा होय.** सरकार एखादी व्यक्ती किंवा संस्था आपल्या कर्तव्याचे पालन करत नसेल त्यामुळे एखाद्या व्यक्तीवर अन्याय झाल्यास त्या अन्यायाचे परिमार्जन करण्यासाठी त्या हितसंबंध गुंतलेल्या व्यक्तीने असा अर्ज उच्च किंवा सर्वोच्च न्यायालयाकडे करावयाचा असतो. हा अर्ज सार्वजनिक अधिकारी, सार्वजनिक संस्था, महामंडळे, कनिष्ठ न्यायालय, न्यायाधीकरणे किंवा शासन यांनी आपले कर्तव्य पार पाडावे यासाठी करता येतो. म्हणजे हा आदेश नायीक अधिसत्ता सोबत प्रशासकीय आधीसत्तेच्या विरोधात दाखल केला जातो.

**प्रतिषेध(Prohibition):-**

**प्रतिषेध म्हणजे प्रतिबंध करणे होय.** या आदेशाचा उद्देश कनिष्ठ न्यायालय यांना त्यांच्या अधिकार क्षेत्राचे उल्लंघन करण्यापासून प्रतिबंध करण्याचा आहे. परमादेश सक्रिय होण्यासाठी तर प्रतिषेध कृती प्रतिबंधित करण्यासाठी जारी केला जातो. प्रतिषेध आणि उत्प्रेषण हे दोन प्राधिलेख केवळ न्यायिक दिसते. विरोधात जाणारी प्रतिषेध जारी करणे हा वरिष्ठ

न्यायालयाचा विवेक अधिकार नसून त्यांचा हक्क आहे. खटल्याच्या कार्यवाहीत न्यायालय दोषामुळे मूलभूत हक्कावर विपरीत परिणाम होणार असेल तरच सर्वोच्च न्यायालयाचा हा आदेश जारी करता येतो. खटल्याची सुनावणी सुरू आहे पण अंतिम निर्णय जाहीर झालेला नाही अशा वेळीही हा आदेश दिला जातो.

**उत्प्रेषण (Certiorari) :-**

**उत्प्रेषण म्हणजे मंजुरी देणे किंवा माहिती देणे होय.** हा आदेश खटला सुरू असताना अथवा खटल्याच्या निकालानंतर जारी करता येतो. म्हणजेच खटल्यातील निर्णय रद्दबातल करून हा खटला योग्य अधिकार क्षेत्र असलेल्या न्यायालयाकडे किंवा न्यायाधिकरणाकडे हस्तांतरित करण्यासाठी जारी केला जातो. हा अर्ज प्रतिबंधात्मक आणि उपायात्मक अशा दोन्ही स्वरूपाचा आहे.

**अधिकार पृच्छा (Quo-Warrantor):-**

कोणतेही सरकारी किंवा सार्वजनिक पद पात्रता नसतानाही एखादी व्यक्ती त्यासंबंधीची पद भूषवित असेल तर सुरक्षा करण्याचा अधिकार आहे. परंतु अशावेळी अर्जदाराने पुढील दोन अटी पूर्ण केल्या पाहिजेत. ज्या पदाचे बाबतीत वाद चालू असेल आणि त्या पदाची त्या व्यक्तीचे हितसंबंध गुंतलेले असतील, पद कायम स्वरूपाचे असून ते पद प्राप्त करणाऱ्या व्यक्तीला कोणाच्या इच्छेने काढून टाकता येणार नसावे. न्यायालयाने अर्ज मान्य केल्यास बेकायदेशीरपणे व धारण करणाऱ्या व्यक्तीला ते पद सोडण्याची आज्ञा न्यायालय देते.

**कलम ३३ सशस्त्र दले व मूलभूत हक्क:-**

सशस्त्र दले निमसरकारी दले पोलीस दले गुप्तचर यंत्रणा आणि तदनुषंगिक दलांच्या सदस्यांना प्राप्त असलेल्या मूलभूत हक्कावर निर्बंध लादण्याचे किंवा त्यांचा सक्षम करण्याचा अधिकार या कलमांतर्गत संसदेला आहे. असा अधिकार राज्याच्या विधिमंडळाला नसून केवळ संसदेला आहे.

**कलम ३४ लष्करी शासन मार्शल लॉ आणि मूलभूत हक्क:-**

देशात कुठेही लष्करी शासन असेल तर कलम ३४ नुसार त्या भूप्रदेशातील नागरिकांच्या मूलभूत हक्कावर निर्बंध येतात. अशावेळी संसदेने केलेल्या कायद्याला तो कोणत्याही मूलभूत हक्काच्या विसंगत आहे या कारणास्तव कोणतेही न्यायालयामध्ये आव्हान देता येत नाही.

**कलम ३५ ठरावीक मूलभूत हक्कांची परिणामकारकता:-**

काही विशिष्ट मूलभूत हक्कांना परिणामकारकता देण्यासाठी कायदा करण्याचा अधिकार राज्य विधिमंडळ यांना नव्हे तर केवळ संसदेला दिला आहे. या कलमातील तरतुदी ३५(१) नुसार पुढील विषयाबाबत केवळ संसदेला कायदा करण्याचा अधिकार आहे. अ) शासकीय रोजगार किंवा नियुक्त यांसाठी रहिवास ही अट नमूद करणे. ब) अर्ज अभिलेख जारी करण्याबाबत इतर न्यायालयांना सक्षम बनविणे. क) सशस्त्र दल, पोलीस दल वगैरे बाबतीत

मूलभूत हक्क निर्धारित करणे, लष्करी, राजवट दरम्यानच्या कार्यवाही दरम्यान केलेल्या कृतीबाबत कोणतीही व्यक्ती किंवा सरकारी कर्मचाऱ्यांचा बचाव करणे. कलम ३५(२) मूलभूत हक्क अंतर्गत गुन्हा म्हणून घोषित केलेल्या कृतीबाबत शिक्षा नमूद करण्यासाठी कायदा करण्याचा अधिकार संसदेला असेल. उदा. अस्पृश्यता, मानवी व्यापार आणि सक्तीचे श्रम. ३५(३) राज्यघटनेच्या अंमलबजावणी वेळी वर नमूद केलेल्या कोणत्याही विशिष्ट विषयासंदर्भात एखादा कायदा कार्यवाहीत असेल. तर संसद जोपर्यंत त्यामध्ये बदल किंवा दुरुस्ती करत नाही अथवा तो काढून घेत नाही तोपर्यंत त्यात सातत्य राहील.

**संदर्भ :-**

१) जाधव तुकाराम/ महेश शिरापूरकर – भारतीय संविधान आणि राजकारण – युनिक अकॅडमी, पुणे. २०१९ – पृष्ठ क्र. ९

२) राठी शुभांगी – भारतीय संविधानाची ओळख – अथर्व पब्लिकेशन, धुळे. २०१७ - पृष्ठ क्र. ६४

३) जाधव तुकाराम/ महेश शिरापूरकर – भारतीय संविधान आणि राजकारण – युनिक अकॅडमी, पुणे. २०१९ – पृष्ठ क्र. ४२

४) राठी शुभांगी – भारतीय संविधानाची ओळख – अथर्व पब्लिकेशन, धुळे. २०१७ - पृष्ठ क्र. ६६

५) जाधव तुकाराम/ महेश शिरापूरकर – भारतीय संविधान आणि राजकारण – युनिक अकॅडमी, पुणे. २०१९ – पृष्ठ क्र. ४६

६) जाधव तुकाराम/ महेश शिरापूरकर – भारतीय संविधान आणि राजकारण – युनिक अकॅडमी, पुणे. २०१९ – पृष्ठ क्र. ४७

# १२. धर्मनिरपेक्षत: राज्यघटनेचे मूलभूत तत्वज्ञान

**प्रा. के. एच. वाघमारे**
(राज्यशास्त्र विभाग प्रमुख )
कै. डॉ. संकरराव सातव महाविद्यालय कळमनुरी

**प्रस्तावना :-**

भारतमध्ये अनेक जातीचे, धर्माचे, वंशाचे व पंथाचे लोक एकत्र राहतात. विभिन्न संस्कृति व बोलीभाषा असून तरी सुद्धा भारतीय जनतेच्या मना मध्ये एकतेची भावना प्रतिबिंबित होते. कोणत्याही जातीचा अथवा धर्माचा विचरण करता प्रत्यक व्यक्ति राष्ट्राचा, अखंडत्वचा व राष्ट्रीय एकात्मतेचा विचार करून राष्ट्राप्रती बलिदान करण्याचा संकल्प करतो ही राष्ट्राची अंतर्गत शक्ति असून या आधारे आधुनिक भारताची निर्मिती होण्यास मदत होत आहे. भारत मध्ये विविधते मध्ये एकता असून ही शक्ति कोणत्याही बाह्यशक्तीला नष्ट करता येत नाही हे पुन्हा सिद्ध झाले आहे. भारतीय राज्यघटनेच्या तिसऱ्या विभागामध्ये मूलभूत हक्काची तरतूद करण्यात आली आहे. भारतातील प्रत्येक व्यक्तिला धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार प्रदान करून राज्य घटनेने सर्व धर्म समभावाची मूलभूत संकल्पना मान्य केल्यामुळे. भारताने अप्रत्यक्ष पणे धर्म निरपेक्षतेचे तत्व मान्य केले आहे. भारतामध्ये प्रत्येक व्यक्ति आपल्या धर्माचे अनुपालन करून धर्माचा प्रचार व प्रसार करू शकते. परंतु ही कृती इतर धर्माला बाधक ठरणार नाही याची दक्षता प्रत्यकणे घेणे आवश्यक आहे. परस्पर धर्माचा आदर करणे हे प्रत्येकाचे मूलभूत कार्य आहे. तरच जातीय सलोखा निर्माण होऊन राष्ट्रीय एकात्मता निर्माण होईल. स्वातंत्र्य, संरक्षण व सार्वभौमत्व सुरक्षित राहील.

भारतीय राज्यघटनेच्या प्रस्तावणे मध्ये भारत सरकारने दुरुस्ती करून धर्मनिरपेक्षता हा नव्याने शब्दप्रयोग करून भारताला अंतराष्ट्रीय क्षेत्रामध्ये धर्मनिरपेक्ष राष्ट्र म्हणून घोषित केले. १९७६ ला ४२ वी घटना दुरुस्ती करून भारत सरकारने भारत हे निधर्मी राष्ट्र असून भारताला कोणताही धर्म नाही. तसेच धर्म मध्ये हस्तक्षेप केल्या जाणार नाही. धार्मिक कार्यात भारत देश तटस्थ राहील अशी घटनात्मक हामी भारतीय जनतेला देण्यात आली आज भारत देश अंतराष्ट्रीय क्षेत्रामध्ये धार्मिक तत्वज्ञानाला एक वैचारिकता प्राप्त करून दिली. जगातील प्रत्येक धर्म समान असून मानवतावाद हाचखरा प्रत्येक धर्माचा आत्मा आहे.

"धर्मनिरपेक्षता ही संकल्पना अखिल मानव जातीचे तत्वज्ञान आहे. भारतातीलच नव्हे तर जगातील सर्व धर्मांना समान पातळीवर आणनारी संकल्पना आहे. धर्माच्या नावाखाली समाजामध्ये सामाजिक विषमता निर्माण होऊन माणसा-माणसा मध्ये जो भेद निर्माण झालेला होता. तो समाप्त करण्यासाठी या संकल्पनेचा आधुनिक राजकीय वेवस्थेमद्धे उपयोग झालेला आहे. मानवाला धर्माचा अर्थ समजल्या मुळे विश्व बंधुतत्वाची निर्मिती होण्यास मदत झाली आहे. राष्ट्रीय पातळीवर या संकल्पनेने देशाचे अखंडतत्व व राष्ट्रीय एकात्मता निर्माण करून

जातीय सलोखा निर्माण केला आहे. देशातील सामाजिक गुलामगिरी समाप्त करून कायद्याच्या अधिराज्याला सुरुवात झालेली आहे. कोणतेही राष्ट्र एकात्मतेचा बळी देऊन कृतज्ञत्ता व्यक्त करू शकत नाही. त्याचा प्रमाणे कोणतेही व्यक्ति आपल्या धर्माला सोडून जगू शकत नाही हे वास्तव सत्य सर्वसाधारणपणे नाकारता येत नाही. परंतु प्रत्येक व्यक्तीने धर्माला अपेक्षित असणारे वर्तन केल्यास भारत देश विश्वगुरु बनून जगाचे नेतृत्व करू शकते आज भारतीय राजकरणामध्ये धर्माचा अतिरेक होत आहे. संकुचित विचार करून जातीय संघर्ष निर्माण केले जात आहे. धर्माचा योग्य वापर न करता धर्माच्या नावाखाली अनैतिक व अमानवतावादी कृत्य केले जात आहे. धर्मनिरपेक्षतेला धोका निर्माण झालेला आहे. धर्माच्या भिंती निर्माण करून राजकीय हित सध्या केल्या जात आहे. धर्माच्या भिंती पलिकडे असणार माणूस आज आम्हाला दिसत नसल्या मूळे मानवाच्या अस्थितवाला धोका निर्माण झालेला आहे. जातीय सलोखा, राष्ट्रीय एकात्मता, स्वातंत्र्य, संरक्षण व सर्वभौमत्व या संकल्पनेला धोका निर्माण झाल्या मुले मानवी मुल्याचे हाणन होत आहे. वरील संभाव्य समस्या समाप्त करणीयसाठी धर्मनिरपेक्षतेचे तत्वज्ञान माणसाला आत्मसात करणे अनिवार्य झालेले आहे. नसता मानव जातीचा लवकरच धर्माच्या नावाखाली विध्वंस होणार ही नीचित आहे”

**धर्मनिरपेक्षतेचे गृहीते :-**

**१) मानवतावाद :-**

धर्मनिरपेक्षता ही एक आधुनिक राजकीय विचार प्रणाली आहे. या तत्वप्रणाली मध्ये सत्य, नैतिकता, अहिंसा व मानवतावाद या मूल्यांचा समावेश होतो धर्मनिरपेक्षता ही संकल्पना राष्ट्रीय आणि अंतराष्ट्रीय क्षेत्रातील सर्व धर्मांना समान पातळीवर आणणारी असल्यामुळे धार्मिक भेट समाप्त होऊन. विश्व धर्माचे व्यापकं वैशिवक रूप धारण करणारी संकल्पना आहे. मानवतावाद हा प्रत्येक धर्माचा आत्मा असल्यामुळे खऱ्या अर्थाने सामाजिक समानता प्रस्थपित होण्यास मदत झाली आहे. जगातील कोणताही धर्म माणसाला माणूस बनवितो. त्यामूळे श्रेष्ठ अथवा कनिष्ठ या धार्मिक भेदाचा आस्थ होण्यास मदत झाली आहे. महात्मा गांधीणी धर्माचा खरा अर्थ स्पष्ट करून धर्म आणि राजकारण यांना एकत्र करून राजकारणाला शुद्ध रूप देण्यासाठी धर्माची अवशक्ता प्रतिपादन केली आहे. धार्मिकता हा मानसिकतेचा अविभाज्य घटक आहे. त्यामूळे शिक्षणाने आधुनिक नवसमाजाची निर्मिती करण्यास धर्मनिरपेक्षितिची मदत झाली आहे. थोडक्यात धर्मनिरपेक्षता या संकल्पनेचा मुख्य आधार मानवतावाद आहे.

**२) जातीय सलोखा :-**

धर्मनिरपेक्षता ही एक पाशिमात्य संकल्पना आहे. या संकल्पनेचे तीन प्रमुख निकक्ष आहेत.

**१) धर्मिक स्वतंत्र**

**२) हक्काची समान संधी**

३) राजकारणा पासून अलिप्त या निकक्षाचे अनुपालन झाल्यास भारतामध्ये जातीय सलोखा निर्माण होऊ शकतो. भारतामध्ये जातीय संघर्ष होऊन देशाची एकता व एकात्मता धोक्यात आलेली आहे. धर्माचा आपल्या इच्छे नुसार अर्थ लाऊन समाजामध्ये जातीय तेढ निर्माण केल्या जात आहे. निवडणूक आणि जातीय संघर्ष ही समीकरण दिसून येत आहे. भारताची सर्व शक्ति व्यय जात आहे. या शक्तीचा विधायक कार्या मध्ये रूपांतर होणे अवशक आहे. जातीय सलोखा निर्माण करणीयसाठी सर्वधर्म समभावाची अवशक्ता आहे. परस्पर धर्माचा आदर झाल्यास नवभारताची निर्मिती होणे हे अगदी सरल आणि सोपे आहे. भारतामध्ये जातीवादमुळे दहशद्वाद निर्माण होत आहे.

**३) वंशवाद :-**

वंशवाद ही संकल्पना श्रेष्ठ अथवा कनिष्ठ या पद्धतीवर आधाररीत असून आमचा धर्म इतरापेक्षा श्रेष्ठ आहे. आशा प्रकारची मानसिकता आहे. पाश्चिमात्य देशा मध्ये प्राचीन व मध्ययुगीन काळखंडामध्ये वंशवादाचे समर्थन करण्यात आले होते. ग्रीक तत्वज्ञानामद्धे वंशवादाचा विकास झालेला असून त्याचा वाईट परिणाम जगावर झालेला आहे. हे दिसून येते. आधुनिक काळामध्ये हिटलर आणि मुसोलिनी यांनी वंशवादाच्या नावाखाली जगाला नियंत्रित करण्याचा प्रयत्न केलेल्या होता. परिणामी जगाला दुसऱ्या महायुद्धाचे परिणाम भोगावे लागले. वंशवाद या संकल्पनेने धर्माचे विभाजन करून भेद निर्माण केला. वंशवादामुळे माणूस माणसापासून दूर गेलेल्या आहे. धर्मनिरपेक्षता ही संकल्पना वंशवदाला विरोद करून संनतेच्या तत्वाचे अनुपालन करते त्यामूळे जगाला या तत्वज्ञानाना शिवाय परियाय नाही.

**४) विभिन्न धर्म व संस्कृति :-**

भारत हा खंडप्राय देश आहे. भारत ही संताची भूमी असून भारताला गौरवशाली इतिहासाची परंपरा असून भारताची संस्कृति जगामध्ये सर्वश्रेष्ठ असून या संस्कृतीचा मानवी कल्याणासाठी उपयोग करून घेतल्या जात आहे. भारतमध्ये अनेक जातीचे, धर्माचे, पंथाचे व वंशाचे लोक एकत्र राहत असून त्यांची विभिन्न संस्कृति व बोलीभाषा आहे. विविधतेने नटलेल्या लोकांना राष्ट्रीय यतत्वाच्या एका धाग्यामद्धे बांधण्याचे कार्य धर्मनिरपेक्षता या तत्वाने केलेळे आहे. सर्वधर्मांना समान पातळीवर आणून कोणताही धर्म श्रेष्ठ अथवा कनिष्ठ नाही. अशी या संकल्पनेने शिकवण दिलेली आहे. आज प्रत्येक व्यक्ति या तत्व प्रणालीशी एकरूप होऊन आपले वर्तन करत आहे. आज भारतामध्ये संकुचित राष्ट्रवादाचा उदय झालेला असून त्यामूळे देशाच्या अखंडत्ववाला निर्माण झालेला आहे. म्हणून आपली संस्कृती आणि धर्माच्या आधारे मानवी कल्याण हे ध्येय ठेवणे आवश्यक आहे.

**५) एकतेची भावना :-**

कोणतेही राष्ट्र एकतेच्या भावनेवर उभे असून प्रत्येक व्यक्तीच्या मनामध्ये देशाप्रति आस्था निर्माण झाल्यास त्या व्यक्तीच्या मनामध्ये राष्ट्रभक्ती जागृत होऊ शकते . परंतु राष्ट्रभक्तीला आधुनिक काळामध्ये जातीवाद अनैतिक ठरत असून एकतेच्या भावनेला आव्हान

 ISBN No. 978-93-91097-18-9

देत आहे. आधुनिक काळामध्ये धर्मनिरपेक्षता हे तत्वज्ञान सर्व धर्माला पुढे नेणारे आहे. धार्मिक दृष्ट्या उदार दृष्टिकोण ठेवल्यास भरतीयच्या मनामध्ये एकमेका बदल जिव्हाळा निर्माण होऊन एकतेचे प्रतिबिंब राष्ट्रवादामद्धे दिसून येईल. ग्रीक तत्वज्ञाना मध्ये "आम्ही असू तर एक असू नसता काहीच नसू" या वर भरदेऊन सिकंदर यांनी प्राचीन काळी लोकशाहीचे समर्थन केले होते. धर्मनिरपेक्षता ही संकल्पना लोकशाहीला सक्षम करणारी आहे.

**६) सामाजिक समानता :-**

भारतीय समाज व्यवस्था विषमते वर आधारित असून श्रेष्ठ, कनिष्ठ असा भेद केल्या जातो. त्यामूळे समाजामध्ये संघर्ष होऊन जातीय दंगली होत आहे. विशिष्ठ समाजावर सामाजिक गुलामगिरी लादून त्यांच्यावर शारीरीक, आर्थिक व मानसिक अत्याचार केल्या जातो. त्यामूळे देशामध्ये अस्थिर वातावरण निर्माण होऊन राष्ट्राच्या विकास प्रक्रियेवर वाईट परिणाम होतो. व्यक्तिला जे कायदेशीर अधिकार प्राप्त झाले आहेत. त्याचा संकोच होऊन न्याय नाकारला जातो परिणामी कायद्याच्या अधिराज्याला अर्थ राहत नाही. व्यक्तिला निसर्गतदत्त अधिकार नाकारल्यामुळे धर्माचा समाज व्यवस्थेवर वाईट परिणाम होतो. धर्मनिरपेक्षता ही राजकीय संकल्पना व्यक्तिला सर्व क्षेत्रामध्ये समान असे अधिकार प्रदान करणारे तत्वज्ञान आहे. धर्मनिरपेक्षता सामाजिक क्षेत्रामध्ये परिवर्तन आणनारे आहेत.

**७) राष्ट्राचे सार्वभौमत्व :-**

आधुनिक राजकीय व्यवस्थेमध्ये सार्वभौम राष्ट्राचे प्रतिबिंब दिसून येते. प्रत्येक सार्वभौम राष्ट्राला राष्ट्रीय व पराष्ट्रीय धोरण निक्षित करण्याचा अधिकार प्राप्त जल आहे. स्वतंत्र्य, संरक्षण व सार्वभौमत्त्व या तत्वाच्या अधीन राहून प्रत्येक देश आपले परराष्ट्रीय धोरण निक्षित करतो. परंतु सबंधित देशामध्ये जातीय द्वेष, तिरस्कार व मत्सर असल्यास देशाच्या सार्वभौमत्वाला धोका निर्माण होऊन देशाचे स्वातंत्र्य समाप्त होऊ शकते. धर्मनिरपेक्षता हे तत्व देशाच्या स्वातंत्र्याला सक्षम करणारे असून या संकल्पानेमध्ये विधायक कार्याचा वापर करून राष्ट्रीय व अंतराष्ट्रीय पातळीवर कार्य करण्यासाठी अंतर्गत करुणा व प्रेम या शास्वत मूल्याची गरज आहे.

**८) सर्वसमावेशक राजकीय प्रणाली :-**

धर्मनिरपेक्षता ही एक आधुनिक पाश्चिमात्य राजकीय विचार प्रणाली आहे. या प्रणालीमध्ये धार्मिक वास्तववाद शास्त्रीय पद्धतीने मांडून धर्माच्या सीमारेषा नीचित करून व्यक्तीच्या धार्मिक वर्तनाला नियंत्रित करून प्रत्येक धर्म आपल्या धर्मा प्रमाणे असून त्याचा प्रत्येकाने आदर करणे हे शास्त्रीय पद्धतीने निक्षित केलेले आहे. धर्मनिरपेक्षता हा धार्मिक विचार सर्व समावेशक असून या तत्व प्रणालीने चांगले करणे म्हणजेच व्यक्तीचा धर्म आहे. हे सैद्धांतिक विचार स्पष्ट केलेला आहे.

**धर्मनिरपेक्षतेचे तथ्ये :-**

धर्मनिरपेक्षता ही राजकीय प्रणाली कोणत्याही धर्माचे समर्थन करत नाही. अथवा धार्मिक क्षेत्रात तटस्थ भूमिका घेऊन प्रत्येक नागरिकांना धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार प्रदान करणारी तत्व रणाली आहे. या प्रणालीमध्ये मानवी मूल्याचा समावेश होत असल्यामुले या संकल्पनेने धर्माला विधायक स्वरूप प्राप्त करून दिले आहे. आजच्या आधुनिक राजकीय व्यवस्थेमध्ये धर्माच्या नावाखाली भेद केल्या जातो तसेच सामाजिक अन्याय करून राजकारणामध्ये धर्माचा वापर करून जातीय संघर्ष होत आहेत त्यामुळे सर्व धर्मांना समान पातळीवर आनन्यासाठी धर्मनिरपेक्षतेचा स्वीकार करण्यात अला आहे.

१) जातीय संघर्ष

२० सामाजिक विषमता

३) वंशवाद

४) फुटीरवाद

५) संकुचित विचार

६) हक्काचा संकोच

७) राष्ट्रीय नेतृत्वाचा अभाव

८) एकता व एकात्मतेला धोका

९) स्वातंत्र्य, संरक्षण व सार्वभौमत्वाला आव्हान

१०) लोकशाहीला धोका

**निष्कर्ष**

१) एकतेची भावना

२) राष्ट्रवादाला चालना

३) सर्वधर्म समभाव

४) मानवीमूल्य

५) राष्ट्रीय नेतृत्व

६) निधर्मी राष्ट्र

७) कायद्याचे अधिराज्य

८) जातीय सलोखा

९) परस्पर धर्माचा आदर

**ग्रंथसूची**

१) भरताचे संविधान ( मिलिद प्रकाशन वर्धा)

२) तुलनात्मक राजकारण ( साईनाथ प्रकाशन नागपूर- डॉ. एस.जि. देवगांकर)

३) अंतराष्ट्रीय संबंध ( मंगेश प्रकाशन नागपूर- वसंत रायपुरकर)

४) भारतीय राज्यघटना ( के. सागर प्रकाशन पुणे- वी. मा. बाचल)

५) राजकीय विचार प्रणाली ( शुभंम प्रकाक्षण लातूर- संतोष पाटील )

# १३. मानवाधिकार आणि भारतीय महिला

**डॉ.मलदोडे साहेबराव रामराव**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
श्री संत गाडगे महाराज महाविद्यालय, लोहा

**प्रस्तावना**

मानवी अधिकार हे अतिप्राचीन असून मानवाच्या उत्क्रांतीनंतर हे अधिकार प्रत्येक व्यक्तीला आपोआपच प्राप्त होत असतात. मानवी अधिकारांच्या संदर्भात हॉब्स, लॉक, रुसो या विचारवंतानी मानवी अधिकारांच्या उत्पती संदर्भात लिखान केलेले आढळते. मानवांच्या अधिकारांचे संरक्षण करण्यासाठीच राज्य संस्थेची स्थापना करण्यात आली होती. मानवाच्या व्यक्तिमत्व विकासासाठी मानवी अधिकार अतिशय महत्वाचे असतात. महिला हा शब्द २० व्या शतकामध्ये नारीवाद या रुपाने परिचयाला आला. महिलांच्या संदर्भात विभिन्न संस्कृतीमध्ये उल्लेख आलेला आढळतो यात युनान, चीन, भारत या सारख्या सभ्स देशामध्ये महिला अधिकारा संबंधीत अनेक पुरावे मिळतात. इटली मध्ये १४०५ मध्ये क्रिस्टाइन डी यांनी आपल्या ग्रंथात ‘बुक ऑफ द सिटी ऑफ लेडीज‘ यात महिलांना शिक्षण व राजकीय अधिकार मिळवण्यासाठी प्रयत्न केले. महिला मानवी अधिकारांचा अभ्यास करावयाचा झाल्यास जागतिक पटलावरील महिलांचे हक्क मिळवण्यासाठी जे प्रयत्न झाले आहेत यांचा आढावा घेण्यासाठी विकासाच्या दृष्टीने तीन कालखंडात रुपांतर करता येते. यात पहिला विकासाचा टप्पा हा १८३० गृहित धरला जातो रुसोच्या विचारांने प्रभावीत होऊन १७५९-९७ मध्ये मेरी वुलस्ट्रोन यांनी आपल्या ‘ए विंडीकेशन ऑफ द राइट्स ऑफ वुमेन‘ हा ग्रंथ लिहिला या ग्रंथात त्यांनी महिला आधिकारांची मागणी केली. एडम्स अबीगैल १७४४-१८१८ दरम्यान महिलेच्या शोषणा वरील लिखान करुन यांनी गुलामगीरीच्या विरोधात आवाज उठवला. अमेरिकन दासी टूथ सजोनर यांनी १७७९-१८८३ मध्ये उच्च वर्णीयांच्या विरुध्द खटल्यात विजय मिळविला यांनी आपल्या ग्रंथात ‘क्या मै नारी नही हू‘ या ग्रंथात महिलांच्या अधिकारा बाबत लिखान केले. अमेरिकन महिला एंथनी सूसन यांनी १८२० ते १९०६ मध्ये महिलांना मताधिकार मिळावा म्हणून संघर्ष केला, ब्रिटन महिला ब्लैक क्लेमण्टीना यांनी १८५० ते १९२३ दरम्यान महिला व मुली यांची स्थिती सुधारण्यासाठी प्रयत्न केलेले आहेत. या पहिल्या टप्प्यात महिलांनी मतधानाचा अधिकार मिळावा यासाठी प्रयत्न जे ल्यामुळे पश्चिमेकडील राष्ट्रात १९२० पासून महिलांना मतदानाचा अधिकार मिळाला. महिला विकासाचा दुसरा टप्पा हा १९६० ते ८० दरम्यान मानला जातो या टप्प्यात जगातील अनेक महिलांनी मतदानाचा काही राष्ट्रामध्ये अधिकार मिळाल्यामुळे आत्मविश्वास दुनावल्याने या दुसऱ्या टप्प्यात पुरुष्यांच्या प्रमाणे समानता असली पाहिजे यावर भर देण्यात आला समान कामास समान वेतन, कामकाजाच्या ठिकाणी भेदभावला आळा घालणे, गर्भपातला मान्यता मिळाली पाहिजे या संदर्भात विचार मांडण्यात येवू लागले. तिसरा कालखंड १९८० ते १९९० मानला जातो या काळामध्ये महिलांना अधिकार प्राप्त झाले पाहिजेत त्याबरोबरच महिलांची स्वातंत्र ओळख होण्यासाठी कार्य केलेले दिसून येते.

जागतिक पटवलावर मानवी अधिकारांचा अनेक वेळेला संकोच होत असल्याने या अधिकारांचे संरक्षण करण्यासाठी जागतिक पातळीवर एक संस्था असावी असा विचार समोर आला. यातूनच १९४८ रोजी संयुक्त राष्ट्राद्वारे मानवी अधिकारांचा जाहिरनामा प्रकाशित करण्यात आला. स्त्रियांना पुरुष्या प्रमाणे मानवी अधिकार मिळाले पाहिजेत यासाठी जागतिक पटलावर विचार समोर येवू लागले. यातूनच ६ डिसेंबर १९६७ रोजी युनोच्या महासभेने स्त्रियांच्या विरोधातील भेदभावांची समाप्तीची घोषणा केली. १९७५ साली मेक्सिको येथील महिला जागतिक परिषदेत महिलावर होणारे अत्याचार व भेदभाव संदर्भात घोषणा करण्यात आली. १९९३ साली महिला प्रती होणारी हिंसा दुर करण्यासाठी घोषणापत्र पास केले. मानवी म्हणजे असे अधिकार की, जे मानव या नात्याने त्याला जन्मतः हा प्राप्त होत असतात. या संदर्भात लॉक म्हणतो की, मानवाला निसर्गिक अधिकार प्राप्त झालेले असतात यात स्वातंत्र्याचा अधिकार, संपत्तिचा अधिकार व जीविताचा अधिकार हे अधिकार कोणतीही व्यक्ती किंवा संस्था हिरावून घेवू शकत नाही. निसर्गतःहा स्त्री-पुरुष असा कोणताही भेदभाव न करता व्यक्तीला मिळालेले अधिकार आहेत. जगातील महिलांची अर्धी शक्ती असल्याने जगांच्या विकासात महिलांचा मोलांचा वाटा असतो. समाजाच्या व्यवहारात वावरत असतांना स्त्री १८ तास काम करीत असते हे नाकारुन चालत नाही. प्राचीन काळापासून जगातील बहुतेक भागात पुरुष प्रधान संस्कृती असल्यामुळे त्यांना त्यांच्या अधिकारापासून वंचित करण्यात आले होते. समाजामध्ये विद्येची व समृध्दीचे प्रतिक म्हणून त्यांचा वापर करण्यात आला आहे. जगातील काही भागात तर त्यांना भोगवस्तू मानले गेले आहे. एवढेच नसून समाजाने स्त्रियांच्या बाबतीत सतिप्रथा, केशवपन, भृणहत्या, विधवाविवाह इत्यादी अनिष्ट प्रथांच्या माध्यमातून त्यांचे सातत्याने शोषण करण्यात आले आहे. शारीरिक दृष्टीने पुरुष्यांच्या तुलनेत कमजोर व आर्थिक बाबतीत पुरुष्यावर अवलंबून असल्याने त्यांचे प्राचीन काळापासून शोषण होत आले आहे. भारतात रामायनामध्ये श्रीरामाने एका धोब्याच्या सांगण्यावरुन सीतेला अग्नीपरीक्षा द्यावी लागली, महाभारतामध्ये द्रोपदी यांचे झालेले वस्त्रहरज यावरुन स्त्रियांची मानहानी होण्याबरोबर त्यांची शारीरिक पिळवणूक केलेली अनेक पुरावे सापडतात. माहिती तंत्रज्ञानाच्या समकालीन युगात तर महिला पुढील अनेक समस्या निर्माण झ ाल्या आहेत. यात गर्भपात, स्त्रीभृणहत्या, अश्लील चित्रपट फितीमुळे बलात्कारांच्या दिवसेंदिवस वाढत्या घटनामुळे महिलांना जीवन जगणे अशक्य झाले आहे. युनीसेफच्या अहवालानुसार भारतात प्रतिवर्षी जवळपास ५०,००००० लाख भृणहत्या होतात.

**संयुक्त राष्ट्रसंघ व महिलांचे मानवाधिकार :-**

संयुक्त राष्ट्र संघाने महिलांच्या मानवी अधिकाराबाबत सातत्याने प्रयत्न केलेले दिसून येतात. संयुक्त राष्ट्रांच्या चार्टर मध्ये असे स्पष्ट केले आहे की, संयुक्त राष्ट्रसंघाचे आम्ही लोक असा विश्वास व निश्चय करतो की आम्ही भावी पिढीला युध्दांच्या विध्वंसापासून दुर राहून स्त्री-पुरुष्याचे मूलभूत हक्काचे जतन करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जातील. सर्व राष्ट्रांना संयुक्त राष्ट्रांच्या चार्टर नुसार स्त्री हक्कांच्या अधिकारांचे संरक्षण केले जाईल असे स्पष्ट केले आहे. महिलांची परिस्थिती सुधारण्यासाठी चार्टर मधील कलम १,८,१३,५५,६२ मध्ये तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. १० डिसेंबर १९४८ मध्ये घोषीत करण्यात आलेल्या घोषणा पत्रामध्ये असे म्हटले आहे की, सर्व मानव समान आहेत व सर्वांना जीवन जगण्याचा अधिकार आहे व पुरुष्याकडून स्त्रीसोबत कोणत्याही प्रकारचा भेदभाव केला जाणार नाही. यामुळे स्त्री-पुरुष्यामध्ये विषमता,

 ISBN No. 978-93-91097-18-9

शोषण, दुरावा किंवा घृणा निर्माण होईल अशी कोणतीही कृती पुरुष्याकडून केली जानार नाही यांची जबाबदारी घोषणापत्रामध्ये घेण्यात आली आहे. १९६६ मध्ये महिलांच्या संदर्भात सुधारणा करण्यासाठी दोन आयोग स्थापन करण्यात आले त्यात नागरिक व राजकीय तर दुसरा आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक अधिकार, १९७० मध्ये आयोगाच्या सिफारशी नुसार मानवी अधिकारांच्या सभेमध्ये महिला विकासासंदर्भात कार्यक्रम जाहीर करण्यात आला. १९७५ हे वर्ष महिला वर्ष म्हणून घोषीत करण्यात आले. १९७९ मध्ये महिलांच्या विरुध्द केला जाणारा लैंगिक भेदभाव नष्ट करण्याच्या हेतूने एक प्रपत्र तयार करण्यात आले ज्यांचा प्रमुख उद्देश महिला व पुरुष्यामध्ये समानता प्रस्थापित करणे हा होता. संयुक्त राष्ट्रांच्या १९८० मध्ये प्रकाश्ति झालेल्या अहवालात घोषीत करण्यात आले की, महिला ही जागतिक लोकसंख्येच्या क्रमवारीत ५० टक्के आहे व प्रत्येक तासाच्या कार्यामध्ये यांचे स्थान २/३ एवढे आहे.

**भारत व महिला मानवाधिकार :-**

महिलांना आपल्या हक्काबाबत बराच काळ संघर्ष करावा लागला आहे. प्राचीन काळामध्ये भारतात सतीप्रथा, बालविवाह, हुंडाबळी, केशवपन, जरठ विवाह इत्यादी प्रथा परंपरा समाजाने घालून दिल्यामुळे महिलांच्या हक्काला कवडीमोल किंमत होती. १९ व्या शतकात भारतामध्ये पाश्चिमात्यांचे आगमन झाल्याने त्यांच्या संस्कृतीमुळे भारतातील राजाराम मोहन रॉय, महात्मा फुले, केशव कर्वे, कर्मविर भाऊराव पाटील, डॉ. बाबासाहे आंबेडकर इत्यादी समाजसुधारकांनी महिलांच्या समस्याबद्दल जनजागृती केल्यामुळे एक प्रकारची सामाजिक परिवर्तनाची लाठ पसरली यामुळे चार भिंतीच्या आत असलेल्या स्त्रिया शिक्षणाच्या हक्कासाठी रुढीप्रथेच्या जोखडातून बाहेर पडून शिक्षण घेण्यासाठी सरसावलेल्या दिसून येतात. महिलांचे हक्क मिळवण्यासाठी १९१७, १९२६, १९२७ दरम्यानच्या काळात भारतामध्ये भारतीय महिला संघ, भारतीय महिला परिषद, अखील भारतीय महिला संमेलनाची स्थापना करण्यात आली. भारतामध्ये राष्ट्रीय स्तारावर मानवाधिकार लागू करण्यासाठी १९५० मध्ये घटनात्मक उपाय योजना करण्यात आल्या. भारतीय घटनेतच आम्ही भारतीय लोक असा शब्द प्रयोग केल्याने समाविष्ठ केल्याने स्त्री-पुरुष्यांना समानतेचा दर्जा देण्यात आला आहे. राज्यघटनेमध्ये भारतीय नागरिकांना सामाजिक, आर्थिक, धार्मिक, राजकीय न्याय, विश्व बंधुता व राष्ट्रीय एकात्मता प्रस्थापित करण्यासाठी मूलभूत अधिकारांची भर घालण्यात आली आहे. कलम १४ (२) नुसार कायद्यासमोर समानता धर्म, वंश, जात लिंग जन्मस्थान यापैकी कोणत्याही कारणावरुन भेदभाव करता येत नाही. कलम १५ (१)३ नुसार स्त्रिया व मुलासाठी काम करण्यासाठी प्रतिबंध लावू शकत नाहीत. कलम २१ (५) नुसार स्त्रियांना उपजीविकेची साधने, स्त्री-पुरुष्याना समान कामासाठी समान वेतन, महिलांना दिर्घ रजा देणे सामाजिक स्वास्थ लक्षात घेऊन काम देणे, कामगारांच्या आरोग्याची काळजी घेणे इत्यादि सुविधा देण्यात आल्या कलम ३९ (६) नुसार महिलांना प्रस्तुतीच्या काळात मानवी सुविधा उपलब्ध करुन देणे, कलम ४२ (७) नुसार राज्य सर्व नागरिकांसाठी निवार्हवेतनाची सुविधा उपलब्ध करुन देईल. कलम ४३ (८) नुसार भारतातील सर्व नागरिकांना समान नागरी कायदा लागू राहिल. कलम ४४ (९) मध्ये निवडणूक महिलांना मतदान करण्याचा व निवडणुकीस उभा राहिण्याचा अधिकार दिला आहे.

 ISBN No. 978-93-91097-18-9

**महिला कल्याणासाठीचे कायदे:-**

**१. हुंडा प्रतिबंध कायदा:-**

१९६१ च्या कायद्यान्वये हुंडा मागणे आणि हुंडा देणे हा गुन्हा ठरविण्यात आला आहे. कायद्याची अंमलबजावणी प्रभावी होण्यासाठी भारतीय दंड संहितेत प्रस्तुतीच्या काळात मानवी सुविधा उपलब्ध करुन देणे, ३०४ ख आणि ४९८ क ही नवीन कलमे अंतर्भूत करण्यात आली.

**२. महिला संरजज ज ायदा:-**

ज ौटुंबिक छळ महिला संरक्षण प्रतिबंध कायद्या नुसार महिलांना कुटूंबात शारीरिक, मानसिक छळ होत असेल तर त्यातून त्यांचे संरक्षण या कायद्यान्वये करण्यात येते. हा कायदा फक्त पुरुष्याच्या विरोधात लागू होतो यात नुकसान भरपाई देणे, संरक्षण देणे, भागीदारांच्या घरात राहण्याचा अधिकार देणे, वैद्यकीय मदत करणे इत्यादी सुविधा या कायद्यान्वये देण्यात येतात.

**३. अश्लीलता विरोधी कायदा :-**

भारतीय दंड संहितेच्या कलम २९२ ते २९४ अन्वये महिलांशी अश्लील वर्तन ज रज्याऱ्यांना शिक्षा देण्याची तरतुद केली आहे. जाहिराती, पुस्तक, चित्र आदीच्या माध्यमातून महिलांची विटबंना केल्यास १९८७ नुसार अटक वॉरण्ट शिवाय अटक होऊ शकते.

**४. बालविवाह विरोधी ज ायदा :-**

बालविवाह प्रथा बंध करण्यासाठी बालविवाह प्रतिबंक अधिनियम शारदा ॲक्ट १९८९ मध्ये सुधारणा करुन लागू केला. यानुसार मुलीच्या लग्नाचे वय १८ वर्ष तर मुलांचे वय २१ वर्ष करण्यात आले.

**५. कौटुंबिक न्यायालय कायदा :-**

दाम्पत्य व कौटुंबिक कलहाची प्रकरणे एकाच ठिकाणी सोडवण्यासाठी कौटुंबिक अधिनियम १९८४ मध्ये लागू करण्यात आला. कुटूंब न्यायालय नसल्यास तेथील जिल्हा न्यायालयाला हा अधिकार देण्यात आला आहे.

**६. हिंदू विवाह ज ायदा :-**

भारतीय दंड संहितेत कलम १२५ नुसार स्त्रीला पोटगीची मागणी करण्याचा अधिकार देण्यात आला आहे. हिंदु विवाह कायदा १९५५ नुसार अर्ज दाखल केल्यानंतर न्यायालय पोटगी देण्याचा अधिकार देते.

**७. विशेष विवाह ज ायदा :-**

१९५४ च्या तरतुदी नुसार मानसिकदृष्टया सक्षम आणि १८ वर्ष पूर्ण झालेल्या महिलां-ना प्रेम विवाह किंवा आंतरजातीय विवाह केल्यास स्वत: च्या इच्छेनुसार विवाह नोंदनी करु शकते. पुढील काळात काही अडचणी निर्माण झाल्यास न्यायालयाकडे दाद मागता येते.

**८. गर्भलिंग चाचणी :-**

स्त्रीभृणहत्या रोखण्यासाठी गर्भलिंग निदान करणे हा अधिनियम १९९४ च्या कायद्याने जु-हा नोंदवण्यात आला आहे.

**९. सतिप्रथा निवारण अधिनियम :-**

१९८७ च्या अधिनियमा नुसार सतिजाण्यास भाग पाडणाऱ्या विरुध्द शिक्षा करण्यासाठी कायद्याची अंमलबजावणी करण्यात येते.

**१०. स्त्री प्रदर्श-न ज ायदा :-**

या अधिनियम १९७१ अंतर्गत कोणत्याही महिलेची चित्रफित करता येणार नाही त्यांच्या सार्वजनिक नैतिकतेला आघात पोवचेल अशी चित्रफीत प्रकाशित करता येत नाही.

**११. ७३ वी व ७४ वी घटना दुरुस्ती :-**

२४ एप्रिल १९९३ रोजी घटना दुरुस्तीमुळे महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थेत १/३ जागा राखीव ठेवण्यात आल्या आहेत. या निर्णयामुळे महिलांचा राजकारणात निश्चितच सहभाग वाढला आहे.

वरील प्रमाणे महिलांचा दर्जा उंचावण्यासाठी जे कायदे निर्माण करण्यात आले. त्यात शिक्षणांचा अधिकार देण्यात आला एवढेच नव्हे तर सर्वोच्च न्यायालयाने शिक्षणाला मूलभूत अधिकारांचा दर्जा दिल्यामुळे महिलांच्या साक्षरतेत निश्चितच वाढ झालेली दिसून येते.

**१९५१ ते २००१ दशकापर्यंत स्त्री पुरुष साक्षरतेचे प्रमाण**

| जनगणना वर्ष | एकूण साक्षरता | पुरुष साक्षरता | स्त्री साक्षरता | स्त्री-पुरुष साक्षरता |
|---|---|---|---|---|
| १९५१ | १८.३३ | २७.१६ | ८.८६ | १८.३ |
| १९६१ | २८.३ | ४०.४ | १५.३५ | २५.५ |
| १९७१ | ३४.४५ | ४५.९६ | २१.९७ | २३.९८ |
| १९८१ | ४३.५७ | ५६.३८ | २९.७६ | २६.६२ |
| १९९१ | ५२.२१ | ६४.१३ | ३७.२९ | २४.८४ |
| २००१ | ६५.५८ | ७५.८५ | ५४.१६ | २१.७ |

२४ एप्रिल १९९३ रोजी ७३ वी व ७४ घटना दुरुस्ती करुन महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थेत १/३ टक्के जागा राखीव ठेवल्यामुळे महिलांचा राजकारणा विषयीचा आत्मविश्वास दुनावला आहे. महिला स्वत:च्या कर्तृत्वाने आपले नेतृत्व सिध्द करताना दिसून येत आहेत लोकसभेतील महिलांच्या सहभागाचा आढावा घेण्यात आला आहे.

**१९५२ ते २०१४ पर्यंतच्या लोकसभा सदस्य पुरुष व महिला यांचा ताळेबंध**

| इ.सन | पुरुष जासदार संज्या | एकूण | स्त्री जासदार संज्या |
|---|---|---|---|
| १९५२ | ४७५ | ४८९ | १४ |
| १९५७ | ४६७ | ४९४ | २७ |
| १९६२ | ४६० | ४९४ | ३४ |
| १९६७ | ४९२ | ५२३ | ३१ |
| १९७१ | ४९९ | ५२१ | २२ |
| १९७७ | ५२५ | ५४४ | १९ |
| १९८० | ५१६ | ५४४ | २८ |
| १९८४ | ५०० | ५४४ | ४४ |
| १९८९ | ४९९ | ५२९ | २८ |

| | | | |
|---|---|---|---|
| १९९१ | ४७३ | ५०९ | ३६ |
| १९९६ | ५०१ | ५४१ | ४० |
| १९९८ | ५०१ | ५४५ | ४४ |
| १९९९ | ४८५ | ५४३ | ४८ |
| २००४ | ४९८ | ५४३ | ४५ |
| २००९ | ४८४ | ५४३ | ५९ |
| २०१४ | ४८२ | ५४३ | ६१ |

वरील सारणीच्या विश्लेषणावरुन असे स्पष्ट होते की, १९५२ मध्ये १४ महिला खासदार होत्या त्यात भर पडून ही संख्या २०१४ मध्ये ६१ वर पोहचवली आहे. भारतीय राजकारणात महिलांचा सक्रिय सहभाग राहिलेला दिसून येतो. कारण भारतामध्ये महिलेने पंतप्रधान, राष्ट्रपती, राज्यपाल अशा सर्वच पदावर काम केलेले दिसून येते. भारतात महिलांचा सन्मान होताना दिसून येत आहे.

**निष्कर्ष :-**

२१ व्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगामध्ये झपाटयाने जगाची प्रगती होत असली तरी दुसऱ्या बाजूला मानवाधिकारांचे सर्रास पणे उल्लंघन होताना दिसून येते. मानव या नात्यने स्त्री व पुरुष्याला जे अधिकार प्राप्त होत असतात त्यात कोणताही भेदभाव न करता मिळणे आवश्यक असते. जागतिक पटलावर भारताचा विचार करता पुरुष्यांच्या तुलनेत स्त्रियांची स्थिती दयनीय असलेली दिसून येते. १९७९ च्या युनोच्या घोषणापत्रामध्ये स्त्री-पुरुष भेदभाव समाप्त करण्याची घोषणा करण्यात आली. परंतु जो पर्यंत उत्तरदायित्व, निर्णय निर्धारण प्रक्रियेत समान अधिकार, कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी प्रबळ न्यायव्यवस्था सक्रिय होणार नाही तोपर्यंत महिलांच्या हक्काचे शोषण होतच राहिल. भारतामध्ये आज देखील राजकीय प्रतिनिधी महिला असते परंतु महिलांना चार भिंतीच्या आत ठेवून पुरुष आपणच प्रतिनिधी आहोत या तोरात वावरत असतात. पुरुष्याने महिलांना सार्वजनिक जीवनात मुक्त पणे निर्णय निर्धारणाच्या प्रक्रियेत सहभाग नोंदवू दिला पाहिजे. पुरुष प्रधान संस्कृती व रुढीप्रथा यांना झुजारुन दिल्याशिवाय महिलांना समान अधिकार भोगता येणार नाहीत. महिलांच्या दर्जा वाढी संदर्भात जे कायदे केले जात आहेत असे कायदे एका चौकटीत बंदिस्त न ठेवता या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी केली पाहिजे. महिलांनी देजील अश्लीलतेला बळी न पडता प्रभाविपणे आपली भूमिका पार पाडणे आवश्यक आहे. भारतात आज घडीला महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न सुटलेला दिसून येत नाही. पुरुषा प्रमाणेच महिलांनी देखील नैतिक पातळीचे उल्लंघन न करता आपापल्या अधिकाराचा वापर करत असतांना दुसऱ्याच्या अधिकारांचे हनन होणार नाही यांची काळजी घेणे आवश्यक आहे.

**संदर्भ सूची :-**

१. एन.डी.आरोडा, राजनीति विज्ञान, Mc Graw Hill प्रकाशन, पृ क्र. ७.२४
२. महाराष्ट्र टाईम्स दैनिक ८ मार्च २००१, महिला कल्याणासाठी कायदे
३. सिंह ओम प्रकाश, प्राचीन भारतीय राज्य एवं समाज, राम प्रसाद एण्ड सन्स आगरा पृ क्र ५९
४. सिंह बृजमोहन, राजनीति मे महिला आरक्षण, ए जर्नल ऑफ एशिया मुरैना पृ क्र १७

# १४. लोकन्यायालय (Lok Nyayalaya)

**मार्गदर्शक**
**डॉ. विलास आघाव**
उपप्राचार्य व विभागप्रमुख
राज्यशास्त्र विभाग (पदवी व पदव्यूत्तर)
आदर्श महाविद्यालय, हिंगोली 431513

**संशोधक**
**चौधरी संदीप जनार्धन**
हिंगोली - 431513

**सारांश:-**

लोकशाही व्यवस्थेत न्यायाला विशेष महत्व असते. न्याय सहज सुलभतेने मिळावा अशी सर्वसामान्य व्यक्तीची अशी अपेक्षा असते. लोक स्वातंत्र्याला व मूलभूत हक्कांना वंचित होता काम नयेत. विशेषत: सामाजिक आणि आर्थिक विषमता असलेल्या भारतीय समाजाला न्यायसंस्था सहज उपलब्ध झाली पाहीजे. आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांना ती व्यवस्था परवडली पाहिजे. न्यायालयीन निर्णय विना विलंब लागले पाहिजेत. कारण न्यायाला विलंब होणे म्हणजे न्याय नाकारणे हाये असे म्हटले जाते. त्या दृष्टीने न्यायव्यवस्थेतील एक महत्वाची रचना म्हणजे लोकन्यायालय होय.

लोकन्यायालय म्हणजे देशाच्या घटनात्मक न्यायपध्दतीला असणारी, पक्षकारांना परवडणारी, कमी खर्चाची व सुलभ, त्वरीत न्याय मिळवून देणारी न्यायव्यवस्था होय. देशातील सर्व लोकांना विशेषत: दुर्बल, आभासी व न्यायापासून वंचित असलेल्यांना लोक न्यायालयाच्या यंत्रणेचा निश्चित फायदा होतो.

**प्रस्तावना:-**

लोकन्यायालय ही कल्पना भारताला नवीन नाही. प्राचीन काळापासून भारतात न्याय पंचायत ही व्यवस्था चालत आलेली आहे. हा संदर्भ या ठिकाणी आपणास घेता येतो. नवीन स्वरुपात नवीन पध्दतीने लोकन्यायालय स्थापन करण्यात आले. सध्याच्या लोकन्यायालयाची परिस्थिती बदली आहे.

भारतीय राज्यघटनेतील कलम 39 (अ) च्या नुसार "विधी सेवा अधिसत्ता अधिनियमांनी" (Legal Services Authorities Act 1987) लोक न्यायालयाला वैधानिक दर्जा दिलेला आहे. या कायद्यामध्ये लोकन्यायालयाव्दार विवाहांचे निराकरण करण्याबाबत विविध तरतूदीचा समावेश करण्यात आला आहे. समान संधी तत्वाच्या आधारावर समाजातील सर्व घटकांना मोफत व सक्षम विधी/कायदेशीर सेवा पुरविण्यासाठी या अधिनियमाव्दारे विधीसेवा अधिसत्तेची स्थापना करण्यात येते.

1987 चा कायदा त्या संदर्भात मंजूर झाला. 1994 ला तो दुरुस्त करण्यात आला. त्यालाच "वैधानिक सेवा अधिकार कायदा" असे म्हणतात. सर्वोच्च न्यायालयापासून ते कनिष्ठ

सत्र न्यायालयापर्यंतच्या सर्व न्यायालयात अनेक खटले आहेत. त्यांचे निर्णय व्हायचे आहेत. ही संख्या दिवसेंदिवस वाहतच लोकन्यायालयाकडे गेली तर निर्णय लवकर होईल व प्रस्थापित न्यायालयाकडील खटल्यांची संख्या कमी होईल अशी अपेक्षा आहे.

**लोकन्यायालयाचा अर्थ:-**

आपापसातील वाद शक्यतो सामंजस्याने सोडविण्याची पध्दत भारतात प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे. पूर्वी गावांमध्ये उद्भवलेला वाद मिटविण्याचे काम गावामध्ये वयोवृध्द, प्रतिष्ठीत आणि आदरणीय लोक करत होते. याला गावपंचायत असे म्हणत असत. अलीकडे लोकन्यायालय सुरु झालेले असून हे गावपंचायतीचे आधुनिक रुप मानले जाते. लोकन्यायालयामध्ये नि:पक्षपाती, नि:स्पृह तसेच कायदा जाणणाऱ्यांचा समावेश आहे. लोक न्यायालयात येणारी प्रकरणे सामंजस्याने व परस्पर तडजोडीने निकाली काढली जातात.

लोकन्यायालयाची कल्पना भारताचे सरन्यायाधिश **पी.एन. भगवती** यांनी मांडली. “लोकांच्या आपआपसातील दावे, तंटे, तक्रारी संघर्ष हे वेळ व पैसा यांचा अपव्यय टाळून स्थानिक पातळीवर परस्पर सामंजस्याने मिटावेत. या हेतूने लोकन्यायालयाची स्थापना केली गेली.”

**लोकन्यायालयाचे संघटन:-**

न्यायमंडळाच्या सर्व पातळ्यांवर कायदा सेवा समिती असते. तिचे कामकाज त्या त्या पातळीवरील न्यायदानाशी संबंधीत असते. अशी समिती लोकन्यायालय भरवते. ते कोठे व केव्हा भरवायचे याचा निर्णय ती समिती घेते. लोकन्यायालयाचे कामकाज त्या-त्या क्षेत्रापुरते मर्यादीत असते. त्यामुळे त्या क्षेत्रातील लोकांना लोकन्यायालय सहज उपलब्ध होते.

लोकन्यायालयात एक प्रधान न्यायाधिश, व इतर अन्य जाणकार व्यक्ती यांचा समावेश असतो. प्रधान (मुख्य) न्यायाधिश हा न्यायालयीन सेवेत असलेला किंवा निवृत्त झालेला न्यायाधिश असतो. अन्य जाणकार व्यक्ती कोण असाव्यात हे समिती ठरवते. त्या सर्वांचा अनुभव, गुणवत्ता इत्यादी गोष्टी समितीकडून ठरवल्या जातात.

**लोकन्यायालयाचे कार्यक्षेत्र:-**

लोकन्यायालयांचे कार्यक्षेत्र, रचना, कामकाज पध्दती इत्यादी बाबी विधीसेवा प्राधिकरण अधिनियम 1987 नुसार निश्चित करण्यात येतात.

तालुका स्तरावर तालुका विधी प्राधीकरण, जिल्हा स्तरावर जिल्हा विधीसेवा प्राधिकरण, राज्यस्तरावर राज्यविधी प्राधिकरण तर राष्ट्र स्तरावर राष्ट्र विधी प्राधिकरण यांच्याव्दारे लोकन्यायालय भरवले जाते. लोकन्यायालय भरण्याचा वेळ, दिनांक, आणि स्थळ किमान एक महीना अगोदर नाही करण्यात येते.

**लोकन्यायालय स्वरुप/रचना:-**

लोकन्यायालयाचे कामकाज नियमित न्यायालयाप्रमाणे चालते, परंतु नियमित न्यायालयामध्ये केवळ एकच न्यायाधिश कामकाज चालवतात. तर लोकन्यायालयामध्ये

जाणकार अशा तीन व्यक्तींचे मंडळ कामकाज पाहते. या तिघांपैकी एक व्यक्ती कार्यरत असणारे अथवा निवृत्त झालेले न्यायाधिश असते. अन्य दोन व्यक्ती मध्ये कायदे तज्ज्ञ, कायद्याची आवड असणारी, समाजसेवक, एखादी स्त्री असू शकते. विधीसेवा प्राधिकरण 1987 असू शकते. विधीसेवा प्राधिकरण 1987 नुसार लोकन्यायालयाची रचना व कामकाज पध्दत निश्चित करण्यात आलेली आहे.

**लोकन्यायालयाचे स्थळ आणि कालावधी:-**

राज्यातील सर्व न्यायालयात लोकन्यायालये नियमितपणे भरवण्याची सोय आहे. प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी आणि तालुक्याच्या ठिकाणी किमान दोन महिन्यातून एकदातरी लोकन्यायालय भरवण्यात येते. आवश्यकतेनुसार परंतु पूर्व सुचनेने लोकन्यायालय जास्त वेळाही भरवता येतात. तालुका न्यायालयात तालुका लोकन्यायालय, जिल्हा न्यायालयात जिल्हा लोकन्यायालय, उच्च न्यायालयात राज्य लोकन्यायालय भरवले जाते. तालुका व जिल्हा लोकन्यायालयांचे वेळापत्रक मंजूरीकरीता दरवर्षी राज्यविधी सेवा प्राधिकरणाकडे पाठवले जाते. मंजूरी मिळाल्यानंतर लोकन्यायालयाच्या कामकाजाला प्रारंभ होतो. ही लोकन्यायालय विशिष्ट दिवशी भरवली जातात. त्यामुळे यांना हंगामी न्यायालय असेही म्हणतात.

कधी कधी लोकन्यायालय ही शाळा किंवा महाविद्यालयाच्या इमारतीत गरजेनूसार भरवले जातात. ही लोकन्यायालये शक्यतो रविवारी किंवा सुट्टीच्या दिवशी सकाळी 10 ते 06 वाजेपर्यंत किंवा काम संपेपर्यंत चालतात.

**लोकन्यायालयापुढे येणारे खटले:-**

लोकन्यायातयापुढे दिवाणी आणि फौजदारी अशा दोन्हीही प्रकारचे खटले समझोत्यासाठी येवू शकतात. परंतु खुन, दरोडा, बलात्कार, अपहरण, खंडणी वसूली अशा गंभीर गुन्ह्याचे खटले लोकन्यायालयात येत नाहीत. लोकन्यायालयात येण्याऱ्या खटल्यामध्ये मोटर अपघात, भू-संपादन, नुकसान भरपाई, बँक इतर वित्तीय संस्थाच्या वसुलीचा दावा, वैवाहीक संबंधातील वाद इ. समाविष्ट करता येतो.

अशा खटल्या करीता स्वतंत्र लोकन्यायालयाची सोय करता येते. त्याचबरोबर नियमित न्यायालयात प्रलंबीत असणारे खटले सुध्दा लोकन्यायालयात येवू शकतात. प्रसंगी नियमित न्यायालयात दाखल न केलेला खटला सुध्दा या न्यायालयात आणता येईल.

**लोकन्यायालयात खटला आणण्याची पध्दत:-**

ज्या न्यायालयात आपला खटला चालू असेल त्या न्यायालयात साधा अर्ज करुन आपण आपला खटला लोकन्यायालयात आणू शकतो. अशा प्रकारचा अर्ज केल्यानंतर न्यायाधिश दोन्हीही पक्षकाराचे म्हणणे ऐकून घेतात. त्यावेळी हा खटला (दावा) समेटाने (समझोता) ने मिटू शकतो असा त्यांना विश्वास वाटल्यास तो खटला लोकन्यायालयापुढे नेण्याला परवानगी मिळते. तसेच एखादया खटल्यामधील मजकुरावरुन संबंधीत प्रकरण समेटाने

मिटू शकते असा विश्वास न्यायाधिशांना वाटला तरी कोणत्याही अर्जाशिवाय संबंधीत खटला न्यायाधिश सुध्दा लोकन्यायालयाकडे वर्ग करु शकतात. वादातील दोन पक्षांनी ऐकमेकांशी त्या प्रकरणी खाजगी तडजोड केली व त्याला कायदेशीर स्वरुप पाहिजे असेल तर ते लोकन्यायालयात जावू शकतात.

**लोकन्यायालयाचे कामकाज व कार्य:-**

लोकन्यायालय किमान एक महिना अगोदर जाहिर केलेल्या दिवशी ठरलेल्या वेळी, ठिकाणी न्यायालयाचे कामकाज तीन सदस्याचे मंडळ सुरु करते. सुनावणीसाठी येणाऱ्या खटल्यांची यादी अगोदरच जाहिर करण्यात येते. या यादीतील खटले क्रमाक्रमाने सुनावणीसाठी लोकन्यायालयापुढे येतात. अशावेळी पक्षकार स्वत: किंवा आपल्या वकीला मार्फत आपली बाजू मांडतो.

लोकन्यायालयातील न्यायाधिशांना दिवाणी न्यायालयाच्या न्यायाधिशासारखे अधिकार असतात ते पुढीलप्रमाणे

1) न्यायालयात हजर राहण्याविषयी साक्षीदाराला सूचना देवू शकतात. प्रश्न विचारुन त्यांची तपासणी करु शकतात.
2) संबंधीत कागदपत्रे व पुरावे हजर करण्याविषयी सूचना देवू शकतात.
3) प्रतिज्ञापत्रावर पुरावा उपलब्ध करुन घेवू शकतात.
4) न्यायालयाकडून दप्तर मागून घेवू शकतात.

सर्व प्रक्रिया न्यायालयीन असते. न्यायालयाने दिलेला निकाल अंतीम स्वरुपाचा असतो. तो दोन्ही पक्षांना बंधनकारक असतो. लोकन्यायालयाच्या तटस्थ कामकाजामुळे दोन्हीही पक्षकार शक्यतो समेट स्विकारतात. त्या समेटावर दोन्हीही पक्षकार, त्यांचे वकील व लोकन्यायालयाच्या सदस्यांच्या सह्या घेवून निवाडा तयार होतो.

**लोकन्यायालयाच्या निवाड्याची अंमलबजावणी:-**

लोकन्यायालयामधील निर्णय हा न्यायालयाचा पक्का हुकूमनामा मानतात. तो दोन्ही पक्षांना बंधनकारक असतो. वादी-प्रतिवादी या दोघांनी एकमेकांमध्ये मान्य केलेला समजुतीचा मसूदा लोकन्यायालयापुढे तयार करण्यात येतो. त्याचाच निवाडा बनतो. ज्याप्रमाणे नियमित न्यायालयाच्या हुकूमनाम्याची अंमलबजावणी होते त्याचप्रमाणे लोकन्यायालयाच्याही निवाडयाची अंमलबजावणी केली जाते. लोकन्यायालयात होणारा निवाडा हा अंतिम स्वरुपाचा असतो. त्या विरुध्द अपील करता येत नाही.

**लोकन्यायालयामध्ये समेट न झाल्यास:-**

लोकन्यायालयामध्ये आलेल्या खटल्यांपैकी एखादया खटल्याचा वाद मिटत नाही. अशावेळी असे खटले नियमित न्यायालयाकडे परत जातात. नंतर त्या खटल्याचा निवाडा प्रचलित नियमानूसार होतो. जर एखादा खटला नियमित न्यायालयात दाखल करण्यापूर्वी लोकन्यायालयापुढे आला, पण त्याचा निवाडा झाला नाही तर तो खटला नियमित न्यायालयात

पुन्हा दाखल करता येतो. अशावेळी दोन्हीही पक्षांनी यापूर्वी दिलेला तडजोडीचा प्रस्ताव रद्द होतो.

**लोकन्यायालयामुळे होणारे फायदे:-**

1) वेळ व पैसा दोन्हीची बचत होते.
2) लोकन्यायालयाचा निवाडा दोन्ही पक्षकारांना समाधान देतो.
3) लोकन्यायालयाच्या निवाडया विरुध्द अपील नाही. एकाच निर्णयात कोर्ट बाजीतून कायमची सुटका होते.
4) लोकन्यायालयात होणारा निवाडा हा आपसात समजुतीने होत असल्याने ना कुणाचा जय होतो ना कुणाची हार.
5) लोकन्यायालयात समेट झाला नाहीतर परंत नियमित न्यायालयात खटला परत नेण्यात कोणताही अडथळा नाही.
6) खटल्याचा निर्णय ताबडतोब मिळतो.

**मूल्यमापन:-**

न्यायालयीन सक्रियतेच्या अनुषंगाने लोकन्यायालयाची भूमिका महत्वाची आहे. न्यायालयावरील कार्याचा बोजा कमी होतो.

न्यायालयात अनिर्णीत असलेली अनेक प्रकरणे लोकन्यायालयात समेटाने मिटवली जातात. लोकन्यायालयात दोन्ही पक्षकारांना व्यावहारिक तडजोड सूचवली जाते. त्यामुळे दोन्हीही पक्षकारांचे समाधान होते. नियमित न्यायालयात प्रकरण दीर्घकाळ अनिर्णित राहण्याने होणारा त्रास, शत्रुत्व, अनिश्चितत्तता, कडवेपणा यापासून पक्षकारांची सुटका होते.

लोकन्यायालयामुळे एकमेकांमधील वैरभाव संपून सदभाव निर्माण होतो. लोकन्यायालयात प्रकरणाचा निवाडा करण्याकरीता कोणतीही फी आकारली जात नाही. वकील न्यायालयीन अधिकारी सामाजिक कार्यकर्ते, सामाजिक संस्था यांच्या सहभागामुळे लोकन्यायालयाला एक वेगळाच दर्जा व महत्व प्राप्त झाले आहे.

**संदर्भसूची:-**


1) बी.बी. पाटील (2002), भारतीय शासन आणि राजकारण, फडके प्रकाशन, कोल्हापूर.
2) कृष्णा भोगे (2013), भारतीय राज्यघटना, साकेत प्रकाशन, पुणे.
3) डॉ. शं.ना नवलगुंदकर (2008), राज्यशास्त्र, नरेंद्र प्रकाशन, पुणे.
4) वाईकर जी.व्ही. (2009), राज्यशास्त्र, शेठ पब्लिकेशन, मुंबई.
5) डॉ. राजशेखर सोलापुरे आणि प्रा. डी.एच. मेहत्रे (2012), भारतीय शासन आणि राजकारण, अरुणा प्रकाशन, लातूर.
6) डॉ. बी.एल. फडिया, राजनीति विज्ञान, प्रतियोगीता साहित्य, आग्रा.
7) संजय नाथे (2012), भारतीय राज्यघटना व पंचायतराज, नाथे पब्लिकेशन, नागपूर.
8) रंजन कोळंबे, भारतीय राज्यघटना आणि प्रशासन, भगीरथ प्रकाशन, पुणे .

# १५. भारतीय संघराज्याचे बदलते प्रारूप

**प्रा .डॉ.अर्जुन गंगाराम येरगे**
राज्यशास्त्र विभागप्रमुख
श्री संपतराव माने महाविद्यालय खानापूर
जिल्हा सांगली.मो.९६३७४६२६४७

---

**गोषवारा-**

भारतीय संविधानाने एकात्म शासनाचे लक्षणे असणारी संघात्मक शासन व्यवस्था भारतामध्ये स्वीकारली . भारत हा विविधतेने नटलेला देश आहे त्यामुळे या विविधते मध्ये एकता प्रस्थापित करायचे असेल तर भारतीय संघराज्यात केंद्राकडे जास्तीचे अधिकार असले पाहिजेत हा हेतू संविधान निर्मात्यांचा होता. स्वातंत्र्यप्राप्ती पासून आजपर्यंत पाहिले तर भारतीय संवादाचे प्रारूप बदलत गेलेले दिसून येते. 1989 पर्यंत संघवादाचे एकात्मता रूप दिसून येते .1989 नंतर आघाडी सरकारांचा उदय झाला, प्रादेशिक पक्षांचे महत्त्व वाढले व 1989 ते 2014 पर्यंत भारतीय राजकीय व्यवस्थेत सौदेबाजी संघवादाचे प्रारुप दिसून येते. 2014 नंतर भारतीय जनता पार्टीचे सरकार नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सत्तेत आले. सत्तेत आल्यानंतर योजना आयोग बरखास्त करून नीती आयोगाची स्थापना केली व सहकारी संवादाच्या माध्यमातून केंद्र राज्य संबंध अधिक चांगले बनवू असे सांगितले गेले. परंतु 2014 ते 2021 या काळातील केंद्र सरकारची वाटचाल पाहिली तर केंद्र सरकारची एकाधिकारशाही दिसून येते. सी .बी. आय, ई .डी, इन्कम टॅक्स डिपारमेंट, एनसीबी ,राज्यपाल इत्यादीं यंत्रणांचा गैरवापर करून केंद्र सरकार विरोधी पक्षाचे सरकार असलेल्या घटक राज्यांमध्ये अस्थिरता निर्माण करू पाहत आहे .यातून केंद्र राज्य संबंध अधिक बिघडत चालले आहेत .त्यामुळे भारतीय संघराज्य शासन यशस्वी करायची असेल तर सहकारी संघवादाचे प्रारूप प्रस्थापित करणे गरजेचे आहे.

**मुख्य शब्द-** संघराज्य, निति आयोग, एकात्म संवाद, सहकारी संघवाद, सौदेबाजी संघवाद, प्रादेशिक पक्ष ,आघाडी शासन.

**प्रास्ताविक:-**

भारतीय संघराज्याचे स्वरूप जाणून घेण्यासाठी संघराज्य म्हणजे काय ते पाहणे आवश्यक आहे. संघराज्यात्मक शासन व्यवस्थेमध्ये राज्याची सत्ता केंद्र आणि राज्य सरकारांमध्ये विभागलेली असते. या दोन्ही सत्तांचे केंद्र संविधान असते. संविधानानुसार केंद्रा आणि घटक राज्य सरकारची सत्ता पूर्णपणे स्पष्ट केलेली असते आणि कोणीही इतरांच्या सत्तेत हस्तक्षेप करू शकत नाही. राष्ट्रीय आणि प्रादेशिक सरकारांना आपल्या अधिकाराचा वापर आपापल्या नागरिकांवर करता येतो तसेच नागरिकांना केंद्र आणि घटकराज्य सरकारांच्या प्रति

दुहेरी निष्ठा ठेवावी लागते.federation हा शब्द मूळचा लॅटिन शब्द fedous पासून तयार झालाय. त्याचा अर्थ करारनामा किंवा करारबद्ध होणे असा होतो .

**प्रा. गार्नर** यांच्या मते- "राष्ट्रीय ऐक्य आणि सामर्थ्य यांची प्राप्ती करण्यासाठी दोन किंवा दोनपेक्षा जास्त स्वायत्त राज्याने स्वतःचे वैशिष्ट्य किंवा वेगळेपण कायम राखून एक मध्यवर्ती सरकार निर्माण करणे आणि ह्या मध्यवर्ती सरकारला विशिष्ट अधिकार लिखित कराराद्वारे सोपविणे आणि करारात समाविष्ट नसलेले इतर अधिकार आपल्याकडेच ठेवणे ह्या उद्देशाने निर्माण केलेले संयोजन किंवा संघटन म्हणजे संघराज्य होय" **प्रा. डायसी** च्या मते – "राज्यांच्या हक्कांना बाधा न येता राष्ट्रीय ऐक्य आणि सामर्थ्य याची समप्रमाणात प्राप्ती व्हावी म्हणून दोन पेक्षा जास्त राज्यांनी निर्माण केलेले संघटन म्हणजे संघराज्य होय".

**प्रा.के सी व्हीयर** यांच्या मते-" संघात्मक शासनात केंद्राने घटक सरकारची सत्ता पूर्णपणे व स्पष्टपणे विस्तारित केलेली असते आणि प्रत्येक सरकार आपल्या अधिकाराच्या बाबतीत स्वतंत्र असते".

**एन्सायक्लोपीडिया**- "संघात्मक शासन व्यवस्था म्हणजे भिन्नभिन्न असणाऱ्या राजनीतिना एका विशिष्ट राजनीतीमध्ये संघटित आणि एकताबद्द करणारी व्यवस्था होय".थोडक्यात वेगवेगळी घटक राज्य किंवा प्रदेश आपली प्रादेशिक अस्मिता व कार्यकारी स्वायत्तता कायम ठेवून एकाच राज्यव्यवस्थेत एकत्र येतात तेव्हा त्यास संघराज्य व्यवस्था असे म्हणतात.

**भारतीय संघराज्य व्यवस्था-**

भारतीय राज्यघटनेत संघराज्य हा शब्द कोठेही आढळत नाही. भारतीय राज्यघटनेच्या पहिल्या कलमात भारत हा एक राज्यांचा संघ असेल असे म्हटले आहे .भारतीय राज्यघटनेत संघराज्य ऐवजी राज्यांचा संघ हा शब्द हेतुपुरस्सर टाकलेला आहे. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते जरी भारत हे संघराज्य वाटत असले तरी हा संघ त्यात सम्मिलित झालेल्या प्रदेशाच्या समझोत्याचा परिणाम म्हणून निर्माण झालेला संघ नाही. त्यामुळे या संघातून बाहेर पडण्याचा अधिकार कोणत्याही घटक राज्याला नाही. याचा अर्थ भारत एकात्म राज्य आहे असा नाही .वर्तमान स्थितीत संघराज्यातील सरकार पेक्षा भारतातील केंद्र सरकारला जास्तीचे अधिकार व घटक राज्यावर नियंत्रण ठेवण्याची शक्ती प्राप्त झालेली असले तरी सर्वसाधारण भारताची राजनीतिक व्यवस्था संघात्मक राज्या सारखे आहे. भारतीय संविधानाने मध्यवर्ती सरकार आणि घटक राज्यांची शासन यंत्रणा अशी दुहेरी शासन पद्धती स्वीकारलेली आहे तसेच अधिकारक्षेत्राची विभागणी ,लिखित व परिद्रढ राज्यघटना आणि सर्वोच्च न्यायालय ही संघराज्याची वैशिष्ट्ये भारतीय शासन पद्धतीत आढळतात.

1950 मध्ये बनविलेल्या संविधानात राज्यांची अ. ब. क. ड. अशी वर्गवारी केली होती. अ गटात 1947 पूर्वीच्या इंग्रजी अमलाखालील प्रांत होते तर ब गटात पूर्वीच्या संस्थानांनी बनविलेले घटक राज्ये होती त्याचे प्रमुख पूर्वीचे संस्थानिकच होते नंतर ही संस्थाने

भारतात विलीन झाली होती. क गटात पूर्वीच्या चीफ कमिशनर प्रमुख असलेले लहान प्रांत होती. ब व क गटाची स्वायत्ता अ गटापेक्षा कमी होती. ड गटातील प्रदेश केंद्रशासित होते. ही वर्गवारी 1956 मध्ये भाषावार प्रांतरचना झाल्यावर रद्द झाली. भाषेच्या आधारावर नव्या घटक राज्यांची निर्मिती झाली. त्यानंतर च्या काळात अनेक घटक राज्यांची निर्मिती झाली .1966 मध्ये पंजाब राज्याचे विभाजन होऊन हरियाणा, पंजाब व हिमाचल प्रदेश असे तीन राज्ये अस्तित्वात आली . वांशिक आधारावर वेगळया घटक राज्याच्या मागणीवरून चळवळी होऊन आसाम मधून नागालँड, मेघालय व आसाम असे तीन घटक राज्य निर्माण . शिवाय गोवा अरुणाचल प्रदेश या केंद्रशासित प्रदेशांना घटक राज्याचा दर्जा मिळाला. पुढे बिहारमधून झारखंड, उत्तर प्रदेशमधून उत्तरांचल, मध्य प्रदेशातून छत्तीसगड, अलीकडे आंध्र प्रदेशातून तेलंगणा हे घटक राज्य बनले व जम्मू काश्मीर चा घटक राज्याचा दर्जा कडून जम्मू काश्मीर आणि लदाख अशा दोन केंद्रशासित प्रदेशाची निर्मिती करण्यात आली . सध्या भारतीय संघराज्यात 28 घटक राज्य व 8 केंद्रशासित प्रदेश आहेत.

केंद्र शासन कायदा करून घटक राज्याचे विभाजन किंवा नव्या नव्या राज्याची निर्मिती करू शकते त्यासाठी खास पद्धतीचे किंवा घटना दुरुस्ती ची गरज नाही एका अर्थाने घटक राज्याचे अस्तित्वच केंद्र शासनाच्या मर्जीवर अवलंबून आहे. या घटक राज्याची वेगळी संविधाने नाहीत सर्वांसाठी एकच संविधान आहे. केंद्राचे किंवा घटक राज्याच्या कायद्यापेक्षा संविधान श्रेष्ठ आहे याचा स्पष्ट उल्लेख संविधानात आहेत , म्हणजे त्यांनी केलेले कायदे संविधानाशी विसंगत असल्यास ते रद्द ठरवण्याचा अधिकार सर्वोच्च व उच्च न्यायालयांना मिळालेला आहे .ही न्यायालय तटस्थ व स्वतंत्र असावी तशी संविधानात तरतूद आहे .न्यायाधीशांना राष्ट्रपतीने निवडलेले असते तरी त्यांना नोकरीवरून सहजासहजी काढता येत नाही त्यांचे वेतन भत्ते कमी करता येत नाहीत.

संघराज्याचे संविधान दुरुस्तीच्या प्रक्रियेत घटक राज्य व केंद्र शासन दोघांचाही सहभाग असायला हवा हे तत्त्व भारतीय संविधानात अंतर्भूत आहे मात्र संविधानाच्या ज्या भागाशी घटक राज्याचा संबंध आहे त्या पुरतीच ही तरतूद आहे .अशा तरतुदी उदाहरणात - विषयाचे विभाजन ,राष्ट्रपती पदाविषयी तरतूद इत्यादी विषयक दुरुस्ती करायची झाल्यास त्यास संसदेच्या हजर असलेल्या 2/3 सदस्यांची संमती व अर्ध्यापेक्षा जास्त घटक राज्याची मान्यता लागते . बाकीच्या तरतुदी संदर्भात संसद साध्या बहुमताने व दोन तृतीयांश बहुमताने घटना दुरुस्ती करू शकते त्यासाठी घटक राज्यांची संमती लागत नाही. उदा - मूलभूत हक्क

राष्ट्रपती निवडणुकीच्या प्रक्रियेत लोकसभा सदस्या प्रमाणेच घटक राज्यांचे विधानसभा सदस्य ही भाग घेतात परंतु सर्व घटक राज्यांना समान मते नाहीत ती त्यातील लोकसंख्येच्या प्रमाणात आहेत. तसेच घटकराज्यांना संसदेच्या राज्यसभा या ग्रहास समान प्रतिनिधित्व नाही . त्यांच्या प्रतिनिधींची संख्या सुद्धा त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात आहे. राज्यसभेला लोकसभेच्या तुलनेत कायदे व वित्त विधेयक संमत करण्याच्या बाबतीत फार कमी

 ISBN No. 978-93-91097-18-9

अधिकार आहेत. त्यास मंत्रिमंडळाविरुद्ध अविश्वास दर्शक ठराव संमत करण्याचा अधिकार नाही .फक्त दोन बाबतीत राज्यसभेचे विशेषाधिकार आहेत. राज्यसभा राज्य सूचीतील एखादा विषयावर एका वर्षासाठी केंद्रास कायदा करण्यासाठी देऊ शकते तसेच राज्यसभा अखिल भारतीय सेवा निर्माण करू शकते.

भारताच्या संविधानातील केंद्र व घटक राज्य यांच्यातील कार्यक्षेत्राचे केलेले विभाजन वैशिष्ट्यपूर्ण आहे . त्यात तीन सूची आहेत. पहिल्या केंद्र सूचित 99 विषय असून त्यावर फक्त केंद्र सरकार कायदे करू शकतात. दुसरा राज्य सूचित 61 विषय असून त्यावर घटक राज्य कायदे करू शकतात .समवर्ती सूचीत ५२ विषय आहेत त्यावर केंद्र व राज्य दोघेही कायदा करू शकतात, मात्र अशा कायद्या पैकी केंद्र सरकारने केलेला कायदा अधिक श्रेष्ठ मानला जातो .ज्या विषयाचा उल्लेख तीनही सूचित नाही असे शेषाधिकार केंद्राकडेच आहेत . तसेच दोन राज्यांनी विनंती केल्यास केंद्र त्यांना हव्या त्या असलेल्या राज्य सूचीतील विषयांवर कायदे करू शकते परंतु असे कायदे ज्या घटक राज्यांनी त्यांना मान्यता दिली आहे त्यांनाच लागू होतात. आणीबाणीच्या काळात केंद्रीय संसदेस राज्य सूचीतील विषयावर कायदे करण्याचा अधिकार प्राप्त होतो. केंद्र सरकार राज्य सरकारास प्रशासकीय आदेश देऊ शकते गरज भासल्यास राज्याच्या कारभारात हस्तक्षेप करू शकते याचा अर्थ आणीबाणीच्या काळात संघराज्य व्यवस्था तहकुब होऊन भारत एकात्म शासन असल्यासारखे कार्य करतो पण त्याला संसदेची मान्यता घ्यावी लागते.

कलम 356 नुसार एखाद्या घटक राज्यातील शासन संविधानानुसार चालवणे अशक्य झाल्यास राष्ट्रपती तेथील विधानसभा तहकूब किंवा विसर्जित करू शकतो .तेथील मंत्रिमंडळ बरखास्त करून राज्याचे शासन केंद्र सरकार चालवतो .त्यासही संसदेची मान्यता आवश्यक असते. त्याचप्रमाणे घटक राज्याचे राज्यपाल राष्ट्रपती कडून (केंद्र सरकारकडून) नेमले जातात त्यांना काढून टाकण्याचा किंवा त्यांची बदली करण्याचा राष्ट्रपतीस अधिकार आहे. विधानसभेने संमत केलेले विधेयक राज्यपाल राष्ट्रपती च्या विचारासाठी राखून ठेवू शकतो .त्यांना संमती नाकारू शकतो .वेळोवेळी राष्ट्रपतीस घटक राज्याच्या शासनाबद्दल अहवाल पाठवू शकतो. एका अर्थाने तो घटकराज्यात केंद्राचा हस्तक म्हणून कार्य करतो.या वरील सर्व घटनांचा आढावा घेतल्यानंतर असे दिसून येते की भारतीय संघराज्य हे केंद्राकृषी संघराज्य आहे. परंतु स्वतंत्र प्राप्ती पासून आज पर्यंत भारतीय संघवादाचे प्रारूप बदलत गेलेले दिसून येते .

**भारतीय भारतीय संघवादाचे प्रारूप:-**

१. सहकारी संघवादाचे प्रारुप

२. सौदेबाजी संघवादाचे प्रारूप

३. एकात्म संघवादाचे प्रारूप

**१. सहकारी संवादाचे प्रारूप:-**

देशाचा आर्थिक विकास घडून येण्यासाठी त्याच्या निरनिराळ्या भागात किमान सहकार्याची गरज आवश्यक असते .विशेषत ज्या संघराज्यात विकासाशी निगडित विषय घटक राज्यांच्या कक्षेत आहेत ज्याच्या योग्य विकासासाठी घटक राज्यात परस्पर आणि संघराज्या बरोबर , समायोजनाची गरज भासते. भारतासारख्या विकसनशील देशात तर हे अधिकच जाणवते. ही गरज भागविण्यासाठी संविधान निर्मात्यानी संविधानात काही राजकीय संस्थांची तरतूद केली ज्याचा उद्देश केंद्र –राज्य परस्पर सहकार्य प्रस्थापित करणे हा होता .उदा – नियोजन आयोग , वित्त आयोग .

“जेव्हा घटक राज्याच्या कार्यकक्षेत असणाऱ्या विषयात विकास साधण्यासाठी संस्थात्मक पातळीवर सहकार्य व समायोजन केले जाते तेव्हा त्यास सहकारी संघराज्यवाद असे म्हणतात” **ए .एच .बर्च** यांनी भारतीय संघवादास सहयोगी संघवादाची संज्ञा दिलेली आहे. भारतात घटनेद्वारे सहयोगाचे अनेक संस्थांची व्यवस्था केलेले आहे. त्यामध्ये भारतीय वित्त आयोग, नियोजन आयोग (निती आयोग) अनुसूचित जाती जमाती आयोग, आंतरराज्य समिती, अखिल भारतीय सेवा, भारतीय लोकसेवा आयोग, नियंत्रक व महालेखापरीक्षक, सर्वोच्च व उच्च न्यायालय ,मुख्यमंत्री व इतर मंत्र्यांची सभा-संमेलने तसेच कायद्याने निर्मित केंद्रीय संस्था त्यामध्ये विद्यापीठ अनुदान आयोग, क्रीडा प्राधिकरण, कावेरी खोरे प्राधिकरण, अखिल भारतीय शिक्षण समिती अशाप्रकारे औपचारिक आणि अनौपचारिक संस्थांचे एक जाळेच भारतीय संघराज्यात निर्माण झालेले आहे .

**2. सौदेबाजी संघवादाचे प्रारूप:-**

दुसऱ्या महायुद्धानंतर आशिया आफ्रिका खंडातील नवोदित राज्यांमध्ये पक्ष पद्धतीचा विकास झाला. काही पक्ष राष्ट्रीय स्तरावर तर काही राजकीय पक्ष क्षेत्रीय आणि प्रादेशिक स्तरावर निर्माण झाले. त्यामुळे केंद्रात सत्ताधारी होणाऱ्या आणि घटक राज्यांमध्ये सत्ताधारी होणाऱ्या राजकीय पक्षांमध्ये सौदेबाजी चा प्रारंभ झाला. १९८९ नंतर भारतामध्ये आघाडी शासनाचा उदय झाला .प्रादेशिक पक्ष केंद्रीय सत्तेमध्ये सहभागी होऊन केंद्राबरोबर सौदेबाजी करू लागले .पंडित नेहरूंच्या काळातील घटक राज्याचे काही मुख्यमंत्र्यांची सौदेबाजीची स्थिती मजबूत होती. उदाहरणात बी.सी रॉय , कामराज, प्रतापसिंह कैरो , इत्यादी. पुढे भारतात अकरावी व बारावी आणि तेराव्या लोकसभा निवडणुकीनंतर चंद्रबाबू नायडू तेलुगु देसमचे प्रमुख, ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेस, नवीन पटनाईक बिजू जनता दल, ओम प्रकाश चौटाला हरियाणा, करुणानिधी तामिळनाडू, प्रकाशसिंह बादल-पंजाब यांचे प्रादेशिक पक्ष केंद्रात सौदेबाजी करू लागले.

**3. एकात्मक संघवादाचे प्रारूप:-**

मागील दशकांतील संघात्मक शासन प्रणालीचा अभ्यासावरून आपणास असे लक्षात येते की आज एकात्मक संघवाद ही प्रवृत्ती जास्त प्रबळ झाली आहे. संरक्षण, अंतर्गत शांतता व सुव्यवस्था यावरून केंद्रास जास्तीचे अधिकार मिळत गेले व केंद्र सरकार घटक राज्य

 ISBN No. 978-93-91097-18-9

पेक्षा प्रबळ बनत गेले. परिणामी घटक राज्यांना दुय्यम स्थान मिळू लागले. तसेच भारतात एकात्मक संघवादाचे प्रारूप घटनेच्या अंतरंगात आढळते. एकेरी नागरिकत्व ,एकीकृत न्याय व्यवस्था, अखिल भारतीय सेवा, राज्यपालाची नियुक्ती, राष्ट्रपतीचे संकटकालीन अधिकार, आर्थिक दृष्ट्या घटक राज्य केंद्रावर निर्भर , निती आयोग ,वित्त आयोग, पंतप्रधानांचे प्रभावी नेतृत्व यातून एकात्म संघवाद आढळतो.

**सारांश:-**

स्वतंत्रप्राप्ती पासून जवळपास 40 वर्षापर्यंत केंद्र व राज्यात कॉंग्रेस पक्षाचा एकाधिकार आढळतो. अशा एक पक्ष प्रधान व्यवस्थेत संपूर्ण व्यवस्था केंद्राच्या हातात एकवटलेली दिसते. 1989 नंतर आघाडी सरकारचा उदय झाला व अनेक घटक राज्यात प्रादेशिक पक्षाची सरकारे निर्माण झाले .त्यामुळे एकात्मक सांघवादाचे रूपांतर सौदेबाजी संघवादात झालेले दिसते. परंतु अलीकडे केंद्रात पंतप्रधान नरेंद्र मोदीचे बहुमताचे सरकार आले व ज्या राज्यात बीजेपीचे सरकारे आहेत त्या ठिकाणी केंद्राची सत्ता असलेली दिसून येते आणि पुन्हा एकदा भारतीय संघवाद एकात्मते कडे झुकलेले आपला दिसून येतो.परंतु भारतीय राज्यघटने द्वारे एकात्म संघराज्य निर्माण करण्यात आले असले तरी ज्या उद्देशाने घटनाकारांनी एकात्म शासनाची लक्षणे असलेले संघराज्य भारतामध्ये स्वीकारले. त्याचा गैरवापर राजकीय स्वार्थासाठी मोठ्या प्रमाणात होऊ लागला . भारताला खऱ्या अर्थाने जर विकसित देश बनायचे असेल तर केंद्र आणि घटक राज्य यांनी परस्पर सहकार्याने कार्य कार्य केले पाहिजे. संविधान निर्मात्यांना अपेक्षित असणारा संघराज्य प्रस्थापित करायचं असेल तर सहकारी संघवादाचं प्रारूप प्रस्थापित करणं गरजेचे आहे.

# १६. भारतीय संविधानातील मुलभूत अधिकाराची फलनिष्पत्ती

**सत्यवान नामदेव रेपे**
(संशोधक विद्यार्थी)
राज्यशास्त्र विभाग
स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड.

**प्रस्तावना :-**

राज्यघटना म्हणजे असा दस्ताऐवज ज्यामध्ये शासनाचे स्वरुप तसेच नागरिक आणि शासन यांच्यातील संबंधाची निश्चीती आणि वर्णन करणा-या कायघांचा आणि नियमांचा समावेश असतो. या नुसार राज्यघटना दोन प्रमुख बार्बीशी सबंधित असते विविध स्तरांवरील शासनामधील संबंध व शासन व नागरिक यांमधील संबंध राज्यघटना ही शासन संस्थेचा मुलभुत कायदा असते घटनेत शासनसंस्थेने साध्य करावयाची उद्दिष्टये दिलेली असतात. तसेच तीच्यात घटनात्मक आराखडयाची म्हणजेच विविध स्तरांवरील शासकीय संरचनेची आणि अंगांची तरतूदही केलेली असते. त्यामुळे देशाच्या शासनामध्ये घटना अत्यंत मुलभूत असते.

भारतात लोकशाही शासनव्यवस्था असून नागरिकांच्या मुलभुत अधिकारांना मान्यता देण्यात आली आहे. भारताच्या संविधानाच्या तिस-या भागात २२ ते ३५ मध्ये सहा प्रकाराच्या मुलभुत अधिकारांचा समावेश केला आहे. लोकशाही देशांमधील व्यक्तींना काही मुलभुत अधिकार प्रदान केले जातात ज्याचे संरक्षण देशातील न्यायव्येवस्थे मार्फत केले जाते. भारतीय राज्यघटनेच्या भाग III मध्ये मुलभुत अधिकाराचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे भाग III ला भारताचा मॅग्ना कार्टा असे संबोधले जाते. घटनाकर्त्यांनी हे मुलभुत अधिकार युएसएच्या घटनेवरुन घेतली आहेत. भारताच्या संविवधानाने मुलभुत अधिकाराच्या संरक्षणाची जबाबदारी न्यायालयाकडे सोपवली आहे. १३ व्या कलमानुसार मुलभुत अधिकाराचा संकोच किंवा भंग होत असेल तर त्यास, न्यायमंडळ घटनाबाहय आहे. म्हणून घोषित करु शकते, यास ‘न्यायालयीन पूनर्विलोकन’ असे म्हणतात.

मुलभुत अधिकार हे मानवासाठी निर्माण केलेली एक सुविधा आहे. या शिवाय व्यक्तीला आपला विकास करता येत नाही मानसाच्या सामाजिक विकासासाठी निर्माण केलेले अधिकार आहेत त्यांच्या संरक्षणाची जबाबदारी राज्याकडे असते. मुलभुत अधिकाराला विधानमंडल जसे पाहिजे तसा बदल करत शकत नाही याचे संशोधन करायचे असेल तर संविधानाच्या प्रक्रियेद्वारे केले जाते यामुळे तर याला मुलभुत अधिकार म्हटले जाते. मुलभुत अधिकार देशात राजकीय लोकशाहीचा आदर्श प्रस्थापित करतात. ते देशात एकाधिकारशाही व जुलमी सता प्रस्थापित होण्यास प्रतिबंध करुन

राज्यसंस्थेच्या आक्रमणापासुन जनतेच्या स्वातंत्र्याचे संरक्षण करतात. थोडक्यात 'ते माणसाचे नव्हे तर' कायद्यांचे शासन प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करतात.

**शोधनिबंधाची उदिष्टये :-**

१. भारतीय संविधानातील मुलभुत अधिकाराचा अभ्यास करणे.
२. उत्कृष्ट जिवन जगण्यासाठी मुलभुत अधिकार आवश्यक आहेत.
३. मुलभुत अधिकार व्यक्तीच्या संरक्षणाची जबाबदारी स्वीकारतात.

**संशोधन पध्दती :-**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी वर्णनात्मक, विध्लेषणात्मक पध्दतीचा अवलंब करण्यात आलेला आहे. तसेच विविध संदर्भ ग्रंथ, लेख, नियतकालीक, मासिके, वर्तमानपत्रे, विविध संकेतस्थळे यांचा आवलंब करण्यात आला आहे.

**मुलभुत अधिकाराचा अर्थ :-**

देशाच्या घटनेत समाविष्ट करण्यात आलेल्या अधिकाराला मुलभुत अधिकार असे म्हणतात. म्हणजेच घटनेतील मुलभुत अधिकाराच्या यादीमध्ये नसलेल्या इतर ज्या अधिकारात राज्य सुध्दा हस्तक्षेप करु शकत नाही त्याला मुलभुत अधिकार असे म्हणतात.

**मुलभुत अधिकाराची वैशिष्टये :-**

**१) घटनेचा अविभाज्य भाग :-**

मुलभुत अधिकार घटनेचा अविभाज्य भाग असुन ते साधारण कायद्याद्वारे बदलता किंवा रद्द करता येत नाहीत.

२) घटनेचा सर्वात विस्तृत भाग :-

घटनेचा भाग हा जगातील कोणत्याही घटनेतील मुलभुत हक्कापेक्षा अधिक विस्तृत व विध्लेषणात्मक आहे.

३) ते केवळ नैसर्गिक अधिकार नव्हेत :

घटनेतील मुलभुत अधिकार हे निसर्गाने मानवाला बहाल केलेले नौसर्गिक अधिकार नव्हे फक्त घटनेत उल्लेख केलेले अधिकार मुलभुत अधिकार आहेत. या यादीमध्ये नसलेल्या कोणत्याही इतर अधिकारांना मुलभुत अधिकाराचा दर्जा नाही.

४) काही अधिकार केवळ नागरिकांना उपलब्ध :

काही अधिकार केवळ देशाच्या नागरिकांनाच उपलब्ध आहेत. उदा. कलम १५, १६, १९, २९, व ३० मधील मुलभुत अधिकार म्हणजेच हे अधिकार परकीयांना उपलब्ध नाहीत. मात्र कलम १४, २०, २१, २२, २३, २४, २५, २६, २७ व २८ मधील अधिवार परकीयांनाही उपलब्ध आहेत.

५) नकारात्मक व सकारात्मक अधिकार :-

काही अधिकार हे नकारात्मक स्वरुपाचे आहेत म्हणजेच ते राज्यसंस्थेला काही कृती करण्यात प्रतिबंध करतात. उदा. पदव्या रद्द करणे कलम १८ या उलट काही अधिकार सकारात्मक स्वरुपाचे आहेत. म्हणजे ते जनतेला काही अधिकार मिळवून देतात. उदा. स्वातंत्र्य व समानतेचा अधिकार.

६) मुलभुत अधिकार अमर्यादीत नाहीत :-

मुलभुत अधिकार हे अमर्यादीत नसुन गुणात्मक आहेत. म्हणजेच राज्यसंस्था त्यांच्यावर पर्याप्त मर्यादा घालू शकते मात्र अशा मर्यादा पर्याप्त आहेत की नाहीत हे ठरविण्याचा अधिकार न्यायालयांना आहे.अशा रीतीने मुलभुत अधिकार व्यक्तीचे हक्क व संपुर्ण समाजाचे हक्क यामध्ये आणि पर्यायाने वैयक्तीक स्वातंत्र्य व सामाजिजक नियंत्रण यामध्ये संतुलन निर्माण करते.

**७)** न्यायप्रविष्ट :-

मुलभुत अधिकार हे न्यायप्रविष्ट आहेत म्हणजेच त्यांचे उल्लंघन झाल्यास ते सर्वोच्च न्यायालयाकडुन किंवा उच्च न्यायालयाकडून पुन्हा प्रात्र करुन घेता येतात. अर्थात त्यांची पुनप्राप्ती सर्वोच्च न्यायालयाकडून करुन घेणे हे कलम ३२ अंतर्गत मुलभुत अधिकार आहे. तर त्यांची पुनप्राप्ती कलम २२६ अंतर्गत उच्च न्यायांलयाकडून करुन घेणे हा मात्र मुलभुत अधिकार नाही.

**८)** मुलभुत अधिकारामध्ये दुरुस्ती करता येते

संसदेस मुलभुत अधिकारामध्ये दुरुस्ती करण्याचा अधिकार आहे. मात्र संसदेत ही दुरुस्ती घटनादुरुस्ती कायद्यानेच करता येते साधारण कायद्याने नव्हे. असे करताना मात्र घटनेच्या मुलभुत संरचनेत बदल करता येत नाही.

९) मुलभुत अधिकार स्थापित करता येतात :-

राष्ट्रीय आणिबाणीच्या काळात राष्ट्रपती कलम २० व २१ मधील अधिकार वगळता इतर सर्व अधिकार स्थगित करु शकतात. तसेच कलम १९ अंतर्गत उपलब्ध ६ मुलभुत स्वांतत्र्य युध्द किंवा बाहय आक्र मणाच्या आधारावर घोषित करण्यात आलेल्या आणीबाणी दरम्यानच स्थगित करता येतात. सशस्त्र उठाव या कारणाच्या आधारावर घोषित करण्यात आलेल्या आणीबाणीदरम्यान ही स्वातंत्र्ये स्थगीत करता येत नाहीत.

९) बहुतेक मुलभुत अधिकार आपोआपच अंमलात येतात तर काहींना अंमलात आणण्यासाठी संसदीय कायदा करण्याची गरज असते अर्थात असा कायदा करण्याचा अधिकार केवळ संसदेला आहे. राज्य विधीमंडळला नाही. देशभरात कायद्याची एकरुपता साध्य व्हावी हा त्यामागचा उद्देश आहे.

 ISBN No. 978-93-91097-18-9

## भारतातील संविधानातील मुलभुत अधिकार

### १) समनतेचा अधिकार :

समता हा लोहशाहीचा आधार आहे. समतेचा अधिकार दिल्याशिवाय इतर अधिकार वापरता येत नाहीत. म्हणुन भारताच्या राज्यघनेत समतेच्या अधिकारचा समावेश करण्यात आला आहे. सामाजिक, आर्थिक आणि राजकीय समता प्रस्थापित करणे हा या अधिकाराचा उद्देश  आहे. कायद्यापुढे समानता या हक्कान्वये सर्व व्यक्ती कायद्यासमोर समान असतात आणि सर्वांना कायदयाचे समान संरक्षण मिळते. भारताच्या नागरिकांना धर्म, वंश, जात, लिंग अशा कोणत्याही आधारावर भेदभाव केला जाणार नाही. पण या अधिकारावर काही बंधने आहेत. भारताच्या संविधानानुसार नोकरीतील आरक्षाचे धोरण समतेच्या अधिकारावर गदा आणत नाही. भारताच्या समाजाला कलंक असलेली अस्पृश्यता कायदयाने नष्ट केली आहे विषमतेचा सर्वात दाहक अविष्कार म्हणजे अस्पृश्यता समाजातील ही विषमता दूर करण्यासाठी तसेच मुलभुत अधिकाराच्या संरक्षणासाठी आस्पृश्यता पाळण्यावर प्रतिबंध घालण्यात आला आहे. ब्रिटीश राजवटीत लोकांना रावसाहेब, रावबहादूर, दिवाण खान, खान बहादूर अशा पदव्या दिल्या जात असत या पदव्यांमुळे व्यक्तीव्यक्तीत कृत्रिम भेद निर्माण होत असे. भारताच्या संविवधानाने भेदभाव निर्माण करणारे असे किताब देणे बंद केले आहे. परंतु शासना  मार्फत व्यक्तीच्या व सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याचा गौरव व्हावा व त्यापासुन इतरांनी प्रेरणा घ्यावी यासाठी पद्म पुरस्कार दिले जातात.

### २) स्वातंत्र्याचा अधिकार :-

स्वातंत्र्य हा लोकशाहीचा आत्मा आहे. स्वातंत्र्य आणि समता परस्परांवर अवलंबुन असतात. व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी स्वातंत्र्याची नितांत गरज आसते. स्वातंत्र्य म्हणजे बंधनरहित अवस्था परंतु स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार किंवा अनिर्बंध स्वातंत्र्य नव्हे. लोकशाही शासनव्यवस्थेमध्ये भाषण व अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य असणे आपल्या विचारांचा प्रचार व प्रसार करण्याचा अधिकार मिळाला आहे. नागरिकांना आपल्या विचारांच्या प्रसारासाठी शांततामय रीतीने व निःशस्त्र पदधतीने एकत्र जमण्याचा अधिकार आहे. स्वांतत्र्याच्या हक्कामुळे संघटना व संस्था स्थापन करण्याचे स्वातंत्र्य मिळाले आहे. यामुळे कामगार संघटना, व्यापारी व व्यावसायीक संस्था, राजकीय व सांस्कृतीक संघटना स्थापन करता येतात. भारताच्या नागरिकांना भारताच्या भुप्रदेशात मुक्तपणे फिरण्याचे स्वातंत्र्य आहे. भारताचा नागरिकांना आपल्या इच्छेनुसार प्रत्येक भारताच्या भुप्रदेशावर तात्पुरते वा कायमस्वरुपी वास्तव्य करण्याचे स्वातंत्र आहे. प्रत्येक नागरिरकाला आपल्या इच्छेप्रमाणे कोणताही व्यवसाय करण्याचे वा पेशा आचरण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले जीवीताचा आणि व्यक्तीगत स्वातंत्र्याचा अधिकार महत्वाचा अधिकार मानला जातो. कोणालाही जीवीताच्या हक्कापासुन वंचित ठेवले जात नाही.

मानवी प्रतिष्ठेचा आदर या हक्काने केला जातो. यामुळे कोणालाही चुकीच्या पद्धतीने अटक करता येत नाही.

३) **शोषणाविरुध्दचा अधिकार :**

भारतीय समाजात पुर्वीपासुन वेठबिगारी देवदासी अशा शोषण करणा-या अनिष्ट प्रथा प्रचलित होत्या. त्यामुळे व्यक्तीची पिळवणूक घेत असे. नागरिकांचे शोषण होऊ नये म्हणुन हा अधिकार देण्यात आला आहे. वेठबिगारी म्हणजे मोबदला न देता सक्तीने काम करुन घेण्याची पध्दत बंद केली आहे. तसेच १४ वर्षाखालील मुलामुर्लींना खाण कारखाने किंवा अन्य धोकादायक ठिकाणी, कामावर ठेवण्यास मनाई केली आहे. या अधिकारामुळे शोषण करणा-या प्रथा बंद करुन सर्वांना सन्मानाने जगण्याची संधी प्राप्त झाली आहे.

४) **धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार :-**

भारतात धार्मिक विविधता आहे. राज्यात कोणताही विशिष्ट धर्म नाही. सर्व धर्मांना समान वागणूक दिली जाते. त्याचप्रमाणे राज्य धर्मांच्या आधारावर भेदभाव करुन शकत नाही. भारतातील राज्यव्यवस्था धर्मनीरपेक्ष आहे. या हक्कान्वये व्यक्ती सदसद्विवेकबुध्दीने स्वातंत्र्य उपभोगू शकतो. आपल्या इच्छेनुसार धर्माचे आचरण व प्रसार करु शकतो. कोणताही धर्म धार्मिक संस्था स्थापन करु शकतो व धार्मिक कार्याचा प्रसार करु शकतो. संपत्ती धारण करु शकतो. धार्मिक कारणांसाठी सक्तीने कर गोळा करता येत नाही. ज्या शिक्षण संस्थाना राज्याचे आाक साहाय्य मिळते अशा संस्थांमध्ये विशिष्ट धर्माचे शिक्षण देता येत नाही. मात्र शासन अशा संस्थाच्या दित्तीय बाजूंचे नियंत्रण करु शकते.

**५) सांस्कृतीय व शैक्षणिक अधिकार :-**

भारतात विविधतेत एकता आढळते. वेगवेगळया समाज घटकातील लोक वेगवेगळी भाषा बोलतात. भारताच्या वेगवेगळया भागात सण उत्सव चालीरीती यातही वैविध्य दिसून येते. म्हणूनच सांस्कृतिक व शिक्षणाच्या अधिकारामध्ये धार्मिक आणि भाषिक अल्पसंस्यांकांचा विचार केला आहे. सांस्कृतीक आधिकारानुसार अल्पसंख्यांक समाज घटकाला आपली भाषा, लिपी व संस्कृती जतन करण्याचा अधिकार आहे. बहुसंख्याकांनी केवळ संख्याबळावर अल्पसंख्यांकावर संस्कृती लादू नये म्हणून तसेच अल्पसंख्यांकांच्या मनात सुरक्षिततेची जाणीव निर्माण व्हावी यासाठी असा अधिकार देण्यात आला आहे. भाषिक व धार्मिक अल्पसंख्यांक गट स्वतःच्या शिक्षण संस्था चालवू शकतात. त्यांना आर्थिक साहाय्य करताना राज्य धर्माच्या आधारावर भेदभाव करु शकत नाही.

६) **घटनात्मक उपाययोजना करण्याचा अधिकार :-**

मुलभुत अधिकारांना संरक्षण देणारा हा अधिकार महत्वाचा अधिकार मानला जातो. कोणताही भारताचा नागरिक मुलभुत हक्कांचे उल्लंघन झाल्यास हक्क परत

मिळविण्यासाठी सर्वोच्च व उच्च न्यायालयाकडे दाद मागू शकते. मुलभुत अधिकारांच्या रक्षणाची जबाबदारी न्यायमंडळावर सोपविली आहे.मुलभुत अधिकाराच्या संरक्षणासाठी सर्वोच्च किंवा उच्च न्यायालयाने काढलेल्या आदेशास रिट्स असे म्हणतात. सर्वोच्च अथवा उच्च न्यायालयातील न्यायाधीश बंदी प्रत्यक्षीकरण, परमादेश, प्रतिषेध, उत्प्रेषण आणि आधिकारपृच्छा अशा विविध प्रकारच्या आदेशांद्वारे मुलभुत अधिकारांना संरक्षण देतात. या आदेशांचा उपयोग संरक्षणाचा सर्वात शेवटचा उपाय म्हणुन बघितला जातो.

**१) बंदीप्रत्यक्षीकरण :**

हा शब्द लॅटीन भाषेतील आहे. बंदीप्रत्यक्षीकरण म्हणजे 'संदेह उपस्थित रहाणे' पोलीस अधिका-याने जर एखाद्या व्यक्तीला अटक केली असेल आणि जर त्यास २४ तासाच्या आत न्यायालयासमोर हजर केले नसेल तर ती व्यक्ती किंवा तीचे नातेवाईक वा मित्र हा अर्ज करु शकतात. अशा परिस्थीतीत न्यायालय त्या व्यक्तीच्या अटकेची चौकशी करते.

**२) परमादेश :-**

जर एखादया व्यक्तीचा वा व्यक्तीगटाचा मुलभुत अधिकार डावलला गेला तर ती व्यक्ती किंवा तो व्यक्तीगट आपल्या मुलभुत अधिकाराच्या संरक्षणासाठी न्यायालयात परमादेश रिट अर्ज दाखल करत शकतात.त्यामुळे बाधित व्यक्ती अथवा व्यक्तीगटाच्या मुलभुत अधिकाराचे रक्षण केले जाते.

**३) प्रतिषेध :**

जर कनिष्ठ न्यायालयाकडुन अधिकारक्षेत्राचे उल्लंघन झाले तर प्रतिषेध हा आदेश वरिष्ठ न्यायालये त्याच्या अधिकारक्षेत्राच्या मर्यादेत राहूनच कार्य करतील अशी अपेक्षा असते.

**४) उत्प्रेषण :-**

हा आदेश देखील न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रात खटल्यांच्या सुनावणीसंदर्भात वापरला जातो. अधिकार क्षेत्राबाहेरील खटला जर कनिष्ठ न्यायालयात चालवला जात असेल तर वरिष्ठ न्यायालय अशा खटल्यातील कागदपत्रे मागवुन घेतात.

**५) अधिकारपृच्छा :**

न्यायालय एखाद्या व्यक्तीच्या विरुध्द हा प्रधिलेख काढून त्याला सदर सार्वजनिक अधिकारपदावर राहण्याचा आपणास कोणता अधिकार आहे अशी विचारणा करु शकते एखाद्या व्यक्तीला एखादे सार्वजनिक अधिकारपद बेकायदेशीरपणे धारण करण्यापासुन प्रतिबंधीत करण्यासाठी या प्रधिलेखाचा वापर केला जातो. कोणताही नागरिक अशा प्रकारचे आव्हान एखाद्या सरकारी अधिका-याला देऊ शकते.

**समारोप :-**

भारताच्या संविधानात नागरिकाला मुलभुत अधिकार देण्यात आले आहेत त्यामुळे नागरिकाला स्वातंत्र्य समता न्याय हे अधिकार प्राप्त झाले आहेत. असे असले तरी या अधिकारावर बंधने आहेत आणि या मर्यादा मुलभुत अधिकार स्पष्ट करणा-या कलमाबरोबरच देण्यात आलेल्या आहेत. उदा. भाषण स्वातंत्र्य बहाल केले असले तरी राष्ट्राची एकता आणि अखंडता धोक्यात येईल परदेशांशी असलेल्या मैत्रीपूर्ण संबंधाना बाधा येईल, सार्वजनिक व्यवस्था नैतीकता न्यायालयाचा अवमान होईल असे भाषण करता येणार नाही एकत्र जमवण्याचे स्वातंत्र्यही शांततापूर्वक रीतीने निःशस्त्र पद्धतीने जमण्यासाठी आहे.

**संदर्भ :-**


**१)** घायाळ विनायक , प्रथमावृत्ती २०१८, भारतीय राज्यघटना, आणि राजकीय व्यवहार एक परामर्श, के. सागर पब्लीकेशन्स पूणे .

**२)** रंजन कोळंबे, भारताची राज्यघटना आणि प्रशासन, भगीरथ प्रकाशन पुणे.

**३)** डॉ.बी. एल. फडिया, राजनिती विज्ञान, प्रतियोगीता साहित्या सीरीज, हॉस्पीटल रोड, आगरा.

**४)** एन.डी.अरोडा, राजनीती विज्ञान, टाटा मसग्रेवहील पब्लिकेशन कंपनी लिमीटेड नई दिल्ली.

**५)** सौरभ गुप्ता, राहुल गुप्ता, भारतीय राजव्यवस्था एवं प्रशासन, अरिहन्त पब्लिकेशन्स इडिया लिमिटेड.

# १७. संघराज्य शासन आणि भारतीय संघराज्याचे स्वरूप

**डॉ. अरूण पेंटावार**
राज्यशास्त्र विभागप्रमुख
सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगाव, जि.बीड.

**प्रस्तावना:**

केंद्र शासन आणि राज्य शासन यांच्यातील परस्पर संबंधावरून शासनाचे दोन प्रकार पडतात. ते म्हणजे एकात्मिक शासन पद्धती आणि संघराज्य शासन पद्धती होय. एकात्मक शासन पद्धतीमध्ये सर्व अधिकार हे केंद्र शासनाकडे असतात तर संघराज्य शासन पद्धती मध्ये केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांच्यामध्ये घटनेनुसारच अधिकारांची विभागणी केली जाते. ब्रिटन, फ्रान्स व जापान यासारख्या देशामध्ये एकात्मिक शासन पद्धती अस्तित्वात आहे. तर अमेरिका कॅनडा व ऑस्ट्रेलिया यासारख्या देशांमध्ये संघराज्य शासन पद्धती अस्तित्वात आहे.

आधुनिक काळात मूलतः समान हितसंबंध, समान सामाजिक व सांस्कृतिक वारसा, समान उद्दिष्टे, भौगोलिक व्याप्ती व तसेच प्रशासनाच्या सोयीसाठी अनेक देशांमध्ये संघराज्य शासनाचा प्रयोग स्वीकारण्यात आला. संघराज्याच्या निर्मितीच्या मुख्यता दोन प्रक्रिया आहेत. ते म्हणजे केंद्राकर्षी व केंद्रोत्सारी होय. केंद्राकर्षी प्रक्रियेत स्वतंत्र प्रदेश किंवा राज्य एकत्र येऊन संघराज्य शासन निर्माण करतात. उदा. अमेरिका. यामध्ये अमेरिकेतील तेरा स्वतंत्र वसाहती मिळून एक संघराज्य निर्माण झाले आहे. केंद्रोत्सारी प्रक्रियेत एका अखंड भूप्रदेश भौगोलिक व्याप्ती किंवा प्रशासन किंवा विविध कारणामुळे घटक राज्य शासन निर्माण केले जातात. उदा. भारत. कारण भारतातील सामाजिक, राजकीय, धार्मिक विविधता व प्रशासकीय सोयीच्या दृष्टीने संघराज्य शासन अस्तित्वात आलेला आहे. भारतीय राज्यघटनेमध्ये संघराज्य शासन प्रणालीच्या सरकारची तरतूद आहे. देशाचे मोठे आकारमान आणि सामाजिक व सांस्कृतिक विविधता या दोन कारणांमुळे घटनाकारांनी संघराज्य शासन पद्धती स्वीकारली प्रस्तुत प्रकरणांमध्ये संघराज्याचा अर्थ संघराज्याची सर्वसाधारण वैशिष्ट्ये व भारतीय संघराज्याचे स्वरूप स्पष्ट करण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

**संघराज्य शासनाचा अर्थ**

संघराज्य म्हणजे केंद्र व राज्य अशा दोन स्तरावर स्वायत्त शासन यंत्रणा अस्तित्वात असणे होय. संघराज्य म्हणजे इंग्रजीतील 'Federation' हा शब्द 'Foedus' या लॅटिन शब्दापासून बनला आहे. त्याचा अर्थ आहे करार किंवा सहमती. राज्यातील सहमतीनुसार किंवा राज्या-राज्यामधील करारानुसार संघराज्य हे नवे राज्य स्थापन होते. संघराज्यातील घटकांना

 ISBN No. 978-93-91097-18-9

अमेरिकेत स्टेट्स, स्विझरलँड मध्ये कॅन्टन, कॅनडामध्ये प्रॉव्हिन्सेस, रशियामध्ये रिपब्लिक तर भारतामध्ये राज्य असे संबोधले जाते.

सर्वसाधारणपणे संघराज्य म्हणजे अधिकार वाटपाची अशी व्यवस्था आहे की, ज्यामध्ये केंद्रस्तरावर व राज्य स्तरावर दोन शासन निर्माण केल्या जातात. त्यांच्यामध्ये राज्यघटनेनुसार अधिकारांची विभागणी केली जाते व काही संघर्ष निर्माण झाल्यास न्यायव्यवस्थेद्वारे सोडविण्याचा प्रयत्न केला जातो.

**संघराज्य शासनप्रणालीची सर्वसाधारण वैशिष्टे**

संघराज्य म्हणजे केंद्र व राज्य अशा दोन स्तरावर स्वायत्त शासन यंत्रणा अस्तित्वात असणे. अमेरिकेने आधुनिक अर्थाने संघराज्य व्यवस्थेला सुरुवात केली. अमेरिकन संघराज्य प्रतिमानानुसार संघराज्य व्यवस्थेची पाच ठळक वैशिष्ट्ये असतात.

1) दुहेरी राज्यव्यवस्था किंवा शासन (केंद्र सरकार व राज्य सरकार)
2) सत्ता किंवा अधिकारांची विभागणी- ही अधिकार विभागणी स्पष्ट व घटनेद्वारे केलेली असावी.
3) लिखित व परीदृढ म्हणजे बदलण्यास कठीण असणारी राज्यघटना.
4) स्वतंत्र न्यायमंडळ याचे उद्दिष्ट केंद्र व राज्य किंवा राज्य व राज्य यांतील विवाद निष्पक्षपातीपणे सोडवणे.
5) द्विगृही केंद्रीय कायदेमंडळ. यातील एक सभागृह जनतेचे प्रतिनिधित्व करणारे आहे मात्र दुसरे सभागृह घटकराज्यांचे प्रतिनिधित्व करते.

कोणत्याही संघराज्य व्यवस्थेमध्ये ही आधारभूत वैशिष्ट्ये आढळून येतात. म्हणूनच या वैशिष्ट्यांना संघराज्य व्यवस्थेची मूलभूत तत्वे मानली जातात.

**भारतीय संघराज्याचे स्वरूप व वैशिष्ट्ये**

देशाचा मोठा आकार आणि देशातील सामाजिक व सांस्कृतिक विविधता या दोन कारणांमुळे भारतीय राज्यघटनेमध्ये देशासाठी संघराज्यात्मक शासन पद्धतीची (Federal System of Government) तरतूद करण्यात आली. मात्र भारतीय घटनेमध्ये कोठेही संघराज्य (Federation) या शब्दाचा उल्लेख नाही. घटनेतील कलम 1 मध्ये भारताचे वर्णन 'राज्यांचा संघ' असे करण्यात आले आहे. भारताच्या राज्यघटनेतील भाग-1 मधील कलम 1 ते 4 हे संघराज्य व त्यांच्या राज्य क्षेत्राशी संबंधित आहेत ही संघराज्य व्यवस्था अमेरिकन मोडेल वर आधारित नसून ती कॅनडाच्या मॉडेल वर आधारित आहे

भारताची संघराज्य प्रणाली ही कॅनडाच्या प्रणालीवर आधारित आहे. अमेरिकन संघराज्य पद्धती व कॅनडाच्या संघराज्य पद्धतीतील मूलभूत फरक म्हणजे कॅनडाच्या प्रणालीत सामर्थ्यशाली केंद्राची स्थापना केली आहे. म्हणूनच बऱ्याच तत्वांच्या बाबतीत भारतीय संघराज्याचे स्वरूप हे कॅनडाशी मिळतेजुळते आहे. भारतीय राज्यघटनेतील संघराज्यीय वैशिष्ट्ये किंवा स्वरूप पुढील प्रमाणे स्पष्ट करता येईल.

**1) दुहेरी राज्यव्यवस्था किंवा शासन**

भारतीय राज्यघटनेमध्ये केंद्र सरकार व राज्य सरकार अशी दुहेरी राज्यव्यवस्था किंवा शासनाची तरतूद केलेली आहे. दोन्ही शासन व्यवस्थेला राज्यघटनेने विशेष अधिकार बहाल केलेले आहेत. केंद्र सरकार व राज्य सरकार यांनी आपले अधिकार वापरत असताना एकमेकांच्या कार्यात हस्तक्षेप करू नये हे संघराज्य व्यवस्थेत अपेक्षित असते. परंतु समकालीन पक्षीय राजकारणामुळे केंद्राचा मोठ्याप्रमाणात राज्यांतर्गत हस्तक्षेप वाढत आहे. यातून केंद्र-राज्य संघर्ष अनेक वेळा निर्माण झालेला आहे.

**2) लिखित राज्यघटना**

संघराज्य व्यवस्थेमध्ये राज्यघटना ही लिखित स्वरूपात असते. भारतीय राज्यघटना हे लिखित असून जगातील सर्वात मोठी राज्यघटना आहे. यामध्ये सुरुवातीला 22 भाग, 395 कलमे आणि 8 परिशिष्टे होती. सध्या भारतीय राज्यघटनेत सरनामा, 25 भाग, 465 पेक्षा अधिक कलमे, आणि 12 परिशिष्टे आहेत. यामध्ये केंद्र व राज्य या दोन्ही सरकारांची रचना, संघटना, अधिकार व कार्य यांची तरतूद करण्यात आली आहे.

**3) अधिकारांची विभागणी**

संघराज्य व्यवस्थेमध्ये केंद्र व राज्यांमध्ये अधिकारांची विभागणी केलेली असते. त्यानुसारच भारतीय राज्यघटना अंतर्गत परिशिष्ट 7 मधील केंद्र सूची, राज्य सूची व समवर्ती सूची या अंतर्गत केंद्र सरकार व राज्य सरकार यांच्या अधिकारांची विभागणी करण्यात आलेली आहे. या सूचीनुसार केंद्र सूची मध्ये 100 विषय, राज्य सूची मध्ये 61 विषय तर समवर्ती सूची मध्ये 52 विषय आहेत. समवर्ती सूचीतील विषयांबाबत कायदे करण्याचा अधिकार केंद्र व राज्य दोघांनाही आहे मात्र दोन्ही कायद्यात परस्पर विसंगती आढळल्यास केंद्राचा कायदा श्रेष्ठ ठरतो.

**4) स्वतंत्र न्यायव्यवस्था**

संघराज्य व्यवस्थेत केंद्र सरकार व राज्य सरकार यांच्यात विविध विषयावर संघर्ष निर्माण झाल्यास ते सोडविण्यासाठी स्वतंत्र न्यायव्यवस्था आवश्यक असते. भारतानेही संघराज्य पद्धती स्वीकारल्यामुळे राज्यघटनेने सर्वोच्च न्यायालयाच्या नेतृत्वाखाली स्वतंत्र न्याय व्यवस्था स्थापन केली आहे. स्वतंत्र व सर्वोच्च न्यायव्यवस्थेचा मुख्य उद्देश म्हणजे न्यायालयीन पुनर्विलोकना च्या माध्यमातून राज्यघटनेचे श्रेष्ठत्व अबाधित राखणे आणि केंद्र-राज्य व राज्या राज्या मधील विवाद सोडविणे होय. भारतीय न्यायव्यवस्था ही कायदेमंडळ व कार्यकारी मंडळ यापासून स्वतंत्र आहे. म्हणून भारतीय संघराज्य प्रणालीचे हे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य ठरते.

**5) द्विगृही कायदेमंडळ**

प्रत्येक संघराज्य व्यवस्थेमध्ये द्विगृही कायदेमंडळ असते. भारतीय राज्यघटनेमध्ये वरिष्ठ सभागृह (राज्यसभा) आणि कनिष्ठ सभागृह (लोकसभा) अशी द्विगृही कायदे मंडळ व्यवस्थेची तरतूद करण्यात आली आहे. यातील वरिष्ठ सभागृह राज्यसभा हे भारतीय संघराज्यातील राज्यांचे प्रतिनिधित्व करते तर लोकसभा हे भारतातील संपूर्ण जनतेचे प्रतिनिधित्व करते. या

दोन्ही सभागृहांची तुलना केल्यास राज्यसभेला अतिशय मर्यादित अधिकार आहेत. असे असले तरी केंद्राच्या अयोग्य हस्तक्षेपापासून राज्यांच्या हितांचे संरक्षण करण्याचे कार्य राज्यसभा करीत असते. त्यामुळेच संघराज्य व्यवस्थेतील संतुलन राखण्यासाठी राज्यसभेची आवश्यकता आहे.

**6) ताठर राज्यघटना**

ताठर राज्यघटना हे भारतीय राज्यघटनेचे व संघराज्य व्यवस्थेचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. घटनेतील संघराज्य वैशिष्ट्या मध्ये दुरुस्ती करण्यासाठी संसदेच्या विशेष बहुमताने बरोबरच देशातील किमान अर्ध्यापेक्षा अधिक राज्यांच्या समर्थनाची तरतूद करण्यात आलेली आहे.

वरील प्रमाणे काही मूलभूत तत्त्वांचा समावेश असलेले भारतीय संघराज्याचे स्वरूप आहे. काही घटनेच्या अभ्यासकांनी भारतीय संघराज्य हे खरे संघराज्य नाही, अशी टीका केली. आपल्या घटनाकारांनी राज्यघटनेत ‘फेडरॅलिझम’ हा शब्दप्रयोग न करता ‘युनिअन ऑफ स्टेटस’ (राज्यांचा समूह) असा शब्द वापरला आहे. वरील टीकाकार टीका करताना अमेरिकन प्रतिमान नजरेसमोर ठेवत असल्याचे दिसते. पण भारताच्या गरजेनुसार योग्य ते बदल करून घटनाकारांनी भारतीय संघराज्य घडवले आहे. संघराज्याच्या मुलभूत व्यवस्थेचा स्वीकार करताना आवश्यक ते बदलही त्यात केले, यात काहीही वावगे नाही. त्यामुळे भारतीय संघराज्य हे कोणत्याही अन्य देशाची नक्कल नसून ते स्वयंभू आहे. डी. डी. बासू या अभ्यासू घटनातज्ज्ञाने म्हटले आहे की भारतीय संघराज्य हे ‘sui-generis’ (म्हणजे स्वतःसारखेच आहे).

**भारतीय संघराज्याचे बदलते स्वरूप**

भारताचे संघराज्य हे पूर्णतः संघराज्यीय स्वरूपाचे नसून त्यात केंद्र सरकारचे अधिकार वाढवणाऱ्या आणीबाणीसारख्या अनेक तरतुदी आहेत. त्यामुळे भारतीय संघराज्य हे अर्धसंघराज्यीय आणि एकात्मिक संघराज्य आहे असे संघराज्याचा अभ्यास करणारे विचारवंत व घटनातज्ञांचे मत आहे. पण १९९० नंतरच्या सामाजिक आर्थिक आणि राजकीय बदलांमुळे संघराज्याचे स्वरूप बदलत असल्याचे दिसून येते. १९९० नंतर भारतीय राजकारणात संघराज्यांच्या संदर्भात चार वेगवेगळे प्रवाह निर्माण झालेले आपणास दिसतात हे चार प्रवाह खालीलप्रमाणे —-

१. भारतीय संघराज्याच्या रचनेचा वा फेररचनेचा आधार भाषा हा होता. भाषेच्या आधारावर भारतात राज्यांची फेररचना करज्यात आली पण आता भाषिक आधारा ऐवजी सांस्कृतिक आधार जास्त महत्त्वाचा ठरत असून त्यामुळे अनेक राज्यांच्या फेररचनेची मागणी होत असताना आपणास दिसते.

२. भारतात राष्ट्रपालकीवरील राजकीय पक्षांचा -हास होत असून काँग्रेस व भाजप या दोन्ही राष्ट्रीय पक्षांना केंद्रात सरकार स्थापन करण्यासाठी प्रादेशिक पक्षांच्या वा इतर लहान पक्षांच्या पाठिंब्यावर अवलंबून राहावे लागत आहे त्यामुळे केंद्रातील सरकारला सहमतीच्या आधारावर राज्य करणे आता अपरिहार्य बनत आहे.

३. सर्वोच्च न्यायालयाचे १९९२ साली एस. आर. बोसाई खटलमात घटनेच्या ३५६ कलमाच्या वापरावर बंधनं आजही आहेत आणि या बंधनामुळे आपल्या इच्छेप्रमाणे राज्यास राष्ट्रपती शासन लादणे केंद्रसरकारला अशक्य बनत आहे.

४. उदारीकरणाच्या नव्या आर्थिक धोरणामुळे केंद्राचे अधिकार कमी होत असून राज्यांना काम करण्यास जास्त वाव मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे आपणास जास्त अधिकार मिळावेत अशी राज्यांची मागणी आहे.

**समारोप**

भारतीय घटनाकारांनी ही संघराज्य व्यवस्थेला आवश्यक असणारी पाचही वैशिष्ट्ये आपल्या राज्यघटनेत स्वीकारली आहे. केंद्र-राज्य यांना स्वतंत्र अस्तित्व दिले, अधिकारांची विभागणी करण्यासाठी संघसूची, राज्यसूची व समवर्ती सूची निर्माण केली. स्वतंत्र न्यायव्यवस्था निर्माण करून घटनेचा अन्वयार्थ लावण्याची व संघ–राज्यांतील वाद सोडवण्याची जबाबदारी सर्वोच्च न्यायालयाकडे दिली आणि राज्यसभा हे राज्यांचे प्रतिनिधिगृह म्हणून लोकसभेसोबत संसदेचा अविभाज्य भाग बनवले. अमेरिकन संघराज्य हे राज्यांनी एकत्र येऊन निर्माण केले. स्वाभाविकपणे राज्यांनी स्वतःकडे अधिक अधिकार ठेवले. सुरुवातीला अनेक भारतीय नेत्यांना अशा संघराज्याची निर्मिती भारतासाठी व्हावी असे वाटत होते. घटना समितीमधील काहीजणही याच मताचे होते. किमान अधिकार (उदा. परराष्ट्र व्यवहार, संरक्षण, चलन इ.) केंद्राकडे ठेऊन अन्य सर्व अधिकार राज्यांकडे द्यावे, असे त्यांचे मत होते. मात्र देशाच्या फाळणीमुळे चित्र बदलले. धर्माच्या आधारावर देश विभाजित झाला. संस्थानांच्या विलीनीकरणाचेही मोठे आव्हान होते. भाषिक राज्यांच्या मागण्या जोर धरत होत्या. या पार्श्वभूमीवर घटनाकारांनी प्रबळ केंद्राची निर्मिती देशाच्या अखंडतेसाठी अधिक महत्त्वाची मानली. त्यामुळे प्रबळ केंद्र असणारे कॅनडाचे संघराज्य प्रतिमान घटनाकारांना जास्त योग्य वाटू लागले. स्वातंत्र्याच्या काळातील राष्ट्रउभारणीच्या विविध आव्हानांचा विचार करून प्रबळ केंद्र असलेल्या संघराज्याची निर्मिती घटनाकारांनी केली. हे अनेक तरतुदींवरून दिसून येते.

**संदर्भ ग्रंथ सूची**


❖ डॉ. शर्मा, रश्मी, (2020), भारत में संघवाद, एस.बी.पी.डी. पब्लिकेशन्स, दिल्ली.

❖ जाधव तुकाराम, शिरपूरकर महेश, (2012), भारतीय संविधान व भारतीय राजकारण-भाग 1, द युनिक ॲकॅडमि पब्लिकेशन्स, पुणे.

❖ एम. लक्ष्मीकांत, (2017), इंडियन पॉलिटी, के'सागर पब्लिकेशन्स, पुणे.

❖ Dr. Jain S.K, (2018), Indian Federalism:Emerging Issues, Kalpaz Publications, New Delhi.

❖ Panikkar, K.M., (2019), 'Federal India', Eastern Book Linkers Publications, Delhi.

# १८. भारतीय राज्यघटनेची वैशिष्टये

**डॉ श्रीनिवास भोंग**
सहाय्यक प्राध्यापक
राज्यशास्त्र विभाग
संगमनेर महाविद्यालय
संगमनेर जिल्हा – अहमदनगर
Email- shri.bhong09@gmail.com

**सारांश**

सदर शोधनिबंधात भारतीय राज्यघटनेच्या वैशिष्ट्याचा विस्तृत आढावा घेण्यात आला आहे . जागतिक संदर्भात आणि विशेषतः दक्षिण आशियातील अन्य नवस्वतंत्र देशातील लोकशाही राज्यघटनेची अंमलबजावणी आणि भारतातील संसदीय लोकशाही व्यवस्थेतील राज्यघटनेची अंमलबजावणी व त्यासंदर्भातील यशापयश याची तौलनिक चिकित्सा केली आहे.भारताला लाभलेला ब्रिटीश काळातील लोकशाही व्यवस्थेचा वारसा ,भारताच्या नवस्वतंत्र व्यवस्थेत लोकशाही प्रणाली यशस्वी होण्यासाठी उपयुक्त ठरला .या पृष्ट्भूमीवर भारतीय राज्यघटनेच्या ,लिखित व विस्तृत स्वरुपाची राज्यघटना, ताठरता आणि लवचिकता यांचा समन्वय, अंतिम सत्ता जनतेच्या हाती, एकात्म व्यवस्थेकडे झुकलेले संघराज्य ,आणीबाणी विषयक तरतुदी या व इतर वैशिष्ट्यांचा आढावा सदर शोधनिबंधात घेण्यात आला आहे.

**कळीचे शब्द** : भारत,राज्यघटना,डॉ .बाबासाहेब आंबेडकर, मुलभूत हक्क, मुलभूत कर्तव्ये, मार्गदर्शक तत्वे

**प्रस्तावना :**

भारतीय राज्यघटना ही जगातील सर्वात मोठी व लिखित राज्यघटना आहे .लोकशाहीची जननी असलेल्या इंग्लडची राज्यघटनाही संपूर्णपणे लिखित स्वरुपात उपलब्ध नाही ही मोठी उणीव आहे .आजही इंग्लड सारखा प्रगत देश संकेत व परंपरावर अवलंबून आहे . इंग्लड अद्याप नाममात्र राजेशाहीचा त्याग करू शकलेला नाही .याउलट शतकानुशतके राजेशाही असलेल्या भारतात राजेशाहीचा पूर्णपणे त्याग केलेला आहे .भारताचे सर्वोच्च प्रमुख राष्ट्रपती असतात व ते लोकांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधीद्वारे निवडले जातात.म्हणूनच भारत हे गणराज्य आहे .

इंग्लडमध्ये मात्र सर्वोच्च नामधारी राष्ट्रप्रमुख राजा राणी असतात .जपान सारख्या प्रगत देशात आजही नामधारी स्वरुपात सम्राट पद कायम आहे .ऑस्ट्रेलिया सारख्या प्रगत देशातही इंग्लडची राणी नामधारी प्रमुख आहे . याचा अर्थ लोकशाही व्यवस्था स्वीकारली तरी

राजा म्हणजे भूपती ही भावना प्रगत देशांमध्ये कायम आहे. याउलट मागास म्हणून हिणविल्या गेलेल्या भारतामध्ये राष्ट्रपती पदावर महिला ,दलित ,अल्पसंख्याक व्यक्ती निवडल्या गेल्या आहेत .याउलट अमेरिकेमध्ये अद्याप महिला राष्ट्राध्यक्ष झालेली नाही .

अमेरिकेची राज्यघटनाही भारताइतकी तपशीलवार नाही. ज्या इंग्लडने भारतावर अधिराज्य गाजवले , त्या इंग्लडमधील राजकीय विचारवंत अर्नेस्ट बार्कर यांनी यांनी राजकीय सिद्धांताची मुलतत्वे हे पुस्तक लिहिले .त्यांना भारतीय राज्यघटनेचा सरनामा इतका प्रेरक वाटला की त्यांनी आपल्या पुस्तकाची प्रस्तावना म्हणून भारतीय राज्यघटनेचा सरनामा छापला.

**भारतीय राज्यघटनेची निर्मिती महत्वाची वैशिष्ट्ये**

**१ .लिखित व विस्तृत स्वरुपाची राज्यघटना -**

राज्यकारभाराचा तपशील संकेतांवर अवलंबून न ठेवता तो निश्चित लिखित स्वरूपात भारतीय राज्यघटनेत देण्यात आला आला आहे .सर्व तपशिलाचा राज्यघटनेमध्ये समावेश केल्यामुळे ती विस्तृत बनली आहे. शासन यंत्रणा आणि कायदे मंडळ यांच्यापेक्षा लिखित राज्यघटना श्रेष्ठ ठरावी आणि खऱ्या अर्थाने घटना देशाचा मूलभूत कायदा बनवावी या अपेक्षेने भारतीय राज्यघटनेत अनेक तरतुदी केल्या आहेत .त्यामुळेच जगातील सर्वात मोठी व लिखित स्वरुपाची राज्यघटना म्हणून भारताची राज्यघटना ओळखली जाते.

२. **ताठरता आणि लवचिकता यांचा समन्वय** –

भारतीय राज्यघटनेत काही दुरुस्त्या साध्या बहुमताच्या पद्धतीने तर उर्वरित दुरुस्त्या विशेष अथवा अतिविशेष बहुमताच्या द्वारे केल्या जातात म्हणजेच भारताची राज्यघटना अंशतः ताठर तर अंशतः लवचिक आहे.

**३. अंतिम सत्ता जनतेच्या हाती** –

जनता ही सर्व अधिकाराचे उगमस्थान असल्याचा उल्लेख राज्यघटनेच्या सरनाम्यामध्ये केलेला आहे. राज्यघटनेच्या उद्दिष्टांच्या ठरावात जनतेच्या अधिकाराचे तत्व मांडलेले आहे. तसेच भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या लोकशाहीवादी प्रारूपाशी हा विचार सुसंगत आहे. जनता ही सर्वश्रेष्ठ आहे हे भारतीय राज्यघटनेचे मुख्य वैशिष्ट्य आहे.

**४.एकात्म व्यवस्थेकडे झुकलेले संघराज्य-**

राज्यघटनेने एकात्म शासनाकडे झुकणाऱ्या मुद्द्यांना भारतीय राज्यघटनेने महत्व दिले आहे. प्रत्येक भारतीय नागरिक संपूर्ण देशाचा नागरिक असतो. भारतामध्ये प्रत्येक घटक राज्यासाठी वेगवेगळी राज्यघटना तयार केलेली नाही.

भारतातील घटक राज्यांना वेगळी राज्यघटना , वेगळा ध्वज अशी रचना निर्माण करता येणार नाही .भारताची न्यायव्यवस्था एकात्म स्वरूपाची आहे. केंद्र-राज्य अधिकार विभाजना मध्ये केंद्राला विस्तृत अधिकार आहेत.

संकट प्रसंगी भारतीय राज्यव्यवस्था एकात्म स्वरूपाची होते पण इतर वेळेला देखील राज्यघटनेने प्रबळ केंद्र सरकारची तरतूद केली आहे. राज्यघटनेने संघराज्य स्वरूपाची रचना काही प्रमाणात स्वीकारली मात्र विकेंद्रीकरणाऐवजी एकात्मतेला प्राधान्य दिले.

घटक राज्यांमध्ये राज्यपाल म्हणून केंद्राद्वारे नियुक्ती होते. राज्यात राष्ट्रपती राजवटीमध्ये राज्यपालांची भूमिका महत्वाची असते. अशा विविध वैशिष्ट्यांमुळे एकात्म शासन पद्धतीकडे झुकलेले संघराज्य असे भारतीय व्यवस्थेचे वर्णन केले जाते.

**५ .आणीबाणी विषयक तरतुदी** –

असामान्य आणि अनपेक्षित परिस्थिती हाताळता यावी म्हणून भारतीय राज्यघटनेने राष्ट्रपतींना आणीबाणी विषयक अधिकार दिले आहेत. भारतीय राज्यघटनेच्या आठव्या भागात कलम ३५२ ते ३६० यांमध्ये या तरतुदी आहेत .कलम ३५२ राष्ट्रीय आणीबाणी

कलम ३५६ घटक राज्यात राष्ट्रपती राजवट

कलम ३६० आर्थिक आणीबाणी

**६.संघराज्य शासन पद्धती-**

संघराज्य शासन पद्धती हे भारतीय राज्यघटनेचे मुख्य वैशिष्ट्य आहे. संघराज्य शासन पद्धतीची सुरुवात भारतामध्ये 1935 च्या कायद्याची झालेली होती. त्यामुळे संघराज्य पद्धतीचा अनुभव भारताला काही प्रमाणत होता.

भारतासारख्या विस्ताराने मोठ्या विविधता असलेल्या देशासाठी संघराज्य पद्धती उपयुक्त मानली गेली व स्वीकारली गेली.

भारतीय संघराज्य **केंद्रोत्सारी** पद्धतीने निर्माण झालेले आहे. केंद्राकडे असलेली सत्ता राज्यांना विभागून दिलेली आहे. केंद्र सूची, राज्य सूची, समवर्ती सूची या तीन सूची राज्यघटनेच्या सातव्या परिशिष्टा मध्ये समाविष्ट केलेल्या आहेत.

**७. संसदीय शासन पद्धती-**

भारतीय राज्यघटनेने संसदीय शासन पद्धती स्वीकारली. अल्पप्रमाणात ब्रिटिशांनी या पद्धतीची सुरुवात भारतावर मध्ये केलेली होती. केंद्र सरकार आणि घटक राज्यांची सरकारे संसदीय शासन पद्धतीची असतात. संसदेचा विश्वास असेपर्यंतच मंत्रिमंडळ सत्तेवर राहते.कायदे मंडळाचे कार्यकारी मंडळावर असणारे नियंत्रण हे या पद्धतीचे वैशिष्ट्य होय. या पद्धतीमुळे अधिक जबाबदार शासन निर्माण होऊ शकेल असा विश्वास घटना समितीला होता.

**८. द्विगृही पद्धतीचे कायदेमंडळ** –

भारताचे केंद्रीय कायदेमंडळ द्विगृही पद्धतीचे आहे, हे भारताच्या राज्यघटनेचे एक प्रमुख वैशिष्ट्य आहे. संघराज्यात घटक राज्यांना केंद्र सरकारच्या कारभारात सहभागी होता यावे म्हणून केंद्रीय कायदे मंडळात दोन सभागृहांची पद्धती असते.

एक सभागृह लोकांचे प्रतिनिधित्व करते ते लोकसभा होय. दुसरे सभागृह घटक राज्यांचे प्रतिनिधित्व करते ते म्हणजे राज्यसभा होय .

 ISBN No. 978-93-91097-18-9

**९.न्यायालयीन स्वातंत्र्य -**

न्यायालयाचे स्वातंत्र्य जपण्यासाठी न्यायाधीशांना सेवा शास्वती, वेतनाची शास्वती, बदनामी पासून संरक्षण या गोष्टींची तरतूद करण्यात आलेली आहे.

कायदे मंडळाने केलेले कायदे आणि प्रशासनाची कृती यांची घटनात्मकता तपासून बघण्याचा म्हणजेच न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अधिकार हे न्याय मंडळाचे वैशिष्ट्य आहे.

**१०.मूलभूत हक्क-**

भारतीय राज्यघटनेच्या तिसऱ्या विभागात कलम १२ ते ३५ मध्ये मूलभूत हक्कांचा समावेश केलेला आहे. मूलभूत हक्कामुळे नागरिकांना व्यक्तिमत्वाच्या विकासाची संधी मिळते. भारताने अमेरिकेच्या राज्यघटने कडून मूलभूत हक्कांची संकल्पना स्वीकारली आहे. हक्क पुढील प्रमाणे आहेत

कलम १४ ते १८ समतेचा अधिकार

कलम १९ ते २२ स्वातंत्र्याचा अधिकार

कलम २३ , २४ शोषणाविरुद्धचा अधिकार

कलम २५ ते २८ धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार

कलम २९ ते ३० सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क

कलम ३२ ते ३५ न्यायालयात दाद मागण्याचा अधिकार

कलम ३१ मधील मालमत्तेचा हक्क आता मूलभूत हक्क नसून नागरी हक्क अथवा कायदेशीर हक्क आहे. १९७८ च्या ४४ व्या घटनादुरुस्तीने हा बदल झाला .

कलम 21 क मध्ये आता शिक्षणाचा मूलभूत हक्क समाविष्ट आहे. वय वर्षे सहा ते चौदा या गटातील मुला-मुलींना मोफत व अनिवार्य शिक्षणाचा हक्क भारतीय घटना देते. सन २००२ च्या ८६ व्या घटनादुरुस्तीने हा बदल करण्यात आला आहे .

**११.मूलभूत कर्तव्य** –

१९७६ च्या ४२ व्या घटनादुरुस्तीने भारतीय राज्यघटनेमध्ये प्रकरण चार मध्ये कलम ५१ मध्ये आकरा मूलभूत कर्तव्यांचा समावेश ला आहे. हक्क व कर्तव्य या दोन्ही एकाच नाण्याच्या या दोन बाजू आहेत, ही राज्यघटनेतील मुलभूत कर्तव्यांच्या समावेशा मागील भूमिका आहे.

**१२.मार्गदर्शक तत्वे**

भारतीय राज्यघटनेच्या चौथ्या भागातील कलम ३६ ते ५१ मध्ये मार्गदर्शक तत्वांचा सामावेश करण्यात आलेला आहे.

सर्वांगीण विकास घडवून आणणे व कल्याणकारी राज्याची ची संकल्पना राबविणे यासाठी मार्गदर्शक तत्त्वे आवश्यक आहेत.मार्गदर्शक तत्त्वे ही ही सामाजिक आर्थिक राजकीय व व परराष्ट्र धोरण संबंधीत आहेत. भारत सरकारने मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न केला आहे , परंतु मार्गदर्शक तत्त्वांचे पालन झाले नाही न्यायालयात दाद मागण्याची राज्यघटनेत तरतूद नाही.

 ISBN No. 978-93-91097-18-9

**१३. लोककल्याणकारी राज्य**

भारतीय राज्य घटनेने **लोककल्याणकारी राज्य** या संकल्पनेचा स्वीकार केला आहे. राज्यघटनेतील मार्गदर्शक तत्त्वांचा उद्देश व्यक्तीचा सर्वांगीण विकास करणे आणि कल्याणकारी राज्य निर्माण करणे हा आहे. धर्म, वंश, जात, प्रदेश असा कोणताही भेदभाव न करता, लोककल्याणाच्या संदर्भात प्रत्येक व्यक्तीचा राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक विकास करणे ही भारताच्या लोककल्याणकारी शासनाची जबाबदारी आहे.

१४.**धार्मिक व भाषिक अल्पसंख्यांकांकरीता तरतुदी** –

भारतीय राज्यघटनेने धार्मिक व व भाषिक अल्पसंख्यकांना आपली भाषा, संस्कृती जतन करण्याचा हक्क दिलेला आहे. भाषिक व धार्मिक अल्पसंख्यांकांना स्वतःच्या शिक्षण संस्था स्थापन करण्याचा आणि चालवण्याचा अधिकार भारतीय राज्यघटनेने दिलेला आहे.

**१५.सामाजिक न्याय** –

भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्यामध्ये न्याय हा शब्द योजलेल्या आहे. सामाजिक, आर्थिक दृष्ट्या वंचित घटकांना शिक्षण, नोकरी आणि राजकीय क्षेत्रात राखीव जागांची तरतूद भारतीय राज्यघटनेने केलेली आहे.

**१६.स्वतंत्र निवडणूक आयोग-**

राज्यघटनेने स्वतंत्र व निष्पक्षपाती निवडणूक आयोगाची तरतूद केली आहे. निवडणूक आयोगावरील आयुक्तांची नेमणूक राष्ट्रपती करतात . निवडणूक विषयक सर्व कामकाज हा आयोग पाहतो. निवडणुकीमध्ये शासनाचा सत्ताधारी पक्षाचा हस्तक्षेप होऊ नये म्हणून ही तरतूद केलेली आहे

**१७.प्रौढ मताधिकार** –

भारतीय राज्यघटने भारतीय नागरिकांमध्ये धर्म, वंश, जात, लिंग, शिक्षण, संपत्ती असा भेदभाव न करता प्रत्येक नागरिकाला सार्वत्रिक प्रौढ मताधिकार दिलेला आहे. १९८९ च्या ६१ व्या घटनादुरुस्तीने मतदाराचे वय २१ वर्षेवरून 18 वर्षे करण्यात आलेले आहे .

**समारोप :**

भारत हा दक्षिण आशियातीलच नव्हे तर जगातील सर्वात मोठा लोकशाही देश आहे.भारताच्या बरोबरीने जगात आशिया ,आफ्रिका ,दक्षिण अमेरिका या खंडामध्ये अनेक देशांना स्वातंत्र्य मिळाले .नवस्वतंत्र देशांनी लोकशाही व्यवस्था स्वीकारली .मात्र त्यापैकी अनेक देशात हुकुमशाही किवा लष्करशाही आली .कारण त्या देशातील राज्यघटना भारताप्रमाणे पूर्णपणे लिखित व विस्तृत स्वरूपाची नव्हती हे एक महत्वाचे कारण होते .

दक्षिण आशियातील देशांचा विचार करता त्यामध्ये भारत, पाकिस्तान, अफगाणिस्तान, मालदीव, मोरीशस, बांगलादेश, नेपाल, म्यानमार, श्रीलंका या देशांचा समावेश करावा लागतो. यापैकी भारत वगळता अन्य कोणत्याही देशात देश स्वतंत्र झाल्यावर लोकशाही व्यवस्था

टिकली नाही .पाकिस्तान ,बांगलादेश मध्ये हुकमशाही होती.म्यानमारमध्ये अनेक वर्षे लष्करशाही आहे .अफगाणिस्तान मध्ये तालिबानची धार्मिक राजवट आहे.

भारतामध्ये संसदीय लोकशाही राज्यघटनेची सलग एकसष्ट वर्षे अमलबजावणी होऊ शकली याचे श्रेय तीन घटकांना जाते : भारतातील सुजाण मतदार ,भारताची सहभागी राजकीय संस्कृती आणि भारतातील लष्कराची मर्यादित भूमिका .दक्षिण आशियातील इतर देशांचा तुलनात्मक विचार करता भारतीय मतदार मूलतः लोकशाही व धर्मनिरपेक्ष व्यक्तिमत्वाचा आहे.भारतीय मतदार धर्मान्ध राजकीय पक्षाला जवळ करत नाही .धर्माधीष्टीत राजकीय पक्ष सत्तेजवळ आलेच तर त्यांना सबका साथ सबका विश्वास अशी भूमिका घ्यावी लागते . महाराष्ट्रातही शिवसेनेने हिंदुत्वाच्या भूमिकेला सोडचिट्ठी दिल्यावरच राष्ट्रवादी व विशेषतः कॉंग्रेसने शिवसेनेने पाठींबा दिला .एकोणीसशे ऐन्शिच्या दशकाच्या उत्तर काळात कॉंग्रेसने धर्मनिरपेक्ष भूमिकेला सोडचिट्ठी देत शहाबानो व आयोध्या या दोन विषयात मुस्लीम व हिंदू मतदारांना धार्मिक आधारावर चुचकारण्याचा प्रयत्न केल्यावर सुजाण भारतीय मतदारांनी कॉंग्रेसचा पराभव केला . एम आय एम ,मुस्लीम लीग ,ए आय डी यु एफ या धार्मिक पक्षांना भारतीय अल्पसंख्याक मतदारांनी एका मर्यादेतच यश दिले .असे इतर शेजारी देशात घडले नाही .

भारतीय लष्कराची मानसिकता पूर्णतः लोकशाही स्वरूपाची आहे . भारतीय लष्कराने कधीही राजकीय प्रक्रियेत हस्तक्षेप केला नाही. जगभरातील तुलनात्मक राज्यशास्त्र व घटनावाद या विषयाच्या अभ्यासकांच्या दृष्टीने भारतीय लष्कराची लोकशाहीवादी भूमिका हा अभ्यासाचा विषय आहे .

**संदर्भ :**

१ Barker Ernest, Principles of Social and Political Theory, Oxford University Press, New York, 1951

२. Kamble Bal & Bhong Shriniwas, Indian Democracy & Fundamentalism, in Indian Democracy & Fundamentalism (Editor: Kamble Bal), Aditya Publications, Latur, 2014

३. Kamble Bal & Bhong Shriniwas, Challenges to Indian Democracy: Demand of Small States, in Kamble Bal (Editor) Challenges to Indian Democracy, Diamond Publication, Pune, 2012

**४.** ऑस्टीन ग्रानव्हील ,(अनुवाद : केळकर भारती ) भारतीय राज्यघटना :राष्ट्राची कोनशीला, डायमंड पब्लिकेशन ,पुणे ,२०१३

५.कांबळे बाळ (संपादक),भारतीय लोकशाहीपुढील आव्हाने ,डायमंड पब्लिकेशन ,पुणे,२०१२

६. कांबळे बाळ, वकील अलीम ,देवरे पी.डी .,भारतीय राज्यघटना ,राजकारण आणि कायदा ,डायमंड पब्लिकेशन्स ,पुणे ,

७.देवगावकर एस जी.,पाच देशांची संविधाने ,श्री साईनाथ प्रकाशन ,नागपूर , २०१३ ८.यादव योगेश व इतर २०१० (अनुवाद : मनोहर सोनवणे ) लोकशाही जिंदाबाद, समकालीन प्रकाशन ,पुणे.

# १९. विधानसभा कामकाज प्रक्रिया आणि संसदीय आयुधे

**प्रा.डॉ. सुखनंदन ढाले**
राज्यशास्त्र विभागप्रमुख
शिवाजी महाविद्यालय, हिंगोली
Email - dhalesu@gmail.com
**Mob - ९८२२६९८८१८**

**प्रस्तावना**

महाराष्ट्र राज्य विधिमंडळाचा इतिहास हा जाज्वल्य व प्रेरणादायी आहे. या विधिमंडळाने देशाला विविध क्षेत्रात नेतृत्व करणारे नेते दिलेले आहेत. मुंबई प्रातांच्या विधिमंडळापासून खऱ्या अर्थाने महाराष्ट्र विधिमंडळाच्या इतिहासाला सुरवात होते. विधानसभेची कार्यपध्दती आणि कामकाज यांचे नियमन करण्यासाठी महाराष्ट्र विधानसभेने भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २०८ खंड (१) अन्वये नियम केलेले आहेत. या नियमांना महाराष्ट्र विधानसभा नियम असे म्हणतात. ते २३ ऑगस्ट १९६० पासून अंमलात आले आहेत. भारतीय संविधानाच्या कलम १७४ अन्वये राज्यपाल विधानसभेच्या अधिवेशनाची वेळ व जागा नेमून देणारी अधिसूचना काढून सचिवामार्फत ती विधानसभा सदस्यांना एक आवाहनपत्र (समन्स) पाठविले जाते. अधिवेशन प्रारंभ झाल्यानंतर अध्यक्षांच्या निर्देशास अधीन राहून सभागृहाच्या बैठकी सोमवार ते शुक्रवार या काळात होतात. सोमवारी दुपारी १२.०० वा. ते सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत, मंगळवार ते गुरुवार ११.०० ते ५.०० वाजेपर्यंत तर शुक्रवारी सकाळी १०.०० ते ६.०० वाजे पर्यंत सभागृहाच्या बैठका चालतात.[१] विधानसभेचे कामकाज मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेत चालते परंतू अध्यक्षांच्या परवानगीने. एखाद्या सदस्यास आपल्या मातृभाषेतून भाषण करता येते. भारतीय राज्यघटनेच्या कलम १७५ आणि १७६ प्रमाणे कायदेमंडळाच अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी तसेच दरवर्षी पहिल्या अधिवेशनाच्या सुरुवातीस विधानसभा व विधानपरिषद या दोन्ही सभागृहाच्या सदस्यांना उद्देशून राज्यपाल अभिभाषण करतात. म.वि.नि. ५९ नूसार सभागृहाचा अध्यक्ष सभागृहातील नेत्यांशी सल्लामसलत करुन अभिभाषणात उल्लेख केलेल्या बाबीवर चर्चा करण्याची वेळ ठरवितात. अभिभाषणात राज्यपाल राज्यशासनाच्या कार्याचा आढावा घेऊन पुढील वर्षभरात राज्यशासनामार्फत हाती घेण्यात येणाऱ्या कार्यक्रमाची माहिती देतात. विधानसभा नियम ६० नूसार राज्यपालाच्या अभिभाषणानंतर कृतज्ञता ठराव एक सदस्य सभागृहात मांडतो. त्यास दुसरा अनुमोदन देतो. राज्यपालाच्या अभिभाषणावर दोन दिवस चर्चा चालते. या चर्चेच्या माध्यमातून विरोधी पक्ष राज्यसरकारवर टिका करतात.[२] काही दुरुस्त्या सुचवितात पण त्या संमत झाल्यावर सरकारला राजीनामा द्यावा लागतो.

 ISBN No. 978-93-91097-18-9

- **संसदीय आयुधे**

जनताभिमुख राज्यकारभार व्हावा यासाठी देशातील राज्यकारभारावर लोकशाहीचे नियंत्रण व देखरेखीसाठी विकसित केलेले वेगवेगळे मार्ग, तंत्रे, साधने यांना संसदीय आयुधे (Devices of Parlimentary Democracy) असे म्हणतात. या आयुधांच्या माध्यमातून लोकप्रतिनिधी कार्यकारी मंडळावर नियंत्रण ठेवतात. विधानसभा सदस्यांच्या कामकाजातील यश हे प्रभावी संसदीय आयुधांच्या वापरावर अवलंबून असते. या संसदीय आयुधांची चर्चा पुढीलप्रमाणे करता येईल.

**१ ) प्रश्नोत्तराचा तास**

संसदीय लोकशाहीमध्ये लोकप्रतिनिधींना मिळालेली प्रमुख आयुध म्हणून प्रथमत: प्रश्नोत्तराच्या तासाचा उल्लेख करावा लागतो. संसद व घटकराज्यांच्या विधिमंडळाच्या कामकाजाची सुरवात ही प्रश्नोत्तराच्या तासाने होते.प्रत्येक दिवसाचा पहिला तास प्रश्नोत्तराचा असतो. या तासाला बहुतेक सर्व सदस्य हजर राहतात. त्याशिवाय सभागृहाच्या गॅलरीत पत्रकार व प्रेक्षकही उपस्थित राहू शकतात. विधानसभा सदस्य मंत्रीमंडळाला प्रश्न विचारतात. त्या विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देणे मंत्रीमंडळाला बंधनकारक असते.[३] प्रश्नोत्तर तासाच्या माध्यमातून विधिमंडळ सदस्य हे राज्यसरकार व नोकरशाहीवर प्रभावी नियंत्रण ठेवू शकतात. सरकारच्या कारभारातील उणीवा, दोष, भ्रष्टाचार उघडकीस आणून जनतेसमोर सरकारला उघडे पाडण्याचे काम याव्दारे केले जाते. संसदीय लोकशाहीच्या विकासात प्रश्नोत्तराचा तास अतिशय महत्वाचा ठरलेला आहे. केंद्रीय व राज्यविधिमंडळात सामान्यत: जे प्रश्न विचारले जातात त्याचे तीन प्रकार पडतात.

अ) तारांकित प्रश्न (Starred Questions) -

सभागृहात ज्या प्रश्नांची उत्तरे तोंडी दिली जातात त्या प्रश्नांना तारांकित प्रश्न म्हणतात. अशा प्रश्नांवर (*) अशी खुण केली जाते. [४]

ब ) अल्पसूचना प्रश्न (Short Notice Questions) ः

अल्पसूचना प्रश्न हा तातडीचा असल्यामुळे तारांकित प्रश्नाच्या आधी घेतला जातो व या प्रश्नावरील चर्चेत तारांकित प्रश्नाप्रमाणे अनुपुरक प्रश्नोत्तरे होतात.[५]

क ) अतारांकित प्रश्न ः

विधानसभा सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांना लेखी स्वरुपात उत्तर हवे असते अशा वेळी सदस्य अतारांकित प्रश्नाची सूचना देतात. केवळ माहिती हवी असते किंवा सांख्यिकिय माहिती विचारली असेल असे प्रश्नही सामान्यत: अतारांकित प्रश्न म्हणून स्विकृत केले जातात. [६]

**२ ) प्रस्ताव (Motion / Proposal)**

एखाद्या विषयावर सभागृहाचे मत आजमावण्यासाठी तसेच त्या बाबतीत निर्णय जाणून घेण्यासाठी सदस्यांमार्फत त्यांचे मत व अपेक्षा प्रदर्शित करणारा प्रस्ताव सभागृहासमोर विचारार्थ आणला जातो. सभागृहाचे मत आजमावण्यासाठी कोणताही

विषय सभागृहासमोर प्रस्तावाच्या माध्यमातून येणे आवश्यक असते. या प्रस्तावावरील चर्चेचे सर्वसाधारण चार भाग पडतात. १) प्रस्ताव मांडणे, २) मा. अध्यक्षांना सभागृहासमोर ठेवणे ३) चर्चा ४) मतदान व सभागहाचा निर्णय.

**३) स्थगन प्रस्ताव (Adjournament Motion)**

महाराष्ट्र विधानसभा नियम ९७ नूसार निकडीच्या तातडीच्या म्हणजेच नेमक्याच घडलेल्या सार्वजनिक महत्वाच्या एखाद्या विषयावर सभागृहासमोर असलेल्या विहीत कामकाज बाजूला सारुन चर्चा करण्यासाठी जो प्रस्ताव मांडावयाचा असतो. त्याला स्थगन प्रस्ताव म्हणतात. सभागृहात हा प्रस्ताव मांडण्यापूर्वी अध्यक्षांची त्यास अनुमती मिळणे आवश्यक आहे. त्या सदस्याचे सभागृहाच्या अनुमतीसाठी प्रस्ताव मांडल्यानंतर २९ किंवा जादा सदस्य उभे राहिल्यास सभागृहाची अनुमती आहे किंवा २९ पेक्षा कमी सदस्य उभे राहिल्यास सभागृहाची अनुमती नाही असे मा. अध्यक्ष जाहिर करतात. त्यानंतर त्या सभागृहाच्या बैठकीचे शेवटचे दोन तास उपलब्ध असतांना सभागृहासमोर असलेले विहित कामकाज बाजूला सारुन स्थगन प्रस्तावावर चर्चा सुरु होते.[७]

**४ ) लक्षवेधी सूचना (Calling Attention)**

सार्वजनिक महत्वाच्या आणि तातडीच्या बाबीकडे संबंधित खात्याच्या मंत्र्याचे लक्ष वेधण्यासाठी जी सूचना दिली जाते तिला लक्षवेधी सूचना म्हणतात. महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ मध्ये या आयुधाची तरतुद केलेली आहे.[८]

**५) अर्धा-तास चर्चा (Half an hour discussion)**

महाराष्ट्र विधानसभा नियम ९४ अन्वये अर्धा तास चर्चा हे विधिमंडळात वापरले जाणारे महत्वाचे संसदीय आयुध आहे. इतर सार्वजनिक महत्वाच्या विषयावरसुध्दा चर्चा उपस्थित करणे सुलभ झाले आहे.[९]

**६) अल्पकालीन चर्चा (Short Duration Discussion)**

महाराष्ट्र विधानसभा नियम १०१ अन्वये सार्वजनिक निवडीच्या विषयावर चर्चा उपस्थित करण्याचे हे एक महत्वाचे संसदीय आयुध उपलब्ध आहे. या चर्चेला जास्तीत जास्त अडीच तास वेळ असल्यामुळे तातडीचे सार्वजनिक महत्वाच्या विषयावर सभागृहात चर्चा उपस्थित करण्यासाठी सदस्यांना विशेषत: विरोधी पक्षाच्या सदस्यांना एक जास्त संधी मिळते. अल्पकालीन चर्चेची तरतूद सन १९५८ ला करण्यात आली. त्यामुळे अल्पकालीन चर्चा हे संसदीय आयुध सदस्यांना अधिक उपयुक्त ठरले आहे.[१०]

**७) अंतिम आठवडा प्रस्ताव (Last Week Motion)**

महाराष्ट्र विधानसभा नियम २९२ अन्वये १९७१ ला या प्रस्तावासंबंधीच्या तरतूदीचा समावेश करण्यात आला आहे. या प्रस्तावाचा महत्वाचा उद्देश म्हणजे सभागृह स्थगित होण्यापूर्वी निकटच्या कालावधीत अडचणी, समस्या/प्रश्न सभागृहासमोर आणणे हा आहे. सभागृहातील नेत्यांशी विचार विनिमय करुन अशा पुरेशा सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा घडून आणण्यासाठी शेवटच्या आठवड्यातील एक दिवस नेमून देतात. त्यासाठी तीन दिवस अगोदर प्रस्तावाची लेखी सूचना देता येईल. सूचना स्विकारण्यापूर्वी अध्यक्ष ज्या विभागाशी तो प्रस्ताव संबंधीत असेल त्या विभागाच्या मंत्र्यांशी सल्लामसलत

करतात. राज्यातील कायदा सुव्यवस्था, महागाई, पाणी प्रश्न या सारखे सार्वजनिक व निकडीचे विषय या प्रस्तावाव्दारे सभागृहा समोर मांडता येतात.[११]

**८ )अविश्वास प्रस्ताव (No Confidacne Motion)**

महाराष्ट्र विधानसभा नियम ९५ अन्वये मंत्रीमंडळावर विधानसभेचा विश्वास आहे किंवा नाही हे ठरविणे या प्रस्तावाचे उद्दिष्ट्ये आहे. मंत्रीमंडळावर अविश्वास व्यक्त करणाऱ्या किंवा एखाद्या विशिष्ट बाबतीतील मंत्रीमंडळाच्या कामाविषयी नापसंती व्यक्त करणाऱ्या प्रस्तावाची लेखी सूचना देणे आवश्यक असते. विधानसभेचे अधिवेशन चालू असतांना असा प्रस्ताव अध्यक्षांनी स्विकृत करुन घेतल्यास स्विकृत केल्यापासून दोन दिवसांहून उशिरा नाही अशा अध्यक्ष नेमतील त्या दिवशी प्रश्नोत्तरानंतर व त्या दिवसाच्या यादीतील कामकाज सुरु होण्यापूर्वी प्रस्ताव मांडण्यास अनुमती मागितल्यानंतर अध्यक्ष तो प्रस्ताव वाचून दाखवितात व २९ किंवा त्यापेक्षा जास्त सदस्य उभे राहिल्यास सदर प्रस्ताव मांडण्यास परवानगी आहे असे सांगून व त्या दिवसापासून तीन दिवसाहून अधिचा व सात दिवसाहून उशिरा नाही असा अध्यक्ष नेमून देतील त्या दिवशी तो विचारात घेण्यात येईल असे अध्यक्ष जाहिर करतात. २९ पेक्षा कमी सदस्य उभे राहिल्यास प्रस्ताव मांडण्यास विधानभेची परवानगी नाही असे मा. अध्यक्ष जाहिर करतात. प्रस्तावावर चर्चा घेऊन मुख्यमंत्र्यांचे उत्तर होते. त्यानंतर मतदानाव्दारे या प्रस्तावावर निर्णय घेतला जातो.

**९) विश्वासदर्शक प्रस्ताव (Confidacne Motion)**

संसदीय लोकशाहीत मंत्रीमंडळ सामुदायिकरित्या विधानसभेला जबाबदार असते. विधानसभेचा विश्वास असे पर्यंतच मंत्रीमंडळ सत्तेवर राहू शकते. म्हणून विधानसभेत मुख्यमंत्र्यांना बहुमत सिध्द करता यावे हा या प्रस्तावाचा उद्देश आहे. विश्वासदर्शक प्रस्तावासंबंधी नियमात विशिष्ट अशी तरतूद नाही. महाराष्ट्र विधानसभा नियम २३ अन्वये ज्या बाबतीत विधानसभेच्या निर्णयाची आवश्यकता असेल अशा बाबिचा निर्णय मा. अध्यक्ष सदस्यांनी मांडलेला प्रस्ताव मतास टाकून करतील. महाराष्ट्र विधानसभा नियम २३(२) नूसार मंत्रीमंडळावर विश्वास व्यक्त करण्यासाठी प्रस्तावाची लेखी सूचना देणे आवश्यक आहे. प्रस्तावाची सूचना अध्यक्षांनी स्विकृत केल्यानंतर या प्रश्नावर चर्चा केंव्हा घ्यावयाची व चर्चेला किती वेळ द्यावा याबाबतचा निर्णय कामकाज सल्लागार समितीच्या बैठकांमध्ये घेण्यात येतो. प्रस्तावावर चर्चा होऊन मुख्यमंत्र्याचे आभार प्रदर्शक भाषण होते व नंतर मतदानाव्दारे या प्रस्तावावर निर्णय घेण्यात येतो.[१२]

**१०) अध्यक्षांना व उपाध्यक्षांना पदावरुन दूर करण्यासंबंधीचा प्रस्ताव**

**(Removal of speaker/Dy. Speaker Motion)**

भारतीय राज्यघटनेच्या कलम १७९ अन्वये अध्यक्षांना किंवा उपाध्यक्षांना पदावरुन दूर करण्यासंबंधीचा प्रस्ताव मांडण्याकरीता १४ दिवसांची सूचना द्यावी लागते. सूचनेची मुदत संपल्यानंतर अध्यक्ष असा प्रस्ताव वाचून दाखवितात व जे सदस्य प्रस्ताव वाचून दाखवितात व जे सदस्य प्रस्ताव मांडण्याची परवानगी देण्यास अनुकूल असतील त्यांना आपापल्या जागेवर उभे राहण्याची विनंती करतात. २९ किंवा त्यापेक्षा अधिक सदस्य उभे राहिल्यास प्रस्ताव मांडण्यास अनुमती दिली जाते व अनुमती दिल्यापासून ७

दिवसाच्या आत अध्यक्ष ठरवतील त्या दिवशी प्रस्ताव विचारात घेतला जातो. जर २९ पेक्षा कमी सदस्य उभे राहिले तर प्रस्ताव विधानसभेची अनुमती नाही असे अध्यक्ष जाहिर करतात.[१३]

**११) ठराव (Resolution)**

सार्वजनिक हिताच्या प्रश्नांवर सभागृहात चर्चा करण्यासाठी ठराव हे संसदीय आयुध अत्यंत महत्वाचे आहे. ठराव हा एक मुळ प्रस्तावच आहे. या ठरावाचे पुढील काही प्रकार पडतात.

अ) अशासकीय ठराव (Non-official Resolution) - महाराष्ट्र विधानसभा नियम १०६ अन्वये हा ठराव मांडला जातो. विधानसभा नियम १२ अन्वये शुक्रवारच्या बैठकीचे शेवटचे अडीच तास अशासकीय कामकाजासाठी नेमून देण्यात येतात.

ब ) शासकीय ठराव (Official Resolution)- महाराष्ट्र विधानसभा नियम ११० अन्वये ज्या ठरावांची सूचना मंत्री किंवा महाधिवक्ता यांनी दिलेली असेल त्याला शासकीय ठराव म्हणतात अशा ठरावाच्या बाबतीत सात दिवसाची सूचना द्यावी लागते.

क ) संवैधानिक प्रस्ताव (Staturory Motion)- महाराष्ट्र विधानसभा नियम २९०अन्वये संविधान व अधिनियामतील तरतुदीच्या अनुषंगाने हा प्रस्ताव मांडला जातो. यामुळे या प्रस्तावाला संवैधानिक प्रस्ताव असे म्हणतात. हा प्रस्ताव मंत्री अथवा अशासकीय सदस्य यांना मांडता येतो. अध्यादेश नापसंतीचा प्रस्ताव मा. अध्यक्ष, उपाध्यक्षांना पदावरुन दूर करण्यासंबंधीच्या प्रस्तावाचा यात समोवश होतो.

**१२) अभिनंदनपर प्रस्ताव (Congratulatory Motion)**

सभागृहाच्या बैठकीस प्रारंभ होण्यापुर्वी अध्यक्षांच्या परवानगीने अभिनंदनपर प्रस्ताव प्रश्नोत्तराच्या वेळेनंतर कोणत्याही वेळी मांडता येतो.[१४]

**सारांश**

लोकशाही शासन पध्दती ही जगातील एक सर्वोत्तम शासन पध्दती म्हणून आज नावारुपास आली आहे. ब्रिटीश पार्लमेंटच्या धर्तीवर जगातील जवळपास ११५ देशांनी प्रातिनिधिक लोकशाहीचा स्विकार केलेला असून देशातील राज्यकारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठी वेगवेगळ्या संसदीय आयुधांचा वापर केला जातो. लोकशाही शासनव्यवस्थेत जनता ही सार्वभौम असते. त्यामुळे लोकांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधीला मंत्रीमंडळ हे जबाबदार असते. जोपर्यंत लोकप्रतिनिधी सभागृहा चा (विधानसभेचा) पाठिंबा मंत्रीमंडळाला असेल तोपर्यंतच मंत्रीमंडळ सत्तेवर राहू शकते. मंत्रीमंडळावर लोकप्रतिनिधीचे नियंत्रण राहावे यासाठी योग्य काम करणाऱ्या शासनाला पाठिंबा देणे, अयोग्य काम करणाऱ्या शासनाला बदलणे, त्यांना लोकहितवादी बनविणे, त्यांच्या चुकांबद्दल जाब विचारणे, धोरणात बदल करण्यास भाग पाडणे, लोकहिताचे निर्णय घेण्यास भाग पाडणे, शासनाच्या कारभारात पारदर्शकता निर्माण करण्यासाठी विधिमंडळ सदस्यांना प्रश्नोत्तराचा तास, प्रस्ताव, लक्षवेधी सूचना, अर्धा तास चर्चा, अल्पकालीन चर्चा, अंतिम आठवडा प्रस्ताव, अविश्वास प्रस्ताव, विश्वासदर्शक प्रस्ताव, ठराव, अभिनंदन प्रस्ताव अशा संसदीय आयुधांचा वेळेनूसार वापर करता येतो. यामुळे

लोकशाहीला बळकटी येते. शासनाच्या ध्येयधोरणासंबंधी तसेच जनकल्याणार्थ राबविण्यात येणाऱ्या विविध योजना, प्रश्नांवर, धोरणावर विधिमंडळात साधक-बाधक चर्चा होते. चर्चेअंती निर्णय घेतले जातात. यातून विधिमंडळ सदस्य विविध संसदीय आयुधांच्या माध्यमातून शासनाला दिशा देण्याचे व प्रशासन गतिमान करण्याचे कार्य करत असतात.

**संदर्भसूची**


१) महाराष्ट्र विधानसभा नियम (२०१४), अकरावी आवृत्ती, महाराष्ट्र विधिमंडळ सचिवालय, मुंबई - २२.

२) चतुरस्त्र वसंतराव, नाईक - हरित क्रांतीचे प्रणेते (२०१५), महाराष्ट्र विधिमंडळ सचिवालय, मुंबई.

३) गव्हाणे, डॉ. अजय, (२०१४), संसदीय लोकशाहीची आयुधे, नांदेड, क्रिएटिव्ह पब्लिकेशन, १३५.

४) गव्हाणे, डॉ. अजय, (२०१४), संसदीय लोकशाहीची आयुधे, नांदेड, क्रिएटिव्ह पब्लिकेशन, १४२.

५) महाराष्ट्र विधानसभा नियम (२०१४), अकरावी आवृत्ती, महाराष्ट्र विधिमंडळ सचिवालय, मुंबई - २८.

६) गिरमे, के.टी., (१९८३), विधानसभा परिचय आणि कामकाज, व्दितीय आवृत्ती पुणे, विद्या प्रकाशन, १८५.

७) कळसे, अनंत., (संकलन) (२०१५), भारतीय संविधानाची तौलानिक वैशिष्ट्ये व विधिमंडळ कामकाज, मुंबई, महाराष्ट्र विधिमंडळ सचिवालय व राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखा १६.

८) कळसे, अनंत., (संकलन) (२०१५), भारतीय संविधानाची तौलानिक वैशिष्ट्ये व विधिमंडळ कामकाज, मुंबइ, महाराष्ट्र विधिमंडळ सचिवालय व राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखा १६

९) कळसे, अनंत., (संकलन) (२०१५), भारतीय संविधानाची तौलानिक वैशिष्ट्ये व विधिमंडळ कामकाज, मुंबई, महाराष्ट्र विधिमंडळ सचिवालय व राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखा १७

१०) कळसे, अनंत., (संकलन) (२०१५), भारतीय संविधानाची तौलानिक वैशिष्ट्ये व विधिमंडळ कामकाज, मुंबई, महाराष्ट्र विधिमंडळ सचिवालय व राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखा २०.

११) गव्हाणे, डॉ. अजय, (२०१४), संसदीय लोकशाहीची आयुधे, नांदेड, क्रिएटिव्ह पब्लिकेशन, १४६.

 ISBN No. 978-93-91097-18-9

# २०. तीन केंद्रिय घटनात्मक संस्थाचे अधिकार व स्वायत्ता : एक दृष्टिक्षेप

**डॉ. चंद्रशेखर शंकरराव ढोले**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
शिवजागृती महाविद्यालय, नळेगाव
ता. चाकूर जि. लातूर
मो. 8788105453

२६ जानेवारी १९५० पासून राज्यघटनेची अंमलबजावणी सुरू झाली. भारतीय राज्यघटना लिखित असल्यामुळे कायदा हा सर्वश्रेष्ठ सर्व भारतीयांना तो लागू असेल येथे कायदयाचे राज्य असल्यामुळे कायद्यासमोर कोणीच मोठा नाही. सर्व भारतीय कायद्यासमोर समान हे तत्व विशेष आहे. भारतीय घटनाकारांनी सत्तेचा समतोल राखून फेडरेशनच्या (संघराज्य) ऐवजी युनियन ऑफ स्टेटस (राज्याचा संघ) कलम १ मध्ये स्वीकारले आहे. त्यानुसार केंद्र व राज्याच्या अधिकार व कर्तव्याचे वाटप करण्यात आले आहे. केंद्राच्या अधिकारात ९७ विषय येतात जे राष्ट्रीय स्तराव महत्वाचे आहेत. आणि या विषयावर फक्त केंद्रसरकारचाच अधिकार असेल तर राज्याच्या अधिकारात ६६ विषय येतात. तर समवर्ती सुचित ४७ विषयाचा समावेश करण्यात आला आहे. एखाद्या विषयाबद्दल केंद्र व राज्य याच्यात वाद झाला तर भारताची न्यायसंस्था त्याबाबत कायद्यानुसार न्यायनिवाडा करते. केंद्रसरकार व राज्यसरकारच्या अधिकारांतर्गत अनेक नियामक संस्था काम करतात या संस्थाना घटनात्मक अधिकार व स्वायत्तता देण्यात येऊन या संस्थावर जी जबाबदारी सोपविण्यात आली आहे. ती ते नियम, कायदा, नि:पक्षपातीपणा व पारदर्शपणे निभावतील ही अपेक्षा ठेऊन यांची स्थापना करण्यात आली आहे. सीबीआय (Central Bureau of Investigation) ईडी (Directorate of Enforcement) एनसीबी (Narcotics Control Bureau) आयटीसह अनेक संस्था (Income tax) तर राज्यसरकारच्या अधिकारात सीआयडी, एटीएस, एल.सी.बी., महाराष्ट्र पोलीस अशा ब-याच संस्था कार्य करतात. प्रस्तुत शोध निबंधात कांही केंद्रिय तपास संस्थाचा अभ्यास करण्यात आला आहे.

प्रस्तुत शोध निबंध लिहिण्याचा उद्देश म्हणजे सध्या महाराष्ट्रात या संस्थांनी ज्या कार्यवाह्या सूरू केल्या आहेत. ज्यामुळे देशासह महाराष्ट्राचे राजकीय व सामाजिक जीवन ढवळून निघाले आहे. विशेष म्हणजे महाराष्ट्रात तीन पक्षाचे आघाडी सरकार आल्यापासून गेल्या दोन वर्षात त्यात सुशांतसिंह राजपूत मत्यू प्रकरणापासून प्रारंभ झाला

आहे. प्रस्तुत शोध निबंधामध्ये काही केंद्रिय तपास यंत्रणाच्या अधिकार स्वायत्तता त्याच्यावरील आरोपावर भाष्य करण्यात आले आहे.

**१) सीबीआय (Central Bureau of Investigation)**

ही भारतातील नामांकित संस्था आहे. अनेक प्रकरणात या संस्थेने अतिशय चांली भुमिका बजावली आहे. या संस्थेचा नावलौकिक आहे. केंद्रसरकारच्या अधिकारात येणारी सीबीआय ही संस्था भ्रष्टाचार, गुन्हे, आर्थिक घोटाळे व जनहिताच्या गंभीर प्रश्नावर ही संस्था चौकशी करते. सीबीआयला केंद्रसरकारच्या आदेशानुसार काम करावे लागते. पण हे कार्य कायद्याच्या चौकटीतच राहून करावे लागते. केंद्रसरकारला पण कायद्यानुसार चौकशीसाठी सीबीआयकडे विषय द्यावा लागतो. राजकीय किंवा इतर द्वेषातून चौकशी सरकारने करू नये हे पण बंधन आहे. त्यांनी दबावातून चौकशी न करता स्वतंत्रपणे कोणत्याही प्रकरणाची चौकशी करावी हा घटनात्मक नियम आहे. पण सुशांतसिंह राजपुत प्रकरणामध्ये सीबीआय, ईडी, एनसीबी यांनी तपास केला व या प्रकरणावर टप्प्या टप्प्याने राजकीय आरोप प्रत्यारोप होऊ लागले तेंव्हा सर्वोच्च न्यायालयाने या संस्थेबाबत जे विधान सात वर्षापूर्वी केले त्याची आठवण व चर्चा देशात होऊ लागली. सोशल मिडीयामध्ये यावर चर्चा बघायला मिळाली. विशेष म्हणजे दिल्ली, बिहार व महाराष्ट्रात सुशांत प्रकरण आणि या प्रकरणाच्या तपास करणा-या यंत्रणावर सर्वसामान्य जनता बुध्दिवादी लोक चर्चा करू लागले होते. मग अशा वेळी अशा संस्थांनी आपली स्वायत्तता व स्वातंत्र्य अबाधित ठेऊन प्रत्येक प्रकरणाची चौकशी दबावाला बळी न पडता केली पाहिजे. सुशांतसिंह राजपुत प्रकरणात राजकारण आले. त्यामुळे या प्रकरणाचा तपास करीत होते पण केंद्रिय तपास यंत्रणाकडे गेल्यामुळे हा तपास सीबीआय करीत आहे. महाराष्ट्र पोलीसांनी योग्य तपास केले आहे. हे न्यायालयाचे विधान असताना पण राजकीय संघर्षातून ही केस या केंद्रिय यंत्रणाकडे देण्यात आली आहे असे आरोप कॉंग्रेस, राष्ट्रवादी कॉंग्रेस व शिवसेना या पक्षांनी केला. ज्यावेळी असे आरोप होतात तेंव्हा या तपास यंत्रणाविषयी संशय निर्माण होतो व लोकांचा विश्वास त्याच्यावर राहत नाही. तेंव्हा या केंद्रिय संस्थांनी स्वायत्तता व स्वातंत्र्य टिकवून नि:पक्षपाती चौकशी केला तर गुन्हेगार लोकांच्या समोर येईल. सुशांत राजपुत प्रकरण राजकारणातून पुढे आले. त्यामुळे त्या प्रकरणाचा तपास आतापर्यंतही पूर्ण होऊ शकले नाही.

**२) ईडी (Directorate of Enforcement)**

अंमलबजावणी संचालनालय मनी लॉड्रींगसह अनेक गैरव्यवहाराची चौकशी करीत असता तसा अधिकार या संस्थेला घटनात्मकरित्या प्राप्त झाला आहे. सध्या महाराष्ट्रात

ईडी हा शब्द खुप लोकप्रिय झाला आहे. सोशल मिडीयावर याबाबत खुप चर्चा चालु आहे. महाराष्ट्राचे माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्यावर परमवीर सिंहानी भ्रष्टाचाराचे आरोप केले. आणि हे प्रकरण पण राजकीय झाले. या प्रकरणावर आरोप प्रत्यारोप होऊ लागले. या प्रकरणाचा तपास केंद्रसरकारच्या आदेशाने ईडी करत आहे. अनिल देशमुख यांच्या प्रमाणेच राज्यातील महाविकास आघाडीतील प्रताप सरनाईक, एकनाथ खडसे, संजय राऊत यांची पण ईडी चौकशी झाली. पुढे या प्रकरणाचे काय झाले त्याचे उत्तर लोकांना मिळाले नाही. उत्तर जर मिळत नसेल तर सगळयाच बाबी संशयाच्या घे-यात राहतात. शरद पवार व राज ठाकरे दोन वर्षाखाली ईडी चौकशीला सामोरे गेले होते. त्याही बाबतीत पुढे काय झाले याचे उत्तर महाराष्ट्रातील जनतेला मिळाले नाही. अनिल देशमुख यांच्यावर जे आरोप झाले आहेत त्याची चौकशी चालू आहे. किमान हे प्रकरण तरी निकालात काढले पाहिजे. विनाकाराण त्रास देण्यासाठी या यंत्रणानी दबावातून कार्य करू नये हा घटनात्मक नियम आहे. पण महाराष्ट्रात ज्या पध्दतीने इडी, आयटी व एनसीबी सक्रिय झाल्या आहेत त्यावरून सोशल मिडीयात जनता व राजकीय पक्षात वेगवेगळया पध्दतीने चर्चा होत आहे. आणि अशी चर्चा ही घटनात्मक संस्थाच्या स्वायत्तता व स्वातंत्र्यासाठी चांगली असणार नाही या संस्थानी दबावातून चौकशी न करता स्वतंत्रपणे चौकशी करून गुन्हेगार शोधले पाहिजेत तरच या संस्थाविषयी लोकांच्या मनात चांगली भावना साहित्य व चांगली चर्चा पण होईल.

**३) एनसीबी (Narcotics Control Bureau)**

सुशांतसिंह राजपुत प्रकरण ते सध्याचे आर्यन खान प्रकरणापूढे एनसीबी महाराष्ट्रातील सर्वसामान्य लोकांना माहिती झाले या संस्थेविषयी पण सोशल मिडीया चर्चा सुरू झाली. ती अनेक अर्थाने एनसीबी ही केंद्रिय संस्था अंमली पदार्थाच्या तस्करी व वापर याबाबत तपास करून गुन्हेगार शोधत असते. अंमली पदार्थ भारतात कसे आले याची पण चौकशी करीत असते. गेल्या अनेक वर्षापासून अंमली पदार्थाची तस्करी व त्यासंदर्भातील अनेक प्रकरणात या संस्थेने अतिशय चांगले काम केले आहे. भारताच्या अनेक राज्यात अंमली पदार्थांची तस्करी होत असते. त्यात पंजाब, उत्तरप्रदेश, असाम, दिल्ली, सिक्कीम या राज्यांचा समावेश होतो. पण सुशांतसिंह प्रकरणानंतर महाराष्ट्रात एनसीबी सक्रिय झाली. आर्यनखान प्रकरणामुळे याला वेगळेच वळण लागले या प्रकरणात राजकीय आरोप प्रत्यारोप झाले. प्रचंड संशय व गोंधळ निर्माण झाला. नवाब मलिक यांनी एनसीबीवर गंभीर आरोप आर्यन खान प्रकरणात केले. एनसीबीला आपल्याच अधिका-याची चौकशी करावी लागली तेंव्हा अधिकच संशय वाढला. आणि प्रकरण राजकीय झाले. ज्यावेळी तपास यंत्रणा एखाद्या प्रकरणाची चौकशी करतात तेंव्हा राजकीय हस्तक्षेप वाढतो तेंव्हा

तपास यंत्रणाच्या कामात अडथळे निर्माण होतात. पण या तपास यंत्रणानी तटस्थपणे व नि:पक्षपातीपणे कोणत्याही दबावाला बळी न पडता कायद्याच्या कक्षेत राहून चौकशी केली पाहिजे. पण या सर्व संस्था  आज महाराष्ट्रात सक्रिय झाल्या आहेत. पण गुजरातच्या एका विमानतळावर २१ हजार कोटींचे ड्रग्ज सापडते तेंव्हा त्या प्रकरणाची चौकशी करायला पाहिजे होती. देशात ड्रग्ज येतो कसा याची चौकशी झाली पाहिजे. देशात ड्रग्ज येऊ नये यासाठी उपाययोजना तयार केल्या पाहिजेत.

**निष्कर्ष :-**

१) युवकांमध्ये अंमली पदार्थांच्या सेवनाबाबत जनजागृती करावी.

२) सरकारी व्यसनमुक्ती केंद्र स्थापन करावेत.

३) राजकीय दबावातून या संस्थांनी काम करू नये.

४) उत्पन्नापेक्षा जास्त संपत्ती या संस्थानी नि:पक्षपातीपणे शोधावी.

५) विशिष्ट राजकीय पक्षाच्या नेत्यांना विनाकारण चौकशीला बोलावू नये.

६) गुन्हेगारांनाच शोधावे व नोटीस द्यावी अटक करावे.

७) गुन्हेगार विदेशात पळून जाऊ नये याची काळजी घ्यावी.

८) कुणाच्या आदेशावरून काम न करता कायद्यानुसार कार्यवाही करावी.

९) या तपास संस्थानी आपले स्वातंत्र्य, स्वायत्तता जोपासावी व राजकारणापासून अलिप्त रहावे.

**समारोप :-**

अनेक केंद्रिय तपास व इतर संस्थानी भारताच्या स्वातंत्र्यानंतर अनेक प्रकरणात खुप महत्वाची भुमिका व जबाबदारी पार पाडली आहे. त्यामुळे या संस्थांची लोकप्रियता निश्चितच जास्त आहे. तसेच मुंबई पोलीस व महाराष्ट्र पोलीस हे पण जागतिक स्तरावर आपला नावलौकिक ठेवून आहेत. या सर्व संस्थानी भारतीय राज्यघटनेतील तरतुदी व नियमाप्रमाणे राजकीय दबावापासून मुक्त राहून स्वतंत्रपणे व नि:पक्षपातीपणे चौकशी करायला पाहिजे. ही सर्वसामान्य भारतीयाची अपेक्षा व इच्छा असते.

**संदर्भ :-**

१) भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण, भा. ल. भोळे, पिंपळापुरे प्रकाशन,नागपूर

२) Internet दै. लोकसत्ता, दै. लोकमत, दै. सामना ऑक्टोबर नोव्हेंबर अंक

# २१. भारतीय संविधानाची उददेशपत्रिका

**सुभाष किसनराव पोले**
(संशोधक विद्यार्थी)
लोकप्रशासन विभाग
डॉ. बा.आं.म. विदयापीठ, औरंगाबाद

प्रस्तावाना :-

जगातील प्रत्येक राष्ट्राच्या संविधानात विशिष्ट तत्वज्ञान अंतर्भूत असते. आर्थीक, सामाजीक, शैक्षणिक, नैतिक, सांस्कृतीक संदर्भ ग्रहीत धरून विशिष्ट तत्वे मांडलेली असतात. त्यांना तत्वज्ञान किंवा विचारसरणी असे म्हणतात. भारतीय राज्यघटनेत देखील अंत्यत मौल्यवान असे तत्वज्ञान सामाविष्ट केलेले आहे. पंडीत जवाहरलाल नेहरू यांनी 22 जानेवारी 1947 रोजी संविधान सभेत जो उदीष्टांचा ठराव मांडला. या ठरावाच्या सहयाने मुलभूत तत्वे संविधानात समाविष्ट केलेली आहेत.देशपत्रिका/ सरनामा/ प्रस्तावना यालाच संविधानाचा संक्षिप्त आराखडा किंवा संविधानाचे सार असे म्हणतात. प्रसिध्द न्यायतज्ञ एन. ए. पालकिवाला यांनी संविधानाच्या प्रस्तावनेला ‘ संविधानाचे परिचय पत्र ’ असे म्हटले आहे. नेहरूनी मांडलेल्या उदेशप्रस्तावाला 42 व्या संविधान संशोधन अधिनियम 1976 दवारे दूरूस्त करून त्यामध्ये समाजवाद,धर्मनिरपेक्षता आणी अखंडता अशी तत्वे समाविष्ट करण्यात आली. लोकशाही, प्रज्यासताक, सार्वभौमत्व, संघराज्य, राज्याना स्वायतत्ता, सार्वभौम जनता, सर्वाना समान न्याय, सर्वाना समान स्वातंत्र, अधिकार, धर्मस्वातंत्र, अल्पसंख्याकाच्या हिताच्या रक्षण, भौगोलीक एकात्मता असे भारतीय राज्यघटनेचे तत्वज्ञान आहे. असा तत्वज्ञानाला अनुसरून संविधानाच्या प्रारंभी एक उदेशपत्रिका किंवा प्रास्ताविक (Preamble) लिहीण्यात आलेले आहे. भारतीय तत्वज्ञान, ध्येय, उदीष्ट यांच्या संक्षिप्त मांडणीला उदेशपत्रीका असे म्हणतात. घटनाकारांनी, पर्यायाने संपूर्ण जनतेने आपल्या उराशी बाळगलेली स्वप्ने प्रस्तावनेत प्रतिबिंबीत झालेली असतात. याच प्रस्तावनेसह संपूर्ण राज्यघटनेला 26 नोव्हेंबर1949 रोजी मान्यता मिळाली आणी 26 जानेवारी 1950 पासून भारतीय संविधानाची अंमलबजावणी करण्यात आली. **उदेशपत्रिकेचे विश्लेषण** तीन भागात केले जाते. शासन संस्थेचे स्वरूप, राज्यघटनेचे उदीष्टे , जनतेचे सार्वभौमत्व. सार्वभौम,प्रजासताक, गणराज्य स्वरूपाचे शासन संविधानाने स्विकारलेले आहे. प्रस्तावनेत संपूर्ण संविधानाचे सार असते. **उदेशपत्रीकेचे मुलतत्व आहेत.** संविधानाच्या अधिकाराचा उगम भारतीय संविधानाच्या उदेशपत्रीकेत

 ISBN No. 978-93-91097-18-9

स्पष्ट केले आहे की, देशाची संपूर्ण सत्ता लोकांच्या हातात विकेंदीकृत स्वरूपात सोपवलेली आहे. भारत एक सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, गणराज्य, राज्यव्यवस्था असलेला देश आहे. न्याय स्वातंत्र, समता, व बंधूता हे भारतीय संविधानाचे मूलभूत तत्व आहेत.

**भारताचे संविधान**

**प्रास्ताविक किंवा उददेशपत्रिका**

आम्ही भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम
समाजवादी धर्मनिरपेक्ष प्रजासत्ताक गणराज्य घडविण्याचा
व त्यांच्या सर्व नागरीकांस,
सामाजीक, आर्थीक व राजनैतीक **न्याय**,
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रध्दा
व उपासना यांचे **स्वातंत्र**,
दर्जाची व संधीची **समानता**,
निश्चीतपणे प्राप्त करून देण्याचा
आणी सर्वामध्ये व्यक्तीची प्रतिष्टा
आणी राष्टाचे ऐक्य व एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधूता**
निश्चीतपणे प्राप्त करून देण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून,
आमच्या संविधान सभेत
आज दिनांक 26 नोव्हेबर 1949 रोजी
याद्वारे हे संविधान अंगीकृत आणी अधीनीयमीत करून स्व:प्रत अर्पण करीत आहेत.

**उदेशपत्रिकेचे मुलतत्वे :-**

**१) सार्वभौमत्व :-**

ब्रिटीशाने भारतात सुमारे 150 वर्षे राज्य केले.1947 पर्यंत भारत ब्रिटीशांच्या अधिपत्याखाली होता. ब्रिटीशांची राजवट एक वसाहत होती. जिचे नियंत्रण सर्वावर होते परंतू जिच्यावर इतराचे नियंत्रण नव्हते त्या शक्तीस सार्वाभौमत्व म्हणतात.15 ऑगस्ट 1947 मध्ये भारत स्वातंत्र झाला. बाहय दृष्टीने व अंतर्गत दृष्टीनेही सार्वभौमत्व प्राप्त होउन स्व:ताचे सरकार स्थापन झाले.

**२) प्रज्यासत्ताक :-**

प्रज्यासताक शासन व्यवस्था ही असी शासन व्यवस्था असते की ज्यात सर्व नागरीकाना प्रत्येक्ष वा अप्रत्यक्ष रिताने सहभागी होता येते.भारतात प्रजासताक आहे

कारण येथे अप्रत्यक्षरीत्या म्हणजे जनतेने निवडूण दिलेल्या प्रतिनिधीमार्फत राज्यकारभार चालवीला जातो.

**3) गणराज्य :**

कोणत्याही गणराज्यात राज्यप्रमुख हा लोकानी निवडून दिलेला असतो. तो वंश परंपरेवर आधारलेला नसतो.ब्लुंटली यांच्या मते ज्या राज्यातील लोक एकाच वेळी प्रज्या व स्वतंत्र नागरीक असा दोन भुमीक पार पाडीत असतात व ज्या राज्यातील सत्ता कोणाएकाकडे मालकी हक्काप्रमाणे न रहाता ती लोककल्यानासाठी वाफरली जाते त्यास गणराज्य असे म्हणतात. त्या दृष्टीने भारताने गणराज्याचा स्वीकार केलेला असून भारताचा राष्टपती अप्रत्यक्षपणे जनतेकडून निवडला जातो.

**४) समाजवाद :-**

संपतीचे उत्पादन समाजाच्या मालकीचे ठेउन सर्वाना समान माणनारी व संपतीचे न्याय वितरण करून सर्वाना एकाच समान पातळीवर आणणारी विचारप्रणाली आहे. उत्पादन, वीभाजन आणी यांचे साधने जनतेच्या म्हणजे समाजाच्या मालकीचे व्हावीत, प्रत्येक व्यक्तीला आपल्या गूणाची जोपासना करण्याची समानसंधी दिली जावी व त्यातून समाजाच्या उत्पादन शक्तीचा विकास व्हावा अशी अपेक्षा असते. दारीद्र आणी शोषण संपूष्टात आणून न्याय्य पातळीवर समाजाची पूनर्रचना करणे व मानवी जीवन सुखी आणी समृध करण्याचे आव्हान समाजवादात अपेक्षीत असते. समाजवादी विचारसरणीने समता व न्यायावर आधारावर नव्या समाजव्यवस्थेचा पुरस्कार केला आहे. या विचारप्रणालीच्या पुरस्कर्त्यांच्या मते व्यक्तीहीतापेक्षा समाजहीत महत्वाचे आहे. औदयोगीक क्रांती, त्या क्रांतीनंतर निर्माण झालेली अर्थीक विषमता व्यक्तीवाद व भांडवलशाही या सर्वाच्या प्रतिक्रीयेतून समाजवादी विचार निर्माण झाला.

**५) धर्मनिरपेक्षता :-**

धर्मनिरपेक्षता म्हणजे राजकीय, नागरी किंवा सामाजीक व्यवहारात धर्म, धर्मविचार किंवा धार्मीक विचारांना याना दूर ठेवणे. धर्म निरपेक्षता म्हणजे अधर्म, निधर्मीपणा, नास्तीकता किंवा धर्मविरोध नाही. राजस्तेला धर्माबाबत उदाशीन राहवे लागत.सगळयाच धर्माबाबत समान आदर, समान प्रतीष्टा आणी कोणत्याच धर्मकार्यात हस्तक्षेप न करण्याचे धोरण हे या धर्मनीरपेक्षतेचे स्वरूप आहे. भारतीय घटणेच्या 25 व्या कलमाने धर्मनिरपेक्षतेचा असा अर्थ स्पष्ट केला आहे की, ‘भारतातील कोणत्याही व्यक्तीला त्याला योग्य वाटणाऱ्या उपासनेचा, धर्मपालणाचा, पारलौकीक कल्याणाचा, अध्यात्मीक उन्नतीचा पूर्ण अधीकार आहे. धर्माच्या नावावर सरकार हस्तक्षेप करणार

नाही तसेच मदत व विरोधही करणार नाही. सामाजीक व राजकीय जीवनात व्यक्तीमध्ये धर्माच्या नावाने भेदभाव केला जाणार नाही.

**६) लोकशाही प्रौढ मताधिकाराच्या** आधारे, खूल्या व नि:पक्षपाती निवडणूकाद्वारा लोकांनी निवडणूकाद्वारा लोकांनी निवडुण दिलेल्या प्रतिनीधीद्वारे चालणारे राज्य लोकशाही हा शब्द इंग्रजी शब्द डीमॉक्रसी पासून बनलेला आहे. या शब्दाची उत्पती डीमॉस+क्रसी या शब्दापासून झालेली आहे. सामान्यलोकांची सता म्हणजे लोकशाही होय. बहूमताचे शासन म्हणजे लोकशाही होय.लोकशाही ही एक जीवनपध्दती आहे. तो एक राज्यघटनेचा व राज्यव्यवस्थेचा प्रकार आहे.

**७) गणराज्य /प्रजासत्ताक :**

हे अशा प्रकारचे सरकार आहे ज्यामध्ये देश हा जनतेचा सार्वजनीक मामला मानला जातो. कोणा एका व्यक्ती किंवा गटाचा देशावर हक्क नसतो. प्रजास्ताकामधील राष्टप्रमुख, विविध पदाधिकारी व प्रशासक सार्वत्रीक निवडणूकीद्ववारे नेमले जाते ज्या देशाचा राष्टप्रमुख एखादा राजा, सम्राट सुलतान नाही तो देश प्रजास्ताक स्वरूपाचा आहे। प्रजास्ताक हा शब्द प्रामूख्याने सार्वभौम देशासाठी वापरला जात असला तरीही अनेक देशाचे उपविभाग देखील प्रजास्ताक असु शकतात.

**८) न्याय :-**

न्याय म्हणजे नैतीक दृष्टया,विवेकवादाने, नैसर्गीक दृष्टीने निष्पक्षेतेने समतेने बरोबर असने. न्याय हे समाजाचे एक मुख्य व अविभाज्य अंग असते.प्लेटो व ॲरीस्टॉटल यांनी न्याय ही संकल्पना मान्य केली आहे. न्याय तीन स्वरूपात मान्य केलेला आहे. सामजीक आर्थीक आणी राजकीय. जात ,धर्म,वंश, रंग,लिग, प्रांत या आधारावर व्यक्ती-व्यक्तीमध्ये कोणताही भेदभाव केला जाणार नाही. राष्टाच्या अर्थीक संपत्तीवर सर्व जाति यंत्रणा राहील व तिचे न्याय वितरण करण्याची व्यवस्था निर्माण केली जाईल.देशातील सर्व व्यक्तीला मतदानाचा, निवडणूक प्रक्रीयेत भाग घेण्याचा, स्वतंत्र राजकीय व्यवहार करण्याचा अधिकार असेल.

**९) स्वतंत्रता :-**

भारतीय संविधानाने स्वातंत्रता हे तत्व स्वीकारलेले आहे. प्रत्येक व्यक्ती जन्मत:हा स्वतंत्र आहे. सर्व व्यक्ती समान आहे. राज्य किंवा इतर कोणत्याही संस्था व्यक्तीच्या विकासात अडसर निर्माण करणार नाहीत. व्यक्तीला स्वतंत्र जीवन जगण्याचा अधिकार प्राप्त झालेला आहे.

**१०) समता :-**

समाजातील सर्व नागरीक समान आहेत. सर्वांना समान संधी प्राप्त झालेली आहे. समाजातील कोणत्याही वर्गाला विशेष अधिकार देण्यात आलेले नाहीत. कोणत्याही प्रकारचा भेदभाव केला जाणार नाही. असे स्पष्ट केले आहे. मूलभूत अधिकारात कलम 14 मध्ये समानतेचा अधीकार सर्व नागरीकाना प्राप्त झाला आहे.

**११) बंधूता :-** समाजातील सर्व नागरीकानी बंधू भाव जोपासून एकत्रीत गुण्या गोंवीदाने एकत्र राहणे आणी एकमेका बददल आदर बाळगणे. राष्ट या नावाखाली सर्वांनी एकत्रीत जीवन जगणे. जेणे करून देशात एकात्मता व अखंडता कायम टिकून राहील. प्रत्येक देशाच्या संविधानाला उददेशपत्रीक असते. भारतीय संविधानाला प्रारंभी उददेशपत्रीका जोडलेली आहे. डॉ. पायली म्हणतात की, इतक्या निवडक शब्दात इतके सुंदर विचार व श्रेष्ठतम आदर्श लिहीलेले अपवादानेच आढळतील. पं. ढाकूरदास भार्गव अर्थपूर्ण शब्दांचा उल्लेक करून असे म्हणतात की सरनामा हा राज्यघटनेचा आत्माच आहे. तो राज्यघटनेचा अलंकार असून ते एक श्रेष्टतम गद्य पद्य आह. नव्हे, ते एक स्वत:च पूर्णत्व आहे.

**संदर्भग्रंथ :-**

1) के.आर.बंग (2008), भारतीय प्रशासनाची रूपरेषा,विद्या बुक्स पब्लीशर्स, औरंगाबाद.

2) के.आर.बंग (2016), भारतीय प्रशासन व संदीधानात्मक प्रक्रीया,वीद्या बुक्स पब्लीशर्स, औरंगाबाद,

3) चीं. ग.घांगरेकर(2001),भारतीय राज्यघटना स्वरूप आणी राजकारण ,श्री.मंगेश प्रकाशन, नागपूर.

4) अलका देशमुख (2010),भारतीय शासन आणी राजकारण, साईनाथ प्रकाशन, नागपूर.

5) सुधाकर जोशी (2003),भारतीय शासन आणी राजकारण्,विद्या बुक्स पब्लीशर्स, औरंगाबाद.

6) शीलवंत सींह,संविधान एवं राजव्यवस्था, टाटामॅकग्राहील शिक्षण प्राईव्हेट लिमीटेडा न्यु.दिल्ली.

7) श्रीराम माहेश्वरी(2002),भारतीय प्रशासन, ओरीएंट लॉगमन प्रायव्हेट लीमीटेड, मुंबई.

# २२. भारतीय संविधानातील नागरिकांचे मुलभूत हक्क

**प्रा. डॉ. नवनाथ गोविंदराव अडकिणे**
सहयोगी प्राध्यापक व राज्यशास्त्र विभागप्रमुख
कै. बाबासाहेब देशमुख गोरठेकर महाविद्यालय,
उमरी जि. नांदेड मो. क्र. 94 21 300 542
ई-मेल आयडी- ngadkine74@gmail.com

**गोषवारा (Abstract):** कोणत्याही देशाची राज्यघटना ही त्या देशाचा मूलभूत कायदा असतो. राज्यघटनेनुसारच लोकशाही शासनव्यवस्थेतील राज्यकारभार चालत असतो. त्यामुळे लोकशाही देशात राज्यघटनेला अत्यंत महत्त्वाचे स्थान असते. भारतीय राज्य घटनेतील तिसऱ्या प्रकरणात कलम 12 ते 35 अंतर्गत नागरिकांच्या मूलभूत हक्कांची तरतूद करण्यात आली आहे. मूलभूत हक्क हे व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत आवश्यक असतात.

ठळक मुद्दे (Keywords): संविधान, स्वातंत्र्य, समता, बंधुता व राष्ट्राची एकात्मता.

**भारतीय मूलभूत अधिकारांचा इतिहास:**

भारताच्या संविधानात मूलभूत अधिकारांचा समावेश असावा हा विचार 1895 मध्ये अनी बेझंट यांनी त्या वर्षीच्या काँग्रेस अधिवेशनात मांडला व तेव्हापासून तो सातत्याने मांडला गेला. 1928 मध्ये सर्वपक्षीय संमेलनात मूलभूत हक्कांची मागणी केली गेली. 1928 मध्येच काँग्रेस पक्षाने भारताच्या संविधानाची रूपरेषा सुचविण्या करिता पं. मोतीलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली जी समिती नेमली, तिनेही संविधानात मुलभूत अधिकारांची तरतूद असावी असे सुचविले. 1931 च्या कराची काँग्रेसमध्ये मूलभूत अधिकारांचा ठराव पंडित जवाहरलाल नेहरू यांनी मांडला. 1945 च्या सप्रू अहवालातही मूलभूत हक्कांची निर्मिती आवश्यक आहे असा उल्लेख आहे. त्यानुसार घटना समितीने एकमताने संविधानात मूलभूत अधिकाराचा समावेश करण्याचा निर्णय घेतला.

**भारतीय राज्यघटनेतील मूलभूत हक्क:**

भारतीय राज्य घटनेच्या तिसऱ्या भागात कलम 12 ते 35 मध्ये मूलभूत हक्कांचा समावेश करण्यात आला आहे. कलम 12 व 13 मध्ये राज्य म्हणजे काय ? ते सांगून राज्याला

देखील मूलभूत हक्का विरुद्ध जाणारा कायदा करता येणार नाही असे सांगितले आहे. तिसऱ्या प्रकरणातील नागरिकांना दिले सात मुलभुत हक्क पुढील प्रमाणे आहेत.

1. समतेचा हक्क (कलम 14 ते 18):
2. व्यक्तीस्वातंत्र्याचा हक्क (कलम 19 ते 22):
3. शोषणाविरुद्धचा हक्क (कलम 23 व 24):
4. धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क (कलम 25 ते 28):
5. शिक्षण आणि संस्कृतीचा हक्क (कलम 29 व 30):
6. खाजगी मालमत्तेचा किंवा संपत्तीचा हक्क (कलम 31):( हा हक्क 44 व्या घटनादुरुस्तीनुसार मूलभूत हक्काच्या यादीतून वगळून कलम तीनशे मध्ये कायदेशीर हक्कात समाविष्ट करण्यात आलेला आहे.)
7. घटनात्मक उपाययोजनेचा हक्क (कलम 32 ते 35):

1.समतेचा हक्क (कलम 14 ते 18): या कलमात पुढील बाबींचा समावेश होतो-

अ. कायद्यापुढे समानता: कलम 14 - सर्वांना कायद्याने समान वागणूक व समान संरक्षण दिले जाईल.

ब. भेदभावाचा अंत (कलम 15): जात, वंश, लिंग, धर्म, वर्ग व जन्मस्थान या कोणत्याही आधारावर सार्वजनिक ठिकाणी उदा- शाळा, मंदिरे, सिनेमागृहे, उपहारगृहे, पाणवठे इ. नागरिकांमध्ये भेदभाव केला जाणार नाही.

क. समान संधी (कलम 16): सार्वजनिक नोकऱ्यात सर्वांना समान संधी दिली जाईल. जाती, धर्म, वंश, वर्ग, लिंग या आधारावर कोणालाही अपात्र ठरविले जाणार नाही.

ड. अस्पृश्यतेचा अंत (कलम 17): कोणत्याही प्रकारच्या अस्पृश्यता पालनास बंदी घातली असून ती पाळणे हा फौजदारी गुन्हा मानला जाईल.

इ. पदव्यांची समाप्ती (कलम 18): रावसाहेब, रावबहादूर, खानसाहेब, खानबहादूर, नवाब इत्यादी पदव्या समाजात विषमता पसरविणाऱ्या असल्यामुळे त्या नष्ट करण्यात येत आहेत.

2. व्यक्ती स्वातंत्र्याचा हक्क (कलम 19 ते 22): या कलमात पुढील बाबींचा समावेश होतो.

अ. कलम 19 अंतर्गत व्यक्तीला पुढील हक्क प्राप्त होतात.

1. भाषण व अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य ज्यात मुद्रण स्वातंत्र्याचा समावेश आहे.
2. नि:शस्त्र सभा संमेलनाचे स्वातंत्र्य
3. संघटना स्थापन करण्याचे स्वातंत्र्य.
4. भारताच्या सर्व प्रदेशात मुक्त संचार करण्याचे स्वातंत्र्य.

5. कुठलाही व्यापार, व्यवसाय किंवा धंदा करण्याचे स्वातंत्र्य.

या हक्कांवर काही मर्यादाही घालण्यात आलेल्या आहेत त्या मर्यादा नागरिकांचे हित व राष्ट्राचे अखंडत्व कायम राखण्यासाठी आहेत.

ब. कलम 20 ते 22 मध्ये व्यक्तिस्वातंत्र्याच्या हक्काचे संरक्षण केले आहे.

1. गुन्हा सिद्ध झाल्याशिवाय कोणत्याही व्यक्तीला शिक्षा केली जाऊ शकणार नाही.
2. एका गुन्ह्यासाठी एकापेक्षा अधिक वेळा शिक्षा दिली जाणार नाही.
3. कोणत्याही व्यक्तीला साक्ष देण्याची सक्ती केली जाणार नाही.
4. अटक झालेल्या व्यक्तीस अटकेची कारणे त्वरित सांगितली पाहिजेत.
5. अटक केलेल्या व्यक्तीला 24 तासाच्या आत न्यायालयासमोर उभे करावे लागेल.

अटक झालेल्या व्यक्तीची अटक जर प्रतिबंधक स्थानबद्धतेच्या कायद्याखाली झाली असेल तर त्या व्यक्तीला तीन महिन्यापर्यंत अटकेत ठेवता येते.

3.शोषणाविरुद्धचा हक्क (कलम 23 व 24): या कलमात पुढील बाबींचा समावेश होतो-

अ. कलम 23 नुसार वेठबिगारी, सक्तीने काम करून घेणे किंवा सक्तीची मजुरी करायला लावण्यास संपूर्ण बंदी घालण्यात आली आहे.

ब. कलम 24 नुसार 14 वर्षाखालील मुलांना कारखाने, खाणी किंवा अशा इतर ठिकाणी कामावर जुंपता येणार नाही.

4. धर्मस्वातंत्र्याचा हक्क (कलम 25 ते 28): या कलमात पुढील बाबींचा समावेश होतो-

अ. प्रत्येक व्यक्तीला कोणत्याही धर्माचा स्वीकार व प्रचार करण्याचा अधिकार असेल.

ब. मंदिरे हे सर्व जाती-जमातींना खुले असतील.

क. प्रत्येक धार्मिक संस्थेला अंतर्गत स्वातंत्र्य असेल तसेच धार्मिक संस्थेला स्वतःच्या मालकीची संपत्ती विकण्याचा, विल्हेवाट लावण्याचा हक्क असेल.

ड. कोणत्याही व्यक्तीला धार्मिक संस्थांना पैसा देण्याची सक्ती करता येणार नाही.

5. शिक्षण व संस्कृतीचा हक्क (कलम 29 व 30): या कलमात पुढील बाबींचा समावेश होतो-

अ. प्रत्येकाला आपली स्वतःची भाषा, लिपी अथवा संस्कृती यांची जोपासना करण्याचे स्वातंत्र्य असेल.

ब. राज्याने अनुदान दिलेल्या कोणत्याही शैक्षणिक संस्थेत धर्म, वंश, जात अथवा वर्ग या आधारावर कोणत्याही व्यक्तीला प्रवेश नाकारता येणार नाही.

क. प्रत्येक व्यक्तीला आपल्या इच्छेनुसार शिक्षण घेण्याचा हक्क असेल.

ड. शिक्षण संस्था स्थापन करण्याचा व चालविण्याचा हक्क प्रत्येकाला असेल तसेच अशा संस्थांना मदत देताना राज्यातर्फे भेदभाव केला जाणार नाही.

इ. कोणत्याही सरकारी शिक्षण संस्थेत धार्मिक शिक्षण दिले जाणार नाही व त्याचबरोबर सरकारी अनुदान प्राप्त खाजगी शिक्षण संस्थांमधून धार्मिक शिक्षण देता येईल पण त्याबाबत सक्ती करता येणार नाही.

एकूणच धर्म स्वातंत्र्याच्या हक्कानुसार राज्याचा कोणताही धर्म असणार नाही व राज्यासाठी सर्व धर्म समान असतील.

6. खाजगी संपत्तीचा हक्क (कलम 31): या कलमात पुढील बाबींचा समावेश असेल-

अ. कोणत्याही नागरिकाला त्याच्या खासगी मालमत्तेचे पासून वैध मार्गाशिवाय वंचित केले जाऊ शकणार नाही. प्रत्येकाला खाजगी मालमत्ता बाळगण्याचा अधिकार असेल.

ब. खाजगी मालमत्ता सरकारला ताब्यात घ्यायची असेल तर ती सार्वजनिक हिताच्या दृष्टिकोनातून ताब्यात घेता येईल.

क. हा ताबा कायद्याचा आधार घेऊनच करता येईल त्यासाठी योग्य मोबदलाही दिला जाईल.

(हा हक्क 1978 मध्ये 44 व्या घटनादुरुस्तीनुसार मूलभूत हक्काचा यादीतून वगळण्यात आला आहे व कलम 300 अंतर्गत कायदेशीर हक्कात याचा समावेश करण्यात आला आहे.

7. घटनात्मक उपाययोजनेचा हक्क (कलम 32 ते 35): या कलमात पुढील बाबींचा समावेश होतो -

वरील सर्व हक्कांचे रक्षण करण्याची जबाबदारी न्यायालयावर टाकण्यात आली आहे.

अ. मूलभूत अधिकारांचा संकोच झाला तर कुण्याही व्यक्तीला सर्वोच्च न्यायालयाकडे दाद मागण्याचा अधिकार आहे. यानुसार खालील पाच अर्जाद्वारे व्यक्तीला न्यायालयात दाद मागता येतो.

अ. बंदी प्रत्यक्षीकरण (Habeas corpus)- कोणत्याही व्यक्तीला बेकायदेशीर अटक झाली असेल, अन्यायकारक दंड दिला असेल अथवा बेकायदेशीर मार्गाने दाबून ठेवली असेल तर त्या व्यक्तीला आपल्या अटकेच्या कारणा संबंधी विचारणा करण्याचा रिट अर्ज.

ब. परमादेश (Writ of mandamus)- या आदेशाद्वारे कोणत्याही व्यक्तीला वा संस्थेला तिचे कर्तव्य पालन करण्याची आज्ञा दिली जाते.

क. अधिकार पृच्छा (Quo warranto)- एखाद्या व्यक्तीला सार्वजनिक किंवा शासकीय पदावर राहण्याचा अधिकार काय अशी न्यायालयाकडे पृच्छा करण्याचा व्यक्तीला मिळालेला अधिकार.

ड. प्रतिषेध (Prohibition)- एखादे कनिष्ठ न्यायालय त्याच्या अधिकार क्षेत्राबाहेरील खटला चालवीत असेल व तो खटला चालविण्याची कायदेशीर सत्ता त्या न्यायालयास नसेल तर या खटल्याची सुनावणी तहकूब करावी अशी विनंती करणारा अर्ज वरिष्ठ न्यायालयाकडे करता येतो.

इ. उत्प्रेक्षण (Certiorari)- कनिष्ठ न्यायालयाकडे चालू असलेला खटला वरिष्ठ न्यायालयाने चालवावा अशी विनंती करणारा अर्ज.

वरील प्रमाणे भारतीय संविधानातील तिसऱ्या प्रकरणात कलम 12 ते 35 अंतर्गत नागरिकांना मूलभूत हक्क प्रदान करण्यात आले आहेत. हे हक्क म्हणजे भारतीय लोकशाही मजबूत करण्याचे एक साधन होय. व्यक्तीला आपल्या व्यक्तिमत्त्वाचा स्वाभाविक व सर्वांगीण विकास करण्यासाठी वरील हक्क आवश्यक आहेत हे हक्क म्हणजे भारतीय जनतेचा मॅग्नाकार्टाच होय.

**संदर्भ ग्रंथ सूची: (References)**


1. सुधाकर जोशी, भारतीय शासन आणि राजकारण, विद्या बुक पब्लिकेशन, औरंगपुरा, औरंगाबाद, फेब्रुवारी, 2015.
2. व्ही. एन. इंगोले, व्ही. एल. एरंडे भारतीय शासन आणि राजकारण निर्मल प्रकाशन, नांदेड 2000.
3. शांताराम भोगले, आधुनिक राज्यशास्त्र, शेत प्रकाशन, मुंबई 1990.
4. राजेंद्र शिंदे (संपादक), भारतीय राजकारणातील बदलते प्रवाह, क्रिएटिव्ह पब्लिकेशन नांदेड, फेब्रुवारी, 2020.
5. आनंद यादव (संपादक), राजकीय संरचना, ग्रंथ निर्मिती केंद्र य.च.म.मुक्त विद्यापीठ नाशिक, जून, 2002.

# २३. लोकशाही आणि मुलभूत कर्तव्य

**डॉ. रेखा रामनाथ बने**
सहायक प्राध्यापक
राज्यशास्त्र विभाग
कै. सौ. शेषाबाई सीताराम मुंढे कला महाविद्यालय,
गंगाखेड. पिन – ४३१५१४

**सार :-** आपला भारत देश स्वातंत्र्य होवून 75 व्या अमृत महोत्सवी वर्षात पदार्पण करीत आहे. आपल्या देशात शिक्षणाचे प्रमाण समाधानकारक नसल्यामुळे लोकशाहीतील मुलभूत कर्तव्य पालन करत असताना टाळाटाळ करत असल्याचे दिसून येते. आपल्या देशातील निवडणुकीमध्ये पण सुशिक्षित वर्ग मतदान करण्याचे टाळत असल्याचे दिसून येते. यामुळेच राज्यशास्त्र या विषयाचा अभ्यास करण्याऱ्या संशोधकांनी आपल्या देशातील नागरिकात मुलभूत कर्तव्य पालनाबाबत जागृती निर्माण करणे गरजेचे आहे.

**Key words:-** लोकशाही, मुलभूत कर्तव्य

**प्रस्तावना :-**

प्राचीन काळापासूनच आपल्या देशात वर्ण व्यवस्था प्रचलित होती. नागरिकांना त्यामुळे आपले अधिकार व कर्तव्य याची जाण नव्हती. परंपरेप्रमाणे प्रचलित व्यवस्थेत मानवी वाटचाल चालू होती. जरी बहुतांश लोक मुलभूत हक्क यापासून दूर असले तरी त्यांना याबाबतीत काहीच वाटत नसल्याचे दिसून येते. ते याबाबतीत आपल्या जातीला दोष देत असत व वर्ण व्यवस्थेप्रमाणे कामे करीत असत. आपला देश स्वातंत्र्य झाल्यावर त्यात बदल होवून प्रत्येक मानवाला समान अधिकार मिळाले. त्याबरोबरच त्याने काही मुलभूत कर्तव्य पार पाडावीत अशी रचना आपल्या संविधानात करण्यात आली. भारताच्या संविधान निर्मितीच्या वेळी अधिकाराची भरपूर चर्चा होती. घटना समितीने यासंदर्भात घटनेत तरतूद केलेली होती. मात्र त्यावेळी मूलभूत कर्तव्याचा समावेश केलेला नाही मूलभूत हक्क आणि कर्तव्य हे एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत असे गृहीत धरल्यामुळे कर्तव्य पालन व्यक्ती स्वतःहून करतील असे गृहीत धरले आहे, कारण अधिकार व हक्क यांचा जन्मच कर्तव्याच्या कुशीतून होतो. म्हणून कर्तव्य हक्कातच विहीत आहेत किंबहुना कर्तव्याचे पालन करता यावे म्हणूनच अधिकार घटनेत नमूद करून देण्यात आले आहे. परंतु भारतीय नागरिकांना जन्म देणारी कर्तव्य कुशी समजत नाही हे जेव्हा लक्षात आले तेव्हा घटनाकारांनी 1976 मध्ये 42 व्या घटनादुरुस्तीद्वारे नागरिकांची मूलभूत कर्तव्य विशद करणारे कलम 51 क संविधानाच्या भाग चार मध्ये समाविष्ट करण्यात आले. मूलभूत कर्तव्य 3 जानेवारी 1977 पासून अमलात

आले त्यामुळे तीन जानेवारी हा मूलभूत कर्तव्य दिन म्हणून पाळला जातो. भारतीय संविधानाचा प्राण म्हणून मूलभूत कर्तव्य आहेत असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

**लोकशाही :-** लोकशाही म्हणजे प्रौढ मताधिकाराच्या आधारे खुल्या व निःपक्षपाती निवडणुकांद्वारा लोकांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधींद्वारे चालणारे राज्य.

**मुलभूत कर्तव्य :-** भारतीय संविधानात सुरुवातीला मूलभूत कर्तव्य याची गरज भासू लागली तसे प्रत्येक व्यक्तीचे आयुष्य शांतता व समानतेने व्यतित व्हावे म्हणून ज्या प्रमाणे कायदेशीर रित्या मूलभूत हक्क प्राप्त झाली आहेत त्याचप्रमाणे राष्ट्रहिताच्या दृष्टीने काही कर्तव्य देखील पार पाडावी लागतात. 1976 मध्ये सुवर्ण सिंह समितीच्या शिफारशीवरून भारतीय राज्यघटनेत 10 मूलभूत यात आली त्यानंतर घटनादुरुस्तीने 2002 मध्ये अकरावे कर्तव्य समाविष्ट करण्यात आले.

**महत्व :-** लोकशाही व्यवस्थेत नागरिकाच्या विवेक क्षमतेतुनच हक्कविषयक दावे आणि कर्तव्याची जाणीव या बाबी पुढे येतात व्यक्तीच्या कर्तव्य पालनातून नागरिकांच्या मूल्यांची जोपासना होते भारतीय समाजासाठी काय करावे हे जसे महत्त्वाचे आहे तसेच भारतीय नागरिकांच्या जबाबदाऱ्या व मूलभूत कर्तव्य हे काय आहेत हे नागरिकांना माहीत असणे आवश्यक आहे कारण जिथे दुसऱ्याचे अधिकार सुरू होतात तिथे आपले कर्तव्य पालन करण्याची वेळ आलेली असते. राज्यघटनेतील चौकटीत राहून आपल्या अधिकाराचा वापर समाजातील व प्रशासनातील प्रत्येक घटकाने करणे म्हणजेच कर्तव्यपालन होय. नागरिक हे केवळ प्रेक्षक नाहीत तर राष्ट्राचे ध्येय प्रत्यक्षात आणण्यासाठी सक्रिय सहभागीदार आहेत.

**उद्देश :-**

1. लोकशाही शासन व्यवस्थेच्या कल्याणकारी धोरणाची अंमलबजावणी करणे
२. भारतीय जनतेत सामंजस्य व बंधुभाव वाढीस लावणे
3. मानवतावाद विज्ञान निष्ठा शोधक वृत्ती व सुधारणावाद हा समाजात रुजवणे

**मूलभूत कर्तव्ये :-**

1. घटनेचे पालन करणे आणि तिचे आदर्श व संस्था, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीत यांचा आदर करणे.
2. ज्यामुळे आपल्या राष्ट्रीय स्वातंत्र्य लढयास स्फूर्ति मिळाली त्या उदात्त आदर्शाची जोपासना करून त्यांचे अनुसरण करने.
3. भारतात सार्वभौमत्व, एकता व एकात्मता उन्नत ठेऊन त्यांचे संरक्षण करणे.
4. देशाचे संरक्षण करणे व आवाहन केले जाईल तेव्हा राष्ट्रीय सेवा बजावणे.
5. धार्मिक, भाषिक व प्रादेशिक किंवा वर्गीय भेदांच्या पलीकडे जाऊन भारतातील सर्व जनतेमध्ये सामंजस्य व बंधुभाव वाढीस लावणे. स्त्रियांच्या प्रतिष्ठेला उणेपणा आणणाऱ्या प्रथांचा त्याग करणे.

6. आपल्या समिश्र संस्कृतीचे समृद्ध वारशांचे मोल जाणून त्यांचे जतन करणे.
7. वने, सरोवरे, नद्या व वन्यजीवसृष्टी यांसह नैसर्गिक पर्यावरणाचे रक्षण करून त्यात सुधारणा करणे, आणि प्राणीमात्रा बद्दल दया भाव बाळगणे.
8. विज्ञान वादी दृष्टीकोण मानवतावाद आणि शोधकबुद्धी व सुधारणा यांचा विकास करणे.
9. सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण करणे व हिंसाचाराचा निग्रहपूर्वक त्याग करणे.
10. राष्ट्र सतत उपक्रम व सिद्धी यांच्या चढत्या श्रेणी गाठत जाईल अशाप्रकारे व्यक्तीगत व सामुदायिक कार्याचे सर्व क्षेत्रा मध्ये उत्तमता संपादन करण्यासाठी झटणे.
11. जो जन्मदाता असेल किंवा पालक असेल त्याने, आपल्या आपत्यास अथवा पल्यास त्याच्या वयाच्या 6व्या वर्षापासून ते चौदाव्या वर्षापर्यंत शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे.

समाज अस्तित्वात आल्यावर व्यक्तीच्या अधिकाऱ्यांना जसा आकार मिळतो त्याच प्रमाणे समाजात व्यक्तीला कर्तव्य पालन केले तरच व्यक्तींना आपल्या अधिकाराचा उपभोग घेऊन सर्वांगीण विकासाला चालना देता येते. समाजाचे नेते नियम कायद्यात अंतर्भूत असतील किंवा नसतील तरी त्याचे पालन फारसे होताना दिसत नाही. अशा वेळी सामाजिक नीतिनियम आणि विशेषाधिकार यांच्यात उभा संघर्ष होऊन सामाजिक अस्थिरता वाढते. अनेकांना आपल्या अधिकाराचा उपभोग घेता येत नाही. मुलभूत कर्तव्य पालन आपण स्वतः किती करतो हे प्रत्येकाने पडताळून पाहावे. वरील कर्तव्याचे पालन जबाबदारीने केले तर कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न पूर्णपणे सुटेल.

अलीकडे कायदा हातात घेऊन सामुदायिक हिंसा करण्यात येत असलेली उदाहरणे मन सुन्न करणारी आहे लोक हिंसाचाराला बळी पडत आहेत शासन आणि समाज मूलभूत कर्तव्य पासून किती प्रमाणात दूर आहे याची प्रचिती येत आहे सुजाण नागरिकांनी या संदर्भात आपले कर्तव्य निभावले तर भारतीय समाजाला पुढील धोका दूर होईल शासनाने मार्गदर्शक तत्वातील तरतुदीनुसार समाजासाठी काय करावे हे जाणून घेऊन कार्य करावे आणि नागरिकांना मूलभूत कर्तव्य नुसार जबाबदाऱ्या पार पाडण्यात सहकार्य करावे.

**संदर्भ** –

1. एम लक्ष्मीकांत – भारतीय राज्यव्यवस्था
२. जाधव तुकाराम – भारतीय शासन आणि राजकारण

 ISBN No. 978-93-91097-18-9

# २४. निती आयोग

**डॉ. कोनेरू बाबान्ना डुमलवाड**
लोज प्रशास-ा विभाज प्रमुजा
ज र्मयोगी तुळशीराम पवार महाविद्यालय, हडोळती
E-mail : koneru.dumalwad11@gmail.com

**प्रस्तावना :-**

स्वातंत्र्यानंतर आपल्या देशाने तत्कालीन सोव्हिएत संघाचा समाजवादी शासन संरचनेचा स्वीकार केला असून ज्यामध्ये योजना तयार करुन कार्य केले जात असे. त्यामुळे दीर्घकाळापासून पंचवार्षीक आणि वार्षिक योजना देशामध्ये चालू होत्या. अनेक दशज ापासू-ा नियोजन आयोगाने नियोजन करणारी यंत्रणेच्या रुपात योजना तयार करण्यामध्ये आपले योगदान दिले आहे. परंतु देशात सत्ता परिवर्तन झाल्यानंतर ऑगस्ट २०१४ मध्ये केंद्रसरकारने जुना योजना आयोग बरखास्त करुन त्या ऐवजी नविन संस्था स्थापण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार केंद्रिय कॅबिनेट मंडळाच्या ठरावाने १ जानेवारी २०१५ रोजी निती आयोग ही संस्था स्थापली गेली . ही संस्था घटनात्मक नाही आणि तसेच वैधानिकही नाही.

निती या शब्दाचा अर्थ इंग्रजीतील Policy या शब्दाशी नसून निती म्हणजे राष्ट्रीय भारत ि-ार्माज संस्था (NITI-National Institution for transforming India) चा लघुरुप आहे. केंद्रिय मंत्री मंडळाने निती आयोगाशी संबंधित पारीत केलेल्या प्रस्तावात महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, दीनदयाल उपाध्याय आणि स्वामी विवेकानंद यांच्या भाषणांचा उल्लेख करण्यात आला आहे.

जुजरात विकास मॉडेलचे समर्थक असलेले अरविंद पनगढिया यांची निती आयोगाचे पहिले उपाध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली. अरविंद पनगढिया हे भारताचे पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांच्या प्रमुख वित्तीय सल्लागारापैकी एक होते. तत्पूर्वी ते कोलंबिया विद्यापीठात अर्थशास्त्राचे प्राध्यापक होते. त्यांनी सन २०१४ च्या सार्वत्रिक निवडणूकीपूर्वी गुजरातच्या विकास मॉडलवर लेख लिहीले होते. अरविंद पनगढिया हे राजस्थानचे मुख्यमंत्री वसुंधरा राजे यांच्या आर्थिक सल्लागार समितचे उपाध्यक्ष म्हणून कार्य केले आहे. राजस्थानमधील श्रम सुधारणेत त्यांची महत्वपूर्ण भूमिका राहीलेली आहे. अरविंद पनगढिया १९७० च्या दशकात राजस्थान विद्यापीठातून अर्थशास्त्र विषयात बी. ए. आणि एम. ए. पूर्ण केले होते. आणि प्रिस्टन विद्यापीठातून पीएच.डी. ची पदवी प्राप्त केली. जानेवारी २०१५ ते ऑगस्ट २०१७ या कालावधीत निती आयोगाचे उपाध्यक्ष म्हणून त्यांनी कार्य केले आहे.

**योजना आयोगाचा इतिहास :**

योजना आयोगाची स्थापना १५ मार्च १९५० रोजी केंद्रिय मंत्री मंडळाच्या एका सामान्य प्रस्तावाद्वारे करण्यात आला होता. योजना आयोगाने आपल्या स्थापनेपासून ते बरखास्त होईपर्यंत काही राजकीय व आर्थिक उपलब्धी त्या बरोबरच अनेक आव्हानांचा सामना केलेला आहे. योजना आयोगाने आत्तापर्यंत १२ पंचवार्षीक योजना आणि ६ वार्षीक योजनेची सुरुवात करुन गेल्या ६५ वर्षाच्या इतिहासात २०० लाख कोटी रुपयाहून अधिक खर्च केलेला आहे. योजना आयोगाची

 ISBN No. 978-93-91097-18-9

स्थापना देशामध्ये उपलब्ध संसाधनाचा कार्यक्षमपणे उपयोग करुन लोकांचा राहणीमानाचा दर्जा उंचावणे, रोजगारांची संधी उपलब्ध करणे आणि उत्पादन क्षमता वाढविणे यासाठी करण्यात आली होती. परंतु आता योजना आयोग ही इतिहास जमा झालेली आहे.

**निती आयोगाची संरचना :**

निती आयोगाची रचना पुढीलप्रमाणे आहे.

अध्यक्ष :- भारताचा पंतप्रधान हा निती आयोगाचा पदसिद्ध अध्यक्ष असतो.

उपाध्यक्षः- नामवंत अर्थतज्ञ यांची उपाध्यक्ष म्हणून नियुक्ती भारताचा पंतप्रधान करेल.

मुख्य कार्यकारी अधिकारी :- भारत सरकारचा सचिव दर्जाचा अधिकारी यास निश्चित कार्यकालासाठी पंतप्रधान नियुक्ती करतील.

पूर्जवेळ सदस्य :- पाच स्थायी सदस्य असतील.

अर्धवेळ सदस्य :- देशातील नामांकीत विद्यापीठ आणि संशोधन संस्थांमधून जास्तीत जास्त दो-न सदस्यांची आळीपाळीने निवड.

पदसिद्ध सदस्य :- केंद्रिय मंत्री परिषदेच्या चार सदस्यांची पंतप्रधानाकडून नामनिर्देशीत केले जातील.

विशेष निमंत्रीत :- संबंधित कार्यक्षेत्रातील विशेषज्ञ आणि कार्यरत व्यक्तींना विशेष निमंत्रित म्हणून पंतप्रधान नामनिर्देशीत करतील.

प्रादेशिज परिषद :- विशिष्ट मुद्दे किंवा आपात्कालीन प्रकरणे ज्यांचा संबंध एकापेक्षा अधिक राज्यांशी असेल अशा प्रसंगी ही परिषद ज ाही ज ालावधीसाठी बनविण्यात येईल. यामध्ये संबंधित कार्यक्षेत्रातील मुख्यमंत्री आणि केंद्रशासित प्रदेशांचे उपराज्यपाल यांचा समावेश असेल. या परिषदेचा अध्यक्ष निती आयोगाचे उपाध्यक्ष असेल.

निती आयोगाचे सध्याचे उपाध्यक्ष डॉ. राजीवकुमार हे असून अमिताभ कांत हे मुख्य कार्यकारी अधिकारी आहेत. राजनाथ सिंह, निर्मला सितारमण, अमित शहा आणि नरेंद्र सिंह तोमर हे निती आयोगाचे पदसिद्ध सदस्य असून विशेष निमंत्रित सदस्यामध्ये नितीन गडकरी, थावरचंद गहलोत आणि रमेश पोखरीयाल यांचा समावेश आहे. तसेच श्री व्ही. के. सारस्वत, प्रो. रमेशचंद्र, डॉ. व्ही. के. पॉल हे पूर्णवेळ सदस्य आहेत.

**निती आयोगाचे दोन प्रमुज ज़ें द्र :**

१) टीम इंडिया हब :- टीम इंडिया केंद्र सहकारात्मक संघराज्य यास प्रोत्साहन देणे आणि धोरणे व कार्यक्रमाची रुपरेखा तयार करण्याच्या निर्देशाची अंमलबजावणी करते. ही निती आयोगास राज्य सरकार बरोबर तिच्या कार्याच्या संदर्भात आवश्यक ते सहकार्य व समन्वयाचे कार्य करते.

२) ज्ञान आणि नाविण्य हब :- सुशासन व सर्वश्रेष्ठ कार्यपद्धतीवर संशोधन करणे आणि निती आयोगाची थिंकटँक (विचारगट) म्हजू-न ज ार्य ज रेल.

 ISBN No. 978-93-91097-18-9

## निती आयोग आणि योजना आयोग यामधील फरक :

| अ. क्र. | निती आयोग | योजना आयोग |
|---|---|---|
| १ | निती आयोग सल्लागार मंडळ किंवा थिंकटँक म्हणून काम करणार | योजना आयोगाने एक संवैधानिक रुपात कार्य करत होती. परंतु या आयोगास संवैधानिक दर्जा मिळाला -ाही. |
| २ | हा आयोग सहकारात्मक संघराज्य या भावनेतून कार्य करते कारण राज्यांना महत्वाचे स्थान मिळणार | या आयोगाच्या वार्षीक योजना बैठकीत राज्यांचा सहभाग कमी होता |
| ३ | या आयोगास धोरणे लागू करण्याचा अधिकार नाही | योजना आयोग राज्यासाठी धोरणे तयार करत होती आणि स्वीकृत योजनांना निधी वितरीत करीत असे |
| ४ | पंतप्रधानाद्वारे नियुक्त सचिवास मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) म्हजू-न संबोधले जाते | योजना आयोगाच्या सचिवास सामान्य प्रक्रियेच्या माध्यमातून नियुक्त केले जात असे |
| ५ | हा आयोग Bottom - UP दृष्टीकोनानुसार कार्य करते | हा आयोग Top-Down दृष्टीकोनानुसार कार्य करते |
| ६ | निती आयोगास निधी वितरीत करण्याचा अधिकार नाही हा अधिकार वित्त मंत्र्यांना आहे | योजना आयोग विविध मंत्रालय आजि राज्य सरकारला निधी वितरण करण्याचा अधिकार होता |

**निती आयोगाची गरज :-**

श्री नरेंद्र मोदी हे भारताचे पंतप्रधान होण्यापूर्वी बारा वर्ष गुजरात राज्याचे मुख्यमंत्री होते. त्यांचा अनुभव असा होता की, विविध राज्याच्या मुख्यमंत्र्यांना दरवर्षी योजना आयोगापुढे हात पसरावे लागत असे. त्यांनी सहकारात्मक संघराज्य (Co-Operative Federalism) म्हणजे राज्यांना सोबत घेवून काम करणारी यंत्रणा आवश्यक असल्याचे म्हटले आहे. यासाठी १५ ऑगस्ट रोजी लाल किल्यावर केलेल्या भाषणात योजा आयोग बरखास्त करण्याची घोषणा केली. गेल्या पासष्ट वर्षामध्ये आर्थिक परिस्थिती बदललेली असून भारत आता उभरती अर्थव्यवस्था म्हणून जागतिक अर्थव्यवस्थेत खुप मोठी भूमिका पार पाडणार आहे. भारतातील प्रत्येक राज्याचा आर्थिक विकासाचा स्तर विभिन्न असून प्रत्येक राज्यांची वित्तीय बलस्थाने आणि कमतरता ही वेजवेजळी आहे. म्हणून सर्व राज्यासाठी एकच आर्थिक नियोजनाचा आराखडा लागू करणे योग्य ठरणार नाही. कारण आजच्या वैश्विक अर्थव्यवस्थेत भारताला प्रतिस्पर्धी म्हणून कार्य करण्यास सक्षम बनविण्यासाठी निती आयोगाची स्थापना करण्यात आली.

**नीती आयोगाच्या उद्दिष्टे व कार्य :-**

नीती आयोग (राष्ट्रीय भारत परिवर्तन संस्था) ही केंद्र सरकारच्या धोरण निर्मितीमध्ये अग्रगण्य भूमिका पार पाडते. राज्यशासनाबरोबर घनिष्ट स्वरुपात कार्य करते. ही एक ज्ञान-केंद्र (Knowledge Hub) म्हणून कार्य करत असते आणि भारत सरकारची धोरणे व कार्यक्रमाच्या अंमलबजावणीत प्रगती याचा पर्यवेक्षण करत असते. ही संस्था केंद्र आणि राज्य शासनांना धोरणाच्या प्रमुख घटकासंबंधात सुसंगत धोरणात्मक आणि तांत्रिक सल्ला प्रदान करते. या अंतर्गत आर्थिक क्षेत्रातील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय महत्वाचे प्रकरण, देशांतर्गत आणि अन्य राष्ट्रातील उपलब्ध असलेल्या सर्वोत्तम पद्धतीचा प्रचार, नविन धोरणात्मक विचारांचा समावेश व विशिष्ट मुद्यावर सहकार्य करत असते. नीती आयोग खालील उद्देश साध्य करण्यासाठी कार्य करेल.

१) राष्ट्रीय उद्देश डोळ्यासमोर ठेवून राज्याचा सक्रीय सहभागीता वाढवून राष्ट्रीय विकासाची रणनिती ठरविणे.
२) देशाची व्युहरचनात्मक व दीर्घकालीन धोरणांचा किंवा कार्यक्रमाचा आराखडा तयार करण्याचे त्याच बरोबर धोरणाची प्रगती व कार्यक्षमता यावर देखरेख करणे, देखरेख व प्रतिक्रिया यांच्या आधारे धोरणांची मध्यावधी आढाव घेण्याचे आणि आवश्यकतेनुसार सुधारणा करण्याचे कार्य नीती आयोग करेल.
३) नीती आयोग ग्रामीण स्तरावर विश्वसनिय योजना तयार करण्यासाठी तंत्र विकसित करणार असून या संदर्भातील योजना उत्तरोत्तर उच्च पातळीला नेण्याचे कार्य करणार आहे.
४) आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या सामाजिक वर्गावर विशेष लक्ष देण्याची जबाबदारी देण्यात आली.
५) सक्षम राज्य ही सक्षम राष्ट्र निर्माण करु शकते ही उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून राज्या बरोबर सहकार्य आणि तंत्राच्या माध्यमातून सहयोगपूर्ण संवाद वाढविणे.
६) नीती आयोगापुढे विशेषतः आर्थिक धोरण व त्या धोरणामध्ये राष्ट्रीय सुरक्षेच्या हिताकडे लक्ष देण्याचे काम सोपविण्यात आले आहे.
७) नीती आयोग समान विचारधारा असलेल्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय विचारगट (थिंक टँक) शिवाय शैक्षणिक व धोरणात्मक संशोधन संस्था यामध्ये सहभागीता वाढविण्यासाठी सल्ला व प्रोत्साहन देईल.
८) नीती आयोगाने विकास आराखड्याच्या अंमलबजावणीमध्ये गतीशिलता आणण्यासाठी आंतरक्षेत्रिय आणि आंतरविभागीय मुद्यावर तोडगा काढण्यासाठी हा आयोग एक व्यासपीठ म्हणून कार्य करणार आहे.
९) राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय विशेषज्ञ आणि भागधारकांच्या माध्यमातून ज्ञान, नवकल्पना उद्योगशिल यंत्रणा तयार करेल.
१०) धोरणे, योजना व कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी कार्यक्षमता व तंत्रज्ञान सुधार यावर जोर देईल.
११) राष्ट्रीय विकास आराखडा आणि उपरोक्त उद्देशपूर्तीसाठी आवश्यक असणारी कार्यपद्धती पार पाडेल.

अशा प्रकारे नीती आयोग सहकारात्मक संघराज्यास प्रोत्साहन देताना भारताची शाश्वत विकास उद्दिष्ट साध्य करण्याच्या मार्गामध्ये अनेक आव्हानांचा सामना करत आहे. यात कार्याची

अतिव्यापकता, रोजगारांची संधी उपलब्ध करणे, आर्थिक विकास वृद्धी, सरकार - नाजरीज परस्पर संवाद, नौकरशाहीचे उत्तरदायित्व निश्चित करणे यांचा समावेश आहे. यासाठी केंद्र सरकारने काही मिशन मोड कार्यक्रमांचा प्रारंभ केला आहे. जसे की, स्मार्ट सिटी, कौशल्य भारत- कुशल भारत, स्वच्छ भारत, सर्वांसाठी घरे व विहीर इत्यादी या सर्वांची यशस्वीता केंद्र व राज्यामधील योग्य सहकार्य आणि सकारात्मक स्पर्धा यावर अवलंबून आहे. निती आयोग हे सहकार्य मिळवण्यास उत्प्रेरक म्हणून भूमिका पार पाडण्यास तयार आहे.

**संदर्भ :-**


१) निती आयोग, वार्षिक अहवाल, २०२०-२०२१, नई दिल्ली.

२) ओम्मेन एम. ए., निती आयोग आणि स्थानिक सरकारांचा दृष्टिकोन, योजना मासिक, अंक-७, फेब्रुवारी २०१५, नवी मुंबई, पृ. क्र. ०५.

३) उंबरकर राजेश गंगाधर, निती आयोग : अर्थव्यवस्थेची गरज, योजना मासिक, अंक-७, फेब्रुवारी २०१५, नवी मुंबई, पृ. क्र. ३६-३७.

४) सिविल सर्विसेज क्रॉनिकल, फरवरी २०१५, वर्ष २४, अंक-७, पृ. क्र. २०-२१.

५) शिंदे अभिजीत, भारतीय राज्यघटना राजकारण आणि कायदे, चाणक्य मंडल परिवार, पुणे, पृ. क्र. २२१.

६) www.niti.gov.in

७) www.niticentral.com

८) www.vikipedia.org.

 ISBN No. 978-93-91097-18-9

# २५. लोकशाही आणि निवडणूक प्रक्रिया

**प्रा. ज्ञानेश्वर बनसोडे**
पदवी व पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग,
राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर

**डॉ. महादेव गव्हाणे**
प्राचार्य
राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर

लोकशाही ही निवडणूक प्रक्रियेशी बांधलेली असते. कुठल्याही लोकशाहीसाठी नियमित निवडणूक या जीवनदायिनी असतात. लोकमताचे प्रतिबिंब निवडणूकीतूनच खऱ्या अर्थाने उमटत असते. मतदानाचा अधिकार हा सर्वांना समान स्वरुपामध्ये प्रदान केल्यास सामुहिक निर्णय प्रक्रियेचा उदय निश्चित मानला जातो. हेच आदर्श लोकशाही व्यवस्थेचे लक्षण मानले जाते. लोकशाही या शासनप्रकारात जनता ही सर्वश्रेष्ठ असते. राज्यकारभार हा लोकांच्या इच्छेनुसार चालावा अशी अपेक्षा या व्यवस्थेत व्यक्त केलेली असते. परंतू प्रातिनिधीक लोकशाहीत शासनाची प्रत्यक्ष सत्ता ही लोकांच्या हातात नसुन लोकप्रतिनिधींच्या हातात असते. लोकशाहीतील प्रतिनिधीत्व म्हणजे मतदार आणि लोकप्रतिनिधी याच्यातील देवाणघेवाणीची प्रक्रियाच असते. निवडुन आलेले प्रतिनिधी एक प्रकारे राजकीय सेवाच जनतेला पुरवत असतात आणि त्याबदल्यात निवडणूकीत मतांचा कौल मागत असतात. त्यामुळे प्रातिनिधीक लोकशाहीला महत्त्व द्यावे लागते आणि म्हणूनच प्रातिनिधीक लोकशाहीमध्ये निवडणूकांना अत्यंत महत्त्व असते. निवडणूका या लोकशाहीचा प्राणवायू असतात, तर लोकांचा माताधिकार हा लोकशाहीचा आत्मा असतो. निवडणूकांच्या माध्यमातून लोकांना राजकीय प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी मिळते. विशेषत: मतदानाच्या प्रक्रियेत तर अधिक सहभाग असलेला दिसतो. अलीकडे भारतात मतदानाच्या टक्केवारीत झालेली वाढ जनतेच्या राजकीय सहभागात वाढ झ ाल्याचे दर्शवते. गतकालाशी तुलना करता निवडणूकीतील वाढता सहभाग याचा अर्थ लोकांचा राजकारणात अधिक रस वाढल्याचे द्योतक आहे. सत्ता कोणाच्या हातात द्यायची आणि त्या सत्तेचा वापर त्यांनी कसा करायचा यासंबंधी निर्णय घेण्याची प्रक्रिया म्हणजे निवडणूक प्रक्रिया होय. ही प्रक्रिया देशाच्या संवैधानिक कायद्याने निर्धारित केली जाते.

नि:पक्षपातीपणे, मुक्त वातावरणात आणि निश्चित कालावधीनंतर निवडणूका होणे हे प्रगल्भ लोकशाहीचे लक्षण मानले जाते. देशात खऱ्या अर्थाने लोकशाही अस्तित्वात यावयाची असेल तर खुल्या आणि स्वच्छ वातावरणात निवडणूका होऊन योग्य पात्र अशा प्रतिनिधींची निवड होणे आवश्यक असते. कारण लोकशाहीचा कारभार जनतेच्या सहमतीतून आणि टिकेतून चालतो. निवडणुकाशिवाय सत्ता प्राप्ती हे हुकूमशाहीचे द्योतक असते. म्हणूनच निवडणूका याच लोकशाहीला जीवंत ठेवू शकतात. लोकशाही आणि निवडणूका या एकाच नाण्याच्या दोन बाजु आहेत. लोकशाहीतील निवडणूकांचे महत्त्व स्पष्ट करताना पोलॉक या विचारवंताने असे म्हटले आहे की, `सार्वत्रिक निवडणूका ह्या योग्यपणे आणि कार्यक्षमतेने पार पाडल्या गेल्या नाहीत तर केवळ सार्वजनिक यंत्रणाच कुचकामी ठरत नाही, तर संपूर्ण लोकशाही व्यवस्थाच संकटात सापडते`. थोडक्यात निवडणूका याच लोकशाहीला बलशाही बनवतात. निवडणूकीच्या माध्यमातूनच सत्तांतर होत असते. प्रातिनिधीक लोकशाहीत लोकांच्या हाती सत्ता नसली तर

 ISBN No. 978-93-91097-18-9

सत्तेवर कोणाचे सरकार असावे हे निवडणुकीच्या माध्यमातून लोकांना ठरविता येते. त्यामुळे लोकमताचे शासनावर नियंत्रण राहते. याचे संपूर्ण श्रेय निवडणूक व्यवस्थेलाच द्यावे लागेल.

आपल्या देशात जवळपास 70 वर्षे केंद्रीय तसेच राज्य स्तरावर लोकशाही मार्गाने निवडणूका होऊन शांततेत सत्तांतरे पार पडली आहेत. या सत्तांतरांसाठी लोकांनी अभिव्यक्ति स्वातंत्र्य, चळवळ आणि धर्म याचा पुरेपूर वापर केला तथापि भारतीय राज्यघटनेत न्याय, स्वातंत्र्य आणि समानता यांची हमी असताना दुर्दैवाने एतदेशियांना असमानता अन्याय किंवा सामाजिक अपेक्षांची अपूर्तता यांचा वापरंवार अनुभव आला. त्यामुळे लोकशाही या शब्दात अंतर्भूत असलेली मूळ संकल्पना, सार्वजनिक समाज आणि तत्त्वज्ञान यांचे अवमूल्यन झाले आहे. कारण त्याचा सतत गैरवापर केला गेला आणि आपला हेतू साध्य करण्याच्या दृष्टीने लोकशाहीचा वापर केला गेला म्हणूनच लोकशाही हा धोक्याचा वापर केला हे चेस्टरटनचे मत योग्य वाटते.

लोकशाही ही एक अशी शासन व्यवस्था आहे की ज्यात समाज अधिक चांगल्या रितीने चालवण्यासाठी तसेच न्यायनितीचा अवलंब त्यात योग्य पध्दतीने करता येण्यासाठी अधिकाधिक समावेश आणि त्यांचे प्रतिनिधीत्व असणे आवश्यक असते. जोपर्यंत लोकशाहीची व्याख्या सामाजिक आणि व्यक्तीगत पातळीच्या संदर्भात केली जात नाही तोपर्यंत लोकशाहीची व्याख्या ही अपूर्ण असते. पंडीत जवाहरलाल नेहरु यांनी लोकशाही संदर्भात असे म्हटले होते की, ``लोकशाही म्हणजेच समता, केवळ मतदानाच्या हक्कांबाबत समता नव्हे तर आर्थिक व सामाजिक समता निर्माण करणे होय``. थोडक्यात स्वातंत्र्य, समता, न्याय, सहिष्णुता, मानवी हक्क या मूल्यांना जोडणारी व्यवस्था म्हणून लोकशाहीकडे पाहिले जाते. कांही विचारवंत लोकशाहीला एक शासनपध्दती मानतात. तर कांही विचारवंत लोकशाहीला जीवन मार्ग म्हणून मान्यता देतात. तरीही आपल्या देशात अलीकडील कांही वर्षात राजकारणी आणि लोकप्रतिनिधींचे वर्तन आणि राजकीय पक्षांच्या कृती, त्यांचे राजकारण, संघटन आणि प्रचाराच्या पध्दती यांमुळे लोकशाहीची मूळ संकल्पना आणि तत्वज्ञान यांची तीव्रता कमी झाली आहे. सत्तेची धुंदी, पैशाची ताकद आणि निरर्थक प्रचारतंत्र याचा स्वार्थासाठी योग्य वापर होतानाचे आपण पाहिले आणि अनुभवले आहे. निवडणुकीच्या रिंगणात उतरलेले उमेदवार आणि राजकीय पक्ष आपल्या जाहिरनामा तसेच प्रचारसभांमध्ये बेधडक खोटी आश्वसने देताना दिसतात. वेगवेगळ्या माध्यमातून आरोप-प्रत्यारोप करुन एकमेकांवर कुरघोडी करण्याचा आणि लोकसहानुभूती मिळवण्याचा प्रयत्न करतात. वैयक्तीक आरोप-प्रत्यारोप केले जाऊ नयेत असे म्हटले जात असले तरी प्रत्यक्षात याचा विचार केला जात नाही. राजकीय धोरणांवर व कार्यक्रमांवर आरोप-प्रत्यारोप करणे आणि त्याद्वारे प्रचार करणे ही बाब निवडणूकात सर्वश्रुत आहे. एवढेच नव्हे तर गेल्या कांही वर्षात निवडणूकांचे निकाल लागल्यानंतर सत्ता आपल्याच हातात ठेवण्यासाठी वाढत्या घोडेबाजाराची उदाहरणेही डोळ्यांदेखत पहायला मिळाली. ही प्रथा अलीकडच्या काळात खूपच जोमाने वाढू लागली असून ती लोकशाहीसाठी धोक्याची घंटा आहे.

लोकशाहीमध्ये बहुमताला महत्त्व असते. लोकशाही डोकी मोजून चालणारा शासनप्रकार असतो. निवडणूकीमध्ये ज्या उमेदवाराला बहुमत मिळते तो निवडून येतो तर विधीमंडळात ज्यांचे बहुमत असते ते सत्ताधारी पक्ष म्हणून सत्ता चालवितात. बहुमताचा आकडा ज्याच्या खात्यात त्याच्याकडे सत्तेची दोरी असे सुत्र आहे. त्यामुळे संसदीय सभागृहात आपल्या पक्षाच्या उमेदवारांची संख्या वाढवण्यासाठी निवडूण येण्याची पात्रता एवढ्या एकाच निकषावर

राजकीय पक्षांकडून उमेदवारी दिली जाते. त्यामुळे गुन्हेगाराना राजकारणात सहज प्रवेश मिळत आहे. भारतासारख्या लोकशाही देशाला आज राजकारणातील गुन्हेगारीकरणाने ग्रासलेले आहे. या संदर्भाने महाश्वेतादेवी यांनी म्हटले आहे की, `पूर्वी गुन्हेगार राजकारण्यांच्या आश्रयाला जात होते, परतू आज राजकारणीच गुन्हेगारांच्या आश्रयाला जात आहेत`. आज कांही गुन्हेगार हे गुंडगिरी, दडपशाही व पैशाच्या बळावर निवडणुकांच्या आखाड्यात जाहीरपणे उतरत आहेत. विविध राजकीय पक्षांच्या व्यासपीठावर खुलेआम वावरताना दिसुन येतात. त्यामुळे राजकीय पक्षाची प्रतिमा दिवसेंदिवस मलीन होत चालली आहे. त्यामुळे राजकारणाचे गुन्हेगारीकरण हे लोकशाही मूल्यांच्या सर्वथा विरुध्द आहे आणि लोकशाहीत अशा प्रकारांना स्थान असता कामा नये. मात्र राजकारणाच्या गुन्हेगारीकरणाला देशातील कोणत्याही राज्याचे मतदार, राजकीय पक्ष आणि कायदा व सुव्यवस्था राखणाऱ्या यंत्रणा हे सर्व एकसाथ जबाबदार आहेत.

लोकशाहीमध्ये राजकीय सहभागाला विशेष महत्त्व असते. समाजातील प्रत्येक व्यक्तीने आपण लोकशाहीचे आधार तर आहोतच पण त्यासोबतच त्या लोकशाहीच्या संरक्षणाची जबाबदारी आपलीच आहे हा विचार आज आपण सर्वांनी करणे गरजेच आहे. हा विचार एका दिवसात करणे आणि परिवर्तन होणे शक्य नाही. त्यासाठी जीवन पध्दतीतच एक संस्कार म्हणून त्याला समाविष्ट करावे लागेल प्रत्येक व्यक्तीने निर्भयपणे व बाह्य प्रलोभनाला बळी न पडता मतदान केले पाहिजे. तरच आपण प्रगतीकडे जाऊ शकतो. तसेच राजकीय पर्यायांना सबल करण्याकडे लक्ष देऊन परिवर्तनाचे स्वप्न पुर्ण करण्यासाठी मतदारांनी कटिबध्द रहावे तरच लोकशाही प्रक्रियेवर मतदारांचे खरे नियंत्रण राहु शकेल.

**संदर्भ सुची** :-

1) डॉ. भोळे भास्कर लक्ष्मण, `भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण`, पिंपळापूरे बुक डिस्ट्रीब्युटर्स, नागपूर, जुलै 2014.
2) कुमार संजय, राय प्रवीण, `भारतातील मतदान वर्तनाचे मापन` (अनु. श्रीरंजन आवटे) सेज पब्लीकेशन, नवी दिल्ली, 2018.
3) डॉ. सोलापूरे राजशेखर, `लोकशाही आणि निवडणूक प्रक्रिया`, अरुणा प्रकाशन, लातूर 2017.
4) डॉ. निरगुडकर उदय, डॉ. सरवटे दिलीप, `निवडणूक जिंकण्यासाठी सर्व काही`, राजहंस प्रकाशन, पुणे-2009.
5) देशमुख अलका, `भारतीय लोकशाही प्रक्रिया`, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर 2014.
6) पळशीकर सुहास, योगेंद्र यादव, पीटर डिसूजा, `लोकशाही जिंदाबाद` (अनु.मनोहर सोनवणे) समकालीन प्रकाशन, पुणे 2010.
7) डॉ.सोलापूरे राजशेखर, प्रा.बनसोडे ज्ञानेश्वर, `राजकीय संकल्पनांचा परिचय`, सुमन प्रकाशन, लातूर 2019.
8) प्रा. विसावे विलास, `भारतातील घटनात्मक आणि राजकीय प्रक्रिया`, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव 2016.
9) योजना मासिक, जानेवारी 2021.

# २६. कलम ३७० आणि संयुक्त राष्ट्र

**प्रा.डॉ.विनोद गायकवाड**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
ग.भि.मुरारका महाविद्यालय, शेगांव
मो.नं.9850324202

**सारांश:-**

जम्मू काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग असल्याने तेथे भारत सरकारचे सर्वच कायदे सरळ-सरळ लागू होणे काळाची गरज बनले होते. मात्र पाकिस्तान व चीनचे जम्मू काश्मीरबाबतचे हितसंबंध वेगळे असल्यामुळे या दोन्ही देशांच्या पोटात दुखले. भारतीय संविधानातील अस्थायी कलम 370 मोदी सरकारने हटविल्यानंतर त्याचे पडसाद राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर उमटले.

जम्मू काश्मीरबाबत माजी पंतप्रधान पंडित नेहरु आणि सरदार वल्लभभाई पटेल यांच्या तुलनात्मक भूमिकेची चर्चा तत्कालीन परिस्थितीकडे डोळेझाक करुन वेगाने सुरु आहे. जुलै 1946 मध्ये जेव्हा अंतरिम सरकार स्थापन करण्यात आले, तेव्हा पं.नेहरु पंतप्रधान आणि सरदार पटेल गृहमंत्री असे खातेवाटप झाले होते. सहाजिकच गृहमंत्री म्हणून संस्थानांच्या विलिनीकरणाचा विषय सरदार पटेल यांच्या अखत्यारित होता. याचा अर्थ विलिनीकरणामध्ये पंतप्रधान आणि गृहमंत्री या दोहोंची भूमिका महत्वपूर्ण होती. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह या दोहोंच्या सकारात्मक भूमिकेतून जम्मू काश्मीरला स्वतंत्र दर्जा देणारे कलम 370 रद्द करण्यात आले.

**उद्दिष्टे:-**

1) कलम 370 ची प्रासंगिकता शोधणे.

2) काश्मीर बाबत संयुक्त राष्ट्राच्या भूमिकेचा शोध घेणे.

**गृहितके:-**

1) भारतीय संविधानातील कलम 370 अस्थायी कलम आहे.

2)काश्मीर हा द्विपक्षीय मुद्दा आहे.

3)भाजपाचा अजेंडा

1980 मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत जनता पक्षाचा पराभव झाल्यानंतर जनता पक्ष फुटला. अटलबिहारी वाजपेयीसह लालकृष्ण आडवाणी यांनी जनता पक्षातून बाहेर पडून भारतीय जनता पक्षाची स्थापना केली. 1989 नंतर लोकसभेत पक्षाचा प्रभाव वाढला, तेव्हापासून पुढे झालेल्या लोकसभा निवडणुकांमध्ये राम मंदिर, समान नागरी कायदा व कलम 370 रद्द करणे या आपल्या अजेंड्यावर भाजपाने अधिक भर दिला. शेवटी 2019 मध्ये कलम 370 हटवून आपल्या मुख्य एका अजेंड्याची पुर्तता केली.

**परिस्थितीनुसार बदलते परराष्ट्र धोरण:-**

भारताचे संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी भारताच्या संरक्षण धोरणात बदल करण्याचे सुतोवाच केले. अण्वस्त्राचा वापर भारत प्रथम करणार नाही या धोरणातील बदल भविष्याच्या परिस्थितीवर अवलंबून राहणार आहे, हे राजनाथ सिंहाचे मत बदलत्या परिस्थितीनुसार आहे. माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांनी जेव्हा अणुचाचणी केली तेव्हा लोकसभेत आंतरराष्ट्रीय समुदायाला ठणकावून सांगीतले होते की, भारताने ही चाचणी फक्त स्वरक्षणाकरीता केली असून अण्वस्त्राचा वापर भारत प्रथम करणार नाही. अटलबिहारी यांचे 1999 दरम्यानचे हे मत आज परिस्थितीनुसार बदलण्याची भाषा भाजपाचेच नेते राजनाथ सिंह करीत आहेत. याचा अर्थ तेव्हा वाजपेयींचे संरक्षणविषयक धोरण चुकीचे होते किंवा राजनाथ सिंहाचे चुकीचे आहे अशी चर्चा किंवा निष्कर्ष काढणे निरर्थक ठरते. बदल्या परिस्थितीनुसार अंतर्गत व बाह्य धोरणात बदल करणे आवश्यक असते आणि तत्कालीन सरकारचे ते संवैधानिक कर्तव्य ठरते. जसे आंतरराष्ट्रीय पातळीवर संयुक्त राष्ट्राच्या धोरणातही बदल होतो आहे.

**तत्कालीन पंतप्रधानांची भूमिका:-**

जम्मू काश्मीर संस्थांचे भारतातील विलिनीकरण आणि शीतयुध्दा दरम्यान स्विकारलेले अलिप्ततेचे धोरण हे पं.नेहरुंचे धोरण, 1965 च्या भारत-पाक युध्दातील विजय हा माजी पंतप्रधान लालबहादुर शास्त्रींची रणनीती, 1971 मध्ये पाकिस्तानची फाळणी करुन झालेली स्वतंत्र बांगलादेशाची निर्मिती व भारत-पाक मधील सिमला करार (28 जुन 1972) आणि 1974 मधील पोखरण येथील अणुस्पोट चाचणी ही तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधीजींची यशस्वी धोरण, 1999 मधील कारगिल युध्द आणि पोखरण येथील अणुचाचणी हे तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांचे दुरदृष्टी धोरण तसेच ऑगस्ट 2014 मध्ये भारतीय संविधानातील कलम 370 रद्द करणे हे मोदी सरकारचे भारत हिताचे धोरण इत्यादी वरील तत्कालीन पंतप्रधानांची धोरणे ही भारताच्या परराष्ट्र धोरणाला बळकटी देणारे ठरलेत. अशा प्रकारे तत्कालीन परिस्थितीनुसार तत्कालीन पंतप्रधानांनी पाकिस्तानला जागा दाखविणारे आणि झुकविणारे परराष्ट्र धोरण राबविले.

**काश्मीर आणि संयुक्त राष्ट्र:-**

भारत आणि काश्मीरच्या सिमा परस्परांना लगत आहे. काश्मीरलाच पाकिस्तान, अफगानिस्तान व चीनच्या सिमा लागून असल्याने भारताच्या दृष्टीने ह्या प्रदेशाचे महत्व लष्करीदृष्ट्या फार महत्वाचे आहे. भारताचे असे स्पष्ट मत आहे की, काश्मीरचे भारतातील विलिनीकरण हे 1947 च्या भारत स्वातंत्र्य कायद्यानुसारच झाले त्यामुळे हे विलिनीकरण पुर्णपणे वैध आहे. मात्र हे पाकिस्तानला मान्य नाही. म्हणूनच पाक वारंवार हा मुद्दा संयुक्त राष्ट्राच्या आमसभेत व सुरक्षा परिषदेत उपस्थित करतो.

काश्मीरबाबत संयुक्त राष्ट्राच्या पुर्वीच्या आणि आजच्या भूमिकेत बदल झाला. जवळ-जवळ पाच दशके अमेरिका आणि पश्चिम राष्ट्रांचे मत पाकच्या बाजूने होते, कारण पाकिस्तान अमेरिकेच्या गोटात होता. फक्त रशिया हा एकमेव देश असा आहे की तो नेहमीच सुरक्षा परिषदमध्ये भारताच्या बाजूने ठामपणे उभा राहिला व राहतो. जम्मू काश्मीरबाबतची तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरुंची भूमिका नंतरच्या काही दशकात आंतरराष्ट्रीय व्यासपिठाने मान्य केली नव्हती, प्रामुख्याने अमेरिकेने, मात्र जवळ-जवळ गेल्या दोन दशकांपासून विशेषता अमेरिकेला दहशतवादाची झळ पोहचल्यानंतर अमेरिकेसह पश्चिम राष्ट्रांच्या धोरणात मोठा बदल झाला. आंतरराष्ट्रीय व्यासपिठावर चीन वगळता अन्य सदस्य राष्ट्रांकडून काश्मीर हा द्विपक्षीय मुद्दा आहे हे मान्य करण्यात आले.

भारत सरकारने कलम 370 रद्द करुन जम्मू काश्मीरच्या केलेल्या विभाजनाचा मुद्दा ऑगस्ट 2019 मध्ये चीनने संयुक्त राष्ट्राच्या सुरक्षापरिषदे समोर मांडला न्युयॉर्कमध्ये बंद खोलीत झालेल्या सुरक्षा परिषदेच्या बैठकीत रद्द केलेल्या कलम 370 बाबत 73 मिनीटे औपचारिक चर्चा झाली. कलम 370 हटविणे ही भारताची एकतर्फी कारवाई असल्याचा कांगवा चीनने सुरक्षा परिषदेत केला. मात्र अमेरिका, रशिया, इंग्लड व फ्रान्स या स्थायी सदस्य देशाने भारताने घेतलेल्या निर्णयाचे समर्थन केले. काश्मीर हा भारत-पाक चा द्विपक्षीय प्रश्न असून तो परस्परांशी चर्चा करुनच सोडवावा. संयुक्त राष्ट्राने त्यात हस्तक्षेप करण्याचे कारण नाही अशी स्पष्ट भूमिका रशियाने घेतली. नेहमी प्रमाणे रशिया भारताच्या बाजूने खंबीरपणे उभा दिसला. चीन व पाकिस्तानची वाढती जवळीक पाहता यावेळी अमेरिकेनेही काश्मीर हा द्विपक्षीय मुद्दा असल्याने तो दोन्ही देशांनी चर्चेतून सोडवावा असे ठामपणे स्पष्ट केले. इतकेच नव्हे तर या बैठकीपुर्वी पाकिस्तानचे पंतप्रधान इमरान खान यांनी अमेरिकन राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम यांना फोन करुन भारता विरोधात पाकिस्तानच्या मागणीला पाठींबा द्यावा अशी मागणी केली. मात्र अमेरिकेने ती फेटाळली.

सुरक्षा परिषदेच्या अमेरिका, रशिया, इंग्लड व फ्रान्स या चारही सुरक्षा परिषदेच्या स्थायी सदस्य देशांनी काश्मीर प्रश्नात संयुक्त राष्ट्राच्या हस्तक्षेपास विरोध केल्याने पाक व चीन तोडघशी पडले. मागील अनेक दशके काश्मीर मुद्यांवर सतत पाकची साथ देणाऱ्या अमेरिकेची बदलती भूमिका (भारताच्या बाजूने) भारताच्या कुटनीतीचा मोठा विजय मानल्या जात आहे.

संयुक्त राष्ट्रातील भारताचे स्थायी दुत सय्यद अकबरुद्दीन यांनी न्युयॉर्क येथे ऑगस्ट 2019 मध्ये आंतरराष्ट्रीय पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नांची जी उत्तरे दिलीत त्यामधून जम्मू काश्मीर विभाजनाची भारताची भूमिका अधिक स्पष्ट झाली. जम्मू काश्मीरमधील जनतेच्या विकासाकरीता कलम 370 हटविण्याचा निर्णय भारत सरकारने घेतला असून तो भारताचा आंतरिक मुद्दा आहे. त्याच्याशी बाहेरच्या देशांचा कोणताही संबंध नाही हे अकबरुद्दीन यांच्या रोखठोक प्रतिक्रीया म्हणजेच सरळसरळ द्विपक्षीय मुद्यात चीनचा हस्तक्षेप नाकारणाऱ्या आहेत. दहशतवाद थांबला तरच पाक सोबत बोलनी सुरु करता येईल ही भारताची भूमिका स्पष्ट केली.

सुरक्षा परिषदेच्या चार स्थायी सदस्य देशांनी भारताच्या निर्णयाच्या बाजूने मते नोंदविल्यानंतरही संयुक्त राष्ट्रातील पाकचे स्थायी प्रतिनिधी अलिहा लोधी यांनी मात्र पाकची खोटे बोलण्याची परंपरा जपत आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताविरोधी मत असल्याच्या प्रतिक्रीया दिल्यात. मोदी सरकारची नीती कशी चुकीची आहे हे जगाला पटविण्याकरीता पाक परराष्ट्र मंत्री कुरेशींना पं.नेहरुंची नीती योग्य वाटते 'नेहरु का हिन्दुस्तान न रहा' असे ते बोलतात. मात्र तेव्हा याच पाकने नेहरुंच्या नीतीचा संयुक्त राष्ट्रामध्ये सुध्दा विरोध केला होता.

**निष्कर्ष:-**

संशोधन लेखाकरीता निश्चित केलेली दोन्ही गृहितके सिध्द झाली आहेत. माजी पंतप्रधान पं.नेहरु आणि सरदार पटेल यांच्यात काही मुद्यांवर वैचारिक मतभेद निश्चितच होते. मात्र त्या मतभेदांना प्रसंगानुसार वेगवेगळया पध्दतीने मोडतोड करुन मांडण्याचा व लिहिण्याचा जो प्रयत्न होतो आहे तो राजकीय व सामाजिक दृष्ट्या विघटनकारी वाटतो आहे. भारताच्या विकासासाठी या दोन्ही नेत्यांचे योगदान मोठे आहे, मात्र त्या योगदानाची तुलना करतांना तत्कालीन परिस्थितीचे भान ठेवणे आवश्यक आहे. प्रत्येक नेत्यांची धोरण हे तत्कालीन परिस्थितीनुरुप असतात. तत्कालीन परिस्थितीमध्ये निश्चित केलेली धोरण काही दशकानंतर वैचारिक संघर्ष निमार्ण करण्यास कारणीभूत ठरतात. कारण त्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन परिस्थितीनुसार बदलतो तसेच तो राजकीय बनतो.

पाक हा दहशतवादाचे उगमस्थान असून त्याची झळ जगाला पोहचते आहे. ही भारताची भूमिका जगाला पटत असल्याचे सुरक्षा परिषदेतील समर्थन सिध्द करते. दुसरे, जो चीन सतत तिबेट प्रदेशातील चीनी नागरीकांच्या मानवाधिकारांचे हनन करतो, तेथे लष्करी कारवाई करुन तिबेट नागरीकांचा आवाज दाबतो. त्याला जम्मू काश्मीर विषयी बोलण्याचा कोणताही नैतिक अधिकार नाही. भारताची अर्थव्यवस्था दुबळी करणे आणि पाकला अमेरिकेच्या गोटातून बाहेर काढून भारता विरोधी वापरणे या दुहेरी उद्देशाने चीन संयुक्त राष्ट्रामध्ये पाकच्या बाजूने उभा राहतो, हे आता जगाला समजले. म्हणूनच आंतरराष्ट्रीय पातळीवर चीन व पाक एकाकी पडले तर भारताची बाजू भक्कम दिसली.

संदर्भ ग्रंथ:- 1) डॉ.वसंत रायपूरकर - आंतरराष्ट्रीय संबं

2) डॉ.वा.भा.पाटील - आंतरराष्ट्रीय संबंध

3) डॉ.शैलेंद्र देवळाणकर - परराष्ट्र धोरण

4) वृत्तपत्रातील लेख

# २७. केंद्र-राज्य संबंध

**प्रा. डॉ. दिनकर संतुकराव कळंबे**
प्राध्यापक, विभाग प्रमुख व संशोधक मार्गदर्शक (राज्यशास्त्र)
मोरेश्वर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय
भोकरदन, ता. भोकरदन जि. जालना. (महाराष्ट्र) ४३१११४.
E-mail ID- kalambedinakar@gmail.com
Cell No. 9422219593

**गोषवारा:-**

भारताने संघराज्य शासन पध्दतीचा स्वीकार केला आहे. याबाबतीत भारताने अमेरिकेचे अनुकरण केले. भारताने संघराज्याचा स्वीकार करतांना इतर देशांचे अनुकरण जसेच्या तसे न करता आपल्या भारतीय परिस्थितीला अनुकूल करण्याचा प्रयत्न केला आहे. भारताची सामाजिक, आर्थिक, राजकीय परिस्थिती विचारात घेऊन संघराज्याच्या इतर तत्वाचां समावेश संविधानात करण्यात आलेला आहे. संघराज्य याचा अर्थ केंद्र सरकार म्हणजेच संघसरकार व राज्य सरकार यांच्यात केलेली अधिकारांची विभागणी होय. लोकशाही असलेल्या भारताने विस्तृत भूप्रदेश व वाढती लोकसंख्या विचारात घेऊन संघराज्य शासनपध्दतीचा स्वीकार केला आहे.

'भारत हा राज्यांचा एक संघ (Union) होईल,' या कलमाने या देशाच्या घटनेचा प्रारंभ होतो. 'संघराज्य' या शब्दाचा उल्लेख घटनेत कुठेही नाही. संघराज्य शासन पध्दतीच्या काही महत्वपूर्ण वैशिष्ट्यांचा स्वीकार केलेला आहे. भारतीय सार्वभौमत्व, एकता व एकात्मता यास घटनाकारांनी प्राथमिकता दिलेली आढळते. भारताची झालेली फाळणी, काही भागांत झालेल्या दंगली, भारतातुन फुटून निघण्यसाठी झालेली आंदोलने लक्षत घेता केंद्र प्रभावी असावे. असे त्यांना वाटत होते. परिणामतः एकात्म शासन पध्दतीची वैशिष्ट्ये ही भारतात पहावयास मिळतात. राज्यांच्या हक्कांना बाधा न आणता राष्ट्रीय ऐक्य आणि सामर्थ्य यांची निर्मिती व्हावी म्हणून केलेल्या संयोजनाला संघराज्य असे म्हटले आहे. भारतीय संविधानात संघराज्य (Union of the States) असा उल्लेख केलेला आहे. हा शब्द जास्त एकतावादी आहे. या संदर्भात बोलतांना डॉ. आंबेडकरांनी असे स्पष्ट केले होते की, ''भारत संघराज्य वाटत असला तरी हा संघ त्यामध्ये सिम्मिलित झालेल्या प्रदेशाच्या समझोत्यांचा परिणाम म्हणून

निर्माण झालेला संघ नाही त्यामुळे या संघातून बाहेर पडण्याचा अधिकार कोणत्याही घटक राज्याला नाही.''

**Keywords:- ''भारतीय संघराज्य- केंद्र-राज्य संबंध.''**

**संशोधानाची वैशिष्ट्येः-**

१) भारतीय संघराज्य म्हणजे काय? याची रचना, स्वरुप व वैशिष्ट्यांचा अभ्यास करणे.

२) केंद्र सरकार किवां संघ सरकार आणि राज्यसरकार घटकराज्य यांच्या अधिकरांचा अभ्यास करणे.

३) केंद्र-राज्य संबंधाविषयी आजच्या विद्यार्थ्यांना माहिती प्राप्त करुण देणे.

**संशोधन पध्दतः-**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी संशोधकाने वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पध्दतीचां अवलंब केला आहे. सामाजिक शास्त्रात कोणत्याही विषयावर संशोधन करीत असताना केवळ एकाच पध्दतीचा अवलंब करणे अशक्य असते यास सदरिल विषय अपवाद नाही. संशोधन पेपरसाठी प्राथमिक व व्दीतीय साधनांचा वापर केला गेला आहे. प्राथमिक साधनात भारतीय संघराज्याच्या निर्मिती, विविध देशांच्या शासनसंस्था यांचा अभ्यास व व्दीतीय साधनात विविध केंद्र सरकार व राज्यसरकार यांच्यातील अधिकार विभागणी, यावर उपलब्ध असणारे विविध संदर्भग्रंथ, मासिके, साप्ताहिके, नियतकालीके इत्यादिंचा समावेश केला आहे.

**संघराज्यः-**

**भारतीय घटना संघराज्याची स्थूलमानाने सर्व वैशिष्ट्ये पूर्ण करते.**

१) संघराज्य शासन पध्दतीत दोन सरकारे असतात. केंद्र सरकार आणि घटक राज्य सरकार

२) संघराज्य शासन पध्दतीत घटना सर्वश्रेष्ठ असते. घटनेची चौकट केंद्र-राज्यांना मोडता येत नाही.

३) सत्तेचे विभाजन- केंद्रास ९७ विषय, राज्यांस ६६ विषय आणि सामाईक अधिकार ४७ विषयांत आहे.

४) लिखित व परिदृढ राज्यघटना- संघराज्य शासन पध्दतीची लिखित व परिदृढ राज्यघटना ही गरज आहे.

५) न्यायालयाचे स्वातंत्र्य- भारतात सर्वोच्च न्यायालय आहे. व घटक राज्यांसाठी उच्च न्यायालय आहे. या न्यायालयांना घटनेशी विसंगत कायदा घटनाबाह्य

 ISBN No. 978-93-91097-18-9

घोषित करण्याचा अधिकार आहे. थोडक्यात संघराज्य शासन पध्दतीची वैशिष्ट्ये भारतात पहावयास मिळतात.

भारतीय घटनेने पूर्णतः संघराज्य स्वीकारलेले नाही. कारण भारतात जेव्हा-जेव्हा केंद्र कमकुवत असते तेव्हा एकता भंग होते. फुटीरवादी शक्ती अधिक कार्यरत होतात. अराजकतेचा धोकाही संभवतो घटनाकारांना फाळणीच्या पार्श्वभूमीवर केंद्र प्रभावी असावे असे वाटते. म्हणूनच एकात्म शासन पध्दतीची काही वैशिष्ट्ये भारतीय पध्दतीत पहावयास मिळतात.

१) केंद्र सरकारला जास्तीचे किंवा अधिकचे अधिकार.
२) भारतात एकेरी नागरिकत्व आहे. भारतात भारतीय फक्त भारताचा नागरिक असतो.
३) भारतात सर्वांसाठी एकच राज्यघटना आहे.
४) संसदेस राज्य सीमा बदलता येते, नवीन राज्य निर्माण करता येते.
५) भारतीय संविधानात आणीबाणीची तरतुद आहे. त्यामुळे केंद्रास राज्य सूचीवर कायदा करता येतो.
६) राज्य सूचीवर कायदा करण्याचा अधिकार.
७) राज्यपालांची नियुक्ती.
८) राज्यांचे आर्थिक परावलंबित्व.
९) राज्यसभेत समान प्रतिनिधीत्वाचा अभाव.
१०)घटना दुरुस्तीचा अधिकार केंद्रास.
११)आंतरराज्य परिषद
१२)योजना आयोग व आताचा निती आयोग.

प्रशासकिय सोयीसाठी भारतीय घटनेने संघराज्याची रचना स्वीकारलेली आहे. तर एकता, एकात्मता, राष्ट्रीय हित व सार्वभौमत्वाची जपणूक यासाठी एकात्म शासन पध्दतीचा स्वीकार केलेला आहे.

**केंद्र-राज्य संबंध:-**

केंद्र-राज्य संबंध हा अतिशय गुंतागुंतीचा विषय आहे. त्यामुळेच मोठ्या प्रमाणात चर्चेचा विषय झाला आहे. केंद्र-राज्य संबंधचा विचार दोन पातळ्यांवर केला जातो.

१) संविधानिक पातळी / संविधानात्मक पातळीवर
२) व्यावहारिक व राजकीय पातळीवर

- **संविधानात्क पातळीवर केंद्र-राज्य संबंधचा विचार तीन प्रकार केला जातो.**

  १) केंद्र-राज्य वैधानिक संबंध

  २) केंद्र-राज्य प्रशासकीय संबंध

  ३) केंद्र-राज्य आर्थिक संबंध

**वैधानिक संबंधः-**

केंद्र-राज्य संबंधात तीन सूचीचा संबंध येतो त्यांना केंद्र सूची, राज्य सूची व सामाईक सूची म्हटले जाते. या सूचीनां संविधानाच्या सातव्या सूचीत समाविष्ट केलेले आहे.

**वैधानिक संबंधः-**

केंद्र-राज्य संबंधात तीन सचीचा संबंध येतो. त्यांना केंद्र सूची, राज्य सूची व सामाईक सूची म्हटले जाते. या सूचीनां संविधानाच्या सातव्या सूचीत समाविष्ट केलेले आहे.

**केंद्रसूचीः-**

यांत राष्ट्रीय महात्वाच्या विषयांचा समावेश आहे. या सूचीत संरक्षण, युध्द, करार, नागरिकता, विदेश, रेल्वे, बंदर, हवाई मार्ग, दूरध्वनी, चलन, बॅंक, विमा, खाणी इत्यादी ९७ विषयांचा समावेश आहे.

**राज्यसूची'-**

प्रादेशिक विकासाच्या दृष्टीकोनातून महत्वाच्या विषयांचा यात समावेश केलेला आहे. यात पोलिस, न्याय, जेल, स्थानिक, स्वशासन, सार्वजनीक आरोग्य, कृषी, सिंचन, रस्ते इत्यादी ६६ विषयांचा समावेश आहे.

**समवर्ती सूचीः-**

समवर्ती सूचीत ४७ विषय होते. पण ४२ व्या (१९७९) घटना दुरुस्तीने राज्य सूचीतील चार विषय शिक्षण, जंगल, जंगली जनावरे, पक्षी यांची रक्षा व वजन मापे यांचा समावेश सामाईक सूचीत करण्यात आला आहे. यामुळे सामाईक सूचीतील विषयांची संख्या ४७ वरून ५१ झाली. तसेच ''लोकसंख्या नियंत्रण व परिवार नियोजन'' हा एक विषय नव्याने समवर्ती सूचीत समाविष्ट करण्यात आला. म्हणून समवर्ती सूचीतील विषयांची संख्या ही ५२ झालेली आहे. पण घटनेच्या दृष्टीकोणातून आजही समवर्ती सूचीतील विषयांची संख्या ४७ एवढीच आहे. समवर्ती सूचीत त्या विषयाचा समावेश आहे. ज्यांचा संबंध केंद्र व प्रांतासाठी सारखाच आहे. यात फौजदारी, विवाह, घटस्फोट, दत्तक उत्तराधिकारी, औद्योगिक वाद सामाजिक सुरक्षा पूनर्वास यांचा समावेश होतो.

**उर्वरित अधिकार, शेषाधिकारः-**

उर्वरित अधिकार हे संघराज्याच्या संकेतानूसार राज्यास असावयास पाहिजे, पण भारतीय घटनेने मात्र उर्वरित अधिकार केंद्रास दिलेले आहेत. संसदेस काही परिस्थितीत राज्य सूचीवर कायदा करण्याचा अधिकार आहे.

१) राज्य सूचीतील विषय राष्ट्रीय महत्वाचा झाला तर.
२) राज्य विधिमंडळाने इच्छा व्यक्त केली तर
३) आणीबाणीत संसद कायदा करु शकते.
४) राज्यातील घटनात्मक यत्रंणा कोलमडल्यास.
५) विधेयक मांडण्यासाठी व अंतिम मंजूरीसाठी केंद्राची अनुमती.
६) आंतरराष्ट्रीय करारांच्या अंमलबजावणीसाठी.

**केंद्र-राज्य प्रशासकिय संबंधः-**

संघ सूचीतील विषयांचा कारभार केंद्र सरकारने पाहावयाचा आहे. तसेच राज्य सूचीतील विषयांच्या प्रशासनाची जबाबदारी राज्य सरकारवर आहे. समवर्ती सूचीतील विषयांवार केंद्र सरकार कायदे करु शकेल. पण या विषयांचा कारभार पाहाण्याची जबाबदारी राज्य सरकारांची असते. परकिय आक्रमण आणि अंतर्गत बंडाळी ह्यापासून घटक राज्याचे रक्षण करणे ही केंद्र सरकारची जबाबदारी असते. म्हणून संपूर्ण भारताच्या हिताची जपणूक केंद्र सरकारने करावयाची असल्यामुळे केंद्राला प्रशासकिय क्षेत्रातसुध्दा घटनेने काही विशेषाधिकार दिलेले आहेत, ते पुढीलप्रमाणेः- (१) सूचना देणे (२) कार्यकारी कामाची जबाबदारी (३) आदेशाचे पालन (४) आंतरराज्यीय मंडळाची स्थापना. राज्य व केंद्र सरकारचे प्रशासकिय अधिकारी वेगवेगळे नाहीत. एखाद्या जिल्ह्यामध्ये राज्य सरकारच्या कायद्यांची अमंलबजावणी करण्याचे कार्य जो अधिकारी करतो त्याच्याकडे केंद्र सरकारच्या कायद्याच्या अंमलबजावणीचे कामसुध्दा सोपविलेले असते.

- **राज्यपालाची भूमिकाः-**

राज्यपाल हा घटक राज्याचा संवैधानिक प्रमुख असतो. संसदीय शासनप्रणाली असलेल्या भारत देशात मुख्यमंत्री वास्तविक प्रमुख असून, राज्यपाल नामधारी प्रमुख असतात. राज्यांचा नामधारी प्रमुख असलेल्या राज्यपालाची रचना घटनेच्या कलम १५३, १५५, १५६, व १६३ कलमात सप्ष्ट करण्यात आली आहे. राज्याचा शासनाविषयक कारभार राज्यपालाच्या नावाने चालतो. राज्यपालांना राज्य घटनेच्या कलम १६३ नूसार स्वविवेकाधिन अधिकार प्राप्त झालेला आहे.

- **केंद्र राज्य आर्थिक संबंधः-**

**१) कर निर्धारणः-**

घटनेने कर लावण्याच्या अधिकाराचे विभाजन केलेले आहे. तसेच करांतून मिळालेल्या उत्पनाचे विभाजन केलेले आहे. केंद्रास कर रुपाने मिळालेले उत्पन्न पुढील बाबीतून मिळते. आयकर, सीमाशुल्क, निर्यात शुल्क, कृषी-भूमी सोडून इतर संपत्तीवरील कर रेल्वे, शेअर बाजार राज्यास कर रुपाने उत्पन्न पुढील बाबीतून मिळते. कृषी-भूमी कर, वाहनांवरील कर, नाका, वीज, राज्य परिवहन, पशू इत्यादी काही कर केंद्र लावते, गोळा करते व खर्च करते. काही कर केंद्र लावते, गोळा करते पण राज्यांना देते. काही कर केंद्र सरकार लावते, केंद्रच गोळा करते, मात्र केंद्र व राज्य यांच्यात ते वाटून दिले जाते.

**अनुदानः-**

**केंद्र सरकार विविध स्वरुपात राज्यांना अनुदान देत असते.**

अ) बिहार, पश्चिम बंगाल, आसाम, ओरिसा यांना ताग व त्यापासून बनवलेल्या वस्तूच्या निर्यात शुल्कातून जे उत्पन्न मिळते त्यातील काही भाग केंद्र त्यांना देते.

**ब)** पूर, भूकंप, दूष्काळ, व नैसर्गिक आपत्तीच्या वेळी केंद्र राज्यांना अनुदान देते.

क) प्रत्येक राज्यात ज्या भागात आदिवासी असतात त्यांच्या कल्याणासाठी, योजना राबविण्यासाठी केंद्र राज्यांना अनुदान देते.

ड) राज्य आर्थिक संकटात असेल तर त्या संकटातून राज्यास बाहेर काढयासाठी केंद्र त्यास अनुदान देते.

**कर्ज काढण्याचा अधिकारः-**

भारतीय घटनेने विदेशी कर्ज काढण्याचा अधिकार केंद्रास दिलेला आहे. राज्यांना अंतर्गत कर्ज काढण्याचा अधिकार आहे. मात्र विदेशी कर्ज काढण्याचा अधिकार राज्यांना नाही. केंद्राचे राज्यावर कर्ज असेल तर राज्यांना अंतर्गत कर्ज काढण्यापूर्वी केंद्राची परवानगी काढणे गरजेचे आहे. यावेळी केंद्र राज्यावर काही अटी लादू शकते.

**करातून सूटः-**

राज्यात केंद्राची जी संपत्ती आहे त्यावर राज्य कर लावू शकत नाही. केद्र देखील राज्यांच्या मालमत्तेवर कर लावू शकत नाही.

**नियंत्रक-महालेखा परीक्षकः-**

भारताच्या नियंत्रक–महालेखा परीक्षकाची नियुक्ती राष्ट्रपती मंत्रिमंडळाच्या सल्ल्याने करतो. तो भारत सरकारच्या तसेच राज्यांच्या हिशोबांवरही लक्ष ठेवतो. खर्चाची चौकशी करातो. संसद त्याच्या माध्यमातुन राज्याच्या उत्पन्नांवर नियंत्रण ठेवते.

**आर्थिक आणिबाणीः-**

देशात आर्थिक आणीबाणी घोषित असेल तर राज्य फक्त राज्य सूचीमधील विषयांवर कर लावू शकते. आर्थिक आणीबाणीच्या काळात राष्ट्रपती केंद्राकडून राज्यांना मिळणारी सहाय्यता, अनुदान बंद करु शकतो. करातुन मिळणा-या उत्पनाची वाटणी बंद करण्याचे आदेशही देऊ शकतो.

अशाप्रकारे भारतीय संघराज्यातील केंद्र-राज्य संबंध जे आहेत ते आपण विविध पातळीवर अभ्यासले आहेत.

**समारोप / निष्कर्षः-**

केंद्र सरकार आणि घटक राज्यसरकार यांच्या संबंधाचा अभ्यास करतानां आपाल्याला त्यांच्या आधिकाराची विभागणी ही ज्या पध्दतीने केली आहे त्या सर्वांचा विचार केल्यानंतर संघराज्यामध्ये सत्तेचे विकेंद्रीकरण केल्या गेले. त्यादृष्टीने केंद्र-राज्य यांचे संबंध हे वृध्दीगंत होण्याऐवजी किंवा त्यांच्यात समन्वय प्रस्थापित होण्याऐवजी हे दोन सरकारमधील संबंध हे तणावाचेच पहावयास मिळतात. आज आपण महाराष्ट्राचा व केंद्रसरकारचा विचार केला तर दोन्ही सरकारमध्ये शह व काटशहाचे राजकारण आपणांस पहावयास मिळातात. आणि हे संबंध जर समन्वय आणि सहकार्याचे पहावयाचे असल्यास दोन्ही सरकारने संबंधात सुधारणा कराव्या म्हणजे केंद्र-राज्य संबंध सुधारुन विकासात्मक व कल्याणकारी योजना राबवल्या जातील.

**संदर्भसूचीः-**

१) भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण- डॉ. भास्कर लक्ष्मण भोळे- पिंपळापूरे ॲंड कंपनी पब्लिशर्स, नागपूर.- सप्टेंबर- २०१२.

२) भारताचे शासन आणि राजकारण- डॉ. भास्कर लक्ष्मण भोळे- पिंपळापूरे ॲंड कंपनी पब्लिशर्स, नागपूर.- ऑक्टोबर- २०१३

३) भारतीय संविधान- शासन आणि राजकिय प्रक्रिया- डॉ. बी. वाय. कुलकर्णी- एज्यूकेशनल पब्लिशर्स ॲंड डिस्ट्रीब्यूटर्स औरंगाबाद. जून-२०१३

४) भारताचे शासन आणि राजकारण- डॉ. शुभांगी राठी- कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद.- जूलै- २०१४

# २८. 'भारतीय संविधानातील समता : एक विचार'

**डॉ. रजनी अ. बोरोळे,**
सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभागप्रमुख,
कर्मयोगी तुळशीराम पवार महाविद्यालय, हाडोळती,
ता. अहमदपूर, जि. लातूर.

**सारांश** –

भारत जगातील सर्वात मोठा लोकशाहीप्रधान देश आहे. भारतीय जनतेने अथक प्रयत्नातून, अहिंसात्मक मार्गाने ब्रिटिशांना देशातून हाकलून दिले मात्र समाज जीवनातील विषमता दूर करून सहजपणे सर्व अंगाने समानता प्रस्थापित करता आली नाही. 19 व्या शतकात भारतात निर्माण झालेल्या विविध सामाजिक चळवळींनी समाज जीवनात समता प्रस्थापित करण्याचे यशस्वी प्रयत्न केले. पुढे स्वातंत्र्यानंतर डॉ. राजेंद्र प्रसाद आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या सहकाऱ्यांच्या साथीने भारतीय संविधानाची निर्मिती केली. ज्यात प्रास्ताविका, मूलभूत हक्क आणि राज्य धोरण यात 'समता' या तत्त्वाचा समावेश केला आहे. प्राचीन काळापासून कोणत्याना कोणत्या निमित्ताने भारतीय समाज जीवनात सतत समतेचा विचार रुजविण्याचे प्रयत्न झाले आहेत. संविधानाने त्याला कायद्याचे रूप देऊन समता हे मूलभूत तत्त्व अधिक व्यापक पध्द्तीने मांडले आहे. सामाजिक, आर्थिक, धार्मिक, राजकीय क्षेत्रातील समतेच्या बाबतीत अजूनही काही प्रश्न शिल्लक असले तरी वर्षानुवर्षं अज्ञान, अंधकारात खितपत पडलेल्या समाजास प्रगतीचा मार्ग खुला करून देण्यात भारतीय संविधान आणि त्यातील समतेचे तत्त्व अत्यंत महत्त्वाचे ठरले आहे, हे नाकारता येत नाही.

**प्रस्तावना -**

आज आपण भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करीत आहोत. ब्रिटिशांच्या गुलामगिरीतून अहिंसात्मक मार्गाने मुक्त होऊन जगासमोर सर्वात मोठा लोकशाहीप्रधान देश म्हणून भारत सक्षमपणे उभा आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशातील सर्व घटकांना सामावून घेऊन त्यांच्या सर्वांगीण हिताची हमी देणारी संविधाननिर्मिती हे अत्यंत महत्त्वाचे आणि मूलभूत कार्य होते. मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर, घटना समितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद आणि त्यांचे सर्व सहकारी यांच्या अथक विचारमंथनातून आणि प्रयत्नातून भारताचे संविधान निर्माण झाले आहे.

**प्रमुख संज्ञा** - समता, बंधुता, स्वातंत्र्य, प्रतिगामित्व, संविधान.

**तथ्य संकलन -** प्रस्तुत संशोधन लेख द्वितीयक तथ्यावर आधारलेला असून त्यासाठी वेगवेगळी संदर्भ ग्रंथ, पुस्तके, मासिके, वृत्तपत्र आणि इंटरनेटचा आधार घेतला आहे.

**उद्दिष्टे -**

1. समतेचा अर्थ लक्षात घेणे.
2. भारतीय समाजातील समतेची प्रत्यक्ष स्थिती तपासणे.

'समता, बंधुता आणि स्वातंत्र्य' या मानवीमूल्यांची कायदेशीर जोपासना संविधानात केली गेली आहे. वास्तवात एकोणिसाव्या शतकापासूनच समाजजीवनात समतेचा विचार रुजविण्यासाठी संघटनात्मक कार्याला सुरुवात झाली होती. सत्यशोधक समाज, ब्राम्हो समाज, प्रार्थना समाज, रामकृष्ण मिशन अशा कितीतरी चळवळी 19 व्या शतकाच्या मध्यानंतर भारतात निर्माण झाल्या. महात्मा फुले, गोपाळ गणेश आगरकर, लोकहितवादी, राजा राममोहन रॉय, स्वामी विवेकानंद यासारख्या समजधुरीनानी जनमत जागृत करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला. स्वातंत्र्य, समता, शिक्षण, स्त्री पुरुष समानता समाज जीवनात रुजविण्याचे कार्य वरील सुधारकांनी केले. हा बदल सामाजिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक जीवनातील प्रतिगामीत्व दूर करण्याच्या दिशेने होता. वरील प्रयत्नामुळे संविधान निर्मितीस बळ प्राप्त झाले आहे.

**अ) समाजजीवनात समतेची आवश्यकता -**

आधुनिक काळात पाश्च्यात्य विचाराच्या अनुकरणातून भारतीय समाजास समतेची आवश्यकता अधिक जाणवू लागली. विशेषकरून भारतीय धर्मजीवन अधिक प्रतिगामी होते. जातीय उतरंड अधिक मजबूत असल्यामुळे क्षमता असूनही प्रगतीच्या संधी प्रत्येकास समान नव्हत्या. समानता हे जसे व्यक्तिगत मूल्य आहे तसेच ते सामूहिकही आहे. मात्र परंपरेचा पगडा अधिक असल्यामुळे सर्वप्रकारची विषमता समाजजीवनात मूळ धरून होती. ही अतिरेकी विषमता पारतंत्र्यासही कारणीभूत होती. परिणाम प्रगती आणि स्वातंत्र्य या दोन्हीसाठी समाजजीवनात समता प्रस्थापित होणे गरजेचे होते. 19 व्या शतकात जे समाजसुधारक निर्माण झाले त्यात गोपाळ गणेश आगरकर हे समतेचा व्यक्तिगत जीवनात पूर्णपणे स्वीकार करणारे महत्त्वाचे सुधारक होते. 'अस्पृश्यतानिवारणाकडे पाहण्याची आगरकरांची दृष्टी निव्वळ भूतदयेची नव्हती. समाजाचे घटक म्हणून अस्पृश्य जातींना आपण बरोबरीच्या नात्याने वागवले पाहिजे. त्यासाठी आधी आपल्या लौकिक व्यवहारातील भेदभाव व पंक्तिप्रपंच समूळ नाहीसा करून आपल्या सामाजिक जीवनाची घडी समतेच्या तत्त्वावर नव्याने बसवली पाहिजे,'[1] अशी आगरकरांची भूमिका होती. अस्पृश्यता संपून समाजजीवनात समता प्रस्थापित होणे अगत्याचे आहे, हे त्यांनी पटवून दिले आहे. स्वामी विवेकानंद हे समतेचा सखोल विचार करणारे महत्त्वाचे सुधारक आहेत. 'पोकळीत स्वत:ला विसर्जित करून तुम्ही नाहीसे व्हा आणि शेतकऱ्याच्या झोपडीतून, कोळी, चांभार, भंगी यांच्या वस्त्यांमधून आणि किराणाभुसार मालाच्या दुकानातून तसेच मांसाचे तुकडे भाजून विकणाऱ्यांच्या भट्टीतून नवा भारत उदयास येऊ द्या. कारखान्यांतून, बाजारपट्ट्यांमधून, डोंगरदऱ्यातून आणि अरण्यातून तो उभा राहू द्या. हजारो वर्ष या सामान्य माणसांनी तोंडावाटे शब्दही न काढता छळ सहन केला असल्यामुळेच त्यांच्या ठिकाणी अफाट बळ निर्माण झाले आहे. मूठभर अन्नावर राहूनही संपूर्ण जगाला ते हादरे देऊ शकतात. त्यांना

फक्त अर्धी भाकर द्या आणि मग बघा त्यांच्या शक्ती सामावून घेण्यास अवघे विश्व तोकडे पडेल. आता उच्च वर्गांचे कल्याण निम्न समाजांना त्यांचे हक्क मिळवण्याच्या दृष्टीने कार्य करण्यातच सामावलेले आहे.'[2] वरीलप्रमाणे त्यांनी समतेच्या बाबतीत अत्यंत मूलभूत विचार मांडले आहेत. देशाच्या सर्वांगीण विकासासाठी समाजातील निम्न वर्गाचे सर्वोतोपरी हीत जोपासले जाणे अगत्याचे असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. नव्या भारताचा उदय जसा कारखान्यातून होईल तसाच तो छोट्या छोट्या भट्ट्यातूनही व्हायला हवा ही सर्वव्यापी संकल्पना स्वामी विवेकानंद यांनी मांडली आहे. समाजाचे मानसिक स्वास्थ सुदृढ होण्यासाठी धार्मिक जीवनात समता प्रस्थापित होणे नितांत आवश्यक असल्याचे मूलभूत विचार त्यांनी व्यक्त केले आहेत.

**ब) भारतीय संविधानातील समतेचे तत्त्व -**

जवळपास सलग दोन वर्ष संविधाननिर्मितीचे काम चालू होते. राजकीय स्वातंत्र्य मिळाले तरी सामाजिक आणि धार्मिक जीवनात गुलामगिरी प्रचलित होती. परिणामी भारतीय समाज एकारेषेत आणण्यासाठी सर्वांना समानता बहाल करणे अगत्याचे होते. याचे भान संविधान निर्मात्यांना होते. भारतीय संविधानात समता तत्त्वाचा निर्देश प्रास्ताविका, मूलभूत हक्क आणि राज्य धोरणाची मार्गदर्शक तत्वे अशा तीन ठिकाणी करण्यात आला आहे. भारतातील प्रत्येक नागरिकाला दर्जाची आणि संधीची समानता निश्चितपणे प्राप्त करुन देण्याचा संकल्प संविधानाच्या प्रस्ताविकात आहे. मूलभूत हक्काच्या यादीत पहिले स्थान समतेला देऊन येथील प्रत्येक व्यक्तीला कायद्याबाबत समानता आणि कायद्याचे समान संरक्षण देण्याचे बंधन राज्यसत्तेवर घातले आहे. धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान या कारणांसाठी नागरिकांमध्ये भेदभाव केला जाणार नाही. त्याचप्रमाणे कोणासही कोणतेही व्यवसाय करण्याचे स्वातंत्र्य, सार्वजनिक उपहारगृहे, भोजनालय, सार्वजनिक करमणुकीचे ठिकाण याचा वापर करण्याची मुभा राजसत्तेने सर्वसामान्य लोकांना द्यावे असे आश्वासन संविधानात दिले गेले आहे. केवळ धर्म, वंश, जात, लिंग, कुळ, जन्मस्थळ, वास्तव्यस्थान या कारणासाठी कोणत्याही नागरिकास कोणत्याही सरकारी नोकरीपासून अपात्र ठरवता येणार नाही. याप्रमाणे नागरिकातील भेदभाव नाहीसा करण्याचे कार्य संविधानाने केली आहे.

'समतेच्या संदर्भात उल्लेखनीय मार्गदर्शक तत्वे पुढीलप्रमाणे सांगता येतील. सर्व नागरिकांना जीवनावश्यक गोष्टी पर्याप्त प्रमाणात प्राप्त व्हाव्यात. समाजाच्या भौतिक संसाधनाची मालकी व वितरण यांचे स्वरूप सर्वसाधारण हिताचे ठरेल असे असावे. सामुदायिक हिताला बाधक ठरेल एवढ्या प्रमाणात संपत्तीचे व उत्पादन साधनांचे केंद्रीकरण होऊ नये. सर्व स्त्री-पुरुषांना समान श्रमासाठी समान वेतन मिळावे. आर्थिक निकडिंनी लागलेल्या अनारोग्यापासून व अतिकष्टापासून श्रमिकांचा बचाव व्हावा, बालमजुरीला आळा बसावा, बाल्य व तारुण्य यांचे नैतिक भौतिक शोषणापासून संरक्षण व्हावे आणि त्यांना निकोप विकासाची संधी मिळावी, श्रमिकांना जीवनवेतन, उत्तम जीवनमान व विश्रांती यांची हमी असावी, उत्पन्नातील तफावत कमी व्हावी आणि दर्जा, संधी व सुविधा याबाबतची विषमता नष्ट व्हावी, गरज पडल्यास

प्रत्येकाला कायदेविषयक मदत उपलब्ध असावी, सर्व नागरिकांसाठी एकच एक नागरी कायदा असावा, 14 वर्षाखालील सर्व मुला-मुलींना प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे असावे, समाजातील दुर्बल घटकांच्या विकासासाठी विशेष प्रयत्न केले जावेत.[3] वरीलप्रमाणे संविधानातून अभिप्रेत असलेल्या समतेचे स्वरूप विस्ताराने पाहता येईल. शिक्षण, व्यापार, उद्योग, धर्म जीवन, करमणूक, विश्रांती, आरोग्य अशा कितीतरी घटकांमध्ये समतेचा स्वीकार संविधानाने केला. 19 व्या शतकापासून प्रचलित असलेला समतेचा विचार संविधानाच्या निमित्ताने कायद्याच्या रूपात अवतरीत झाला. 1960 नंतर महाराष्ट्रात शिक्षणाचा प्रसार होऊन सर्वच बाबतीत बहुजन समाज प्रगतीच्या मार्गावर अग्रेसर झाला. ही किमया संविधानातील समतेच्या तत्त्वामुळे नक्कीच शक्य झाली आहे, हे मान्य करावे लागते.

**क) संविधानातील समतेचे तत्त्व आणि आजची स्थिती -**

भारतीय संविधानाने कायद्याने समता प्रस्थापित करून समाजातील सर्व थरातील घटकांना प्रगतीचा मार्ग खुला करून दिला आहे हे खरे असले तरी वास्तवात मात्र अजूनही काही समस्या शिल्लक आहेत. राजकारण, धर्मकारण, शिक्षण, आरोग्य, स्त्री जीवनात समता पूर्ण अर्थाने रुजलेली नाही. 'चाळीस कोटी असंघटित कष्टकरी, आदिवासी, दलित, स्त्रिया, अल्पसंख्य, विद्यार्थी इत्यादींचे जीवन-मरणाचे प्रश्न म्हणजे सामाजिक सुरक्षा कायदा, घरेलू कामगार कायदा, महागाई, महिला आरक्षण, शिक्षण, आरोग्य हे प्रश्न पुन्हा अग्रक्रमांनी पुढे आणण्यासाठी चळवळीची गरज आहे. कष्टकऱ्यांच्या चळवळीच्या दबावातूनच कष्टकऱ्यांना न्याय मिळेल.'[4] वरील मत विचारात घेतल्यास समताधिष्ठित समाज निर्मिती अजून झालेली नाही असेच म्हणावे लागते. विविध क्षेत्रातील मूलभूत प्रश्न अजूनही कायम आहेत, हे वरील मतावरून स्पष्ट होते.

स्त्रीच्या बाबतीत समाजजीवनात अजून समता प्रस्थापित होणे शिल्लक आहे. कायद्याने स्त्रीला सक्षम बनविले असले तरी वास्तव समाजजीवनात मात्र ती अजूनही दुय्यम आहे. 'ज्या परमेश्वराने ही आश्चर्यकारक सृष्टी उत्पन्न केली, त्यानेच स्त्री-पुरुष निर्माण केले. तरी सर्व प्रकारचे साहास दुर्गुण स्त्रियांचेच अंगी वसतात किंवा जे अवगुण स्त्रियांचे अंगी आहेत तेच पुरुषात आहेत किंवा नाहीत हे अगदी स्पष्ट करून दाखववावे याच हेतूने हा लहानसा निबंध मी माझ्या सर्व देशभगिनींचा अभिमान धरून रचिला आहे. यात अमुकच जाती किंवा कुळ याकडे माझे मुळीच लक्ष नाही. स्त्री पुरुषांची तुलना आहे.'[5] स्त्री पुरुष तुलनेच्या भाष्यकार ताराबाई शिंदे यांनी 19 व्या शतकात उपस्थित केलेला प्रश्न आजही कमी अधिक स्वरूपात कायम आहे. महात्मा फुले, सावित्रीबाई फुले यांनी अथक प्रयत्नातून स्त्रीला शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणले. पुढे ताराबाई सारख्या विदुषीने समाजमन जागृत करण्याचा कसोशीने प्रयत्न केला. काही अंशी सरकारात्मक बदल झालेही. पण आजही स्त्रीला कुटुंब, समाज, अर्थ, राजकारण आणि धर्म जीवनात दुय्यम स्थान दिले जाते. विवाहासारख्या अत्यंत महत्त्वाच्या वेळीही तिचे मत विचारात घेतले जात नाही, ही वस्तुस्थिती आहे.

जी अवस्था स्त्रियांची तीच बहुजनांची आहे. उच्चवर्णीय कायमच समतेच्या विरुद्ध राहिले आहेत. याबाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी खूप लिखाण केले आहे ‘खोटी प्रतिष्ठा सांभाळणाऱ्या व्यक्ती खूपच असतात. त्यांचे विचारमंथन लक्षणीय असते. सामाजिक सुधारणांविषयी त्यांची मते विलक्षण असतात. अशा व्यक्तीचा छडा लावताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर 'समाज समतेचे विरोधक' या लेखात विचार व्यक्त करतात. जातीभेदाचे समर्थन करणारे लोक जाती दुराभिमानी असल्यामुळे ते समतेच्या भावनेला पारखे झालेले असतात.'[6] जातीय आणि धर्मीय दुराभिमान अजूनही समाजात प्रचलित आहे. खोटी प्रतिष्ठा, मान - सन्मान याच्या आहारी जावून सामाजिक समतेला हानी पोहचविण्याचे काम केले जाते.

**निष्कर्ष** -

थोडक्यात कायद्याने समतेचे सूत्र स्वीकारले असले तरी वास्तव जीवनात समता अजून पूर्णपणे प्रस्थापित झालेली नाही. कायदा आपल्या बाजूने असला तरी तो योग्य पद्धतीने वापरण्याची समज असणेही नितांत गरजेचे असते, ही बाब विचारात घ्यावी लागते. भारतीय समाज जीवनाचा विचार करता 19 व्या शतकापासून विविध मार्गाने समता, बंधुता आणि स्वातंत्र्य हे मानवी मूल्य रुजविण्याचा प्रयत्न केला गेला आहे. स्वातंत्र्यानंतर भारतीय संविधानाने ही समता या मूल्यास विशेष प्राधान्य देऊन समाजात सामाजिक, आर्थिक, धार्मिक समता प्रस्थापित करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केल्याचे दिसते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान निर्मितीच्या वेळी समाजातील शोषित, पिडीत घटकांच्या प्रगतीसाठी विशेष उपाय योजना केल्याचे दिसते, हे इथे मान्य करावे लागते.

**संदर्भ सूची** -


1. गं. बा. सरदार - आगरकरांचा सामाजिक तत्त्वविचार - व्हिनस प्रकाशन, पुणे - 1975 - पृ. 8.
2. विवेकानंद - कास्ट, कल्चर अँड सोशालिझम - अद्वैताश्रम - अलमोरा - 1975 - पृ. 75.
3. भास्कर लक्ष्मण भोळे - विसावे शतक आणि भारतातील समताविचार - सुगावा प्रकाशन, पुणे - 2004 - पृ. 73.
4. पुरोगामी सत्यशोधक - संपादक डॉ. बाबा आढाव - वर्ष 35, अंक 2 - एप्रिल - मे - जून 2009 - पृ. 3 - 4.
5. ताराबाई शिंदे - स्त्री पुरुष तुलना - रघुवंशी प्रकाशन, पुणे - प्रस्तावना - पृ. 1.
6. डॉ. नारायण कांबळे - बाबासाहेबांची पत्रकारिता : एक मुक्तचिंतन - शब्द शिवार प्रकाशन, मंगळवेढा - 2021 - पृ. 50.

# २९. खाजगीपणाचा अधिकार (Right To Privacy)

**डॉ. प्रशांत विघे**
(राज्यशास्त्र विभाग प्रमुख)
भारतीय महाविद्यालय, अमरावती
vighepv@gmail.com, Mobile No:9326877749

**प्रस्तावना :**

भारतीय संविधानात मूलभूत अधिकाराचा समावेश करण्यात आलेला आहे, परंतु खाजगीपणाचा अधिकार अंतर्भूत करण्यात आलेला नाही. काळानुरूप खाजगीपणाच्या अधिकाराची व्याप्ती न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या निर्णयामुळे वाढली. परिणास्वरुप खाजगीपणाच्या अधिकाराला मूर्तस्वरूप प्राप्त झाले असल्याचे दिसून येते. भारतीय जनता पार्टीच्या लोकशाही आघाडी सरकारने खाजगीपणाच्या अधिकाराला २०१४ पासून आधार कार्डची जोडणी केली. त्यानुसार प्रत्येक सामाजिक कल्याणकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी आधार कार्ड अनिवार्य केले गेले. त्यामुळे लोकांनी सरकारच्या या धोरणाला विरोध दर्शवून न्यायालयामध्ये एक जनहित याचीका दाखल केली. त्या वेळेपासून खाजगीपणाच्या अधिकारासंदर्भात चर्चा सुरू झाली. सर्वोच्च न्यायालयाने २०१५ मध्ये एक खंडपीठ स्थापन करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार २३ सप्टेंबर २०१८ ला खाजगीपणाच्या अधिकारासंदर्भात खंडपिठाने निर्णय दिला. तेव्हापासून भारतामध्ये खाजगीपणाचा अधिकार प्राप्त झाला.

**खाजगीपणाचा अधिकार म्हणजे काय?**

एखाद्या व्यक्तीच्या गोपनियतेला धक्का पोहचवणाऱ्या सरकारी आणि खाजगी कृत्यांना प्रतिबंध करणं, म्हणजेच खाजगीपणाचा अधिकार होय.जगातील १५० पेक्षा जास्त देशांच्या संविधानामध्ये गोपनियतेचा अधिकार नागरिकांना देण्यात आला आहे. मात्र हा विषय कायमच आंतरराष्ट्रीय स्तरावरील चर्चेचा मुद्दा ठरला आहे.

परंतु वाढती गुन्हेगारी,दशहतवाद यांच्या पार्श्वभूमीवर एनएसए, सीआयए,रॉ यासारख्या सरकारी संस्था नागरिकांच्या खाजगीपणाचा अधिकार हा अडथळा ठरु शकतात. नागरिकांच्या प्रत्येक गोपनीय बाबींवर व्हर्च्युअली नजर ठेवत खाजगीपणाचा अधिकार जपता येऊ शकते का? हा प्रश्न उपस्थित केला जातो.

**व्यक्तीच्या खाजगीपणाच्या अधिकाराची ऐतिहासिक पार्श्वभूमी :**

१८९५ मध्ये सर्वप्रथम खाजगीपणाच्या अधिकाराची चर्चा समोर आली (Right to privacy, Harvard Law review–Val.-IV. No. December 15 ; 1890). त्यावेळी एका विधेयकात असे म्हटले होते की, सरकार कुठल्याही ठोस कारणाशिवाय व्यक्तीच्या खाजगी अधिकारावर बंधने आणू शकत नाही. खाजगीपणाच्या अधिकाराच्या संदर्भात सन १९२५ मध्ये एक समिती नियुक्त करण्यात आली होती. यावेळी या समितीचे सदस्य म्हणून स्वत: महात्मा गांधी यांनी हे काम पाहिले आणि महात्मा गांधींनी व्यक्तीचा खाजगीपणाचा अधिकार हा मूलभूत अधिकार असल्याचे मत मांडले. तर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनीही भारत स्वातंत्र्याच्यावेळी प्रत्येक व्यक्तीस त्याच्या खाजगीपणाचा अधिकार असल्याचे मत मांडले. एवढेच नव्हे व्यक्तीच्या खाजगी अधिकारांतर्गत सरकारला काही चौकशी करायची असल्यास अशी चौकशी न्यायमंडळाच्या देखरेखीखाली झाली पाहिजे असेही मत डॉ.बाबासाहेबांनी मांडले. तत्कालीन खासदार अरूण जेटली यांनी मार्च २०१६ मध्ये आधारकार्ड विधेयकाच्या

वादविवादाच्या संबंधी खाजगीपणाचा अधिकार हा संविधान कलम २१ अंतर्गत येणाऱ्या जीवन जगण्याशी संबंधीत असल्याचे मत व्यक्त करून खाजगीपणाची व्याख्या मांडली.[१]

**व्यक्तीच्या खाजगी अधिकारासंदर्भात न्यायालयीन निर्णय**

भारताच्या सुप्रीम कोर्टाने दिलेल्या खालील निर्णयांमुळे व्यक्तीच्या खाजगीपणाच्या अधिकाराच्या कक्षा रुंदावत गेल्या आहेत. या संदर्भातील काही महत्त्वाचे निर्णय खालील प्रमाणे आहेत.

**खडक सिंग विरुध्द उत्तरप्रदेश सरकार (१८ डिसेम्बर १९६२) :**

खडकसिंग हा उत्तरप्रदेशातील कुख्यात डाकू होता. त्याच्यावर गुंडगिरी व डाकुपणा करण्याचे आरोप होते. तथापि पुराव्याअभावी त्याची सुटका झाली. त्याच्यावर जेव्हा पोलीसांकडून पाळत ठेवण्यात आली तेव्हा पोलीसांनी त्याच्यावरील आरोपांचे समर्थन केले. मात्र पोलीसांचे अशा प्रकारचे कृत्य संविधानाच्या भाग-३ मधील कलम २१ अंतर्गत जो जीवित व व्यक्तीगत स्वातंत्र्याचा अधिकार आहे यावर आघात करणारे आहे असा दावा खडकसिंग याच्यावतीने करण्यात आला.[२] न्या.अय्यंगर यांच्या खंडपीठाने बहुमताने असे मत व्यक्त केले की संविधानामध्ये 'खाजगीपणाचा हक्क' या संदर्भात विशेषत्वाने काहीही कथन केलेले नाही. याच निर्णयातील अल्पमताच्या बाजूने न्यायमूर्ती सुब्बाराव होते. त्यांच्या मते आपले संविधान खाजगीपणाच्या अधिकारासंदर्भात बोलत नसले तरी तो हक्क वैयक्तिक स्वातंत्र्याच्या हक्कात अंतर्भूत आहे. प्रत्येक लोकशाहीवादी देशात व्यक्तीला आराम करण्याचा हक्क, शारिरीकदृष्ट्या तंदुरुस्तीचा हक्क, मनाची शांती व सुरक्षितता यांचा हक्क असला पाहिजे. सरते शेवटी माणसाचे स्वत:चे घर जिथे तो आपल्या कुटूंबियांसोबत वास्तव्यास असतो तो त्याचा 'किल्ला' (Castle) असतो; तिथे हस्तक्षेप करणे म्हणजे त्याच्या व्यक्तीस्वातंत्र्यावर अतिक्रमण होय. या खटल्यातील न्या. सुब्बाराव यांच्या मतांनी कलम-२१ मधील खाजगीपणाच्या हक्काचा पाया रचला असे म्हटले जाते.[३]

**आर. एम. मलकानी विरुध्द महाराष्ट्र राज्य (२२ सप्टेंबर १९७२) :**

सुप्रीम कोर्टाने या केसमध्ये वैयक्तिक फोन टॅपिंगचे प्रकरण हाताळले आहे. श्री. मलकानी यांच्या टेलिफोनवरील वैयक्तिक संवाद रेकॉर्ड करून त्याआधारे त्यांना ब्लॅकमेल केले जात होते; त्यांना कलम २१ अंतर्गत जो खाजगीपणाचा हक्क प्राप्त झाला आहे त्याचे हे उल्लंघन आहे असे त्यांचे म्हणणे होते. सुप्रिम कोर्टाने त्यांचे म्हणणे व दावा फेटाळला. कोर्टाच्या मते, ''टेलिफोनवरील संभाषणास टेप करण्यास न्यायालय पाठिंबा कदापि देणार नाही. मात्र हा पाठिंबा सामान्य किंवा सर्वसाधारण व्यक्तीसाठी आहे. गुन्हेगारांच्या बाबतीत पोलीस टेलिफोनवरील संभाषण ऐकू शकतात; कायदा व सुव्यवस्था राखणे आणि सार्वजनिक सेवेतील भ्रष्टाचार निर्मुलनासाठी त्याची गरज आहे.''[४]

**गोविन्द विरुध्द मध्यप्रदेश राज्य (१९७५)[५] :**

मध्यप्रदेश पोलीस रेग्युलेशनच्या कलम ८५५ व ८५६ नुसार पोलीसांना नियमित गुन्हेगारांच्या घरांना भेटी देणे, त्यांना संशयित म्हणून ताब्यात घेण्याचे अधिकार आहेत. ह्याच अधिकारांचा जो प्रश्न आहे त्याची संविधानात्मक वैधता तपासण्याचा प्रश्न प्रस्तुत प्रकरणात अंतर्भूत होता. सुप्रिम कोर्टाचा पोलीसांच्या अशा प्रकारच्या अधिकारास पाठिंबा होता. गुन्हेगार सराईत असेल व त्याच्या गुन्हेगारीपणात सातत्य असेल तर पोलीसांना गुन्हेगारावर पाळत ठेवण्याचा अधिकार आहे.या खटल्यामुळे खाजगीपणाचा एखाद्या व्यक्तीचा अधिकार निरंकुश असू शकत नाही हे स्पष्ट झाले. या खटल्यानंतर 'निरंकुशता नसणे' किंवा 'अमर्याद निरंकुशता नसणे' हे तत्व हे या हक्काचे वैशिष्ट्य झाले.

## मालक सिंग विरुध्द पंजाब राज्य आणि हरियाना (१९८१)[६] :

मालक सिंग विरुध्द पंजाब राज्य आणि हरियाना राज्य या खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने ''एखाद्यावर पाळत ठेवणे ही गोष्ट कायदेशीर असून त्यामुळे नागरिकाच्या वैयक्तीक स्वातंत्र्याच्या हक्काचे कोणतेच उल्लंघन होत नाही. अशी पाळत बेकायदेशीर हस्तक्षेप नसावी'' असा निर्णय दिला आहे.

## राजगोपाल विरुध्द तामिळनाडू राज्य (१९९४)[७] :

राजगोपाल विरुध्द तामिळनाडू राज्य या खटल्यामध्ये कोर्टाने नागरिकांचा खाजगीपणाचा अधिकार आणि सार्वजनिक सेवेतील नोकरांचे वर्तन व त्यांचे कार्य यावर टिका करण्याचा प्रसार माध्यमांचा अधिकारामध्ये समतोल साधण्याचा प्रयत्न केला आहे. या प्रकरणातील कैद्यास (शंकर) सहा खुन केल्याने त्यास मृत्यूदंडाची शिक्षा झाली होती. त्याने त्याचे आत्मचरित्र लिहिले ज्यात त्याने उच्च पातळीवरील अधिकाऱ्यांशी आलेल्या संबंधाचे वर्णन केले होते. त्या आत्मचरित्रास प्रकाशित करण्याची परवानगी मुद्रण प्रसारमाध्यमांनी शासनाकडे मागितली होती पण शासनाने ती नाकारली. या पार्श्वभूमिवर पोलीस महासंचालकांनी त्या वृत्तपत्रास आत्मचरित्र प्रकाशित करण्यास प्रतिबंध केला. या प्रकाशनामुळे तुरुंगाच्या खाजगीपणाच्या अधिकाराचे उल्लंघन होईल असे मत त्यांनी व्यक्त केले. या प्रकरणात त्या कैद्यास अथवा त्याच्या कुटूंबियास पक्षकार बनविले गेले नाही. कोर्टाने नंतर कैद्याचे खाजगीपण त्या पुस्तकाच्या प्रकाशनाने बाधित होते अथवा नाही याचा विचार केला.

अशा तऱ्हेने वरील पाचही प्रकरणांमध्ये सुप्रीम कोर्टाने खाजगीपणाच्या हक्काचा विचार केला आहे. तो पुढीलप्रमाणे सांगता येतो.

१) नागरिकांच्या खाजगीपणाचा अधिकार हा संविधानाच्या कलम २१ मध्ये नागरिकांना जो जिवीत व व्यक्तिगत स्वातंत्र्याचा अधिकार आहे त्यामध्येच समाविष्ट आहे. प्रत्येक नागरिकास त्याच्या खाजगीपणाचे संरक्षण स्वत: करण्याचा, त्याचे कुटूंब, विवाह, जन्म घालण्याचा, मातृत्व, अपत्य बाळगण्याचा आणि शिक्षणाचा हक्क आहे.

२) वरील विषयाशी संबंधित कोणतीही बाब कोणतीही व्यक्ती संबंधित व्यक्तीच्या परवानगीशिवाय किंवा मान्यतेशिवाय प्रकाशित करू शकणार नाही. जर असे झाले तर तो कायदेशीर गुन्हा असेल आणि त्या व्यक्तीच्या खाजगीपणाच्या हक्कांचा भंग झाला असे समजण्यात येईल. अर्थात या बाबीस मर्यादा किंवा अपवाद असतील.

३) जर एखाद्या प्रकरणात न्यायालयीन निर्णय झाला असेल तर त्याचे प्रकाशन हा सार्वजनिक अभिलेख असू शकतो. तथापि कोर्टाच्या मते अशा प्रकाशनामध्ये सभ्यतेच्या मर्यादा पाळायला हव्यात. उदा. एखाद्या प्रकरणात एखाद्या महिलेवर बलात्कार झाला असेल, तिला किडनॅप केले असेल किंवा अपहरण झाले असेल तर अशा प्रकरणी तिची मानहानी होऊ नये म्हणून तिचे नाव, तिच्यावरील तो प्रसंग प्रकाशनाचा भाग असू नये.

## मूलभूत अधिकारामध्ये खाजगीपणाचा अधिकार :[८]

भारतीय संविधानाने देशातील प्रत्येक नागरिकांना कायम मुलभूत अधिकार प्रदान केले असून या अधिकारांना व्यक्तीच्या विकासासाठी महत्वाचे मानले जाते. भारतीय संविधानानुसार नागरिकांना पुढील अधिकार आहे. १) समानतेचा अधिकारी २) स्वातंत्र्याचा अधिकार ३) शोषणाविरुद्धचा अधिकार ४) धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार ५) संस्कृती तसेच शिक्षणाचा अधिकार ६) घटनात्मक उपाय करण्याचा अधिकार ७) खासगीपणाचा अधिकार हा नव्याने मुलभूत अधिकारात विकसित झाला.

**व्यक्तीच्या खाजगीपणाच्या अधिकाराविषयी भारतीय संविधानात उल्लेख :**

भारतीय संविधानातील भाग ३ मध्ये कलम १२ ते ३५ पर्यत प्रत्येक नागरिकास दिलेल्या मूलभूत अधिकारांचा उल्लेख केलेला असून हे अधिकार सर्व भारतीय नागरिकांना स्वत:चा आर्थिक, सामाजिक तसेच सांस्कृतिक विकास करण्यासाठी वापरता येतात. हे मूलभूत अधिकार कुठल्याही ठोस कारणास्तव सरकारी यंत्रणा/संस्था/अधिकारी हिरावून घेवू शकत नाही. याच अधिकारांमध्ये खाजगी अधिकाराविषयी उल्लेख मिळत असून असा उल्लेख कलम २१ मध्ये अंतर्भूत आहे.

भारतीय नागरिकास त्याच्या गौरवपूर्ण जीवन जगण्याशी संबंध असणाऱ्या अधिकारापासून दूर करता येत नाही. कारण कलम २१ हे Right to Life and Personal Liberty यासंबंधी आहे. त्यामुळे कोणत्याही व्यक्तीस तिचे जिवीत व व्यक्तीगत स्वातंत्र्यापासून वंचीत करता येणार नाही.

न्यायालयाने कलम २१ मध्ये खालील गोष्टींच्या संदर्भात उल्लेख केला आहे. त्यात[९]

- प्रतिष्ठेसह जीवन जगण्याचा अधिकार
- स्वच्छ पर्यावरण- स्वच्छ शुद्ध पाणी आणि मोकळ्या हवेमध्ये जगण्याचा अधिकार
- जीवन रक्षणाचा अधिकार
- आरोग्याचा अधिकार
- खाजगी स्वातंत्र्याचा अधिकार
- आश्रय घेण्याचे स्वातंत्र्य
- वर्षापर्यंत मोफत शिक्षणाचा अधिकार
- मोफत कायदेशीर सहाय्य मिळविण्याचा अधिकार
- त्वरीत न्यायाचा अधिकार
- कारावासात एकटे राहण्याविरूध्दचा अधिकार, अंधार कोठडी विरुध्दचा अधिकार
- मानवी प्रतिष्ठेला धोका पोहोचेल अशा व्यवहाराविरूध्दचा अधिकार
- हातकडी लावण्याविरूध्दचा अधिकार
- प्रतिष्ठेचा अधिकार
- माहितीचा अधिकार
- सार्वजनिक फाशी विरूध्दचा अधिकार
- सुनावणीचा अधिकार
- निष्पक्ष सुनावणीचा अधिकार
- राज्याबाहेर जाण्याचा अधिकार
- सरकारी दवाखान्यात वेळेवर उपचाराचा अधिकार
- अतितातडीच्या वेळी चिकित्सा सुविधा मिळण्याचा अधिकार
- कोठडीतील शोषणाविरूध्दचा अधिकार
- वेठबिगारी विरूध्दचा अधिकार
- परदेशात जाण्याचा अधिकार
- उशिरा फाशी देण्याविरूध्दचा अधिकार
- महिलांबरोबर आदर आणि सन्मानपूर्वक व्यवहाराचा अधिकार.

भारतीय संविधानाच्या खंडपीठाने खाजगीपणाच्या अधिकारासंदर्भात दिलेल्या निर्णयामुळे पुढील प्रश्न निर्माण होतात.[१०]

**कलम ३७७ :**

सर्वोच्च न्यायालयाने वरील बाबींना मूलभूत अधिकाराचा दर्जा दिल्यामुळे भारतीय दंड विधान संहितेतील कलम ३७७ ला आव्हान दिले गेले. कारण या कलमानुसार समलैंगिकता गुन्हा मानण्यात येत होता, मात्र न्यायालयाच्या खाजगीपणाबाबतच्या अधिकारावर दिलेल्या निर्णयामुळे कुणाला घरामध्ये प्रवेश द्यावा हा त्या व्यक्तीचा अधिकार आहे.त्यामुळे तो घरामध्ये कोणतेही नातेसंबंध जपू शकतो. घराच्या खाजगीपणामध्ये कुटुंब, विवाह, संतती, लैंगिक भावना या सर्वांना या अधिकाराच्या दृष्टीने महत्व प्राप्त आहे. **नवतेज सिंग जोहर वि. युनियन ऑफ इंडिया** या खटल्यात समलैंगिकतेला सर्वोच्च न्यायालयाने अंशतः मान्यता दिली आहे.

**ब) इच्छा मरण :**

सर्वोच्च न्यायालयाने खाजगीपणाला मूलभूत अधिकाराचा दर्जा दिल्यामुळे इच्छा मरणाचा मार्ग मोकळा झाला आहे. अर्थात व्यक्तीचे आयुष्य हे खाजगीपणाच्या अधिकारात येणारा मुद्दा असला तरी अद्यापही न्यायालयाने इच्छा मरणाची परवानगी मान्य केलेली नाही. इच्छा मरण हे भारतीय न्याय व्यवस्थेसमोरील एक आव्हान आहे. भविष्यात या अधिकाराच्या संदर्भात काय निर्णय घेतला जाईल हे वेळच ठरवेल. नुकताच यावरही सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय आला आहे.

**क) गर्भपाताचा अधिकार :**

एखाद्या महिलेने अपत्यास जन्म द्यावा की नाही याचा तिला अधिकार असेल त्यामुळे महिलांच्या गर्भपात करण्यासंबंधीचे नियम शिथिल होण्याची शक्यता आहे. या संदर्भात निर्णय व्हायचा आहे.

**ड) बीफ कायदा :**

मुंबई उच्च न्यायालयाने २०१५ मध्ये सरकार व्यक्तीच्या खाजगीपणामध्ये प्रवेश करून त्यांच्याकडे बीफ आहे की नाही याचा शोध घेवू शकत नाही असा निर्णय दिला होता. यावेळी महाराष्ट्र सरकारने मुख्यत: खाजगीपणाचा अधिकार मूलभूत अधिकारामध्ये समाविष्ट नसल्याचे मत मांडले होते. परंतु सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानुसार सरकारला व्यक्तीच्या घरामध्ये थेट घुसता येणार नाही. न्या. चेलमेश्वर यांनी व्यक्त केलेल्या मतानुसार, कुणी काय खावे, काय खावू नये, कोणता पोशाख वापरावा, कोणती विचारधारा स्विकारावी हे सरकारने सांगणे कोणालाही आवडणार नाही.

**खाजगीपणाच्या अधिकारासंदर्भातील अजून काही खटले[११]:**

**(i) एस. पी. शर्मा विरुद्ध सतीशचंद्र १९५४ :**

मेसर्स दालमिया जैन एअरवेज हे गैर मार्गाचा अवलंब करत आहे या संदर्भात प्रथम माहिती अहवाल दाखल करण्यात आला. त्यानंतर न्याय दंडाधिकाऱ्यांनी त्याचा तपास करण्याचे निर्देश दिले. तेव्हा कंपनीने या निर्देशाला आव्हान देण्यासाठी रिट अर्ज न्यायालयात दाखल केला एवढेच नव्हे तर दाखल करून कंपनीची मालमत्ता मिळवणे, ताब्यात ठेवणे तसेच त्यांच्या संपत्तीची विल्हेवाट लावणे हे खाजगीपणाच्या अधिकाराचे उल्लंघन होत असल्याची भूमिका मांडली. त्यावेळी आठ न्यायाधीशांच्या खंडपीठाने निर्णय देवून मालमत्ता मिळवणे हा गोपनियतेचा अधिकार नाही असे म्हटले आहे.

**(ii) गोविंद विरुद्ध भारत सरकार १९७७ :**

गोविंद खटल्यामध्ये पोलीसांकडून गोविंद यांच्यावर पाळत ठेवली जात असल्याने त्यांनीही संविधान मूलभूत अधिकारांचा उल्लेख करत या मूलभूत अधिकारांवर गदा येत असल्याचे आव्हान न्यायालयात केले. तेव्हा न्यायालयाने त्यांचे आव्हान फेटाळून लावले.

### (iii) मेनका गांधी विरुद्ध भारत सरकार १९७७ :

१९७७ ला आणीबाणी संपल्यानंतर मेनका गांधी यांना सार्वजनिक हितासाठी तुमचे पारपत्र जप्त करण्यात येत असल्याचे सरकारकडून कळवण्यात आले. त्यावेळी त्यांनी परदेशात प्रवासाला जाणे संविधान कलम २१ अन्वये दिलेल्या व्यक्तीगत स्वातंत्र्याचा भाग असल्याचा दावा केला. तेव्हा सात न्यायाधीशांच्या खंडपीठाने गोपनियतेचा हक्क हा व्यक्तीगत स्वातंत्र्याशी निगडीत असल्याचे मत मांडले.

### (iv) राजगोपाल विरुद्ध तामिळनाडू सरकार १९९६:

राजगोपाल यांना सहा जणांचा खून केल्याप्रकरणी मद्रासच्या तुरुंगात शिक्षा झाली होती. या शिक्षेदरम्यान राजगोपाल यांना स्वत:चे आत्मचरित्र प्रकाशित करायचे होते. त्यावेळी त्यांनी आपल्या आत्मचरित्रात काही आय.पी.एस.अधिकाऱ्यांचा नावानिशी उल्लेख केला होता, या कारणास्तव त्यांचे हे प्रकाशन रद्द करण्यात आले होते. त्यावेळी त्यांनी आपल्या गोपनियतेच्या अधिकाराचे उल्लंघन होत असल्याचे मत मांडले.

### (v) आर. सुकण्या विरुध्द आर. श्रीधर २००४:

सुकण्या विरुध्द श्रीधर या दोघांमध्ये वैवाहिक वाद असल्यामुळे त्यांची न्यायालयात सुनावणी सुरू होती. या सुनावणीच्या वार्ताकन प्रसिध्दीला मनाई करावी, या संबंधातील माहिती इतरांना देवू नये अशी मागणी करणारा अर्ज सुकण्याकडून करण्यात आला. तेव्हा न्यायालयाने हा अर्ज फेटाळला. पण उच्च न्यायालयाने तो मान्य करून इन कॅमेरा सुनावणी करण्याचे आदेश दिले. कारण न्यायालयाच्या निर्णयानुसार घटस्फोटाच्या खटल्यात गोपनियतेचा अधिकार हा बातम्या प्रसिद्धीच्या अधिकारापेक्षा वरचढ ठरतो.

### (vi) खाजगीपणाच्या अधिकारासंदर्भातील घटनापीठ[१२] :

सर्वोच्च न्यायालायाच्या निर्देशानुसार केंद्र सरकारने आपला निर्णय सर्वोच्च न्यायालयाला सादर केला होता. त्यावर सर्वोच्च न्यायालयाने २४ ऑगस्ट २०१७ ला दिलेल्या निर्णयात असे म्हटले आहे की, खाजगीपणाचा अधिकार हा मूलभूत अधिकार असून हा अधिकार कलम २१ अंतर्गत येणाऱ्या जीवन जगण्याच्या अधिकाराचा एक भाग आहे.यासाठी सर्वोच्च न्यायालयाने स्थापन केलेल्या ९ सदस्यीय खंडपीठात १.जे.एस. खेर (सरन्यायाधिश)(अध्यक्ष) २.न्या.चमलेश्वर ३.आर.के.अग्रवाल ४. एस.ए.बोबडे ५. ए.एम.सापरे ६. आर.एम.नरिमन ७. जी.वाय.चंद्रचूड ८. संजय किसन कौल ९. एस.अब्दुल नजीर यांचा अंर्तभाव होता.

### वैयक्तिगत गोपनियता मूलभूत अधिकार ठरल्याने काय परिणाम?

वैयक्तिक गोपनियता हा मूलभूत अधिकार नसल्याचं सरकारने कोर्टात सांगितलं होतं. जर व्यक्तिगत गोपनियतेला मूलभूत अधिकाराचा दर्जा दिला, तर व्यवस्था चालवलं कठीण होऊन बसेल. शिवाय, कुणीही व्यक्तिगत गोपनियतेचं कारण देत फिंगर प्रिंट, फोटो किंवा अन्य माहिती देण्यास नकार देऊ शकतं. सर्वोच्च न्यायलयाच्या या निर्णयामुळे आता आधार कार्ड, पॅन डिटेल्स यासारख्या बाबी सार्वजनिक होणार नाहीत.

### आधारचं काय?

'आधार' सक्तीसाठी आग्रही असलेल्या केंद्र सरकारला हा मोठा धक्का मानला जात आहे. मात्र केहर यांच्या नेतृत्वाखालील ९ सदस्यीय घटनापीठाला केवळ गोपनीयतेच्या अधिकाराचा दर्जा निश्चित करायचा होता. त्यामुळं या निर्णयाचा 'आधार' योजनेवर लगेचच काहीही परिणाम होणार नाही असं बोललं जात आहे. 'आधार' विरोधातील याचिकांवर स्वतंत्र सुनावनी होणार आहे. आधार कार्डसाठी घेतले जाणारे बोटांचे ठसे, डोळ्यातील बुब्बुळाचं स्कॅनिंग व अन्य माहितीमुळं मूलभूत अधिकारांचा भंग होतो की नाही हे आता न्यायालय ठरणार आहे. आपली भूमिका न्यायलयात पटवून देण्याचं आव्हान मात्र केंद्रापुढं असेल.

**सर्वसामान्यांच्या जीवनावर काय परिणाम?**

आधार कार्ड अनेक सरकारी प्रक्रियांसाठी महत्त्वाचं ठरत आहे. डोळ्यांची बुब्बुळं किंवा बोटांचे ठसे यासारखी आधारशी लिंक्ड असलेली खाजगी माहिती लीग झाल्यास गुन्हागार त्याचा गैरवापर करण्याची भिती आहे. त्यामुळेच आधारबाबत सुप्रीम कोर्टाने अद्याप कोणताही निर्णय दिलेला नाही.

मेसेज, फोटो यासारख्या गोष्टी दोन मोबाईल युझर्सनी फक्त एकमेकांसोबत शेअर केलेल्या असतात. सर्व्हिस प्रोव्हाईडरने त्याचा अ‍ॅक्सेस घेऊन इतर बाबींसाठी वापर करणे हा गोपनियतेचा भंग आहे. मीडियामध्ये जेव्हा एखाद्या व्यक्तीच्या वैयक्तिक आयुष्याचं रिर्पोटिंग केलं जातं. तेव्हा तोही राईट टू प्रायव्हसीचा मुद्दा ठरतो. पब्लिक फिगरविषयी माहिती करून घेण्याचा अधिकार सर्वसामान्यांना असल्याचा युक्तिवाद यावेळी केला जातो.

अशातऱ्हेने खाजगीपणाच्या अधिकाराची पार्श्वभूमी मांडली आहे. ती मांडण्यापूर्वी खाजगीपणाच्या अधिकाराचे आजच्या स्थितीचे कथन करून सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने दिलेल्या निर्णयाचे विश्लेषण केले आहे. आता व्यक्तीच्या खाजगीपणाचा अधिकार हा संविधानाचे कलम २१ मधील व्यक्तीच्या जिवीत व्यक्तीगत स्वातंत्र्याच्या अधिकाराचा (Right to Life and Personal Liberty) एक भाग असल्याचे स्पष्ट होते.

**संदर्भ :**

१ विघे, डॉ. प्रशांत, ईडियन पॉलिटी, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २०२० पृ. .८०
२ पूर्वेक्त पृ.८१
३ पूर्वेक्त पृ.८२
४ पूर्वेक्त पृ.८२
5. AIR 1973 SC 157; 1973 SCR (2) 417.
6. AIR 1981 SC 760.
7. (1994) 6 S.S.C. 632.
8. AIR 2018 SC 4321.
९. विघे, डॉ. प्रशांत, भारतीय संविधानातील तरतूदी आणि स्थानिक स्वशासन, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २०१७ पृ. १२४.
१०.विघे, डॉ. प्रशांत, ईडियन पॉलिटी, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २०२० पृ. .८४
११.विघे, डॉ. प्रशांत, तेलगोटे, धर्मेद्र, लोकशाही, निवडणूक प्रक्रिया व सुशासन, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २०१९ पृ. ३२५.
१२ विघे, डॉ. प्रशांत, ईडियन पॉलिटी, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २०२० पृ. ८५

 ISBN No. 978-93-91097-18-9

# ३०. भारतीय राज्यघटनेची वैशिष्टये

**डॉ. विकास बी. चांदजकर**
(राज्यशास्त्र विभाग प्रमुख)
एम. एस. गोटे महाविद्यालय वाशिम
मो. नं. 9764294888 vikaschandajkar@gmail.com

सारांश:-

प्रत्येक देशाच्या राज्यघटनेची काही ठराविक वैशिष्टये असतात. त्या देशातील परिस्थिती व संस्कृतिला अनुसरून ती वैशिष्टये निश्चित होत असतात. प्रत्येक देशाच्या राज्यघटनेची वैशिष्टये हे भिन्न असतात. अमेरिका किंवा इंग्लडच्या राज्यघटनेची जी वैशिष्टये दिसतात तिच वैशिष्टये सर्वच देशातील राज्यघटनेची आहेत असे कोणीच ठामपणे म्हणू शकत नाही. अगदी त्याच प्रमाणे भारतीय राज्यघटनेची सुध्दा स्वतंत्र व वेगळी अशी वैशिष्टये आहेत. ती वैशिष्टये भारतातील परिस्थिती व संस्कृतिला अनुरूप अशी स्वीकारलेली दिसतात. त्यावरूनच भारतीय संविधाना ओळखण्यास मदत होते. भारतीय राज्यघटनेच्या वैशिष्टयाचे स्पष्टीकरण सविस्तरपणे सांगता येतात. भारतीय घटनेचा सर्व वैशिष्टयांचा साकल्याने विचार केला असता. भारतीय राज्यघटना आदर्श स्वरूपाची आहे काय? हा प्रश्न उपस्थित होतो. गेल्या 70 वर्षाच्या घटनेच्या अमलबजावणीचा अनुभव विचारात घेतला असता काही प्रमाणात स्थिर व यशस्वी झालेली आहे असे म्हणता येईल. आता पर्यंत झालेल्या सार्वत्रिक निवडणूका, त्यातील जनतेचा सहभाग, संसदेचे कामकाज, न्यायालयीन निर्णय, केंद्र व राज्य सरकारचे संबंध, राष्ट्पतीचे आणीबाणी विषयक अधिकार अशा विविध गोष्टींचा परामर्श घेतला असता भारतीय राज्यघटना जनतेने मान्य केली असे म्हणता येईल. परंतु अधूनमधून संसदीय शासनपध्दती ऐवजी अध्यक्षीय शासन पध्दती स्वीकारण्याची अशी वादग्रस्त चर्चा चालू असलेली दिसते. राज्यघटनेची अमलबजावणी ही तिच्या स्वरूपावर नव्हेतर ती देशातील जनता व राजकीय पक्ष यावर अवलंबून असते असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 26 नोंव्हेंबर 1949 च्या भाषणात सांगीतले होत. ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनीने प्लासीच्या लढाईनंतर भारतामध्ये सत्तेचा पाया रचला आणि 1765 पासून राजकारणाला सुरूवात झाली. ब्रिटीश इंडिया कंपनीच्या विरूध्द भारतामध्ये 1857 मध्ये मोठा उठाव झाला. त्यामुळे ब्रिटीश पार्लमेंटच्या कायद्याव्दारे कंपनीच्या सत्तेची समाप्ती करण्यात आली. पुढे भारतीयांना संतुष्ट करण्यासाठी ब्रिटीश सत्तेतून 1909 मध्ये मोर्ले मिंटो सुधारणा कायदा, 1919 चा भारत प्रशासन सुधारणा कायदा आणि 1935 चा भारत प्रशासन कायदा असे कायदे करण्यात आले. या दरम्यान भारतामध्ये राष्ट्रीय कॉंग्रेसची स्थापना करण्यात आली. राष्ट्रीय कॉंग्रेसच्या मागण्या व स्वातंत्र्यासाठी ब्रिटीश सत्तेसोबत संघर्ष सुरू झाला. भारताला वसाहतीचे स्वराज्य देण्यात येईल.

 ISBN No. 978-93-91097-18-9

भारतासाठी घटना निर्माण केल्या जाईल याकरिता क्रिप्स योजना, व्हेवेल योजना अशा योजना तयार करण्यात आल्या. मात्र यावर एकमत होवू कले नाही. त्यामुळे अशा परिस्थितीमधून मार्ग काढण्यासाठी कॅबिनेट मिशन योजना तयार करण्यात आली. यानुसार विविध योजना ब्रिटीश सत्तेकडून राष्ट्रीय कॉंग्रेसची व मुस्लीम लीग समोर मांडल्या ज्यामध्ये भारतासाठी संघराज्य, घटना समीती आणि हंगामी सरकार स्थापने संबंधीच्या सूचना केल्या होत्या. मात्र मुस्लिम लिगने यामध्ये सहभाग घेतला नाही. त्यामुळे कॉंग्रेस व इतर पक्षाच्या मदतीने हंगामी सरकारची स्थापना करण्यात आली. भारताकरिता घटना निर्माण करण्याकरिता एक घटना समिती निर्माण करण्यात आली. घटना समितीचे कामकाज 9 डिसेंबर 1946 रोजी सुरू झाले. डॉ. सच्चिदानंद सिन्हा यांना घटना समितीचे अस्थाई अध्यक्ष म्हणून नियुक्त करण्यात आले. 11 डिसेंबर 1946 रोजी डॉ. राजेंद्र प्रसाद घटना समितीचे स्थाई अध्यक्ष म्हणून निर्वाचित झाले. घटना निर्माण करण्याकरिता महत्वपूर्ण उध्देशचा प्रस्ताव पं. नेहरूनी 1946 रोजी मांडला. 29 आगस्ट 1947 रोजी मसुदा समितीची निर्मिती करण्यात आली. यामध्ये के. एम. मुन्सी, मो. सादूल्ला, बी. एल. मितल, अल्लादी कृष्णस्वामी अय्यर, एन गोपाल स्वामी अय्यंगार आणि डि. पी. खेतान इत्यादी सदस्य व डा. बाबासाहेब आंबेडकर हे अध्यक्ष होते. नंतर बी. एल. मित्तर आणि डि. पी. खेतान यांच्या जागेवर एन. माधवराव व टि. टि. कृष्णम्माचारी यांची नियूक्त करण्यात आली. घ्टना समितीने 26 नोंव्हेबंर 1949 रोजी घटना निर्मितीचे कार्य पूर्ण केले आणि 26 जानेवारी 1950 रोजी ती लागू करण्यात आली. घटना समितीचे कार्य 2 वर्ष 11 महिने व 18 दिवस चालले.

**भारतीय राज्यघटनेची वैशिष्टये:-**

नागरिकांकरिता व शासनाकरिता काही नियम बनविले जातात आणि अशा नियमाचे संहिताकरण सर्वोच्च कायदा म्हणून केले जाते. ज्याला राज्यघटना असे म्हटल्या जाते. सधारणतः आज प्रत्येक देशामध्ये लिखित अथवा अलिखित राज्यघटना निर्माण करण्यात आलेली आहे. ज्याव्दारे त्या देशाचा शासनकारभार पाहीला जातो. भारतामध्ये सुध्दा शासन कारभार पाहण्याकरिता राज्यघटना निर्माण करण्यात आली. या राज्यघटनेची विविध वैशिष्टये आढळून येतात. ती पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**1) सर्वात मोठी लिखित राज्यघटना: -**

26 नोव्हेंबर 1949 रोजी स्वीकारलेली भारतीय राज्यघटना ही जगातील सर्वात मोठी राज्यघटना आहे. ही राज्यघटना निर्माण करण्यासाठी कॅबिनेट मिशन योजनेतील तरतुदीनुसार एक घटनासभा निर्माण करण्यात आली. या संविधानाने 2 वर्ष 11 महिने आणि 18 दिवस अथक परिश्रम करून भारतीय राज्यघटनेला आकार दिला. भारतीय राज्यघटनेमध्ये 395 कलमे (सध्या 448) आणि 22 भाग मिळून ती करण्यात आली. भारतीय राज्यघटना विस्तृत होण्यामागे कारण म्हणजे भारतीय नागरिकांच्या परिस्थितीचा विचार करून राज्यघटनेतील प्रत्येक कलम, उपकलम, परिशिष्ट इत्यांदींचे सविस्तर वर्णन केलेले आहे. प्रत्येक गोष्ट स्पष्टपणे सांगण्याचा प्रयत्न केला. भारतीय नागरिकांचे मूलभूत अधिकार सांगतांना फक्त अधिकारांचे वर्णन केलेले

नाही तर त्यासोबत अधिकारावरील बंधनाचे वर्णन करण्यात आले आहे. लोकसेवा आयोग, निवडणुक आयोग, भाषा आयोग अशा भागांचीही तरतुद घटनेमध्ये करण्यात आलेली आहे. भारतातील विविधता आणि विस्तार लक्षात घेता प्रत्येक गोष्टीचे सविस्तर वर्णन करणे गरजेचे होते या विचार घटनाकारांनी केलेला आहे.

**2) संसदीय शासनपध्दती: -**

भारतीय घटनाकारांनी संसदीय शासनप्रनालीचा स्वीकार केलेला आहे. घटना निर्माण कार्य सुरू असतांना घटनाकारांसमोर संसदीय शासनप्रणाली किंवा अध्यक्षीय शासनप्रणाली स्वीकारण्याचे पर्याय होता. संसदीय शासनपणालीमध्ये नामधारी व वास्तविक शासनप्रमुख अशा प्रकारचे दोन कार्यकारी प्रमुख असतात. मंत्रिमंडळाचे सदस्य हे कायदेमंडळाचे सदस्य असतात. तसेच वास्तव शासन प्रमुख असलेला पंतप्रधान हा सुध्दा कायदेमंडळात बहुमतप्राप्त पक्षाचा नेता सदस्य असतो. यासोबत एक नाममात्र शासनप्रमुख म्हणून राष्ट्रपती असतो. पंतप्रधान व मंत्रीमंडळ हे लोकसभेला सामुहिकरित्या उत्तरदायी राहतात. त्यामुळे त्यांचा कार्यकाल पाच वर्षाचा असला तरी त्याआधी सरकार पदावरून दूर होवू शकते. संसदीय शासनप्रणालीला उतरदायी शासनप्रणाली असे सुध्दा म्हटल्या जाते. संसदीय शासन प्रणालीमधील तरतुदी भारतीय राज्यघटनेमध्ये आहेत. त्यामुळे भारतीय शासनप्रणाली ही संसदीय शासनप्रणाली आहे. अध्यक्षीय शासनप्रणालीमध्ये कार्यकारमंडळ हे कायदेमंडळापासून वेगळे राहते. त्यांचा कार्यकाल हा निश्चित असतो.

**3) संघराज्याचे स्वरूप:-**

देशाचे क्षेत्रफळ हे आकाराने मोठे असल्यास किंवा देश धार्मिक, भाषिक, सांस्कृतिक विविधतेने नटलेला असेल तर अशा देशाकरिता संघराज्यपध्दती उपयुक्त ठरू शकते. भारत हा राज्याचा संघ असेल असे वर्णन कलम 1 मध्ये करण्यात आले आहे. भारतीय राज्यघटनेमध्ये भारत हे संघराज्य आहे असा उल्लेख करण्यात आलेला नाही. मात्र संघराज्य शासनासाठी आवश्यक असलेले निकष भारतीय राज्यघटनेमध्ये आढळून येतात. भारतीय राज्यघटना ही विशिष्ट कालखंडात लिखित बध्द आहे. भारतीय कायदेमंडळाची रचना द्विगृही कायदेमंडळ अशी आहे. तसेच भारतामधील न्यायप्रणाली शासनाच्या इतर अंगापसून स्वतंत्र ठेवण्यात आलेली आहे. मात्र भारतामधील शासनप्रणाली ही पूर्णपणे अमेरिकेतील संघराज्याप्रमाणे नाही. भारतामध्ये केंद्रसरकार अधिक बलशाली असलेले दिसून येते.

**4) अंशतः परिदृढ व अंशतः लवचिक:-**

राज्यघटना ताठर असने म्हणजे त्या राज्यघटनेमध्ये काही परिवर्तन करायचे असल्यास कठीण पध्दत असते. तसेच राज्यघटना परिवर्तनिय असणे म्हणजे त्या राज्यघटनेमध्ये परिवर्तन सोप्या पध्दतीने होते. अमेरिकेची राज्यघटना ही ताठर स्वरूपाची आहे. इंग्लंडची राज्यघटना ही लवचिक स्वरूपाची आहे. मात्र भारतातील एकंदरीत परिस्थितीचा विचार करून भारतीय संविधान कर्त्यांनी या दोघामधील कुठल्याही एका पध्दतीचा स्वीकार न करता या

दोधांमध्ये सुवर्णमध्ये साधलेला आहे. भारतीय राज्यघटनेतील काही भाग साध्या बहूमताने बदलता येतो. सभागृहामध्ये उपस्थित असलेल्या सदस्यांच्या बहूमतने कलम 2, 3, 4, 5, ते 11 इत्यादी तर काही भागासाठी मात्र विशेष बहूमत आवश्यक असते. त्याचसोबत अर्धापेक्षा जास्त घटक राज्यांची मान्यता असल्याषिवाय परिवर्तन करता येत नाही. सभागुहातील एकूण सदस्य संख्येचे बहूमत आणि उपस्थित असलेल्या सदस्यांच्या दोन तृतिअंश बहूमत कलम 54, 55, 73 ते 162 इत्यादी.

**5) मताधिकार:-**

भारताने संसदीय शासन प्रणालीचा स्वीकार केलेला आहे. या शा शासन पध्दतीमध्ये सनकर्ते हे नागरिकाद्वारे निवडून नागरिकाकरिता शासन करण्याकरिता जनतेचे प्रतिनिधी म्हणून कार्य करतात. या शासनकर्त्यांनी निवडून पाठविण्याकरिता प्रत्येक नागरिक ज्यांच्या वयाला 18 वर्ष पूर्ण झालेली असतील त्यांना मतदानाचा अधिकार दिला जातो. भारत ज्या दिवशी प्रजासत्ताक झाला त्याच दिवशी प्रत्येक नागरिकाला मतदानाचा अधिकार देण्यात आला.

**6) एकेरी नागरिकत्व:-**

भारतीय संविधानकर्त्यांनी भारतातील सांस्कृतिक ऐक्य टिकवून राहावे व राष्ट्रीय एकातमता अंगी भिनावी यासाठी एकेरी नागरिकत्वाची संकल्पना स्वीकारली. प्रत्येक भारतीय हा भारतीय म्हणून ओळखला जातो. यावाय लोकशाही, गणराज्य, धर्मरिपेक्षराज्य, मूलभूत अधिकार, मार्गदर्शक तत्वे, एकेरी व स्वतंत्र न्यायव्यवस्था, एकच राज्यघटना, स्वतंत्र निवडणूक आयोग आदी वैशिष्टये भारतीय राज्यघटनेची सांगता येतात.

**संदर्भ**

1) पाटील बी. बी. राज्यशास्त्र, फडके पब्लीकेशन कोल्हापूर, 1994 पृ. क्र. 120

2) गटकर ज्ञानेशर, भारतीय घटनात्मक तरतुदी आणि स्थानिक स्वराज्य संस्था, पायोनियर प्रकाशन, अमरावती, पृ. क्र. 03

3) चौधरी राजेश , भारताचे संविधान, चौधरी ला. पब्लिकेशन जळगाव, पृ. क्र. 35

4) भोळे भा. ल., भारतीय संविधान सिध्दांत आणि व्यवहार, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ नागपूर, 1987 पृ. क्र. 22

 ISBN No. 978-93-91097-18-9

# ३१. महाराष्ट्र विधानसभा

**डॉ. मनीषा शंकर यादव**
श्री. गाडगे महाराज महाविद्यालय, मुर्तीजापुर, जिल्हा आकोला

भारतीय राज्यघटनेच्या सहाव्या भागातील तिसऱ्या प्रकरणात कलम १६८ ते २१२ मध्ये राज्यातील विधिमंडळाच्या रचनेचा तपशील असून आहे. बिहार, उत्तरप्रदेश, कर्नाटक, तेलगनां, महाराष्ट्र, जम्मु काश्मीर ही घटकराज्ये व्दिसदनात्मक आहेत. राज्यघटनेच्या १६८ कलमात असे स्पष्ट केले आहे की प्रत्येक घटक राज्याच्या विधिमंडळात राज्यपाल आणि एक किंवा दोन सभागृहाचा समावेश केला जाईल.[१] त्यानुसार महाराष्ट्र राज्य विधिमंडळाचे प्रथम गृह म्हणून विधानसभेचा उल्लेख केला जातो. विधानसभा प्रत्यक्ष जनतेचे प्रतिनिधित्व ज रणारे गृह आहे. भारतीय राज्यघटनेच्या कलम १७० नुसार विधानसभेची रचना सांगितलेली आहे. विधानसभेची सदस्यसंख्या ही घटक राज्यातील लोकसंख्येच्या आधारावर ठरवली जाते. विधानसभेतील सदस्य संज्या ५०० पेक्षा अधिक आणि ६० पेक्षा कमी असू नये असे ठरवण्यात आले आहे. सध्याच्या तरतूदीनुसार विधानसभेत ४० पेक्षा कमी व ५०० पेक्षा जास्त सदस्य असणार नाहीत अशी घटनात्मक तरतूद करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र विधानसभेत २८८ सदस्य आहेत. यामध्ये ॲंग्लो इंडियन प्रतिनिधीस प्रतिनिधित्व मिळाले नाही, असे राज्यपालास वाटल्यास कलम ३३३ नुसार ते एक प्रतिनिधी नियुक्त करु शकतात. २००९ च्या महाराष्ट्र विधानसभेत २८८ मतदारसंघापैकी सर्व साधारण मतदारसंघ २३५ होते. त्यापैकी २९ मतदारसंघ अनुसूचित जातीसाठी व २५ मतदारसंघ अनुसूचित जमातीसाठी ठेवण्यात आले आहेत. राजीव मतदारसंघातून त्या अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीचा प्रतिनिधी निवडणूक लढवतो महाराष्ट्र विधानसभेत काही अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्यासाठी मतदारसंघ राखीव ठेवण्यात आले आहेत.[२]

**निवडणूक पध्दत :-**

विधा-ासभेचे प्रतिनिधी प्रादेशिक एक प्रतिनिधी मतदारसंघातून प्रौढ व गुप्तमतदान पद्धतीने निवडले जातात.

**पात्रता :-**

विधानसभेचा सदस्य होण्यासाठी पुढील पात्रता अटी पूर्ण कराव्या लागतात.

१) तो भारताचा नागरीक असावा.

२) त्याचे वय किमान २५ वर्ष पूर्ण असावे.

३) संसदेने वेळोवेळी ठरवून दिलेल्या अटी त्याने पूर्ण केलेल्या असाव्यात.

याशिवाय भारतीय राज्यघटनेमध्ये विधानसभा सदस्यांच्या अपात्रतेच्या अटी पुढील प्रमाणे दिल्या आहेत.

**अपात्रता :-**

१) एजादी व्यक्ती वेडसर व दिवाळजोर असेल तर

२) एकाच वेळी दोन किंवा त्यापेक्षा अधिक घटकराज्याच्या विधिमंडळाचे सदस्यत्व व्यक्तीला स्वीकारता येणार नाही. तिला एकाच घटकराज्याच्या एकाच विधिमंडळाच्या एकाच गृहाचे सदस्यत्व स्विकारता येते.[३]

३) एखादी व्यक्ती सलग ६० दिवस परवानगी न घेता गैरहजर राहिली तर तिचे विधानसभा सदस्यत्व रद्द होते.

४) एकाच वेळी राज्य विधिमंडळाच्या दोन्ही गृहाचे सदस्यत्व स्वीकारता येणार नाही कोणत्याही एका गृहाचे सदस्यत्व स्वीकारता येईल.

५) निर्वाचन आयोगाने निर्धारीत केल्याप्रमाणे निवडणूकीतील खर्चाचे हिशोब सादर न केल्यास तो अपात्र ठरतो.

६) ती व्यक्ती केंद्र किंवा राज्यसरकार मध्ये नोकरी किंवा प्राप्तीचे पद धारण करणारा असेल तर तो अपात्र समजला जाईल.

**कार्यकाल :-**

विधानसभेचा कार्यकाल पाच वर्षाचा असतो आणिबाणीच्या काळात हा कार्यकाळ एका वर्षाने वाढवता येतो. त्याच बरोबर मुदतपूर्व विधानसभा बरखास्त करता येते. विधानसभा बरखास्त करण्याचा अधिकार राज्यपालास आहे किंवा अन्य काही पेचप्रसंग निर्माण झाल्यास ३५६ कलमानुसार 'राष्ट्रपती राजवटीची' शिफारस राज्यपाल राष्ट्रपतीस करु शकतो.

**विधानसभेचे पदाधिकारी :-**

विधानसभेचे सदस्य आपल्यातून एकाची अध्यक्ष व एकाची उपाध्यक्ष म्हणून निवड करतात ही निवड गुप्त मतदान पद्धतीने, विधानसभेच्या पहिल्या बैठकीत होते, सभापती व उपसभापतीची निवड मतदान न करता एकमताने होऊ शकते. सभापती हा बहुमतधारी राजकीय पक्षाचा प्रतिनिधी असतो. सभापतीच्या अनुपस्थितीत उपसभापती विधानसभेचे कामकाज पाहतो, तो ही नसेल तर ज्येष्ठ सदस्यांच्या पॅनेल मधील एक ज्येष्ठ सदस्य विधानसभेचे कामकाज पाहतो. सभापती, उपसभापती आपल्या इच्छेनुसार राजीनामा देऊ शकतात. विधानसभा बरखास्त झाली असेल, तर नवीन विधानसभेचे अधिवेशन भरेपर्यंत पूर्वीचा सभापती अधिकार पदावर राहून काम करतो. महाराष्ट्र विधानसभेत सभापती पद बहुमतधारी राजकीयपक्षाला व उपसभापतीपद विरोधी पक्षाला देण्याची प्रथा आहे.

**अधिवेशन :-**

विधीमंडळाच्या सभागृहाची अधिवेशने बोलावणे, तहकूब करणे, विधानसभा बरखास्त करणे हा अधिकार राज्यपालास आहे.[४] विधानसभेची कमीत कमी दोन अधिवेशने होणे बंधनकारक आहे. महाराष्ट्रात विधानसभेची तीन अधिवेशने होतात, त्यापैकी पावसाळी व अर्थ संकल्पीय अधिवेशन मुंबई येथे तसेच एक हिवाळी अधिवेशन नागपूर येथे होते.

**गणसंख्या :-**

विधानसभेचे कामकाज सुरु होण्यासाठी एकूण सदस्य संख्येच्या १/१० किंवा दहा यापैकी जी संख्या मोठी नसेल ती गणसंख्या म्हणून ठरवली जाते. महाराष्ट्राच्या विधानसभेत २९

आणि विधानपरिषदेत दहा सदस्य हजर असल्याशिवाय कामकाजाला सुरवात होत नाही.[५] गणसंख्या अपूर्ण असेल तर सभापती सभागृहाचे कामकाज काही काळ स्थगित ठेवतात.

**विधानसभेचे स्थान व महत्व :-**

विधा-ासभेला ज ायदेविषयज , शास-ा विषयक अधिकार, घटनादुरुस्ती विषयक अधिकार तसेच राष्ट्रपतीच्या निवडणूकीत मतदान करण्याचा अधिकार आहे. विधानसभा हे जनतेचे प्रतिनिधित्व करणारे गृह असल्याने ते श्रेष्ठ मानले जाते. मुख्यमंत्री व त्याचे मंत्रीमंडळ हे विधानसभेला जबाबदार असते. विधानसभा कोणत्याही मंत्र्याला खात्याच्या कामकाजाबाबत प्रश्न विचारु शकते, याचे उत्तर देणे मंत्र्याना बंधनकारक असते. याशिवाय एखादे विधेयक, धन विधेयक आहे की नाही हे ठरवण्याचा अधिकार विधान सभेला आहे. विधानसभा मंत्रीमंडळावर अविश्वास प्रस्ताव दाखल करु शकते. त्यामुळे मुख्यमंत्री व मंत्रीमंडळ विधानसभेला जबाबदार राहून कार्य करतात. विधानसभा सार्वजनिक लेखा समिती, अंदाज समितीच्या माध्यमातून शासनाच्या अनावश्यक खर्चावर नियंत्रण ठेवू शकते, त्यामूळे विधानसभेचे स्थान व महत्व घटकराज्य विधिमंडळात महत्वाचे असलेले दिसते. राज्यपालाच्या अभिभाषणावरील संमत्ती दर्शक ठरावाला विधानसभेचे सदस्य असंमती दर्शवून शासनावर नियंत्रण ठेवू शकतात. अंदाजपत्रकास विधानसभेच्या सदस्यांची संमत्ती असल्याशिवाय सरकार पैसा खर्च करु शकत -ाही. यावरुन असे दिसते की विधानसभा हे गृह कनिष्ठ असले तरी अधिकारांच्या दृष्टीने वरीष्ठ आहे.

**महाराष्ट्र विधानसभेचा अर्थसंकल्प :-**

एप्रिल महिण्याच्या पहिल्या तारखेपासून ते दुसऱ्या वर्षाच्या मार्च महिण्याच्या एकतीस तारखेपर्यत आर्थिक वर्ष असते. या आर्थिक वर्षात होणारा खर्च सरकारला विधिमंडळाकडून मंजूर करुन घ्यावा लागतो. त्याशिवाय एकही पैसा खर्च करता येत नाही. आर्थिक वर्षात शासनाला सर्व मार्गानी किंवा साधनाव्दारे उपलब्ध होणारे उत्पन्न तसेच हे उत्पन्न शासन कोणकोणत्या बाबीवर खर्च करणार आहे, याचे एक विवरण दरवर्षी तयार करते आणि शासनाच्या विविध खात्यांनी केलेल्या पैशाच्या मागण्याना विधीमंडळाची मान्यता मिळाली यासाठी ते विधानमंडळासमोर सादर करीत असते. म. वि. स. नियम २४५ व भारतीय संविधानाचे अनुच्छेद २०२ (१) मध्ये उल्लेखाप्रमाणे या विवरणास अंदाजपत्रक (वार्षिक, आर्थिक विवरण) किंवा अर्थसंकल्प असे म्हटले जाते.[६] अर्थ संकल्पातील वित्तविषयक विवरण पत्राला 'ग्री-ा बुज' व अर्थसंकल्पीय अंदाजाला 'व्हाईट बुक' असे म्हणतात. विधीमंडळाकडे अनुदान मागण्या पुरक माजज्या, पुरवजी मागण्या, अतिरिक्त मागण्या सादर होतात. याशिवाय लेखाअनुदान, लक्षणिक अनुदान मागण्या, अधिक खर्चाच्या मागण्या सादर होतात. शासनाला अर्थ संकल्पामध्ये तरतूद नसताना कधी -ज धी आकस्मित खर्च करावा लागतो. याला विधीमंडळाची मान्यता घ्यावी लागते. शासनाच्या खर्चात अनुदान कमी करण्यासाठी त्यातील काही बाबी वगळण्यासाठी कपात सूचना दिल्या जातात त्या पुढील प्रमाणे

**१) एक रुपयाची कपात :-**

एखादया महत्वाच्या विषयात शासनाला आलेले अपयश म्हणून सत्तारुढ पक्षावर अविश्वास व्यक्त करावयाचा असेल तेव्हा अशी कपात सूचना केली जाते अशी सूचना, अविश्वास प्रस्ताव मानली जाते, अशी कपात मंजुर झाल्यास सत्तारुढ पक्षाला राजीनामा दयावा लागतो.

**२) लाक्षणिक कपात :-**

शासनाच्या कारभाराला किंवा एखादया विभागाच्या धोरणावर चर्चा करावयाची असेल त्यावेळी १०० रुपयाची कपात सुचविली जाते ही कपात सुचविणे म्हणजे शासनाच्या धोरणावर सभागृहाने व्यक्त केलेले असमाधान असते.

**३) विशिष्ठ रक्कमेची कपात :-**

मागणीत किंवा त्यातील एखादया बाबीच्या संबधात विशिष्ठ रकमेची कपात जेव्हा सूचवायची असते त्यावेळी त्या विशिष्ठ रक्कमेची कपात सूचना सूचविली जाते.[७]

**समिती :-**

संसदीय आयुधा प्रमाणे समिती सुध्दा एक आयुध मानले जाते. विधानसभेच्या कामकाजात समिती पद्धतीला महत्व आहे. प्रशासनावर अंकुश ठेवण्याचे काम समितीच्या माध्यमातून केले जाते. ज्या विषयाची चर्चा सभागृहात होत नाही त्या विषयाच्या संदर्भात चर्चा करण्यासाठी निरनिराळ्या समित्या गठीत केल्या जातात.[८] समितीमध्ये विधानसभा व विधा-न परिषदेचे सदस्य असतात ते पक्षीय भावना बाजूला ठेवून समितीमध्ये कार्य करतात, त्यामुळे अधिवेशन संपले तरी वर्षभर समितीचे कार्य सुरु असते. समिती एखादया बाबीचा सखोल अभ्यास करुन आपला अहवाल सभागृहाला सादर करते. महाराष्ट्र विधीमंडळात एकूण ३२ समित्या असून त्यातील काही समित्या पुढील प्रमाणे.

१) अंदाज समिती
२) लोकलेखा समिती
३) सार्वजनिक उपक्रम समिती
४) कामकाज सल्लागार समिती
५) अशासकीय सदस्यांची विधेयक व ठराव याबाबत समिती
६) उपविधान समिती
७) नियम समिती
८) शासकीय अश्वासन समिती
९) सभागृहाच्या बैठकीतील सदस्यांच्या अनुपस्थितीबाबतची समिती
१०) अनुसूचित जाती कल्याण समिती
११) अनुसूचित जमाती कल्याण समिती
१२) विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समिती
१३) पंचायत राज समिती
१४) रोजगार हमी समिती
१५) महिलांची हक्क व कल्याण समिती
१६) विभाग संलग्न स्थायी समित्या

**विशेष हक्कभंग सूचना :-**

लोकप्रतिनिधीना आपली कर्तव्ये व्यवस्थितपणे पार पाडता यावीत यासाठी त्यांना काही विशेष हक्क देण्यात आले आहेत, विधानसभेला आपल्या सदनाच्या कामकाजाचे नियम करण्याचा अधिकार आहे. विधिमंडळामध्ये सदस्यांने केलेल्या वक्तव्यावर न्यायालयीन कार्यवाही करता येत नाही. विधिमंडळ सदस्यांना भाषण स्वातंत्र्याचा अधिकार दिलेला आहे, याशिवाय सदनाच्या कायदेशीर हुकूमाचे पालन न करणे अध्यक्षाच्या चारित्र्यावर टीका करणे, अध्यक्ष म्हणून कर्तव्य पार पाडत असताना त्यांच्यावर पक्षपातीपणाचा आरोप करणे, सदनावर टीका करणे, विधानसभेच्या गुप्त अधिवेशाची माहीती बाहेर सांगणे याला हक्कभंग म्हटले जाते याबाबत सभागृह सबंधीत व्यक्तीवर कारवाई करु शकते.

**संसदीय शिष्टाचार :-**

विधिमंडळाचे सार्वभौमत्व आबाधित रहावे यासाठी काही शिष्टाचार निर्माण झालेले आहेत, याचे पालन सर्वांना करावे लागते. विधानसभेत निवडून आलेल्या सदस्यांना बैठकी वेळी आपले ओळखपत्र सोबत ठेवावे लागते, तसेच सभागृहात जाण्यापूर्वी हजेरीपटावर स्वाक्षरी करावी लागते. सदस्यांना सभागृहाची प्रतिष्ठा राखण्याकरीता सभागृहात कोणत्याही प्रकारच्या घोषणा देता येत नाहीत. अध्यक्षांनी संमत्ती दिल्या शिवाय कोणती ही बातमी वर्तमानपत्रात प्रसिध्द करता येत नाही. त्याचप्रमाणे सभागृहात विचारलेल्या प्रश्नांना सभागृहात उत्तर मिळाल्याशिवाय प्रसिध्द करता येत नाही. अध्यक्षांनी सभागृहात दिलेल्या कोणत्याही निर्णयावर टिका करता येत नाही. काही संसदिय शिष्टाचार पुढीलप्रमाणे.

१) विधानसभेबाबत निर्माण झालेल्या शिष्टाचारानुसार सदस्यांला आपले लेखी भाषण सभागृहात वाचून दाखवता येत नाही तथापी त्या संदर्भासाठी टिपणाचा वापर करता येतो.

२) विधिमंडळ सदस्यांना अगोदर बोललेल्या सभासदाच्या भाषणाच्या मुद्याची पुनरुक्ती इतर सदस्यांना करता येत नाही.

३) विधिमंडळ सदस्यांनी आपले भाषण संपल्याबरोबर सभागृहातून निघून जाणे शिष्टाचार संमत्त नाही, अगदी आवश्यक असल्यास काही वेळ बसून नंतर सभागृहातून जाता येते.

४) सभागृहात एखादया बाबीविषयी मत दयायचे असल्यास अनुकूल असलेल्या सदस्यांनी 'होय' व प्रतिकूल असलेल्या सदस्यांना '-नाही 'असे म्हणता येते.

५) विधिमंडळ सदस्यांना भाषणात निंदानालस्ती करणारे आरोपात्मक किंवा असंसदीय शब्द प्रयोग वापरता येत नाहीत.

६) विधानसभा सदस्यांनी आपल्या जागेवरुन उठून अध्यक्षाच्या आसनाकडे जाऊ नये आवश्यकता असल्यास सचीवाकडे चिठ्ठी पाठवता येते.

७) विधिमंडळाच्या कोणत्याही सदस्यांला नव्याने निवडून आलेला सदस्यांच्या भाषणात अडथळे निर्माण करता येत नाहीत.

अशा काही संसदीय रितीरिवाज, संकेत व शिष्टाचार याचे पालन विधानसभा सदस्यांना करावे लागते. विधानसभेचे माजी अध्यक्ष बाळासाहेब भारंदे 'विधिमंडळास लोकशाहीचे

महामंदिर' असे म्हणतात. या लोकशाहीच्या मंदिराची प्रतिष्ठा रहावी जनमाणसात त्यांचे सर्वोच्च स्थान निर्माण व्हावे, त्या प्रती लोकांनी आदराची भावना बाळगावी, या करीता संसदीय रितीरिवाज, रुढी, परंपरा, शिष्टाचार निर्माण झालेले दिसून येतात. संसदेचे कामकाज कशा पद्धतीने करावे. यासाठी संविधानातील तरतूदी सोडल्या तर संसदेचे आणि विधानमंडळाचे कामकाज कसे चालावे यासाठी कुठल्याही प्रकाराचे नियम नाहीत. संविधानाच्या कलम २०८ मध्ये विधिमंडळातील कामकाजाविषयी नियम करण्याचे अधिकार हे विधानमंडळास दिले आहेत. ज लम २८८ -नुसार विधिमंडळाने आपल्या विधानमंडळाच्या कामकाजाची कार्यपद्धती व नियम तयार करावे असे नमूद केले आहे.


१) पाटील प्रा. बी. बी. - भारतीय शासन आणि राजकारण ,प्रथमावृत्ती १ ऑगस्ट १९९९, फडके प्रकाशन कोल्हापूर, पा-न ज्र . १६१.

२) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण मार्च २८, २००६ चैत्र ७ शके १९२८ भाग चार, भारतीय परिसिमन आयोग आदेश क्रमांक २१, पान क्र. २८८.

३) पाटील प्रा. बी. बी. - भारतीय शासन आणि राजज ारण ,प्रथमावृत्ती १ ऑगस्ट १९९९, फडके प्रकाशन कोल्हापूर, पान क्र. ५३.

४) पाटील डॉ. वा.भा. - महाराष्ट्र प्रशासन , प्रथमावृत्ती जून २०१२, प्रशांत पब्लीकेशन जळगांव, पान क्र. ९७.

५) तत्रैव, पान क्र. ९३.

६) कळसे डॉ. अनंत, मोहिते श्री अशोक, साठये श्री. शिवदर्शन - अर्थसंकल्प म्हणजे काय व विधिमंडळातील अर्थसंकल्प विषयक कार्यपद्धती संकलन, मार्च २०१५, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय मुंबई, पान क्र. ५.

७) तत्रैव, पान क्र. २२.

८) राष्ट्रकुल संसदीय मंडळ महाराष्ट्र शाखा, ३६ व्या अभ्यासवर्ग ,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय विधानभवन मुंबई २००५, पान क्र. ९२.

९) भोळे डॉ. भा.ल. - भारतीय शासन आणि राजकारण, पाचवी आवृत्ती ऑगस्ट २०११, पिंपळापूरे ॲण्ड कंपनी पब्लीशर्स नागपूर, पान क्र. १२४.

१०) चतुरस वसंतराव नाईक - हरित क्रांतीचे प्रणेते, १ जुलै २०१५, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय मुंबई.

११) के.टी. गिरमे - विधानसभा परिचय आणि कामकाज, व्दितीय आवृत्ती २६ जानेवारी १९८३, श्री. विद्या प्रज ाश-न पुजे, पा-न ज्र . १८५.

# ३२. रोजगार हमी योजनेत ग्रामपंचायतीची भूमिका

संशोधक

**प्रा.सुनील कांशिराम राठोड**

उद्देश्वर उच्च माध्यमिक विद्यालय, सावरगाव तालुका देवणी जिल्हा लातूर

मो. ९६२३११२०९७/७५८८४२४२०८

Email-srsunilrathod30@gmail.com

भारताने स्वातंन्त्र्य मिळाल्यानंतर लोक”ाहीचा स्वीकार केला. लोक”ाहीला लोकमताचे राज्य म्हणतात परंतु लोक”ाही हा केवळ शासन प्रकार नसून तो एक जीवन जगण्याचा मार्ग आहे. ठराविक कालावधीनंतर मतदान करणे व नंतर शासन व्यवस्थेत कोणत्याही प्रकारे सहभागी न होणे ही खरी लोक”ाही नाही. खऱ्या लोक”ाही लोकांचा सक्रीय पाठिंबा अंतर्भूत असतो. प्र”ासनाला कार्यक्षम करण्यासाठी शासनाला आपल्या कार्याची विभागणी करावी लागते. संघराज्यात्मक शासन व्यवस्थेत लिखित राज्यघटनेद्वारे केंद्र व घटक राज्ये यांच्यात अधिकारांची विभागणी केलेली आहे. घटक राज्यांनी आपल्या राज्यात स्थानिक लोककल्याण योजनेची जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थेवर टाकली आहे. दे”ाच्या ग्रामीण भागात राहणारी जनता कल्याणकारी योजनेमुळे सुखी समृद्धी होऊ शकते. महात्मा गांधीजींच्या मते, ‘‘ज्या दिव”ी कुणीही दे”ावासी दुःखी राहणार नाही, त्याच दिव”ी आपण एक राष्ट्र आहोत असे स्वतःला संबोधण्यास पात्र ठरू.’’ याचा अर्थ दे”ाचा विकास दुर्बल घटकांपर्यंत पोहचला पाहिजे. हे काम ग्रामपंचायतीच्या माध्यमातून होत आहे.

भारतीय राज्यघटनेमध्ये वेगवेगळी मार्गद”िक तत्त्वे आहेत. या तत्त्वांच्या सूचीमध्ये प्रत्येकास रोजगाराची संधी प्राप्त करून देण्याचा प्रयत्न सरकारने करावा असा उल्लेख केला गेला आहे. सरकारने बेकारी निर्मूलनासाठी पहिल्या तीन पंचवार्षिक योजनांमध्ये अनेक कार्यक्रम राबविले; परंतु बेकारी कमी झाली नाही. म्हणून महाराष्ट्र सरकारने रोजगार हमी योजनेची सर्वप्रथम सुरुवात करून ग्रामीण भागातील नागरिकास रोजगाराचा अधिकार प्राप्त करून दिला आहे. रोजगार हमी योजना गरजू व्यक्तींना त्यांच्या परिसरात रोजगाराची हमी देतानाच त्यातून गावांचा विकास घडविण्याची व्यवस्था करण्यासाठी कायदा करणारे महाराष्ट्र हे दे”ातील नव्हे तर जगातील पहिले राज्य आहे. महाराष्ट्राच्या रोजगार हमी योजनेचे प्रवर्तक श्री.वि.स. पागे हे आहेत. ते विधान परिषदेचे सभापती होते. त्यांच्या प्रेरणेने सर्वप्रथम सांगली जिल्ह्यात प्रायोगिक तत्त्वावर सन 1965 साली रोजगार हमी योजना सुरू करण्यात आली आहे.

भारत हा खेड्यांचा दे”ा आहे. ग्रामीण भागातील वाढती बेरोजगारी व दारिद्र्य यावर उपाय म्हणून राज्य शासनाने 15 कलमी कार्यक्रमाचा एक भाग म्हणून राज्य पातळीवर रोजगार हमी योजनेचा हा एक कार्यक्रम सुरू करण्यात

आला. 20 डिसेंबर 1974 रोजी राज्य विधिमंडळाने रोजगार हमी योजनेवर सखोल चर्चा करून एकमताने एक प्रस्ताव पारित केला आणि ग्रामीण भागातील प्रत्येक प्रौढाला घटनेतील मार्गद"र्शक तत्त्वानुसार काम मिळविण्याचा कायदे"ीर हक्क प्राप्त झाला आहे. महाराष्ट्र रोजगार हमी योजना अधिनियम 1977 अन्वये राज्य सरकारने रोहयोला वैधानिक स्वरूप दिले. राज्य सरकारने ग्रामपंचायतींच्या माध्यमातून ग्रामीण भागात टिकावू स्वरूपाचे तलाव, कालवे, विहिर, नाली, बंधारे बांधणे, शेततळे, रस्ते इत्यादी कामांवर भर देऊन ग्रामीण भागात राहणाऱ्या गरीब जनतेला रोजगार उपलब्ध करून देण्यात आला आहे. या योजनेत श्रमप्रधान तंत्रावर भर देऊन एकूण खर्चापैकी 60 टक्के खर्च रोजगारावर व 40 टक्के खर्च यंत्रणेवर करण्यात आला. 1991–92 मध्ये 200 कोटी रुपयांची तरतूद या योजनेसाठी करण्यात आली. त्यामधून 7.5 कोटी श्रमदिवस रोजगार निर्माण झाला. या योजनेचे य"ा पाहून केंद्र सरकारनेही राष्ट्रीय रोजगार हमी योजना सुरू केली. केंद्र सरकारने राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम 2005 ला लागू करण्यात आला. या राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियमातून 100 दिवस रोजगाराची हमी देणारा कायदा केंद्र सरकारने पारित केल्यानंतर बारमाही विकासाची मजुरांना, कष्टकऱ्यांना गरजूंना रोजगार पुरवणारी योजना म्हणून ओळखल्या जाणाऱ्या रोहयोमुळे गाभ्यावर आधारलेल्या राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचा उगम झाला. सर्वप्रथम राष्ट्रीय रोजगार हमी योजनेची सुरुवात आंध्रप्रदे"ातील अनंतपूर जिल्ह्यात तत्कालीन पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंह यांनी 2 फेब्रुवारी 2005 यांच्या हस्ते करण्यात आली.

सन 2011 च्या जनगणनेनुसार दे"ाची 68.84 टक्के जनता ग्रामीण भागात राहते. ग्रामीण भागात राहणाऱ्या जनतेचा जीवनस्तर उंचावल्या"िावाय संपूर्ण विकास करणे शक्य नाही. आज जगात भारत आर्थिक शक्ती म्हणून पुढे येत आहे. दे"ाच्या विकासाचा लाभ खेड्यातील दुर्बल असंघटित आणि दुर्लक्षित अ"ा घटकांपर्यंत स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत पोहचविली पाहिजेत. गावाचा विकास आणि प्रगती दे"ाचा सर्वांगीण विकास साध्य करणारी आहे. गावाच्या विकासाची जबाबदारी राज्य सरकारने स्थानिक स्वराज्य संस्थेतील ग्रामपंचायतीवर टाकली आहे. दे"ाला एक कल्याणकारी राज्याच्या स्वरूपात उभे करण्यासाठी सरकारने समाजातील दुर्बल आणि गरीब घटकासाठी कल्याणकारी योजना राबवून त्यांचा विकास केला पाहिजे. या योजना स्थानिक प्र"ासनाकडे म्हणजेच ग्रामीण भागात काम करणाऱ्या ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद यांच्याकडे हस्तांतरित केल्या आहेत. पंडित नेहरु यांच्या मते, ''स्थानिक प्र"ासन हा लोक"ाहीचा पाया आहे. या पायावरच लोक"ाहीचा डोलारा उभा आहे आणि तो बळकट असल्या"िावाय वरिष्ठ पातळीवर लोक"ाही बळकट होणार नाही.'' म्हणजेच जागतिकीकरणाच्या काळातही ग्रामीण भागात राहणाऱ्या दुर्बल घटकांच्या विकासासाठी स्थानिक स्वराज्य संस्थेतील ग्रामपंचायतीची भूमिका फार महत्त्वाची ठरते.

ग्रामपंचायत स्तरावर द्यावयाच्या कामाची निवड ग्रामसभेत होत असल्यामुळे कामाची निवड करण्यामध्ये ग्रामस्थांचा महत्त्वाचा वाटा आहे. दे”ाात ग्रामीण मजुरांना अकु”ाल रोजगाराची हमी 1997 पासून कायद्यान्वये देणारे महाराष्ट्र हे दे”ाातील एकमेव राज्य आहे. भारत सरकारने ग्रामीण रोजगााचे विविध कार्यक्रम जवाहर रोजगार योजना, एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम, संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना इत्यादी योजना निधीच्या उपलब्धतेनुसार राबविल्या जातात. मात्र या कार्यक्रमात रोजगाराची हमी नव्हती तर फक्त रोजगाराची उपलब्धता होती. महाराष्ट्रातील रोहयो कायद्याची य”ास्वी अंमलबजावणी माहितीचा अधिकार कायदा व सद्यस्थितीच्या अनुषंगाने अभ्यास करून केंद्र शासनाने संपूर्ण दे”ाासाठी 5 सप्टेंबर 2005 पासून महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा 2005 अमलात आणला. राष्ट्रीय कायद्याची अंमलबजावणी 2 फेब्रुवारी 2006 पासून टप्प्याटप्प्याने सुरू झाली. ग्रामीण भागातील भूमिहीन शेतमजुरांना रोजगार उपलब्ध करून देणे हा या योजनेचा उद्दे”ा होता. कुटुंबातील किमान एका व्यक्तीला एका वर्षात किमान 100 दिवस रोजगार पुरविणे, ग्रामीण विकासाला पूरक अ”ाी कामे हाती घेणे, ग्रामीण भागाला जोडणारे रस्ते बांधणे, पडीत जमिनीत सुधारणा करणे, सामाजिक वनीकरण, जमिनीचे संरक्षण करणे ही कामे करण्यासाठी 60 कोटी रुपये मंजूर करण्यात आले. 1995–86 मध्ये 21 कोटी श्रमदिवस रोजगार उपलब्ध करण्यात आला. 1988 पर्यंत या योजनेद्वारे 4.27 लाख घरे 533 द”ालक्ष झाडे, 532 लाख हेक्टर जमिनीत वनीकरण करण्यात आले.

ग्रामीण भागात राहणाऱ्या अनुसूचीत जाती–जमाती वस्तीतील लोकांच्या मूलभूत गरजांची पुर्तता तसेच त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी महाराष्ट्र सरकारने 1974–75 पासून दलित वस्ती सुधार योजना सुरू केली आहे. अनुसूचीत जाती–जमातीच्या लोकांचे जीवनमान उंचावणे हा योजनेचा उद्दे”ा होता. पण ग्रामपंचायतीमधील राजकीय वाद, अपुरा पाणीपुरवठा, जागेचा वाद अ”ाा अनेक कारणांमुळे दलित वस्ती योजनेतील तरतूद पूर्ण होत नाही. तसेच केंद्र सरकारने 20 ऑक्टोबर 1998 रोजी ग्रामीण भागातील लोकांच्या कल्याणासाठी एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम सुरू केला. ग्रामीण भागात आर्थिकदृष्ट्या दुर्बल लोकांची संख्या वाढू नये, त्यांना रोजगार उपलब्ध व्हावा म्हणून ग्रामीण विकास कार्यक्रम सुरू करण्यात आला.

एम.आर.ई.जी.–II अंतर्गत प्रथमच 50 टक्के निधी हा ग्रामपंचायतीच्या माध्यमातून खर्च करीत व 50 टक्के निधी हा राज्याने खर्च करण्याचा एक क्रांतिकारी निर्णय घेण्यात आला आहे. या योजनेसाठी केंद्र सरकारने 90 टक्के व राज्य सरकारचे 10 टक्के खर्चाचे प्रमाण असे आहे. ग्रामपंचायतीच्या माध्यमातून आपल्या गावाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी व विकासाचे अनेक प्रलंबित प्र”न मार्गी लावण्यासाठी ही एक महत्त्वपूर्ण योजना लागू करण्यात आली. ग्रामपंचायतीच्या माध्यमातून रोजगार हमी योजनेचे काम करीत असताना लोकसहभाग मोठ्या प्रमाणावर वाढला व त्याप्रमाणे काम झाले तर एक चमत्कार

घडेल व अनेक गावे राळेगणसिद्धी व हिवरेबाजार यांना मागे टाकतील. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने”ी संबंधित सर्वांत महत्त्वाची तरतूद म्हणजे ही योजना राबविताना ग्रामपंचायतींची महत्त्वाची भूमिका आहे. ग्रामपंचायतींना कामाची अंमलबजावणी करण्यामध्येही किमान 50 टक्के कामे त्यांना स्वतः करावयाची आहेत. ग्रामसभा ही ग्रामपंचायतीची एक कार्यकारी समिती आहे. ग्रामपातळीवर शासनाचा कोणताही कार्यक्रम य”ास्वीपणे पार पाडण्यासाठी ग्रामपंचायतीचे बळकटीकरण करणे गरजेचे आहे. त्यासाठी प्रत्येक विषयावर ग्रामसभा बोलाविणे कायद्यानुसार गरजेचे आहे. अ”ाा ग्रामसभेच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात लोकांचा सहभाग वाढू शकतो. ि”ावाय शंकांचे निरसन करणे सहज शक्य होऊ शकते म्हणून ग्रामीण विकासात ग्रामपंचायतीची भूमिका महत्त्वाची आहे.

## समारोप

73 व्या घटना दुरुस्तीने पंचायतराज संस्थांना घटनात्मक स्थान देण्यात आले. त्यामुळे या घटना दुरुस्तीने पंचायत संस्था आर्थिकदृष्ट्या मजबूत झाल्या आहेत. अकु”ाल काम करण्यास इच्छुक असणाऱ्या प्रत्येक कुटुंबातील प्रौढ व्यक्तीला रोजगार हमी योजनेअंतर्गत 100 दिवस प्रतिकुटुंब रोजगाराची हमी देण्यात आली असून त्या माध्यमातून स्थायी स्वरूपाची मालमत्ता निर्माण करणे हे योजनेचे मूळ उद्दिष्ट आहे. त्याचप्रमाणे ग्रामीण भागातील शेतकरी शेतमजुरांना या अधिनियमाच्या माध्यमातून रोजगाराचा हक्क प्रदान करणे, सामाजिक सुरक्षा देणे, महिला व दुर्बल घटकांचे सबलीकरण करणे तसेच पंचायतराज संस्थांचे बळकटीकरण करण्यावर योजनेत भर देण्यात आला आहे.

## संदर्भ


1) मुंबई ग्रामपंचायत सुधारणा अधिनियम (2006), महाराष्ट्र शासन
2) डॉ.ि”ावाजी भ. यादव, ग्रामपंचायत वित्त व योजना, चिन्मय प्रका”ान, औरंगाबाद
3) प्रा.मनोज पाटील, संचालक, नागरिकांसाठी केंद्र व राज्य शासनाच्या विकास योजना, चौधरी पब्लि”ार्स, पुणे, 2009
4) य”ादा वाचन साहित्य–राज्य ग्रामीण विकास संस्था, य”ावंतराव चव्हाण विकास प्र”ाासन प्रबोधिनी, राजभवन आवार, बाणेर रोड, पुणे
5) रोजगार हमी योजना (महाराष्ट्र शासन) रोजगार हमी योजना कायदा 1977
नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
6) डॉ.दत्तात्रय आघाव, ग्रामीण विकास आणि योजना, ऑगस्ट 2012

 ISBN No. 978-93-91097-18-9

# ३३. निर्वाचन सुधारणा (The Electoral Reforms)

**Prof. Dr. R. G. Suralkar**
HOD Dept. of Political Science
Smt. Sindhutai Jadhao Arts & Science Mahavidyalaya, Mehkar.
Email:- ramesh.suralkar@gmail.com

## सारांश

निवडणूका सुरळीतपणे व निप:क्षपणे पार पाडणे ही निवडणूक आयोगाची जबाबदारी आहे. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सन १९५० पासून आजपर्यत झालेल्या सर्व सार्वत्रिक निवडणूका यशस्वीपणे पार पाडण्यात निवडणूक आयोगाचे योगदान महत्वाचे आहे.निर्वाचन सुधारणा ही सतत सुरुअसणारी प्रक्रिया आहे. भारतीय निवडणूक प्रक्रियेतील काही दोष दूर करण्यासाठी निवडणूक आयोगाने आजपर्यत वारंवार प्रयत्न केले आहेत. मात्र संपूर्ण देशातील मतदान आणी त्यानंतरची मतमोजणी एका दिवसात पुर्ण करण्याची क्षमता अद्यापही विकसित झालेली नाही. अपक्ष व स्वतंत्र उमेदवाराची संख्या मर्यादित करण्याच्या दिशेने उपाययोजना करणे आवश्यक झाले आहे. निवडणूकीतील काळया पैशांचा प्रभाव कमी करणे गरजेचे झाले आहे. थोडक्यात परिस्थितीची गरज लक्षात घेवून निर्वाचन सुधारणा करण्यास नेहमीच वाव असतो.

१९५२ पासून तर आजपर्यतच्या सार्वत्रिक निवडणूका यशस्वी झाल्या.त्याचे श्रेय निवडणूक आयोगाला द्यावे लागेल.भारतीय निवडणूज प्रक्रियेत अनेक दोष होते. यासाठी वेळोवेळी संथानाम समिती (१९६४) जगन्नाथराव समिती १९७१, वांछू समिती १९७३, दिनेश गोस्वामी समिती १९९०, इंद्रजित गुप्ता समिती, तारकुंडे समिती इत्यादी समित्यांची निर्मिती करुन दोष कमी करण्याचे प्रयत्न झालेले आहेत. विविध समित्यांचा अभिप्राय, राजकीय पक्षाकडून आलेल्या सुधारणा,जनतेमधून केलेल्या मागण्या त्याचा परिणाम म्हणून भारतात आजपर्यत अनेक निवडणूक सुधारणा करण्यात आलेल्या आहेत. त्याचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

१) **मतदारांची वयोमर्यादा:-**इ.स.१९८८ मध्ये ६१ वी घटनादुरूस्ती करु नसंविधानाच्या ज लम ३२६ नुसार मतदाराचे वय २१ वर्ष वरुन १८ वर्ष करण्यात आले. मतदारांच्या वयोमर्यादेत बदल केल्यामुळे भारतातील मतदारांच्या संख्येत १५ टक्के वाढ झाली. तसेच सुशिक्षित मतदारांचे प्रमाण सुध्दा वाढले आहे.

२) **राष्ट्रीय प्रतिकांचा सन्मान :-**भारताचे संविधान, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीत या प्रतिकांचा अपमान करणाऱ्या व्यक्तीला ६ वर्षाच्या ज ालावधीसाठी अपात्र ठरविज्यात आले आहे.

३) **सुचक व अनूमोदक यांच्या संख्येत वाढ :-**राज्यसभा व विधानपरिषदेच्या निवडजूकीसाठी उभे राहणाऱ्या उमेदवाराच्या नामांकन अर्जावर निर्वाचन संख्येच्या १० टक्के ज्ं वा १० पेक्षा कमी असेल तितके सूचक व अनूमोदक अनिवार्य ठरविण्यात आले आहे. सन १९७७ मधील अध्यादेशानूसार राष्ट्रपतीच्या निवडणूकीसाठी सूचक व अनूमोदक यांची संख्या ५० पर्यत वाढवली आहे. अशा बदलामूळे प्रतिष्ठीत पदासाठी उभे राहणाऱ्या उमेदवाराच्या संख्येवर नियंत्रण ठेवण्यात आले आहे.

४) **अनामत रक्कम :-** लोक सभा उमेदवारासाठी अनामत रक्कम रुपये १०,००० व राखीव उमेदवारासाठी रु ५००० केली आहे. तसेच विधानसभा उमेदवारासाठी अनामत रक्कम रु पये ५००० व राखीव उमेदवारासाठी रुपये २,५०० जमा करण्याची तरतूद केली आहे.

५) **लोकप्रतिनिधीत्व कायदा:-** १९५५ च्या लोकप्रतिनिधीत्व कायद्यानुसार संसद किंवा राज्य विधिमंडळाच्या सदस्यासाठी अपात्रतेच्या अटी ठरवतांना निवडणूकीत गैरमार्गाचा अवलंब करणाऱ्या उमेदवाराला शिक्षा झाली असेल असे उमेदवार ६ वर्षापर्यत निवडणूकीत उभे राहू शकणार नाही अशी अट आहे.

६) **मतदारांना ओळखपत्र :-** निवडणूक आयुक्त टि.एन.शेषन यांनी मतदारासाठी ओळखपत्र देण्याची योजना राबवली. त्यानुसार सरकारने मतदारांना ओळखपत्र देण्याचे काम सुरु केले. भारतात मात्र याबाबत अनेक राज्ये उदासिन असल्याचे दिसून येते.

७) **उमेदवारी अर्ज :-** उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा दिवस आणि मतदानाचा दिवस यातील अंतर २० दिवसाऐवजी १४ दिवस करण्यात आले.

८) **इलेक्ट्रॉनिक मशीनचा वापर :-** लोकप्रतिनिधीत्व कायद्यात सुधारणा करुन मतदानासाठी इलेक्ट्रॉनिक्स मशीनचा वापर करण्याची परवानगी देण्यात आली आहे. इलेक्ट्रॉनीक मशीनच्या सहाय्याने मतदान करण्याच्या सोयीमुळे निवडणूक प्रक्रिया गतिमान झाली आहे.

९) **निवडणूक लढविण्याबाबत:-** एका उमेदवाराला एका वेळी केवळ दोन मतदारसंघासाठी अर्ज करता येईल. मात्र त्यापेक्षा अधिक मतदारसंघामध्ये अर्ज भरण्यास प्रतिबंध लावण्यात आला आहे.

१०) **निवडणूक आचारसंहिता :-** राजकीय पक्ष आणि उमेदवारासाठी आचारसंहिता निर्माण करुन निवडणूक आयुक्त टि.एन.शेषन यांनी तिचे अत्यंत कसोशीने पालन करवून घेतले . त्यामुळे अनेक गैरव्यवहारांना पायाबंद बसला आहे.

११) **निवडणूक खर्चाचे हिशेब:-** प्रत्येक उमेदवाराने निवडणूक खर्चाचा हिशेब ठरावीक नमुण्यात सादर करावा अशी तरतुद लोकप्रतिनिधीत्व कायद्यात केली आहे. हिशेब सादर न करणाऱ्या उमेदवाराला ३ वर्ष निवडणूकीत उभे राहता येणार नाही अशी तरतुद आहे. तसेच प्रचारासाठी उमेदवाराने किती व कसा खर्च करावा हे ठरविण्याचा अधिकार निवडणूक आयोगास आहे.

१२) **उमेदवारांच्या मृत्यू संदर्भात:-**अपक्ष उमेदवाराचा मृत्यू झाल्यास त्या मतदारसंघातील निवडणूक स्थगित केली जाणार नाही.मात्र राष्ट्रीय किंवा प्रादेशिक पक्षाच्या उमेदवाराचा मृत्यू झाल्यास मतदानाची तारीख पूढे ढकलली जाते. या संदर्भात ७ दिवसात उमेदवाराचे नाव निश्चित करण्यास सांगितले जाऊ शकते.

१३) **सर्वोच्च न्यायालयाचे निर्देशन:-** सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक प्रक्रियेत सुधारणा करण्यासाठी अत्यंत महत्वपूर्ण निर्देश निवडणूक आयोगाला दिले आहे. या निर्देशानूसार निवडणूकीत उभे राहणाऱ्या प्रत्येक उमेद्वाराच्या विरुध्द किती गुन्हे नोंदविले आहेत तसेच त्यांच्या कुटूंबियाची चल व अचल संपत्ती किती आहे. याची माहिती व घोषणापत्र नांमाकन अर्जासोबत आयोगाने घ्यावी. मात्र या निर्देशाबाबत सर्व राजकीय पक्ष एकत्र येऊन त्यांनी विरोध केला.याशिवाय निवडणूक आयोगाला असे करता येउ नये म्हणून संसदेत कायदा

सुध्दा मंजुर करुन घेतला . मात्र या कायद्याच्या वैधतेला आव्हान देण्यात आले असून सर्वोच्च न्यायालयाने पुन्हा तसे निर्देश निवडणूक आयोगाला दिले आहेत.

**१४) ज मचाऱ्याच्या संदर्भात:-** निवडणूक कार्यासाठी निवडणूक आयुक्तांच्या विनंतीवरुन केंद्र व राज्य शासनाला आपला कर्मचारी वर्ग निवडणूक आयोगाला उपलब्ध करुन द्यावा लाजतो. ज ारण निवडणूक आयोगाला स्वत:चा कर्मचारी वर्ग नाही. १९९८मधील दुरु स्तीनुसार निवडणूक कार्य करणे बंधनकारक आहे.

**१५) पोष्टाद्वारे मतदान :-** जनप्रतिनिधीत्व कायद्यातील दुरुस्तीनुसार १ ऑगस्ट १९९६ पासू-न पोष्टाद्वारे मतदान करण्यासाठी मान्यता देण्यात आली आहे. यामुळे अनेक सार्वजनिज सेवेतील कर्मचारी पोस्टाद्वारे मतदान करु शकतात.

**१६) मद्यपाना संदर्भात :-** मतदानाच्या दिवशी शांतता व सुव्यवस्था टिकून रहावी यासाठी दारु ची दुकाने बंद ठेवण्याची तरतुद केली आहे.

**१७) पोटनिवडणूकीबाबत :-** लोकसभा व विधानसभेतील कोणत्याही कारणाने एखादी जागा रिक्त झाल्यास ६ महिन्याच्या आत पोटनिवडणूका घेण्यात याव्यात अशी तरतुद करण्यात आली आहे.

**१८) ज मचाऱ्यांच्या सुटी संदर्भात :-** मतदानाच्या दिवशी निवडणूकीचे कार्य करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांना सेवेतून सुटीची व्यवस्था केलेली आहे.

**स-न २०१० पासू-न लाजू झालेल्या निवडजूज सुधारजा:-**

1. **एक्झिट पोलवर निर्बंध :-** भारतीय निवडणूक आयोगाच्या २००९ च्या सूचनेनूसार लोकसभा व विधानसभेच्या निवडणूकी दरम्यान एक्झिट पोल प्रसिध्दीवर बंदी घातली आहे. या तरतूदीमुळे -निवडणूक काळात सर्वेक्षण करता येणार नाही. तसेच जनमत कौल हा प्रिंट किंवा इलेक्ट्रीक मिडियाद्वारे प्रसिध्द करता येणार नाही. असे करणाऱ्यास २ वर्षाची शिक्षा होऊ शकते.
2. **अपात्र ठरविण्याच्या सदंर्भात कालमर्यादा :-** लोकप्रतिनिधी सुधारणा कायदा ,२००९ नुसार निवडणूक काळातील भ्रष्टाचारामुळे दोषी आढळणाऱ्या व्यक्तीस अपात्र ठरविण्याची तरतुद आहे. भ्रष्टाचाराची चौकशी करण्यासाठी नियुक्त केलेला अधिकारी अपात्रतेच्या संदर्भात निर्णय घेण्यासाठी आपला अहवाल ३ महिन्याच्या कालावधीत राष्ट्रपतीकडे पाठवतो.
3. **भ्रष्टाचाराची व्याप्ती :-** लोकप्रतिनिधीत्व कायदा २००९ नुसार निवडणूक काळात निवडणूक आयोगाने नियुक्त केलेल्या सार्वजनिक सेवेतील अधिकाऱ्याने उमेदवाराकडून आर्थिक सहाय्य घेतल्यास तो कायद्याने भ्रष्टाचार ठरतो.
4. **उमेदवाराच्या अनामत रकमेत वाढ :-** (लोकप्रतिनिधी सुधारणा कायदा २००९ ) १ फेब्रुवारी २०१० नुसार लोकसभेच्या निवडणूकीत उभे राहणाऱ्या उमेदवारालाअनामत रक्कम रुपये १०,००० वरुन २५००० करण्यात आले. राखीव उमेदवारासाठी ५००० रु वरुन १२,५००० करण्यात आणि विधानसभेच्या
5. उमेदवारासाठी ५ हजार वरुन १०हजार करण्यात आले आणि राखीव उमेदवारासाठी ५ हजार वरुन १० हजार ज रण्यात आले आणि राखीव उमेदवारासाठी २५०० वरुन ५ हजार इतके वाढविण्यात आले.
6. **जिल्हयामध्ये अपिलेट प्राधिकरण :-** लोज प्रतिनिधी सुधारणा कायदा,२००९ नुसार १ फेब्रुवारी २०१० पासून निवडणूक नोंदणी अधिकारी यांच्या आदेशाविरु ध्द राज्य मुख्य निवडणूक

अधिकारी यांचेकडे दाद मागता येते. या तरतुदीमुळे मतदारसंघाच्या निवडजूज -नोंदजी अधिकाऱ्याच्या आदेशाविरु ध्द जिल्हा दंडाधिकारी किंवा जिल्हा न्यायाधिकारी तसेच जिल्हाधिकारी यांचेकडे दाद मागता येते.

7. **विदेशातील भारतीय नागरीकाला मतदानाचा अधिकार:-** लोकप्रतिनिधी कायदा २०१० नूसार फेब्रुवारी २०११ पासून विदेशात राहणाऱ्या भारतीय नागरीकास मतदानाचा अधिकार आहे. अर्थात १) त्या व्यक्तीचे मतदार यादीत नाव असावे २) त्याने परकीय नागरिकत्व स्विकारलेले नसावे ३) तो नोकरी किंवा शिक्षणासाठी भारतात राहत नसेल अशा नागरिकांना लोकसभा व विधानसभेसाठी मतदानाचा अधिकार प्राप्त झाला आहे.

8. **ऑनलाईन मतदार नोंदणी :-** केंद्रसरकारच्या मतदार नोंदणी दुरु स्ती नियमा-ुसार २४ ऑक्टोबर २०१३ पासून मतदार यादीत नाव नोंदणीसाठी ऑनलॉईन अर्ज करता येतो.

9. **नोटा (None of Above) मत नाकारण्याचा अधिकार:-**सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानूसार निवडणूक आयोगाने इलेक्ट्रॉनिक मतदान मशीन यंत्रात नोटा (NOTA) अशा बटनाची पर्यायी तरतुद केली आहे. त्यामुळे कोणत्याही उमेदवाराला मतदान न देण्याचा अधिकार मतदाराला प्राप्त झाला आहे. अशा मतदानाबाबत गुप्तता राखली जाते.

10. **तुरुंगातील व्यक्तीला निवडणूक लढविण्याचा अधिकार :-** सन २०१३ मधील पाटणा उच्च न्यायालयाच्या निर्णयावर सर्वोच्च न्यायालयाने मुख्य निवडणूक आयूक्त विरुध्द जन चौकीदार या खटल्याचा निर्णय देतांना उच्च न्यायालयाचा निर्णय योग्य ठरविला. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयानूसार लोकप्रतिनिधी कायदा, २०१३ नुसार १९५१ च्या लोकप्रतिनिधी कायद्यात पुढील दोन तरतुदी करण्यात आल्या.
१) तुरुं गातील किंवा पोलीस कोठडीतील व्यक्तीच्या मतदानावर प्रतिबंध असला तरी मतदार यादीत नाव असलेल्या व्यक्ती मतदार नाही असे म्हणता येणार नाही. २) संसद किंवा राज्यविधिमंडळाच्या सदस्याला कायद्यातील एखादी तरतुद अपात्र ठरवित असेल तर तो अपात्र ठरेल.मात्र इतर कोणत्याही कारणाने तो अपात्र ठरणार नाही. अशाप्रकारे सर्वोच्च न्यायालयाद्वारे तरतुद केली आहे.

11. **जुन्हेगारास अपात्र ठरविण्याबाबत तरतुदी:-** लोकप्रतिनिधी कायदा, २०१३ नुसार सर्वोच्च न्यायालयात आरोपपत्र दाखल
झालेले संसद सदस्य किंवा राज्य विधिमंडळ सदस्य यांच्यावरील अपराध सिध्द झाला तर ते सदस्यत्वासाठी तात्काळ अपात्र ठरतात. यासाठी अपील करण्याबाबत पुर्वी असलेला ३ महिन्याचा कालावधी रदद् करण्यात आला आहे.

शिक्षापात्र गुन्हेगार सदस्यास शिक्षा देण्यावर स्थगिती मिळविण्यासाठी परवानगी देणारा लोकप्रतिनिधी कायदा १९५१ मधील कलम ८ (अ) घटनाबाहय म्हणून खंडपीठाने रदद् ठरविला आहे. खंडपीठाचा हा निर्णय मात्र पुर्वीलक्षी प्रभावाने (यापूर्वीच्च अपिल दाखल केले असेल तर) लागू होणार नाही असे २०१३ च्या खंडपीठाने स्पष्ट केले आहे.

एखादी व्यक्ती संसद किंवा राज्य विधिमंडळाचा सदस्य म्हणून निवडून येण्यास अपात्र आहे. हे ठरविण्यासाठी संसदेने विशेष कायदा करावा असे संविधानाच्या कलम १०२ व कलम १९१ मध्ये तरतुद आहे. त्यामुळे खंडपीठाच्या निर्णयानुसार वेगळाकायदा करण्याची आवश्यकता -ाही.

**12. निवडजूज जर्चाची मर्यादा :-**निवडणुक प्रक्रिया नियमन १९६१ नुसार २८ फेब्रुवारी २०१४ पासू-न ज़े द्रसरकारने मोठया राज्यातील लोकसभा उमेदवारासाठी जास्तीत जास्त ७०,००, ००० लाख तर लहान आकाराच्या राज्यातील उमेदवारासाठी जास्तीत जास्त ५४,००,००० लाख निवडणूक खर्चाची कमाल मर्यादा ठरवून दिली आहे. मोठया विधानसभा मतदारसंघातील उमेदवारासाठी जास्तीत जास्त २८,००,००० लाख तर लहान आकाराच्या विधानसभा मतदारसंघातील उमेदवारासाठी जास्तीत २०,००,००० लाख कमाल मर्यादा ठरवून देण्यात आली उमेदवारासाठी जास्तीत २०,००,००० लाख कमाल मर्यादा ठरवून देण्यात आली आहे.

**13. उमेदवाराचे ओळखपत्र :-** निवडणूक आयोगाच्या आदेशानूसार १ मे २०१५ नंतर होजाऱ्या सार्वजनिक निवडणूकामध्ये एकाच नावाच्या उमेदवारामुळे मतदारामध्ये होजारा जोंधळ टाळण्यासाठी इलेक्ट्रॉनिक मतदान मशीन यंत्रामध्ये उमेदवाराचे नाव, उमेदवाराचे चिन्ह,उमेदवाराचे छायाचित्र असेल अशी तरतुद केली आहे. अशी प्रक्रिया सर्वप्रथम जून २०१५ मध्ये पाच राज्यात

झालेल्या एकून ६ जागांच्या पोटनिवडणुकीच्या वेळी वापरण्यात आली. असा बदल करण्याचे महत्वपूर्ण कारण म्हणजे एका मतदारसंघात सारख्या नावाने उमेदवार निवडणूक लढवितात. यामूळे निवडणूक आयोगाने याची दखल घेतली आहे.

**संदर्भ ग्रंथ**


१. आऊटलाईन्स, ऑफ इंडियन लिगल हिस्ट्री, एम.मी. जै, वधवा अँड कंपनी, -नाजपूर.
२. बसु डी.डी.कमेंटरी ऑफ द कॉन्स्टिटयुशन ऑफ इंडिया,प्रकाशन प्रेटिंग हाल,खंड५
३. बाली एल. आर.डॉ. आंबेडकर और भारतीय संविधान, भीम पत्रिज ा पब्लिज़े श-न.
४. बहिष्कृत भारत, दि .१८ जाने.१९२९ संपादक डॉ. बाबासाहेब आंबेडकर.
५. बसू. दुर्गादास भारतीय राज्यघटनेची ओळख, लेक्सिस नेक्सिस पब्लिज़े श-न प्रा.लि.हरियाणा, भारत प्रथम आवृत्ती २०१४.
६. ज श्यम सुभाष , अप्पर कॉन्स्टीटयुशन ,नॅशनल बुक ट्रस्ट ,तृतीय खंड,२००१
७. ज ॉन्स्टीटयुशन असेम्बली डिबेट्स खंड ७ भारत सरकार प्रकाशन.
८. पाटील बी.बी. भारतीय शासन आणि राजकारण, फाळके प्रकाशन कोल्हापूर ,तृतीय आवृत्ती २००६ .
९. जाधव तुकाराम, भारतीय संविधान व भारतीय राज्यकारण खंड -२, प्रज ाश-न युनिज ॲकाडमी,द्वितीय आवृत्ती जुलै २०१२.
१०. भोळे, भा. ल. भारतीय लोकशाहीचे संविधानातील आधार, भारताचे शासन व राजकारण, पिंपळापूरे प्रज ाश-न, -नाजपूर, पृ.ज्र .५६.

# ३४. शिक्षण हक्क उपलब्धी आणि आव्हाने

प्रा. डॉ. डोंगरे एल.बी.
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालय,
हिमायतनगर, जि. नांदेड (महाराष्ट्र).

---

मानवाच्या सामाजिक आणि आर्थिक प्रगतीमध्ये शिक्षणाने अत्यंत महत्त्वाची भुमिका पार पाडलेली आहे. त्यामुळे शिक्षणाचा हक्क हि प्रमुख समस्या म्हणुन आजच्या काळात पुढे आलेली आहे. शिक्षणामुळे व्यक्तिची केवळ कार्यक्षमताच वाढत नाही तर लोकशाहीतील सहभागीता वाढते त्यामुळे एक उत्कृष्ट जीवन जगण्याची संधी त्यांना मिळते. याबद्दल यु-नोस्ज ा-ने असे म्हटले आहे. कि जीवनाच्या सर्व व्यवहाराकरिता महत्त्वाचे असणारे ज्ञान, कौशल्य व जाणीव विकसीत करणारे संघटीत व सातत्याने अध्यापन म्हणजे शिक्षण होय या प्रमाणेच जागतिक शिक्षण तज्ञ जॉन ड्युई या बदल असे म्हणतात कि शिक्षण म्हणजे लहान व असामान्य मनुष्यप्राण्याला सुखी, नितिमान व कार्यक्षमबनविण्यास मदत करणे होय. या शिक्षण हक्कांची जाणीव सर्वप्रथम 1776 अमेरिकन राज्यक्रांती 1789 मधील फ्रेच राज्यक्रांतीमुळे समोर आली.

भारतात 1835 च्या कायद्याने शिक्षणाच्या हक्काची अल्प प्रमाणात सुरूवात झाली कारण तो भारतीय गुलामगीरी चा काळ होता. भारतीय स्वातंत्र्यानंतर घटनाकर्त्यांना शिक्षणाच्या हक्कांची प्रकर्षाने जाणीव होती. त्यामुळे त्यांनी घटनेतील मार्गदर्शक तत्त्वामधील 45 व्या कलमात शिक्षणाचा मानवी हक्का बद्दल तरतुद करून ठेवली. पण त्याची व्यापकप्रमाणात अंमलबजावणी झाली नाही. त्यामुळे मोठ्या प्रमाणात शिक्षणाचे ध्यैय साध्य झाले नाही. या कारणाने त्यातील दोषदुरू करून शिक्षणाच्या हक्काची व्यापकता वाढविण्यासाठी सर्वांच्या कल्याणासाठी RTE-कायदा 2009 संमत करण्यात आला. या कायद्यामुळे भारतात शिक्षण हक्क युगाची सुरूवात झ ाली. हि एक नवीन शैक्षणिक क्रांतीच आहे. या कायद्यात एकूण सात प्रकरण व 38 कलमे आहेत. त्यामधील 02 कलमामध्ये शिक्षणाचा हक्क या बद्दल असे म्हटले आहे कि, समुचीत शास-न राज्यशासन, प्रतिव्यक्ति, शुल्क, बालक, उपेक्षीत गटातील बालक, दुर्बल घटकातील बालक, प्रार्थमिक शिक्षण, पालक स्थानिक प्राधिकरण, राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोग, अनुसूचना, माता-पिता विहीत, अनुसूची शाळा, चाळणी प्रक्रिया निर्दिष्ट प्रवर्ग यामध्ये विलगतेचा त्याग करून सर्वच क्षेत्रात सुगमता आनन्यावर भर दिलेला आहे.

शिक्षणाचा हक्क अधिक प्रभावी पणे लागु व्हावा त्याकरिता विविध योजना देखील क्रि यान्वीत केलेल्या दिसून येतात त्यामध्ये OBB-ऑपरेशन ब्लॅक बोर्ड, DPEP- जिल्हा प्राथमिक शिजज, MDM-मध्यान्ह भोजन, EGS-शिक्षण हक्क योजना तसेच पर्यायी नवीन हक्क उपक्रम योजले.

प्रस्तुत शोध निबंधात शिक्षणाचा हक्क हा व्यक्तिचा मुलभुत हक्क आहे. ज्यावर व्यक्तिचा व समाजाचा, राष्ट्राचा सर्वांगीन विकास अवलंबुन असतो. शिक्षणाच्या सार्वत्रिकणाच्या एकंदरित स्थीतीवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. यामध्ये शिक्षणाचा हक्काचा

पूर्व इतिहास, RTE-2009 कायद्याची निर्मीती त्यातील तरतुदी व अंमलबजावणी त्यासाठी योजलेल्या विविध योजना एकंदरित स्थीतीवर दृष्टीक्षेप टाकण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

➢ **संशोधनाचा उद्देश :-**

1. शिक्षण हक्क कायद्याचा पूर्व इतिहास जाणुन घेणे
2. भारतीय समाजजीवनातील शिक्षण हक्काचा अभ्यास करणे.
3. राज्यघटनेतील शिक्षण हक्काच्या तरतुदीचाा अभ्यास करणे
4. शिक्षणाच्या सार्वत्रिकरणाचा आढावा घेणे.

➢ **तथ्य संकलन पद्धती :-**

प्रस्तुत शोध निबंधाच्या तध्य संकलनासाठी दुय्यम तथ्य संकलन पद्धतीचा उपयोग करण्यात आलेला आहे. त्यामध्ये इंटनेटच्या माध्यमातून माहीती, विविध पुस्तके, मासिके प्रकाशित सदर, वर्तमानपत्रे विषया संदर्भात लिखान तसेच शासनाच्या विविध प्रकाशनातील लिखान इ. वापर करण्यात आलेला आहे.

➢ **जृहित कृत्य :-**

1. शिक्षणाच्या हक्काची  अंमलबजावणी होतांना अनेक ठिकाणी त्रुटी दिसून येतात.
2. राज्यघटनेत याबाबत व्यापक प्रमाणात घटना दुरूस्ती करणे गरजेचे आहे.
3. भारतीय समाज हा शिक्षणाप्रती उदासिन दिसून येतो.
4. शिक्षणाचा व्यापक प्रमाणात आजही प्रचार प्रसार झाल्याचे दिसुन येत -ाही.

➢ **संशोधनाचे महत्त्व :-**

राष्ट्रीय एकात्मता, सहकार्य, सामाजिक न्याय, अध्यात्मीकता तसेच शिक्षणाचा हक्क मानवाधिकार राज्यघटनेतील तरतुदी समाजाच्या कल्याणात आणि ज्ञानात भर घालणाऱ्या आहेत. शिजज हक्काच्या विविध समस्याचा अभ्यास प्रस्तुत शोधनिबंधात करण्यात आलेला आहे.

➢ **शिक्षण हक्क कायद्याची पार्श्वभूमी**

मार्जदर्शक तत्त्वातील कलम 45 असे वर्णन केलेले आहे कि, सहा वर्षापर्यंतच्या सर्व बालकांसाठी शिक्षण तसेच बालगृहे या सुविधा पुरविने हि प्राथमिक शिक्षण हक्काच्या सार्वत्रिकरणाची सुरूवात आहे. डॉ. एम.व्ही. पायली याबदल असे म्हणतात कि, संयुक्तराष्ट्र संघाच्या मानवी अधिकार पत्राचा प्रभाव मार्गदर्शक तत्त्वावर आहे. या प्रमाणे राज्यघटनेतील समाजाच्या सार्वत्रिक कल्यानावर भर देण्यात आलेला आहे पण त्याची काटेकोर अंमलबाजवणी महत्त्वाची आहे. शासनाची हि केवळ नैतिक जबाबदारी असल्यामुळे सुरूवातीच्या काळात शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणावर आधिकभर देण्यात आलेला नव्हाता शिक्षण हा राज्य सुचीतील विषय असल्यामुळे त्याकडे राज्यकर्त्यांनी दुर्लक्ष केले. त्यावर राष्ट्रीय सहमती बनली नव्हती. 1966 कोठारी आयोगाची निर्मीती झाली. शिक्षणाचा हक्क या संदर्भात नेहरु काळाप्रमाणेच इंदिरा गांधी युगात देखील विविध योजना आयोग नेमण्यात आले त्यानुसार 1968 चे शैक्षणिक धोरण अस्तीत्वात  आले. शिक्षणाच्या सार्वत्रिकरणामध्ये 1975 पर्यंत साध्य करण्याचे यामध्ये ठरविण्यात आलेले होते.  पण ते शक्य होऊ शकले नाही. यामध्ये नोंदणी, समान शिक्षण आणि गुणवत्ता या बाबी आधारभुत मानल्या गेल्या. पण यामध्ये अपेक्षीत बदल झाले. सर्व त्यामुळे 1975 ते 1980, 1980 ते 1985, 1985-1990 अशा पद्धतीने पाच वर्षाची तीन वेळेस वाढकरण्यात आली.

 ISBN No. 978-93-91097-18-9

राजीव गांधी यांच्या प्रेरणेने 1986 ला दुसरे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण निश्चित करण्यात आले. 1995 पर्यंत या शैक्षणिक धोरणाची मर्यादा ठरविण्यात आलेली होती. या 08 वर्षाच्या काळामध्ये अपेक्षीत असा बदल होऊ शकला नाही. त्यामुळे राममुर्ती यांच्या नेतृत्त्वाखाली 1992 मध्ये एक कृती कार्यक्रम सादर करण्यात आला होता. याच वर्षी संयुक्त राष्ट्राच्या बाल कायद्यावर भारताची स्वाक्षरी झाली. 1990 मध्ये शिक्षण बालकांचा हक्क संसदेमध्ये पारीत करण्यात आले. आंध्रप्रदेशामध्ये 1993 ला उनीकृष्णण विरूद्ध इतर खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने कलम 21 हे मानवाचा जीवन जगण्याचा महत्त्वपूर्ण अधिकार मानले त्यामुळे येथुनच शिक्षणाचा हक्क हा मुलभुत हक्काच्या यादीमध्ये समावेश होऊ शकला शिक्षणाचा हक्क कायद्याची सुरूवात येथुनच मानली जाते. 28 नाव्हेंबर 2001 मध्ये शिक्षणाचे सार्वत्रिकरण करण्यासाठी प्राथमिक शिक्षण हक्क विधेयक लोकसभेत मांडण्यात आले. त्यानंतर 14 मे 2001 राज्यसभेत त्यास मंजुरी मिळाली राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांच्या स्वाक्षरीने 86 वी घटनादुरूस्ती झाली. या-नुसार प्रार्थमिज शिक्षणाचा मुलभुत अधिकारामध्ये समावेश करण्यात आला. त्यानुसार समाविष्ट करण्यात आलेले कलम 21 (A) म्हणते राज्यसंस्था तिने निश्चित केलेल्या रितीने 06 ते 14 वयोगटातील सर्व मुला मुलींना मोफत आणि सक्तिचे शिक्षण पुरवेल.

मार्गदर्शक तत्त्वातील कलम 45 तरतुदीमध्ये बदल केला. त्यानुसार सर्व मुलांच्या वयाची 6 वर्षे पूर्ण होईपर्यंत राज्यसंस्था त्यांना प्रारंभिक बाल्यावस्थेत संगोपन आणि शिक्षण पुरविण्याचा प्रयत्न करेल.

ज लम 51 (अ) मध्ये पूर्वी 10 मुलभूत कर्तव्यांचा समावेश होता या घटनादुरूस्तीने 11 वे कर्तव्य जोडण्यात आले. त्यानुसार 6 ते 14 वयोगटातील मुला-मुलींचे आई-वडील व पालक असणाऱ्या सर्व भारतीय नागरिकांचे हे कर्तव्य असेल कि, त्यांनी आपल्या मुलांना वा पाल्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून द्यावी ग्रॅनव्हिल ऑस्टीन असे म्हणतात कि, मार्गदर्शक तत्त्वाच्या अंमलबजावणीद्वारे देशातील सामाजिक क्रान्तीची उद्दिष्ट्ये साध्य होतील. यानंतर 2003 मध्ये शैक्षणिक धोरण मोडण्यात आले 2004, 2005 पर्यंत कोणताच मोठ्या प्रमाणात शिक्षण व्यवस्थेत बदल घडुन आलेला नव्हता मात्र 2005 मध्ये RTE या पहिला मसुदा तयार झाला त्या दिशेने पाऊले उचलण्यास सुरूवात झाली यासाठी एक समितीगठीत करण्यात आली या समितीने सतत सात वर्षे अभ्यास करून हा कायदा तयार केला. 2008 मध्ये संसदेसमोर हा कायदा विचाराधीन ठेवण्यात आला.

2 जुलै 2009 रोजी विधेयकाला मंजुरी दिली. हे विधेयक राज्यसभेने 20 जुलै रोजी तर लोकसभेने 4 ऑगस्ट 2009 रोजी पास केले राष्ट्रपतींनी 2009 रोजी याला मान्यता दिली. जम्मु कश्मिर या राज्याचा अपवाद वगळता 1 एप्रिल 2010 पासून संपूर्ण भारतात या कायद्याची अंमलबाजवणी सुरू झाली. पंतप्रधान मनमोहनसिंग यांच्या भाषनाने या कायद्याची अंमलजबावणी ती पहिलीच वेळ होती. राजस्थान हे देशातील पहिले घटकराज्य ठरले.

यामुळे विश्वसमुदायात भारत शिक्षणाला मुलभुत हक्कात समावेश करणारा 135 वा देश ब-ला.

**शिजण हक्क कायद्यातील तरतुदी :-**

1) प्रार्थमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत घराजवळ असलेल्या शाळेत प्रत्येक बालकाला 6 ते 14 वर्षापर्यंत मोफत वसक्तिचे शिक्षण मिळवण्याचा हक्क असेल.

2) बालकाच्या वयाच्या सहाव्या वर्षी जर एखाद्या बालकाने शाळेत प्रवेश घेतलेला नसेल तर, तिच्या किंवा त्याच्या वयानुसार तिला त्याला संबंधीत वर्गामध्ये प्रवेश मिळु शकतो.
3) प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणत्याही बालकाला मागील वर्गात नापास, शाळेतून काढले जाणार नाही.
4) तरतुद केलेल्या वयोगटामध्ये (6 ते 14) एखाद्या विद्यार्थ्याचे प्राथमिक शिक्षण पूर्ण झ ाले नाहीतर 14 वर्षापुढे ही प्राथमिक शिक्षण पूर्ण होण्यासाठी मोफत शिक्षण पूर्ण होज्यासाठी मोफत शिक्षण मिळु शकेल.
5) 40 विद्यार्थ्यांमागे एक शिक्षक (1:40)
6) शिक्षकांनी 05 वर्षाच्या आत प्रशिक्षण घेणे अनिवार्य असे.
7) RTE Act च्या अंतर्गत वर्ग 6 ते 8 पर्यंत विज्ञान, गणित, व सामाजिक अध्ययन व भाषाविषयास एज शिक्षक आवश्यक राहील.
8) ज्या ठिकाणी 100 व्या अधिक मुल-मुली असतील तेथे एक कायमस्वरुपी मुख्याध्यापक पाहीजे तसेच कार्यालयीन एक कला शिक्षक तसेच तथा एक पूर्ण कार्य करणारा कार्य पालक अध्यापक पाहीजेत.
9) RTE ॲक्ट च्या अनुसार वर्ग 1 ते 5 पर्यंत 200 दिवस कार्य दिवस राहतील तसेच वर्ग 6 ते 8 पर्यंत 220 दिवस कार्य दिवस राहतील.
10) प्रत्येक विद्यार्थ्यांच्या घरापासून एक किलोमिटरच्या आत शाळा आणि तीन किलो मिटरच्या आत माध्यमिक शाळा असने आवश्यक असेल जर नसल्यास वाहनाची व्यवस्था ज रावी.
11) प्रवेश घेताना कोनत्याच प्रकारचे अनुदान मिळणार नाही.
12) प्रवेशासाठी वयाचा पुरावा-1856 च्या जन्म, मृत्यु आणि विवाह नोंदजी ज ायद्या-ुसार दिल्याजाणाऱ्या प्रमाणपत्राच्या पुराव्यावरून मुलाचे वय निश्चित केले जाईल.
13) प्राथमिक शिक्षणपुर्ण केल्यावर विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र दिल्या जाईल.
14) हा कायदा जम्मु-कश्मीर वगळता सर्वत्र लागु असेल.
15) शाळेतील पायाभुत सोयी-सुविधा तीन वर्षाच्या आत सुधाराव्यात अथावा शाळेची मान्यता रद्द केली जाईल.
16) या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी येणारा आर्थिक खर्च केंद्र आणि राज्य सरकार भागीदारी उचलेल.
17) घटनेतील कलम 29 (1) व 30 (1) मधील अल्पसंख्याकाच्या मुलभूत अधिकाराने उल्लंघन होते त्यामुळे आर.एम.लोढा या सरन्यायाधीशानी अल्पसंख्यांकाच्या 25% आरक्षण बंधनकारक नसेल असा निर्णय दिला.

**1. सामाजिज आव्हाने :-**

भारतीय समाजात जातीची ओळख महत्त्वपूर्ण बनलेली आहे. कनिष्ठ वर्गातील मुलांना वरिष्ठ वर्गाच्या मुलांपासून वेगळे ठेवले जाते. कुटूंबात मिळालेल्या संस्कारामुळे सामाजिक श्रमाचा समस्या निर्माण होते. सामाजिक विषमतेचा जन्म होतो मध्यान्ह भोजन योजनेमध्ये कनिष्ठ जातीच्या महिलांनी बनविल्या मुळे वरिष्ठ वर्गातील मुले

 ISBN No. 978-93-91097-18-9

जात नाहीत. त्यामुळे हा चर्चेचा विषय बनला आहे. ग्रामीण पातळीवर हि समस्या मोठ्या प्रमाणात दिसून येते. शहरी भागात आर्थिक घटकावर आधारित हा भेदभाव आढळतो.

2. **भौजोलिज्‍ समस्या :-** भारत देश हा विविधतेने नटलेला देश आहे. भौगोलिक वातावरण वेगवेगळे असल्यामुळे शिक्षणाचा हक्क योग्यप्रकारणात मिळने दुर्लभ होते. पहाडी प्रदेशात शिक्षण संस्थाचे प्रमाण कमी आहे.
3. **योजनेची कार्यवाही :-** शिक्षणाचा अधिकार 2009 लागु झाल्यानंतर योग्यप्रमाणात ज्ृ तीशील बनला नाही. अनेक धोरणात विसंगती आढळते. स्वच्छ व पारदर्शक देखरेख व नियंत्रन आवश्यक आहे. संख्या शाळा वाढत आहेत तर सरकारी शाळामध्ये विद्यार्थी संख्या कमी होताना दिसून येते.
4. **प्रशासनाचे अपयश :-** विद्यालय प्रबंध समिती, केंद्रीय सरकार, समुचित शासन व स्थानिक अधिकारी यांनी शिक्षणाचा अधिकार कायदा-2009 मधील प्रशासकिय कर्तव्य व जबाबदाऱ्या दिल्यागेल्या आहेत त्यापूर्ण करू न शकने मोठे आव्हान आहे.
5. **शाळेपर्यंत जाण्याची सुविधेचा अभाव :-** या कायद्याने मोठ्याप्रमाणात शाळा निर्माण करण्यात आलेल्या आहेत परंतु पाहाडी-दुर्गम भागामध्ये विद्यार्थ्यांना शाळेपर्यंत जाण्याच्या विविध अडचनी आहेत.
6. **भाषेची-अध्यापनाची समस्या :-**
ज निष्ठ वर्गातील जातीच्या मुलांना भाषेची मुख्य समस्या म्हणुन पुढे आलेली आहे. आर्थीक विषमतेमुळे गरिब कुटूंबातील मुलांनी शाळा सोडण्याचे प्रमाण अधिक आहे. शासनाचे विविध प्रयत्न असफल होत आहेत.
7. **आरक्षण :-** या कायद्यामध्ये खाजगी संस्थेमध्ये आर्थीक दृष्ट्यामागास असलेल्या वर्गासाठी 25% मुलांचा प्रवेश बंधनकारक केलेला असला तरी याचा लाभ वरिष्ठ वर्गातील मुलांनाचा मिळत आहे. संस्थाचालक गैर पद्धतीने त्यांची भर्ती करत आहे.

**उपाय :-**

1. शिक्षकांच्या प्रशिक्षणाची व्यवस्था करण्यात यावी. जे शिक्षक कर्तव्याचे पालन करणार नाहीत त्यांच्यावर दंडात्मक कार्यवाही केल्या जाईल.
2. प्राथमिज्‍ शिक्षण मातृभाषेतून देण्यात यावे.
3. आरक्षणाबाबत जागृत राहने आवश्यक आहे.
4. एक समान फिसचे नियम केले जावे. संस्था ऐकत नसल्यास त्यांची मान्यता रद्द करण्यात यावी.
5. स्थानिक शासन संस्थेने आपली महत्त्वपूर्ण भुमिकापार पाडने आवश्यक आहे वंचीत घटकाच्या न्याय देण्याची जबाबदारी त्यांचीच आहे.
6. शिक्षकाकडून गैर-शैक्षणिक कार्य घेणे बंद झाल्यामुळे वंचीत-माजास विद्यार्थी संज्या कमी होत आहे. वंचीत वर्गातील विद्यार्थ्यांमध्ये जागृती निर्माण करण्याचे कार्य केले जावे.
7. 30 विद्यार्थ्यांमागे एक शिक्षकाची नियुक्ती करण्यात यावी त्यांना योग्य प्रशिक्षण देण्यात यावे एकसमान शिक्षण अभ्यासक्रम कार्यक्रम लागु करण्यात यावा.
8. शिक्षणात सर्वप्रकारच्या विषयमतेचा अंत करण्यात यावा.

9. सर्व देशात एकसमान शिक्षणाचा कार्यक्रम राबवावा.
10. देशात मोठ्या प्रमाणात शाळा स्थापन करून कनिष्ठ वर्गातील मुलांना त्यामध्ये प्रवेश द्यावा त्यासाठी विशिष्ट व्यवस्था व लक्ष ठेवण्यात यावे.

**निष्कर्ष :-**

देशाच्या विकासाची जबाबदारी प्रामुख्याने शिक्षणावर आधारीत असते. कनिष्ठ आर्थीक मागासलेल्या वर्गातील मुलांना शिक्षणापासून दूर न ठेवने यासाठी RTE 2009 हा कायदा अस्तीत्वात आला त्याची कोटेकोरपणे अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. मागास घटकातील बालकांच्या शिक्षणावर समाज व शासनाने लक्ष देणे आवश्यक आहे. भारतीय राज्यघटनेत वर्णन केलेल्या ज्ञानी समाजाचे धैय साध्य करण्यासाठी वंचीत घटकाच्या मुलांचे शिक्षण पूर्ण होणे आवश्यक आहे. देशाच्या सर्वांगिन विकासात शिक्षणाची महत्त्वाची भुमिका आहे. म्हजुन शिक्षणाचा प्रचार व प्रसार व्यापक प्रमाणात झाल्याशिवाय देशाचा विकास होत नाही.

**संदर्भ ग्रंथ सुची :-**


1. यादव सतीषकुमार :ग्रामीण भारतात चांगले शिक्षण उपलब्धी व आव्हाने, कुरूक्षेत्र पत्रिका, प्र.18-23, 2015.
2. भारताचे राजपत्र : (2010) - नवी दिल्ली भारत सरकार मानव संसाधन विकास मंत्रालय, एप्रिल-09,2010
3. झा.कमलनाथ : शिक्षण व्यवस्थेत समुदायाची भुमिका सहभागीता कुरूक्षेत्र पत्रिक अं.क्र1 प्र.स. 50-52
4. सोनाल - योजना- भारतीय जनजातीत समुहोके शैक्षणिक विकास व असमानता उत्तराखंड के जनजातीय समुहो का अध्ययन, 2014, अंकन प्र. 39-60
5. अरोश, रंजाना एंव राजरानी- शिक्षा का मौलीक अधिकार कुछ मुद्दे और कुछ चुनौतीया, भारतीय आधुनिक शिजा, नई दिल्ली एन.सी.आर.टि प्र. 05-15
6. सिंह अमितंश कुमार एवं कुमार मुनेश, परीक्षा अधिकारी अधिनियम 2009 की व्यवहारिक प्रासंगीकता एक दुर्मिळ सोशल रिसर्च अंक-2017 प्र.स.49-51
7. जाधव तुकाराम-शिक्षा भारतीय संविधान भाज-01, युनिक ॲकडमी, 2015 पृ. 23-24

# ३५. न्यायमूर्ती सरकारिया आयोगाच्या मुख्य शिफारशी

**प्रा. ढोबळे डी. बी.**

सहयोगी प्राध्यापक राज्यशास्त्र विभाग

श्री. छत्रपती शिवाजी महाविद्यालय उमरगा

**प्रस्तावना**

राज्यांची स्वायतता आवश्यक आणि उपयुक्त असली तरी भारतीय संविधानाने राष्ट्रीय एकता आणि अखंडत्त्वाला अधिक महत्त्व दिले आहे. परिणामी शक्तीशाली केंद्रसरकारची निर्मिती करताना भारतीय राज्यतंत्राचा Union of States असा उल्लेख संविधानात केला. संसदीय शासन पद्धतीमुळे पंतप्रधान व मंत्रिपरिषदेची भूमिका संघराज्यात व्यापक बनत गेली आहे. मात्र संसद, राजकीय पक्ष, गट, संघटना, भाषा, धर्म, जाती व संस्कृती यांच्या प्रति त्यांना उत्तरदायी रहावे लागते. सामाजिक संतुलन साधण्याची जबाबदारी पार पाडावी लागते. संघराज्यात सामाजिक संतुलनाची केंद्रावर असलेली जबाबदारी पार पाडण्यात न्यायसंगतता दिसत नाही. १९६२ च्या भारत- चीन युद्धातील पराभव आणि व्यापक, सामाजिक, आर्थिक, औद्योगिक असंतोष आणि नैसर्गिकसंकटांनी भारतीय राज्यव्यवस्था प्रभावित झाली. परिणामी एक पक्ष प्रधान पद्धतीकडून बहूपक्ष प्रधान पद्धतीकडे भारतीय राजकारणाची वाटचाल होत गेली. १९६७ नंतर प्रादेशिक पक्षांचा वाढलेला प्रभाव भारतीय संघराज्यात प्रादेशिकवाद आणि राज्य स्वायततेच्या मागणीला कारणीभूत ठरला. चीनकडून पराभव आणि नेहरुंच्या मृत्यूनंतर केंद्र शासनाची दूर्बलता पुढे आली.[१] प्रादेशिकवादातून धार्मिक, भाषिक, सांस्कृतिक अस्मिता जागृत झाल्या. या अस्मितांनी राज्य स्वायततेबरोबर वेगळ्या राज्याच्या मागणीसाठी अंदोलने सुरु केली. या प्रदेशातील सामान्य जनतेलाही वेगळे राज्य हाच आपल्या समस्त समस्यांवरचा उपाय आहे असे वाटू लागले. राष्ट्रीय एकता आणि अखंडत्त्वाच्या रक्षणासाठी संविधानाद्वारा निर्मित प्रबळ केंद्रसरकार असलेल्यासंघराज्यासमोरच आव्हाने निर्माण झाली. या कालखंडात राष्ट्रीय प्रश्नांपेक्षास्थानिक प्रश्नांना महत्त्व दिले जावू लागले. पंजाब, तामिळनाडू, केरळ, पं. बंगाल, आसाम मधून सुरु झालेली आंदोलनेस्थानिक प्रश्नांना महत्त्व देणारीहोती. या राज्यांमधून स्वायतते बरोबरच केंद्र-राज्य यांच्यातील संबंधाची पूनर्रचना करण्याची मागणीबळावत गेली.त्या दृष्टीकोनातून केंद्र-राज्य संबंधात सुधारणा व पूनर्रचना करण्याच्या हेतूने १९८३ सालीन्या.सरकारियाआयोगाची स्थापना करण्यात आली.

**न्या.सरकारिया आयोगाच्या मुख्य शिफारसी**

पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी केंद्र-राज्य संबंधावर विचार करण्यासाठी २४ मार्च १९८३ रोजी सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश आर. एस. सरकारिया यांच्या अध्यक्षतेखाली एक आयोग स्थापन केला. जो 'सरकारिया आयोग' या नावाने ओळखला जातो. श्री. बी. शिवरामन आणि श्री. डॉ. एस. आर. सेन यांची आयोगाच्या सदस्य पदी नेमणूक केली. या त्रिसदस्यीय आयोगावर विद्यमा-न जें द्र-राज्य संबंधाचे बदललेल्या सामाजीक, आर्थिक घडामोडींच्या अनुषंगाने आणि देशाच्या ऐक्य आणि एकात्मतेचे महत्त्व लक्षात ठेवून परीक्षण करण्याची जबाबदारी होती. अशा परीक्षणाबरोबरच केंद्र-राज्य संबंधात आवश्यक असलेल्या बदलांची शिफारस करण्याची जबाबदारीही सरकारियाआयोगावर टाकण्यात आलीहोती.पाच वर्षाच्या अथक परीश्रमानंतर

आयोगाने दोन खंडातील १६०० पानांचा आणि २४७ शिफारसी असणारा आपला अहवाल ३० जानेवारी, १९८८ ला भारत सरकारला सादर केला.[२]

**१. विधीविषयज संबंध :-**

सरकारिया आयोगाच्या कार्यपद्धती प्रमाणे आयोगाने विविध विषयांतील तज्ञांची मते जाणून घेतली. कायदेविषयी क्षेत्रातील विषम अधिकार विभागणीवरुन केंद्र-राज्यात तणाव असला तरी सरकारिया आयोगाच्या समक्ष अनेक वर्गातील लोकांनी देशाच्याएकता आणि अखंडत्त्वासाठी प्रबळ केंद्रसरकारची आवश्यकता असल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली. वर्तमान केंद्र-राज्य विधिविषयक संबंधाबाबत केंद्रशासनाकडे झालेले सत्तेचे 'अतिकेंद्रीकरण' या आधारावर टीका केली जाते. विधीविषयक संबंधाबाबत आयोगाकडे झालेल्या प्रतिक्रियांची चार भागात विभागणी करता येते[३].

ज्ेंद्र-राज्य विधीविषयक अधिकारांच्या बाबतीत सरकारिया आयोगाकडे आलेल्या सर्व निवेदनांचा विचार करुन आयोगाने विधीविषयक बाबतीत महत्त्वाच्या शिफारसीकेल्या, ज्यात-

१. कलम २४६ आणि २५४ संबंधी आयोगाकडे आलेल्या प्रश्नांसंबंधी फक्त दोन राज्यांनी कलम २४६ ची पूनर्रचना करुन राज्याच्या विधीविषयक अधिकारांवर केंद्रीय वर्चस्व निर्माण करणारे शब्द काढून टाकावेत अशी मागणी केली होती. अन्य तीन राज्य सरकारांनी कलम २५४ मध्ये दुरुस्ती किंवा ते काढून टाकावे अशी मागणी केली. सरकारिया आयोगाने या संदर्भात केंद्रीय सर्वोच्चता मान्य केली. कलम २४६ व २५४ काढून टाकण्याचे परिणाम घातक असतील, ज्यामुळेआमच्या राजकीय व्यवस्थेत परस्पर संघर्ष, कायदेविषयक अव्यवस्था आणि केंद्र व राज्यातील परस्पर विरुद्ध कायद्याच्या निर्मितीमुळे निर्माण होणाऱ्या अडचणी संघराज्यासाठी उचित असणार नाहीत.

२. कलम २४८ च्या संदर्भात आयोगाकडे आलेल्या निवेदनात उर्वरित अधिकारांच्या बाबतीत विद्यमान असणाऱ्या तरतुदींमध्ये बहुतांश राज्यांना परिवर्तनाची गरज वाटत नाही. मात्र चार राज्यांनी अशीसूचना केली की, उर्वरित अधिकार केंद्रा ऐवजी राज्यांना दिलेजावेत आणि दोन राज्यांचा प्रस्ताव असा होता की, केंद्रसुचीतील ९७ विषय समवर्ती सूचीमध्येहस्तांतरीत करावेत. या संदर्भात सरकारिया आयोगाचे मत असे की, कर आकारणीच्या बाबतीतील विषय केंद्राकडे असावेत मात्रत्यापेक्षा भिन्न असणारे उर्वरीत विषय समवर्ती सूचीत टाकले जावेत, त्यासाठी संविधानात योग्य ती घटना दुरुस्ती करण्याची आयोगाची शिफारस आहे.

३. समवर्ती सूचीतील विषयांची संख्या सध्या ५२ एवढी आहे. काही राज्यसरकारांनी सरकारिया आयोगाकडे अशी मागणी केली की, समवर्ती सूचीतील सर्व विषय राज्यसूचीत टाकावेत. आयोगाच्या मते समवर्ती सूचीतील ज्या बाबींसंबंधी देश हिताच्या दृष्टीने ध्येयधोरणे व कृती या दोन्ही दृष्टींनीसंपूर्ण देशभर सारखेपणा असणे आवश्यक असते, तेवढ्याच फक्त केंद्रसरकारने स्वत:कडे घ्याव्यात बाकीच्या सर्व बाबतीत केंद्रसरकारने घालून दिलेल्या स्थुल चौकटी सांभाळून तपशिल ठरविण्याची मुभा घटक राज्यांना दिली जावी. समवर्ती सूचीतील अधिकार विषयावर कायदा करताना केंद्रसरकारने वेगवेगळ्या घटकराज्यांशी स्वतंत्रपणे तर चर्चा करावी पण सामुहीकपणे आंतरराज्यीय परिषदेतही विचार विनिमय केला जावा, अशी शिफारस आयोगाने केली. अर्थात समवर्ती सूची वगळण्याची आयोगाला आवश्यकता वाटत नाही.

४.एका विशिष्ट परिस्थितीत राज्यसूचीतील विषयांवर संसदेला कायदा करायचा अधिकार देणारेकलम२४९ संविधानातून वगळले जावे अशी मागणी चार राज्यसरकारांनी सरकारिया आयोगाकडे केली. मात्र सरकारिया आयोगाने आपल्या अहवालात नमुद केले की, कलम २४९

संविधानातून वगळण्याची किंवा त्यात दुरुस्ती करण्याविषयी दिलेल्यातर्कांवरगंभीर विचार केला आहे. अधिकारांचा दुरुपयोग होण्याची शंका या तर्कांमध्ये व्यक्त केली होती, मात्र आयोगाला त्या विषयी अनुभवाश्रीत आधार मिळत नाही.[४] कलम २४९ चा वापर पहिल्यांदा १९५० मध्ये काळ्या बाजाराच्या प्रभावी नियंत्रणासाठी केला होता. त्यानंतर आयोगाच्या मते या कलमाचा फारसा वापर झाला नाही. अर्थात आयोगाने कलम २४९ वगळण्याला विरोध केला आहे.

विधीविषयक संबंधाबाबतच्या तक्रारींचा विचारकरुन आयोगाने केलेल्या शिफारसींवरुन असे दिसते की, आयोगाला संविधानाद्वारा निर्मित 'संघीय सर्वोच्चता' हा संविधानाचा मुख्य आधार स्तंभ बदलने उचित आणि आवश्यक वाटत नाही. अर्थात आयोगाला केंद्र-राज्य तणावासाठी वैधानिक घटकांपेक्षा कार्यात्मक घटक जबाबदार वाटतात.

**२. प्रशासकीय संबंध :-**

भारतातील केंद्र व राज्य यांच्यातील प्रशासकीय संबंध निर्धारित करणारी कलमे २५६, २५७, आणि ३६५महत्त्वाची आहेत. या कलमांच्या वापरांवरुन केंद्र-राज्य यांच्यात वाद होत गेले. त्यामुळे अनेक राज्यांनीसरकारियाआयोगाकडे दिलेल्या निवेदनात या कलमातील तरतुदीबाबत तक्रारी केल्या. संवैधानिक तरतुदीनुसार घटकराज्यांनी आपली कार्यकारी सत्ता चालवताना केंद्राच्या कायद्यांना अनुसरुन चालवावी, केंद्राच्या कार्यकारीसत्तेला बाधा येणार नाही याची खबरदारी घ्यावी, केंद्राकडून दिल्या जाणाऱ्या सुचना व निर्देशांची पालन करणे बंधनकारक आहे. त्यामुळे काही राज्यांची अशी मागणीहोती की, कलम २५६ आणि २५७ नुसार जर केंद्राकडून राज्यांना काहीसुचना व निर्देश दिले जात असतील त्यावर आंतरराज्यीय परिषदेत विचार विनिमय आणि सहमतीनंतरच दिले जावेत. पूढे संविधानात अशीतरतूद आहे की, जर राज्यांनी कलम २५६ व २५७ नुसार केंद्राने दिलेल्या निर्देशांचेपालन केले नाहीतर येथील राज्य कारभार घटनेनुसार चालत नाही या कारणास्तव राष्ट्रपतीने कलम ३६५ अंतर्गत केलेली कार्यवाही कायदेशीरठरेल. परिणामी काही राज्यांनी कलम ३६५ संविधानातून वगळण्याची मागणी आयोगाकडे केली.

सरकारिया आयोगाने आपल्या अहवालात कलम २५६, २५७ आणि ३६५ हे उचित असून संघराज्यातील कायदे आणि राष्ट्रीय नीतींच्या प्रभावी कार्यासाठी केंद्र व राज्यात समन्वय प्रस्थापित करण्यासाठी संविधानात त्यांचा समावेश कला आहे, असे आयोगाला वाटते. कलम २५६ व २५७ अंतर्गत दिलेले निर्देश आणि त्यांच्या नुसार आचरण न करण्याबद्दल कलम ३६५ चा करावा लागणारा वापर आयोगाच्या मते अंतिम उपाय म्हणून केला जावा. आयोगाच्या मतेसंघराज्यवाद हीस्थायीसंस्थात्मकसंकल्पनेपेक्षासहकार्याधिष्ठित कार्यात्मक व्यवस्था अधिक आहे आणि कलम २५८ चा निष्पक्ष वापर झाल्यास सहकारी संघवादाची निर्मिती होवू शकतो.[५] अर्थात संविधानाचा संघराज्यांतर्गत सुसंवादाचा हेतू आयोगाने मान्य केला. पण आयोगाला असे वाटते की, कलम ३६५ अनुसार कारवाई करण्यापुर्वी कमालीची काळजी घ्यावी आणि उपलब्ध असलेल्या सर्व पर्यायांची पडताळणी केली पाहिजे.

**३. आर्थिक संबंध :-**

केंद्र-राज्य यांच्यातील तणावाचा प्रमुख घटक म्हणून त्यांच्यातील आर्थिक संबंधाकडे बघितले जाते. भारतीय संविधाने संघीय सर्वोच्चतेचा सिद्धांत मान्य केल्यामुळे केंद्र-राज्य यांच्यातील वित्तीय संसाधनांचे वितरण करताना केंद्राला अधिक झुकतेमाप दिल्याचे आढळते. परिणामी मागील प्रकरणात उल्लेख केल्या प्रमाणे राज्यांना आपल्या जबाबदाऱ्या आणि उत्तरदायित्त्वाच्या पूर्तीसाठी वित्तीय संसाधनांचीतुट जाणवते. सरकारियाआयोगाकडे विभिन्न राज्यांमधून ज्या तक्रारी आल्या

त्यामध्ये वित्तीय संसाधनांच्या विषम वितरणाबाबत तक्रारीहोत्या. राज्य सरकारांनी काही संसाधनांना विभागणीच्या कक्षेबाहेर ठेवण्याऱ्या केंद्रसरकारच्या धोरणाचा विरोध जे ला, ज्यांची राज्यांमध्ये वाटणी आवश्यकहोती. राज्यांनी अशीहीतक्रार केली की, आयकर अधिभार दीर्घ काळ सुरु राहिल्याने राज्य अधिक महसूला पासून वंचित राहिले, जो राज्यांमध्ये भागीदारी योग्य असतो. अनेक राज्यांनी केंद्राकडून उत्पादन शुल्क वाढविण्याऐवजी, जे त्यांच्याशी भागीदारी योग्य असतात अशा पेट्रोल, कोळसा या सारख्या वस्तुंच्या निर्देशित मूल्यांमध्ये वृद्धीची तक्रार केली आहे. जवळपास सर्वच राज्यांनी अशीतक्रार केली की, वित्त आयोगाची सतत बदलती नियमावली संवैधानिक तरतुदी पेक्षाही महत्त्वाची ठरु लागली, शिवाय वित्त आयोगाच्या शिफारसीपूर्ण पणे कार्यान्वित केल्या जात नाहीत. त्यामुळे केंद्र-राज्य वित्तीय संबंधात तणाव निर्माण होतो अशी अनेक राज्यांनी प्रतिक्रिया दिली.[६] जें द्र-राज्य आर्थिक संबंध मधूर असावेत यासाठी प्रशासकीयसुधारणा आयोग आणि राजमन्नार समितीने ज ाही शिफारसी जे ल्या. मात्र जें द्र-शासनाची आर्थिक निती फारशी बदलली नाही. परिणामी सरकारिया आयोगाकडे वित्तीय तक्रारी मोठ्या प्रमाणात आल्या. आयोगाने केंद्र राज्य आर्थिक संबंधाच्या दृष्टीने वित्त आयोग, नियोजन आयोग, राष्ट्रीय विकास परिषद आणि वित्तीय संसाधनाच्या वितरणासंबंधी महत्त्वाच्या शिफारशीकेल्या.

सरकारिया आयोगाने वित्त आयोगासंबंधी शिफारसी करताना असे म्हटले की, वित्त आयोगाचे गठन निश्चित काळासाठी केले जात असल्यानेतो मर्यादित काळात काम करतो. नियोजन एक गतिशिल प्रक्रिया असल्याने त्यात निरंतर मूल्यांकन आणि समायोजनांची आवश्यकता असते. योजना आयोग दरवर्षी राज्यांमधीलसंसाधने व योजनांच्या आवश्यकतेचीसमीक्षाकरतो. त्यामुळे राज्यांमधील योजना संबंधीची माहिती दरवर्षी प्राप्त होते. अशा स्थितीत योजना आयोगाची भूमिका महत्त्वाची ठरते. वित्त आयोगालाही भूमिका शक्य होणार नाही. म्हणून योजनांसंबंधी कार्य वित्त आयोगाकडे सोपविणे सरकारिया आयोगाला कठीण वाटते. सरकारिया आयोगाने अशी शिफारस केली की, योजना आयोगामध्ये प्रस्तावित वित्त आयोगच्या शाखांनी राज्यांच्या वित्तीय व्यवस्थेवर नियंत्रण ठेवायला हवे. या शाखांनी वित्त आयोगाच्या मापदंडातील परिवर्तनाचे वार्षिक अनुमान लावले पाहिजेत. त्यानंतर योजना आयोग वित्त आयोगाच्या पुर्वानुमानातील परिवर्तन, त्याची कारणे व अन्य घटकांची वार्षीक समीक्षा राष्ट्रीय विकास परिषदेसमोरसादर करेल. आयोगाने आपल्या शाखा मजबुत करण्यावर भर द्यावा, ज्यामुळे वित्त आयोग आणि योजना आयोगात समन्वय साधता येईल. सरकारिया आयोगाच्या मते वित्त आयोगाला आपले कार्य करण्यासाठी संपूर्ण देशातून विशेषज्ञांची नियुक्ती करणे आवश्यक आहे. वित्त आयोगाच्या सचिवालयातील कर्मचारी नियुक्त करण्यासाठी राज्यांमधून विशेष तज्ञांची निवड केल्यास अधिक लाभदायक ठरेल.[७]

सरकारिया आयोगाने योजना आयोगा बदलच्या तक्रारींवर विचार करुन आपल्या अहवालात अनेक शिफारसी केल्या. योजना आयोगाला स्वायत्त संघटना म्हणून निर्माण करण्यासाठी सरकारिया आयोगाचा विरोध आहे. कारण आयोगाच्या मते अशा स्वायत संघटनेचे कामकाज विधीविषयक समस्यांनी ग्रस्त राहिल. योजना आयोग केंद्रसरकारच्या नियंत्रणाबाहेर नसावा अशीही शिफारस केली. राज्यांच्या तक्रारी लक्षात घेता सरकारिया आयोगाने अशी शिफारस केली की, योजना आयोगाला स्वायत स्वरुप देण्याऐवजी आयोगाच्या कामकाजात सुधारणा केली जावी.

राष्ट्रीय विकासपरिषदेच्या बाबत सरकारीया आयोगाने अशी शिफारस केली की, राष्ट्रीय विकास परिषदेला अधिक प्रभावशाली बनविण्याची गरज आहे. ज्यामुळे केंद्र व राज्य सरकार यांच्यातील सर्वोच्च राजकीय संस्था म्हणून राष्ट्रीय विकास परिषद निर्माण होईल. राष्ट्रीय विकास

परिषदेचेनाव बलदून 'राष्ट्रीय आर्थिक आणि विकास परिषद' करण्याची शिफारस सरकारिया आयोगाने केली. या परिषदेशी विचार विनिमय करुन केंद्र शासनाने सर्व राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका नियमित करुन त्यात एकरुपता आणली, त्यासाठी घटना दुरुस्ती करण्याची शिफारस सरकारिया आयोगाने केली.

**राज्यपाल पदासंबंधी :-**

राज्यपाल पदाविषयीची संवैधनिक तरतुदी आणि व्यवहारिकभूमिका लक्षात घेता सरकारिया आयोगाने आपल्या अहवालात असे म्हटले की, स्वातंत्र्य प्राप्तीनंतर १९८४ पर्यंत राज्यपालांच्या नियुक्त्यांवरुन असे दिसते की, राज्यपालांच्या एकूण संख्येच्या ६० टक्केपेक्षा अधिकजन सक्रिय राजकारणात भाग घेतलेलेहोते, अन्य व्यवसायातून राज्यपालपदी नियुक्त झ ालेल्यांची संख्या ५० टक्के पेक्षा अधिक नाही.[८] सरकारिया आयोगाने अपल्या अहवालात म्हटले की केंद्रातील सत्तारुढ पक्षा पेक्षा भिन्न राजकीय पक्षाचे सरकार असणाऱ्या राज्यामध्ये केंद्रातील सत्तारुढ पक्षाच्या नेत्यांना तिथे राज्यपाल म्हणून नियुक्त केले जावू नये. निवृत्तीनंतर राज्यपालांना कोणतेही लाभाचे पद दिले जावू नये, ते राष्ट्रपती व उपराष्ट्रपतीच्या निवडणूकीत भाग घेवू शकतात, मात्र पक्षीय राजकारणातत्यांनी सक्रिय होवू नये असे आयोगाचे मत आहे. सरकारिया आयोगाच्या मते कलम १५५ मध्ये दुरुस्तीकरुन राष्ट्रपतीकडून राज्यपालाची नियुक्ती करताना संबंधित घटकराज्यांच्या मुख्यमंत्र्याशी विचारविनिमय करण्याची व्यवस्था करावी, ही नियुक्ती करतानाती व्यक्ती सत्ताधारी पक्षाचा नेता नसेलहे बघावे, शिवाय ती व्यक्ती संबंधित घटकराज्याची रहिवाशी असू नये असेआयोगाला वाटते. राज्यपालपदी नियुक्त होणारी एखाद्या क्षेत्रातील नामांकित व्यक्ती असावी, ती राज्यराजकारणा पासून तटस्थ असावी अशी आयोगाने शिफारस केली. राज्यपाल जेंद्र-राज्य संबंधातील महत्त्वाची कडी असल्यामुळे आयोगाने या पदावरील व्यक्तींकडून राष्ट्रीय एकता, अखंडत्व आणि जनकल्याणाच्या प्रति, समर्पित असणाऱ्या नामवंत व्यक्तिच्या नियुक्तीला आयोगाने प्राथमिकता दिली आहे. उपर्युक्त शिफारसीबरोबर आयोगाने राज्यपालांच्या एका राज्यातून दुसऱ्या राज्यात स्थानांतराला व मुदतपूर्व बडतर्फीला विरोध केला आहे.

**४. राष्ट्रपती शासन लागू करण्यासंबंधी :-**

भारतीय संविधानातील कलम ३५६ (१) नुसार जर एखाद्या राज्याचे शासन संविधानानुसार चालविणे शक्य नाही अशी परिस्थिती उद्‌भवली आहे, असा अहवाल राज्यपालाकडून मिळाल्यास किंवा तशी राष्ट्रपतीची खात्री झाल्यास तिथे राष्ट्रपती शासन लागू केले जाते. राज्यपालाच्या अहवालाच्या आधारावर राष्ट्रपती राजवटीचा निर्णय घेतला जातो. राज्यपाल सामान्यतः आपल्या राज्यांच्या राजकीय पक्षांशी व्यवहार करताना आपले राजकीय पुर्वग्रह व धोरणांपासून मुक्तराहत नसल्यामुळे परिणामी राज्यपालांचे निर्णय निष्पक्ष पद्धतीने घेतले गेले नाही. केंद्राचे एजंट म्हणूनत्यांचा उल्लेख केला गेला. संविधानोत्तर राज्यपालांची भूमिका, मुख्यमंत्री नियुक्ती, बहुमताचे परिक्षण, मंख्यमंत्र्यांची बरखास्ती, विधानसभा भंग करणे, राष्ट्रपती राजवटीची शिफारस करणे, विधेयक राष्ट्रपतीच्या विचारार्थ पाठविणे इत्यादीसंदर्भात महत्त्वाची राहिली आहे. राज्यांना अनेक दृष्टीने केंद्रावर अवलंबून रहावे लागते. राज्यांना उत्पन्नाचे पर्याप्त स्त्रोत नाहीत आणि अधिकांश घटनांमध्ये केंद्रीय मदतीची आणि मार्गदर्शनाची त्यांना आवश्यकता असते. आयोगाच्या मते राष्ट्रपती राजवट हा अंतिम पर्याय असावा. राष्ट्रपती राजवटीचा प्रयोग कमी प्रमाणात व्हावा. राज्यातील व्यवस्था संविधानानुसार चालविणे अशक्य झाल्यास केंद्राचा हस्तक्षेप राज्यात व्हावा. आयोगाच्या मते राष्ट्रपती राजवटीचा प्रयोग करण्याआधी संबंधित राज्याला सूचना देवून स्पष्टीकरण मागितले पाहिजे आणि

निर्णय घेताना या स्पष्टीकरणावर विचार व्हावा. विदेशी आक्रमण किंवा अंतर्गत अशांततेमुळे संवैधानिज व्यवस्था भंज झाली आहे असे केंद्राला वाटत असेलतर अशा परिस्थितीतही समस्या निराकरणासाठी अन्य पर्यायांचा गांभीर्याने विचार केला पाहिजे. जर राजकीय कारणांमुळे असंवैधानिकता निर्माण झाली असेलतर राज्यपालांनी विधानसभेत बहुमताचे सरकार स्थापन होते काय हे पाहायला हवे. जर राज्यसरकारची निती संबंधीच्या प्रश्नावर हारझाली असेल आणि त्वरीत निवडणूका घ्यायच्या असतीलतर विद्यमान सरकारला काळजीवाहू मंत्रिमंडळ म्हणून काम करु दिले पाहिजे. त्यापुढे आयोगाने असे म्हटले की, राष्ट्रपती राजवटी संबंधिचा आदेशदोन महिण्याच्या आत संसदेसमोर ठेवला पाहिजे. संसदेच्या मान्यतेनेच विधानसभा भंग केली जावी. त्यासाठी कलम ३५६ मध्ये दुरुस्तीची आवश्यकता आयोगाला वाटते. कलम३५२ प्रमाणे राष्ट्रीय आणिबाणीच्या घोषणेसाठी लोकसभेचे विशेष अधिवेशन बोलावण्याची तरतुद आहे, तशीच व्यवस्था कलम ३५६ च्या निती संबंधीच्या प्रयोगासाठी असावी. राज्यपालांकडून राष्ट्रपतीला पाठविलेल्या अहवालावर संसदेत चर्चा व्हावी की, राष्ट्रपतीने कोणत्या कारणाने निर्णय घेतला आहे. त्यामुळे कार्यकारी मंडळावर संसदेचे नियंत्रण येईल, शिवाय राज्यपालाने पाठविलेला अहवाल वर्तमान पत्रांतून प्रसारित केला जावा अशी आयोगाची धारणा आहे.

**आयोगाच्या इतर शिफारसी:-**

संघराज्य व्यवस्थेची निर्मिती करुनही संविधानातील अधिज ार विभागणी विषम स्वरुपाची आहे, त्यामुळे केंद्र प्रभावी तर राज्य दुय्यम बनतात. या संबंधी आयोगाकडे आलेल्या निवेदनांबाबत आयोगाने संविधानातील प्रबळ केंद्रशासनाची निर्मिती अनिवार्य असल्याची भूमिका घेत केंद्रसरकारचे अधिकार कमी करण्याचा राज्यांचा प्रस्ताव नाकारला. आयोगाने आपल्या अहवालात असे म्हटले की, संविधानाच्या मुळ स्वरुपात बदल करणे उचित आणि आवश्यक नाही. आनंदपूर साहिब प्रस्तावावर कोणतीही चर्चा न करता आयोगाने केंद्राच्या अधिकारांवर अंकूश निर्माण करणे उचित नसल्याचे म्हंटले.

सरकारिया आयोगाच्या मते समवर्ती सूचीतील जे विषय राष्ट्रहिताच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत त्यासंबंधी कायदे करण्यापूर्वी घटकराज्यांची मते जाणून घ्यावीत तसेच आंतरराज्यीय परिषदेशी विचार विनिमय करुन अशा कायद्यांच्या अंमलबजावणीसाठी केंद्र व राज्यात परस्परसहकार्य निर्माण ज रावे.

आयोगाच्या मते राज्यांना कर्ज देण्याच्या पद्धतीचा पुर्नविचार केला जावा, कर्ज उभारणीसाठी राज्यांना केंद्राच्या परवानगीची गरज नसावी, राष्ट्रीय कर्जआयोग स्थापन करावा इत्यादी मागण्या अनुचित आहेत. मात्र केंद्रसरकारकडून राज्यांना दिले जाणारे वित्तीय सहाय्य (अनुदान, कर्ज) या संबंधिच्या प्रचलित पद्धतीतसुधारणा करावी असे आयोगाला वाटते. केंद्राद्वारा प्रायोजीत योजनांची संख्या कमी असावी, विशेषत: योजनांच्या कालावधी मध्ये नवीन परियोजना सुरु करु नयेत असे आयोगाने म्हटले आहे. शिवाय नैसर्गिक आपत्तीच्या काळात केंद्रसरकार राज्यांना आपत्ती अनुदान देते. त्यासंबंधी अनुदान पद्धतीचे परिक्षण करुन निश्चित असे नियम, संकेत ठरविण्यात यावेत की जेणे करुन राज्ये आपत्ती अनुदानाचा गैरवापर करणार नाहीत, अशी शिफारस आयोगाने केली. केंद्र व राज्यांकडून होणारी अनाठायी व आयोग्य उधळपट्टी रोखण्यासाठीराष्ट्रीय खर्च आयोग स्थापन करावा ही मागणी देखिल आयोगाने फेटाळून लावली. वित्त आयोग, सार्वजनिक हिशोब समिती, अंदाज समिती, सार्वजनिक उपक्रम समिती यांचे कार्य अधिक जबाबदारीने व दक्षतेने व्हावे असे आयोजाचे मत आहे. राज्यपातळीवर राज्य वित्त आयोगाची स्थापना करावी अशीही शिफारस केली.[९]

ज्ें द्र-राज्य संबंधातील भाषा विवाद हा तणाव निर्माण करणारा प्रमुख घटकआहे. भारतात हिंन्दी भाषिक आणि गैर हिन्दी भाषिकांच्या वादा बरोबरच भाषिक अस्मितेच्या समस्येमुळेसंघराज्यात राष्ट्रीय एकात्मतेचा प्रश्न निर्माण झाला. या भाषा विवादाच्या संदर्भात आयोगाने असे म्हटले की, संसदीय राजभाषा समिती, राजभाषा विभाग आणि केंद्रीय निदेशालयातून हिन्दी शब्द काढूनत्या ऐवजी राजभाषा किंवा अनुसूचित भाषा असे शब्द वापरावेत. भाषेच्या राजकीयकरणामुळे देशाच्या ऐक्य आणि अखंडत्त्वासमोर निर्माण झालेली समस्या सोडविज्यासाठी त्रिभाषा सुत्राचा अवलंब सर्व राज्यांत प्रभावी करावा. भाषिक अल्पसंख्यांकाच्या हितसंवर्धनासाठीची आचारसंहिता पूर्णतः लागू केली जावी, संसदेत सदस्यांना आपल्या मातृभाषेतून बोलण्याची संधी द्यावी, यासाठी विशिष्ट अटी किंवा नियम नसावेत असे अयोगाचे मत आहे.

सरकारिया आयोगाने अतिशय काळजीपूर्वक केंद्र-राज्य संबंधामध्ये समन्वयासाठी उपर्युक्त महत्त्वाच्या शिफारसीकेल्या आहेत. संविधानाद्वारा निर्मित संघराज्य व्यवस्था, केंद्र-राज्य यांच्यातील कार्यात्मक विवाद आणि राज्यांच्या केंद्रसरकार बद्दलच्या तक्रारी यातीन आधारावर आयोगाने केंद्र-राज्य समन्वयाच्या दृष्टीने शिफारसी केल्या. आयोगाच्या मते संविधानाद्वारा निर्मित व्यवस्था संघराज्यासाठी आधारभूत, संतुलीत आणि प्रभावी आहे, संकट काळातहीत्यामुळेचसंघराज्य कसोटीला खरे उतरले आहे.[१०] आयोगाला संविधानात मुलभूत परिवर्तनाची आवश्यकता वाटत नाही. आयोगाने असा दृढ विश्वास व्यक्त केला की जर त्यांचा अहवाल स्वीकारला तर भारतीय राज्यतंत्रातील दोन्ही शासनांमध्ये परस्पर सहयोग व समन्वय वाढेल आणि एका वास्तविक सहकारी संघराज्याचा विकास होईल.

**आयोगाच्या शिफारसीचे मुल्यमापण:-**

सरकारिया आयोगाच्या अहवालाच्या संदर्भात अशी टीका केली जाते की अहवालात संघात्मक एकात्मतेच्या दृष्टीने केंद्र-राज्य संबंधाचा विचार केला गेला नाही. आयोगाने राज्यांना शिक्षण, श्रम, विज यासारखे कोणतेही नवीन विषय हस्तांतरीत करण्यासाठी विरोध केला आहे. त्यामुळे असे दिसते की, आयोगाने मजबूत आणि निरंकूश केंद्र शासनाच्या सार्वभौतत्वाला मान्यता दिली आहे. केंद्र शासनाच्या अधिकार व सत्तेत कोणतीही कपात आयोगाला मान्य नाही. उलट राज्यांची निर्मीती, जुन्या राज्यांचे पूनर्गठन, राज्यांची स्वायतत्तेची मागणी अशा केंद्र-राज्य संबंधांना प्रभावित करणाऱ्या घटकांविषयी आयोगाने फारसा विचार केलेला दिसत नाही. सरकारिया आयोगाच्या मते कलम ३५६ चा दुरुपयोग थांबविण्यासाठी संविधानात दुरुस्ती करुन काही उपयोग होणार नाही, तरत्यासाठी एक स्वस्थ परंपरेचा विकास होणे आवश्यक आहे. भोपाळ येथील पत्रकार परिषदेत न्यायमुर्ती सरकारिया यांनी म्हटले की, भारतीय जनता पार्टीची राज्य सरकारे कलम ३५६ नुसार बरखास्त केली गेली त्यास कोणताही भक्कम आधार नव्हता. १९७७ मध्ये जनता पक्षाच्या काळात ज्या हेतूने कलम३५६ चा दुरुपयोग झाला, १९७७ च्या घटनांशी समकक्ष माणून जबलपूर उच्च न्यायालयातील न्यायाधिशांनी असे म्हटले की, विधिमंडळाच्या कार्यक्षेत्रात न्यायालय हस्तक्षेप करणार नाही. यावर सरकरीया आयोगाने दृष्टीक्षेप टाकून प्रत्येक समस्येच्या समाधानासाठी घटना दुरुस्ती हाच पर्याय ठरु शकत नाही. त्यासाठी राजकीय आणि पक्षीय पातळीवर सुदृढ परंपरांचा विज ास आयोगाला आवश्यक वाटतो. त्यासाठी आयोगाने आंतरराज्यीय परिषदेची स्थापना करुन या परिषदेत कलम ३५६ च्या प्रयोगावर विचार केला जावा. आयोगाने १९८० मधील मध्यप्रदेश, हिमाचल प्रदेश, राज्यस्थान येथील भाजप सरकारे बरखास्त करणे कलम ३५६ चा दुरुपयोग असल्याचे म्हटलेत्यासाठी आयोगाने न्यायपालिका, कार्यकारी मंडळ व कायदेमंडळ यांच्यात परस्पर संवादाची गरज आहे. असे

म्हटले.[११] मात्र त्यासाठी घटनात्मक बदलाला आयोगाची मान्यता नाही. सरकारिया आयोगाने आपल्या अहवालात केवळ मध्यम मार्गाचा अवलंब केल्याचे आढळते. राज्यपालाचे पद, राज्यांची स्वायत्तता, अखिल भारतीय सेवा, वित्तीय संसाधनांचे वितरण इ. केंद्र- राज्य संबंधाला प्रभावित करणाऱ्या घटकांविषयी आयोगाची भूमिका स्थायित्वाची आहे. याबाबतीत आयोगाने प्रबळ केंद्रसरकारची संविधानाद्वारा केलेली निर्मिती संघराज्यासाठी योग्य मानली. त्यामुळे सरकारिया आयोगाच्या अहवालामुळे केंद्र-राज्य संबंधात पूनर्रचनेची शक्यता दिसत नाही. परिणामी पुढच्या काळातही राज्यांच्या तक्रारी फारशा थांबल्या नाहीत. आयोगाने वर्तमान संघराज्याची संवैधानिक संरचना अबाधित ठेवून केंद्र-राज्य समन्वय निर्माण करणाऱ्या घटकांवर भर द्यावा हीभूमिका घेतली. अर्थात संविधान निर्मात्यांचा दृष्टीकोन आयोगाने प्रमाण मानला. सरकारिया आयोगाने राज्यांच्या तक्रारींचे फारसे समाधान केले नसले तरी आयोगाचा अहवाल भारतीय संघराज्याच्या ऐक्य आणि अखंडत्त्वासाठी महत्त्वाचा आहे,हे नाकारता येत नाही. त्यासाठीच आयोगाने राज्य स्वायततेची मागणी मा-य ज़ेली नाही. सहयोगी संघवादाच्या दृष्टीकोनातून आयोगाने योजना आयोग, वित्त आयोग, आंतरराज्यीय परिषद या बाबतीत सुधारणेसाठी सुचना केल्या, राज्यांच्या तक्रारीला वाव मिळणार नाही, यासाठी केंद्र शासनाची भूमिका निस्पृह असावी अशी भूमिका आयोगाने घेतली. आयोगाच्या शिफारसींवर टीका केली जात असली तरी आयोगाने दिलेल्या अहवालाची अंमलबजावणी केली गेली तर सहयोगी संघवादाची निर्मिती निश्चित होईल असे दिसते.

**संदर्भ सुची.**


१. वर्मा एस. एल, शर्मा ब्रिजमोहन, भारतमें संवैधानिक आपातकाल, रावत पब्लिकेशन जयपुर, २००१, पृष्ठ क्र. १६३.

२. Center - State Relation Report Part १ (१९८८) P.No. १२४

३. डॉ. मल पुरन, केंद्र राज्य संबंध, अविष्कार पब्लिशर्स, डिस्ट्रीब्यूटर्स, जयपुर २००७, पृष्ठ क्र.३७.

४. Center - State Relation Report Part १ (१९८८) पृष्ठ क्र. ६० - ४

५. कित्ता, पृष्ठ क्र. १०१ -५

६. डॉ. मल पुरन, केंद्र राज्य संबंध, अविष्कार पब्लिशर्स, डिस्ट्रीब्यूटर्स, जयपुर २००७, पृष्ठ क्र. ६६.

७. दि हिन्दु, २९ अगस्त १९७१.

८. Center - State Relation Report Part १ (१९८८) P.No. १२४.

९. Center - State Relation Report Part १ (१९८८), पृष्ठ क्र. २११.

१०. Center - State Relation Report Part १ (१९८८), पृष्ठ क्र. ३१५.

११. कित्ता, पृष्ठ क्र. ५४३.

# ३६. माहिती अधिकार कायदा २००५ : मधील संशोधन

**प्रा.डॉ.आंधळे बी.व्ही.**
राज्यशास्त्र विभाग
कै.रमेश वरपूडकर महाविद्यालय, सोनपेठ जि.परभणी.
मो.9423472755 ,bvandhale@gmail.com

**प्रस्तावना :-**

भारतात माहिती अधिकार कायदा लागू होऊन आज पंधरा वर्ष होत आहेत. हाच कायदा जगात सर्वप्रथम स्वीडन या देशान १७६६ मध्ये लागू केला ; त्यानंतर १९७८ मध्ये फ्रान्सने, १९८२ मध्ये कॅनडाने आणि १२ ऑक्टोबर २००५ रोजी भारताने हा कायदा लागू केला. स्वीडनमध्ये माहिती अधिकाराची माहिती नि: शुल्क व तात्काळ मिळते. तर भारतात RTI अंतर्गत निवेदन दिल्यावर एक महिना म्हणजेच ३० दिवसांचा कालावधी लागतो. पण हीच माहिती स्वातंत्र्य व जीवन मरणाची संबंधित असेल तर ४८ तासाच्या आत माहिती देणे बंधनकारक आहे. राष्ट्रीय सुरक्षा, सार्वभौमत्व,संसदेचे विशेष अधिकार, गोपनीयते संबंधीचे असे मुद्दे की, जे गुन्हेगारीशी संबंधित असतील ज्याचा परिणाम त्याच्या तपासावर होऊ शकतो असे काही अपवाद सोडता सरकारच्या अंतर्गत येणाऱ्या सर्व सार्वजनिक प्राधिकरणाची माहिती सर्वसामान्य जनतेला देणे हे माहिती अधिकार कायद्यात बंधनकारक आहे.

१३ नोव्हेंबर २०१९ रोजी दिलेल्या सर्वोच्च न्यायालयाच्या एका निर्णयानुसार ' न्यायालय व सरन्यायाधीशांचे ' हे सुद्धा माहिती अधिकाराच्या अखत्यारीत येणार आहे. याबाबत निर्णय देताना सर न्यायाधीश रंजन गोगोई यांच्या अध्यक्षतेखालील स्थापन झालेल्या एन.व्ही.रमन्ना, डी.वाय. चंद्रचूड, दीपक गुप्ता व संजीव खन्ना या पाच सदस्य घटनापीठाने निर्णय देताना माहिती अधिकार कायदा हा सर्वोच्च न्यायालयाला सुद्धा लागू असेल असा निर्णय दिला. यावरून एकच म्हणता येते की, माहिती अधिकार कायदा २००५ अधिक व्यापक व सर्वसामान्य नागरिकांच्या हिताचा झाला आहे. स्वतंत्र भारताच्या इतिहासात आज पर्यंत सर्वात यशस्वी कायदा म्हणून या कायद्याचा उल्लेख मान्यवरांकडून करण्यात येतो. परंतु पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारने अलीकडील काळात माहिती अधिकार कायदा २००५ मध्ये काही बदल केले आहेत. या बदलामुळे माहिती अधिकार कायदा २००५ याच्या एकूण अंमलबजावणीबाबत व त्याच्या सर्वव्यापी विचारा बाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. म्हणून प्रस्तुत शोधनिबंधामध्ये माहिती अधिकार कायदा २००५ मधील या बदलाविषयी अभ्यास करून मत मांडले जाणार आहे.

**माहिती अधिकार कायदा निर्मितीचा उद्देश :-**

माहिती अधिकार कायदा २००५ निर्मितीचा उद्देश शासन व प्रशासनाच्या व्यवहारात पारदर्शकता, उत्तरदायित्व , प्रशासकीय कार्यपद्धतीत बदल, भ्रष्टाचाराचे समूळ उच्चाटन,

विनाविलंब प्रशासकीय कामे व शासकीय कामांमध्ये होणाऱ्या गैरव्यवहारस वाव राहू नये या सर्व उद्देशानुसार भारतात माहिती अधिकार कायद्याची निर्मिती करण्यात आली आहे. या बाबतीत माहिती अधिकार कायद्याचे अभ्यासक शैलेश गांधी म्हणतात, " सरकारचे काम भ्रष्टाचार रोखणे हे असते. आपल्याकडे भ्रष्टाचार निवारण संस्था सीबीआय, सीव्हीसी, लोकपाल भ्रष्टाचार थांबू शकले नाहीत. सामान्य माणसाला भ्रष्टाचार करणाऱ्या पेक्षा आपला खिसा कापणारा याची भीती अधिक वाटते. त्यामुळे काही लोक जर माहिती अधिकाराचा गैरवापर करत असतील तर आपणाला चिंता खिशेकापूंची व्हायला हवी की समाजाला लुटणार्यांची हवी याचे उत्तर शोधायला हवे" त्यामुळे आज भारतात अनेक प्रामाणिक माहिती अधिकार कार्यकर्त्यांनी मोठं मोठे भ्रष्टाचाराची घोटाळे उघडकीस आणून सामान्य नागरिकांचे हित जोपासले आहे. नागरिकांचे मूलभूत अधिकार सुदृढ लोकशाही निकोप अभिव्यक्ती स्वातंत्र्याची जोपासना करणे हे भारतीय माहिती अधिकार कायद्याची निर्मिती करण्याचा मुख्य उद्देश आहे.

**माहिती अधिकारातील संशोधन:-**

माहिती अधिकार कायदा २००५ अंमलात आल्यानंतर लागलीच तीन वर्षांनी त्यात बदल करण्याचा प्रयत्न पंतप्रधान मनमोहन सिंग सरकारने केला. त्यानंतर २०१८ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारने पुन्हा एकदा माहिती अधिकार कायद्यात बदल करण्याचे प्रयत्न केले. पण नागरिकांच्या विरोधामुळे हे बदल त्यांना करता आले नाहीत. त्यानंतर सन २०१९ च्या लोकसभा सार्वत्रिक निवडणुका होऊन पुन्हा एकदा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्रात सरकार स्थापन झाले. तेव्हा लागलीच या सरकारने माहिती अधिकार कायदा २००५ मध्ये बदल करण्यासाठीची पावले उचलली. आणि दिनांक १९ जुलै २०१९ रोजी तत्कालीन केंद्रीय राज्यमंत्री जितेंद्र सिंह यांनी माहिती अधिकार संशोधन विधेयक २०१९ मांडले. आणि २२ जुलै २०१९ रोजी ते लोकसभेने ७८ विरुद्ध २१८ मतांनी पास केले. त्यानंतर लागलीच २५ जुलै २०१९ रोजी राज्यसभेने ७५ विरुद्ध ११७ आवाजी मतांनी हे विधेयक पास करून भारताच्या राष्ट्रपतीकडे स्वाक्षरीसाठी पाठवले. त्यावर राष्ट्रपतींनी सही करून त्यात पुढील महत्त्वपूर्ण बदल करण्यास मान्यता दिली. माहिती अधिकार कायदा २००५ मध्ये संशोधन करताना केंद्र सरकारने माहिती अधिकाराच्या कलम १३ , १६, २७ मध्ये संशोधन करून पुढील प्रकारचा बदल केला आहे.

१) **माहिती आयुक्तांचा कार्यकाळ:-**

आरटीआय कायदा २००५ मधील कलम १३ उपकलम (१) मधील तरतुदीनुसार माहिती आयुक्त व राज्य माहिती आयुक्त यांचा कार्यकाळ पाच वर्षे किंवा वयांची ६५ वर्ष एवढा निश्चित करण्यात आला होता. परंतु नवीन बदलानुसार हा कार्यकाळ केंद्रसरकार ठरवील तेवढा राहणार आहे.

२) **वेतन व भत्ते:-**

आरटीआय कायदा २००५ मधील कलम १६ (ग) उपकलम (५) मधील तरतूदीनुसार माहिती आयुक्ताचे , भत्ते व सेवेच्या इतर अटी या मुख्य निवडणूक आयुक्ताप्रमाणे असतील अशी तरतूद होती. परंतु नवीन बदलानुसार आयुक्ताच्या वेतन भत्ते व सेवाशर्ती संबंधीचा निर्णय केंद्र सरकार घेईल. असा बदल करण्यात आला आहे.

३) **वेतन कपात :-**

आरटीआय कायदा २००५ मधील कलम १६ नुसार केंद्रीय माहिती आयुक्त व राज्य माहिती आयुक्त यांना नियुक्तीच्या वेळी ज्या पेन्शन व इतर सेवानिवृत्तीचे लाभ मिळत असतील ते पूर्वी केंद्रीय निवडणूक आयोगाच्या आयुक्त प्रमाणे होते. परंतु नवीन बदलानुसार केंद्र सरकार त्यांच्या वेतनातून पेन्शनची राशी कपात करू शकेल; असा बदल करण्यात आला.

**आर टी आय संशोधनाचे परिणाम :-**

केंद्र सरकारने माहिती अधिकार कायदा २००५ मध्ये जे संशोधन करून सन २०१९ ला जे बदल केले त्याचा एकूण काय परिणाम होईल हे पहाणे आवश्यक आहे. या बदलामुळे माहिती आयोग आणि माहिती आयुक्त यांची स्वायत्तता व स्वातंत्र्य प्रभावित होईल. तसेच माजी माहिती आयुक्त श्रीधर आचार्युकु यांच्या मतानुसार “या संशोधनामुळे माहिती आयोग हा सरकारच्या नियंत्रणात येईल. यामुळे मूळ आरटीआयची हत्या ठरेल. तसेच संघराज्य व्यवस्थेची हानी होऊन सुशासन आणि लोकशाही कमकुवत होईल.” याशिवाय दुसरे माजी माहिती आयुक्त शैलेश गांधी हेसुद्धा या बदलास ‘बेहद दुर्भाग्यपूर्ण' आहे असे म्हणतात. तसेच आर टी आय कार्यकर्ता लोकेश बत्रा म्हणतात, “केंद्र सरकार कडून माहिती आयोगाची स्वायत्तता हिरावून घेतली जाऊन नागरिकांच्या माहिती जाणून घ्यावयाच्या अधिकार नष्ट करण्यावर हा दुसरा घाला आहे.”

केंद्र सरकारने केलेल्या या बदलामुळे माहिती आयुक्ताचे पद हे अस्थिर होईल. तसेच ते सरकारच्या मर्जीवर अवलंबून राहील . त्यामुळे माहिती आयुक्त सरकारला आदेश देण्यास कठोर राहणार नाही. म्हणून याचा परिणाम एकूणच माहिती अधिकार कायद्यावर होणार आहे. माहिती अधिकार कायदा २००५ नुसार केंद्रीय माहिती आयुक्त यांचा दर्जा सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांच्या बरोबरचा होता. परंतु तो आता नवीन बदलामुळे राहणार नाही. माहिती अधिकार कायद्यां मध्ये हे बदल केल्यामुळे या कायद्याचा एकूण दर्जा कमकुवत होणार आहे . माहिती अधिकार कायद्यात बदल करावा अशी कोणाचीही मागणी नसताना केंद्र सरकारने आपल्या सोयीसाठी हे नवीन संशोधन केले आहे असे विरोधी पक्षाच्या लोकांना वाटते.यात कांहीं प्रमानात सत्य दिसून येते. माहिती अधिकार कायदा २००५ करण्यामध्ये ज्यांची महत्त्वाची भूमिका राहिली आहे असे ज्येष्ठ समाजसुधारक अण्णा हजारे याबाबतीत ,” भारतातला माहिती अधिकार कायदा २००५ मिळाला पण नवीन संशोधनामुळे केंद्र सरकारने

देशातील लोकांना धोका दिला आहे लोक जर रस्त्यावर उतरून याला विरोध करायला तयार असतील तर मी त्यात सहभागी होईल." असे म्हटले आहे. भारताचे पहिले मुख्य माहिती आयुक्त वजाहत हबीबुल्ला यांनीसुद्धा या बदलामुळे माहिती अधिकार कायदा कमजोर होईल असे म्हटले आहे. तसेच हा कायदा बनवण्यामध्ये महत्त्वाची भूमिका निभावणारे माहिती अधिकार कार्यकर्ते निखील डे म्हणतात," या संशोधनामुळे केंद्र सरकार कायद्याच्या मूळ ढाचा वर आक्रमण करून हा कायदा अधिक कमजोर करत आहे."

**समारोप :-**

माहिती अधिकार कायदा २००५ मधील कलम २७ उपकलम २ खंड (ग) कलम १३ उपकलम क (१) उपकलम ख (२) उपकलम ग (५) कलम १६ क(१) उपकलम ख(२) उपकलम ग (५) यामध्ये बदल करून माहिती आयुक्त यांचा कार्यकाळ वेतन भत्ते व इतर सेवाशर्ती यांच्यामध्ये बदल करून केंद्र सरकारने माहिती अधिकार कायदा २००५ कमकुवत केला आहे. यामुळे माहिती अधिकारांच्या वापरावर व अंमलबजावणीवर होणार आहे. वरवर पाहता हे सर्व बदल माहिती आयुक्त यांच्याशी निगडित आहेत असे वाटते.परंतु त्यामुळे एकुण कायद्याच्या व्यापकतेवर होणार आहे.सध्या भारतात माहिती अधिकार कायद्यानुसार केवळ २.२% प्रकरणात तपास होऊन दंड अथवा शिक्षा होते.तसेच आज केंद्रीय माहिती आयुक्ताकडे २.२ लाख खटले प्रलंबित आहेत.याचे कारण माहिती आयुक्तालयात सरकार योग्य तो कर्मचारीवर्ग भरत नाही.माहिती आयुक्तांच्या कार्य आणि अधिकारावर सरकार गदा घालत असेल तर या कायद्याचा उद्देश साध्य होणार नाही.

हे जरी सत्य असले तरी या बदलामुळे माहिती अधिकार कायदा म्हणावा तितकासा कमजोर होईल असे वाटत नाही. लोकांची इच्छाशक्ती जर झाली तर हा कायदा अधिक सक्षमपणे राबवता येईल. केंद्र सरकारने केलेल्या या बदलाला न जुमानता तो अधिकाधिक वापरात आणला तर शासनाचे आणि प्रशासनाचे गैरव्यवहार उघड करता येतील आणि त्याच बरोबर या कायद्याचा वापर करून एक सक्षम लोकशाही व निर्भय समाजाची निर्मिती होईल असे वाटते.

**संदर्भ सूची :-**

१)माहिती अधिकार कायदा २००५ यशदा प्रकाशक
२) माहितीचा अधिकार- व्ही.बी.पाटील गघ
३) माहिती अधिकार कायदा-ॲड.वि.पु.शिंत्रे
४) RTI duty to Disclose- M.Sridhar Acharyulu
५) Right to Information act 2005 an analysis-Dr.Abhe Singh Yadav
६) www.bbc.com
७) www.Lokstta.com

# ३७.भारतीय संसद आजि -यायालयी-ग सक्रीयता

**डॉ. संतोष कोल्हे**
पदवी व पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग,
ज्ञानोपासक शिक्षण मंडळाचे
ज्ला, वाणिज्य व विज्ञा-न महाविद्यालय,
परभजी. मो.९४०३८४६४१५

**जोषवारा**

लोकशाही शासन व्यवस्थेमध्ये कायदे मंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायमंडळ हे शासनाचे तीन घटक असतात. त्यातील कोणताही एक घटक प्रभावी ठरु नये म्हणून तिन्ही घटकांना स्वायतत्ता आणि स्वातंत्र्य देण्यात आलेले आहे. कायदेमंडळाने कायदे करावेत, कार्यकारी मंडळाने त्या कायद्याची अंमलबजावणी करावी आणि त्या कायद्याच्या आधारे -यायमंडळाने लोकातील तंटे न्याय देऊन सोडवावेत अशी व्यवस्था करण्यात आली. जेंव्हा कधी घटनात्मक वाद निर्माण होतात तेंव्हा प्रकरणे न्यायालयाकडे जातात अशा वेळी सरकारची कृती अथवा संसदेची कृती तपासली जाते. आपल्या घटनेप्रमाणे मूलभूत हक्काची पायमल्ली सरकार किंवा संसदेला करता येत नाही आणि मूलभूत हक्कांची पायमल्ली झाल्यास घटनेच्या कलम १३ प्रमाणे असा कायदा अवैध ठरवला जावू शकतो आणि असे अधिकार न्यायसंस्थेला आहेत. एवढेच नव्हे तर संसदेने घटनेत दुरुस्ती करुन घटनेची मूलभूत चौकट बदलण्याचा प्रयत्न केला तर अशी घटनादुरुस्ती वैध की अवैध हे ठरवण्यासाठी न्यायालयाकडे जाता येईल की नाही, हाही मुद्दा केशवानंद भारती प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाच्या १३ न्यायामुर्तीच्या पूर्ण पीठाने १९७३ मध्ये निकाली काढला. संसद व सर्वोच्च न्यायालये यांच्यातील संघर्ष भारतीय लोकशाहीच्या विज्ासातील अडथळा ठरत आहे. दोन्ही संस्थांनी राज्यघटनेचे पावित्र्य राखून आपल्या कार्यक्षेत्राच्या मर्यादा संभाळणे आवश्यक आहे. संसदीय लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी मूलभूत निवडणूक सुधारणा करुन राजकीय साक्षरता मोठ्या प्रमाणात निर्माण करुन कार्यक्षम संसदेची निर्मिती जनतेने केली पाहिजे. न्यायालयीन सक्रीयतेमुळे सर्वोच्च न्यायालये अधिक लोकप्रिय होत आहेत. तरी सुध्दा लोकशाहीत न्यायमंडळाने स्वतःवर काही मर्यादा घालूनच संयम पाळूनच संयम कसा पाळला पाहिजे याचे एक उत्तम उदाहरण तत्कालीन प्रख्यात ॲड. आर.के. गर्ग यांनी आपल्या एका लेखात सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती के.एस. हेगडे यांच्यावर बोचरी टिका केली होती, न्यायमूर्ती हेगडे हे काँग्रेसचे अध्यक्ष निजलिंगप्पा यांच्यासारखेच दिसतात' असे म्हटले होते. पुढे सर्वोच्च न्यायालयाच्या एका कार्यक्रमात श्री गर्ग हे न्या. हेगडे यांना भेटले त्यावेळी गर्ग त्यांना म्हणाले, "अवमान केल्याबद्दल तुम्ही मला शिक्षा करणारच आहात ना?" त्यावर न्या. हेगडे यांचे उत्तर पुढील प्रमाणे होते, "जर मी उच्च न्यायालयाचा न्यायाधीश असतो, तर कदाचित शिक्षा केली असती पण मी सर्वोच्च न्यायालयाचा न्यायाधीश असल्याने शिक्षा करणार नाही, कारण मी चूक केल्यास ती दुरुस्त करावयास कोणीच असणार नाही, प्रत्येक संस्थेने आपली प्रतिष्ठा कमवायची असते, धाक दाखवून ती मिळविता येत नसते. न्यायायालयाने या पध्दतीनेच कामकाज केले

पाहिजे." २८ जानेवारी १९५० मध्ये सर्वोच्च न्यायालयालयाच्या उद्घाटन समारंभ प्रसंगी सर्वोच्च न्यायालयाचे पहिले न्यायाधीश श्री हरीलाल कानिया म्हणाले होते की, "सर्वोच्च न्यायालय हे कायद्याचा अर्थ लावण्याचे काम करेलच, पण त्या बरोबरच लोकशाहीच्या संरक्षणाकरिता केवळ चाकोरीबध्द कामकाज न करता बदलत्या सामाजिक परिस्थितीनुसार कामकाज ज रेल.

**प्रस्तावना :**

२६ जानेवारी १९५० या दिवशी आपली राज्यघटना कार्यरत झाली देशाचा कारभार कसा चालावा या बाबतचं मार्गदर्शन करण्याचे काम राज्यघटना करते. भारताच्या महान नेत्यांनी स्वतंत्र भारताच्या राज्यकारभारासंबंधी जी स्वप्ने रंगविली होती, ज्या आशा-आकांक्षा उराशी बाळगल्या त्याचे दर्शन आपल्या राज्यघटनेत दिसून येते. घटना लागू झाल्यानंतर भारतीय न्यायव्यवस्थेच्या सर्वोच्चस्थानी सर्वोच्य न्यायालयाची स्थापना २६ जानेवारी १९५० रोजी करण्यात आली. साधारणपणे भारतीय राज्यव्यवस्थेचे स्वरुप संघराज्यीय असले तरी भारतीय राज्यघटनेने एकेरी न्यायव्यवस्थेचा पूरस्कार केलेला आहे. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाला कायद्याबाबतचे, अपिला बाबतचे, राज्यघटनेचा अर्थ लावण्याचे महत्वपूर्ण अधिकार प्राप्त झाले आहेत. संघराज्याला आवश्यक असलेल्या लिखित राज्यघटना, केंद्र व राज्य सरकार यांच्यात अधिकाराची विभागणी स्वतंत्र न्यायमंडळ व न्यायालयीन पुनर्विलोकन या अटी भारतीय राज्यवस्थेने पूर्ण केलेल्या आहेत. या मधूनच भारतीय राज्यघटनेमधील अनुच्छेद १२४ नुसार सर्वोच्च न्यायालयाची स्थापना झाली.

**विषय प्रतिपादन :**

लोकशाही शासन व्यवस्थेमध्ये कायदे मंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायमंडळ हे शासनाचे तीन घटक असतात. त्यातील कोणताही एक घटक प्रभावी ठरु नये म्हणून तिन्ही घटकांना स्वायतत्ता आणि स्वातंत्र्य देण्यात आलेले आहे. कायदेमंडळाने कायदे करावेत, कार्यकारी मंडळाने त्या कायद्याची अंमलबजावणी करावी आणि त्या कायद्याच्या आधारे न्यायमंडळाने लोकातील तंटे न्याय देऊन सोडवावेत अशी व्यवस्था करण्यात आली. जेंव्हा कधी घटनात्मक वाद निर्माण होतात तेंव्हा प्रकरणे न्यायालयाकडे जातात अशा वेळी सरकारची कृती अथवा संसदेची कृती तपासली जाते. आपल्या घटनेप्रमाणे मूलभूत हक्काची पायमल्ली सरकार किंवा संसदेला करता येत नाही आणि मूलभूत हक्कांची पायमल्ली झाल्यास घटनेच्या कलम १३ प्रमाणे असा कायदा अवैध ठरवला जावू शकतो आणि असे अधिकार न्यायसंस्थेला आहेत. एवढेच नव्हे तर संसदेने घटनेत दुरुस्ती करुन घटनेची मूलभूत चौकट बदलण्याचा प्रयत्न केला तर अशी घटनादुरुस्ती वैध की अवैध हे ठरवण्यासाठी न्यायालयाकडे जाता येईल की नाही, हाही मुद्दा जे शवा-नंद भारती प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाच्या १३ न्यायामुर्तीच्या पूर्ण पीठाने १९७३ मध्ये निकाली काढला. त्यात स्पष्ट करण्यात आले आहे की घटनादुरुस्तीने जर भारतीय घटनेचे मूलभूत स्वरुपच बदलत असेल तर अशी घटनादुरुस्ती वैध असणार नाही १९७६ मधील बेचाळीसाव्या घटनादुरुस्तीने जेंव्हा न्यायालयाचे अधिकारक्षेत्र संपवण्याची तरतूद केली आपल्या मर्जीतील व्यक्तीसच न्यायाधीश पद देता यावे या अनुषंगाने काही तरतूदी केल्या गेल्या एकूणच संसदेने केलेले कायदे सहजासहजी न्यायालयाला रद्द करता येवू नयेत अशी व्यवस्था करण्यात आली. परंतु मिनर्व्हा मिल्स प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने आणखी एकदा हे स्पष्ट केले की संसदेने केलेल्या कायद्याची तपासणी न्यायसंस्थेला करता येईल आणि असा कायदा घटनाबाह्य

असेल तर तो रद्दबातल ठरवता येईल म्हणजेच आपल्या लोकशाहीत संसद किंवा सरकार सार्वभौम नाही. त्याच प्रमाणे आपली न्यायसंस्थाही सार्नभौम नाही अमेरिकन न्यायव्यवस्थेप्रमाणे अमर्याद न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अधिकार आपण न्यायसंस्थेला दिलेला नाही. आणि आपले न्यायाधीशही चौकशी पासून अलिप्त नाहीत. म्हणजेच भारतामध्ये सरकार, संसद किंवा न्यायसंस्था सार्वभौम नसून आपली राज्यघटना सार्वभौम आहे.

विद्यमान परिस्थितीत सर्वोच्च न्यायालय अधिक आक्रमकपणे बदलत्या सामाजिक परिस्थितीनुसार निर्णय देतांना दिसत आहेत. न्यायालयाच्या काही निर्णयामुळे कायदेमंडळ व न्यायमंडळ यांच्यातील मतभेद वाढतांना दिसत आहेत. राज्यघटनेने न्यायसंस्थेवर मुख्यतः दोन महत्वाच्या जबाबदाऱ्या टाकल्या आहेत.

१) सर्व शासज्ीय संस्था या कायद्यानुसार आणि कायद्याच्या मर्यादेतच चालतात की नाही हे पाहजे.

२) मूलभूत अधिकारांच्या संकोचाविरुध्द योग्य ती उपाययोजना करणे.

केवळ हक्क देऊन पूरेसे नसते तर त्या हक्कांच्या संरक्षणाची तरतूदही आवश्यक असते. या संरक्षणात्मक तरतूदी विषयी डॉ. आंबेडकर म्हणाले, जर मला कोणी विचारले की या घटनेतील कोणती अशी तरतूद आहे की जी काढली तर घटना शून्यवत होईल. तर मी कलम ३२ चा उल्लेख करीन ही तरतूद घटनेचा प्राण आहे. (कलम ३२ मध्ये सर्वोच्च न्यायायालयास मूलभूत अधिकारांच्या संरक्षणार्थ करावयाच्या उपाययोजना बाबत सक्षम करण्यात आले आहे) कलम ३२ नुसार या देशातल्या एखाद्या समाजघटकावर अन्याय होत असेल, मूलभूत हक्कांचे उल्लंघन होत असेल तर असे करण्याऱ्या विरुध्द रिट अर्ज दाखल करता येईल. या देशातील मूलभूत हक्क व मार्गदर्शक तत्वांची अंमलबजावणी करण्याचे अधिकार सरकार, विधीमंडळ, प्रशासन व्यवस्था जर नाकारत असेल तर त्यांना त्यांची अंमलबजावणी करण्याचे आदेश देण्याचा अधिकार घटनेने न्यायालयास दिला आहे.

या देशातील उच्च न्यायालयाला असे वाटले की, या प्रकरणात आपल्याला हस्तक्षेप करणे आवश्यक आहे तर ते करु शकते उदा. भारतातील हवाई सुंदरीवर असे बंधन होते की, नोकरीस लागल्यावर चार वर्ष लग्न करता येणार नाही आणि अगोदरच लग्न झालेले असेल तर तिने चार वर्ष मूल होवू द्यायचे नाही. हा आदेश पुरुषाला लावणं शक्य नव्हता कारण पुरुषाला मूलं होत नाहीत. पुरुषापासून मूल होवू शकतात. सर्वोच्च न्यायालयाने या बाबत विचार केला की घटनेनुसार माणसा-माणसात,स्त्री-पुरुषात फरक करता येणार नाही त्यामुळे मानवावर लादलेले हे अनैसर्गिक नियम आहेत. असे मानून या बंधनाला ते घटनेच्या विरोधी आहे असा निकाल दिला. असे अनेकवेळा सामाजिक न्यायाच्या दृष्टीने अनेक निकाल न्यायालये देत असतात. सामाजिक न्यायासंदर्भात केवळ विधिमंडळ व शासनव्यवस्था यांच्यावर अवलंबून न रहाता न्याय संस्थेलाही सक्रीय भूमिका बजावणं ही काळाची गरज आहे.

आज कायदेमंडळाची अवस्था बिकट बनली आहे. ज्यांनी कायदे करावयाचे तेच प्रथम कायदे मोडणारे ठरले आहेत. समाजातील गुन्हेगारीचे प्रमाण वाढल्यामुळे ते आता निवडणूक लढवत आहेत. निवडूणही येत आहेत. विद्यमान उपराष्ट्रपतींनी आपल्या भाषणातून खंत व्यक्त केली की आज सभागृहात २३-२५% लोप्रतिनिधी असे आहेत की ज्यांच्यावर खटला चालवला

तर ५-१० वर्षे सक्त मजुरीची शिक्षा होवू शकते. पक्षानुसार प्रमाण राजद-३४.८, बसपा-२७.८, समाजवादी -१९.४, भाजपा-१०.९, ज ाँग्रेस -७.६% असे सांगता येईल.

आघाडीची सरकारे सत्तेवर आल्यापासून संसदेची जनमाणसातील प्रतिमा ढासळत आहे. संसदीय कामकाजात मोठ्या प्रमाणात गोंधळ होताना दिसतो आहे. अभ्यासू लोकप्रतिनिधी व त्यांची भाषणे, चर्चा अपवादानेच ऐकावयास मिळतात. खासदार लाच प्रकरणामुळे तर संसदेची प्रतिष्ठा मोठ्या प्रमाणात मली-न झाली आहे अशा परिस्थितीत सर्वोच्च न्यायालये अतिशय सक्र ीय झाले आहेत.

आज भारतीय संसदीय लोकशाहीसमोर संसदेच्या सार्वभौमत्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. लोकशाहीमध्ये लोकांच्या इच्छा-आकांक्षा व्यक्त करण्याचे देशातील सर्वोच्च ठिकाण म्हणजे संसद आहे. जनतेमधून निवडून गेलेले प्रतिनिधी संसदेमध्ये असतात व हे प्रतिनिधी जनतेला जबाबदार असतात. संसदीय शासनपध्दतीत संसदच सार्वभौम असणे गरजेचे आहे मात्र संसदेने बहुमताच्या आधारावर जर काही घटनात्मक चुका केल्या तर त्या दुरुस्त कोण करणार हा प्रश्न उपस्थित होतो यासाठी घटनाकारांनी सर्वोच्च न्यायालयाला न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अधिकार दिलेला आहे. या अधिकाराचा न्यायालयाने आवश्यक तेवढा वापर करणे अपेक्षित आहे. सोमनाथ चटर्जी म्हणतात, "सर्वोच्च न्यायालये नवीन कायदे तयार करु शकत नाहीत, न्यायालयाने एखाद्या कायद्यावरील केलेले स्पष्टीकरण किंवा अर्थबोधन म्हणजे नवीन कायदा नव्हे", सर्वोच्च न्यायालयाने कायदेशीरपणाचीच समिक्षा करावी व संसदेचे सार्वभौमत्व मान्य करणे लोकशाहीत अभिप्रेत आहे. सार्वत्रिक निवडणूकीच्या माध्यमातून जनता संसदेनी केलेली चूक सत्ताधारी पक्षाला पायउतार करुन सुधारु शकते.

डॉ. राजेंद्र प्रसाद घटनासमितीच्या समारोप प्रसंगी म्हणाले होते, "आम्ही लोकसत्ताक राज्यघटना तयार केली आहे, परंतु लोकशाहीमधील संस्थांनी आपल्या यशस्वीतेसाठी एकमेकांबद्दल समझोत्याची तयारी दर्शविली पाहिजे. राज्यघटनेत प्रत्येक बाब लिहून ठेवणे शक्य नसते, त्या बाबी संकेतावर आधारित सोडवाव्या लागतात. मी अशी आशा व्यक्त करतो की, त्या क्षमतांचा व संकेतांचा भारतात विकास होईल." एकंदरीत संसद व सर्वोच्च न्यायालये या दोन्ही उच्च संस्थांनी एकमेकांचा आदर राखून देशहिताचे निर्णय घेतले पाहिजेत. राज्यघटनेमधील सत्ता संतुलन साधून राज्यघटना हाच अंतिम कायदा मानून या तिन्ही संस्थांनी आपली निर्मिती राज्यघटनेमुळेच झाली हे लक्षात घेऊन कार्यक्षम, पारदर्शक व समझोत्याच्या तत्वावर कामकाज करणे आवश्यक आहे.

**ि-ष्क र्ष :**

संसद व सर्वोच्च न्यायालये यांच्यातील संघर्ष भारतीय लोकशाहीच्या विकासातील अडथळा ठरत आहे. दोन्ही संस्थांनी राज्यघटनेचे पावित्र्य राखून आपल्या कार्यक्षेत्राच्या मर्यादा संभाळणे आवश्यक आहे. संसदीय लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी मूलभूत निवडणूक सुधारणा करुन राजकीय साक्षरता मोठ्या प्रमाणात निर्माण करुन कार्यक्षम संसदेची निर्मिती जनतेने केली पाहिजे. न्यायालयीन सक्रीयतेमुळे सर्वोच्च न्यायालये अधिक लोकप्रिय होत आहेत. तरी सुध्दा लोकशाहीत न्यायमंडळाने स्वतःवर काही मर्यादा घालूनच संयम पाळूनच संयम कसा पाळला पाहिजे याचे एक उत्तम उदाहरण तत्कालीन प्रख्यात ॲड. आर.के. गर्ग यांनी आपल्या एका लेखात सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती के.एस. हेगडे यांच्यावर बोचरी टिका केली होती, न्यायमूर्ती हेगडे

हे काँग्रेसचे अध्यक्ष निजलिंगप्पा यांच्यासारखेच दिसतात' असे म्हटले होते. पुढे सर्वोच्च न्यायालयाच्या एका कार्यक्रमात श्री गर्ग हे न्या. हेगडे यांना भेटले त्यावेळी गर्ग त्यांना म्हणाले, "अवमान केल्याबद्दल तुम्ही मला शिक्षा करणारच आहात ना?" त्यावर न्या. हेगडे यांचे उत्तर पुढील प्रमाणे होते, "जर मी उच्च न्यायालयाचा न्यायाधीश असतो, तर कदाचित शिक्षा केली असती पण मी सर्वोच्च न्यायालयाचा न्यायाधीश असल्याने शिक्षा करणार नाही, कारण मी चूक केल्यास ती दुरुस्त करावयास कोणीच असणार नाही, प्रत्येक संस्थेने आपली प्रतिष्ठा कमवायची असते, धाक दाखवून ती मिळविता येत नसते. न्यायायालयाने या पध्दतीनेच कामकाज केले पाहिजे." २८ जानेवारी १९५० मध्ये सर्वोच्च न्यायालयालयाच्या उद्घाटन समारंभ प्रसंगी सर्वोच्च न्यायालयाचे पहिले न्यायाधीश श्री हरीलाल कानिया म्हणाले होते की, "सर्वोच्च न्यायालय हे कायद्याचा अर्थ लावण्याचे काम करेलच, पण त्या बरोबरच लोकशाहीच्या संरक्षणाकरिता केवळ चाकोरीबध्द कामकाज न करता बदलत्या सामाजिक परिस्थितीनुसार कामकाज करेल."

**संदर्भ :**


- भोळे भा.ल., भारताचे स्वातंत्र्य पन्नास वर्षाचा मागोवा, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, १९९८.
- साठे सत्यरंजन, भारताच्या राज्यघटनेची पन्नास वर्ष, काँन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, २००२.
- साठे सत्यरंजन, ज्युडिशिअल ॲक्टिव्हिझम इन इंडिया, ऑक्सफर्ड युनि., प्रेस, न्यू दिल्ली, २००२.
- चोप्रा प्राण (संपा.), दि सुप्रीम कोर्ट व्हर्सेस दि काँन्स्टिट्युशन - ए चॅलेन्ज टू फेडरॅलिझम, सेज प्रकाशन, न्यू दिल्ली, २००६.
- सत्याग्रही विचारधारा, जाने. २००८.
- प्रबोधन प्रकाशन माला, पुस्तक सहावे, १९९७.
- इकॉनॉमिक अँड पोलिटीकल विकली, मे-२००६.

 ISBN No. 978-93-91097-18-9

# ३८. केंद्र-राज्य यांचे प्रशासकीय, कार्यकारी आणि आर्थिक संबंध

**डॉ. सुनिल पिंपळे**
(सहय्यक प्राध्यापक), राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
लोकसेवा महाविद्यालय,
गारखेडा परिसर, औरंगाबाद.
मो. ८६६८९९८९२८.
sunilpimpleg@gmail.com

## प्रस्तावना

भारतीय राज्यघटनेच्या भाग ११ मधील कलम २५६ ते २६३ मध्ये केंद्र आणि राज्य सरकार मधील प्रशासकीय संबंधाच्या तरतुदी दिलेल्या आहेत. तसेच राज्यघटनेतील भाग ११ मधील कलम २४५ ते २५५ मध्ये केंद्र - राज्य कार्यकारी संबंधाची तरतूद करण्यात आलेली आहे. राज्यघटनेच्या भाग १२ मधील कलम २६८ ते २९३ दरम्यान केंद्र राज्य वित्तीय संबंधाची तरतूद करण्यात आलेली आहे.

## केंद्र - राज्य प्रशासकीय संबंध

भारतीय राज्यघटनेच्या भाग ११ मधील कलम २५६ ते २६३ मध्ये केंद्र आणि राज्य सरकार मधील प्रशासकीय संबंधाच्या तरतुदी दिलेल्या आहेत.

केंद्र सरकारला संघसूचीतील विषयाबबात जे कायदे विषयक अधिकार प्राप्त आहेत. त्याबाबतचे सर्व कार्यकारी अधिकारही प्राप्त आहेत. कोणताही तह किंवा करार याव्दारे प्राप्त हक्क,प्राधिकार आणि कार्यक्षेत्राच्या अंमलबजावणीचे हक्कही केंद्र सरकारला प्राप्त आहेत.

राज्य सरकारला राज्यसूचीतील विषयांबाबत जे कायदेविषयक अधिकार प्राप्त आहेत. ते राज्याच्या प्रदेसापुरतेच मर्यादित असतात. समवर्ती सूचीतील विषयांबाबत कार्यकारी अधिकार सामान्यत: राज्यांना प्राप्त असतात. मात्र संसदीय कायद्याने हा अधिकार केंद्र सरकारकडे देता येऊ शकतो.

समवर्ती सूचीतील विषयांवरील कायदा जरी संसदेने संमत केलेला असला तरी त्याची अंमलबजावणी मात्र राज्याकडून केली जाते.

## केंद्र-राज्य कार्यकारी संबंध

घटनेतील भाग ११ मधील कलम २४५ ते २५५ मध्ये केंद्र - राज्य कार्यकारी संबंधाची तरतूद करण्यात आलेली आहे. केंद्र-राज्य कार्यकारी संबंधाच्या चार बाजू आहेत.

**अ) केंद्र व राज्याच्या कायद्यांचा प्रादेशिक विस्तार**

**ब) कायदेविषयक विषयांची विभागणी**

**क) राज्य विषयांवर कायदे करण्याचा केंद्र सरकारचा अधिकार**

**ड) राज्य कायद्यांवरील केंद्र सरकारचे नियंत्रण**

### अ) केंद्र व राज्याच्या कायद्यांचा प्रादेशिक विस्तार

१) संसद भारताच्या राज्यक्षेत्राच्या सर्व किंवा कोणत्याही भागासाठी कायदे करू शकते.

२) राज्य विधिमंडळ संबंधित राज्यासाठी कायदे करू शकते. हे कायदे राज्याबाहेर लागू होऊ शकत नाहीत.

३) घटनेने संसदेच्या प्रादेशिक कार्यक्षेत्रावर काही मर्यादा घातलेल्या आहेत ते पुढील प्रमाणे.

  १) राष्ट्रपती अंदमान व निकोबार बेटे लक्षव्दीप,दादरा व नगर हवेली,दमन व दीव या चार केंद्रशासित प्रदेशांच्या शांतता,प्रगती व सुशासनासाठीचे नियमने तयार करू शकतात.

  २) राज्यपाल यास एखादा संसदीय कायदा,राज्यातील अनुसूचित क्षेत्रास लाग ूहोणार नाही किंवा बदल / अपवादसहित लागू होईल असा निर्देश देण्याचा अधिकार आहे.

  ३) आसामच्या राज्यपालांना आसाममधील आदिवासी क्षेत्रांना (स्वायत्त जिल्ह्यांना) आणि राष्ट्रपतींना मेघालय,त्रिपुरा व मिझोराम या राज्यांमधील आदिवासी क्षेत्रांना स्वायत्त जिल्ह्यांना) न एखादा संसदीय कायदा लागू होणार नाही किंवा बदल अपवादासहीत लागू होईल असा निर्देश देण्याचा अधिकार आहे.

### ब) कायदेविषयक विषयांची विभागणी

१) संघसूची,राज्यसूची व समवर्ती सूची या तिनही सूची व त्यातील विषय सातव्या परिशिष्टात समाविष्ट करण्यात आलेले आहेत.

२) संघसूचीत सध्या १०० विषय आहेत. मूळ घटनेत संघसूचित ९७ विषय होते. तरीही सध्या शेवटच्या विषयाचा क्रमांक ९७ आहे. २अ, ९२अ, ९२ब, ९२क या क्रमांकाचे विषय नव्याने समाविष्ट करण्यात आले तर ३३ क्रमांकाचा विषय वगळण्यात आला.

३) राज्यसूचित सध्या ६१ विषय आहेत. मूळ घटनेत राज्यसूचित ६६ विषय होते. तरीही सध्या शेवटच्या विषयाचा क्रमांक ६६ आहे. ११,१९,२०,२९ आणि ३६ क्रमांकाचे विषय वगळण्यात आले. राज्य विधीमंडळाला सामान्य परिस्थितीत राज्यसूचीतील कोणत्याही विषयावर कायदे करण्याचा अधिकार आहे.

४) समवर्ती सूचीत सध्या ५२ विषय आहेत. मूळ घटनेत समवर्ती सूची मध्ये ४७ विषय होते. तरीही सध्या शेवटच्या विषयचा क्रमांक ४७ असून ११अ,१७अ,१७ब,२०अ,३३अ या क्रमांकाचे विषय नव्याने समाविष्ट करण्यात आले. हे विषय ४२ व्या घटनादुरूस्तीव्दारे राज्यसूचीतून काढून समवर्ती सूचित टाकण्यात आले.

५) शेषाधिकार केंद्राकडे आहेत म्हणजेच वरील तिनही सूचीमध्ये ज्या विषयांचा उल्लेख नाही अशा विषयांवर (कलम २४८) नुसार कायदे करण्याचा अधिकार संसदेस आहे.

६) समवर्ती सूचीतील विषयांवर केंद्र व राज्य कायद्यात विसंगती निर्माण झाल्यास केंद्राचा कायदा वरचढ असेल. मात्र जर राज्य कायदा राष्ट्रपतींच्या विचारार्थ राखून ठेवला असेल तर त्या राज्यात राज्य कायदा वरचढ असेल. संसद त्या विषयावर पुन्हा कायदा करू शकते. जे नवीन संसदीय कायदा राज्य कायद्याच्या वरचढ ठरेल.

**क) राज्य विषयांवर कायदे करण्याचा केंद्र सरकारचा अधिकार**

राज्यसभेच्या ठरावाने (कलम २४९) जर राज्यसभेने हजार व मतदान करणाऱ्या सद्स्यांच्या दोन तृतीयांश बहुमताने असा ठराव पारित केला की,राष्ट्रहितासाठी राज्यसूचीतील विषयांवर संसदेने कायदा करण्याची गरज आहे. तर संसद असा कायदा करण्यासाठी तात्पुरत्या काळाकरिता सक्षम असेल. असा ठराव एक वर्षासाठी अमलात असेल मात्र तो एका वेळा एक वर्षापर्यंतच्या काळासाठी वाढविता येईल. असा तो कितीही वेळा वाडविता येईल.

ठरावाचा अंमल संपल्यानंतर सहा महिन्यांनी कायद्याचाही अंमल संपुष्टात येईल. हि व्यवस्था राज्य विधिमंडळाला त्याच विषयावर कायदा बनविण्यापासून रोखू शकत नाही. राज्य कायदा व संसद कायदा यामध्ये विसंगती निर्माण झाली तर नंतरचा कायदा ग्राह्य मानला जाईल.

राष्ट्रीय आणीबाणीची घोषणा सुरू असताना राज्यसूचीतील विषयांवर कायदे करण्याचा अधिकार संसदेस प्राप्त होतो. (कलम २५०) नुसार आणीबाणी संपुष्टात आल्यानंतर सहा महिन्यांनी अशा कायद्याचा अंमल संपुष्टात येतो. अशा परीस्थितीतही राज्य विधीमंडळाचा स्वत:चा कायदा करण्याचा अधिकार नष्ट होत नाही. मात्र संसदेचा कायदा व राज्याचा कायदा यामध्ये विसंगती निर्माण झाल्यास संसदीय कायदा वरचढ ठरेल. (कलम २५१

संसद आंतरराष्ट्रीय कराराच्या अंमलबजावणीसाठी राज्यसूचीतील कोणत्याही विषयावर(कलम २५३) नुसार कायदे करू शकते.

**ड) राज्य कायद्यावरील केंद्र सरकारचे नियंत्रण**

१) राज्यपाल राज्यविधीमंडळाने पारित केलेले. काही विधेयके (कलम २००) नुसार राष्ट्रपतींच्या विचारार्थ राखून ठेवू शकतात.

२) राष्ट्रपतींना विधेयकाबाबत (कलम २०१) नुसार पूर्ण नकाराधिकार आहे.

३) राज्यसूचीतील काही विषयांशी संबंधित विधेयके राज्य-विधी मंडळामध्ये केवळ राष्ट्रपतींच्या पूर्व संमतीनेच मांडता येतात.

४) वित्तीय आणीबाणी दरम्यान राष्ट्रपती राज्यांना निर्देश देऊ शकतो,की धन विधेयके आणि इतर विधेयके त्यांच्या विचारार्थ राखून ठेवली जावी.

एखाद्या घटक राज्यातील घटनात्मक यंत्रणा मोडकळीस आल्यास राज्यपाल तसा अहवाल कलम ३५६ नुसार राष्ट्रपतींकडे पाठवतात. तेंव्हा राज्यात राष्ट्रपती राजवट लागू केली जाते. राज्यपालांच्या अहवालाशिवाय देखील एखाद्या घटक राज्यातील घटनात्मक यंत्रणा मोडकळीस आली आहे अशी राष्ट्रपतींची खात्री झाल्यास एखाद्या घटक राज्यात राष्ट्रपती राजवट लागू करता येते.

राज्यघटनेतील विषय सूचीमध्ये ३ऱ्या, ६व्या, ७व्या, १५व्या, ३२व्या, ४२व्या आणि ४६ व्या घटनादुरूस्तीने बदल करण्यात आले.

**केंद्र राज्य आर्थिक संबंध**

घटनेच्या भाग १२ मधील कलम २६८ ते २९३ दरम्यान केंद्र राज्य वित्तीय संबंधाची तरतूद करण्यात आलेली आहे.

**कर अधिकाराची विभागणी**

१) संघसूचीमधील विषयावर कर आकारण्याचा अधिकार केवळ केंद्राला आहे. संघसूचीमध्ये विषय क्रमांक ८२ ते ९२ (क) पर्यंत असे १४ करविषयक अधिकार आहेत.

२) राज्यसूचीमधील विषयांवर कर आकारण्याचा अधिकार केवळ राज्य विधीमंडळाला आहे. राज्यसूची मध्ये विषय क्रमांक ४५ ते ६३ दरम्यान सुमारे १९ करविषयक विषयांचा समावेश आहे.

३) समवर्ती सूचीतील विषयांवर कर आकारण्याचा अधिकार संसद तसेच विधीमंडळाला आहे. समवर्ती सुचित असे तीन विषय आहेत. उदा. यांत्रिक वाहने,स्टॅम्प ड्युटी आणि या सूचीतील कोणत्याही बाबींशी संबंधित शुल्क.

४) कर आकारण्याचा शेषाधिकार संसदेकडे आहे. या तरतुदीच्या आधारे देणगी कर, संपत्तीकर आणि खर्च कर यांची आकारणी केलेली आहे.

**राज्यांच्या करअधिकारावरील बंधने**

१) राज्य शासन व्यवसाय,व्यापार आजीविका आणि नौकऱ्या यांवर कर आकारू शकते. मात्र अशा कराची देय रक्कम कोणत्याही व्यक्तीसाठी एका वर्षाला २५०० पेक्षा जास्त असता कामा नये.

२) राज्य विधीमंडळ वर्तमानपत्रे वगळता इतर वस्तूंच्या खरेदी विक्रीवर कर आकारू शकते. मात्र या अधिकारावर पुढील बंधने आहेत.
   १) राज्याच्या बाहेर झालेल्या खरेदी विक्रीवर कर आकारता येणार नाही.
   २) आयात-निर्याती दरम्यान झालेल्या खरेदी-विक्रीवर कर आकारता येणार नाही.
   ३) संसदेने कायद्याव्दारे आंतरराज्यीय व्यापार वाणिज्याच्या दृष्टिने महत्वाच्या घोषित केलेल्या वस्तूंच्या उदा. तंबाखू, साखर, रेशीम, सुती आणि वुलन कपडे खरेदी-विक्रीवर लावण्यात आलेला कर संसदेने निश्चित केलेल्या बंधनाच्या व अटींच्या अधिन असेल.

३) राज्यविधीमंडळ विजेच्या वापरावर व विक्रीवर कर आकारू शकते. मात्र सरकारला विकलेल्या विजेवर कर आकारता येणार नाही.

४) संसदेने कोणत्याही आंतरराज्यीय नदी खोऱ्याच्या विकासाकरता स्थापन केलेल्या,विक्री केलेल्या पाण्याच्या किंवा विजेच्या बाबतीत राज्य कायद्याने कर आकारू शकते. मात्र असा कर आकारणीचा कायदा अमलात येण्यासाठी तो राष्ट्रपतींच्या विचारार्थ राखून ठेवण्यात येऊन त्यांची संमती मिळणे आवश्यक असेल तरच तो प्रभावी ठरेल.

**कर महसुलाची विभागणी**

८० व्या घटनादुरूस्तीच्या पूर्वी केवळ आयकर व केंद्रीय उत्पादन शुल्क या करापासून प्राप्त महसुलाची विभागणी केंद्र व राज्यांमध्ये केली जात असे. १० व्या वित्त आयोगाने शिफारस केली की एकूण कर उत्पन्नाच्या २९ टक्के राज्यांना वाटा दिला गेला पाहिजे. त्यानुसार ८० व्या घटानादुरूस्तीने (सन २०००) यात बदल करण्यात आला. सध्या केंद्र सरकारने आकारणी आणि वसुली केलेल्या सरचार्ज व सेस वगळता इतर सर्व करांची विभागणी केंद्र व राज्य यामध्ये केली जाते.

८८ व्या घटनादुरूस्तीने (सन २००३) घटनेत सेवा कराशी संबंधित कलम २६८ (अ) हे नवीन कलम टाकण्यात आले. तसेच संघसूचीमध्ये ९२ (क) हा नवीन विषय (सेवा कर) टाकण्यात आला. सेवा कराची आकारणी केंद्र सरकार करते,मात्र त्याची वसुली व नियोजन केंद्र तसेच राज्य सरकार असे दोघांकडून केले जाते.

**केंद्र सरकारच्या अधिकारात येणारे कर**

१) उत्पन्न कर
२) निगम कर
३) अबकारी शुल्क
४) केंद्र सूचीतील आयात शुल्क

**राज्य सरकारच्या अधिकारात येणारे कर**

१) जमीन महसूल

२) कृषी उत्पन्न, उत्तराधिकार यावरील कर, तसेच कृषी भूमीवरील मालमत्ता कर

३) जमीन व इमारती,खनीज हक्क,नौका,वाहने,करमणूक,पथ,मुद्रांक शुल्क इ. वरील कर

४) वर्तमानपत्रातील वगळता इतर जाहिरातींवरील कर,वीज,रस्त्ये किंवा अंतर्गत जलमार्गांनी होणारी आयात निर्यातीवरील कर

**राज्यांना सहाय्यक अनुदान**

राज्यांना वैधानिक अनुदान (कलम २७५) नुसार वित्त आयोगाच्या शिफारसीनुसार दिली जातात. संसद कायद्याव्दारे राज्यांना साधारण अनुदान देण्याची तरतूद करू शकते. अशा अनुदानाची तरतूद सर्वच राज्यांसाठी नसतात. तसेच अनुदान सारखेही नसते. ही रक्कम भारत सरकारच्या संचित निधीवर प्रभारित असते. असे अनुदान कोणत्याही राज्यातील अनुसूचीत जमातीच्या कल्याणासाठी किंवा अनुसूचित क्षेत्राच्या प्रशासनाचा दर्जा उंचावण्यासाठी दिली जातात.

**समारोप**

केंद्र सरकार आपले कायदे विषयक अधिकार राज्य सरकाला प्रदान करू शकत नाही. मात्र केंद्र आणि राज्य सरकार परस्परांना आपले कार्यकारी अधिकार प्रदान करू शकतात. राष्ट्रपती केंद्राचे कोणतेही अधिकार राज्याकडे (कलम २५८ (१) नुसार) त्यांच्या संमतीने सोपवू शकतात. राज्याचे राज्यपाल राज्याचे कोणतेही कार्यकारी अधिकार केंद्राकडे (कलम २५८ (अ )नुसार) केंद्राच्या संमतीने सोपवू शकतात.

संसद कायद्याव्दारे राज्याची संमती न घेता त्या राज्यावर कार्यकारी कार्ये लादू शकतो. संसद संघसूचीतील विषयांवर कायदा करून त्यानुसार राज्य सरकारला अधिकार प्रदान करू शकतात. तसेच त्यावर कर्तव्ये सोपवू शकतात. मात्र अशी बाब राज्य सरकारला करता येत नाही.

**संदर्भसूची**

१) भारतीय राज्यघटना

२) भारतीय राज्यघटना भाग - ११

३) भारतीय राज्यघटनेचे कलम २५६ ते २६३

४) भारतीय राज्यघटनेचे कलम २४५ ते २५५

५) hi.m.wikipedia.org

६) www.drishtiias.com

७) mpscacademy.com

# ३९. राष्ट्रीय अनुसूचित जनजाती आयोग

**प्रा.डॉ. पी.एस.लांडगे**
राजनितीशास्त्र विभागाध्यक्ष,
के. के. एम. महाविद्यालय, मानवत. जि. परभणी.

**प्रस्तावना :-**

संविधान के अनुच्छेद 338अ में यह उल्लेख या गया है कि अनुसूचित जनजातियों के लिए एक आयोग होगा। जिसे राष्ट्रीय अनुसूचित जनजाति आयोग (एनसीएसटी) के नाम से जाना जाएगा। आयोग का यह कर्तव्य है कि वह संविधान के तहत अनुसूचित जनजातियों को उपलब्ध कराए गये सुरक्षा उपायों से संबंधित सभी मामलों की जांच करे। हालांकी आयोग के विभिन्न कार्य और शक्तियां है। जिसका उल्लेख संविधान में किया गया है। भारतीय संविधान का अनुच्छेद 366(25) उन समुदायों को अनुसूचित जनजाति के लिए संदर्भित करता है, जिनका निर्धारण संविधान के अनुच्छेद 342 के अनुसार किया गया है। यह अनुच्छेद कहता है कि केवल वो समुदाय जिन्हे एक आरंभिक सार्वजनिक अधिसूचना के माध्यम से या एक संसदीय संशोधन अधिनियम के माध्यम से राष्ट्रपती द्वारा घोषित किया गया है उन्हे ही अनुसूचित जनजाति माना जाएगा। अनुच्छेद 338अ में इस बात का उल्लेख है कि अनुसूचित जनजातियों के लिए एक आयोग होगा जिसे राष्ट्रीय अनुसूचित जनजाति आयोग के रुप में जाना जाएगा।

राष्ट्रीय अनुसूचित जनजाति आयोग के कार्यालय के अध्यक्ष, उपाध्यक्ष और प्रत्येक सदस्य का कार्यकाल में कार्यभार ग्रहण करने की तिथि से तीन वर्ष का होगा। आयोग के अध्यक्ष को एक केंद्रीय मंत्री का दर्जा प्राप्त होता है और उपाध्यक्ष को एक राज्यमंत्री का दर्जा प्राप्त होता है। आयोग के अन्य सदस्यों को भारत सरकार के एक सचिव का रँक प्राप्त होता है। आयोग के अध्यक्ष, उपाध्यक्ष और तीन सदस्यों को नियुक्ती राष्ट्रपती के हस्ताक्षर और मुहर सहित एक अधिपत्र के माध्यम से कि जाएगी।

अनुसूचित जनजाति अयोग की स्थापना अनुच्छेत 338 में संशोधन करके और संविधान (89 वां संशोधन) अधिनियम, 2003 के माध्यम से संविधान में एक नया अनुच्छेद 338अ अंत स्थापित करके की गयी थी। इस संशोधन द्वारा तत्कालीन राष्ट्रीय असूचित जाती एवं राष्ट्रीय अनुसूचित जनजाति आयोग को 19 फरवरी 2004 से दो अलग-अलग आयोंग में नामत: 1) राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोग ओर 2) राष्ट्रीय

